

'गोदान' नंतर हिंदी कादंबरीक्षेत्रात श्रीलाल शुक्ल यांची प्रस्तुत 'राग दरबारी' कादंबरी अतिशय महत्त्वाची आहे. यात शहराहून खेड्याकडे होणाऱ्या प्रयाणाची कथा सांगितलेली आहे. सामाजिक बेईमानी, धूर्तपणा आणि वंचना यांना संवेदनांच्या धरातलावर अनावृत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील वस्तुस्थितीवर यात अर्थपूर्ण व्यंग केले आहे.

श्रीलाल शुक्ल हिंदीतील प्रख्यात व्यंगकार आहेत. आपल्या उपहासगर्भ लेखांमधून त्यांनी समाज व राजनीतीवर हल्ला चढविलेला आहे. भाषा आणि विषयावरील अधिकारामुळे 'राग दरबारी' मध्ये सामाजिक व्यंग भरपूर असले तरी उपरोधाबरोबरच असलेल्या गांभीर्यामुळे प्रस्तुत कादंबरी अभिजात वाङमयाच्या तोडीची झाली आहे.

रु. 55.00

ISBN 81-237-1226-X

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

# राग दरबारी

श्रीलाल शुक्ल



आंतरभारतीय पुस्तकमाला

# राग दरबारी

श्रीलाल शुक्ल

अनुवाद

श्रीपाद जोशी

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN 81-237-1226-X
पहिली आवृत्ती : 1976 *(शके* 1898)
दुसरी आवृत्ती : 1995 *(शके* 1916)
तिसरी आवृत्ती : 2006 *(शके* 1928)
मूळ © श्रीलाल शुक्ल
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1976
Original title : Rag Darbari *(Hindi)*
Marathi translation : Rag Darbari

रु. 55.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

# प्रस्तावना

हिंदी कादंबरीचा इतिहास एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून सुरू होतो. परंतु एका गंभीर व सुस्पष्ट परंपरेची सुरूवात प्रेमचंदांपासून होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभिक दशकांमध्ये पाश्चात्य जगातील कादंबरी-साहित्य आपल्या विकासाच्या शिखरावर जाऊन पोचले असता हिंदी कादंबरी आपल्या शैशवकालीन बाळबोध वळणातून मुक्त होण्यासाठी धडपड करीत होती ही एक आश्चर्याचीच गोष्ट समजता येईल. प्रेमचंदांच्या कलाकृतींनी थोड्याच वर्षांच्या अवधीत कादंबरी साहित्यात नवीन विक्रम स्थापित केले आणि हिंदी कादंबरीला जागतिक कादंबरीच्या बरोबरीचा दर्जा मिळवून देऊन तिला उत्कृष्ट कादंबरीविश्वाच्या मानचित्रावर स्थानापन्न केले.

विसावे शतक हे राजकीय क्रांत्या, सांस्कृतिक संक्रमणे आणि मानव - नियती यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे शतक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या प्रगतीने संस्कृती व कलाविद्या यांची निरर्थकता सिध्द करणारे पुरावे पुढे आणले आहेत, एवढेच नव्हे तर कलांना एक बिकट आव्हानही दिले आहे. विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या आव्हानांसमोर कादंबरीही तशीच उभी आहे. कादंबरीतील अतिकल्पना विज्ञानाने साकारही केल्या आहेत. परंतु मानवी आकांक्षांचे अक्षय भांडार अजून भरलेले आहे. तंत्रज्ञानासमोर स्वतःला क्षुद्र समजण्याची मानवी भावना आणि तिची संपूर्ण विरूपता यांचे चित्रण कादंबरी करते. आमच्या आजच्या सामाजिक व वैयक्तिक जीवनातील नरकालाही तेवढ्याच तीव्रतेने आधुनिक कादंबरीने आपला विषय बनविले आहे. हिंदी कादंबरी-साहित्याच्या संदर्भात असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही की त्यातही मानवी स्थितीची अशी चित्रणे उपलब्ध आहेत जी कोणत्याही महत्त्वपूर्ण भाषेत उत्कृष्ट कामगिरी समजली जातात. हिंदी कादंबरीचा इतिहास फारसा मोठा नाही हे खरे, तरी पण तिच्या कामगिरीचे टप्पे महत्त्वाचे आहेत.

प्रेमचंदांच्या आधीची हिंदी कादंबरी जादूटोणे व ऐतिहासिक चमत्कार यांनी भरलेली आहे. ती आपली कसलीही परंपरा निर्माण करू शकली नाही, हाच तिच्या महत्त्वहीनतेचा सर्वात भरीव पुरावा होय. भाषा आणि कलात्मकता याबाबतीत त्या कादंबरीने साहित्यात कसलीच भर घातली नाही. पहिल्या प्रथम प्रेमचंदांनीच

सामाजिकतेच्या जाणीवेतील काही मुद्दे पकडण्याचा प्रयत्न केला. सामाजिक परिवर्तन, स्वातंत्र्य, रूढ व मरणोन्मुख मुल्यव्यवस्थेला विरोध आणि अनेकानेक समस्यांचे निदान करणारे मानवी प्रयत्न या गोष्टींचा त्यांत समावेश होता. प्रेमचंदांची 'गोदान' ही कादंबरी म्हणजे एक मैलाचा दगड असून तेथून आधुनिक हिंदी कादंबरीचे नवे युग सुरू होते. 'गोदान'मध्ये शेतकऱ्याचा मजूर बनण्याची करुण गाथा आहे. हे एक विशिष्ट सूत्र आहे. त्याच्या द्वारे प्रेमचंद सावकारशाहीवर म्हणजेच भांडवलशाही व्यवस्थेवरही प्रहार करू इच्छित होते आणि शेतकऱ्याचे मजुरात रूपांतर होण्याची शोकांतिका (ट्रॅजेडी) हा शहरीकरणाच्या भयानक भूमिकेचा पुरावा आहे, हेही ते सांगू इच्छित होते. शहर आणि खेडेगाव या दोन विभिन्न बिंदूंना स्पर्श करणारी ही कथा म्हणजे आमच्या वर्तमान काळाचा एक ऐतिहासिक दस्तऐवज आहे. प्रेमचंद आणि त्यांचे अधिकांश समकालीन यांनी 'सामाजिक वास्तवता' हाच आपला विषय बनविला होता. लोकजीवनाच्या विविध दृश्यांनी परिपूर्ण असलेल्या प्रेमचंदकालीन कादंबऱ्यांमध्ये लोकसंस्कृतीची सारी रूपे विद्यमान आहेत. दास्यातून मुक्तता, शेतकरी व कामकरी यांचा आर्थिक संघर्ष आणि भारतीय समाजात न्याययुक्त समाजवाद आणण्याच्या संकल्पाची महत्त्वपूर्ण सक्रियता यांचा त्यांमध्ये प्रामुख्याने समावेश होतो. साऱ्या जगात फॅसिझम, विश्वयुध्द आणि साम्राज्यवादी मनोवृत्ती यांनी दहशतीचे जे वातावरण निर्माण केले होते त्याचे शब्दबद्ध चित्रण स्वातंत्र्यासाठी केलेल्या संघर्षाच्या घटनांमधून आजही या हिंदी कादंबरीत शोधता येते. जन-आंदोलनाच्या वास्तवतेतून निर्माण झालेल्या राष्ट्रीय मनोवृत्तीची ही कादंबरी. दुसऱ्या महायुध्दानंतर 'मानवा'ला केंद्र बनवून 'व्यक्ती'च्या आंतरिक विश्वातील कथांची कादंबरी कशी बनली, याचा इतिहास नक्कीच मनोरंजक ठरेल. तरी पण एवढे खरे की, सामाजिक आधारानंतर व्यक्तीच्या खासगी विश्वाचे चित्रण ही काही आकस्मिक घटना नव्हे. वस्तुतः 'व्यक्ती'च्या विश्लेषणाचा हा प्रवाह म्हणजे 'व्यक्ती'च्या संशोधनाचाच प्रवाह आहे. अज्ञेय, जैनेंद्र, इलाचंद्र जोशी, भगवतीचरण वर्मा इत्यादींच्या कादंबऱ्यांबरोबरच यशपाल, अश्क, अमृतलाल नागर, वृंदावनलाल वर्मा वगैरेंच्या कादंबऱ्याही खऱ्या अर्थाने भारतीय लोकजीवनाच्या विविध सांस्कृतिक क्षेत्रातील कथा वर्णन करतात.

स्वातंत्र्य हा एक प्रमाणभूत बिंदू आहे. तो आधारभूत धरून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कादंबरीची चर्चा करता येईल. हिंदी कादंबऱ्यांमध्ये सामाजिक वास्तवता आणि मनोविश्लेषण यांच्या महत्त्वपूर्ण प्रयोगानंतर एका सर्वस्वी नवीन पृष्ठभूमीचा स्पर्श स्वातंत्र्यानंतर पाहावयास मिळतो. लेखकांची नवी पिढी ही भारतीय राजकारण व स्वातंत्र्योत्तर भारताची वास्तवता यांचे यथार्थ संदर्भात चित्रण करण्यात यशस्वी झाली आहे. मोहन राकेश, फणीश्वरनाथ रेणु, कृष्ण बलदेव वेद, नागार्जुन, भैरवप्रसाद



गुप्त, कमलेश्वर, राजेंद्र यादव, रांगेय राघव, नरेश मेहता वगैरे कादंबरीकारांच्या कलाकृतींचा या संदर्भात उल्लेख करता येईल. रेणूंची 'मैला आँचल' व नागार्जुनांची 'बलचनमा' या कादंबऱ्यांनी प्रेमचंदकालीन सामाजिक वास्तवतेच्या मनःस्थितीचे विकसित रूप चित्रित केले आहे आणि सहानुभूतीच्या पार्श्वभूमीवर आधुनिक भारतीयांचा लोकानुभव व्यक्त केला आहे. या कादंबऱ्यांपैकी अनेक कादंबऱ्या आमच्या आजच्या युगातील 'क्लासिकल कादंबऱ्या' बनल्या आहेत. आधुनिक रचनाच आधुनिक काळातील अभिजात कलाकृती म्हणून मान्यता पावाव्यात, ही एक आश्चर्यकारक वस्तुस्थिती आहे. अर्थात्, वास्तवतेच्या दृष्टीनेच नव्हे तर कलात्मकता व अनुभूतीच्या दृष्टीनेही स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक कादंबऱ्या म्हणजे 'कादंबरीचे तंत्र' पुनः उकलून सांगण्याचेच प्रयत्न आहेत, ही गोष्टही नाकारता येणार नाही. स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षांमध्ये तरूण लेखकांची जी नवी पिढी उदयास आली आहे तिनेही काही गाजलेल्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. या कादंबऱ्या आकाराने लहान आहेत, परंतु आजची वास्तवता समजून घेण्यास त्या एका दृष्टीने प्रमाणभूत मानता येतील. श्रीकांत वर्मा, श्रीलाल शुक्ल, रमेश बक्षी, महेंद्र भल्ला इत्यादी लेखकांनी आपल्या कादंबऱ्यांतून आपल्या काळातील 'कुरूपता' तिच्या संपूर्ण रूपात चित्रित केली आहे. आपल्या सामाजिक जीवनात जे काही आहे त्याच्या कलात्मक व्याख्या कोणत्याही माध्यमातून करणे शक्य नाही; कारण आज जे काही आहे ते म्हणजे एका विकृत प्रकारच्या विध्वंसाचाच भाग आहे. व्यक्ती, कुटुंब, जात, व्यवस्था, संस्था, विश्वास व अपेक्षित भवितव्य यासंबंधी जो दृष्टिकोण विकसित झाला आहे त्याला चक्रम, बंडखोर अथवा निराशावादी यांसारखी विशेषणे लावून भागणार नाही. त्याबाबतीत असे म्हणावे लागेल की ती एक विकल्परहित स्थिती असून ती नष्टच करता येणे शक्य आहे. वस्तुतः काही कादंबऱ्यांनी ही स्थिती नष्ट करण्याची वैचारिक भूमिका पार पाडली आहे. स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचा वापर करण्यात गुंतलेल्या राजकारणाने आमचे सांस्कृतिक संक्रमण किती मर्यादेपर्यंत अधिक संकटपूर्ण बनविले आहे ही एक विचित्र परंतु शोकांतिक गाथा आहे. आजच्या कादंबरीकारांनी याच शोकांतिकेला आपल्या कादंबरीचे उद्दिष्ट बनविले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील कादंबरीकार ज्या पातळीवरून मनुष्याच्या सामाजिक व आंतरिक समस्यांचे व्यथापूर्ण चित्रण करीत होता, ती पातळी व ती पद्धत सोडून देऊन नव्या कथाकाराने स्वतःला सामाजिक स्थितीच्या समोर ठेवून वस्तुतः समाजातील नष्ट होत चाललेल्या श्रद्धाच उघड्या करून दाखविल्या आहेत. 'जहाज का पंछी' या कादंबरीची 'अंधेरे बंद कमरे' या कादंबरीशी तुलना होऊ शकत नाही. कोणत्याही दोन कादंबऱ्यांची तुलना बहुदा कोणत्याच पातळीवर होऊ शकत नाही. सोयीखातर फक्त एवढेच म्हणता येते की

दोन कादंबऱ्यांमध्ये दोन वेगवेगळे दृष्टिकोण आढळतात. हा दृष्टिकोण अथवा मनःस्थिती ही एक प्रकारे कादंबरीचा मूलभूत आधार किंवा नियामक तत्त्व असते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर लिहिल्या गेल्या असूनही दोन कादंबऱ्यांच्या दृष्टीकोनात अंतर असू शकते. म्हणूनच जेव्हा आपणाला एखाद्या कादंबरीत मानवी पातळीवर 'व्यक्ती'च्या अंतर्जगाचे चित्रण आढळते आणि दुसऱ्या एखाद्या कादंबरीत आपल्या वास्तवतेशी सामना करणाऱ्या त्या शोकांतिकेचे मानवी रूप पाहावयास मिळते, तेव्हा आजच्या कादंबरीला कालच्या कादंबरीपासून वेगळेपण देणाऱ्या गोष्टी त्या दोन विभिन्न दृष्टीकोणांमध्ये आपल्याला शोधता येतात.

'गोदान'पासून 'राग दरबारी' पर्यंतच्या प्रवासात अशा असंख्य महत्त्वपूर्ण कादंबऱ्या येऊन जातात की ज्या अभिजात महत्तेने विभूषितही आहेत आणि आधुनिक कादंबरीप्रमाणे प्रायोगिक कादंबऱ्याही आहेत. 'गोदान' व 'राग दरबारी' हे दोन ध्रुव आहेत. त्यांमध्ये रचनाशैलीचे काहीही साम्य नसले तरी भारतीय जीवनविश्वाच्या दोन महत्त्वपूर्ण बिंदूचे, दोन सांस्कृतिक दृष्टींचे अस्तित्व या दोन्ही कादंबऱ्यांत आहे. प्रेमचंद हे त्या मानाने अधिक प्रख्यात कादंबरीकार आहेत. साहित्यविश्वातील त्याची मानमान्यता 'राग दरबारी'चे लेखक श्रीलाल शुक्ल यांच्या ख्यातीहून सर्वस्वी वेगळी आहे. ज्या साहित्यिकांनी मूलतः आपल्या प्रयोगशील निर्मितीने साहित्यात स्थान मिळविले आहे अशा नवलेखकांपैकी श्रीलाल शुक्ल हे आहेत. 'राग दरबारी' पूर्वी श्रीलाल शुक्ल हे एक व्यंगलेखक म्हणून हिंदीत प्रसिद्ध होते. 'राग दरबारी' ही कादंबरी लिहिल्यानंतर ते अचानक महत्त्वपूर्ण कादंबरीकार म्हणून पुढे आले. या ठिकाणी हे सांगणे आवश्यक आहे की व्यंगलेखक या नात्याने श्रीलाल शुक्ल आपल्या व्यंगलेखांमध्ये (विशेषतः 'अंगद का पाँव' या लेखसंग्रहामध्ये) जे 'गांभीर्य' व्यक्त करीत असत तेच 'गांभीर्य' त्यांच्या या कादंबरीतही आहे. अर्थात् काही टीकाकारांनी 'राग दरबारी' ही कादंबरी नसून व्यंगलेखांचा तो नुसता संग्रह आहे, असे म्हटले आहे, हा भाग वेगळा. तरी पण 'गोदान' व 'राग दरबारी' या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये विषयाचे गांभीर्य आहे, यात शंका नाही. ज्यांच्या लेखनसामर्थ्याविषयी शंका घेण्यास जागा नाही, अशा दोन लेखकांच्या या कलाकृती आहेत. मजेची गोष्ट अशी की 'गोदान'मध्ये खेड्यातून शहराकडे असा प्रवास आहे, शहरीकरणाच्या प्रक्रियेचे शोकांतिक सत्य त्यात गुंफलेले आहे; तर 'राग दरबारी' मध्ये शहराकडून खेड्याकडे प्रयाण केलेले आहे. स्वातंत्र्यापूर्वी शहरीकरणाच्या आंधळ्या शर्यतीत शहराला महत्त्व होते. ते महत्त्व आजही कमी झालेले नाही. तरी पण राजकीय भ्रष्टाचारापासून वाचण्यासाठी, इतर शहरी दडपणांपासून बचाव करण्यासाठी खेड्यांकडे जाण्याचे जे सूत्र आहे त्यातून आजच्या भारताचे खरेखुरे चित्र व्यक्त होते. 'खेडे' आणि 'शहर' ही भारतातील लोकजागृती व भारताचे पतन यांची दोन सांस्कृतिक केंद्रे आहेत. तेथील जीवनांमध्ये सर्व प्रकारच्या भिन्नता आहेत. परंतु लोकशाहीकरणाने त्यांना जे 'संस्कार' दिले आहेत ते कमीअधिक प्रमाणात एकच आहेत. जेथील ग्रामीण वातावरण जातीयतेपासून अलिप्त नाही, असे एक मध्यम आकाराचे खेडवळ गाव मोठमोठ्या शहरांत चालणाऱ्या राजकीय हालचालींमध्ये पूर्णपणे गुरफटलेले आहे. हे सत्य 'राग दरबारी'च्या शीर्षकातूनच प्रतिध्वनित होते. लहानमोठ्या शहरांमध्ये चाललेल्या राजकारणातून जो नवीन स्वभाव बनत आहे त्यामुळे अनेक पातळ्यांवर एक नव्या प्रकारची सरंजामशाहीच उदयाला येत आहे. 'राग दरबारी' च्या व्यंगकथांचा प्रहार याच सरंजामशाहीवर आहे. ती नुसतीच अमानुष आहे असे नव्हे तर अत्यंत कुरूप, किळसवाणी व असह्य आहे.



कथनशैलीची विविधता, तिच्यातील नवनवीन प्रयोग व भाषेची रोचकता यांच्यामुळे 'राग दरबारी' कोणत्याही अभिजात कादंबरीपेक्षा कमी सरस उतरलेली नाही. तरी पण तिला आधुनिक अभिजात साहित्यात समाविष्ट करणे योग्य होणार नाही. ही शोकांतिका म्हणजे एक सार्थक व्यंग आहे. प्रचलित व्यवस्थेच्या खेळात भाग घेऊनही त्यापासून अलिप्त राहण्याची करामत तिच्यात आहे. स्वतः विद्यमान राहून आपले अस्तित्व नष्ट करणे हे उत्कृष्ट लेखनाचे उद्दिष्ट असू शकते. परंतु या ठिकाणी 'राग दरबारी' चे गुणवर्णन करणे हा माझा उद्देश नाही. (कलेच्या दृष्टीने केवळ कलात्मकता हाच महत्त्वाचा आधार ठरू शकत नाही, कारण तथाकथित कलात्मक दृष्टीने 'हीन' असणारी कलाहीन कृती श्रेष्ठ असू शकते.) इतर काही बाबतीत 'राग दरबारी' कोठेकोठे कच्ची असू शकेल, परंतु अनुभूतीच्या पातळीवर तो एक प्रामाणिक प्रयत्न आहे - आमचा सामाजिक अप्रामाणिकपणा, धूर्तता व प्रवंचना उघड करून दाखविणारा प्रामाणिक प्रयत्न !

एका टीकाकारांनी 'राग दरबारी' ही प्रादेशिक कादंबऱ्यांतील शेवटची कलाकृती आहे असे म्हटले आहे. त्यांच्या मते प्रादेशिक कादंबऱ्यांची सुरुवात कोठून होते, हे मला माहीत नाही. तरी पण एवढे अवश्य म्हणता येईल की 'राग दरबारी' ही अर्थपूर्ण व्यंगलेखनाची सुरुवात नक्कीच आहे. यात असभ्य व्यंग प्रसंगही आहेत. परंतु प्रत्येक व्यंग प्रसंग वरवर पाहाता कुरूपच असतो. युक्तिवादाच्या भाषेत प्रत्येक प्रहार हे आक्रमण असते आणि प्रत्येक आक्रमण ही एका रक्तरंजित कुरूपतेची सुरुवात असते. आजच्या भाषेत ज्याला विरोध किंवा विद्रोह असे म्हटले जाते त्याला व्यंगाच्या किंवा उपरोधाच्या भाषेत सहमती असे संबोधून त्यातील अंतर्गत अर्थ-स्वार्थाचा पाया उखडून काढला जातो, त्याला त्याच्या खऱ्याखुऱ्या पद-अर्थाच्या संदर्भात पाहाण्या-ओळखण्याचा प्रयत्न केला जातो. एक व्यंग कलाकृती या नात्याने 'राग

दरबारी'च्या यशस्वितेसंबंधी चर्चा होऊ शकते. परंतु ती एक शोकांत पण साक्षात् व्यंग कृती आहे यात मुळीच शंका नाही. तिच्या स्वतःचा असा एक दृष्टिकोण आहे. तो समजून घेण्याचा दुसरा एखादा मार्गही असेल, असे म्हणता येईल. कदाचित् ती 'कृतीच्या मार्गा'ने पाहाण्याची शक्यता असलेली कादंबरी आहे, असेही म्हणता येईल. कदाचित् अशासाठी की, ती एक कादंबरी आहे आणि व्यंगकृतीही. समाजव्यवस्थेचे कुरूप चेहरे, राजकारणातील किळसवाण्या लटपटी-खटपटी उघड्या करण्याचे काम वृत्तपत्रही करू शकते या दृष्टीने 'राग दरबारी' व वृत्तपत्र यांच्या तात्कालिकतेत फरक आहे. वृत्तपत्र ही कलाकृती नसते, 'राग दरबारी' ही कलाकृती आहे, आणि कलाकृती असण्याची पहिली अट ही आहे की ती विवादास्पद असली पाहिजे, सर्व प्रकारच्या शंकाकुशंकांनी भरलेली असली पाहिजे. 'राग दरबारी' ही केवळ विवादास्पद कादंबरीच नाही तर हे 'संदेहा'चे केंद्रही आहे, यात मुळीच शंका नाही.

— गंगाप्रसाद विमल

# १

शहराचा किनारा. तो सोडला की भारतीय खेड्यांचा महासागर सुरू होत होता.

तेथेच एक ट्रक उभा होता. त्याच्याकडे पाहाताच त्याचा जन्म केवळ सडकांवर बलात्कार करण्यासाठी झालेला आहे याविषयी खात्री पटत होती. सत्याला जशा अनेक बाजू असतात तशा या ट्रकालाही अनेक बाजू होत्या. त्याच्याकडे एका बाजूने पाहून तो सडकेच्या मधोमध उभा आहे, असे पोलिसवाले सांगू शकत होते, तर त्याच्याकडे दुसऱ्या बाजूने पाहून तो रस्त्याच्या कडेला आहे असे ड्रायव्हर म्हणू शकत होता. चालू फॅशनप्रमाणे ड्रायव्हरने ट्रकाचे उजवीकडील दार उघडून पंखासारखे पसरले होते. त्यायोगे ट्रकाचे सौंदर्य वाढले होते. त्याचबरोबर तो तेथे उभा असतांना दुसरे कोणतेही वाहन तेथून जाऊ शकेल हा धोका उरला नव्हता.

रस्त्याच्या एका बाजूला पेट्रोलपंप होता. दुसऱ्या बाजूला लाकडी फळकुटे, पत्र्याचे गंजलेले तुकडे आणि स्थानिक शक्यतेनुसार उपलब्ध होणाऱ्या अडगळीचा वापर करून उभी केलेली छपरांची दुकाने होती. त्यांच्याकडे पाहिल्यानंतर त्यांची संख्या नक्की किती असावी ते सांगता येत नसे. बहुतेक सर्वच दुकानांत जनतेचे एक मनपसंत पेय मिळत होते. धूळ, किटण, चहाची अनेकदा वापरलेली पत्ती आणि उकळते पाणी इत्यादींच्या साह्याने ते पेय तेथे तयार केले जात असे. त्या दुकानांत वेगवेगळ्या मिठायाही होत्या. या मिठाया अहोरात्र पाऊस-पाणी, वादळवारा, माशा-डास यांच्या हल्ल्यांना मोठ्या शौर्याने तोंड देत होत्या. आमच्या देशी कारागिरांचे हस्तकौशल्य व त्यांची वैज्ञानिक दक्षता यांचा तो पुरावाच होता. दाढी करण्याचे एक चांगलेसे पाते बनविण्याची योग्यता आमच्यामध्ये नसली तरी केरकचऱ्यांतून स्वादिष्ट खाद्यपदार्थ निर्माण करण्याची युक्ती मात्र साऱ्या जगात फक्त आम्हालांच अवगत असल्याचे त्या मिठाया सिद्ध करीत होत्या.

ट्रकाचा ड्रायव्हर व क्लीनर एका हॉटेलसमोर उभे राहून चहा पीत होते. रंगनाथाने दुरूनच हा ट्रक पाहिला आणि त्याची पावले झपझप पडू लागली. आज आगगाडीने त्याला फसविले होते. स्थानिक पॅसेंजर ट्रेन नेहमीप्रमाणे दोन तास लेट असेल असे समजून, तो घरून निघाला होता. परंतु ती गाडी आज फक्त दीड तासच उशीरा येऊन

निघून गेली होती. तक्रारवहीतील कथा-साहित्यात आपलीही भर घालून आणि रेल्वे अधिकाऱ्यांच्या दृष्टीने हास्यास्पद ठरून तो स्टेशनाबाहेर पडला होता. रस्त्याने येता-येता त्याला हा ट्रक दिसला आणि त्याची कळी उमलली.

तो ट्रकजवळ जाऊन पोचला तेव्हा क्लीनर व ड्रायव्हर चहाचे उरलेले घुटके घेत होते. इकडे-तिकडे पाहात, आपला आनंद लपवीत, त्याने निर्विकारपणे ड्रायव्हरला विचारले, ''काय ड्रायव्हरसाहेब, हा ट्रक शिवपालगंजच्या बाजूलाच जाणार ना ?''

ड्रायव्हरजवळ पिण्यासाठी चहा आणि बघण्यासाठी दुकानदारीण होती. त्याने बेफिकीरपणे उत्तर दिले, ''होय.''

''आम्हांलाही नेता का तुमच्याबरोबर ? पंधराव्या मैलाला आम्ही उतरू. शिवपालगंजपर्यंत जायचंय.''

ड्रायव्हरने दुकानदारिणीच्या साऱ्या शक्यता एका नजरेत मापल्या आणि मग रंगनाथकडे दृष्टी वळवली. अहाहा! काय ते रूप! पाय खादीच्या पायजम्यात, डोके खादीच्या टोपीत, शरीर खादीच्या सदऱ्यात. खांद्यावर लटकणारा भूदानी थैला. हातात कातडी अॅटॅची. ड्रायव्हर त्याच्याकडे पाहातच राहिला. नंतर काही तरी विचार करून तो म्हणाला, ''बैठ जाईए शिरिमानजी, अभी चलते है !''

घरघर आवाज करीत ट्रक निघाला. शहरालगतची वेडीवाकडी वळणे पार केल्यावर स्वच्छ व निर्जन सडक सुरू झाली. या ठिकाणी ड्रायव्हराने प्रथमच टॉप गियरचा वापर केला. पण तो पुनःपुनः घसरून न्यूटरलवर येऊ लागला. जेमतेम शंभर यार्ड अंतर तोडले की गियर खाली घसरे आणि अॅक्सिलरेटर दाबलेला असल्यामुळे ट्रकाची घरघर वाढे व वेग कमी होई. रंगनाथ म्हणाला, ''ड्रायव्हरसाहेब, तुमचा हा गियर म्हणजे अगदी आपल्या भारत सरकारसारखा आहे.''

ड्रायव्हरने स्मित करून हे प्रशंसापत्र स्वीकारले. आपल्या विधानाचे स्पष्टीकरण करण्यासाठी रंगनाथ म्हणाला, ''भारत सरकारला वाटेल तितक्यांदा टॉप गियरमध्ये टाका. दोन पावलं चालून होतात न होतात तोच ते खाली घसरतं, आणि पुनः आपल्या खाचेत येऊन बसतं.''

ड्रायव्हर हसून म्हणाला, ''शिरिमानजी, मोठी मुद्याची गोष्ट बोललात तुम्ही.''

ड्रायव्हरने या खेपेला गियर टॉपला टाकला आणि आपली टांग जवळजवळ नव्वद अंशाच्या कोनापर्यंत वर उचलून गियर मांडीखाली दाबून धरला. सरकार चालविण्याची देखील हीच युक्ती आहे, असे म्हणण्याची इच्छा रंगनाथला झाली, परंतु



त्यामुळे संभाषण जरा जास्तच वरच्या पातळीवर जाईल, असे वाटून तो गप्प राहिला.

तिकडे ड्रायव्हरने गियरवरून मांडी उचलून ती पूर्ववत् जागच्या जागी ठेवली होती. त्याने गियरवर एक लांब लाकूड ठेवले आणि त्याचे एक टोक पॅनलच्या खाली ठोकून बसविले. ट्रक भरधाव चालू लागला. ट्रक येत आहे असे पाहून सायकलस्वार, पायी जाणारे, बैलगाड्या वगैरे सर्वजण अनेक फर्लांग आधीच घाबरून रस्त्याच्या कडेला जात व रस्ता सोडून खाली उतरत. ती वाहने अशा काही गडबडीने रस्ता सोडून बाजूला होत होती की जणू त्यांच्या दृष्टीने तो ट्रक सामान्य ट्रक नसून ती आगीची ज्वाळा होती, बंगालच्या उपसागरावरून घोंघावत येणारे चक्रीवादळ होते, जनतेवर सोडलेला खाष्ट अधिकारी होता, पेंढाऱ्यांचे टोळके होते. रंगनाथला वाटले, आपण आधीच असे जाहीर करायला हवे होते की, ''लोकहो सावधान. आपापली गुरं आणि मुलंबाळं घरात बंद करून ठेवा. शहराच्या बाजूनं नुकताच एक ट्रक सुटलाय.''

एवढ्यात ड्रायव्हरने विचारले, ''काय शिरिमानजी, काय हालहवाल आहे ? पुष्कळ दिवसांनंतर खेड्याकडे चाललाहात ?''

या औपचारिक संभाषणाला उत्तेजन देण्यासाठी रंगनाथ किंचित हसला. ड्रायव्हर म्हणाला, ''शिरिमानजी, आजकाल काय चाललंय तुमचं ?''

''घास (गवत) खोदतोय !''

ड्रायव्हर हसला. याचवेळी दहा-बारा वर्षांचा एक नागडा-उघडा पोरगा ट्रकाखाली सापडता-सापडता बचावला. जीव वाचवून तो एका छोट्या पुलाखाली पालीसारखा जाऊन पडला. ड्रायव्हरवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. अॅक्सिलरेटर दाबून हसत-हसत तो म्हणाला, ''वाह ! छान ! जरा खुलासा तर करा !''

''खुलासा कसला डोंबलाचा ? घास खोदतोय. यालाच इंग्रजीत रिसर्च (संशोधन) म्हणतात. गत वर्षी एम. ए. झालो. यंदापासून रिसर्च सुरू केलाय''

ड्रायव्हरला वाटले, आपण जणू अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टीच ऐकतो आहोत. तो हसत म्हणाला, ''पण शिरिमानजी, शिवपालगंजला कशासाठी चालला आहात ?''

''तिथं माझे मामा असतात. मी मध्यंतरी जरा आजारी होतो. आता काही दिवस हवापालट करायला चाललोय.''

यावर ड्रायव्हर बराच वेळ खो-खो करून हसत राहिला. तो म्हणाला, ''छान ! काय बनवता साहेब मला !''

रंगनाथने त्याच्याकडे साशंकपणे पाहात विचारले, ''अहो, यात बनवाबनवी कसली ?''

त्याच्या त्या भोळेपणाच्या अभिनयाने ड्रायव्हर भलताच खुष होऊन हसत हसत

म्हणाला; "छान ! बरं ते जाऊ द्या. मला असं सांगा, मित्तल साहेबांची काय हालहवाल ? पोलिस कस्टडीत असलेल्या त्या आरोपीच्या खुनाची मानगड मिटली की नाही ?"

रंगनाथ घाबरून गार पडला. घोगऱ्या आवाजात तो म्हणाला, "अहो मला काय माहीत हा मित्तल कोण, कुठला ते ?"

ड्रायव्हरच्या हसण्याला ब्रेक लागला. ट्रकाचा वेगही थोडा मंदावला. त्याने रंगनाथकडे एकदा निरखून पाहिले आणि विचारले, "तुम्ही मित्तल साहेबांना ओळखत नाही ?"

"अं ऽ हं !"

"जैन साहेबांना -?"

"मुळीच नाही."

ड्रायव्हर खिडकीतून बाहेर पचकन थुंकला आणि त्याने सरळ सरळ प्रश्न केला, "तुम्ही सी. आय. डी. त काम करत नाही ?"

रंगनाथ वैतागून म्हणाला, "सी. आय. डी. ? ही काय मानगड आहे ?"

ड्रायव्हरने एक उसासा सोडला, आणि तो समोर रस्त्याकडे पाहू लागला. कांही बैलगाड्या समोरून चालल्या होत्या. जेव्हा आणि जेथे संधी मिळेल तेव्हा आणि तेथे आरामात ताणून देणे आपले कर्तव्य आहे, या लोकप्रिय सिद्धांतानुसार गाडीवान बैलगाड्यांवर पहुडले होते आणि तोंडावरून पांघरून घेऊन आरामात झोपले होते. बैल आपल्या लायकीमुळे नव्हे तर सवयीप्रमाणे निमूटपणे गाडी फरफटत चालले होते. हेही जनता-जनार्दनाचेच एक रूप होते. पण आता काही बोलण्याची हिम्मत रंगनाथला झाली नाही. सी. आय. डी. च्या उल्लेखाने तो अस्वस्थ झाला होता. ड्रायव्हरने प्रथम रबरी हॉर्न वाजवला. नंतर त्याहून कर्कश असा दुसरा हॉर्न वाजवला. त्यात संगीताचे आरोह-अवरोह असले तरी तो फारच भयंकर होता. पण गाड्या त्याच्याकडे दुर्लक्ष करून तशाच चालत राहिल्या. ड्रायव्हर खूप वेगाने ट्रक चालवीत होता आणि बैलगाड्यांवरून तो पुढे नेण्याची त्याची मनीषा होती. परंतु गाड्यांजवळ पोचता-पोचता बहुदा अचानकपणे त्याच्या लक्षात आले असावे की आपण हेलिकॉप्टर चालवत नसून ट्रक चालवत आहोत. त्याने एकदम ब्रेक लावला. पॅनेलला अडकविलेले लाकूड खाली पाडले, गियर बदलला आणि बैलगाड्यांना जवळ जवळ घासतच तो पुढे निघून गेला. पुढे गेल्यावर त्याने तुच्छतेच्या स्वरात रंगनाथला म्हटले, "तू सी. आय. डी. नाहीस तर मग ही खादी कशाला अंगावर घातली आहेस ?"

त्याच्या या हल्ल्याने रंगनाथांची पाचावर धारण बसली. तरी पण हा प्रश्न सामान्य चौकशीच्या स्वरूपाचा असावा असे समजून तो म्हणाला, "खादी तर आजकाल सर्वच



लोक वापरतात."

"हुं : ! कुणी भला माणूस खादी वापरतो वाटतं ?" असे म्हणून तो पुनः एकदा खिडकीबाहेर तोंड काढून थुंकला आणि त्याने गियर टॉपला टाकला.

ट्रकाच्या मागून बऱ्याच वेळापासून एक हॉर्न वाजत असलेला ऐकू येत होता. रंगनाथाला तो ऐकू येत होता आणि ड्रायव्हर तो ऐकून न ऐकल्यासारखे करीत होता. थोड्या वेळानंतर मागल्या बाजूनं क्लीनराने लोंबकळत ड्रायव्हरच्या कानशिलाजवळ खिडकीवर खटखट असा आवाज करण्यास सुरूवात केली. त्याबरोबर ड्रायव्हराने वेग कमी केला आणि ट्रक रस्त्याच्या डाव्या बाजूला घेतला.

हॉर्नचा आवाज एका स्टेशनवॅगनमधून येत होता. ती स्टेशनवॅगन उजव्या बाजूने पुढे गेली. तिने आपला वेग कमी केला. तिच्यातून बाहेर आलेल्या एका खाकी हाताने ट्रकाला थांबण्याची खूण केली. दोन्ही गाड्या थांबल्या.

स्टेशनवॅगनमधून एक अधिकाऱ्यासारखा दिसणारा पट्टेवाला आणि पट्टेवाल्यासारखा दिसणारा अधिकारी खाली उतरला. खाकी कपडे घातलेले दोन शिपाईही खाली उतरले. ते खाली उतरताच त्यांनी पेंढाऱ्यांप्रमाणे लुटालूट व हिसकाहिसकी सुरू केली. कुणी ड्रायव्हराचे ड्रायव्हिंग लायसेन्स हिसकावून घेतले, कुणी रजिस्ट्रेशन कार्ड काढून घेतले. एकजण बॅकव्ह्यू मिरर वाकडा-तिकडा करून पाहू लागला तर दुसरा ट्रकचा हॉर्न वाजवू लागला. कोणी ब्रेक तपासू लागला. त्यांनी फुटबोर्ड हलवून पाहिला, दिवे लावले, मागील बाजूस वाजणारी घंटी वाजविली. त्यांनी जी जी गोष्ट तपासली ती ती सदोष निघाली. जे पहावे त्यात काही तरी गडबड असल्याचे त्यांना आढळून आले. अशा प्रकारे त्या चार जणांनी चार मिनिटांत जवळ जवळ चाळीस दोष शोधून काढले, आणि मग एका झाडाखाली उभे राहून शत्रूचा समाचार कसा घ्यावा याचे खलबत सुरू झाले.

रंगनाथ एका दुसऱ्या झाडाखाली जाऊन उभा राहिला. तिकडे ड्रायव्हर व चेकिंग स्क्वॉड यांच्यात ट्रकाच्या एकेका भागासंबंधी चर्चा सुरू झाली होती. बघता-बघता ती चर्चा ट्रकाच्या अंगप्रत्यंगांवरून घसरून देशाची सर्वसामान्य स्थिती व आर्थिक दुरावस्था यांवर येऊन ठेपली, आणि थोड्याच वेळात उपस्थित लोकांच्या लहान-लहान उपसमित्या तयार झाल्या. त्या वेगवेगळ्या झाडांखाली बसून एकेका विषयातील विशेषज्ञ या नात्याने विचार विनिमय करू लागल्या. पुष्कळ वादविवाद झाल्यावर एका झाडाखाली खुले अधिवेशन भरले, आणि थोड्या वेळानंतर ते अधिवेशन संपणार असा

रंग दिसू लागला.

अखेर रंगनाथाला अधिकाऱ्याचा किनरा आवाज ऐकू आला: ''क्यों मियाँ अशफाक, तुझं काय मत आहे ? सोडून द्यायचं ?''

पट्टेवाला म्हणाला, ''दुसरं काय करणार, हुजूर ? किती खटले भरणार तुम्ही ? एखादा दोष असला तर खटला भरण्यात फायदा !''

इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर अधिकारी म्हणाला, ''अच्छा जाओ जी बंटासिंह ! तुला सोडून देतो.''

ड्रायव्हर खुशामत करीत म्हणाला, ''शिरिमानजी, आपल्याखेरीज एवढा उपकार दुसरा कोण करणार ?''

तो अधिकारी बऱ्याच वेळापासून दुसऱ्या झाडाखाली उभ्या असलेल्या रंगनाथाकडे पाहात होता. तो सिगारेट शिलगावीत त्याच्याकडे आला आणि म्हणाला, ''तुम्ही याच ट्रकातून चाललाहात वाटतं ?''

''होय !''

''तुमच्याकडून यानं भाडं तर घेतलं नाही ना ?''

''नाही.''

अधिकारी म्हणाला, ''तुमचे कपडे पाहूनच मी ते ओळखलं होतं. पण तपास करणं माझं कर्तव्य होतं.''

त्याला चिडविण्यासाठी रंगनाथ म्हणाला, ''ही खरी खादी थोडीच आहे ! ही गिरणीची खादी.''

तो आदराने म्हणाला, ''अहो साहेब, खादी ती खादी. तिच्यात खरी-खोटी कसली ?''

अधिकारी निघून गेल्यावर ड्रायव्हर व पट्टेवाला रंगनाथाजवळ आले. ड्रायव्हर त्याला म्हणाला, ''जरा दोन रूपये काढा बघू.''

त्याने तोंड फिरवून कडवटपणे म्हटले, ''म्हणजे काय ? मी रूपये कशासाठी देऊ ?''

ड्रायव्हरने पट्टेवाल्याचा हात धरून म्हटले, ''चला शिरिमानजी, तुम्ही माझ्या बरोबर या,'' जाता जाता तो रंगनाथाला म्हणाला, ''तुझ्यामुळं तर माझं चेकिंग झालं. आणि माझ्या अडचणीच्या वेळी तूच असं बोलतोस ? हेच तुझं शिक्षण वाटतं ?''

आजचे आपले शिक्षण म्हणजे रस्त्यात पडलेले बेवारशी कुत्रे आहे. कोणीही येता-जाता त्याला लाथ मारावी. ड्रायव्हरही जाता जाता त्याला एक ठोकर मारून पट्टेवाल्याबरोबर ट्रककडे गेला. रंगनाथाने पाहिले, अंधार पडू लागला आहे, आपली ॲटॅची ट्रकात ठेवलेली आहे, शिवपालगंज अजून पाच मैल दूर आहे आणि आपल्याला इतरांच्या सहानुभूतीची गरज आहे. तो सावकाश ट्रकाजवळ आला. तिकडे स्टेशनवॅगनचा ड्रायव्हर जोरजोरात हॉर्न वाजवून पट्टेवाल्याला बोलावीत होता. रंगनाथ खिशातून दोन रूपये काढून ते ड्रायव्हरला देऊ लागला. यावर ड्रायव्हर म्हणाला, ''आता देतोच आहेस तर ते पट्टेवाले साहेबांना दे. मला तुझे पैसे काय करायचे ?''



बोलता-बोलता ड्रायव्हरच्या आवाजाला धार चढली. जे संन्यासी पैशाला हात लावीत नाहीत, फक्त इतरांना असे सांगतात की 'तुमचा पैसा म्हणजे हातचा मळ आहे,' त्यांच्या आवाजासारखा त्याचा आवाज वाटत होता. पट्टेवाला पैसे खिशात टाकून, बिडीचा शेवटचा झुरका मारून, तिचे उरलेले थोटूक जवळ जवळ रंगनाथाच्या पायजम्यावर फेकून स्टेशनवॅगनकडे निघून गेला. तो गेल्यावर ड्रायव्हरनेही ट्रक चालू केला. आणि गियर 'टॉप' मध्ये टाकून तो रंगनाथला धरून ठेवायला सांगितले.

थोड्याच वेळात अंधुक प्रकाशात रस्त्याच्या कडेला दोन्ही बाजूस काही बोचकी ठेवल्यासारखी दिसू लागली. त्या बायका होत्या. त्या रांगेत बसल्या होत्या. त्या आरामात गप्पागोष्टी करीत हवा खात होत्या; आणि त्याचबरोबर मलमूत्र विसर्जनाचा कार्यक्रमही उरकत होत्या. रस्त्याच्या खालच्या बाजूस मैल्याचे पुंजके पसरले होते. त्यांच्या दुर्गंधाच्या ओझ्याने संध्याकाळचा वारा एखाद्या गर्भवतीप्रमाणे आळसावल्यासारखा वाहात होता. थोड्या अंतरावरून कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज ऐकू आला. छपरांतून धुराचे लोट उठताना दिसू लागले. याचा अर्थ कोणते तरी गाव जवळ आले होते. तेच शिवपालगंज होते.

## २

शिवपालगंजच्या पोलिसचौकीत एक इसम हात जोडून फौजदार साहेबांना म्हणाला, ''आज-उद्या करता-करता कैक महिने होऊन गेले. हुजूर, आता मला कोर्टासमोर उभं करा ना. आणखी उशीर कशाला लावता ?''

फौजदारसाहेब ज्या आरामखुर्चीत बसलेही होते आणि लवंडलेही होते ती मध्ययुगात एखादे सिंहासन असली पाहिजे. ते सिंहासन झिजून त्याची आरामखुर्ची

बनली असावी. त्या गृहस्थाची विनंती ऐकून फौजदारसाहेब मान वर करून म्हणाले, ''करू करू. कोर्टातही उभं करू. घाई काय एवढी ? असं काय मोठं आकाश कोसळून राहिलंय ?''

तो इसम आरामखुर्चीजवळ पडलेल्या एका प्रागैतिहासिक मुड्यावर बसला आणि म्हणाला, ''माझ्यावर तर आकाशच कोसळून राहिलंय. तुम्ही खटला सुरू करा म्हणजे एकदाचा निकाल लागेल.''

फौजदारसाहेब पुटपुटत कुणाला तरी शिव्या देऊ लागले. थोड्या वेळानंतर त्याचा अर्थ लक्षात आला. कामाच्या ओझ्याखाली जीव पिचून चालला आहे. काम इतके वाढले आहे की गुन्ह्यांचा तपास होऊ शकत नाही, खटले उभे राहू शकत नाहीत, न्यायालयात साक्षीदार मिळत नाहीत. इतके काम आहे की सारे काम थंड पडले आहे.

मुडा आरामखुर्चीजवळ सरकला. तो म्हणाला, ''हुजूर, दुष्मन कुजबुजताहेत की शिवपालगंजमध्ये दिवसा ढवळ्या जुगार चालतो. कप्तानाकडे निनावी तक्रार गेलीय. तसं पाहिलं तर वर्षातनं एकदा खटला भरायचं आपसात ठरलंय. या वर्षाचा खटला भरण्यात दिरंगाई होतेय. याचवेळी खटला भरला तर लोकांची तक्रार आपोआपच दूर होईल.''

आरामखुर्चीच नव्हे तर सर्व काही मध्ययुगीन होते. दिवाण, त्याच्यावरील सतरंजीचा फाटका तुकडा, कलमदान, वाळलेल्या शाईच्या दौती, मळलेली कोपरे, दुमडलेली रजिस्टरे, सगळे काही अनेक शतकांपूर्वीचे जुनाट वाटत होते.

या ठिकाणी बसून एखाद्याने चौफेर नजर फिरविली असती तर आपण इतिहासाच्या एका कोपऱ्यात उभे आहोत असा भास त्याला झाला असता. या पोलिसचौकीसाठी अजून फाउंटनपेन तयार झालेले नव्हते. त्या दृष्टीने फक्त एवढीच प्रगती झाली होती की बोरूऐवजी टाक आला होता. या ठिकाणासाठी अजून टेलिफोनचा शोध लागलेला नव्हता. हत्यारांमध्ये काही जुन्या रायफली होत्या. त्या बहुधा बंडाच्या वेळी वापरण्यात आल्या असाव्यात, असे वाटत होते. बाकी शिपायांच्या नेहमीच्या वापरासाठी बांबूची लाठी होती. या लाठीविषयी एका कवीने म्हटले आहे की ती नदी-नाला पार करण्यासाठी व कुत्र्याच्या अंगावर धावून जाऊन त्याला मारण्यासाठी फार उपयुक्त असते. या भागात अजून जीपचे अस्तित्व प्रकट झालेले नव्हते. तिचे काम करण्यासाठी दोन-तीन चौकीदारांच्या प्रेमाच्या सावलीत राहाणारे घोडे नावाचे एक वाहन होते. शेरशहाच्या काळातही हेच वाहन होते.



सारांश, चौकीत प्रवेश करताच कुणाही माणसाला असा भास होई की, आपल्याला कोणीतरी उचलून शेकडो वर्षे मागे फेकून दिले आहे. त्याने अमेरिकन रहस्यकथा वाचल्या असल्यास तो खडबडून इकडे - तिकडे पाहू लागे की बोटांचे ठसे शोधून काढणारे भिंग, कॅमेरे, वायरलेसने सुसज्जित गाड्या वगैरे गोष्टी कोठे आहेत ? त्याऐवजी त्याला वर वर्णन केलेल्या गोष्टी दिसत. त्याचबरोबर समोरच्या चिंचेच्या झाडाखाली भांग घोटणारा, नुसता लंगोट घालून बसलेला उघडाबंब इसम त्याला दिसे. जरा खोलात शिरल्यावर त्याला अशी माहिती मिळे की हा एकटा इसम वीस गावांच्या संरक्षणासाठी नेमलेला असून तो जेथे व ज्या स्थितीत आहे तेथे व त्याच स्थितीत राहून तो वीसही गावांतील गुन्हे थांबवू शकतो, गुन्हा झाला असल्यास त्याचा तलास लावू शकतो आणि गुन्हा झाला नसल्यास तो घडवून आणू शकतो, कॅमेरा, सूक्ष्मदर्शक भिंग, कुत्रा, वायरलेस वगैरे गोष्टी त्याला वर्ज्य आहेत. अशा प्रकारे चौकीचे वातावरण अत्यंत रमणीय व भूतकालीन वैभवाला साजेसे होते.

फौजदारसाहेब आणि चौकीतील दहाबारा शिपाई यांच्यावरच जनतेचा सारा भरवसा होता. अडीचशे-तीनशे गावांत मिळून ती एकुलती एक पोलिसचौकी होती. तेथून आठ मैलांवरील एखाद्या गावात घरफोडी झाली तर यांच्यापैकी कोणाचे तरी तिच्यावर लक्ष जाईल, अशी आशा लोक बाळगून होते. बारा मैलांवरील एखाद्या ठिकाणी रात्रीच्या वेळी दरवडा पडला तर दरवडेखोरांच्या आधी हे शिपाईच तेथे जाऊन पोचतील अशी अपेक्षा बाळगण्यात येत होती. याच भरवशामुळे कोणत्याही गावात एखाद दुसरी बंदूक वगळल्यास लोकांना हत्यार बाळगण्याची परवानगी देण्यात आलेली नव्हती. खेड्यांतील लोकांना हत्यारे दिल्यास ते असंस्कृत व जंगली लोक बंदुकीचा वापर करायला शिकतील, त्यामुळे ते एकमेकांचे खून पाडतील, रक्ताचे पाट वाहू लागतील, अशी भीती होती. दरवडेखोरांपासून जनतेचे संरक्षण करण्याची जबाबदारी फौजदार व त्याचे दहा-बारा शिपाई यांच्या जादूगिरीवर सोपविण्यात आली होती.

त्यांच्या जादूगिरीचे सर्वांत मोठे प्रदर्शन खुनांच्या प्रकारांत होण्याची अपेक्षा बाळगली जात होती. कारण या तीनशे गावांत राहाणाऱ्यांच्या मनांत कुणाविषयी तिटकारा आहे, कुणाचे कुणाशी शत्रुत्व आहे, कोण कुणाला कच्चा खाऊन टाकण्याचा उत्साह बाळगून आहे, याची अगदी तपशीलवार माहिती हे लोक जमवून ठेवतील, आणि कोणी कोणाला ठार मारू शकणार नाही, याची आधीपासूनच तरतूद करून ठेवतील, तसेच कोणी कोणाचा खून केल्यास वाऱ्याच्या वेगाने गुन्ह्याच्या ठिकाणी जाऊन ते गुन्हेगाराला पकडतील, मृत व्यक्तीचा ताबा घेतील, त्याच्या रक्ताने बरबटलेली माती गाडग्यात भरून ठेवतील, आणि त्या खुनाचे दृश्य पाहाणाऱ्या लोकांना दिव्यदृष्टी देऊन त्यांना महाभारतातील संजयाप्रमाणे कोणत्याही कोर्टात उभे

राहून खुनाचे प्रत्यक्ष वर्णन घडाघड म्हणून दाखविण्यास प्रवृत्त करतील, असे गृहीत धरण्यात आले होते. सारांश, फौजदार व त्याचे शिपाई यांना त्या ठिकाणी माणूस म्हणून नव्हे तर अल्लाउद्दिनाच्या जादूच्या दिव्यातून निघणारा राक्षस समजून नेमण्यात आले होते. त्यांना अशा अवस्थेत ठेवून १९४७ साली इंग्रज आपल्या देशाला निघून गेले होते, आणि त्यानंतरच लोकांना हळूहळू हे रहस्य उमगू लागले होते की हे लोक राक्षस नसून माणसेच आहेत, एवढेच नव्हे तर दिव्यातून स्वतःच राक्षस निर्माण करण्याची उमेद मनाशी बाळगून ती अहोरात्र आपापला दिवा घासत असतात.

शिवपालगंजच्या जुगारी - संघाचा मॅनेजिंग डायरेक्टर निघून गेल्यावर फौजदार साहेबांनी एकदा मान वर करून सभोवार नजर फिरविली. सर्वत्र शांतता होती. चिंचेच्या झाडाखाली भांग घोटणारा लंगोटबंद शिपाई आता जवळच्या शिवलिंगाला भांगेचा नैवेद्य दाखवीत होता, एक चौकीदार घोड्याच्या पुठ्ठ्यांना खरारा करीत होता, कच्च्या कैदेत असलेला एक दरवडेखोर जोरजोरात 'हनुमान चालीसा' (हनुमान स्तोत्र) वाचत होता, बाहेरच्या फाटकावर ड्यूटी देणारा शिपाई - अर्थातच रात्री चांगले जागता यावे म्हणून - एका खांबाला टेकून आरामात झोपला होता.

जरा डुलकी घ्यावी या विचाराने फौजदारसाहेब डोळे मिटणार इतक्यात त्यांना रुप्पनबाबू येत असलेले दिसले. क्षणभर डुलकी घ्यायलाही सवड मिळत नाही, असे पुटपुटत ते रुप्पनबाबू आत येताच खुर्चीवरून उठून उभे राहिले, आणि सौजन्य सप्ताह खूप दिवसांपूर्वी होऊन गेला असला तरी अत्यंत सौजन्याने त्यांनी रुप्पनबाबूंशी हस्तांदोलन केले. रुप्पनबाबू खाली बसता-बसता म्हणाले, "रामाधीनकडे लाल शाईनं लिहिलेलं एक पत्र आलंय. दरवडेखोरांनी पाच हजार रूपये मागितलेत. त्यांनी लिहिलंय, अमावास्येच्या रात्री दक्षिणेकडच्या टेकडीवर. . . ."

फौजदारसाहेब हसून म्हणाले, "हा तर निव्वळ जुलूम आहे. कुठं ते पूर्वीचे दरवडेखोर ! डोंगर-नद्या ओलांडून पैसे न्यायला ते घरी येत असत आणि कुठं हे आजचे दरवडेखोर ! यांना वाटतं, लोकांनी आपल्या घरी येऊन पैसे देऊन जावं."

रूप्पनबाबू म्हणाले, "नाही तर काय ! हा कसला दरवडा ? ही तर सरळ-सरळ लाचच झाली की."

फौजदारसाहेब त्याच स्वरात उत्तरले, "लाच, चोरी, दरवडा, सारं काही आता एक झालंय. पुरा साम्यवाद आहे."

रूप्पनबाबू म्हणाले, "बाबासुद्धा असंच म्हणतात,"



"काय म्हणतात ते ?"

"हेच. पुरेपूर साम्यवाद आहे हा."

दोघेही हसले. रूप्पनबाबू म्हणाले, "छेः छेः ! मी थट्टा करत नाही. रामाधीनकडे खरोखरीच असं पत्र आलंय. म्हणून तर बाबांनी मला पाठवलंय. ते म्हणतात, रामाधीन आमचा विरोधक असला म्हणून काय झालं ? त्याला असा त्रास होता कामा नये."

"बरोबर आहे त्यांचं म्हणणं. ज्या कुणाला हे सांगायचं असेल त्याला मी ते सांगतो."

रूप्पनबाबूंनी आपले खोल गेलेले डोळे किलकिले करून फौजदाराकडे पाहिले. फौजदारांनीही त्यांच्याकडे रोखून पाहिले आणि हसून ते म्हणाले, "भिऊ नका. जोपर्यंत मी इथं आहे तोपर्यंत दरवडा पडणार नाही."

रूप्पनबाबू हलक्या आवाजात म्हणाले, "ते मला माहीत आहे. ते पत्र बनावटी आहे. तुम्ही तुमच्या शिपायांनाही जरा विचारून बघा. कदाचित् त्यांच्यापैकीच कुणीतरी लिहिलं असेल."

"छेः छेः ! असं होणं शक्य नाही. माझ्या शिपायांना लिहायला येत नाही. एक-दोघांना नुसती सही करता येते."

रूप्पनबाबू यावर काही बोलू इच्छित होते. इतक्यात फौजदारसाहेब म्हणाले, "एवढी घाई कसली ? रामाधीनला येऊन तक्रार नोंदवू द्या. ते पत्र तर पुढं येऊ द्या."

थोडावेळ दोघेही गप्प राहिले. मग काहीतरी मनात योजून फौजदारसाहेब म्हणाले, "तुम्हांला खरं सांगू ? मला तर वाटतं की या पत्राचा संबंध शिक्षण खात्याशी असावा."

"तो कसा काय ?"

"शिक्षण खात्याशी म्हणजे काय ? तुमच्या कॉलेजशीच !"

रूप्पनबाबू रागावून म्हणाले, "तुम्ही तर आमच्या कॉलेजच्या मागं हात धुवून लागलाहांत !"

"माझा असा अंदाज आहे की रामाधीनला आलेलं हे पत्र तुमच्या कॉलेजातल्या एखाद्या विद्यार्थ्यानं पाठवलं असावं. तुमचं काय मत आहे ?"

"तुम्हां लोकांच्या दृष्टीनं सारे गुन्हे विद्यार्थीच करत असतात." रूप्पनबाबू फणकाऱ्याने म्हणाले, "तुमच्यासमोर एखादा माणूस विष खाऊन मेला तर ती आत्महत्या आहे हे देखील तुम्ही कबूल करणार नाही. तुम्ही असंच म्हणाल की या माणसाला कुणीतरी विद्यार्थ्यानं विष घातलंय."

''तुमचं म्हणणं बरोबर आहे, रूप्पनबाबू. जरूर पडली तर मी असंच म्हणेन. मी बख्तावरसिंहाचा चेला आहे. तुम्हांला हे बहुदा माहीत नसेल.''

यानंतर सरकारी नोकरांचा एकमेव आवडता विषय निघाला. पूर्वीचे सरकारी नोकर कसे असत आणि आजचे कसे आहेत, वगैरे. कुणा बख्तावरसिंहाची चर्चा सुरू झाली.

रूप्पनबाबू अठरा वर्षांचे होते. स्थानिक कॉलेजातील दहावीच्या वर्गात ते शिकत होते. शिक्षणाविषयी, आणि विशेषतः इयत्ता दहावीत शिकत राहाण्याविषयी त्यांना अपार प्रेम होते. त्यामुळे गेली तीन वर्षे ते दहावीत शिकत होते.

रूप्पनबाबू स्थानिक पुढारी होते. इंडियामध्ये पुढारी होण्यासाठी काळ्याचे पांढरे करावे लागतात, हा आरोप त्यांनी आपल्या व्यक्तित्वाने खोडून काढला होता. त्यांच्या पुढारीपणाचा सर्वांत मोठा आधार हा होता की ते सर्वांकडे समदृष्टीने पाहात असत. चौकीतला फौजदार आणि कस्टडीतला चोर हे दोघेही त्यांच्या दृष्टीने एक होते. त्याचप्रमाणे परीक्षेत कॉपी करणारा विद्यार्थी आणि कॉलेजचा प्रिन्सिपॉल दोघेही त्यांना सारखेच वाटत. ते सर्वांना दयनीय समजत. सर्वांचे काम करीत व सर्वांकडून काम घेत. गावात त्यांचा एवढा मान होता की भांडवलशाहीचे प्रतीक असणारे दुकानदार त्यांना माल विकत नसत तर अर्पण करत असत; आणि शोषणाचे प्रतीक असणारे टांगेवाले त्यांना शहरापर्यंत नेऊन पोचविल्यावर त्यांच्याकडून भाड्याऐवजी आशीर्वादाची अपेक्षा करीत. त्यांच्या पुढारीपणाचे सुरूवातीचे व शेवटचे क्षेत्र तेथील कॉलेज होते. तेथील विद्यार्थी त्यांनी इशारा करताच राईचा पर्वत करू शकत व जरूर पडल्यास त्या पर्वतावर चढूही शकत.

ते जन्मजात पुढारी होते; कारण त्यांचे वडीलही पुढारी होते. त्यांच्या वडिलांचे नाव वैद्यजी असे होते.

# ३

तो एक डाक बंगला होता. दोन मोठ्या व दोन छोट्या खोल्यांची ती इमारत डिस्ट्रिक्ट बोर्डाने सोडून दिलेली होती. त्याच्या तीन बाजूंना मातीच्या भिंतींवर छप्पर घालून काही तबेले बनविण्यात आले होते. तबेल्यांपासून थोड्या अंतरावर पक्क्या विटांच्या भिंतीवर पत्रे टाकून एक दुकान तयार करण्यात आले होते. एका बाजूला रेल्वेच्या फाटकाजवळ असते तसले एक खोपट होते. दुसऱ्या बाजूला एका मोठ्या झाडाखाली थडग्यासारखा एक चबुतरा होता. तबेल्याजवळ एक आधुनिक पद्धतीची इमारत होती. तिच्यावर लिहिले होतेः 'सामुदायिक मिलन केंद्र, शिवपालगंज.' या सर्वांच्या मागे तीन-चार एकर पडीत जमीन होती. ती नांगरून तेथे कडब्याचा हिरवा चारा लावण्यात आला होता. तो चारा खरोखरीच कुठे कुठे उगवून आला होता.

या सर्व इमारतींच्या समुदायाला छंगामल विद्यालय, इंटरमीजिएट कॉलेज, शिवपालगंज असे नाव होते.

छंगामल हे कधी काळी जिल्हा बोर्डाचे चेअरमन होते. एक काल्पनिक ठराव लिहून काढून त्यांनी बोर्डाचा डाक बंगला या कॉलेजच्या व्यवस्थापक समितीच्या नावाने करून दिला होता. त्यावेळी कॉलेजजवळ व्यवस्थापक समितीखेरीज दुसरे काहीच नव्हते. करारातील अटीप्रमाणे कॉलेजचे नाव छंगामल विद्यालय असे ठेवण्यात आले होते.

विद्यालयाच्या एकेका विभागाचा वेगवेगळा इतिहास होता. सामुदायिक मिलन केंद्र (कम्युनिटी सेंटर किंवा समाज मंदिर) हे ग्रामसभेच्या नावावर घेण्यात आलेल्या सरकारी पैशातून निर्माण करण्यात आले होते. परंतु त्या इमारतीत प्रिन्सिपॉलची कचेरी होती आणि अकरावी व बारावीचे वर्ग तेथे भरत असत. तबेल्यासारख्या दिसणाऱ्या इमारती श्रमदानाने उभारण्यात आल्या होत्या. पत्र्याची शेडही कुठल्या तरी लष्करी छावणीचे भग्नावशेष रात्रीतल्या रात्री हलवून तेथे उभी करण्यात आली होती. नांगरण्यात आलेली पडीत जमीन शेती विषयाच्या शिक्षणासाठी वापरली जात होती. त्यात जागजागी उगवलेली ज्वारीची धाटे प्रिन्सिपॉलच्या म्हशीला चारा म्हणून वापरली जात होती.

सायन्सचा वर्ग चालू होता. नववी इयत्ता. मास्टर मोतीराम विद्यार्थ्यांना सापेक्ष घनत्व शिकवीत होते. ते एक प्रकारे बी. एस्सी. पास होते. वर्गाच्या बाहेर त्या छोट्याश्या गावाच्या छोटेपणाची छटा पसरली होती. (हे वाक्य खास अनुप्रास

साधण्यासाठी !) रस्त्यावरून ऊस भरलेल्या गाड्या साखर कारखान्याकडे चालल्या होत्या. काही मरतुकडी पोरे गाड्यातून ऊस ओढून काढून पळून जात होती. पुढे बसलेला गाडीवान त्यांना इरसाल शिव्या देत होता. पतंगांची काटाकाटी चालावी तशी शिव्या आणि प्रतिशिव्या यांची चढ्या आवाजात काटाकाटी चालली होती. या सगळ्या शिव्या खिडकीतून वर्गात घुसून पार्श्वसंगीताची भूमिका बजावीत होत्या. विद्यार्थी एकीकडे नाटक पाहाण्याचा आनंद लुटत होते व त्याचबरोबर सायन्स शिकत होते.

एका मुलाने विचारले, ''सर, सापेक्ष घनत्व म्हणजे काय ?''

मास्तरांनी उत्तर दिले, ''सापेक्ष घनत्व म्हणजे रिलेटिव्ह डेन्सिटी.''

दुसरा एक मुलगा म्हणाला, ''हे काय सर ? तुम्ही आता सायन्स सोडून इंग्रजी शिकवायला लागलात.''

यावर ते म्हणाले, ''सायन्स साला अंग्रेजी के बिना कैसे आ सकता है ?''

त्याबरोबर सगळी मुले हसू लागली. त्यांच्या हास्याचे कारण हिंदी-इंग्रजीचा वादविवाद हे नसून गुरूजींनी 'साला' शब्दाचा केलेला झोकदार वापर हे होते. गुरूजी म्हणाले, ''ही काही हसण्याची बाब नाही.''

विद्यार्थ्यांना ते पटले नाही. ते जास्तच जोर जोरात हसू लागले. तेव्हा मास्टर मोतीराम स्वतःही त्यांच्या हसण्यात सामील झाले. मुले गप्प बसली.

मोतीरामजींनी मुलांना माफ केले. ते म्हणाले, ''रिलेटिव्ह डेन्सिटी कळत नसेल तर सापेक्ष घनत्व म्हणजे काय ते मी तुम्हांला उदाहरणानं समजावून देतो. सापेक्ष म्हणजे कशाच्या तरी तुलनेनं. समजा, तुम्ही एक पिठाची गिरणी चालवलीय, आणि तुमच्या शेजारीच एका शेजाऱ्यानं दुसरी पिठाची गिरणी सुरू केलीय. तुम्ही तुमच्या गिरणीतून दरमहा पाचशे रूपये कमावता; आणि तुमच्या शेजाऱ्याला दरमहा चारशे रूपये मिळतात. याचा अर्थ तुम्हांला त्याच्या तुलनेनं जास्त फायदा झाला. सायन्सच्या भाषेतच याला म्हणतात, तुमचा सापेक्ष लाभ जास्त झाला. समजलं ?''

एक विद्यार्थी म्हणाला, ''ते सारं समजलं सर; पण तुमचं सगळं विवेचन मुळातच चूक आहे. या गावात पिठाच्या गिरणीतून कुणालाही दरमहा पाचशे रूपये मिळवता येणं शक्य नाही.''

मास्टर मोतीराम टेबलावर मूठ आपटून ओरडले, ''का शक्य नाही ? काम करणाऱ्याला काय अशक्य आहे ?''

त्यांच्या त्या विधानाचा किंवा त्यांच्या प्रतिपादन शैलीचा त्या मुलावर मुळीच प्रभाव पडला नाही. तो म्हणाला, ''मुळीच शक्य नाही. आमच्या काकांची गिरणी धूमधडाक्यानं चाललीय. पण त्यांना दरमहा जेमतेम दोनशे रूपये मिळतात.''

''कोण आहे तुझा काका ?'' मास्टर मोतीरामांचा आवाज जणू घामाने चिंब



झाला. त्यांनी त्या मुलाकडे निरखून पाहात विचारले, ''तू त्या बेइमान मुन्नूचा पुतण्या काय ?''

मुलाने आपला अभिमान लपविण्याचा प्रयत्न केला नाही. बेफिकीरपणे तो म्हणाला, ''नाही तर काय ?''

बेइमान मुन्नू हे मोठे प्रतिष्ठित गृहस्थ होते. इंग्रज लोकांच्या गुलाबाला क्वचितच सुगंध असतो. पण इंग्रजीत एक म्हण आहे की, गुलाबाला तुम्ही कोणतंही नाव द्या, त्याच्या सुगंधात मुळीच फरक पडायचा नाही. याचप्रमाणे बेइमान मुन्नू यांना कोणत्याही नावाने संबोधले तरी ते प्रतिष्ठित गृहस्थ होते, मजेत पिठाची गिरणी चालवत होते, पैसा कमावत होते. तसे पाहिल्यास बेइमान मुन्नूंनी हे नाव स्वतः कमावलेले नव्हते. ते त्यांना वाडवडिलांकडून मिळाले होते. लहानपणी त्यांचे वडील त्यांना लाडाने बेइमान म्हणत असत, आणि आई प्रेमाने मुन्नू (चिमुकला बाळ) म्हणे. आता सगळा गावच त्यांना प्रेमाने बेइमान मुन्नू म्हणत होता.

मास्टर मोतीराम बेइमान मुन्नूच्या त्या पुतण्याकडे थोडा वेळ निरखून पाहात राहिले. नंतर एक उसासा टाकून उद्गारले, ''जाऊ द्या.''

त्यांनी उघड्या पुस्तकावरून नजर फिरविली. जेव्हा त्यांनी मान वर करून पाहिले तेव्हा विद्यार्थ्यांच्या नजरा आपल्याकडेच लागल्या असल्याचे त्यांना आढळून आले. ते म्हणाले, ''तुम्हाला काही विचारायचंय ?''

एक मुलगा म्हणाला, ''तर मग असंच ठरलं ना की पिठाच्या गिरणीतून दरमहा पाचशे रूपये मिळू शकत नाहीत ?''

''कोण म्हणतंय ?'' गुरूजी म्हणाले, ''मी स्वतः पिठाच्या गिरणीतून दरमहा सातशे रूपये कमावलेत. पण बेइमान मुन्नूमुळं सारा धंदा बसलाय.''

बेइमान मुन्नूच्या पुतण्याने शालीनतेने म्हटले, ''यात वाईट वाटून घेण्यासारखं काय आहे, सर ? हा तर व्यापार आहे. कधी चित, कधी पट ! कॉम्पीटिशनमध्ये असं चालायचंच.''

''इमानदार आणि बेइमान यांच्यात कसली कॉम्पीटिशन ? काय बरळतोस तू'' मास्टर मोतीरामांनी त्याला दटावले.

एक मुलगा म्हणाला, ''हे फार वाईट आहे.''

मास्टर मोतीराम दचकून वर्गाकडे पाहू लागले. त्यांनी विचारले, ''कोण बोललं हे?''

एक मुलगा बसल्या जागी हात वर करून म्हणाला, ''मी, सर ! मी विचारत होतो की सापेक्ष घनत्व काढण्याची पद्धत काय आहे ?''

मास्टर मोतीराम म्हणाले, ''सापेक्ष घनत्व काढण्यासाठी त्या वस्तूचं वजन आणि

आकारमान म्हणजे व्हॉल्यूम माहीत असलं पाहिजे. त्यानंतर सापेक्ष घनत्व काढण्याची पद्धत समजून घेतली पाहिजे. पद्धतीच्या बाबतीत बोलायचं म्हणजे प्रत्येक कृतीच्या दोन पध्दती असतात. एक बरोबर पध्दत आणि दुसरी चुकीची पध्दत. बरोबर पध्दतीने उत्तर बरोबर येतं. चुकीच्या पध्दतीनं चुकीचं उत्तर मिळतं. ही गोष्ट मी एक उदाहरण देऊन सांगतो. समजा, तुम्ही एक पिठाची गिरणी घातलीय. गिरणीतलं यंत्र झकास नवं कोरं आहे, ते उत्तम स्थितीत ठेवलंय. भरपूर ग्रीज लावलंय. एंजिन नवीन, पट्टा नवीन. सारं काही आहे. पण वीज नाही. याचा काय परिणाम होईल ?''

पहिल्यांदा बोलणारा मुलगा म्हणाला, ''याचा अर्थ डिझेल एंजिन लावावं लागेल. मुन्नू काकांनी असंच केलं होतं.''

मास्टर मोतीराम म्हणाले, ''इथं काही एकट्या मुन्नू काकाजवळच अक्कल नाही. या गावात सर्वांत प्रथम डिझेल एंजिन कुणी आणलं होतं ? माहीत आहे का तुम्हाला ?''

सर्व मुलांनी हात वर करून एका स्वरात उत्तर दिले, ''तुम्ही ! तुम्हीच आणलं होतं.''

मास्टर मोतीरामांनी संतुष्टपणे मुन्नूच्या पुतण्याकडे पाहिले आणि ते तुच्छपणे उद्गारले, ''ऐकलंस ? बेइमान मुन्नूनं डिझेल इंजिन माझं पाहून घेतलं होतं. पण माझी गिरणी हे कॉलेज सुरू होण्याच्या आधीपासून चालू होती. माझ्याच चक्कीवर कॉलेजच्या इमारतीसाठी प्रत्येक दळणवाल्याकडून एकेक शेर पीठ दान म्हणून घेण्यात येत होतं. माझ्याच गिरणीतून ते पीठ विक्रीसाठी शहराकडे रवाना झालं. माझ्याच गिरणीत कॉलेजच्या इमारतीचा आराखडा तयार झाला, आणि मॅनेजर काका म्हणाले, मोती, तू कॉलेजात मास्टर म्हणून राहाशील, पण खरी प्रिन्सिपॉलकी तुझ्याच हातात राहील.'' सारं काही माझ्या गिरणीतच ठरलं. आता मात्र गावात गिरणी काय ती बेइमान मुन्नूची. माझ्या गिरणीला जणू काही किंमतच नाही.

विद्यार्थी आरामात ऐकत राहिले. ही हकीगत त्यांनी पूर्वीही ऐकली होती आणि वाटेल तेव्हा ती ऐकण्यास ते तयार असत. त्यांच्यावर तिचा विशेष परिणाम झाला नाही. पण मुन्नूचा पुतण्या म्हणाला, ''मास्टर साहेब, तुमची गिरणीही चांगली आहे आणि मुन्नू काकांचीही छान आहे. पण तुमच्या गिरणीत भात भरडणाऱ्या यंत्राला ओव्हरहॉलिंग करायला पाहिजे. त्यात तांदूळ फार मोडतो.''

मास्टर मोतीराम समजावणीच्या सुरात म्हणाले, ''छे : छे : ! असं नाही. भात भरडायचं माझं जे यंत्र आहे तसलं यंत्र या अख्ख्या भागात दुसरं नाही. पण बेइमान मुन्नू सडण्याचे आणि दळण्याचे दर सारखा कमी करतोय. म्हणूनच लोक त्याच्याकडे धावतात. प्रत्येक हिंदी माणसाची अशीच स्थिती आहे. जिथं दोन पैसे वाचतील तिथंच तो धावतो.''



''असं तर जगात सगळीकडेच चालतं.'' एका मुलाने तत्त्व प्रतिपादन केले.

''सगळीकडेच नाही, फक्त हिंदुस्तानातच असं घडतं. हां......'' ते थोडा वेळ विचार करून म्हणाले, ''तर काय, दर कमी केल्यानं होणारं नुकसान इतर लोक दुसऱ्या मार्गानं-गिऱ्हाईकाचं पीठ चोरून-भरून काढतात. आता ज्या माणसाचं नाव मास्टर मोतीराम आहे तो इतर सर्व काही करू शकतो, पण हे असलं काम कधीच करायचा नाही.''

एका मुलाने विचारले, ''तर मग सापेक्ष घनत्व काढण्याची पद्धत काय ठरली ?''

ते घाईघाईने म्हणाले, ''तेच तर सांगत होतो.''

त्यांची दृष्टी खिडकीतून बाहेर गेली आणि रस्त्यावरील उसाच्या गाड्यांच्या वर तीन फूट चढून तेथून पुढे क्षितिजाला जाऊन धडकली. काही वर्षांपूर्वीच्या, सतत भावसमाधीच्या पोजमध्ये राहाणाऱ्या कवींप्रमाणे ते बोलू लागले, ''या अख्ख्या भागात तेवढं एकच यंत्र होतं. ते होतं लोखंडाचं पण आरशासारखं चमकत होतं.''

अचानक वर्गाकडे पाहून त्यांनी विचारलं, ''काय म्हणत होतास तू ?''

त्या विद्यार्थ्याने आपला प्रश्न पुनः विचारला. पण त्यापूर्वीच त्यांचे लक्ष दुसरीकडे गेले होते. विद्यार्थ्यांनीही कान टवकारून तो आवाज ऐकला. बाहेर ऊस लुबाडणाऱ्या व ऊस बचावणाऱ्या पक्षांतील शिवीगाळीला मागे टाकून, पट्टेवाल्याची खरडपट्टी काढणाऱ्या प्रिन्सिपॉलच्या आवाजाला निष्प्रभ बनवून, म्युझिक क्लासातून बाहेर येणाऱ्या हार्मोनियमच्या म्याँव म्याँवला छेदून, अकस्मात 'भक् भक्-भक् . . . ' असा आवाज ऐकू येऊ लागला होता. मास्टर मोतीराम यांची गिरणी सुरू झाली होती. तिचाच तो आवाज होता. हा खरा आवाज होता. अन्न वस्त्राच्या तुटवड्याचा आक्रोश, दंग्या धोप्यांचा चीत्कार, या सर्वांच्या पलीकडे जाऊन खरा पुढारी जसा फक्त आत्म्याचा आवाज ऐकतो, त्याला दुसरे काहीही ऐकू येत नाही. त्याप्रमाणे मास्टर मोतीराम यांना दुसरे काहींच ऐकू येत नव्हते. फक्त 'भक्-भक्-भक्' ऐकू येत होते.

त्यांनी वर्गातून बाहेर धूम ठोकली.

विद्यार्थ्यांनी त्यांना वाटेतच अडवून विचारले, ''काय झालं, सर ? अजून तासाची घंटा वाजली नाही.''

ते म्हणाले, ''मशीन दुरूस्त झालेलं दिसतंय, कसं काय चालतंय पाहायला हवं.''

ते दारापर्यंत गेले आणि अचानक तेथून मागे वळले. त्यांच्या चेहऱ्यावर व्यथा पसरली होती. जणू कोणीतरी जोरात चिमटा घेतला होता. ते म्हणाले, ''पुस्तकातून वाचून काढा. सापेक्ष घनत्वाचं प्रकरण महत्त्वाचं आहे.'' त्यांनी आवंढा गिळला. थोडा वेळ थांबून ते म्हणाले, ''इम्पॉर्टंट आहे.'' असे म्हणत असतांना त्यांचा चेहरा पुनः

खुलला.

भक् ! भक् ! भक् ! वर्गाबाहेरच्या जटिल कार्यक्षेत्रातून त्यांचे कर्तव्य त्यांना साद घालीत होते. विद्यार्थी व पुस्तके यांचा मोह त्यांना अडवू शकला नाही. ते बाहेर निघून गेले.

संध्याकाळी चार वाजता प्रिन्सिपॉल साहेब आपल्या खोलीतून बाहेर पडले. मरतुकडे शरीर. त्याचे काही अवयव खाकी पँट व शर्ट यांच्याखाली झाकलेले होते. पोलिस सार्जंटांच्या हातात असते तसली छडी त्यांनी खाकेत धरली होती. पायात सँडल होते. एकूण पुष्कळच स्मार्ट दिसत होते. पण वस्तुतः ते जेवढे स्मार्ट होते त्यापेक्षा आपल्याला ते जास्त स्मार्ट समजत असत.

त्यांच्या मागोमाग, नेहमीप्रमाणे, कॉलेजचा कारकून येत होता. त्याच्याशी प्रिन्सिपॉल साहेबांची चांगली दोस्ती होती.

ते दोघे मास्टर मोतीराम यांच्या वर्गाजवळून जाऊ लागले. हा वर्ग तबेल्यासारख्या इमारतीत होता. वर्गात कोणी शिक्षक नसल्याचे दुरूनच दिसत होते. एक मुलगा खालपासून मांडीपर्यंत फाटलेला पायजमा घालून शिक्षकाच्या टेबलावर बसला होता व जोरजोरात रडत होता. प्रिन्सिपॉल शेजारून जात असलेले पाहून तो जास्तच जोराने रडू लागला. त्यांनी विचारले, ''काय रे, काय झालं ? मास्टर साहेब कुठं आहेत ?''

आता तो मुलगा उभा राहून रडू लागला. एका दुसऱ्या मुलाने सांगितले, ''हा मास्टर मोतीरामांचा वर्ग आहे.''

यावर मास्टर साहेब कुठे गेलेत हे प्रिन्सिपॉलना सांगण्याची जरूर उरली नाही. कारकून म्हणाला, ''सेकंडहँड मशीन. तिची देखभाल अष्टौप्रहर करावी लागते. मास्टर मोतीरामांना कितीदा सांगितलं की ही चक्की विकून टाका, पण ऐकतील तर शपथ, मी स्वतःच एकदा दीड हजार रूपये द्यायला तयार झालो होतो.''

प्रिन्सिपॉल साहेब कारकुनाला म्हणाले, ''ते जाऊ द्या. तिकडल्या वर्गातून मालवीयाला बोलावून घ्या.''

कारकुनाने एका विद्यार्थ्याला सांगितले, ''जा रे, तिकडल्या वर्गातून मालवीयांना घेऊन ये.''

थोड्या वेळानंतर एक भला दिसणारा तरूण तिकडून येऊ लागला. तो दूर असतांनाच प्रिन्सिपॉल साहेब ओरडून म्हणाले, ''अहो मालवीय, या वर्गाकडेही बघा जरा.''



मालवीय जवळ येऊन छपराचा एक बांबू धरून उभा राहिला आणि म्हणाला, ''एकाच पिरियडला दोन वर्ग कसे घ्यायचे ?''

रडणारा विद्यार्थी रडत होता. वर्गाच्या मागील बाजूस काही विद्यार्थी जोरजोरात हसत होते. इतर सारेजण या तिघांभोवती गर्दी करून उभे होते. जणू चौकात एखादा अपघातच झाला होता.

प्रिन्सिपॉल साहेबांनी आवाज चढवून म्हटले, ''फार कायद्याच्या गोष्टी बोलू नका. खन्नाशी दोस्ती केल्यापासून तुम्हाला प्रत्येक बाबतीत अडचण भासायला लागलीय.''

मालवीय प्रिन्सिपॉल साहेबांच्या तोंडाकडे पाहातच राहिला. कारकून म्हणाला, ''सरकारी बसेस करतात तसं करा तुम्ही, मालवीय. रस्त्यात एक बस नादुरूस्त झाली तर मागून येणाऱ्या बसमध्ये पहिल्या बसचे सगळे उतारू कोंबून भरतात. या मुलांनाही तुम्ही तुमच्या वर्गात तसेच नेऊन बसवा म्हणजे झालं.''

मालवीय अत्यंत मधुर स्वरात म्हणाला, ''पण हा तर नववीचा वर्ग आहे. मी तिथं सातवीला शिकवतोय.''

प्रिन्सिपॉल साहेबांची गर्दन सर्रकन वळली. माहीतगारांनी ओळखले की आता त्यांचे हात हाफ पँटच्या खिशात जाणार आणि ते जोराने ओरडणार. तसेच झाले. ते म्हणाले. ''मला सारं कळतंय, तुम्हीही खन्नाप्रमाणं वाद घालायला लागलात. सातव्या आणि नवव्या वर्गातला फरक मला कळतोय. हमका अब प्रिंसिपली करै न सिखाव भैया । जौनु हुकुम है, तौनु चुप्पे कैरी आउट करौ । समझैयो कि नाही ?'' (अरे बाबा, आता मला प्रिन्सिपॉलकी कशी करायची ते तू शिकवू नकोस. जो हुकूम दिलाय तो निमूटपणे अमलात आण. समजलं की नाही ?')

प्रिन्सिपॉल साहेब शेजारच्याच गावचे राहाणारे होते. दोन गुणांसंबंधी त्यांची ख्याती दूरवर पसरलेली होती. पहिला गुण म्हणजे खर्चाचा खोटा आराखडा तयार करून कॉलेजसाठी जास्तीत जास्त सरकारी पैसा मिळविणे, आणि दुसरा गुण म्हणजे रागाचा पारा चढला असतांना स्थानिक अवधी बोलीचा वापर करणे. जेव्हा ते खोटे अंदाजपत्रक तयार करीत तेव्हा वाटेल तेवढा हुशार ऑडिटरही त्यात चूक काढू शकत नसे, आणि जेव्हा ते अवधी बोलू लागत तेव्हा मोठ्यातला मोठा वादविवादपटूही त्यांच्या मुद्यांना उत्तर देऊ शकत नसे.

मालवीय मान खाली घालून परत गेले. प्रिन्सिपॉल साहेबांनी फाटक्या पायजम्याच्या विद्यार्थ्याच्या पाठीवर सपकन् छडी लगावली आणि सांगितले,''चले जाओ ! त्याच वर्गात जाऊन सगळेजण गप्प बसा. जरा गडबड कराल तर पाठीचं धिरडं करीन.''

मुले निघून गेल्यावर कारकून हसून म्हणाला, ''चला, आता खन्ना मास्तराचा

समाचार घेऊ.''

खन्ना मास्तराचे खरे नांव खन्नाच होते. टिळक, पटेल, गांधी, नेहरू ही जशी जातींची नांवे नसून व्यक्तींची नावे आहेत तसेच खन्ना हेही व्यक्तीचे नाव होते. या देशातील जातिप्रथा नष्ट करण्याची हीच एक सोपी युक्ती आहे. जाती जवळून तिचे नाव काढून घेऊन ते एखाद्या माणसाचे नाव बनवून टाकले की जातीजवळ दुसरे काही उरतच नाही. ती आपोआप नष्ट होते.

खन्ना मास्टर इतिहासाचे लेक्चरर होते. पण यावेळी ते इंटरमीजिएटच्या एका वर्गात इंग्रजी शिकवत होते. ते दातओठ खाऊन बोलत होते. ''हिन्दीमध्ये तू मोठमोठ्या प्रेमकथा लिहितोस. पण इंग्रजीत एखादं उत्तर द्यायचं म्हटलं की तुझं तोंड घोड्याच्या तोंडासारखं खाली लटकतं.''

एक मुलगा वर्गात मान खाली घालून उभा होता. तसे पाहिल्यास दुधा-तुपाची चणचण आणि खेळ, व्यायाम यांचा अभाव यामुळे प्रत्येक विद्यार्थीच बहुदा मरतुकड्या घोड्यासारखाच दिसत असतो. पण या विद्यार्थ्याचा चेहराच असा काही होता की त्याला ही घोड्याची उपमा बरोबर लागू पडे. वर्गातील मुले खदखदून हसली. खन्ना मास्तरांनी इंग्रजीत विचारले, ''सांग, 'मेटॅफर' म्हणजे काय ?''

मुलगा तसाच उभा राहिला. काही दिवसांपूर्वी या देशात अशी हूल उठली होती की अशिक्षित माणूस हा शिंग व शेपूट नसलेला पशूच असतो. त्याबरोबर निरक्षर लोकांच्या असंख्य मुलांनी खेड्यापाड्यांतून नांगर सोडून देऊन शाळांवर हल्ला केला. हजारोंच्या संख्येने आलेल्या या मुलांनी शाळा, कॉलेजे व विद्यापीठे पार भरून टाकली. शिक्षणाच्या क्षेत्रात रेटारेटी व धक्काबुक्की सुरू झाली. आता मात्र निरक्षर माणूस हा जनावरासारखा असतो असा प्रचार करणारा कोणी मायेचा पूत दिसत नव्हता. उलट हलक्या आवाजात लोक असे बोलू लागले होते की जे विद्यार्थी लायक असतील त्यांनाच उच्च शिक्षण मिळाले पाहिजे, त्यासाठी 'स्क्रिनिंग' झाले पाहिजे. अशा प्रकारे आडवळणाने या ग्रामीण मुलांच्या हातात पुनः नांगर देऊन त्यांना शेतात सोडून देण्याचा सल्ला दिला जात होता. परंतु दरसाल नापास होऊन, वर्गात सर्व प्रकारची बोलणी सहन करून आणि शेतीच्या महिम्यावर पुढाऱ्यांची छापील ठशाची व्याख्याने ऐकूनही ती मुले नांगर-औताच्या जगात परत जाण्यास तयार नव्हती. ती घोरपडीप्रमाणे किंवा गोमेप्रमाणे शाळेला घट्ट धरून बसली होती आणि काही झाले तरी तिला सोडायला तयार नव्हती.

घोड्यासारखा चेहरा असणारा हा मुलगाही याच गर्दीतील एक भाग होता. वर्गामध्ये त्याला रोज आडवळणाने असे सांगितले जात होते की, ''बाबा रे, तू आपला घरी राहून म्हशीची धार काढ आणि बैलांच्या शेपट्या पिरगाळ. शेले आणि कीट्स हे तुझ्यासाठी नाहीत.'' पण मुलगा आपल्या या उपदेशकांच्या अनेक शतके पुढे निघून गेला होता. या इशारेवजा उपदेशाकडे लक्ष देण्यास तो तयार नव्हता. त्याचा बाप आजही आपल्या बैलांसाठी बाराव्या शतकातील खुरप्याने चारा कापत होता. त्यावेळी हा मुलगा एका मळकट पुस्तकात आपले घोड्यासारखे तोंड लपवून विसाव्या शतकातील कलकत्त्याच्या रंगेल रात्रींची चित्रे पाहण्यात दंग होता. या परिस्थितीत कोणताही बदल सहन करण्यास तो तयार नव्हता. त्यामुळे तो 'मेटॅफर' चा अर्थही सांगू शकत नव्हता अथवा आपल्या चेहऱ्याच्या घडणीविषयी वाद करण्याचीही त्याची इच्छा नव्हती.



कॉलेजातील इतर सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे हा मुलगाही पोषाखाच्या बाबतीत बेफिकीर होता. यावेळी तो अनवाणी उभा होता. त्याने रेघारेघांचा मळकट पायजमा घातला होता. शहरांतील लोक सामान्यतः स्लीपिंग सूट किंवा नाइट पँट म्हणून असला पायजमा वापरतात. त्याच्या अंगात गडद तपकिरी रंगाचा जाडाभरडा सदरा होता. त्याची बटने तुटलेली होती. डोकीचे केस राठ व राकट होते. चेहरा मळलेला व डोळे मिचमिचे होते. त्याच्याकडे पाहिल्यानंतर हा एखाद्या प्रचाराला बळी पडून कॉलेजकडे वळला असला पाहिजे, याची खात्री पटत असे.

या मुलाने गतवर्षी कुठल्या तरी भिकार मासिकातील एक प्रेमकथा चोरून ती कॉलेजच्या नियतकालिकात प्रकाशित केली होती. त्याच्या या ख्यातीवरच खन्ना मास्टर शिंतोडे उडवीत होते. त्यांनी आवाज बदलून म्हटले, ''कथाकारजी, काही बोला ना ! मेटॅफर कशाला म्हणतात ?''

खन्ना मास्टरांनी खाकी पँट व निळ्या रंगाचा बुशशर्ट घातला होता, आणि आपण स्मार्ट दिसावे म्हणून काळा चष्मा चढविला होता. खुर्चीवरून उठून ते टेबलासमोर आले. त्यानी आपले बूड टेबलावर ओझरते टेकविले. ते त्या मुलाला आणखी काहीतरी बोलणार इतक्यात वर्गाच्या मागील दारातून प्रिन्सिपॉल साहेब डोळे वटारून पहात असलेले त्यांना दिसले. व्हरांड्यात उभ्या असलेल्या कारकुनाचा खांदा पुसटसा दिसला.

ते टेबलाचा आधार सोडून ताठ उभे राहिले व म्हणाले, ''जी ! शेलेची कविता शिकवत होतो.''

प्रिन्सिपॉलनी एक शब्दावर दुसरा शब्द ढकलत घाईने म्हटले, ''पण तुमचं बोलणं ऐकतोय कोण ? ही पोरं तर चित्र बघत बसलीयेत.''

ते वर्गात आले. त्यांनी एकामागून एक दोन विद्यार्थ्यांच्या पाठीत आपल्या हातातील छडीने ढोसले. ते उठून उभे राहिले. त्यांच्यापैकी एकाने मळकट पायजमा व बुशशर्ट घातला होता. त्याच्या केसातून तेलाचे पाट ओघळत होते. त्याचा चेहरा

तेलकट-कळकट दिसत होता. दुसरा मुलगा पहिलवानी ढंगाची चड्डी व सदरा घालून आलेला होता. त्याचे डोके तुळतुळीत होते. प्रिन्सिपॉल साहेबांनी त्यांना विचारले, ''हाच अभ्यास चाललाय वाटतं ?''

त्यांनी खाली वाकून पहिल्या मुलाच्या बाकावरून एक मासिक उचलले. ते एक सिनेमाचे मासिक होते. त्यातील एक पान उघडून त्यांनी ते वाऱ्यावर फडकविले. मुलांनी पाहिले, कुणातरी विलायती बाईचे उरोज चित्रात धडधडत होते. त्यांनी ते मासिक जमिनीवर फेकले आणि ओरडून विचारले, ''यहै पढ़ि रहे हौ ?'' (हेच वाचतोस काय ?)

वर्गात स्तब्धता पसरली. वर्गाच्या एका टोकाला उभ्या असलेल्या प्रिन्सिपॉल साहेबांनी दुसऱ्या टोकाला उभ्या असलेल्या खन्ना मास्टरांना दरडावून म्हटले, ''तुमच्या वर्गात ही अशी शिस्त असते ! मुलं सिनेमाची मासिकं वाचत असतात आणि आपल्या याच योग्यतेच्या जोरावर आपल्याला व्हाईस प्रिन्सिपॉल करावं, म्हणून तुमची धडपड चाललीय. याच पद्धतीनं तुम्ही व्हाईस प्रिन्सिपॉलकी करणार वाटतं ? अहो, शिकवण्याला काही महत्व नाही. मुद्याची गोष्ट आहे शिस्त. समजलं ?''

असे म्हणून प्रिन्सिपॉल साहेब उमर खैयामच्या हिरोप्रमाणे 'मी पाण्यासारखा आलो होतो आणि वावटळीसारखा निघून जातो,' अशा थाटात तेथून बाहेर पडले. पाठीमागून खन्ना मास्टर पुटपुटल्याचे त्यांना ऐकू आले.

ते कॉलेजच्या फाटकातून बाहेर पडले. रस्त्यावरून पँट-शर्ट घातलेला एक गृहस्थ येत असलेला दिसला. तो सायकलवर होता. जवळून जाता-जाता त्याने प्रिन्सिपॉल साहेबांना व प्रिन्सिपॉल साहेबांनी त्याला नमस्कार केला. तो निघून गेल्यावर कारकुनाने विचारले, ''हा कोण फासे पारधी ?''

''मलेरिया इन्स्पेक्टर आहे. नवीनच आलाय. बी.डी.ओ. चा भाचा आहे. मोठा कावेबाज आहे. मी काही बोलत नाही. कधीतरी उपयोगी पडेल, असं वाटतं.''

कारकून म्हणाला, ''आजकाल अशाच कावेबाज लोकांकडून काम होतं. सज्जन माणूस काहीच उपयोगी पडत नाही.''

थोडावेळ ते दोघे न बोलता रस्त्याने चालत राहिले. मग प्रिन्सिपॉलच बोलू लागले, ''प्रत्येकाशी संबंध ठेवले पाहिजेत. या कॉलेजपायी गाढवाचेही पाय धरावे लागतात.''

कारकून म्हणाला, ''ते तर मी पाहातोच आहे. दिवसभर हेच तर काम तुम्ही करत असता !''

ते म्हणाले, ''तुम्हीच सांगा; माझ्या आधी इथं पाच प्रिन्सिपॉल होऊन गेले. एवढी मोठी पक्की इमारत कुणाला बांधता आली काय ? इथं सामुदायिक केंद्र (समाजमंदिर) बनविण्याची क्लृप्ती माझीच होती की नाही ?''



कारकुनाने मान डोलावून होकार दिला.

थोड्या वेळाने काळजीच्या सुरात ते म्हणाले, ''आताही मी याच फिकिरीत आहे की एखादं सावज जाळ्यात कसं सापडेल आणि या इमारतीत आणखी एक-दोन खोल्या कशा बांधता येतील ?''

कारकून निमूटपणे त्यांच्याबरोबर चालत राहिला. थोड्या वेळाने तो एकदम थबकला. प्रिन्सिपॉल साहेबही थांबले. कारकून म्हणाला, ''दोन इमारती बांधल्या जायच्या आहेत.''

प्रिन्सिपॉल साहेबांनी उत्साहाने मान वर करून विचारले, ''कुठं ?''

''एक म्हणजे अस्पृश्यांसाठी कातडी कमावण्याची इमारत बांधली जाणार आहे. जनावरांचा डॉक्टर सांगत होता. दुसरा, इस्पितळासाठी कॉलऱ्याचा वॉर्ड बनणार आहे. तिथं जागा अपुरी आहे. काहीतरी तिकडमबाजी करून आपण या इमारती कॉलेजच्या जवळच बांधायला लावू, आणि मग हळूच त्यांच्यावर कब्जा करू म्हणजे झालं.''

प्रिन्सिपॉल साहेब निराशेने एक उसासा टाकून पुढे चालू लागले. ते म्हणाले, ''मला हे सारं आधीच माहीत होतं. पण त्याबाबतीत काही तिकडमबाजी चालायची नाही.''

थोडावेळ ते पुनः न बोलता चालत राहिले.

रस्त्याच्या कडेला एक माणूस दोन-चार मजुरांना गोळा करून त्यांना फैलावर घेत होता. प्रिन्सिपॉल साहेब तेथे जाऊन थांबले. तो इसम एवढा का संतापला होता, हे समजून घेण्याची प्रिन्सिपॉल साहेबांची इच्छा होती. मजूर गयावया करीत होते. दोन-चार मिनिटात सारा मामला त्यांच्या लक्षात आला. काही खास गोष्ट नव्हती. मजूर व ठेकेदार आपापल्या रोजच्या कौशल्याचे प्रदर्शन करीत होते आणि त्यातून मामुली पेचप्रसंग निर्माण झाला होता. त्यांनी पुढे होऊन मजूरांना सांगितले, ''चला, जा आता. आपापलं काम करा. ठेकेदारसाहेबांना फसवायचा प्रयत्न कराल तर जोडे खावे लागतील.''

मजुरांनी प्रिन्सिपॉल साहेबांकडे कृतज्ञतेने पाहिले, आणि संधी मिळताच ते आपापल्या कामात गढून गेले. ठेकेदाराने प्रिन्सिपॉलना आपलेपणाने सांगितले, सगळे लेकाचे बेईमान आहेत. जरा डोळा लागला तर कानातला मळ सुध्दा चोरून नेतील. दीडपट मजुरी मागतात आणि कामाच्या नावानं शंख.''

प्रिन्सिपॉल साहेब म्हणाले, ''सगळीकडे हीच स्थिती आहे. आमच्या कॉलेजात काय चाललय ? एकाही शिक्षकाला शिकवायला नको. मी सारखा हात धुवून मागं लागलेला असतो तेव्हा कुठं. . .''

तो इसम खदखदून हसला. तो म्हणाला, ''मला काय सांगता ? तेच तर मी करत

असतो दिवसभर. मला सारं माहीत आहे.'' मग थोडावेळ थांबून त्याने विचारले, ''इकडे कुठे चाललात ?''

याचे उत्तर कारकुनाने दिले, ''वैद्यजींकडे. चेकांवर सह्या घ्यायच्या आहेत.''

''घ्या करून.'' असे म्हणून त्याने प्रिन्सिपॉलना जाण्याची खूण केली. ते जेव्हा जायला निघाले तेव्हा त्याने विचारले, ''आणखी काय हाल हवाल ?''

प्रिन्सिपॉल थांबले. ते म्हणाले, ''ठीक चाललंय. ते खन्ना-बिन्ना बडबड करीत असतात. तुमच्या आणि माझ्या विरूद्ध प्रॉपोगँडा करत फिरतात.''

तो ठासून म्हणाला, ''तुम्ही मुळीच काळजी करून नका. दिमाखात प्रिन्सिपॉलकी चालवत राहा. त्यांना म्हणावं प्रॉपोगँडाला उत्तर आहे दंडा. त्यांना सांगा, हे शिवपालगंज आहे. जरा उंच सखल बघून चाला.''

प्रिन्सिपॉल साहेब थोडे पुढे गेल्यावर कारकून म्हणाला, ''ठेकेदार साहेबांनाही कॉलेज कमेटीचे मेंबर करून घ्या. उपयोगी पडतील.''

प्रिन्सिपॉल साहेब विचार करू लागले. कारकून म्हणाला, ''चार वर्षांपूर्वीची संरक्षकाची पावती फाडून देता येईल. व्यवस्थापक समितीतही हे असले पाहिजेत. म्हणजे मग सारं काही ठीक होईल.''

प्रिन्सिपॉल साहेबांनी लागलीच काही उत्तर दिले नाही. थोडावेळ थांबून ते म्हणाले, ''वैद्यजींशी बोलून पाहू. या सगळ्या वरच्या राजकारणाच्या गोष्टी आहेत. तुमच्या-आमच्या सांगण्यानं काय होणार ?''

## ४

काही उकीरडे, उकीरड्यापेक्षाही गलिच्छ काही दुकाने, मामलेदार कचेरी, पोलिसचौकी, ताडीघर, विकास-विभागाचे कार्यालय, दारूचा गुत्ता, कॉलेज रस्त्यावरून जाणाऱ्याला बहुदा एवढ्याच गोष्टी दिसत. थोड्या अंतरावर एका घनदाट आंबराईत एक कच्चे घरही होते. त्याची पाठ रस्त्याच्या बाजूला होती. त्याचा दरवाजा जंगलाच्या बाजूला होता. त्याला दारे नव्हती. पावसाळ्यात शेतमजूर झाडांखालून उठून या घरात



येत व जुगार खेळत. इतर वेळी ते रिकामे असे. अर्थात् ते जेव्हा रिकामे असे तेव्हाही लोक त्याला रिकामे राहू देत नसत. स्त्रीपुरूष मंडळी संधी साधून त्याचा मनसोक्त वापर करीत असत. शिवपालगंजच्या लोकांनी या घराला जे नाव दिले होते ते हेन्री मिलरलाही थक्क करून सोडणारे होते. त्यात गार पाणी मिसळून कॉलेजच्या एका प्राध्यापकाने त्याला प्रेमभवन असे नाव दिले होते. उकीरडे आणि प्रेमभवन यांच्या दरम्यान असणाऱ्या रस्त्याच्या या भागाला शिवपालगंजचा किनारा नुसता स्पर्श करीत होता. अस्सल शिवपालगंज रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला होते. वैद्यजींच्या बैठकखान्यातच खरे शिवपालगंज होते.

बैठकीपर्यंत पोचण्यासाठी अरूंद गल्लीबोळांतून जावे लागे. त्यांच्या दोन्ही बाजूंना छपरे असलेली अव्यवस्थित, ओबडधोबड घरे होती. त्यांच्या ओसऱ्या वाढविण्यात आल्या होत्या. त्यांनी गल्लीवर अतिक्रमण केले होते. आपल्या सीमेच्या आसपास मोकळी जमीन सापडल्यास नजर चुकवून दोन-चार हात जमीन गडप केली पाहिजे, या तत्वज्ञानाची अंमलबजावणी या घरांनी केली होती.

ही गल्ली अचानक एका मैदानात विलीन होत होती. तेथे निंबाची तीन-चार झाडे होती. ती इतकी झपाट्याने वाढत होती की त्यावरून वनमहोत्सवांची प्रथा सुरू होण्यापूर्वी लावण्यात आली होती, कोणाही पुढाऱ्याचा अथवा अधिकाऱ्याचा स्पर्श त्यांना झालेला नव्हता, आणि वृक्षारोपण व छायाचित्रण त्यांच्या तावडीतून ती सुटली होती हे सिद्ध होते.

या हिरव्यागार भूभागात एका घराने मैदानाची एक संपूर्ण दिशा अशी काही व्यापली होती की तिकडून पुढे जाणे कठीण होते. हे घर वैद्यजींचे होते. त्याचा दर्शनी भाग पक्का आणि खेडेगावच्या दृष्टीने पुष्कळच रूबाबदार होता. मागील बाजूंच्या भिंती कच्च्या, मातीच्या होत्या, आणि त्यांच्या मागे उकीरडे असावेत अशी शंका येई. डोळे दिपविणारे विमानतळ आणि चकचकीत हॉटेले यांच्या द्वारे जशा प्रकारचे 'सिम्बॉलिक मॉडर्नायझेशन' (प्रतीकात्मक आधुनिकीकरण) या देशात होत आहे त्याचा प्रभाव या घराच्या वास्तुकलेवरही पडला होता, आणि त्यावरून दिल्लीपासून गल्लीपर्यंत कार्य करणारी देशी बुद्धी सर्वत्र एकसारखीच आहे, हे सिद्ध होत होते.

घराच्या या पुढच्या भागाला बैठकखाना किंवा बैठक असे म्हणत असत. त्यात चबुतरा, व्हरांडा व एक दिवाणखाना यांचा समावेश होता. दगडविटा वाहण्याऱ्या मजुरालाही बैठक ही नुसती दगडविटांची इमारत नाही हे माहीत होते. नं. १० डाउनिंग स्ट्रीट, व्हाईट हाऊस, क्रेमलिन ही घरांची नावे नसून शक्तींची नावे आहेत.

पोलिस चौकीवरून रूप्पनबाबू परत आले तेव्हा दरबार आममध्ये म्हणजे ओसरीवर गर्दी जमलेली त्यांना दिसली. त्यांची पावले भरभर पडू लागली. धोतर फडफडू लागले. बैठकीत येताच आपले मामेबंधू रंगनाथ हे ट्रकमधून शहरातून आले आहेत आणि वाटेत ड्रायव्हराने त्यांच्याकडून दोन रूपये लुबाडले आहेत, असे त्यांना कळले.

एक मरतुकडा इसम मळकट बनियन व चट्टयापट्टयांची चड्डी घालून बसला होता. नोव्हेंबरचा महिना होता आणि संध्याकाळचा गारठा पसरू लागला होता. परंतु तो बनियनमध्ये खूप खुष दिसत होता. त्याचे नाव मंगल होते, पण लोक त्याला सनीचर (शनैश्वर, शनी) म्हणत. त्याचे केस पिकू लागले होते, आणि पुढचे दात पडले होते. वैद्यजीच्या बैठकीत बसून राहाणे हेच त्याचे काम होते. तो बहुदा नुसती चड्डी घालूनच बसलेला असे. आज त्याने बनियन चढविलेली पाहून सनीचर 'फॉर्मल' (औपचारिक) बनू इच्छित आहे, हे रूप्पनबाबूंनी ओळखले. त्याने एका दमात रूप्पनबाबूंना रंगनाथावर कोसळलेली आपत्ती सांगून टाकली आणि आपल्या उघड्या मांड्यांवर तबल्याने काही अवघड बोल काढत तो हळहळून म्हणाला, ''बद्रीभैया असते म्हणजे मजा आला असता.''

रूप्पनबाबू चटकन रंगनाथाला म्हणाले, ''तू जे केलंस ते योग्यच केलंस, रंगनाथदादा ! दोन रूपये देऊन सगळी भानगड मिटवून टाकलीस, तेच बरोबर झालं. उगीच उठल्या-सुटल्या मारामारी करणं चांगलं नाही.''

रंगनाथ रूप्पनबाबूंना दोन वर्षांनंतर भेटत होता. रूप्पनबाबूंचे गांभीर्य ही दिवसभरातील सर्वांत मजेदार घटना आहे, असे समजून रंगनाथ म्हणाला, ''खरं म्हणजे मी मारामारीच करणार होतो, पण मग तो विचार सोडून दिला.''

रूप्पनबाबूंनी मारामारीतील विशेषज्ञ या नात्याने हात वर उचलून म्हटले, ''तू योग्यच केलंस. असल्या या भांडणांमुळंच 'इण्टुडंट कम्युनिटी' बदनाम होत असते.''

रंगनाथाने आता त्यांच्याकडे लक्ष देऊन पाहिले. खांद्यावर टाकलेला धोतराचा सोगा, नुकतेच खाल्लेले पान, केसांत घातलेले अनेक लिटर तेल - स्थानिक गुंडगिरीच्या कोणत्याही स्टँडर्डने ते होतकरू दिसत होते. रंगनाथाने विषय बदलण्याचा प्रयत्न करीत म्हटले, ''बद्रीदादा कुठं आहेत ? दिसले नाहीत.''

सनीचरने आपली चड्डी झटकायला सुरूवात केली. जणू काही मुंग्यांना तो हाकलून लावू इच्छित होता. डोके किलेकिले करीत तो म्हणाला, ''मला देखील बद्री भैयांची आठवण येतेय. ते असते तर एव्हाना. . .''

''बद्रीदादा कुठं आहेत ?'' रंगनाथाने त्याच्याकडे लक्ष न देता रूप्पनबाबूंना विचारले.

रूप्पनबाबू बेपर्वाईने उत्तरले, ''सनीचर सांगून तर राहिलाय. मला विचारून काही ते गेलेले नाहीत. कुठं तरी गेलेत खरे. बाहेर गेले असतील. येतील परत उद्या, परवा, तेरवापर्यंत परत येतीलच.''



त्यांच्या त्या बोलण्यावरून बद्री हे त्यांचे सख्खे भाऊ आहेत आणि त्यांच्या बरोबर एकाच घरात राहातात, हे कळणे कठीण होते. रंगनाथाने एक दीर्घ उसासा सोडला. त्याने एक दुसराच प्रश्न विचारला, ''आता तू कितवीत आहेस?''

त्यांच्या हावभावांवरून त्यांना हा प्रश्न आवडला नसल्याचे स्पष्ट दिसत होते. ते म्हणाले, ''दहावीत आहे ! . . तू म्हणशील की दहावीत तर तू दोन वर्षापूर्वीही होतास. पण मला तर शिवपालगंजमध्ये या वर्गातून बाहेर पडण्याचा मार्गच दिसत नाही. तुला या कॉलेजची कल्पना नाही. लबाड आणि बदमाष यांचा तो अड्डा आहे. शिक्षक अभ्यास घेण्याऐवजी राजकारण खेळण्यातच दंग असतात. अहोरात्र बाबांच्या डोक्याशी येऊन कटकट करत असतात. इथं परीक्षेत कोण पास होणार ?''

आतल्या खोलीत वैद्यजी रोग्यांना औषध देत होते. ते तेथूनच एकदम उद्‌गारले, ''शांत राहा, रूप्पन. या अव्यवस्थेचा आता शेवट होणारच आहे.''

जणू आकाशवाणीच होत होती. ''भिऊ नकोस वसुदेवा, कंसाचा काळ लौकरच जन्माला येणार आहे.''

रूप्पनबाबू शांत झाले. रंगनाथाने खोलीकडे तोंड करून मोठ्याने विचारले, ''मामाजी, या कॉलेजशी तुमचा काय संबंध ?''

''संबंध ?'' खोलीत वैद्यजींचे हास्य जोरात दुमदुमले. ''या कॉलेजशी माझा काय संबंध आहे हे तू जाणून घेऊ इच्छितोस ? रूप्पन, रंगनाथाची जिज्ञासा पूर्ण कर.''

रूप्पनने मोठ्या ऑफीशियल पद्धतीने सांगितले, ''बाबा कॉलेजचे मॅनेजर आहेत. शिक्षकांचं येणं जाणं त्यांच्याच हातात आहे.''

रंगनाथाच्या चेहऱ्यावर आपल्या या बोलण्याचा काय परिणाम होतो याचा अंदाज घेत ते पुढे म्हणाले, ''असा मॅनेजर संबंध देशात मिळायचा नाही. सरळ माणसाशी अगदी सरळ, आणि बदमाषाशी सवाई बदमाष.''

रंगनाथाने ही माहिती निमूटपणे पचविली, आणि काहीतरी बोलायचे म्हणून तो म्हणाला, ''अन् को-ऑपरेटिव्ह युनियनची काय स्थिती आहे ? तिचेही मामा कुणीतरी होते ना ?''

''होते नव्हे, आहेत.'' रूप्पनबाबू जरा कडवटपणे म्हणाले, ''मॅनेजिंग डायरेक्टर होते, आहेत आणि राहातील.''

वैद्यजी होते, आहेत आणि राहातील.

इंग्रजांच्या राजवटीत ते इंग्रजांविषयी श्रद्धा व्यक्त करीत असत. देशी राजवटीत ते देशी अधिकाऱ्यांविषयी आदर दाखवू लागले. ते देशाचे जुने सेवक होते. दुसऱ्या महायुद्धात जेव्हा भारताला जपानपासून धोका निर्माण झाला होता तेव्हा त्यांनी दूर पूर्वेत लढण्यासाठी पुष्कळ सैनिकांना भरती केले होते. आता जरूर पडल्यास रात्रीतल्या रात्री ते आपल्या राजकीय गटामध्ये शेकडो सभासदांना भरती करून घेतात. पूर्वी देखील न्यायालयात ज्यूरी व असेसर बनून, दिवाणी खटल्यांत इस्टेटींचे विश्वस्त किंवा राखणदार बनून, आणि गावच्या जमीनदारांपैकी पाटील तलाठी बनून ते जनतेची सेवा करीत असत. आता ते को-ऑपरेटिव्ह यूनियनचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि कॉलेजचे मॅनेजर होते. त्यांना पदाधिकारांचा मोह नव्हता. त्यामुळे वस्तुतः या अधिकारपदांवर राहाण्याची त्यांची इच्छा नव्हती. परंतु त्या भागात ही कामे जबाबदारीने पार पाडणारा दुसरा कोणी माणूसच उपलब्ध नव्हता, आणि तेथे जेवढे नवयुवक होते तेवढे सगळे देशातील इतर तरूणांप्रमाणे निरूपयोगी होते. म्हणूनच त्यांना म्हातारपणी ही अधिकारपदे सांभाळावी लागत होती.

म्हातारपण ! वैद्यजींच्या बाबतीत या शब्दाचा वापर केवळ गणिताच्या नाइलाजामुळे करावा लागत होता. कारण तसे त्यांचे वय बासष्ट वर्षांचे असले तरी राजधान्यांमध्ये राहून देशसेवा करणाऱ्या शेकडो महापुरूषांप्रमाणे एवढे वय होऊनही ते म्हातारे झालेले नव्हते. त्याच महापुरूषांप्रमाणे वैद्यजींची अशी प्रतिज्ञा होती की जोपर्यंत मरण येत नाही तोपर्यंत आम्ही म्हातारे होणार नाही, आणि जोपर्यंत लोक आमची अशी खात्री पटवून देणार नाहीत की तुम्ही खरोखरीच निधन पावला आहात, तोपर्यंत आम्ही स्वतःला जिवंत समजून देशसेवा करीत राहू. प्रत्येक थोर राजकारणी पुरूषाप्रमाणे त्यांना राजकारणाचा तिटकारा होता, आणि ते राजकारणी लोकांची टिंगल करीत असत. गांधीप्रमाणे त्यांनी आपल्या राजकीय पक्षात कोणतेही अधिकारपद ग्रहण केले नव्हते. कारण तेथे तरूण रक्ताला प्रोत्साहन देण्याची इच्छा होती. परंतु सहकारी संस्था आणि कॉलेज यांच्या बाबतीत लोकांनी त्यांना भाग पाडले होते, आणि त्यांनी नाइलाजाने ती पदे स्वीकारली होती.

वैद्यजींनी रोगांचे दोन वर्ग पाडले होते. प्रकट रोग आणि गुप्त रोग. ते प्रकट रोगांची प्रकटपणे व गुप्त रोगांची गुप्तपणे चिकित्सा (रोगपरीक्षा व औषध योजना) करीत असत. रोगांच्या बाबतीत त्यांची अशी 'थियरी' होती की सगळे रोग ब्रह्मचर्याच्या नाशामुळे होतात. कॉलेज विद्यार्थ्यांचे निस्तेज व खप्पड चेहरे पाहिल्यानंतर त्यांच्या या 'थियरी' ला बहुदा जोर चढे. या मुलांचे आरोग्य गरिबीमुळे व चांगला आहार न मिळाल्यामुळे ढासळले आहे, असे कोणी म्हटल्यास तो



आडवळणाने ब्रह्मचर्याचे महत्त्व नाकारीत आहे, असे ते समजत, आणि ज्याअर्थी ब्रह्मचर्य न मानणारा माणूस बदफैली असतो, त्याअर्थी दारिद्र्य व पौष्टिक आहाराचा अभाव ही कारणे सांगणारा माणूस यांच्या मते बदफैलीच ठरत असे.

एके दिवशी त्यांनी रंगनाथालाही ब्रह्मचर्याचे फायदे समजावून संगितले. त्यांनी एक विचित्र शरीरशास्त्र त्याला सांगितले. त्यातील हिशेबाप्रमाणे अनेक मण अन्न खाल्ल्यानंतर काही छटाक रस तयार होतो. त्या रसापासून रक्त, त्या रक्तापासून आणखी काही, आणि अशाप्रकारे सरतेशेवटी वीर्याचा एक बिंदू बनतो. वीर्याचा एक थेंब तयार करण्यास जेवढा खर्च येतो तेवढा एक ॲटम बॉंब बनविण्यासही येत नाही, हे त्यांनी सिद्ध करून दाखविले. हिंदुस्तानाजवळ जर कोणती अत्यंत मौल्यवान वस्तु असेल तर ती वीर्य ही आहे, याविषयी रंगनाथाची खात्री पटली. वैद्यजींनी त्याला सांगितले, "वीर्याचे हजारो शत्रू आहेत आणि सारे त्याला लुटायला टपले आहेत. जो कोणी मोठ्या हिकमतीनं आपलं वीर्य सांभाळील त्यानं आपलं संपूर्ण चारित्र्य सांभाळलं असं समज." त्यांच्या एकूण संभाषणावरून असे लक्षात आले की पूर्वी हिंदुस्तानात वीर्यरक्षणावर खूप भर असे, आणि एकीकडे दुधा-तुपाच्या तर दुसरीकडे वीर्याच्या नद्या वाहात असत. त्यांनी शेवटी एक श्लोक म्हटला. त्याचा अर्थ असा की वीर्याचा एक थेंब खाली पडण्याने माणूस मरून जातो आणि एक थेंब उचलून घेण्याने जीवन प्राप्त होते.

संस्कृत श्लोक ऐकताच सनीचरने हात जोडून म्हटले, 'जय भगवान की !' त्याने आपले डोके जमिनीवर टेकले आणि श्रद्धेच्या आवेशात आपल्या शरीराचा मागला भाग छताच्या दिशेने वर उचलला. वैद्यजीना आणखी जोर चढला व ते रंगनाथाला म्हणाले, "ब्रह्मचर्याच्या तेजाचं काय वर्णन करावं ? काही दिवसांनी तू आरशात आपलं तोंड बघ म्हणजे तुला कळून येईल."

रंगनाथ मान डोलावून आत जाण्यास निघाला. आपल्या मामांचा हा स्वभाव त्याला पूर्वीपासून माहीत होता. रूप्पनबाबू दारात उभे होते. त्यांच्यावर वैद्यजींच्या व्याख्यानाचा काहीही परिणाम झाला नव्हता. त्यांनी हलक्या आवाजात रंगनाथला म्हटले, "चेहऱ्यावर तेज आणण्यासाठी आजकाल ब्रह्मचर्याची काय जरूर आहे ? क्रीम - पावडर लावूनही ते सहज आणता येतं."

# ५

पुनर्जन्माच्या सिद्धांताचा शोध दिवाणी कोर्टात लागला आहे. आपला खटला अजून तसाच पडला आहे, याचे दुःख उराशी बाळगून वादी-प्रतिवादींनी इहलोकाचा निरोप घेऊ नये, यासाठी ही कल्पना शोधून काढण्यात आली. आता खटल्याचा निकाल पुढच्या जन्मी तरी ऐकायला मिळेलच, या आशेने ते आता सुखाने मरू शकतात.

वैद्यजींच्या बैठकीच्या बाहेर ओसरीवर जो इसम यावेळी बसलेला होता त्याने सुमारे सात वर्षांपूर्वी दिवाणी कोर्टात एक दावा दाखल केला होता. त्यामुळे त्याच्या बोलण्यात पूर्वजन्मीचे पाप, भाग्य, भगवान, पुढील जन्माचा कार्यक्रम वगैरे गोष्टी न चुकता येणे स्वाभाविक होते.

त्याला लोक लंगडा असे म्हणत. कपाळावर कबीरपंथी टिळा, गळ्यात तुळशीची माळा, वारा-वादळ सोसलेला दाढीयुक्त चेहरा, किरकोळ शरीरयष्टी, अंगात कापूस भरलेली बंडी. एक पाय गुडघ्यात कापला होता. त्याची भरपाई एका काठीच्या साह्याने करण्यात आली होती. जुन्या काळचे ख्रिस्ती संत दररोज आपल्या हाताने स्वतःच्या पाठीवर जोरजोरात शंभर फटके मारून घेत असत. त्यांच्या चेहऱ्यावर जसा भाव दिसे तसा लंगड्याच्या चेहऱ्यावर होता.

सनीचरने भांगेचा एक पेला पुढे करीत म्हटले, ''घे बाबा लंगड्या, पिऊन टाक. या भांगेत खूप माल-मसाला घातलाय.''

लंगड्याने एक दीर्घ उसासा टाकला आणि डोळे मिटून घेतले. आत्मदयेने पीडित व्यक्तींपासून तो वाजवीपेक्षा जास्त खाणाऱ्या लोकांपर्यंत भावप्रदर्शनाची ही एक अत्यंत लोकप्रिय मुद्रा समजली जाते. सनीचरने त्याचा नाद सोडला आणि डार्विनच्या विकासवादी सिद्धांताला पुष्टी देणारी एक वानरउडी मारून बैठकीच्या आतील भागावर हल्ला चढविला. तेथे प्रिन्सिपॉल साहेब, कारकून, वैद्यजी, रंगनाथ वगैरे बसले होते. सकाळचे दहा वाजण्याचा सुमार होता.

सनीचरने भांगेचा तोच पेला प्रिन्सिपॉल साहेबांसमोर धरला आणि तेच वाक्य उच्चारले, ''घ्या प्रिन्सिपॉलसाहेब, यात खूप माल-मसाला घातलाय.''

प्रिन्सिपॉल साहेब वैद्यजींना म्हणाले, ''कॉलेजचं काम सोडून आलोय. ही शांमवी संध्याकाळसाठी ठेवून द्यावी.''

वैद्यजी प्रेमळपणाने म्हणाले, ''संध्याकाळी पुनः घ्या.''

''कॉलेज सोडून आलोय ... '' ते पुनः म्हणाले.

रूप्पनबाबू कॉलेजला जाण्यासाठी घरून तयार होऊन निघाले होते. रोजच्याप्रमाणे खांद्यावर धोतराचा सोगा. अंगात बुशशर्ट. त्यांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे तो मळलेला



असला तरी भारी किंमतीचा असल्यामुळे तो घालण्यास हरकत नव्हती. यावेळी त्यांनी पान खाल्ले होते आणि भांग पाडला होता. हातात एक जाडजूड पुस्तक होते. ते मुख्यतः नागरिकशास्त्राच्या तासाला वाचण्यासाठी होते. त्याचे नाव 'खिशातील गुप्तहेर' असे होते. खिशात दोन फाउंटन पेने होती. एक तांबड्या शाईचे व एक निळ्या शाईचे. पण दोहोपैकी एकातही शाई नव्हती. हातात घड्याळ. ते रिस्टवॉच असे सिद्ध करीत होते की जो जुगार खेळतो त्याचे घड्याळही गहाण पडते आणि जो कोणी जुगाऱ्यांचा माल गहाण ठेवतो त्याला भारी किमतीचे घड्याळ दहा रूपयात मिळून जाते.

रूप्पनबाबूंनी बाहेर पडता-पडता प्रिन्सिपॉल साहेबांचे बोलणे ऐकले होते. ते दारातूनच म्हणाले, कॉलेजला तर ''तुम्ही नेहमीच सोडलेलं असतं, खरं म्हणजे कॉलेजच तुम्हाला सोडत नाही.''

प्रिन्सिपॉल साहेब वरमले. त्यामुळे हसले आणि जोराने म्हणाले, ''रूप्पनबाबूंचं बोलणं मोठं मार्मिक असतं.''

सनीचरने टुणकन उडी मारून प्रिन्सिपॉल साहेबांचे मनगट धरले आणि खुषीत येऊन तो म्हणाला, ''छान ! याच निमित्तानं हा पेला झोकून टाका.''

प्रिन्सिपॉल साहेब भांग पिऊ लागले. त्यांच्याकडे वैद्यजी प्रेमाने पाहात राहिले. पिऊन झाल्यावर प्रिन्सिपॉल साहेब म्हणाले, ''खरोखरीच यात भरपूर माल मसाला घातलाय.''

वैद्यजी म्हणाले, ''भांग ही नावापुरती. आहे म्हटलं तर आहे, नाही म्हटलं तर नाही. वास्तविक द्रव्यं म्हणजे बदाम, मनुका आणि पिस्ते. बदाम हा बुद्धि आणि वीर्य वाढविणारा आहे. मनुका रेचक आहेत. वेलचीही आहे त्यात. तिचा प्रभाव शीतळ आहे. त्यामुळं वीर्य फुटत नाही. भरीव आणि स्थिर राहातं. मी या पेयाचा लहानसा प्रयोग रंगनाथावरही करून राहिलोय.''

प्रिन्सिपॉल साहेब मान वर करून काही विचारणार इतक्यात वैद्यजीच सांगू लागले, ''काही दिवसांपूर्वी त्याला ताप येत होता. शक्ती क्षीण होऊ लागली होती. म्हणूनच मी त्याला इथं बोलावून घेतलंय. त्याच्यासाठी एक दैनिक कार्यक्रम तयार केलाय. पौष्टिक पदार्थांपैकी बदामाचा खुराक चालू केलाय. भांगेची दोन पानंही देतो. सहा महिन्यांनी जेव्हा तो इथून परत जाईल तेव्हा त्याची तब्येत कशी होते ते बघायचंय.''

कॉलेजचा कारकून उद्गारला, ''उंदराएवढे बनून आले होते, ते गेंडा बनून जातील. तुम्ही पाहाल, काका.''

वैद्यजींना कारकून जेव्हा काका म्हणून संबोधत असे तेव्हा आपण त्यांना बाप का म्हणू शकत नाही याची हळहळ प्रिन्सिपॉल साहेबांना वाटे. आताही त्यांचा चेहरा

उदास झाला. ते समोर पडलेल्या फाईली चाळू लागले.

एव्हाना लंगडा दरवाजापर्यंत आला होता. शास्त्रांमध्ये शूद्रांच्या आचरणाचे जे नियम सांगितले आहेत त्या नियमांनुसार उंबरठ्यावर कोंबड्याप्रमाणे उकिडवे बसून वैद्यजींना प्रणाम केला. त्यावरून आपल्या देशात आजही धर्मशास्त्र हे सर्वोपरी असून जातिव्यवस्था नष्ट करण्याचे सारे प्रयत्न ही आत्मवंचना जरी नसली तरी तो रोमँटीक कार्यक्रम मात्र अवश्य आहे, ही गोष्ट स्पष्ट झाली. लंगड्याने जणू भीक मागत असल्याप्रमाणे, याचनेच्या स्वरात म्हटले, ''मी जातो, बापू.''

वैद्यजी म्हणाले, ''जा बाबा ! तू धर्मयुद्ध करतो आहेस. लढत राहा. त्यात मी काय मदत करणार ?''

लंगड्याने स्वाभाविक स्वरात म्हटले, ''बरोबर आहे, बापू. अशा लढाईत तुम्ही काय करणार ? जेव्हा एखाद्या वशिल्याची वगैरे जरूर पडेल तेव्हा तुमच्याच उंबरठ्यावर येऊन नाक घासेन.''

जमिनीपर्यंत वाकून त्याने त्यांना पुनः प्रणाम केला आणि काठीच्या आधाराने एका पायावर तोल सावरीत तो निघून गेला. वैद्यजी खदखदून हसले आणि म्हणाले, ''अगदी बाळबुद्धी आहे.''

वैद्यजी फार क्वचित हसत. रंगनाथाने चमकून पाहिले. हसल्यानंतर वैद्यजींचा चेहरा अत्यंत सौम्य झाला. पुढारीपणाची जागा भलेपणाने घेतली. एका आचारवान् महापुरूषाऐवजी ते बदफैली इसमासारखे दिसू लागले.

रंगनाथाने विचारले, ''कसलं युध्द चालवलंय यानं ?''

प्रिन्सिपॉल साहेब समोर पसरलेल्या फायली व चेकबुके गोळा करू लागले. या फायलींच्या निमित्ताने ते कधी-कधी सकाळीच भांग प्यायला येत असत. ते मध्येच आपली आवराआवर थांबवून म्हणाले, ''याला मामलेदार कचेरीतून एका दस्तऐवजाची नक्कल मिळवायची आहे. यानं अशी शपथ घेतलीय की मी लाच देणार नाही, आणि रीतसर नियमाप्रमाणंच नक्कल मिळवीन. तिकडे नकला देणाऱ्या कारकुनानं अशी शपथ घेतलीय की मी लाच घेणार नाही आणि नियमाप्रमाणंच नक्कल देईन. याच मुद्यावर युध्द चाललंय.''

रंगनाथाने इतिहास विषय घेऊन एम. ए. ची पदवी मिळवली होती, आणि त्याने असंख्य युध्दांची कारणे वाचली होती. शिकंदराने भारतावर कबजा करण्यासाठी आक्रमण केले होते, त्याचा कबजा होऊ नये म्हणून पुरूने त्याला विरोध केला होता. त्यातून युध्द झाले होते. अल्लाऊद्दीन म्हणाला होता की, मी पद्मिनी घेणार, राणा म्हणाला होता, मी पद्मिनी देणार नाही. यावरून लढाई झाली होती. सर्व लढायांचे मूळ याच गोष्टीत होते. एक पक्ष म्हणत होता, मी घेणार, दुसरा पक्ष म्हणत होता मी देणार नाही. याच मुद्यावर युध्द होत असे.



परंतु या ठिकाणी लंगडा म्हणत होता की मी नियमाप्रमाणे नक्कल घेणार, आणि कारकून म्हणत होता मी नियमाप्रमाणेच नक्कल देणार आणि तरीही युध्द चालले होते.

रंगनाथाने प्रिन्सिपॉल साहेबांना या ऐतिहासिक विपर्यस्याचा अर्थ विचारला. त्यांच्या वतीने कारकून म्हणाला,

''हे शिवपालगंजवाल्यांचे चोचले आहेत. ते सहजासहजी लक्षात यायचे नाहीत. हा लंगडा इथून पाच कोस दूर असलेल्या एका खेड्यात राहाणारा आहे. बायको मरून गेलीय. मुलांशी याचं पटत नाही. मुलं आपल्याला मेलीत असं तो समजतो. भगत (माळकरी) माणूस आहे. कबीर आणि दादू यांची भजनं गात असे. गाता-गाता थकवा आला तेव्हा बसल्या-बसल्या एक दिवाणी दावा गुदरून दिला.

''या दाव्यासाठी एका जुन्या निकालाची नक्कल हवीय. त्यासाठी त्यानं मामलेदार कचेरीत अर्ज केला. त्या अर्जात काहीतरी उणीव राहून गेली, म्हणून तो फेटाळून लावण्यात आला. तेव्हा त्यानं दुसरा अर्ज दिला. काही दिवसांपूर्वी हा मामलेदार कचेरीत नक्कल घ्यायला गेला. नक्कलकारकून (नकलनवीस) वस्ताद भेटला. त्यानं पाच रूपये मागितले, लंगडा म्हणाला, दोन रूपयांचा रेट आहे. यावर वाद माजला. दोन-चार वकील तिथं उभे होते. त्यांनी प्रथम नक्कलकारकुनाला सांगितलं की, बाबा रे, हा बिचारा लंगडा आहे. दोन रूपयांत समाधान मान. नक्कल घेऊन तुझं गुणगान करीत राहील. पण तो नक्कल कारकून मुळीच द्रवला नाही. उलट अडेलतट्टूपणानं म्हणाला, ''मर्द एकदाच काय ते बोलतो. जे सांगितलंय तेच मी घेईन. त्यात मुळीच बदल करणार नाही.''

''तेव्हा मग वकिलांनी लंगड्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, ''नक्कलकारकून साहेबही कुटुंबवत्सल आहेत. त्यांच्या मुलींची लग्नं व्हायची आहेत. म्हणून त्यांनी दर वाढवलाय. देऊन टाक पाच रूपये.'' पण लंगडाही अडून बसला. तो म्हणाला, ''अलीकडे हे असंच चाललंय. पगार सगळा दारू आणि मांसमटणात उडवून टाकतात आणि मुलींच्या लग्नासाठी लाच घेतात.'' हे ऐकताच नक्कलकारकून बिथरला. तो गुरगुरला. ''जा जा ! मी आता मुळी लाचच घेणार नाही. जे काही करायचं ते नियमाप्रमाणं करीन.'' वकिलांनी त्याला पुष्कळ समजावलं की बाबा रे असं करू नकोस, लंगडा देवभक्त आहे, त्याचं बोलणं मनावर घेऊ नकोस.'' पण त्याचा राग काही केल्या कमी झाला नाही.

''रंगनाथबाबू, खरं म्हणाल तर लंगड्याचं म्हणणं काही चूक नव्हतं. या देशात मुलींची लग्नं ही सुद्धा चोरीची सबब झालीय. एकजण लाच घेतो तर दुसरा म्हणतो,

काय करणार बिचारा ? मोठं कुटुंब आहे. मुली लग्नाच्या आहेत. साऱ्या बदमाषीची सबब म्हणजे मुलींची लग्नं.''

''ते असो. लंगडा आणि नक्कलकारकून यांच्यात खूप कडाक्याचं भांडण झालं. आता लाच लुचपतीच्या बाबतीत प्रत्येक गोष्टीवर हुज्जत होतच असते. पूर्वीचा मामला सीधा-सरळ असे. जुनी माणसं शब्दाला जागणारी होती. एक रुपया टिकवला की दुसऱ्या दिवशी नक्कल तयार. आता ही शाळेतनं बाहेर पडणारी नवी-नवी पोरं कचेऱ्यांतून घुसतात आणि देवाण - घेवाणीचा रेट बिघडवून टाकतात. त्यांचं बघून जुनी माणसंही वाटेल तसं वागू लागलीत. आजकाल लाच घेणं आणि लाच देणं दोन्ही गोष्टी कटकटीच्या होऊन बसल्या आहेत.''

लंगड्यालाही राग आला. त्यानं गळ्यातल्या तुळशीच्या माळेला स्पर्श करून म्हटलं, ''जा जा. तूही नियमाप्रमाणं वाग आणि मीही नियमाचं काटेकोर पालन करतो. आता तुला एक फुटकी कवडीही मिळायची नाही. मी अर्ज तर गुदरलाय. कधी न कधी त्याचा नंबर येईलच.''

त्यानंतर लंगड्यानं मामलेदाराकडं जाऊन त्यांना सगळी हकीगत सांगितली. मामलेदार खोखो करून हसला, आणि म्हणाला, ''शाबास लंगड्या, अगदी योग्य तेच केलंस. या देण्याघेण्यात पडण्याची तुला जरूर नाही. नंबर आला की तुला नक्कल मिळून जाईल.'' त्यानं शिरस्तेदाराला सांगितलं, ''हा बिचारा लंगडा चार महिने हैराण झालाय. आता नियमाप्रमाणं काम झालं पाहिजे. याला कुणी त्रास देता कामा नये.'' यावर शिरस्तेदार म्हणाला, ''सरकार, हा लंगडा चक्रम आहे. तुम्ही याच्या भानगडीत पडू नका.'' त्याबरोबर लंगडा शिरस्तेदारावर उखडला. दोघेही हमरीतुमरीवर आले. अखेर मामलेदारानं कसं बसं त्यांचं भांडण मिटवलं.

''लंगड्याला पक्कं माहीत आहे की नक्कल कारकून या ना त्या सबबीवर आपला अर्ज फेटाळून लावणार. अर्ज म्हणजे मुंगीचा जीव. तो जीव घ्यायला फार ताकद लागत नाही. त्याचप्रमाणं अर्ज फेटाळून लावायला फारसं कारण लागत नाही. फीचं तिकीट कमी लावलंय, फाइलीचा नंबर चुकीचा लिहिलाय, एक रकाना भरलाच नाही, यासारखं एखादं कारण नोटिसबोर्डावर लिहिलं जातं, आणि ती चूक दिलेल्या मुदतीत दुरुस्त केली नाही तर अर्ज फेटाळून लावला जातो.

''म्हणून आता लंगड्यानं जय्यत तयारी करून ठेवलीय. तो आपलं गाव सोडून इथं आलाय. त्यानं आपल्या घराला कुलूप ठोकलंय. शेती - वाडी, पीक - पाणी, गुरंढोरं सारं काही देवाच्या भरवंशावर सोडून आलाय. आपल्या एका नातेवाईकाकडे मुक्काम ठोकलाय आणि दिवसभर मामलेदार कचेरीच्या नोटिस बोर्डाभोवती घुटमळत असतो. नोटिसबोर्डावर आपल्या अर्जासंबंधी एखादी सूचना लागली आणि ती आपल्याला कळलीच नाही, असं होऊ नये म्हणून ही सारी धडपड. जरा दुर्लक्ष झालं तर अर्ज निकालात निघायचा. एकदा असं झालंयही.''



''नक्कल मिळवण्यासाठी काय करावं लागतं ते सारे नियम त्यानं तोंडपाठ करून ठेवलेत. फीचा संपूर्ण चार्ट त्याला पाठ आहे. माणसाला अवदसा आठवली की त्याला कोर्टाची पायरी चढायची इच्छा होते. लंगड्यालाही अवदसा आठवलीय. परंतु या खेपेला तो मामलेदार कचेरीवर असा काही तुटून पडलाय की पक्का नक्कल घेतल्याशिवाय राहाणार नाही, असं दिसतंय.''

बाहेर जाण्यासाठी कारकून उठला. प्रिन्सिपॉलनी आजूबाजूला दृष्टी फिरवून म्हटले, ''बद्री भैया दिसत नाहीत.''

वैद्यजी म्हणाले, ''एक नातेवाईक दरवड्यात अडकलेत. पोलिसांची लीला अपार आहे. तुम्हांला माहीतच आहे. बद्री तिकडेच गेलाय. आज येईल परत.''

सनीचर उंबरठ्याजवळ बसला होता. तोंडाने शीळ घालत तो म्हणाला, ''येत नाहीत तोपर्यंतच ठीक आहे.''

प्रिन्सिपॉल साहेबांनी भांग प्याल्यामुळे 'आराम हराम है' या घोषणेचा एव्हांना त्यांना विसर पडला होता. एक मोठा तक्क्या आपल्याजवळ ओढून घेत ते आरामात टेकून बसले आणि त्यांनी विचारले, ''काय भानगड आहे ?''

सनीचरने हळूच सांगितले, ''को-ऑपरेटिव्ह युनियनमध्ये अफरातफर झालीय. बद्री भैयांना ते समजलं तर ते सुपरव्हायजरला खाऊन टाकतील.''

प्रिन्सिपॉल साहेब घाबरले. ते पुटपुटले, ''असं होय ?''

एवढ्यात वैद्यजी ओरडून म्हणाले, ''बायकांसारखं असं दबल्या आवाजात काय बोलतो आहेस ? सहकारी संस्थेत अफरातफर झाली, यात काय मोठंसं ? अशी कोणती सहकारी संस्था आहे की जिच्यात अफरातफर झालेली नाही ?''

थोडा वेळ थांबून ते समजावणीच्या सुरात म्हणाले, ''आमच्या संस्थेत अफरातफर झाली नव्हती. त्यामुळं लोक आमच्याकडे संशयानं पाहू लागले होते. आता आम्ही छातीठोकपणानं सांगू शकतो की आम्ही सच्चे लोक आहोत. अफरातफर झालीय आणि आम्ही ती लपवलेली नाही. जे आहे ते आम्ही जाहीर केलंय.''

एक दीर्घ उसासा टाकून ते पुढे म्हणाले, ''चला, बरं झालं. एक काळजी दूर झाली.''

प्रिन्सिपॉल साहेब तक्क्याला टेकून स्तब्ध बसून राहिले. शेवटी सर्वांना ठाऊक

असलेलीच गोष्ट त्यांनी सांगितली. ते म्हणाले, ''आजकाल माणसं फारच बेइमान झाली आहेत.''

ही गोष्ट अत्यंत गुणकारी आहे. प्रत्येक मला माणूस दिवसातून तीनदा जेवण झाल्यानंतर मल्टी-व्हिटॅमिनच्या गोळ्यांप्रमाणे या गोष्टीचा वापर करू शकतो. परंतु कारकुनाला त्यामध्ये व्यक्तिशः आपल्यावरच आक्षेप असल्याचा भास झाला. त्याने उत्तर दिले, ''हे माणसा-माणसावर अवलंबून आहे. आपल्या कॉलेजात आजपर्यंत कधी असं घडलं नाही.''

वैद्यजींनी त्याच्याकडे आत्मीयतेने पाहिले आणि स्मित केले. सहकारी संस्थेतील अफरातफर बियाण्याच्या गोदामातून गहू पळवून करण्यात आली होती. तो रोख मनात धरून ते म्हणाले, ''कॉलेजात अफरातफर कशी होणार ? तिथं काही गव्हाचं गोदाम नसतं.''

ही नुसती गंमत होती. प्रिन्सिपॉल साहेब त्या विनोदावर हसले. एकदा हास्याचा बांध फुटल्यावर पुढील जबाबदारी भांगेने सांभाळली. ते हसतच राहिले. परंतु कारकुनाला अजूनही आपल्यावर व्यक्तिशः आरोप केल्याचा संशय येत होता. तो म्हणाला, ''काका, कॉलेजात भुशाची शेकडो गोदामं आहेत. प्रत्येकाच्या मेंदूत भुसाच भरलाय.''

मूळ मुद्याची गोष्ट दोन-चार तास इकडल्या-तिकडल्या गप्पा झाल्यानंतर काढावयाची ही आपली गौरवपूर्ण परंपरा आहे. त्याप्रमाणे आता वैद्यजींनी प्रिन्सिपॉल साहेबांना विचारले, ''आणखी काही विशेष काम ?''

''तसं काही नाही म्हणा. तो आपला खन्नांचा मामला आहे तेवढाच. परवा वर्गात काळा चष्मा घालून शिकवत होते. मी तिथल्या तिथं त्यांना फैलावर घेतलं. मुलांना भडकवत होते. मी म्हटलं, ''बेट्या, तुला इथल्या इथं सीधा करतो.'' प्रिन्सिपॉल साहेबांनी स्वतःवर चांगलाच संयम ठेवला होता. पण वाक्य संपता संपता त्यांच्या तोंडून 'खीःखीः' असा आवाज निघून गेलाच.

वैद्यजी गंभीरपणे म्हणाले, ''असं करू नये. विरोधकांशीही सभ्यपणाची वागणूक ठेवली पाहिजे. असं पाहा, प्रत्येक मोठ्या पुढाऱ्याला एक-एक विरोधक असतो. प्रत्येकानं स्वेच्छेनं आपापला विरोधक धरून ठेवलाय. हा लोकशाहीचा सिद्धांतच आहे. आपले पुढारी किती शालीनपणे विरोधकांचे आघात झेलतात. विरोधी लोक त्यांच्या मनाला येईल ते बरळत असतात, आणि आमचे पुढारी निमूटपणे आपलं काम करीत राहातात. कोणाचा कुणावर परिणाम होत नाही. हा खरा आदर्श विरोध. तुम्हीही असंच वागलं पाहिजे.''

राजनीतीच्या या मौलिक सिद्धांतांचा कारकुनावर मुळीच परिणाम झाला नाही. तो



म्हणाला, ''यात काही अर्थ नाही, काका. खन्ना मास्टरांना मी चांगला ओळखून आहे. इतिहास घेऊन एम्. ए. झालेत. पण त्यांना स्वतःच्या बापाचंही नाव ठाऊक नाही. फक्त गटबाजीत वस्ताद आहेत. आपल्या घरी मुलांना बोलावून त्यांना जुगार खेळायला लावतात. त्यांना सरळ करण्याचा एक उपाय आहे. कधी तरी त्यांना धरून फडाफड फडाफड जोडे हाणायचे.''

हे ऐकताच वैद्यजी जास्तच गंभीर झाले. परंतु इतर लोकांना जोष आला. जोडे मारण्याचा ढंग आणि परंपरा याविषयी चर्चा सुरू झाली. सनीचर हरखून म्हणाला, ''खन्नाला फडाफड, फडाफड हाणायच्या वेळी मलाही सांगा. बऱ्याच दिवसांत मी कुणाला जोड्यानं मारलं नाही. दोन-चार वार करायला मीही येईन.'' एक इसम म्हणाला, ''जोडा फाटका असला आणि तीन दिवस पाण्यात भिजवलेला असला तर तो मारला की झकास आवाज निघतो आणि दूरदूरच्या लोकांना जोडंपट्टी चालल्याची माहिती मिळते.'' दुसरा एकजण म्हणाला, ''शिकलेल्या माणसाला जोड्यानं मारायचं असेल तर गोरक्षक जोड्याचा वापर केला पाहिजे. म्हणजे मार तर बसतो पण फारशी बेइज्जती होत नाही.'' ओसरीवर बसल्या-बसल्या तिसरा एक इसम म्हणाला, ''जोडे मारायची खरी पद्धत म्हणजे मोजून शंभर जोडे मारायचं ठरवायचं, नव्याण्णवपर्यंत येईतो मागली संख्या विसरून जायची आणि पुनः पहिल्यापासून एक-दोन मोजायला सुरुवात करायची.'' त्याला मनःपूर्वक पाठिंबा देत चौथा गृहस्थ म्हणाला, ''खरोखरी, खेटरपट्टी करण्याची हीच एकमेव पद्धत आहे, आणि म्हणून मीही शंभरापर्यंत आकडे पाठ करायला सुरुवात केलीय.''

## ६

रामाधीनचे संपूर्ण नाव बाबू रामाधीन भीखमखेडवी असे होते. भीखमखेडा हे शिवपालगंजला लागून असलेले, नामशेष होण्याच्या पंथाला लागलेले खेडे होते. काही झोपड्या, महसूल खात्याची कागदपत्रे आणि बाबू रामाधीनची जुन्या ढंगाची शायरी यांमध्येच त्याचे अस्तित्व उरले होते.

बाबू रामाधीन लहानपणी भीखमखेडा गावातून बाहेर पडून लोहमार्गाने शहरात जाऊन पोचले होते. तेथून मिळेल त्या गाडीत बसण्याची योजना बनवून ते कसलीही योजना मनात न बाळगता कलकत्याला जाऊन पोचले होते. तेथे प्रथम एका व्यापाऱ्याकडे चिठ्ठीचपाटी पोचविण्याचे काम त्यांनी पत्करले. नंतर मालाची ने-आण करू लागले. पुढे त्याच्या व्यापारात भागीदारी सुरू केली आणि अखेर शेवटी ते त्या व्यापाराचे मालक बनले.

हा व्यापार अफूचा होता. कच्ची अफू बिहार - उत्तर प्रदेशातून येई. ती वेगवेगळ्या मार्गांनी कलकत्यातीलच मोठमोठ्या व्यापाऱ्यांकडे पोचविण्याचे दलालीचे काम त्यांच्या हातांत होते. ही अफू परदेशांत पाठविण्याचे कामही ते आपल्या हाती घेऊ शकत होते. परंतु ते फार महत्त्वाकांक्षी नव्हते. आपले दलालीचे काम ते गुपचुप करीत आणि उरलेला वेळ पश्चिमेकडील जिल्ह्यांतून येणाऱ्या लोकांच्या संगतीत घालवीत. तेथे ते आपल्या भागातील लोकांमध्ये खूप प्रख्यात होते. लोक त्यांच्या अशिक्षितपणाची तारीफ करीत, आणि त्यांचे नाव घेऊन, युनिव्हर्सिटीची डिग्री न मिळविता अकबर वगैरे अशिक्षित बादशाहांनी किती चातुर्याने राज्य चालविले असेल हे समजून घेण्याचा प्रयत्न करीत.

अफूच्या व्यापारात भरपूर पैसा मिळत असे आणि इतर व्यापाऱ्यांशी पुष्कळच स्पर्धा करावी लागे. या व्यापारात एक लहानसा दोष होता. तो असा की तो कायद्याच्या विरूद्ध होता. हा मुद्दा निघाला की बाबू रामाधीन आपल्या मित्रांना म्हणत, "या बाबतीत मी काय करणार ? कायदा काही मला विचारून केला नव्हता."

अफूच्या कायद्याप्रमाणे बाबू रामाधीन पडकले गेले आणि त्यांना मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात आले. तेव्हाही त्यांनी हीच भूमिका घेतली. त्यांनी इंग्रजी कायद्यांचा धिक्कार करून महात्मा गांधींचा आधार दिला, आणि विदेशी सरकारचे कायदे लहरीप्रमाणे बनविण्यात आले असून प्रत्येक क्षुद्र गोष्टीला गुन्हा असे संबोधण्यात आले आहे, हे सिद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ते म्हणाले, "महाशय, अफू ही एक प्रकारच्या झाडापासून उत्पन्न होते. झाड मोठं झालं की त्याला सुंदर पांढरी फुलं येतात. इंग्रजीत त्यांना पॉपी असं म्हणतात. त्याचाच दुसरा एक प्रकार असून त्याला लाल फुलं येतात. साहेब लोक ही झाडं आपल्या बंगल्याच्या आवारात लावतात. याच फुलांचा आणखी एक प्रकार असून त्याला डबल पॉपी म्हणतात. हुजूर, या साऱ्या फुलाफळांच्या गोष्टी आहेत. त्यांच्याशी गुन्ह्याचा काय संबंध ? त्याच पॉपी नांवाच्या पांढऱ्या फुलाच्या झाडापासून ही काळीभोर वस्तू निघते. हा पदार्थ औषधाच्या कामी येतो. याचा व्यापार करणं हा गुन्हा होऊच शकत नाही. ज्या कायद्यात त्याला गुन्हा ठरवण्यात आलंय तो काळा कायदा होय. तो आमचा नाश करण्यासाठी बनविण्यात



आलाय."

एवढे मोठे लेक्चर झोडल्यावरही बाबू रामाधीनना दोन वर्षांची शिक्षा झाली. परंतु त्या काळात शिक्षा होतच असे. मुद्याची गोष्ट शिक्षा होण्यापूर्वी कोर्टासमोर जोरदार व्याख्यान देणे ही असे. अशा प्रकारे व्याख्यान देऊन शेकडो लोक क्रांतिकारकांपासून अहिंसावाद्यापर्यंत हुतात्मे झाले आहेत हे बाबू रामाधीनना माहीत होते, आणि आपल्या या व्याख्यानाने आपल्यालाही हुतात्मा बनणे सोपे जाईल याविषयी त्यांची खात्री होती. परंतु शिक्षा भोगून आल्यानंतर त्यांना असे आढळून आले की हुतात्मा बनण्यासाठी अफूचा नव्हे तर मिठाचा कायदा मोडावा लागतो. कलकत्त्यात काही दिवस भटकल्यावर बाजारातून आपले उच्चाटन झाले असल्याचे त्यांना दिसून आले. त्याने दुःखी होऊन त्यांनी चार-दोन शेर (कविता) रचले, आणि या खेपेला ते तिकीट काढून आपल्या गावी परत आले. येथे येऊन ते शिवपालगंजमध्ये राहू लागले.

आपले दलालीचे दुकान बंद झाले असल्याचे त्यांनी लोकांना खरेखुरे सांगून टाकले. त्यापेक्षा जास्त सांगण्याची जरूर नव्हती. त्यांनी एक लहानसे कच्चे-पक्के घर बांधले, थोडी जमीन घेऊन शेती सुरू केली, गावच्या मुलांना कवड्यांऐवजी पत्त्यांचा जुगार खेळायला शिकवले आणि दारातील खाटल्यावर पडल्या पडल्या आपल्या कलकत्याच्या मुक्कामातील किस्से सांगण्यात प्राविण्य संपादन केले. एवढ्यात ग्रामपंचायती अस्तित्वात आल्या आणि कलकत्त्यातील आपल्या अनुभवांच्या आधारे त्यांनी आपल्या एका चुलत भावाला सभापतीही बनवून टाकले. सुरूवातीच्या काळात सभापती कशाला म्हणतात हेच लोकांना माहीत नव्हते. त्यामुळे त्यांच्या भावाला त्या जागेसाठी निवडणूकही लढवावी लागली नाही. काही दिवसानंतरच लोकांना समजले की गावात दोन सभापती आहेत. त्यापैकी बाबू रामाधीन हे ग्रामसभेची जमीन खंडाने देण्यासाठी आहेत आणि दुसरा त्यांचा भाऊ जरूर पडल्यास, अफरातफरीच्या खटल्यात तुरूंगात जाण्यासाठी आहे.

बरेच दिवसपर्यंत बाबू रामाधीन यांची गावात चांगली चलती राहिली. त्यांच्या घरासमोर छप्पर असलेला एक बंगला रिकामा पडला होता. त्यात गावचे तरूण जुगार खेळत व भांग घोटण्याचे काम चाले. सारे वातावरण मोठे काव्यमय होते. त्यांनी गावात पहिल्यांदाच कॅना, नॅस्टॅर्शियम, लार्कस्पर वगैरे विलायती फुलांची झाडे लावली होती. त्यात लाल रंगाची काही फुले होती. त्यांच्या विषयी ते कधी-कधी म्हणत, "ही पॉपी आहे, आणि ही साली डबल पॉपी आहे."

परगावाहून परत येतांना गावाबाहेर बद्री पहिलवानांचा रिक्शा कुणीतरी थांबविला. अंधार पडू लागला होता आणि थांबविणाऱ्याचा चेहरा दुरून स्पष्ट दिसत नव्हता. बद्री पहिलवानांनी दरडावले. ''कोण आहे रे ?''

''अरे-तुरे करू नका पहिलवान. मी रामाधीन आहे.'' असे म्हणत एक इसम रिक्शाजवळ येऊन उभा राहिला. रिक्शावाल्याने रस्त्याच्या मधोमध एकदम रिक्शा थांबवला. त्या गृहस्थाने धोतर नेसून सदरा घातला होता. परंतु अंधुक प्रकाशात इतर माणसांपेक्षा त्याचे वेगळेपण त्याच्या धोतर सदऱ्यावरून नव्हे तर तुळतुळीत चमनगोट्यावरून व्यक्त होत होते. रिक्शाचे हँडल धरून तो म्हणाला, ''माझ्या घरावर दरवडा पडणार आहे, कळलंय तुम्हांला ?''

पहिलवानांनी रिक्शावाल्याच्या पाठीत एक बोट ढोसून त्याला पुढे जाण्याची खूण करीत म्हटले, ''पण मग आत्तापासूनच काय पिरपिर चालवलीय तुम्ही ? जेव्हा दरवडा पडू लागेल तेव्हा मला बोलवा.''

रिक्शावाल्याने पॅडलवर जोर दिला. परंतु रामाधीननी त्याचे हँडल इतके घट्ट धरले होते की त्या जोराने या जोराला छेद दिला. रिक्शा जागच्या जागी उभा राहिला. बद्री पहिलवान चिडून म्हणाले, ''मी मनाशी म्हटलं, भररस्त्यात रिक्शा अडवून विधवा बाईसारखं रडायला लागलात तेव्हा अशी कोणती आपत्ती कोसळलीय तुमच्यावर ?''

रामाधीन म्हणाले, ''मी रडत नाही. तक्रार करतोय. वैद्यजींच्या घरात तुम्हीच एकटे माणूस आहात. बाकी सारे दिवटेच आहेत. म्हणून तुम्हांला सांगतोय. माझ्या नावानं एक पत्र आलंय, त्यात दरवडेखोरांनी माझ्याकडे पाच हजार रूपये मागितले आहेत. त्यांनी म्हटलंय, अमावास्येच्या रात्री दक्षिणेकडल्या टेकडीवर पैसे ठेवून ये...''

बद्री पहिलवानांनी मांडीवर षड्डू मारून म्हटले, ''इच्छा असल्यास देऊन या, नसल्यास एक कवडीही द्यायची जरूर नाही. यापेक्षा मी जास्त काय सांगणार ? चल रे रिक्शावाल्या !''

घर जवळ आहे, वाटलेली भांग बाहेर तयार असेल, ती पिऊन, आंघोळ करून, झकास लंगोट लावून, अंगात एक झब्बा चढवून, मजेत बैठकीत बसावे. लोक विचारतील, 'पैलवान काय करून आलात ?' आपण डोके मिटून त्यांचे प्रश्न ऐकावेत, इतरांनाच त्यांची उत्तरे देऊ द्यावीत. शरीरातील ताकद आणि भांगेची नशा यांमुळे जगातील सारे आवाज डासांच्या गुणगुणीसारखे भासावेत ... या विचारांत ते दंग होते.

अशा प्रकारच्या सुखस्वप्नांत डुंबत असतांना आपल्याला अशा अवेळी रस्त्यावर अडविले जावे हे बद्रींना मुळीच आवडले नाही. त्यांनी रिक्शावाल्याला दरडावून पुन्हा म्हटले, ''तुला मी सांगितलं ना, चल पुढं.''



पण तो पुढे कसा जाणार ? रामाधीनांचा हात अजूनही रिक्शाच्या हँडलवर होता. ते म्हणाले, ''पैशाचा मुद्दा नाही. माझ्याकडून पैसे कोण वसूल करतो ते मी पाहातो. माझं तुम्हाला फक्त एवढंच सांगणं आहे की रूप्पनना जरा तंबी द्या. ते स्वतःला जरा जादाच समजू लागलेत. जमिनीकडे बघून चाला म्हणावं. आकाशाकडे पाहून ...''

बद्री पहिलवान आपल्या मांड्यांवर जोर देऊन रिक्शातून खाली उतरले, रामाधीनचा हात धरून रिक्शावाल्यापासून थोडे दूर घेऊन गेले आणि म्हणाले, ''उगीच कशाला आपली जीभ विटाळता आहात ? रूप्पननं काय केलं ?''

रामाधीन म्हणाले, ''माझ्या नावानं दरवड्याचं हे पत्र रूप्पननंच धाडलंय. पुरावा आहे माझ्याजवळ.''

पहिलवान चिडून म्हणाले, ''दोन-चार दिवसही गाव सोडून जाणं कठीण होऊन बसलंय. मी गेलो आणि इकडे ही भानगड सुरू झाली.'' नंतर थोडा वेळ विचार करून म्हणाले, ''तुमच्याजवळ पुरावा असेल तर मग भ्यायचं काय कारण ?'' आणि मग रामाधीनना अभयदान देत त्यांनी सांगितले, ''तर मग तुमच्या घरावर दरोडा-बिरोडा काही पडणार नाही. जा, शांतपणे झोपा. रूप्पन दरवडे घालीत नसतो. पोर आहे, थट्टा केली असेल.''

रामाधीन कडवटपणे उद्गारले, ''ते तर मलाही कळलंय. रूप्पननं थट्टा केलीय. पण ही असली कसली थट्टा ?''

बद्री पहिलवानांनी त्यांच्याशी सहमत होत म्हटले, ''तुमचं म्हणणं बरोबर आहे. असली थट्टा करता कामा नये.

रस्त्यावरून एक ट्रक भरधाव येत होता. त्याच्या दिव्यांचा प्रकाशाने बद्रींचे डोळे दिपले. त्यांनी रिक्शावाल्याला सांगितले, ''अरे, रिक्शा कडेला घे. रस्ता तुझ्या बापाचा नाही.''

रामाधीनना बद्रींचा स्वभाव माहीत होता. त्यांचे ते बोलणे ऐकून ते म्हणाले, ''नाराज होण्याची गोष्ट नाही ही पैलवान. पण तुम्हीच विचार करा, हे काय वागणं झालं ?''

ते रिक्शाकडे परत आले होते. रिक्शात बसता बसता म्हणाले, ''दरोडा पडणारच नाही, तेव्हा जास्त चर्चा करण्याची काय गरज ? चलो रिक्शावाले !''

जाता-जाता ते म्हणाले, ''रूप्पनला मी समजावून सांगतो. हे बरं नव्हे.''

रामाधीन मागून आवाज चढवून म्हणाले, ''त्यानं माझ्या घरावर दरवडा घालण्याचं पत्र पाठवलंय. याबद्दल तुम्ही त्याला नुसतं समजावून सांगणार ? ही समजावून सांगण्याची बाब नाही. चांगली खेटरपट्टी केली पाहिजे.''

रिक्शा चालू लागला होता. पहिलवानांनी मान न वळवताच उत्तर दिले, ''तुम्हाला

फारच राग आला असेल तर तुम्ही माझ्या नावानं तसलंच एक पत्र पाठवून द्या.''

## ७

गच्चीवर एक खोली होती. ती संयुक्त कुटुंबातील पाठ्यपुस्तकासारखी नेहमीच उघडी पडलेली असे. कोपऱ्यात पडलेली करेल्याची जोडी जाहीर करत होती की ही खोली कायदेशीरपणे बद्री पहिलवानांची आहे. तसे पाहिल्यास कुटुंबातील इतर प्राणीही आपापल्या पद्धतीने त्या खोलीचा वापर करीत असत. घरच्या बायका काचेच्या व मातीच्या भांड्यांमध्ये नाना प्रकारची लोणची भरून ती गच्चीत उन्हात ठेवीत असत; आणि संध्याकाळ झाली की ती त्या खोलीत आणून ठेवीत. हीच स्थिती गच्चीवर वाळत घातलेल्या कपड्यांची असे. खोलीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत एक दोरी बांधलेली होती. तिच्यावर संध्याकाळच्या वेळी लंगोटे आणि चोळ्या, टॉवेल व पेटिकोट एकत्रपणे झोके घेत असलेले दिसत. वैद्यजींच्या दवाखान्यातील अनावश्यक बाटल्याही खोलीतील एका कपाटात जमा झालेल्या होत्या. बहुदा सर्वच बाटल्या रिकाम्या होत्या. त्या बाटल्यांवर 'वापर करण्यापूर्वी' आणि 'वापर केल्यानंतर' अशा शिर्षकांखाली दोन चित्रे छापलेली होती. पहिल्या चित्रात एक मरतुकडा माणूस होता आणि दुसऱ्या चित्रात लंगोट कसून मिशांना पीळ देणारा (आणि म्हणून आरोग्य संपन्न असणारा) माणूस दाखविला होता. त्यावरून हजारो लोकांना वाघाप्रमाणे धष्टपुष्ट करून सोडणाऱ्या बाटल्या त्या ह्याच, हे लक्षात येत होते. अर्थात हे लोक आपल्या स्नानगृहात व शयनगृहातच कंबर मुरडून चालणाऱ्या वाघासारखे फेऱ्या घालत असतात, आणि बाहेर मात्र पूर्ववत शेळीसारखेच वागतात ही गोष्ट अलाहिदा !

कुटुंबातील सर्व लोकांच्या शांततापूर्ण सहजीवनाची घोषणा दुमदुमविणारी ही खोली पाहून लोकांच्या मनात स्थानिक संस्कृतीविषयी श्रद्धा उत्पन्न होणे शक्य होते. ही खोली पाहिल्यानंतर पृथ्वीच्या पूर्व गोलार्धात संयुक्त कुटुंबव्यवस्थेला कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण झाला आहे, असे कोणीही समाजशास्त्रज्ञ म्हणू शकला नसता.

हीच खोली रंगनाथाला राहाण्यासाठी देण्यात आली होती. त्याला येथे चार-पाच महिने राहावयाचे होते. वैद्यजींचे म्हणणे बरोबर होते. एम्. ए. होता-होता कोणाही सामान्य विद्यार्थ्याप्रमाणे तो अशक्त झाला होता. त्याला ताप येत होता. कोणाही सामान्य भारतीयाप्रमाणे ॲलोपॅथीवर विश्वास नसतानाही त्याने डॉक्टरचे औषध घेतले होते. त्या औषधाने त्याची तब्येत मुळीच सुधारली नव्हती. कोणाही सर्वसामान्य शहरी माणसाप्रमाणे शहरी व ग्रामीण औषध सारखेच असते, अशी त्याची श्रद्धा होती. म्हणून तो येथे राहाण्यासाठी आला होता. कोणाही सर्वसामान्य मूर्खाप्रमाणे त्याने एम्. ए. झाल्यानंतर नोकरी न मिळाल्यामुळे रिसर्च सुरू केला होता, परंतु कोणाही सामान्य बुद्धीच्या माणसाप्रमाणे त्यालाही हे माहीत होते की रिसर्च करण्यासाठी विद्यापीठात राहणे आणि दररोज ग्रंथालयात बसणे आवश्यक नसते. म्हणून काही दिवस खेड्यात राहून विश्रांती घ्यावी, तब्येत ठणठणीत करून घ्यावी, अभ्यास करावा, जरूर पडेल तेव्हा शहरात जाऊन पुस्तके बदलून आणावीत, आणि 'आमचे तरूण असे कुचकामी नसते तर आम्हा म्हाताऱ्यांना या जबाबदाऱ्या अंगावर घ्याव्या लागल्या नसत्या' असे म्हणण्याची संधी वैद्यजींना पदोपदी द्यावी, असे त्याने ठरविले होते.

वरची ही खोली खूप मोठी होती, आणि तिच्या एका भागावर रंगनाथने लागलीच आपले व्यक्तित्व प्रस्थापित केले होते. तो भाग साफसूफ करून तेथे एक कायमची चारपाई (बाज) टाकून दिली होती. तिच्यावर एक कायमचा बिछाना पसरलेला होता. शेजारच्या कपाटात त्याची पुस्तके ओळीने बसली होती. त्यांमध्ये 'खिशातील गुप्तहेर' किंवा चोरून वाचण्याचे साहित्य यांना मनाई करण्यात आली होती. तेथेच कॉलेजातून मागवून घेतलेले एक लहानसे टेबल व खुर्चीही मांडण्यात आली होती. चारपाई जवळच भिंतीत एक खिडकी होती. ती उघडली की तिच्यातून बागा व शेते दिसत.

रूप्पनबाबूंनी कुठून तरी वेगवेगळे भाग आणून ते जोडून रेडियोसारखे काहीतरी तयार केले होते. खोलीच्या वरच्या बाजूस उभारलेले बांबू आणि आसपासची झाडे यांच्या आधाराने त्यांनी लांब-लांब तारांचे जाळे पसरले होते. ते पाहून आशियातील सर्वांत मोठे ट्रान्समिशन सेंटर येथे आहे, असा भास होत होता. परंतु आतील रेडियो मात्र हेडफोनच्या साह्यानेच ऐकता येत होता. तो कानांवर बसवून रंगनाथ कधी-कधी स्थानिक बातम्या आणि वैष्णव संतांची शोकपूर्ण भजने ऐकत असे. त्यावरून ऑल इंडिया रेडियो पूर्वी जसा होता तसाच अजूनही आहे, आणि हजारो शिव्या खाऊनही तो निर्लज्जपणे आपल्या चाकोरीबाहेर पडण्यास मुळीच तयार नाही, याविषयी त्याची पूर्ण खात्री होई. काही दिवसांनंतर रंगनाथाने स्वतःच एक स्वस्तपैकी रेडियो आणला.

रंगनाथाचा कार्यक्रम वैद्यजींच्या सूचनेप्रमाणे तयार करण्यात आला होता : भल्या पहाटे उठणे, काल खाल्लेले आज पचले असेल असा विचार मनात आणणे (ब्राम्हे मुहूर्ते उत्तिष्ठेत जीर्णाजीर्ण निरूपयन्), तांब्याच्या लोट्यात ठेवलेले गार पाणी पिणे,

खूप दूरवर फिरावयास जाणे, नित्यकर्म (कारण जगात तेवढेच एक कार्य नित्य असून बाकी सर्व अनित्य आहे !), भटकत परत फिरणे (परं चक्रमणं हितम्), तोंड-हात धुणे, दातवणाचे लाकूड चघळणे व त्या निमित्ताने दात साफ करणे (निम्बस्य तिक्तके श्रेष्ठः कषाये बब्बुलस्तथा), कोमट पाण्याने चुळा भरणे (सुरवोष्णोदक गंडूषैः जायते वस्त्रलाघवम्), व्यायाम करणे, दूध पिणे, अभ्यास करणे, दुपारचे जेवण, विश्रांती, अभ्यास, संध्याकाळी फिरावयास जाणे, परत आल्यावर पुनः थोडा व्यायाम, बदाम, मनुका वगैरेनी युक्त पेयाचे पान, अभ्यास, जेवण, अभ्यास, झोप.

रंगनाथाने हा संपूर्ण कार्यक्रम इमाने इतबारे अमलात आणला होता. त्यात फक्त एकच मामुली दुरूस्ती करण्यात आली होती. ती अशी की अभ्यासाची जागा वैद्यजींच्या बैठकीतील शिवपालगंजच्या गावकरी मंडळींच्या सत्संगाने घेतली होती !

काही दिवसांतच शिवपालगंजविषयी रंगनाथाला असे वाटू लागले की महाभारताप्रमाणे, जे इतरत्र कुठेही नाही ते येथे आहे, आणि जे येथे नाही ते कुठेही नाही. आपण भारतीय एक असून प्रत्येक ठिकाणी आपली बुद्धी सारखीच आहे, असे त्याला आढळून आले. डावपेच व छक्केपंजे याबाबतीतील ज्या अखिल भारतीय प्रतिभेची प्रशंसा सारी प्रख्यात वृत्तपत्रे पहिल्या पानापासूनच जाड जाड मथळ्यांखाली करीत असतात, तिच्या आधारे मोठमोठी महामंडळे, आयोग व प्रशासने निर्माण होतात, पतन पावतात, फरफटली जातात ती प्रतिभा याठिकाणी कच्च्या मालाच्या रूपात मुबलक विखुरलेली आहे असे त्याला दिसून आले. ते सारे पाहिल्यानंतर भारताच्या सांस्कृतिक ऐक्यावरील त्याची श्रद्धा अधिकच दृढ झाली.

शिवपालगंज हे खेडेगाव होते, परंतु ते शहरापासून जवळ व रस्त्याच्या कडेला होते. त्यामुळे मोठमोठ्या पुढाऱ्यांची व अधिकाऱ्यांची तेथे येण्यास कसलीही तात्त्विक हरकत असू शकत नव्हती. विहिरींखेरीज तेथे काही हँडपंपही बसवलेले होते. त्यामुळे बाहेरून येणारी बडी माणसे तहान लागल्यावर, आपला जीव धोक्यात न घालता तेथील पाणी पिऊ शकत होती. खाण्याचीही सोय होती. तेथील लहान-सहान अधिकाऱ्यांमधून कोणी ना कोणी असा निघे की त्याचा थाटमाट पाहून स्थानिक लोक त्याला अत्यंत बेइमान समजत, परंतु त्याच गृहस्थाला बाहेरून आलेले लोक सभ्य व शिष्टाचार-संपन्न समजत. ते आपसात म्हणत, "बघा ना, हा किती सुसंस्कृत आहे. फार मोठ्या घराण्यातला आहे हा. अहो, चीको साहेबांची मुलगी याला दिलीय." त्यामुळे भूक लागल्यावर आपला प्रामाणिकपणा धोक्यात न घालता ते लोक तेथे जेवणखाणही



करू शकत असत. कारण काहीही असो, त्या मोसमात शिवपालगंजला लोकनेते व लोकसेवक यांचे जाणे-येणे फारच वाढले होते. त्या सर्वांना शिवपालगंजच्या विकासाची काळजी होती, आणि त्याचा परिणाम म्हणून ते व्याख्यान झोडत असत.

त्या काळात खेडेगावांतील व्याख्यानाचा मुख्य विषय शेती हा होता. याचा अर्थ पूर्वी दुसरा एखादा विषय होता असा मुळीच नाही. वस्तुतः गेल्या कित्येक वर्षांपासून खेड्यातील लोकांना फसवून असे सांगण्यात येत होते की भारतवर्ष हा शेतीप्रधान देश आहे. ग्रामीण लोक या विधानाला हरकत घेत नसत. परंतु प्रत्येक वक्ता सुरूवातीपासूनच असे गृहीत धरून चाले की आपले श्रोते या विधानाला विरोध करणार आहेत. त्यामुळे ते खोदून खोदून अनेक पुरावे शोधून काढीत आणि भारत हा शेतीप्रधान देश असल्याचे सिद्ध करण्याची खटपट करीत. त्यानंतर ते असे सांगत की शेतीची उन्नती हीच देशाची उन्नती होय. यानंतरचा मुद्दा मांडण्यापूर्वीच बहुदा दुपारच्या जेवणाची वेळ होई आणि तो घरंदाज,चीको साहेबांच्या मुलीशी लग्न केलेला, हुशार, सुसंस्कृत तरूण वक्त्याचा सदरा मागच्या बाजूने ओढून खुणेने असे सांगू लागे की, 'काका, जेवण तयार आहे.'' कधी-कधी काही वक्ते पुढच्याही गोष्टी सांगून टाकत, आणि मग त्यांच्या मागच्या व पुढच्या गोष्टीत काहीच फरक नसल्याचे आढळून येई. कारण सगळ्या व्याख्यानाचा मुद्दा हाच असे की भारत हा शेतीप्रधान देश आहे, तुम्ही शेतकरी आहात, तुम्ही उत्तम शेती केली पाहिजे, अधिक धान्य पिकविले पाहिजे. प्रत्येक वक्ता बहुदा या संशयाने पछाडलेला असे की शेतकऱ्यांना जास्त धान्य पिकविण्याची इच्छाच नसते.

व्याख्यानांतील उणीव जाहिराती भरून काढीत. शिवपालगंजच्या भिंतीवर चिकटविलेल्या किंवा लिहिलेल्या जाहिरातींवरून तेथील समस्या व त्यांची उत्तरे यांची चांगली कल्पना येई. उदाहरणार्थ, समस्या अशी होती की भारतवर्ष हा एक शेतीप्रधान देश आहे, परंतु येथील शेतकरी बदमाष असल्यामुळे ते अधिक धान्य पिकवत नाहीत. यावर उपाय असा की शेतकऱ्यांसमोर व्याख्याने झोडावीत आणि त्यांना छान-छान चित्रे दाखवावीत. त्यांच्या द्वारे त्यांना असे सांगावे की तुम्हाला स्वतःसाठी धान्य पिकवायचे नसेल तर ते देशासाठी पिकवा. याच हेतूने जागजागी भित्तीचित्रे (पोस्टर्स) लावण्यात आली होती. ही भित्तिचित्रे शेतकऱ्यांकडून अधिक धान्य पिकविण्याचे काम करवून घेऊ इच्छित होती. व्याख्याने व भित्तीचित्रे यांचा शेतकऱ्यांवर खूप जोराचा परिणाम होई, आणि अगदी साध्याभोळ्या शेतकऱ्याचीही अशी खात्री पटून जाई की याच्यामागे काहीतरी डाव आहे.

त्या दिवसात शिवपालगंजमध्ये एक भित्तिचित्र विशेष गाजत होते. त्या चित्रात एक धष्टपुष्ट शेतकरी डोक्याला टॉवेल गुंडाळून, कानांत भिकबाळ्या घालून, आणि

अंगात रूईदार बंडी घालून उंच वाढलेले गव्हाचे भरदार पीक विळ्याने कापत होता. त्याच्या मागे एक स्त्री उभी होती. ती स्वतःवर बेहद्द खुष होऊन कृषिविभागाच्या अधिकाऱ्यांसारखे स्मित करीत होती. चित्राच्या खाली व वरती इंग्रजी व हिंदी अक्षरांमध्ये लिहिले होतेः 'अधिक धान्य पिकवा' मिकबाळी व बंडी घालणाऱ्या शेतकऱ्यांपैकी जे इंग्रजीचे विद्वान होते त्यांना इंग्रजीच्या साह्याने व जे हिंदीचे विद्वान होते त्यांना हिंदीच्या द्वारे पराभूत करण्याची कल्पना त्याच्या मुळाशी होती. ज्यांना या दोहोंपैकी एकही भाषा येत नव्हती त्यांना निदान स्त्री व पुरूष तरी ओळखता येत होतेच. त्यांच्याकडून अशी अपेक्षा बाळगण्यात आली होती की पुरूषाच्या मागे हसणाऱ्या स्त्रीचे चित्र पाहून ते त्याकडे पाठ वळवून ताबडतोब झपाटल्याप्रमाणे अधिक धान्य पिकवायला सुरुवात करतील. आजकाल शिवपालगंजमध्ये या चित्रावर जागजागी चर्चा चालू होती. कारण गावकरी मंडळींना चित्रातील पुरूषाचे बद्री पहिलवानांशी खूपच साम्य असल्याचा भास होत होता. चित्रातील बाईविषयी मात्र खूपच मतभेद होता. गावातील तरूणींपैकी कोणाचे ते चित्र असावे हे अजून नक्की ठरत नव्हते.

तसे पाहिल्यास सर्वात जास्त गाजावाजा शेतीच्या नव्हे तर मलेरियाच्या जाहिरातीचा होता. जाग-जागी घरांच्या भिंतीवर कावेने लिहिले होतेः 'मलेरिया नष्ट करण्याच्या कामी आम्हाला मदत करा. डास नष्ट होऊ द्यात.' या बाबतीतही असे गृहीत धरण्यात आले होते की शेतकरी गायी-म्हशींप्रमाणे डास पाळायलाही उत्सुक असतात आणि त्यांना मारण्यापूर्वी शेतकऱ्यांचे हृदयपरिवर्तन करणे आवश्यक आहे. हृदयपरिवर्तनासाठी छाप पडली पाहिजे. छाप पडायची तर इंग्रजी हवे, या भारतीय तर्कपद्धतीला अनुसरून डास मारणे व मलेरियाचा नायनाट करणे या कामात सहकार्य करण्याची सारी आवाहने बहुदा इंग्रजीत लिहिलेली होती. त्यामुळे बहुतेक सर्व लोकांनी ती साहित्य म्हणून नव्हे तर चित्रकला म्हणून मान्य केली होती. कावेने भिंती घिताडणाऱ्यांना मनास येईल तसे इंग्रजी लिहिण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. भिंती रंगविल्या जात होत्या, डास मरत होते, कुत्री भुंकत होती, लोक आपआपल्या मार्गाने चालले होते.

एक जाहिरात भाबडेपणाने सांगत होती की आपण पैसे वाचविले पाहिजेत. पैसे वाचविण्याचा उपदेश गावकऱ्यांना त्यांचे पूर्वज मरण्यापूर्वीच करून गेले होते, आणि बहुदा प्रत्येक माणसाला ती गोष्ट चांगली माहीत होती. त्या जाहिरातीत फक्त एकच मुद्दा नवीन होता. तो असा की त्यातही देशाचा उल्लेख होता. 'तुम्ही स्वतःसाठी पैसा वाचवू शकत नसाल तर निदान देशासाठी तरी तो वाचवा.' असेही काही जाहिरातींतून सूचित करण्यात आले होते. हा मुद्दा अगदी बरोबर होता. कारण शेठ-सावकार, उच्च अधिकारी, वकील, डॉक्टर, हे सारे स्वतःसाठी पैसा वाचवतच होते, त्यामुळे लहान



त्यामुळे शेतकऱ्यांनी देशासाठी बचत करण्यास काय हरकत होती ? पैशाची बचत केली पाहिजे या मुद्यावर सर्वांचे तत्त्वतः एकमत होते. पैसा वाचवून तो कोठे व कसा जमा करावा या गोष्टीही जाहिरातींत व व्याख्यानांत स्पष्टपणे सांगण्यात आलेल्या होत्या; आणि लोकांची त्यांनाही काही हरकत नव्हती. मात्र एकच गोष्ट लोकांना सांगावयाची राहून गेली होती. ती अशी की काही बचत करण्यापूर्वी तुमच्या मेहनतीचा मोबदला म्हणून तुम्हाला किती पैसे मिळाले पाहिजेत.

परंतु ज्या जाहिरातींनी रंगनाथाला आपल्याकडे आकृष्ट करून घेतले, त्या पब्लिक सेक्टरमधील नसून ती प्रायव्हेट सेक्टरची देणगी होती. त्यांतून व्यक्त होणाऱ्या गोष्टी सामान्यतः अशा होत्या :- या भागातील सर्वांत व्यापक रोग गजकर्ण हा आहे. त्यावर एक औषध आहे. ते लावले की गजकर्ण समूळ नष्ट होतो. ते पोटात घेतल्यास पडसे-खोकला बरा होतो. ते बत्ताशात घालून पाण्याबरोबर गिळल्यास पटकी बरी होते. असे औषध जगात कुठेही मिळणार नाही. ते शोधून काढणारे अजून हयात आहेत. विलायतेतील लोकांच्या दुष्टपणामुळेच त्यांना आजपर्यंत नोबेल पारितोषिक मिळालेले नाही.

ज्यांना नोबेल पारितोषिक मिळालेले नाही असे आणखीही मोठमोठे डॉक्टर या देशात आहेत. असे एक डॉक्टर जहानाबाद गावात राहात. आता तेथे वीज आली असल्यामुळे ते नपुंसकत्वाचा इलाज विजेच्या साह्याने करतात. आता नपुंसकांना काळजी करण्याचे कारण नाही. असेच आणखी एक डॉक्टर ऑपरेशनशिवाय अंडवृध्दीचा रोग बरा करतात. ते निदान भारतात तरी मश्हूर आहेतच; आणि ही गोष्ट शिवपालगंजमधील अनेक भिंतीवर डांबराने लिहिलेल्या शब्दांत नमूद केलेली आढळते. तसे पाहिल्यास मुलांचा डांग्या खोकला, डोळ्यांचा आजार, मुरडा वगैरे रोगांशी संबंधित जाहिरातीही तेथे आहेत. परंतु मुख्य रोग तीनच आहेत :- गजकर्ण, मुरडा व नपुंसकपणा. या रोगांवरील उपाय शिवपालगंजमधील मुले अक्षरज्ञान होताच भिंतींवरील लिखाणाच्या साह्याने शिकून घेऊ लागतात.

जाहिरातींच्या या गर्दीत 'नवयुवकांसाठी आशेचा संदेश' ही वैद्यजींची जाहिरात आपल्या वेगळेपणाने उठून दिसे. भिंतींवर लिहिलेल्या 'नपुंसकपणावर विजेचा उपाय' यांसारख्या अश्लील जाहिरातींशी तिची तुलना होऊ शकत नव्हती. ती लहान लहान चौकांत, दुकानांवर व सरकारी इमारतींवर-ज्यांच्या जवळ लघ्वी करण्याची व ज्यांच्यावर जाहिराती चिकटविण्याची मनाई होती तेथे - पत्र्याच्या सुंदर पट्टयांवर लाल व हिरव्या अक्षरांनी लिहिलेली असे. तिचे सांगणे फक्त एवढेच होते की, 'नवयुवकांसाठी आशेचा संदेश.' खाली वैद्यजींचे नाव होते व त्यांना भेटण्याचा सल्ला दिलेला होता.

रोगांच्या चिकित्सेमध्ये एका नवीन मितीची भर पडत असल्याचे एके दिवशी

रंगनाथाने पाहिले. सकाळपासूनच काही लोक एका भिंतीवर मोठमोठ्या अक्षरांत लिहित होते: 'मुळव्याध !' हे शिवपालगंजच्या प्रगतीचे चिन्ह होते. मूळव्याध ही पुरूषभर उंचीची चार अक्षरे ओरडून सांगत होती की याठिकाणी मुरड्याचे युग समाप्त होत आहे. नाजुक तब्येत, कचेरीतील खुर्ची, शिष्टाचारपूर्ण राहाणी-करणी, चोवीस तास चालणारे खाणे-पिणे, आणि सौम्य परिश्रम यांचे युग हळूहळू भूतकाळात विलीन होत असून सर्वव्यापी नपुंसकपणाचा मुकाबला करण्यासाठी आधुनिकतेचे प्रतीक अशी मुळव्याध मैदानात उतरत आहे. संध्याकाळपर्यंत राक्षशिणीसारखी ती प्रचंड जाहिरात एका भिंतीवर आपली रंगी-बेरंगी छाप उठवून बसली होती; आणि दूर-दूरपर्यंत घोषित करीत होती : 'मूळव्याधीवरील रामबाण उपाय.'

बघता-बघता चार-सहा दिवसांतच सारे जग मूळव्याध व तिच्यावरील रामबाण उपाय यांखाली दबले गेले. प्रत्येक ठिकाणी तीच जाहिरात चमकू लागली. तीच जाहिरात एका दैनिक वृत्तपत्रातही प्रसिद्ध झालेली पाहून रंगनाथला अत्यंत आश्चर्य वाटले. हे दैनिक रोज सकाळी दहा वाजेपर्यंत शहरातून शिवपालगंजमध्ये येत असे; आणि स्कूटर व ट्रक यांची टक्कर कोठे झाली. अब्बासी नावाच्या संशयित गुंडाने इरशाद नावाच्या संशयित भाजीवाल्यावर संशयित सुरीने संशयित स्वरूपाचा वार कोठे केला, वगैरे गोष्टी जाणून घेण्यास ते लोकांना मदत करीत असत. रंगनाथाला त्या दिवशी असे दिसून आले की दैनिकाच्या पहिल्या पानाचा फार मोठा भाग काळ्या रंगाने रंगविलेला असून त्यावर पांढऱ्या रंगामध्ये छापलेली 'बवासीर' ही मोठमोठी अक्षरे उठून दिसत आहेत, अक्षरांचे वळण येथील भिंतींवर लिहिलेल्या जाहिरातीतील अक्षरांच्या वळणासारखेच आहे. त्या अक्षरांनी मूळव्याधीला एक नवे रूप दिले होते. त्यामुळे आसपासच्या साऱ्या गोष्टी मूळव्याधीच्या आधीन झाल्या होत्या. दैनिकाच्या पानावरील काळ्या पार्श्वभूमीवर चमकणारी 'मूळव्याध' दुरूनच माणसाला आपल्या कवेत घेत होती. इतकेच काय ज्या सनीचरला मोठमोठी अक्षरे वाचतांनाही आंतरिक कष्ट होत असत तोही वृत्तपत्राजवळ खेचला गेला आणि त्यावर डोळे रोखून बसला. बराच वेळ निरीक्षण केल्यानंतर तो रंगनाथला म्हणाला, ''तेच आहे हे.''

त्यात अभिमानाचा झंकार होता. त्याचा अर्थ असा की शिवपालगंजच्या भिंतींवर झळकणाऱ्या जाहिराती म्हणजे काही सामान्य गोष्ट नव्हे. बाहेरच्या वृत्तपत्रातही त्या छापल्या जातात. सारांश, शिवपालगंजमध्ये जे आहे तेच बाहेरच्या वृत्तपत्रात येते.

रंगनाथ दिवाणावर बसून राहिला. त्याच्यासमोर दैनिकाचे पान तिरकस होऊन पडले होते. अमेरिकेने एक नवीन उपग्रह सोडला होता, पाकिस्तान-भारत सीमेवर गोळीबार चालू होता. गव्हाच्या तुटवड्यामुळे राज्यांचा कोटा कमी करण्यात येणार होता, सुरक्षा समितीत दक्षिण अफ्रिकेसंबंधीच्या काही प्रश्नांवर चर्चा चालली होती. या



साऱ्या चिमुकल्या पाखरांना आपल्या पंजात दाबून धरून एखाद्या प्रचंड बहिरी ससाण्याप्रमाणे ती काळी-पांढरी जाहिरात आपल्या तिरकस अक्षरांतून किंचाळत होती. ''मूळव्याध ! मूळव्याध !'' ही जाहिरांत दैनिकामध्ये प्रसिद्ध होताच मूळव्याध हा शिवपालगंज व आंतरराष्ट्रीय जग यांच्यातील एक यशस्वी दुवा बनला होता.

एका विशिष्ट तारखेला, विशिष्ट ठिकाणी रामाधीनांच्या कडून रूपयांची थैली एकान्तामध्ये ठेवण्यात आली पाहिजे असा दरवडेखोरांचा हुकूम होता. दरवडा घालण्याची ही पद्धत आजही देशाच्या काही भागांमध्ये खूप लोकप्रिय आहे. परंतु वस्तुतः ती आहे मध्ययुगीनच, कारण त्यासाठी चांदीचे किंवा कथलाचे रूपये आणि थैली असणे आवश्यक असते. परंतु आजकाल रूपये नोटांच्या रूपात देता येतात आणि पांच हजार रूपये एखाद्या प्रेमपत्राप्रमाणे लहानशा पाकिटातही मावतात. जरूर पडल्यास चेकनेही पैसे देता येतात. या कारणांमुळे परवा रात्री अमुक टेकडीवर पाच हजार रूपयांची एक थैली गुपचुप ठेवून निमूटपणे निघून जा, हा हुकूम अमलात आणण्यामध्ये व्यावहारिक अडचणी येऊ शकतात. टेकडीवर ठेवलेले नोटांचे पाकीट वाऱ्याने उडून जाऊ शकते, चेक बनावटी असू शकतो. सारांश, कला, साहित्य, प्रशासन, शिक्षण इत्यादि क्षेत्रांप्रमाणेच दरवडेखोरीच्या क्षेत्रातही मध्ययुगीन पद्धती आधुनिक युगामध्ये लागू केल्याने अनेक व्यावहारिक अडचणी उत्पन्न होऊ शकतात.

ते कसेही असो. दरवडेखोरांनी या गोष्टींचा विचार केला नव्हता. कारण रामाधीनना दरवड्याचे पत्र धाडणारे हे अस्सल डाकू नव्हते. त्या दिवसांत ग्रामपंचायत आणि कॉलेजचे राजकारण या मुद्यांवरून रामाधीन भीखमखेडवी आणि वैद्यजी यांच्यात काहीशी तेढ निर्माण झाली होती. ते शहर असते आणि राजकारण वरच्या पातळीवरचे असते तर अशा प्रसंगी रामाधीनांच्या विरूध्द एखाद्या महिलेकडून पोलिसांकडे अशी तक्रार करण्यात आली असती की त्यांनी तिचा विनयभंग करण्याचा सक्रिय प्रयत्न केला होता परंतु तिच्या सक्रिय विरोधामुळे ते काही करू शकले नव्हते व ती आपला विनय सहीसलामत ठेवून सरळ पोलिस चौकीवर जाऊन पोचली होती. परंतु हे खेडे होते. तेथे अद्यापि स्त्रियांच्या विनयभंगाला राजकीय युद्धातील हँडग्रेनेड म्हणून मान्यता मिळाली नव्हती. त्यामुळे तेथे काही जुन्या मार्गांचाच वापर करण्यात आला होता, आणि बाबू रामाधीन यांच्यावर दरवडेखोरांच्या हल्ल्याची टांगती तलवार निर्माण करून त्यांना काही दिवस तळमळत ठेवण्यात आले होते.

पोलीस, रामाधीन भीखमखेडवी आणि वैद्यजींचे संपूर्ण टोळके या सर्वांना दरवड्याचे

पत्र बनावटी असल्याचे माहीत होते. अशी पत्रे कित्येक वेळा कित्येक लोकांच्या नावाने आली होती. त्यामुळे ठरलेल्या दिवशी ठरलेल्या वेळी पैसे घेऊन टेकडीवर जाण्यास रामाधीन बांधलेले नव्हते. ते पत्र बनावटी नसते तरी रामाधीननी गुपचुप पैसे देण्याऐवजी घरावर दरवडा पडू देणे बहुदा अधिक पसंत केले असते. परंतु आता पोलिस चौकीवर तक्रार नोंदली गेली होती त्यामुळे पोलिसांना स्वतः काही तरी हातपाय हलविणे भाग होते.

त्यादिवशी टेकडीपासून गावापर्यंतची रंगभूमी पोलिसांना समर्पित करण्यात आली आणि तिच्यावर ते 'डाकू-डाकू'चा खेळ खेळत राहिले. टेकडीवर तर जणू एक स्वतंत्र पोलिस ठाणेच उघडण्यात आले. त्यांनी आसपासची माळराने, जंगले, शेते, खळी, मळ्या सारे काही पालथे घातले. परंतु डाकूंचा कुठेही मागमूस लागला नाही. टेकडीजवळ त्यांनी झाडांच्या फांद्या हलवून, कोल्ह्यांच्या बिळात संगिनी घुसवून आणि सपाट जागांना आपल्या डोळ्यांनी हिप्नोटाइज करून त्या-त्या ठिकाणी जे कोणी आहेत ते डाकू नसून अनुक्रमे पक्षी, कोल्हे व किडेमुंग्याच आहेत याविषयी स्वतःची खात्री करून घेतली. रात्री जेव्हा काही प्राणी जोरजोराने ओरडू लागले तेव्हा तेही दरवडेखोर नसून कोल्ही आहेत, आणि शेजारच्या बागेत जेव्हा दुसरे प्राणी ओरडले तेव्हा थोड्या वेळानंतर ते दुसरे-तिसरे कोणी नसून ती वटवाघुळे आहेत, असे आढळून आले. त्या दिवशी रात्री डाकू आणि रामाधीन भीखमखेडवी यांची कुस्ती बरोबरीत सुटली. कारण डाकू टेकडीवर रूपये नेण्यासाठी आले नाहीत किंवा रामाधीन रूपये देण्यासाठी गेले नाहीत.

ठाण्याचे छोटे फौजदार नुकतेच नोकरीला लागले होते. टेकडीवरील डाकूंना पकडण्याचे काम त्यांच्याकडेच सोपविण्यात आले होते. परंतु एवढे सारे करूनही ते आपल्या आईला पाठविण्याच्या पत्रांच्या पुढील हप्त्यात असे लिहिण्यास लायक ठरले नव्हते की, ''आई, डाकूंनी मशीनगन्सही वापरल्या. परंतु एवढ्या भयंकर गोळीबारातही तुझ्या आशीर्वादाने तुझ्या मुलाच्या केसालाही धक्का लागला नाही.'' ते रात्री सुमारे एक वाजता टेकडीवरून उतरून मैदानात आले. यावेळी अंधार होता आणि थंडी पडू लागली होती. त्यामुळे त्यांना आपल्या शहरातील प्रियतमेची आठवण येत होती. बी.ए. च्या परीक्षेत त्यांनी हिन्दी साहित्याचाही अभ्यास केला होता. या सर्व कारणांमुळे त्यांनी प्रथम हळूहळू गुणगुणण्यास व नंतर मोठ्याने गाण्यास सुरूवात केली, ''हाय मेरे दिल ! हाय मेरे दिल !''

त्यांच्या पुढे दोन शिपाई होते आणि मागे दोन होते. फौजदारसाहेब गात राहिले आणि शिपाई मनात म्हणू लागले, ''काही विशेष नाही. थोड्याच दिवसात ताळ्यावर येतील. मैदान ओलांडून पुढे येता येता फौजदार साहेबांचे गाणे चांगलेच वर चढले



आणि जी मूर्खतापूर्ण गोष्ट गद्यात सांगता येत नाही ती पद्यात मजेने सांगता येते, हे त्याने सिद्ध केले.

सडक जवळ आली होती. इतक्यात जवळच्या एका खड्ड्यातून अचानक आवाज आला, ''कफौन है सर्फाला ?'' (कोण आहे साला ?) फौजदारांचा हात त्यांच्या रिव्हॉलव्हरवर गेला. शिपायांनी थबकून रायफली रोखल्या. एवढ्यात त्या खड्ड्याने पुनः गर्जना केली, ''कफौन है सर्फाला ?''

एक शिपाई फौजदाराच्या कानाशी कुजबुजला, ''हुजूर, गोळी येण्याची शक्यता दिसते. झाडामागे लपा.''

झाड त्यांच्यापासून सुमारे पाच यार्डांच्या अंतरावर होते. फौजदार साहेबांनी शिपायाला हलक्या आवाजात सांगितले, ''तुम्ही सगळे झाडामागे लपा. मी बघतो.''

इतके बोलून ते म्हणाले, ''खड्ड्यात कोण आहे ? जो कुणी असेल त्यानं बाहेर यावं'' आणि मग एका सिनेमात पाहिलेले दृश्य आठवून ते पुढे म्हणाले, ''तुम्ही लोक घेरले गेले आहांत. तुम्ही अर्ध्या मिनिटात बाहेर आला नाहीत तर गोळीबार सुरू होईल.''

खड्ड्यामध्ये थोडावेळ स्तब्धता पसरली. नंतर त्यातून आवाज आला, ''मर्फर गर्फये सर्फाले, गर्फोली चर्फरानेवाले !'' (मर गये साले गोली चलानेवाले)

जो-जो भारतीय आपले घर सोडून बाहेर पडतो तो प्रत्येक जण भाषेच्या बाबतीत अगदी फत्तर बनून जातो. इतक्या प्रकारच्या भाषा त्याच्या कानांत घुसतात की अखेर हार मानून ही नेपाळी आहे की गुजराती याचा विचार करणेच तो सोडून देतो. परंतु या भाषेने फौजदारसाहेब चांगलेच चमकले आणि ते विचार करू लागले की, ''ही काय भानगड आहे ? यात काहीतरी शिवी आहे एवढं समजतंय, पण ही भाषा कुठली ते मात्र का लक्षात येत नाही ?'' यानंतर 'जेथे गोष्ट समजण्याच्या बाहेर जाते तेथेच गोळीबार सुरू होतो', या आंतरराष्ट्रीय सिद्धांताचा वापर शिवपालगंजच्या शिवारात करण्यासाठी फौजदारांनी आपले रिव्हॉलव्हर रोखले व कडकपणे म्हणाले, ''खड्ड्यातून बाहेर ये, नाहीतर मी गोळीबार करतो.''

परंतु गोळी झाडण्याची जरूर पडली नाही. एका शिपायाने झाडामागून पुढे येत म्हटले, ''गोळी झाडू नका हुजूर. हा जोगनाथ्या आहे. दारू पिऊन खड्ड्यात पडलाय.''

सारे शिपाई उत्साहाने खड्ड्याभोवती गोळा झाले. फौजदारांनी विचारले, ''कोण जोगनाथ्या ?''

एका जुन्या शिपायाने आपल्या अनुभवाच्या जोरावर सांगितले, ''हा रामनाथांचा मुलगा जोगनाथ आहे. एकटा जीव सदाशिव आहे. दारू फार पितो.''

शिपायांनी जोगनाथाला उठवून त्याच्या पायांवर उभे केले. परंतु जो स्वतः आपल्या पायांवर उभा राहू इच्छित नाही त्याला इतर लोक कुठवर उभा करणार ? त्यामुळे तो पुनः एकदा झोक जाऊन खाली कोसळणार इतक्यात त्याला सावरण्यात आले. अखेर खड्ड्याच्या वर येऊन तो परमहंसासारखा मांडी घालून बसला. बसल्यावर त्याने डोळे वटारून, हातवारे करीत वटवाघुळांचे व कोल्ह्यांचे आवाज काढून, स्वतःला मानवी पातळीवर संभाषण करण्यालायक बनविले. परंतु त्याच्या तोंडून पुनः तेच शब्द बाहेर पडले : ''कफौन है सर्फाला ?''

एक शिपाई म्हणाला, ''यावेळी तो शुद्धीत नाही. म्हणून शिव्या देतोय.''

शिव्यांवरील जोगनाथाची ती निष्ठा पाहून फौजदार साहेब खूपच प्रभावित झाले. तो बेशुद्ध अवस्थेतही निदान एवढे तरी करीत आहे, हे पाहून त्यांना कौतुक वाटले. त्यांनी जोराने त्याची मान गदगदा हलविली आणि ते दरडावून म्हणाले, ''शुद्धीवर ये.''

परंतु जोगनाथने शुद्धीवर येण्यास साफ नकार दिला. तो फक्त एवढेच उद्गारला, ''सर्फाले !''

शिपाई हसू लागले. फौजदारही हसून म्हणाले, ''हा साला आम्हांला साला म्हणतोय.''

त्यांनी त्याला मारण्यासाठी आपला हात वर उचलला. पण एका शिपायाने त्यांना अडवून म्हटले, ''जाऊ द्या हुजूर.''

शिपायांचा हा मानवतावादी दृष्टिकोण फौजदार साहेबांना फारसा पसंत नव्हता. त्यांनी आपला हात आवरला खरा, परंतु लगेच हुकूम सोडला, ''याला आपल्या बरोबर घ्या आणि लॉकपमध्ये ठेवा. फौजदारीचं कलम १०० याच्यावर लावा.''

एक शिपाई म्हणाला, ''हुजूर तसं करता यायचं नाही. हा इथलाच राहाणारा आहे. भिंतीवरच्या जाहिराती लिहितो. तो बदमाष असला तरी दाखवण्यापुरतं काहीतरी कामही करतो.''

ते लोक जोगनाथाला उठवून त्याला स्वतःच्या पायांनी चालण्यास भाग पाडत रस्त्याकडे निघाले. फौजदार म्हणाले, ''बहुदा दारू प्याल्यामुळं शिव्या देत असावा. त्याच्यावर खटला भरायला कोणतं तरी एखादं कलम सापडेलच. सध्या त्याला नेऊन बंद करून टाका. उद्या कोर्टात उभं करू त्याला.''

तो शिपाई म्हणाला, ''हुजूर, निष्कारण कटकट विकत घेऊन काय फायदा ? जाता-जाता त्याला त्याच्या घरात ढकलून देऊ. त्याला लॉकअपमध्ये कसं ठेवता येईल ? तो वैद्यजींचा माणूस आहे.''

फौजदार साहेब नुकतेच नोकरीला लागले असले तरी शिपायांचा मानवतावादी दृष्टिकोण आता एकदम त्यांना पटला. ते गप्प राहिले. ते शिपायांपासून थोडे दूर राहून पुनः पूर्वीप्रमाणे काळोख, गुलाबी थंडी, नगरवासिनी प्रियतमा आणि 'हाय मेरा दिल' वगैरे गोष्टींतून मनाला समाधान मिळविण्याचा प्रयत्न करू लागले.



## ८

सहकारी सोसायटीतील अफरातफर अगदीच साध्यासुध्या मार्गाने करण्यात आली होती. दररोज होत असलेल्या शेकडो अफरातफरींशी तुलना करता या अफरातफरीतील विशेष सौंदर्य हे होते की ती शुद्ध अफरातफर होती. तिच्यात फारशी गुंतागुंत नव्हती.

सहकारी संस्थेचे एक बियाणे-गोदाम होते. त्यात गहू भरलेला होता. एके दिवशी सोसायटीचा सुपरव्हायजर रामसरूप दोन ट्रक घेऊन गोदामावर गेला. त्याने ट्रकांत गव्हाची पोती भरली. दुरून पाहाणाऱ्यांना वाटले; हे सोसायटीत चालणारे रोजचेच काम आहे. ती पोती जवळच्या दुसऱ्या बीज-गोदामात पोचविण्यासाठी रामसरूप स्वतः एका ट्रक ड्रायव्हरजवळ बसला आणि ट्रक निघाले. मुख्य सडकेपासून एके ठिकाणी कच्चा रस्ता लागतो. त्या रस्त्याने पाच मैलांवर दुसरे बीजगोदाम आहे. परंतु ट्रक त्या रस्त्याला न वळता सरळ पुढेच गेले. येथून अफरातफर सुरू झाली. ते ट्रक सरळ शहरातील धान्यबाजारात जाऊन पोचले. त्याठिकाणी गव्हाची पोती उतरविल्यानंतर दोन्ही ट्रक अफरातफरीच्या संबंधी सर्व काही विसरून गेले आणि दुसऱ्या दिवसापासून आसपासच्या भागातील लाकूड-कोळसा वाहून नेण्यात मग्न झाले. त्यानंतर बरेच दिवसपर्यंत रामसरूपचा काही ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे तो गहू विकून काही हजार रूपये खिशात घालून मुंबईकडे पळून गेला असला पाहिजे, याविषयी लोकांची खात्री पटली. ही सारी घटना स्थानिक पोलिस ठाण्यावर अफरातफरीच्या तक्रारीच्या रूपात नोंदली गेली आणि वैद्यजींच्या मताप्रमाणे एक कटकट मिटली.

परंतु सोसायटीच्या एका डायरेक्टराने काल शहरात गेल्यावर एक वेगळेच दृश्य पाहिले. त्यावरून असे आढळून आले की रामसरूपने ते रूपये खर्च करण्यासाठी मुंबईची वाट न धरता त्या कामासाठी आपल्याच भागातील शहर पसंत केले आहे.

डायरेक्टर साहेब सहज शहर पाहायला म्हणून गेले होते. अशा प्रसंगी इतर कार्यक्रमांबरोबर त्यांचा निदान एक कायमचा कार्यक्रम असे. एखाद्या पार्कात जाणे, एखाद्या झाडाखाली बाकावर बसणे, भेळ खाणे, रंगीबेरंगी फुले व मुलींकडे टक लावून पाहाणे आणि एखाद्या कोवळ्या छोकऱ्याकडून डोक्याला मालिश करून घेणे. या कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत ते पोचले असता एक घटना घडली. त्यावेळी ते झाडाखाली बाकावर बसले होते. त्यांनी डोळे मिटले होते; आणि त्यांच्या डोक्यावर छोकऱ्याची लांबसडक व मऊ बोटे 'तिड्‌ तिड्‌ तिड्‌ तिड्‌' असा आवाज काढत होती. तो पोऱ्या मोठ्या उत्साहाने त्यांच्या केसांवर तबल्याचे काही आडवे - तिडवे बोल काढत होता आणि ते डोळे मिटून हा पोऱ्या मालिशचा कार्यक्रम लौकर बंद तर करणार नाही ना अशी काळजी करीत होते.

त्यांनी समोर पाहिले तो एका झाडाखालच्या बाकावर रामसरूप सुपरव्हायजर बसला होता. तोही एका पोऱ्याकडून तैल - मालिश करून घेत होता आणि 'तिड्‌ तिड्‌ तिड्‌' च्या सुखपूर्ण अनुभूतीत स्वतःला हरवून बसला होता. त्यावेळी दोन्ही पक्ष परमहंसांच्या भावनेसारख्या मनःस्थितीत आपापल्या जगात तल्लीन होते. शांततापूर्ण सहजीवनासाठी ही आदर्श स्थिती होती. त्यामुळे त्यांनी एकमेकांच्या बाबतीत हस्तक्षेप केला नाही. सुमारे पंधरा मिनिटे ते आपापल्या बाकांवर सज्जन शेजाऱ्यांप्रमाणे बसून राहिले. त्यांनी एकमेकांना पाहूनही न पाहिल्यासारखे केले. नंतर ओळखेपिळोखे देऊन दोन्ही पक्ष उठून उभे राहिले आणि आपापल्या मालिशकर्त्याला यथोचित पारिश्रमिक देऊन, त्यांना पुनः त्याच ठिकाणी भेटण्यास प्रोत्साहित करून, पंचशीलच्या सिद्धांतांनुसार आपापल्या मार्गाला लागले.

शिवपालगंजला परततांना डायरेक्टरांना अशी बोचणी लागून राहिली की मालिशच्या सुखापायी आपण सहकारी चळवळीशी विश्वासघात केला, हे काही बरे झाले नाही. रामसरूप फरारी असून पोलीस त्याच्या शोधात आहेत, याचे स्मरण त्यांना झाले. त्यांनी रामसरूपला पकडून दिले असते तर अफरातफरीचा खटला सुरू झाला असता. कदाचित त्यांचे नावही वर्तमान पत्रांत छापून आले असते. हे सर्व आठवून ते दुःखी झाले. त्यांचा आत्मा त्यांना टोचू लागला. म्हणून परत येताच आत्म्याच्या समाधानासाठी ते वैद्यजींना भेटले आणि हिंगाष्टक चूर्णाची एक फक्की मारून त्यांना म्हणाले, "आज मला पार्कात एक माणूस दिसला. तो हुबेहूब रामसरूप सारखा होता."

वैद्यजी उत्तरले, "असेल ! काही माणसं दिसायला सारखी असतात."

एवढ्याने आपला आत्मा आपली पाठ सोडणार नाही असे वाटून थोडावेळ इकडे - तिकडे पाहिल्यावर ते म्हणाले, "मला तेव्हाच वाटलं की हा नक्कीच रामसरूप असला पाहिजे."

वैद्यजींनी डायरेक्टरांकडे रोखून पाहिले. डायरेक्टर पुढे म्हणाले, "तो रामसरूपच होता. मी मनात म्हटलं, हा साला इथं काय करतोय ? तो मालिश करून घेत होता."

"तुम्ही काय करत होता ?"

डायरेक्टरांनी विमनस्कपणे उत्तर दिले, "मी दमून भागून एका झाडाखाली विश्रांती घेत होतो."

वैद्यजी म्हणाले, "त्याचवेळी पोलिसात वर्दी द्यायला हवी होती."

डायरेक्टर थोडावेळ विचार करीत राहिले. मनाशी नीट जुळणी करून म्हणाले, "मला वाटलं, आपल्याला कुणी ओळखलंय हे रामसरूपला कळता कामा नये. म्हणूनच पोलिसात वर्दी दिली नाही."

अफरातफरीचा आरोप मुंबईत नसून पंधरा मैलांवरच आहे आणि तेलमालिश करून घेण्यासाठी त्याचे डोके अजूनही खांद्यावर सहीसलामत आहे, ही माहिती मिळताच वैद्यजी व्यग्र झाले. आता डायरेक्टरांची बैठक बोलावणे आवश्यक होते. ही सगळी हकीगत त्यांनी रिकाम्या पोटी ऐकली होती. ती भांग पिऊनही ऐकावी, म्हणून बैठक संध्याकाळी ठेवण्यात आली.

पृथ्वीच्या पाठीवर वैद्यजी हे एकमेव मनुष्य आणि स्वर्गात हनुमान हा एकमेव देव आहे असे सनीचर मानत होता. त्या दोघांचाही त्याच्यावर वेगवेगळा प्रभाव होता. हनुमान हा नुसता लंगोट लावतो, म्हणून सनीचरही नुसत्या चड्डीवर भागवत असे. जेव्हा त्याला थाटमाट करून कोठे जावयाचे असे त्यावेळीच तो अंगात बनियन घाली. हा झाला हनुमानाचा प्रभाव - वैद्यजींच्या प्रभावाने तो रस्त्याने जाणाऱ्या कोणाही इसमावर कुत्र्यासारखा भुंकू शकत असे, परंतु वैद्यजींच्या घरचा एखादा कुत्रा जरी असला तरी तो त्याच्या पुढे शेपूट हलवू लागे. अर्थात् वैद्यजींच्या घरी कुत्रा नव्हता व सनीचरला शेपूट नव्हते ही गोष्ट अलाहिदा !

त्याला शहरातील प्रत्येक गोष्टीत व म्हणून रंगनाथामध्ये, खूपच स्वारस्य होते. रंगनाथ दारात उभा असला की सनीचरही त्याच्या जवळपास घोटाळत असलेला दिसे. आजही तसेच घडले. वैद्यजी सहकारी सोसायटीच्या सभेला गेले होते. दारात फक्त सनीचर व रंगनाथ होते. सूर्यास्ताची वेळ होती, आणि हिवाळ्यातील रात्रीबरोबर प्रत्येक घरातून बाहेर पडणारा कडवट धूर घरांच्या छपरांवर लोंबकळत होता.

रस्त्याने कोणीतरी खट्खट् करीत गेला. कोणत्याही शारीरिक व्यंगाविषयी आम्हा भारतीयांच्या मनात सात्विक घृणा असते ती पचकन थुंकून बाहेर काढीत सनीचर म्हणाला, ''लंगडा चाललाय साला ?'' असे म्हणून तो उड्या मारीतच बाहेरच्या ओट्यावर आला आणि तेथे बेडकासारखा बसला.

रंगनाथाने हटकले, ''कोण, लंगडेबाबा काय ?''

लंगडा थोडा पुढे गेला होता. आवाज ऐकून तो जागच्या जागी थांबला व मागे वळून पाहात म्हणाला, ''होय बापू, मी लंगडाच आहे.''

''मिळाली नक्कल ?''

लंगडा उत्तरला, ''नक्कल तर मिळाली नाही बापू, पण आज नोटिस बोर्डावर हरकत लागली आहे.''

''काय झालं ? पुनः फी कमी पडली की काय ?''

''फी नाही बापू.'' तो आपले म्हणणे ओरडून सांगत होता, ''या खेपेला दाव्याच्या पत्त्यात काही चूक राहिलीय. अर्जदाराची सही चुकीच्या रकान्यात केली गेलीय. तारखेचे दोन आकडे एकमेकांत मिसळलेत. एका ठिकाणी थोडी खाडाखोड झालीय तिथं सही केलेली नाही. खूपच चुका काढल्या आहेत.'' रंगनाथ म्हणाला, ''हे कचेरीवाले लोक मोठे लुच्चे दिसतात. कसल्या चुका काढल्यात त्यांनी !''

गांधीजी आपल्या प्रार्थनासभेत, 'आपण इंग्रजांचा द्वेष करता कामा नये,' असे समजाऊन सांगत असावेत, त्या थाटात लंगड्याने मान हलवून म्हटले, ''नाही बापू, कचेरीवाले त्यांचं त्यांचं काम करतात. सगळा घोटाळा त्या अर्ज लिहिणाऱ्यानं केलाय. विद्येचा लोप होत चाललाय. नवे - नवे अर्ज लिहिणारे फार चुका करतात.''

विद्येचा लोप होत आहे, ही गोष्ट रंगनाथाने मनातल्या मनात मान्य केली. परंतु लंगड्याने सांगितलेल्या कारणाशी तो सहमत होऊ शकला नाही. तो काही बोलणार इतक्यात लंगडा मोठ्याने म्हणाला, ''तसं काही विशेष नाही, बापू, उद्या अर्ज ठीक होऊन जाईल.''

तो खट्खट् करीत निघून गेला. सनीचर म्हणाला, ''कुठल्या कुठल्या मुलुखातले गावढळ या शिवपालगंजमध्ये गोळा होताहेत देव जाणे.''

रंगनाथाने त्याला समजावले, ''सगळीकडे असंच चालतं. दिल्लीलाही अशीच स्थिती आहे.''

तो सनीचरला दिल्लीचे किस्से सांगू लागला. ज्याप्रमाणे भारतीयांची बुद्धी इंग्रजीच्या खिडकीतून डोकावून जगाची हालहवाल जाणून घेते त्याप्रमाणे सनीचराची बुद्धी रंगनाथाच्या खिडकीतून डोकावत दिल्लीची माहिती करून घेऊ लागली. दोघेही



थोडावेळ त्याच वातावरणात रमून गेले.

अंधार पडू लागला होता, परंतु डोळ्यांसमोर उभा असलेला माणूस व जनावर यांच्यांत फरक करता न येण्याइतका काळोख अजून पडला नव्हता. वैद्यजींच्या बैठकीत एक कंदील टांगण्यात आला. समोरच्या रस्त्यावरून तीन तरूण जोरजोराने हसत खिदळत जाऊ लागले. प्लॅनिंग कमिशनच्या कारभाऱ्यांमध्ये 'इव्हॅल्युएशन', 'कोऑर्डिनेशन', 'पर्सपेक्टिव्ह' वगैरे, किंवा साहित्यिकांमध्ये 'प्रतिमा', 'आयाम', 'युगचेतना', 'संदर्भ', वगैरे शब्द जसे वाक्यावाक्यात वापरण्याची फॅशन आढळते तसे त्यांचे संभाषण अशा एका घटनेसंबंधी चालले होते जिच्यात दुपार, फंटूश, चकाचक, पत्ते व पैसे यांचा उल्लेख वारंवार येणे अपरिहार्य होते. बोलता बोलता ते तिघे तरूण दारावरून थोडे पुढे जाऊन उभे राहिले. सनीचर सांगू लागला. ''बद्री भैया या जनावरांना कुस्ती शिकवतात. वाघाच्या हातात जणू बंदूक देऊन राहिलेत. आधीच या साल्यांमुळे लोकांच्या नाकी नऊ आलेत. त्यात पुनः डावपेच शिकले की लोकांना गाव सोडून जावं लागेल.''

एवढ्यात त्या तीन तरूणांपैकी एकजण बैठकीच्या दारात येऊन उभा राहिला. तो उघडा होता. त्याच्या अंगाला आखाड्यातील माती लागलेली होती. लंगोट्याची पट्टी कमरेपासून पावलांपर्यंत हत्तीच्या सोंडेपर्यंत लोंबत होती. त्यावेळी शिवपालगंजमध्ये लंगोट लावून फिरणाऱ्यांमध्ये हीच फॅशन लोकप्रिय होती. सनीचरने विचारले, ''काय भानगड आहे छोटे पैलवान ?''

पहिलवानाने आपले गजकर्ण खाजवीत विचारले, ''बद्रीभैया आज आखाड्यात नाही आले ? कुठं गडप झाले ?''

''गडप कुठे होणार ? इथचं कुठंतरी असतील.''

''कुठं असतील ?''

''सोसायटीचा सुपरव्हायजर गहू घेऊन पळून गेलाय. त्यासंबंधीचीच मीटिंग सोसायटीत चाललीय. बद्री तिथंच गेले असतील.''

एवढ्यात बैठकीसमोर लोकांच्या पावलांची चाहूल ऐकू आली. ओट्यावर खादीचे धोतर, सदरा, जाकीट, टोपी घातलेले व अंगावर शाल घेतलेले भव्यमूर्ती वैद्य महाराज प्रकट झाले. त्यांच्या मागोमाग त्यांचे बरेचसे चेले होते. बद्री पहिलवान सर्वांच्या मागे होते. त्यांचा चेहरा तोबरा न लावताही तोबरा लावल्यासारखा दिसत होता. त्यांना पाहाताच छोटा म्हणाला, ''वस्ताद, एक मोठी फंटूश भानगड झालीय. तुम्हाला

सांगण्यासाठी केव्हापासून उभा आहे.''

''उभा आहेस तर असा काय वितकून चाललाहेस ? काय भानगड आहे ?'' या शब्दांत बद्री पहिलवानांनी छोट्याचे स्वागत केले. गुरुशिष्य ओट्याच्या दुसऱ्या टोकाला जाऊन आपसात बोलू लागले.

वैद्यजी व इतर चार पाच जण आत गेले. एकाने समाधानाचा दीर्घ निःश्वास टाकला. तो संपता-संपता एक हुंदका बनला. दुसरा दिवाणावर बसला आणि त्याने इतक्या जोरात जांभई दिली की सुरुवातीला जांभई असणारी ती क्रिया शेवटी शीळ बनली. वैद्यजींनी तक्क्याला टेकून बसत आपली टोपी व सदरा अशा ढंगात दिवाणाच्या दुसऱ्या टोकाला फेकला की जणू एखादा बडा गवयी पल्लेदार तान घेऊन समेवर आला होता. सगळेजण एखादी मोठी कामगिरी करून विश्रांती घेण्याच्या अवस्थेत येऊन पोचले आहेत, हे यावरून स्पष्ट झाले. सनीचर म्हणाला, ''महाराज, फार थकवा वाटत असेल तर आणखी एकदा भांग तयार करून देतो.''

वैद्यजी काही बोलले नाही. सोसायटीचे डायरेक्टर म्हणाले, ''दुसऱ्यांदा भांगेचा प्रोग्राम सोसायटीत झालाय. झकाल माल. दुधिया. आता घरी जायला हवं.''

वैद्यजी थोडावेळ तसेच गप्प बसून राहिले व इतरांचे बोलणे ऐकू लागले. जो स्वतः कमी खातो व इतरांना जास्त खाऊ घालतो, स्वतः कमी बोलतो व इतरांना भरपूर बोलू देतो तो स्वतः कमी मूर्ख बनतो व इतरांना अगदी 'मामा' करतो, या बाबतीत त्यांची खात्री पटल्यापासून त्यांनी इतरांना बोलू देण्याची सवय लावून घेतली होती. त्यांनी अचानक विचारले, ''रंगनाथ, तुझं काय मत आहे ?''

ज्याप्रमाणे विचाराधीन मुद्दा काय आहे हे न सांगताच वैद्यजींनी मत विचारले होते त्याचप्रमाणे मुद्दा लक्षात न येताच रंगनाथाने उत्तर दिले, ''जी, जे होतं ते बऱ्यासाठीच होतं.''

वैद्यजी मिशांतल्या मिशांत हसले. ते म्हणाले, ''तुझं म्हणणं बरोबर आहे. बद्री ठरावाच्या विरूद्ध होता, पण नंतर तोही गप्प राहिला. ठराव एकमतानं पास झाला. झालं ते बरंच झालं.''

आपण आपले मत फुकाच देऊन टाकले, हे आता रंगनाथाच्या लक्षात आले. त्याने उत्सुकतेने विचारले, ''काय ठराव केला तुम्ही लोकांनी ?''

''आम्ही असा ठराव केलाय की सुपरवायझरनं आमचं जे नुकसान केलंय ते भरून काढण्यासाठी सरकारनं आम्हांला अनुदान द्यावं.''

ठरावातील या युक्तिवादाने रंगनाथ गडबडला. त्याने विचारले, ''सरकारचा काय संबंध ? अफरातफर केलीय तुमच्या सोसायटीच्या सुपरवायझरनं आणि त्याची नुकसान भरपाई सरकारनं करायची ?''



''तर कुणी करायची ? सुपरवायझर तर फरारी झालाय. आम्ही पोलिसात वर्दी दिलीय. त्यापुढची जबाबदारी सरकारची आहे. आमच्या हातांत काही नाही. तसं असतं तर सुपरवायझरला पकडून त्याच्याकडून गव्हाची किंमत वसूल करून घेतली असती. आता जे काही करायचं असेल ते सरकारनं करावं. सरकारनं वाटल्यास सुपरवायझरला कैद करून आमच्या समोर उभं करावं; किंवा दुसरं काही करावं. ते कसंही असो. आमची सोसायटी जिवंत राहावी आणि तिच्या द्वारा जनतेचं कल्याण होत राहावं, असं सरकारला वाटत असेल तर त्यानंच हा भुर्दंड भरला पाहिजे. नाहीतर ही सोसायटी पार बसून जाईल. आम्ही आमचं काम केलं. याच्या पुढचं काम सरकारचं आहे. त्याची नालायकीही आम्हांला माहीत आहे.''

वैद्यजी इतके तर्कसंगत बोलत होते की रंगनाथाचा भेजा चक्रावून गेला. ते आपल्या बोलण्यात 'सरकारची नालायकी', 'जनतेचं कल्याण', 'जबाबदारी' वगैरे शब्द वारंवार वापरीत होते. नव्या पिढीच्या लोकांना जी भाषा कळते ती भाषा बोलण्यात, आपले मामा जुन्या पिढीचे असूनही पटाईत आहेत, याविषयी रंगनाथाची खात्री पटली.

बद्री पहिलवान एव्हाना छोट्याशी बोलणे करून परत आले होते. ते म्हणाले, ''रामाधीनच्या घरावर तर दरवडा पडला नाही; परंतु इकडे - तिकडे चोऱ्या झाल्याच्या बातम्या आल्या आहेत.''

ते आपल्या वडिलांसमोर बहुदा अदबीने बोलत. ही गोष्टही त्यांनी अशीच अदबीने सांगितली. छोट्याशी त्यांचे जे बोलणे झाले होते त्याचा हाच निष्कर्ष होता व तो त्यांना सांगणे त्यांचे कर्तव्य होते, अशा ढंगात ते बोलले.

वैद्यजी म्हणाले, ''चोरी ! दरवडा ! सगळीकडे हेच ऐकायला मिळतंय. देश रसातळाला चाललाय.''

बद्री पहिलवानांनी त्यांचे बोलणे ऐकून न ऐकल्यासारखे केले - जणू एखादा हेल्थ इन्स्पेक्टर कॉलऱ्यापासून बचाव करण्याचे उपाय सांगत होता. त्यांनी तमाम जनतेला उद्देशून म्हटले, ''गावभर चोरीची चर्चा चालू आहे. जागे राहून झोपलं पाहिजे.''

एवढे बोलून ते अंधारात छोटे पहिलवानाजवळ जाऊन उभे राहिले.

# ९

छंगामल विद्यालय इंटर कॉलेजाची स्थापना 'देशाच्या नव-नागरिकांना महान् आदर्शांकडे प्रेरित करण्यासाठी आणि त्यांना उत्तम शिक्षण देऊन राष्ट्राचे उत्थान घडवून आणण्यासाठी' झालेली होती. चमकदार नारिंगी कागदावर छापलेली कॉलेजची 'घटना व नियमावली' वाचल्यानंतर वास्तवतेच्या घाणीने बरबटलेले मन, भारतीय घटनेतील मूलभूत अधिकारांचे प्रकरण वाचल्यावर जसे होते तसे, निर्मळ व पवित्र बनून जाई.

या कॉलेजची स्थापना राष्ट्राच्या हितासाठी झालेली असल्यामुळे तेथे इतर काही नसले तरी गटबाजी मात्र भरपूर होती. ही गटबाजी ज्या प्रमाणात होती ते प्रमाण काही फारसे उत्तम म्हणता येत नव्हते. परंतु इतक्या थोड्या अवधीत ती गटबाजी विकसित झाली होती की कोणीही कौतुकच करावे. दोन - तीन वर्षांच्या आतच आसपासच्या कॉलेजांतील गटबाजीपेक्षा येथील गटबाजी जास्त भरीव दिसू लागली होती. किंबहुना काही बाबतींत तर ती अखिल भारतीय संस्थांशीही स्पर्धा करू लागली होती.

कार्यकारी समितीत वैद्यजींचा दबदबा होता. परंतु एव्हाना रामाधीन भीखमखेडवी यांनी तिच्यात आपला गट तयार केला होता. त्यासाठी त्यांना खूप मोठी साधना करावी लागली होती. बरेच दिवसपर्यंत ते एकटेच त्या गटात होते. त्यानंतर एकदोन सभासद त्यांच्याकडे ओढले गेले होते. आता खूप परिश्रमानंतर कॉलेजच्या कर्मचाऱ्यांमध्ये दोन गट बनू शकले होते. परंतु अजून त्यांत पुष्कळ काम व्हावयाचे होते. प्रिन्सिपॉलसाहेब वैद्यजींवर पूर्णपणे अवलंबून होते. परंतु खन्ना मास्टर अजून त्या प्रमाणात रामाधीनांच्या गटावर अवलंबून नव्हते. त्यांना ओढून घ्यावयाचे होते. विद्यार्थ्यांमध्येही अजून दोन गटांच्या सहानुभूतीवर आधारलेले वेगवेगळे गट तयार झाले नव्हते. त्यांच्यात आपसात शिवीगाळी व मारामारी होत होती खरी; परंतु या कार्यक्रमांना अद्यापि योग्य दिशा मिळालेली नव्हती. ती कार्ये गटबाजीच्या उद्देशाने न होता वैयक्तिक कारणांवरून होत असत. अशा प्रकारे विद्यार्थ्यांमधील गुंडगिरीची शक्ती वैयक्तीक स्वार्थांवरच खर्च होत होती. तिचा उपयोग राष्ट्राच्या सामुदायिक हितासाठी होत नव्हता. गटबाजांना या दिशेनेही पुष्कळच काम करावयाचे होते.

वैद्यजी वगळल्यास कॉलेजच्या गटबाजांमध्ये अजून अनुभवाची उणीव होती. हे खरे. त्यांच्यात परिपक्वता नव्हती; परंतु प्रतिभा होती. तिचा चमत्कार वर्षातून एखाद्या वेळी दिसून येई. तेव्हा त्याची लाट शहरापर्यंत जाऊन पोचे. त्याठिकाणी कधी-कधी असे डावपेच केले जात की ते पाहून जन्मजात गटबाजही आश्चर्याने थक्क होऊन



जात. गतवर्षी रामाधीनांनी वैद्यजींवर असाच एक डाव टाकला होता. तो निष्फळ ठरला; परंतु त्याची चर्चा दूरदूरपर्यंत होत राहिली. वृत्तपत्रांतही ती छापून आली. त्याने एक गटबाज इतका प्रभावित झाला की तो फक्त दोन्ही गटांची पाठ थोपटण्यासाठी शहरातून कॉलेजपर्यंत धावत आला. तो एक सीनियर गटबाज होता; आणि तो बहुधा राजधानीत ठाण मांडून असे. गेली चाळीस वर्षे त्याने आपला संपूर्ण वेळ केवळ गटबाजीलाच अर्पण केला होता. त्याचे जीवनच गटबाजीचे चालते-बोलते प्रतीक बनले होते. तो अखिल भारतीय पातळीवरील इसम होता; आणि त्याची वक्तव्ये दररोज वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानांवर प्रसिद्ध होत असत. त्यांमध्ये देशभक्ती व गटबाजी यांचा अद्भूत संगम असे. तो एकदा कॉलेजला भेट देऊन गेल्यानंतर यापुढे कॉलेज बंद पडले तरी गटबाजी संपणार नाही, याविषयी लोकांची खात्री पटली होती.

प्रश्न असा आहे की गटबाजी का होती ?

आता असा प्रश्न विचारणे म्हणजे पाऊस का पडतो, खरे का बोलले पाहिजे. वस्तु म्हणजे काय आणि ईश्वर म्हणजे काय यांसारखे प्रश्न विचारणेच होय. वस्तुतः हा एक सामाजिक-मानसशास्त्रीय म्हणजे जवळ जवळ तत्त्वज्ञानातीलच प्रश्न आहे. याचे उत्तर समजण्यासाठी दर्शनशास्त्र समजले पाहिजे.

ज्या वेदान्ताचा हवाला वैद्यजी आयुर्वेदाचा पर्याय म्हणून देत असत त्या वेदान्तानुसार गटबाजी हे परात्मानुभूतीच्या चरम अवस्थेचे एक नाव आहे. त्यामध्ये प्रत्येक 'तू' हा 'मी' ला आणि प्रत्येक 'मी' हा 'तू' ला स्वतःपेक्षा अधिक चांगल्या स्थितीत पाहातो. तो ती स्थिती मिळवू इच्छितो. 'मी' हा 'तू' ला आणि 'तू' हा 'मी' ला नष्ट करून 'मी' च्या जागी 'तू' व 'तू' च्या जागी 'मी' बनू इच्छितो.

वेदान्त ही आपली परंपरा आहे आणि गटबाजीचा अर्थ वेदान्तातून काढता येत असल्यामुळे गटबाजी ही आपलीच परंपरा आहे. आणि या दोन्ही आपल्या सांस्कृतिक परंपरा आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण आपल्या पुष्कळशा सांस्कृतिक परंपरा पुनः खोदून बाहेर काढल्या आहेत. म्हणून तर आपण विमानाने युरोपला जातो परंतु प्रवासाचा कार्यक्रम मात्र ज्योतिषांकडून तयार करवून घेतो, फॉरेन एक्सचेंज व इन्कम टॅक्सच्या अडचणी दूर व्हाव्यात म्हणून बुवा-महाराजांचे आशीर्वाद मिळवितो, स्कॉच व्हिस्की पिऊन भगंदराचा आजार लावून घेतो आणि त्याच्या उपचारासाठी योगाश्रमात जाऊन प्राणायाम करतो व पोट आत ओढून घेतो. याचप्रमाणे विलायती शिक्षणातून मिळालेल्या लोकशाहीचा स्वीकार करतो; आणि ती चालविण्यासाठी आपल्या परंपरागत गटबाजीचा आधार घेतो. युद्धकाळ असो की शांतताकाळ असो, आपल्या इतिहासात राजवाड्यांपासून शेतांतील खळ्यांपर्यंत गटबाजीच्या द्वारे 'मी' ला 'तू' व 'तू' ला 'मी' बनविण्याची भव्य परंपरा चालत आली आहे. इंग्रजी राज्यात इंग्रजांना

हाकून लावण्याच्या कटकटीमुळे काही काळ आपल्याला या परंपरेचा विसर पडला होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या इतर परंपरांप्रमाणे या परंपरेलाही आपण प्रोत्साहन दिले आहे. आता आपण गटबाजीला हमरीतुमरी, लालफीत, साहित्य, कला वगैरे सर्व मार्गांनी पुढे रेटत आहोत. ही आपली सांस्कृतिक आस्था आहे. वेदान्ताला जन्म देणाऱ्या देशाची ही कमाई आहे. हेच गटबाजीचे थोडक्यात तत्त्वज्ञान, इतिहास व भूगोल आहे.

या मूळ कारणांबरोबरच कॉलेजातील गटबाजीचे आणखी एक कारण होते. ते असे की काहीतरी घडत राहिले पाहिजे, असे लोकांना वाटत होते. येथे सिनेमा नाही, हॉटेल नाही, कॉफी हाऊस नाही, मारपीट, सुरामारी, रस्त्यांवरील अपघात, नवीन फॅशनवाल्या पोरी, प्रदर्शने, शिवीगाळीचा यथेच्छ वापर केल्या जाणाऱ्या सार्वजनिक सभाही नाहीत. लोकांनी मग जायचे तरी कुठे ? पहायचे काय ? ऐकायचे काय ? म्हणून काही ना काही घडत राहिले पाहिजे.

चार दिवसांपूर्वी कॉलेजात एक प्रेमपत्र पकडले गेले होते. ते एका विद्यार्थ्याने कुणा मुलीला लिहिले होते. मुलाने चलाखी केली होती. पत्र वाचल्यानंतर तो प्रश्न विचारीत नसून मुलीच्या पत्राचे उत्तर लिहीत आहे, असा भास होत होता. पण ती चलाखी पचली नाही. त्या मुलाला फैलावर घेण्यात आले; बडवण्यात आले, त्याला कॉलेजातून काढून टाकण्यात आले; आणि आपला मुलगा पुनः प्रेम करणार नाही, व कॉलेजच्या नव्या इमारतीसाठी पंचवीस हजार विटा दिल्या जातील असे त्याच्या बापाने आश्वासन दिल्यानंतर त्याला पुनः कॉलेजात प्रवेश देण्यात आला. जे काही घडले त्याचा परिणाम चार दिवसांपेक्षा जास्त काळ टिकून राहिला नाही. त्या आधी एका विद्यार्थ्याजवळ देशी बनावटीचे पिस्तूल सापडले होते. त्या पिस्तुलात काडतूस नव्हते व ते इतके ओबडधोबड होते की देशातील लोहारांच्या कारागिरीबद्दल कपाळ बडवून घेण्याची इच्छा होत होती. परंतु हे सारे दोष असूनही कॉलेजात पोलिस आले; आणि त्या मुलाला व कारकुनाला - तो वैद्यजींचा माणूस असूनही चौकीवर घेऊन गेले. आता काही तरी घडेल व चार-सहा दिवस काही ना काही घडत राहील अशी प्रतीक्षा लोक करू लागले. परंतु संध्याकाळपर्यंत असे आढळून आले की जे काही सापडले होते ते पिस्तूल नसून लोखंडाचा एक लहानसा तुकडा आहे; आणि कारकून साहेब पोलिस चौकीवर पोलिसांच्या आदेशावरून नव्हे तर स्वेच्छेने, सहज फिरायला म्हणून गेले होते; तसेच तो मुलगा गुंडगिरी करण्यात नव्हे तर बासरी वाजविण्यात उत्तम तरबेज होता.



संध्याकाळी जेव्हा कारकून सहज भटकत आणि विद्यार्थी बासरी वाजवीत चौकीतून बाहेर पडला तेव्हा गावच्या लोकांचा फारच विरस झाला. त्यांना वाटले, हे तर काहीच नव्हे; आणि त्यांच्यासमोर तोच कायमचा प्रश्न उभा राहिलाः आता काय करायचे ?

अशा वातावरणात लोकांची नजर प्रिन्सिपॉल साहेब व वैद्यजी यांच्यावर केंद्रित झाली होती. वैद्यजी तर आपल्या जागेवर मदनमोहन मालवीय ढंगाचा फेटा बांधून भक्कमपणे बसले होते; परंतु प्रिन्सिपॉल साहेबांकडे पाहिल्यानंतर असे वाटत हाते की ते कसलाही आधार न घेता विजेच्या खांबावर चढले असून दुरूनच कुणाला तरी पाहून ओरडत आहेत, ''पाहा, पाहा, हा कुणीतरी बदमाषी करू पाहातोय.'' त्यांच्या नजरेत संशय होता; आणि आपल्या जागेला चिकटून बसलेल्या प्रत्येक भारतीयाला आपल्याला या जागेवरून कोणी पदच्युत तर करणार नाही ना असे वाटणारी भीतीही त्यांच्या नजरेत होती. लोकांनी हे दौर्बल्य हेरले आणि ते त्यांच्या व त्यांच्याबरोबरच वैद्यजींच्या पाठीस हात धुवून लागले. इकडे हे लोकही आपल्यावर हल्ला होणार या भीतीने आधीच हल्ला करण्यास तयार झाले.

याच सुमारास एके दिवशी खन्ना मास्टरांना कोणीतरी सांगितले की प्रत्येक कॉलेजात एक प्रिन्सिपॉल व एक व्हाइस प्रिन्सिपॉल असतो. ते इतिहास शिकवीत असत; आणि ते कॉलेजातील सर्वांत ज्येष्ठ लेक्चरर होते. याच भ्रमात ते एके दिवशी वैद्यजींना सांगून आले की, ''मला व्हाइस प्रिन्सिपॉल बनवायला पाहिजे.'' वैद्यजी डोके हलवून म्हणाले, ''हा एक नवीन विचार आहे. नवयुवकांनी नवीन चिंतन केलंच पाहिजे. त्यांच्या प्रत्येक नवीन विचाराचं मी स्वागत करतो. परंतु या प्रश्नाचा विचार कार्यकारी समितीनं करायचा आहे. तिच्या पुढल्या बैठकीत हा प्रश्न आला तर त्यावर योग्य विचार केला जाईल.'' कार्यकारी समितीची पुढली बैठक कधी होत नसते ही गोष्ट खन्ना मास्टरांच्या ध्यानात आली नाही. त्यानी ताबडतोब व्हाइस प्रिन्सिपॉलची जागा आपल्याला मिळावी असा अर्ज लिहून प्रिन्सिपॉल साहेबांकडे दिला आणि कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत त्यावर विचार व्हावा अशी विनंती केली.

खन्ना मास्टरांच्या या खट्याळपणाने प्रिन्सिपॉल साहेब थक्क होऊन गेले. त्यांनी जाऊन वैद्यजींना विचारले, ''खन्नाला हा अर्ज देण्याचा सल्ला तुम्ही दिलात काय ?''

याचे उत्तर वैद्यजींनी तीन शब्दांत दिलेः ''अजून तरूण आहे.''

यानंतर काही दिवसपर्यंत प्रिन्सिपॉल साहेब शिवपालगंजच्या रस्त्यांत भेटणाऱ्या प्रत्येक माणसाला 'आजकालची माणसे अशी का वागतात, त्यांना काय झालंय कोण जाणे.' - हे प्राणिशास्त्रातील तथ्य सांगत होते. खन्ना मास्टरांच्या या असभ्य कृतीचे वर्णन 'मुखमें राम बगलमें छुरी', 'आम्हीच पाळलेलं कुत्रं आमच्यावरच भुंकतंय,' 'पाठीत सुरा खुपसणे', 'बेडकाला पडसं झालंय,' वगैरे म्हणींचा वापर करून ते करीत

होते. एके दिवशी त्यांनी भर चौकात उभे राहून प्रतीकवादी थाटात सांगितले, ''एकदा एका घोड्याच्या खुरात नाल मारला जात होता. ते पाहून एका बेडकाला वाटलं की आपणही नाल मारून घ्यावा. त्याने अगदी हट्टच धरल्यामुळे नालबंदानं त्यांच्या पायात एक बारीकशी चूक ठोकली. बस्स ! तेवढ्यानं बेडूकसाहेब परलोकवासी झाले. भलता षोक अंगाशी येतो तो असा.''

या पंचतंत्राच्या मुळाशी तेच सनातन भय होते : आज जो व्हाइस प्रिन्सिपॉल होऊ इच्छितो त्याला उद्या प्रिन्सिपॉलकी हवी असे वाटू लागेल. त्यासाठी तो कार्यकारी समितीच्या सभासदांना फोडून आपल्या बाजूला करून घेईल, शिक्षकांचा गट बनवील, विद्यार्थ्यांना दंगल करण्यास प्रोत्साहन देईल, वरिष्ठांकडे तक्रारी पाठविण्यास उत्तेजन देईल. तो हलकट असून हलकटच राहील.

सचाई छिप नहीं सकती बनावट के उसूलोंसे ।
कि खुशबू आ नहीं सकती कभी कागज के फूलोंसे ।।

(खोट्या सिद्धांतांच्या साह्याने सत्य लपविता येणार नाही. कागदाच्या फुलांना कधीही सुगंध येऊ शकणार नाही.)

या ओळी शिरोभागी लिहून रामाधीन भीखमखेडवी यांनी वैद्यजींना जे पत्र लिहिले होते त्याचा आशय असा होता की कार्यकारी समितीची बैठक गेल्या तीन वर्षांत झालेली नसून ती दहा दिवसात बोलावली पाहिजे आणि कॉलेजच्या सर्वसाधारण समितीची जी वार्षिक बैठक कॉलेजच्या स्थापनेपासून झालेली नाही ती भरविण्यासंबंधी कार्यकारी समितीच्या बैठकीत विचार झाला पाहिजे. सभेपुढील विचारार्थ विषयांमध्ये त्यांनी व्हाइस प्रिन्सिपॉलच्या नेमणुकीचाही समावेश केला होता.

हे पत्र खिशात घालून प्रिन्सिपॉलसाहेब वैद्यजींच्या घरून बाहेर पडले तेव्हा आपल्या शरीरात आग भडकली असल्याचा भास त्यांना होऊ लागला.

कॉलेजच्या फाटकात त्यांना रूप्पनबाबू भेटले. ते थांबून त्यांना म्हणाले, ''पाहिलंत? खन्नासाहेब रामाधीनचा खुंटा पकडून बसलेत. व्हाइस प्रिन्सिपॉल बनण्याचे डोहाळे लागलेत त्यांना. एकदा एका घोड्याच्या पायात नाल मारला जात असलेला एका बेडकाने पाहिला. त्याला वाटलं.....''

रूप्पनबाबू कॉलेजातून कोठेतरी बाहेर चालले होते आणि घाईत होते. ते म्हणाले, ''ते मला माहीत आहे. हा बेडकाचा किस्सा इथं सगळ्यांना ठाऊक झालाय पण मी तुम्हांला एक गोष्ट साफ सांगून टाकतो. खन्नांविषयी मला मुळीच सहानुभूती नाही.



परंतु इथं एक व्हाइस प्रिन्सिपॉल अवश्य असला पाहिजे, असं माझं मत आहे. तुम्ही जाग्यावर नसता तेव्हा सगळे शिक्षक कुत्र्यां-मांजरांप्रमाणे भांडत असतात, टीचर्स रूममध्ये अशी काही हुल्लड चालते की विचारता सोय नाही. हैं हैं, ठैं ठैं, फैं फैं चाललेलं असतं. ''बोलता बोलता ते गंभीर होऊन हुकूम देण्याच्या सुरात उद्गारले, ''प्रिन्सिपॉल साहेब, आपल्या इथं एक व्हाइस प्रिन्सिपॉलही असला पाहिजे, असं मला वाटतं. खन्ना हे सर्वांत सिनियर आहेत. त्यांनाच होऊ द्या. फक्त नावापुरतं, त्यांचा पगार काही वाढवायचा नाहीच.''

प्रिन्सिपॉल साहेबांची छाती जोरजोरात धडधडू लागली. जणू हृदय उसळी मारून फुफ्फुसात घुसू पाहात होते. ते म्हणाले, ''रूप्पनबाबू, असं कधी चुकूनही बोलू नका. नाहीतर तुम्ही आपल्या पक्षाचे आहात असे खन्ना-बिन्ना ओरडून सांगू लागतील. हे शिवपालगंज आहे. इथं थट्टेतसुद्धा विचार करून बोललं पाहिजे.''

''मी आपलं खरं ते सांगतो. ठीक आहे. पाहू काय होतं. ते.'' असे म्हणत रूप्पनबाबू पुढे सटकले.

प्रिन्सिपॉल साहेब झपझप पावले टाकीत आपल्या खोलीत गेले. थंडी होती, परंतु त्यांनी कोट काढला. शैक्षणिक उपकरणे पुरविणाऱ्या एका दुकानाचे कॅलेंडर त्यांच्या नाकासमोर भिंतीवर लटकत होते. त्यामध्ये नग्न शरीरावर जवळ जवळ पारदर्शक असलेली साडी नेसून कोणीतरी सिनेमा नटी एका पुरूषाला लाडवासारखी कसली तरी वस्तू देत होती. त्या पुरूषाने लांबलचक झिंज्या वाढविलेल्या होत्या. त्याने आपला एक हात डोळ्यांवर आडवा धरला होता. जणू लाडू खाऊन त्याला अपचन झाले असावे, असा चेहरा त्याने केला होता. ही मंडळी म्हणजे मेनका व विश्वामित्र होते. प्रिन्सिपॉलसाहेब थोडावेळ त्यांच्याकडे पाहात राहिले आणि मग घंटी वाजविण्याऐवजी जोराने ओरडून त्यांनी चपराशाला बोलावले आणि सांगितले, ''खन्नाना बोलाव.''

चपराशाने गुपित सांगितल्याप्रमाणे म्हटले, ''फील्डकडे गेलेत. मालवीयही बरोबर आहेत.''

प्रिन्सिपॉलनी चिडून समोरचे कमलदान खसकन दूर सरकविले. हे कमलदानही नमुना म्हणून कुठल्यातरी एज्युकेशन एम्पोरियमकडून फुकटात मिळालेले होते. प्रिन्सिपॉल साहेबानी ते ज्या ढंगात दूर आपटले होते त्यावरून यावर्षी त्या एम्पोरियमचा काहीही माल कॉलेजात विकत घेतला जाणार नाही असे वाटत होते. परंतु प्रिन्सिपॉल साहेबांचा हेतू तो नव्हता. ते फक्त पट्टेवाल्याला एवढेच सांगू इच्छित होते की त्याचा गुप्त पोलिशी रिपोर्ट ऐकण्यास यावेळी ते तयार नव्हते. ते चिडून म्हणाले, ''मी तुला सांगतोय, ताबडतोब खन्नांना बोलावून आण.''

पट्टेवाला टिनोपॉल सदरा व तसलेच शुभ्र धोतर नेसला होता. त्याच्या पायांत

खड़ावा आणि कपाळाला गंध होते. तो शांतपणे म्हणाला, ''जातो ना ! खन्नांना बोलावूनही आणतो. एवढे रागावता कशाला ?''

प्रिन्सिपॉलसाहेब दातओठ खात तिरप्या नजरेने टेबलावर ठेवलेल्या एका पत्र्याच्या तुकड्याकडे पहात राहिले. त्यावर पॉलिश करून लाल गुलाबांचे एक फूल काढले होते. त्याच्या खाली तारीख व महिना दाखविणारे कॅलेंडर होते. दारू बनविणाऱ्या एका प्रख्यात कंपनीने पं. जवाहरलाल नेहरूंच्या स्मरणार्थ हे कॅलेंडर बनविले होते. जेथेजेथे हे कॅलेंडर जाईल तेथील जनतेला पं. जवाहरलाल नेहरूंचे आदर्श आणि या कंपनीची दारू यांचा विसर कधीही पडणार नाही, अशा खात्रीने ते चोहोकडे मोफत वाटण्यात आले होते. परंतु यावेळी कॅलेंडरांचा प्रिन्सिपॉल साहेबांवर काही परिणाम झाला नाही. पं. नेहरूंच्या लाल गुलाबाने त्यांना शांती दिली नाही, अथवा फेसाळ बियरच्या कल्पनेने त्यांच्या डोळ्यांना मिटणे भाग पाडले नाही.

पट्टेवाला पुढे म्हणाला, ''तुम्ही बामण आहात मीही बामण आहे. मिठाला मीठ खाता येत नाही, समजलं ?'' आणि तो निघून गेला. प्रिन्सिपॉल साहेब खडावांचा मंद पडत जाणारा 'खट्खट्' आवाज ऐकत राहिले. त्यांची नजर एका तिसऱ्या कॅलेंडरावर जाऊन खिळली. त्यामध्ये पाच-सहा वर्षांची दोन मुले मोठमोठ्या रायफली घेऊन बर्फावर पहुडली होती. ती बहुदा चिनी सैन्याची प्रतीक्षा करीत होती, आणि अशा प्रकारे मोठ्या कलात्मक ढंगाने कोणत्या फॅक्टरीतील तागाची पोती उत्तम असतात हे सर्वांना सांगत होती.

या कॅलेंडरवर दृष्टी खिळवून बसलेले प्रिन्सिपॉलसाहेब खन्नाची वाट पाहात होते आणि मनाशी म्हणत होते, या खन्नाला व्हाइस प्रिन्सिपॉलकीचा लोभ सुटला नसता तर किती बरे झाले असते !

इकडे भावी घटनेला ऐतिहासिक बनविण्यासाठी बाहेरच्या व्हरांड्यात क्लार्क साहेब येऊन उभे राहिले. भिंतीच्या मागे व खिडकीच्या खाली ड्रिलमास्टर तंगड्या फाकून उभ्या-उभ्या लघवी करण्याऐवजी बिडी ओढू लागले. खन्ना व प्रिन्सिपॉलसाहेब यांच्यातील सुखसंवाद जनतेच्या कानांपर्यंत जाऊन पोचण्यापूर्वीच हवेत विलीन होईल, असा धोका उरला नाही.

रात्री रंगनाथ आणि बद्री गच्चीवरील खोलीत झोपले होते आणि झोप येण्यापूर्वीच्या असंबद्ध गप्पा चालल्या होत्या. आपले बोलणे संपवितांना रंगनाथ म्हणाला, ''प्रिन्सिपॉल आणि खन्ना यांच्यात काय बोलणं झालं ते कळलं नाही. ड्रिलमास्टर बाहेर उभा होता. खन्ना मास्टरनं उच्चारलेलं 'हीच तुमची माणुसकी वाटतं ?' एवढंच वाक्य त्याला ऐकू आलं.''



बद्रींनी जांभई देत म्हटले, ''प्रिन्सिपॉलनी शिवी दिली असेल. त्याला उत्तर म्हणून खन्ना मास्टरनं हे माणुसकीचं रडगाणं गायिलं असेल. हा खन्ना असंच बोलतो. बावळट आहे साला.''

रंगनाथ म्हणाला, ''शिवीला उत्तर जोड्यानं द्यायला पाहिजे.''

यावर बद्री काही बोलले नाहीत. रंगनाथ पुनः म्हणाला, ''मला तर असं दिसतंय इथं माणुसकीची गोष्ट बोलणंच निरर्थक आहे.''

बद्रींनी कुस बदलली. 'गुड नाईट' म्हणावे त्या ढंगात ते म्हणाले, ''ते ठीक आहे. पण इथं जो कुणी, क ख ग घ शिकतो तो उर्दूत भुंकू लागतो. वाक्यावाक्यात माणुसकीचा उद्धार करू लागतो. अंगात बळ नसलं की माणुसकी सुचू लागते.''

रंगनाथ अंगावर पांघरूण घेऊन छताकडे पाहात पडून राहिला. दार उघडे होते. आणि बाहेर चांदणे पसरले होते. थोडा वेळ त्याने सोफिया लॉरेन व एलिझाबेथ टेलरचे ध्यान केले. परंतु थोड्याच वेळात ते चारित्र्यहीनतेचे लक्षण आहे असे समजून तो आपल्या गावच्या धोब्याच्या मुलीसंबंधी विचार करू लागला. धुलाईसाठी आलेल्या कपड्यांतून स्वतःसाठी कपड्यांची निवड करतांना ती अलीकडे बिन बाह्यांचे ब्लाऊझ पसंत करू लागली होती. थोड्या वेळानंतर तेही प्रकरण हलक्या दर्जाचे समजून त्याने पुन्हा सिनेमा नट्यांचे ध्यान सुरू केले. मात्र या खेपेस राष्ट्रीयता व देशप्रेम यांचे पारडे जड झाल्यामुळे लिझ टेलर वगैरे परदेशी नट्यांचा नाद सोडून वहीदा रहमान व सायरा बानू यांचे ध्यान त्याने चालविले. दोन-चार मिनिटांनंतर तो या निष्कर्षावर येऊन पोचला की प्रत्येक बाबतीत विलायतेकडून प्रेरणा घेणे योग्य नाही आणि नीट मन बसले तर देशप्रेमातही मोठी मजा असते. अचानक त्याला झोप येऊ लागली; आणि खूप प्रयत्न करूनही सायरा बानूच्या संपूर्ण शरीराच्या मानाने त्याच्या ध्यानाचे क्षेत्र अपुरे पडू लागले. त्यात काही वाघ व अस्वले उड्या मारू लागली. त्याने एकदा सायरा बानूचे शरीर पकडून तिला फरफटण्याचा जोरदार प्रयत्न केला परंतु ती पकडीतून निसटली आणि त्याचबरोबर वाघ व अस्वलेही पळून गेली. याचवेळी त्याच्या डोक्यात खन्ना मास्तराचे चित्र एक-दोनदा उमटले व पुसले गेले. आणि एक शब्द कानात घुमू लागला ''माणुसकी ! माणुसकी !''

प्रथम त्याला असा भास झाला की कोणीतरी हा शब्द पुटपुटत आहे. नंतर असे वाटले की कोणीतरी रंगभूमीवरून अत्यंत गंभीर स्वरात तो शब्द उच्चारत आहे. त्यानंतर त्याला असा भास झाला की कोठेतरी दंगा सुरू झाला असून चोहोकडून माणसे 'माणुसकी ! माणुसकी !! माणुसकी !!!' असे किंचाळत आहेत.

तो एकदम जागा झाला; आणि त्याला आरोळ्या ऐकू आल्याः ''चोर ! चोर ! चोर !, धरा, पकडा, सुटता कामा नये. चोर ! चोर ! चोर !''

काही क्षणांनंतर 'चोर ! चोर ! चोर !' या पालुपदावर मूळ गाणे येऊन थांबे-जणू ग्रामोफोनची सुई रेकॉर्डच्या विशिष्ट भागात अडकून बसली असावी. त्याने डोळे उघडून पाहिले तेव्हा हा ओरडा गावाच्या दुसऱ्या बाजूने येत आहे आणि बद्री पहिलवान खाटेवरून उडी मारून आधीच खाली उभे राहिले आहेत असे त्याला दिसून आले. तोही उठून बसला. बद्री म्हणाले, ''छोट्या सांगतच होता. चोरांची एक टोळी आसपास फिरते आहे. बहुदा गावातही ते आले असावेत.''

दोघेही घाईघाईने कपडे घालून बाहेर आले. दारापर्यंत येता-येता त्यांच्या पावलांचा वेग बराच वाढला. एव्हांना सर्वच बाजूंनी 'चोर ! चोर ! चोर !' च्या घोषणा दुमदुमू लागल्या होत्या. हा ओरडा बघता-बघता इतका वाढला की तो १९२१ साली इंग्रजांनी ऐकला असता तर ते त्याच वेळी हिंदुस्थान सोडून आपल्या देशाला पळून गेले असते.

दोघेही जिना उतरून खाली आले. बैठकीतून बाहेर पडता-पडता बद्री पहिलवानांनी रंगनाथला सांगितले, ''तू इथंच दारं बंद करून घरी बैस. मी बाहेर जाऊन पाहातो.''

इकडे रूप्पनबाबू घराच्या आतील बाजूने धोतराचा सोगा खांद्यावर टाकून धडपडत तेथे येऊन पोचले आणि म्हणाले, ''तुम्ही दोघेही घरी राहा. मी बाहेर जातो.''

त्यांच्या त्या आविर्भावावरून बाहेर जाणे म्हणजे जणू आपली बहादुरी दाखविणे किंवा चक्रव्यूहाचा भेद करणे असावे, असे वाटत होते. दोघेही भाऊ बाहेर जाण्याचा हट्ट धरून बसले. रंगनाथाने हुतात्म्याचा आव आणून म्हटले, ''तुम्ही दोघेही बाहेर जा. मीच घरी राहातो.''

समोरच्या रस्त्यावरून चांदण्यामध्ये तीन माणसे 'चोर ! चोर ! चोर !' असे ओरडत धावत गेली. त्यांच्या मागोमाग आणखी दोन इसम त्यांच्याच प्रमाणे 'चोर, चोर' करीत ओरडत गेले. नंतर एक माणूस एकटाच 'चोर, चोर' ओरडत निघून गेला. त्याच्या मागोमाग आणखी तीन इसम गेले. सर्वांच्या हातात लाठ्या काठ्या होत्या. सगळे धावत होते. सगळे चोरांना पळवत होते.

त्या मिरवणुकीत सर्वांत शेवटी येणाऱ्यांपैकी काहीजणांना बद्रींनी ओळखले. तेही धावत जाऊन त्यांना मिळाले. त्यांनी जोरातं ओरडून विचारले, ''कोण आहे ? छोटू? चोर कुठं आहेत ?''

छोट्याने धापा टाकत सांगितले, ''पुढं ! पुढं निघून गेले !'' थोडा वेळ शांतता पसरली.

रूप्पनबाबू व रंगनाथ बैठकीचा दरवाजा बंद करून, कुलूप लावून गच्चीवर परत गेले. वैद्यजींनी खालून खाकरत विचारले. ''कोण आहे ?''



रूप्पनबाबूंनी उत्तर दिले, ''चोर आहेत, पिताजी !''

वैद्यजी घाबरून किंचाळले, ''कोण ? रूप्पन ? तू आहेस गच्चीवर ?''

रूप्पनंनी गावातील गोंगाटात यथाशक्ती भर घालीत म्हटले, ''होय ! आम्हीच आहोत. जाणूनबुजून कशाला विचारता ! गप्प पडून का राहात नाही ?''

आपल्या धाकट्या मुलाचे हे आदरपूर्ण बोलणे ऐकून वैद्यजी गप्प राहिले. गच्चीवर रूप्पनबाबू व रंगनाथ गावभर दुमदुमून राहिलेले आवाज ऐकत बसले.

घराच्या परसातून कोणीतरी ओरडले ''मार डाला !''

पुनः गलबला. कोणीतरी ओरडून म्हणाले, ''अरे नको, छोटू ! हा तर भगौती आहे.''

''सोड, जाऊ द्या त्याला. तिकडे ! तिकडे गेलेत चोर.''

कोणीतरी रडत होता. त्याचे सांत्वन करीत दुसरा म्हणाला. ''अरे, असा बायकांसारखा रडतोयस काय ? एक दंडा बसला तर फें फें करायला लागलास !''

त्याने रडत रडत उत्तर दिले, ''आम्हीही पाहून घेऊ. चांगलं उट्टं काढू.''

ती सर्व गडबड पाहून रंगनाथाला उत्साह व उत्सुकता यांच्याबरोबर गंमतही वाटू लागली. रूप्पनबाबू म्हणाले, ''भगौती आणि छोटू यांच्यात वैर आहे. त्यामुळंच या गडबडीचा फायदा घेऊन छोट्यानं काहीतरी केलेलं दिसतंय.''

रंगनाथ म्हणाला, ''ही तर भलतीच भानगड दिसतीय.''

रूप्पनबाबू उपेक्षेच्या स्वरात म्हणाले, ''भानगड कसली त्यात ? मोका साधला की झालं. छोटू तसा भोळा दिसतो पण आहे मोठा बेरकी.''

दोघेही पुनः पूर्ववत् आजूबाजूची धावपळ व आरडा-ओरडा ऐकत राहिले. रंगनाथ म्हणाला, ''चोर बहुदा निसटले असावेत.''

''ते तर इथं नेहमीच घडतं.''

हे संभाषण एवढ्यावरच थांबले. गलबल्याचे शेवटचे पर्व सुरू झाले होते आणि लोक गगन भेदून टाकण्याच्या उद्देशाने बजरंगबलीचा जयजयकार करू लागले होते. रंगनाथ म्हणाला, ''एखादा चोर पकडला गेला असावा असे दिसते.''

रूप्पनबाबू म्हणाले, ''छेः रे ! मी शिवपालगंजच्या लोकांना चांगला ओळखतो. त्यांनी चोरांना गावातून बाहेर पिटाळून लावलं असणार. चोरांनी खुद्द यांनाच गावाबाहेर हाकलून दिलं नाही. हे काय कमी आहे ? याच आनंदाप्रित्यर्थ हा जयजयकार चाललाय.''

चांदण्यांमध्ये लोक दोन-दोन चार-चार जणांची टोळकी करून कुजबुजत रस्त्याने येत-जात होते. रूप्पनबाबूंनी गच्चीच्या कठड्याजवळ उभे राहून पाहिले. एका टोळक्याने खालून सांगितले, ''जागे रहा, रूप्पनबाबू.''

थोड्या वेळानंतर हाच सल्ला गावाच्या कान्याकोपऱ्यात घुमू लागला: ''जागते रहो! जागते रहो !''

आता थोड्या-थोड्या वेळानंतर, थांबून-थांबून गलबला होत होता. चोरोंकडून शिट्ट्याही ऐकू येऊ लागल्या होत्या. रंगनाथाने विचारले,'' या शिट्ट्या कसल्या ?''

रूप्पनबाबूंनी उलट प्रश्न केला, ''शहरांत पोलिस गस्त घालत नाहीत काय ?''

''अस्सं ! म्हणजे पोलिसही वेळेवर आले म्हणायचे !''

''जी हाँ ! पोलिसांनीच तर गावकऱ्यांच्या मदतीनं डाकूंचा प्रतिकार केला. पोलिसांनीच तर त्यांना इथून पिटाळून लावलं.''

रंगनाथ आश्चर्याने रूप्पनकडे पाहू लागला, ''डाकू ?''

''हो, हो ! डाकू नाही तर काय ? चांदण्या रात्री कधी चोर येत असतात ? ते डाकूच होते.'' रूप्पनबाबू खदखदा हसले. ते म्हणाले, ''बाबा रे, या साऱ्या शिवपालगंजच्या लोकांच्या गमती आहेत. त्या तुला कळायच्या नाहीत. आता वर्तमानपत्रात काय छापून येणार ते मी सांगतो आहे.''

एक शिट्टी घराच्या अगदी जवळ रस्त्याच्या कडेला वाजली. रूप्पन म्हणाले, ''तू मास्टर मोतीरामांना पाहिलं आहेस की नाही ? जुने गृहस्थ आहेत. फौजदार साहेब त्यांचा फार आदर करतात. ते फौजदारांचा आदर करतात. प्रिन्सिपॉलसाहेब त्या दोघांचा आदर करतात. कुणी साला काम काही करत नाही, फक्त एकमेकांचा आदर करतात. हेच मास्टर मोतीराम शहरातील वर्तमानपत्राचे बातमीदार आहेत. त्यांनी चोरांच्या ऐवजी डाकू शब्दाचा वापर केला नाही तर मास्टर मोतीराम असून फायदा काय ?''

शिट्ट्या आणि 'जागते रहो' च्या घोषणा दूर-दूर जाऊन विरू लागल्या. आसपासच्या घरांबाहेर लोकांनी दार उघडण्यासाठी जोरजोराने हाका मारण्यास सुरुवात केली. वैद्यजींच्या घरीही कोणीतरी दिंडी दरवाजाची कडी वाजविली. बाहेर झोपणारा एक गडी जोराने खाकरला. कडी पुनः वाजली. रंगनाथ म्हणाला, ''बद्री दादा असतील. चला, आपण कुलूप काढू.''

ते दोघे खाली गेले. कुलूप काढता-काढता रूप्पनने विचारले, ''काय झालं दादा ? सारे चोर पळून गेले ?''

बद्री पहिलवानांनी काही उत्तर दिले नाही. ते न बोलता जिना चढून वर आले. रूप्पनबाबू खालच्या खालीच आतल्या खोलीत निघून गेले. वरच्या खोलीत रंगनाथ व बद्री पहिलवान आपापल्या खाटांवर पडतात न पडतात इतक्यात खालून रस्त्यावरून कोणीतरी ओरडून सांगितले, ''वस्ताद, खाली या. मामला फारच गुंतागुंतीचा झालाय.''



बद्रींनी खोलीच्या दारातून ओरडून विचारले, ''काय झालं छोटू ? आता झोपू देशील की रात्रभर जागायला लावशील ?''

छोट्याने खालूनच उत्तर दिले, ''वस्ताद, झोपायची बात आता सोडून द्या. रिपोर्ट लिहायचं काम आता चाललंय. इकडे साले गल्ली-बोळातून ''चोर चोर'' म्हणून ओरडत बसले आणि तिकडे या गडबडीत कुणीतरी हात मारला, गयादीनच्या घरी चोरी झालीय. तुम्ही या खाली.''

## १०

गावात एक गृहस्थ राहात होता. त्याचे नाव गयादीन. तो बेरीज-वजाबाकी, गुणाकार-भागाकार यांमध्ये अत्यंत पटाईत समजला जात होता. कारण त्याचा धंदा सावकारीचा होता. त्याचे एक दुकान होते, कापडाची विक्री आणि पैशाची देवाण-घेवाण होत असे. त्याला एक तरूण मुलगी होती. तिचे नाव बेला. एक बहीण होती. ती विधवा होती आणि एक बायको होती. ती निधन पावली होती. बेला ही सुदृढ प्रकृतीची, सुंदर, गृहकृत्यांत दक्ष आणि रामायण, माया-मनोहर कहानियाँ ही मासिके वाचण्यापुरती साक्षर होती. तिच्यासाठी एक देखणा सुयोग्य वर शोधण्याचे काम चालले होते. स्वभाव व शरीर दोन्ही दृष्टींनी बेला प्रेम करण्यास लायक होती; आणि रूप्पनबाबू तिच्यावर प्रेम करीत होते. पण तिला याची कल्पना नव्हती. रूप्पनबाबू रोज रात्री झोपण्यापूर्वी तिच्या शरीराचे ध्यान करीत आणि ध्यान शुध्द रहावे म्हणून त्यावेळी ते फक्त तिच्या शरीराकडे पाहात, त्या शरीरावरील कपड्यांकडे पाहात नसत. बेलाची आत्या गयादीनच्या घरचा कारभार पाही आणि बेलाला घराबाहेर पडू देत नसे. बेला वडील माणसांची आज्ञा शिरसावंद्य मानून घराबाहेर पडत नसे. तिला बाहेर जायचे असले म्हणजे ती आपल्या गच्चीवरून तिला जोडून असलेल्या शेजाऱ्यांच्या गच्चीवर जाई व अशा प्रकारे शेजाऱ्यांच्या घरात प्रवेश करी. रूप्पनबाबू बेलासाठी फार तडफडत होते; आणि तिला आठवड्यातून तीन-चार पत्रे लिहून ती फाडून टाकत होते.

या गोष्टींना काही तात्कालिक महत्त्व नाही. महत्त्वाचा मुद्दा असा की गयादीन व्याजाने पैसे देत असत व कापडाचे दुकान चालवीत. सहकारी सोसायटीही व्याजाने पैसे देई आणि कापडाचे दुकान चालवी. दोघेही शांततापूर्ण सहजीवन जगत होते. वैद्यजींशी त्यांचे चांगले संबंध होते. ते कॉलेजच्या कार्यकारी समितीचे उपाध्यक्ष होते. त्यांच्या जवळ पैसा होता, प्रतिष्ठा होती, त्यांच्यावर वैद्यजी, पोलिस, रूप्पन, स्थानिक एम्. एल्. ए. आणि जिल्हा बोर्डाचा टॅक्स कलेक्टर यांची कृपा होती.

इतके सारे असूनही ते निराशावादी होते. ते फार जपून वागत असत. आपल्या स्वभावाच्या बाबतीत ते फार सावधगिरी बाळगीत. उडदाची डाळ सुद्धा ते पथ्य म्हणून खात नसत. एकदा ते शहरात गेले होते. तेथे त्यांच्या एका नातेवाईकाने त्यांना जेवण्यात उडदाच्या डाळीची आमटी वाढली. गयादीननी हलकेच ताट बाजूला सारले आणि आचमन करून उपाशीच उठले. त्यानंतर त्यांना दुसऱ्या डाळीची आमटी असलेले दुसरे जेवण वाढण्यात आले. या खेपेस त्यांनी आचमन करून जेवण घेतले. संध्याकाळी नातेवाईकाने उडदाच्या डाळीला त्यांचा का विरोध आहे, ते विचारून त्याचे उत्तर देण्यास त्यांना भाग पाडले. थोडा वेळ इकडे-तिकडे पाहून त्यांनी हलक्या आवाजात सांगितले की उडदाची डाळ खाल्ली की पोटात वायू धरतो आणि त्यामुळे राग येऊ लागतो.

त्यांच्या नातेवाईकाने विचारले, ''राग आला म्हणून काय झालं ? तो काही वाघ किंवा सिंह नाही. त्याला एवढं घाबरायचं काय कारण ?''

हा नातेवाईक एका कचेरीत काम करीत होता. गयादीननी त्याला समजाऊन सांगितले, ''तुमचं म्हणणं बरोबर आहे. पण राग सर्वांना शोभत नाही. रागावणं हे फक्त अधिकाऱ्यांना शोभतं. सरकार कोलमडलं तरी अधिकारी हा अधिकारीच राहातो. पण आम्ही व्यापारी माणसं आहोत. आम्हाला राग यायला लागला तर कुणी चुकूनही आमच्या दुकानात येणार नाही. शिवाय या रागामुळं केव्हा काय भानगड उद्‌भवेल ते सांगता यायचं नाही.''

गयादीनच्या घरी चोरी झाली होती. त्यावेळी काही दागिने व कपडे एवढेच चोरीला गेले होते. त्या दिवशी रात्री चोरांचा पाठलाग करणाऱ्यांपैकीच कोणीतरी ही चोरी केली असली पाहिजे, असे गृहीत धरणे पोलिसांना सोयीचे होते. चोर जेव्हा गच्चीतून उडी मारून अंगणात आला होता तेव्हा गयादीनची मुलगी व बहीण यांनी त्याला पाहिले नव्हते. त्यावेळी त्यांनी त्याला पाहिले असते तर त्याचा चेहरा त्यांना दिसला असता. परंतु जेव्हा चोर काठीच्या साह्याने भिंतीवर चढून गच्चीवर जाऊ लागला तेव्हा त्या दोघींनी त्याला पाहिले. त्यावेळी त्यांना त्याची फक्त पाठ दिसली. त्यांच्या या वर्तणुकीचा पोलिसांना फार राग आला होता. पोलिसांनी गेल्या तीन दिवसांत अनेक



चोरांना आणून या दोघींपुढे उभे केले होते आणि त्याच्या चेहऱ्यांप्रमाणेच त्यांच्या पाठीही त्यांना दाखविल्या होत्या. परंतु बेलाला अथवा तिच्या आत्येला ज्याच्या गळ्यात पाठीमागून जयमाला घालून ''फौजदार साहेब, हाच आमचा त्या दिवशीच्या रात्रीचा चोर'' असे म्हणता येईल असा एकही इसम त्यांतून निघाला नाही. त्यांच्या या कृत्याचाही पोलिसांना फार राग आला आणि फौजदारसाहेब रागाने पुटपुटू लागले. ''गयादीनची मुलगी आणि बहीण जाणून-बुजून चोराला पकडून देण्याचे नाकारीत आहेत. काय भानगड आहे कोण जाणे !''

गयादीनचा निराशावाद यामुळे जास्तच वाढला होता. कारण गावात इतकी घरे होती, पण चोराला आपल्याकडे ओढून घेणारे त्यांचेच एक तेवढे घर उरले होते. शिवाय चोर खाली उतरताना त्याच्या चेहऱ्यावर बेला आणि तिची आत्या यांची दृष्टी सहज पडू शकली असती; परंतु त्यांच्या नजरेने पाहाण्यासाठी चोराची फक्त पाठच निवडली होती; आणि फौजदारसाहेब सर्वांशी हसत-खेळत बोलत होते पण आडून वार करण्यासाठी त्यांना फक्त गयादीनच उरले होते.

त्या गावात काही शिक्षकही राहात होते. त्यांपैकी एक खन्ना होते. ते बेवकूफ होते. दुसरे मालवीय होते. तेही मूर्ख होते. तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या, सहाव्या व सातव्या शिक्षकाचे नाव गयादीनना माहीत नव्हते. पण तेही सारे मूर्खच होते. यावेळी हे सातही शिक्षक एकत्रपणे त्यांच्या घराकडे येत असलेले पाहून गयादीनांची निराशा जास्तच वाढली होती. कारण ते लोक चोरीच्या बाबतीत सहानुभूती दाखवून एकदम कॉलेजच्या बाबतीत काहीतरी मूर्खासारखी बडबड करीत बसणार, याविषयी त्यांची खात्री होती.

तेच घडले. ही शिक्षक मंडळी अर्धा तासपर्यंत गयादीनना समजावीत राहिली की, ''तुम्ही कॉलेजच्या कार्यकारी समितीचे उपाध्यक्ष आहात; आणि अध्यक्ष महाराज अनेक वर्षांपासून मुंबईत राहात आले आहेत आणि पुढेही राहाणार आहेत. त्यामुळे मॅनेजर व प्रिन्सिपॉल यांच्या भ्रष्टाचाराविरूद्ध उपाध्यक्ष म्हणून तुम्हीच काहीतरी केलं पाहिजे.''

गयादीननी अत्यंत थंडपणे, सर्वोदयी संस्कृतीच्या ढंगात त्यांना समजावून सांगितले की, ''उपाध्यक्ष हा नुसता नावापुरता असतो. वस्तुतः तो काही एखादा हुद्दा नव्हे. माझ्या हातात काहीच अधिकार नाही. अन् मास्टर साहेब, हे खेळ तुम्हीच खेळा, मला त्यात ओढू नका.''

यावर नागरिकशास्त्राचे अध्यापक उपाध्यक्षाचा अधिकार केवढा मोठा असतो ते त्यांना गंभीरपणे समजाऊन सांगू लागले. गयादीनना याबाबतीत काहीच माहीत नसणार अशा खात्रीने त्यांनी उपाध्यक्षाची महती भारताच्या राज्यघटनेच्या संदर्भात सांगण्यास सुरुवात केली. पण गयादीन जोड्याच्या टोकाने जमिनीवर एक वर्तुळ बनवीत राहिले. याचा अर्थ ते जॉमिट्रीचे जाणकार होते असा नव्हे, तर ते कसला तरी डाव मनाशी योजीत होते.

त्यांनी त्या शिक्षकाला मध्येच अडवून विचारले, ''तर मग मास्टरसाहेब, भारताचे उपाध्यक्ष कोण आहेत सांगा बघू ?''

हा प्रश्न ऐकताच अध्यापकांमध्ये गडबड उडाली. सगळेच इकडे-तिकडे पाहू लागले. परंतु भारताच्या उपाध्यक्षाचे नाव लिहिलेले त्यांना कोठेच दिसले नाही. शेवटी नागरिकशास्त्राच्या अध्यापकांनी सांगितले, ''पूर्वी राधाकृष्णन् होते; पण अलीकडेच त्यांची बदली झालीय.''

यावर गयादीन हळूच म्हणाले, ''आता तुम्हीच पाहा मास्टरसाहेब, उपाध्यक्षाला काय किंमत असते ?''

परंतु मास्तर मंडळींनी त्यांचे म्हणणे ऐकले नाही. त्यांच्यापैकी एकाने हट्टच धरला की निदान कॉलेजच्या कार्यकारी समितीची एक बैठक तरी गयादीननी बोलवावीच. गयादीन गावचे महाजन अवश्य होते; परंतु ज्यांच्या गमनाने पंथ बनतो असे महाजन ते नव्हते. अनोळखी वाटेवरून प्रथम भाडोत्री जन पाठवून तेथे चांगली पायवाट बनली आहे, ती खचण्याची भीती नाही, असे पाहून महाजनाप्रमाणे काठी टेकत हळूहळू निघून जाणाऱ्या महाजनांच्या टोळीपैकी ते नव्हते. त्यामुळे प्राध्यापकांच्या आग्रहाचा त्यांच्यावर काही विशेष परिणाम झाला नाही. ते हळूच म्हणाले, ''बैठक बोलावण्याचं काम तुम्ही रामाधीनांवर सोपवा, मास्टरसाहेब ! असल्या कामांना ते चांगले आहेत.''

''त्यांना तर आम्ही गुंतवलंच आहे.''

''तर मग बस्स. त्यांना चांगलं गुंतवून ठेवा. सुटू देऊ नका.'' असे म्हणून गयादीन सभोवती बसलेल्या इतर लोकांकडे पाहू लागले. हे इतर लोक जवळपासच्या खेड्यांतून आलेले होते. जुन्या प्रॉमिसरी नोटांची मुदत वाढविणे, नवीन प्रोनोट लिहून देणे, आणि कोणत्याही परिस्थितीत प्रोनोटांपासून सुटका होणार नाही यांची खबरदारी घेणे, ही त्यांची कामे होती. खन्ना मास्टर मनाशी पक्का निश्चय करून आले होते की आज कोणत्याही परिस्थितीत गयादीनना या प्रश्नाच्या बाबतीत गुंतवून टाकावयाचेच. म्हणून त्यांनी पुनः त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, ''मालवीयजी, आता तुम्हीच गयादीनजींना समजावून सांगा. हा प्रिन्सिपॉल तर आम्हांला भरडून काढतो आहे.''



गयादीननी एक दीर्घ उसासा सोडला. ते मनात म्हणाले, बहुदा आज नशिबात हेच लिहिलेलं असावं. हे लेकाचे मास्तरडे इथून हलणार नाहीत. त्यांनी आपले शरीर हलवून खाटेवर आपले आसन बदलले. इतर लोकांना उद्देशून ते म्हणाले, ''तर मग तुम्ही जा बाबानो ! उद्या सकाळी लौकर या.''

गयादीन आणखी एक उसासा सोडून खन्ना मास्टरांकडे तोंड करून बसले. खन्ना मास्टर म्हणाले, ''तुमची परवानगी असेल तर सारा मामला पुन्हा पहिल्यापासून सांगतो.''

''काय सांगणार, मास्टर साहेब ?'' गयादीन कंटाळून म्हणाले, ही प्रायव्हेट स्कूलची मास्तरकी. तिथं दळण दळायचं काम असतं. कुठ्वर पळून जाल ?''

खन्ना म्हणाले, ''खरी अडचण अशी आहे की या कॉलेजच्या जनरल बॉडीची मीटिंग पाच वर्षांत झालेली नाही. वैद्यजीच मॅनेजर बनून बसलेत. नव्या निवडणुकी झाल्याच नाहीत. वस्तुतः त्या दरसाल व्हायला पाहिजेत.''

गयादीन थोडा वेळ रामलीलेतील राम-लक्ष्मणाप्रमाणे मख्ख चेहरा करून बसले. नंतर म्हणाले, ''तुम्ही मंडळी शिकली सवरलेली आहात. मी काय सांगणार ? परंतु अशा शेकडो संस्था आहेत की ज्यांच्या वार्षिक बैठका वर्षानुवर्षे होत नाही. आपल्या इथलं जिल्हा बोर्डच घ्या. कधी काळी निवडणुका न घेता त्याची रचना करण्यात आली होती. ते वर्षानुवर्षे तसंच फरफटत चाललंय.'' ते गाल फुगवून भरल्या गळ्याने म्हणाले. ''संबंध देशभर हीच स्थिती आहे.'' त्यांचा गळा देशभक्तीमुळे नव्हे तर खोकल्याची उबळ आल्यामुळे भरून आला होता.

मालवीयजी म्हणाले, ''प्रिन्सिपॉल मनाला येईल तसा खर्च करतो. हजारो रूपयांची उधळपट्टी करतो. दरसाल ऑडिटवाले हरकत घेतात. पण तो त्यांना मुळीच जुमानत नाही.''

गयादीननी अत्यंत भोळेपणाने विचारले, ''तुम्ही ऑडिटचे इनचार्ज आहात काय?''

मालवीयजी आवाज चढवून म्हणाले, ''छेः छेः ! तसं नाही. पण जनतेचा पैसा असा उधळला जावा, हे आमच्यानं पाहवत नाही. किती झालं तरी ....''

गयादीननी त्यांना मध्येच अडवून पूर्वीप्रमाणेच हलक्या आवाजात म्हटले, ''तर मग जनतेचा पैसा कसा उधळला जावा, असं तुम्हालां वाटतं ? मोठ्या मोठ्या इमारती बांधून ? सभा-बैठका भरवून ? जेवणावळी घालून ?'' या ज्ञानासमोर मालवीयजी नतमस्तक झाले. गयादीननी उदारपणे समजावले, ''मास्टरसाहेब, मी फारसा शिकलेलो नाही. पण चांगल्या काळात कलकत्ता, मुंबई पाहून आलोय. मलाही थोडंफार कळतंय. जनतेच्या पैशासंबंधी एवढा कळवळा दाखवणं बरं नाही. तो तर

वाया जाण्यासाठीच असतो.'' ते थोडा वेळ गप्प राहिले; आणि मग खन्ना मास्टरांना चुचकारण्यासाठी म्हणाले, ''नका मास्टरसाहेब, जनतेच्या पैशाची एवढी काळजी करू नका. नाहीतर फारच त्रास सोसावा लागेल.''

गयादीनांची विचारसरणी मालवीयजींना फारच गहन वाटली. तशी ती गहन होतीही. ते अजून किनाऱ्यावरच्या वाळूतच लोळत होते. ते म्हणाले, ''गयादीनजी, या गोष्टींशी आम्हां शिक्षकांचा काही संबंध नाही, ते मला माहीत आहे. वैद्यजीनी कॉलेजच्या पैशातून पिठाची गिरणी काढली किंवा प्रिन्सिपॉलनी आपल्या मुलीचं लग्न केलं तरी आम्हाला त्याच्याशी काय करायचंय ? पण ही संस्था तुम्हा मंडळींचीच आहे ना ! तिच्यात उघडउघड इतक्या बेकायदेशीर गोष्टी घडाव्यात, नैतिकतेचं नाव निशाणही उरू नये, हे काय बरं दिसतं ?''

आता कुठे गयादीनांच्या तोंडावर थोडीशी अस्वस्थता दिसू लागली. परंतु जेव्हा ते बोलू लागले तेंव्हा त्यांचा आवाज पहिल्याप्रमाणेच थकल्यासारखा वाटत होता. ते म्हणाले, ''नैतिकतेचं नाव काढू नका मास्टर साहेब, कुणी ऐकलं तर खटला भरील.''

लोक गप्प बसले. नंतर गयादीननी थोडी हालचाल केली. त्यांची नजर एका कोपऱ्यात गेली. तेथे एक मोडका-तोडका लाकडी चौरंग पडला होता. त्याच्याकडे बोट दाखवून गयादीन म्हणाले, ''नैतिकता ही या चौरंगासारखी आहे, असं समजा. एका कोपऱ्यात पडलीय. सभा-सम्मेलनाच्या वेळी त्याच्यावर सुंदर कापड अंथरलं जातं. तेव्हा तो फार छान दिसतो. त्याच्यावर उभं राहून व्याख्यान झोडण्यात येतं. त्यासाठीच हा आहे.''

हा खुलासा ऐकताच सर्व प्राध्यापकांची तोंडे एकदम बंद झाली. गयादीननीच त्यांचे सांत्वन करीत म्हटले, ''आता तुम्ही मला असं सांगा मास्टर साहेब, खुद्द तुम्हाला काय त्रास होतोय ? आतापर्यंत तुम्ही फक्त जनतेच्याच त्रासाच्या गोष्टी बोलत होता.

खन्ना मास्टर चिडून म्हणाले, ''तुम्हाला आमच्या अडचणी सांगण्यात काही अर्थ नाही. तुम्हाला कोणतीही अडचण वाटतच नाही.''

''का वाटणार नाही ?'' गयादीन चुचकारत म्हणाले, ''अवश्य वाटेल. तुम्ही सांगा तर खरे.''

मालवीयजी म्हणाले, ''प्रिन्सिपॉलनं आमच्याकडली सारी कामं काढून घेतली आहेत. खन्नांना हॉस्टेल इनचार्ज राहू दिलं नाही. माझ्याकडून गेम्सचा चार्ज काढून घेतला. रायसाहेब नेहमी परीक्षांचे सुपरिंटेंडेंट असत. त्यांना त्या पदावरून काढून टाकलंय. ही सारी कामं तो आपल्या माणसांना देतोय.''

गयादीन गोंधळलेल्या मनःस्थितीत थोडा वेळ बसून राहिले. नंतर म्हणाले, ''मी काही बोललो तर तुम्हांला राग येईल. पण प्रिन्सिपॉल साहेबांना त्यांच्या मनाप्रमाणं इनचार्ज निवडण्याचा अधिकार असला तर त्यात चुकीचं काय आहे ?''



प्राध्यापक महाशय चुळबुळ करू लागले. तेव्हा ते पुढे म्हणाले, ''जगातली सारी कामं तुमच्या मनांप्रमाणं थोडीच चालणार, मास्टर साहेब ? गतवर्षी काय झालं. ते आठवा. बैजेगावच्या लालसाहेबाला लाटसाहेबांनी व्हाइस चॅन्सेलर केलंच की नाही ? लोकांनी इतकी आदळ आपट केली; पण तिला कुणी भीक घातली ? नंतर सगळे गप्प बसले. तुम्हीही गप्प बसा. आरडाओरडा करून काही फायदा नाही. लोक तुम्हालाच लबाड म्हणतील.''

एक प्राध्यापक मागून उसळून म्हणाले, ''पण आम्ही तरी काय करावं ? प्रिन्सिपॉल आमच्याविरूद्ध विद्यार्थ्यांना चिथावतो. आम्हांला आयाबहिणींवरून शिव्या देतो. खोट्या तक्रारी नोंदवतो. आम्ही काही लिहून दिलं तर ते कागद हरवून टाकतो; आणि मग त्याबद्दल जाब विचारतो.''

गयादीन खाटेवर किंचित हलले. खाट करकरली. त्याबरोबर ते थोडेसे संकोचले. थोडा वेळ विचार करून ते म्हणाले, ''ही सारी तुम्ही कार्यालयातील कामाची पद्धत मला सांगता आहांत. तिथं असंच घडत असतं की.''

त्या शिक्षकाने रागारागाने म्हटले, ''दहा-पाच मुडदे पडतील तेव्हा कुठं नवीन काही घडलंय असं तुम्हांला वाटणार !''

गयादीन त्याच्या त्या रागाकडे दयाभावनेने पाहात राहिले. आज त्याने उडदाची डाळ खाल्ली असली पाहिजे, हे त्यांनी ओळखले. नंतर ते शांतपणे म्हणाले, ''त्यात तरी नवीन काय आहे ? चोहोकडे पटापट मुडदेच तर पडून राहिलेत.''

खन्ना मास्टरांनी बाजू सांभाळण्यासाठी म्हटले, ''यांच्या या रागाचा तुम्ही राग मानू नका. आम्ही लोक खरोखरीच फार त्रासून गेलो आहोत. फार ताप झालाय. आता तुम्हीच बघा, याच जुलै महिन्यात त्यानं आपल्या तीन नातेवाईकांना प्राध्यापक म्हणून लावून घेतलंय. त्यांनाच आमच्यापेक्षा सीनियर बनवून तो त्यांच्याकडून सारी कामं करवून घेतोय. वशिलेबाजीचा कडेलोट झालाय. आता तुम्हीच सांगा, आम्हाला का राग येऊ नये ?''

''त्यात राग येण्यासारखं काय आहे ?'' गयादीन कण्हत-कुंथत म्हणाले, ''तुम्हीच तर सांगता आहांत की वशिलेबाजीचा कडेलोट झालाय म्हणून. वैदजींचे नातेवाईक मिळाले नसतील म्हणून बिचाऱ्यानं आपलेच नातेवाईक लावून घेतले असतील.''

एकदोन शिक्षक हसू लागले. गयादीन पुढे बोलू लागले, ''ही काही थट्टेवारी नेण्याची गोष्ट नाही. हाच आजचा युगधर्म आहे. सगळेजण जे करतात तेच

प्रिन्सिपॉलही करतो. बिचारा आपल्या नातेवाईकांना कुठं घेऊन जाणार ?''

खन्नामास्टरांना उद्देशून ते पुढे म्हणाले, ''तुम्ही इतिहास शिकवता ना, मास्टरसाहेब ? सिंहगड कसा सर झाला ?''

खन्नामास्टर या प्रश्नाचे उत्तर शोधू लागले. गयादीन म्हणाले, ''मी सांगतो तुम्हांला. तानाजी काय घेऊन गेला होता ? एक घोरपड. तिच्या कमरेला त्यानं दोर बांधला आणि किल्ल्याच्या भिंतीवर तिला फेकून दिलं. ती घोरपड आपल्या जागेला घट्ट चिकटून बसली आणि तानाजी व इतर शिपाई त्याच दोराच्या साह्यानं भराभर वर चढून गेले.''

एवढे बोलून होता-होता ते बहुदा दमले. अध्यापक मंडळींना आपला मुद्दा समजला असावा, या अपेक्षेने त्यांनी त्यांच्या चेहऱ्यांकडे पाहिले. परंतु ते निर्विकार होते. गयादीन आपला मुद्दा समजावून सांगू लागले, ''हीच स्थिती आपल्या देशाची आहे, मास्टरसाहेब ! जो ज्या ठिकाणी आहे तो आपल्या जागेला घोरपडीसारखा घट्ट चिकटून बसलाय; जरासुद्धा इकडे - तिकडे सरकायला तयार नाही. त्याला वाटेल तेवढं टोचा, वाटेल तितका धिक्कार करा, तो आपल्या जागेला चिकटूनच राहाणार; आणि त्याचे सगळे नातेवाईक त्याची शेपटी धरून सरसर चढत वर जाऊन पोचणार. कॉलेजला निष्कारण कशाला बदनाम करता ? सगळीकडेच हे चाललंय.''

नंतर एक निःश्वास सोडून त्यांनी विचारले, ''अच्छा, तुम्हीच सांगा मास्टर साहेब, हे सारं कुठं चालत नाही ?''

शिक्षकांचे टोळके चांभारवाड्याजवळून जाऊ लागले. त्यांच्या माना खाली लवल्या होत्या आणि कोणत्याही क्षणी त्यांची मुंडकी टपकन् त्यांच्या पायांशी पडतील असे वाटत होते.

चांभारवाडा ही एक स्वतंत्र गल्लीच होती. तेथे चांभार राहात होते. चांभार हे एका जातीचे नाव असून ती अस्पृश्य समजली जात असे. अस्पृश्य हा एक द्विपाद प्राणी असून नवी राज्यघटना लागू होण्यापूर्वी लोक त्याला शिवत नसत. राज्यघटना हे एका कवितेचे नाव असून तिच्या १७ व्या कलमान्वये अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. अर्थात् या देशातील लोक कवितेच्या आधारे जगत नसून ते धर्माच्या आधाराने राहातात, आणि अस्पृश्यता हा या देशाचा एक धर्म आहे, यामुळे इतर गावांप्रमाणेच शिवपालगंजातही अस्पृश्यांचे वेगवेगळे वाडे किंवा मोहल्ले होते. त्यांपैकी सर्वांत महत्त्वाचा वाडा म्हणजे चांभारवाडा होय. कधीकाळी गावच्या जमीनदारांनी मोठ्या प्रेमाने हा वाडा वसवला होता. त्या प्रेमाचे कारण जमीनदारांच्या मनात चर्मोद्योगाचा विकास घडवून आणण्याची इच्छा होती, हे नसून तेथे वसण्यासाठी येणारे चांभार चांगले लाठीबहाद्दर होते; हे होय.



राज्यघटना लागू झाल्यानंतर चांभारवाडा व शिवपालगंजाचा बाकीचा भाग यांमध्ये एक चांगली गोष्ट घडून आली होती. त्याठिकाणी एक चबुतरा बांधण्यात आला होता. त्याला गांधी चबुतरा असे म्हणत. काही लोकांना कदाचित् अजूनही आठवत असेल की गांधी हे भारतातच जन्मास आले होते आणि त्यांच्या अस्थिकलशाबरोबरच त्यांचे सिद्धांतही प्रयागच्या संगमामध्ये सोडून दिल्यानंतर असे ठरविण्यात आले होते की यापुढे गांधींच्या स्मृतिप्रीत्यर्थ फक्त पक्क्या इमारती बांधावयाच्या. त्याप्रमाणे शिवपालगंजात हा चौथरा बांधण्यात आला होता. हा चबुतरा थंडीच्या दिवसात ऊन्हं खायला फार उपयुक्त होता आणि त्यावर बहुदा कुत्री ऊन्हं खात बसत. आता कुत्र्यांसाठी स्वतंत्र मुताऱ्या बांधण्यात येत नसल्यामुळे ती कुत्री उन्हं खाता-खाता चबुतऱ्याच्या कोपऱ्यावर लघुशंकाही करीत. त्यांचे पाहून कधी-कधी माणसेही चबुतऱ्याच्या आडाला बसून तेच कार्य करीत.

आज त्या चबुतऱ्यावर आग पेटवून लंगडा बसला आहे आणि तो त्या आगीवर काहीतरी भाजतो आहे असे प्राध्यापक मंडळींना दिसून आले. जवळ जाऊन पाहिल्यावर ती भाजली जात असलेली वस्तु एक गोल-गोल, जाडजूड भाकरी आहे, असे त्यांना आढळले. ही भाकरी तो सभोवताली भटकणाऱ्या कुत्र्यांसाठी नक्कीच भाजत नव्हता. त्यांनी थांबून त्याच्याशी बोलायला सुरुवात केली; आणि दोन मिनिटांतच त्यांना असे समजले की लंगड्याने मामलेदार कचेरीत ज्या नकलेसाठी अर्ज दिला होता ती नक्कल आता त्याला कायदेशीर मार्गाने, एक कवडीही वाममार्गाने खर्च न करिता, लौकरच मिळणार आहे.

शिक्षकांना ते खरे वाटले नाही.

$$\text{लंगड्याच्या बोलण्यात आज निराशावाद} + \text{निर्यातवाद} = \frac{\text{पराजयवाद}}{\text{कुष्ठावाद}}$$

चा कसलाही प्रभाव नव्हता. त्याने सांगितले, ''माझं म्हणणं तुम्ही ऐका, बापू ! आज मी सारं काही ठीक करून आलोय. अर्जात आणखी दोन चुका निघाल्या होत्या. त्या दुरुस्त केल्या आहेत.''

एक शिक्षक चिडून म्हणाला, ''पूर्वीही तुझ्या अर्जात चूक निघाली होती. हा नक्कलनवीस पुनः पुनः चुका का काढतो ! बदमाष लेकाचा !''

''शिवी देऊ नका, बापू !'' लंगडा म्हणाला, ''हे धर्मयुद्ध आहे. शिवीगाळीला यात स्थान नाही. नक्कलनवीस बिचारा काय करणार ? कलमवाल्यांची जातच तशी आहे.''

''मग नक्कल कधी मिळणार ?''

''आता मिळालीच असं समजा, बापू. पंधरा-वीस दिवसांत मिळून जाईल. फाईल

जिल्हा कचेरीत गेलीय, आता अर्जही जिल्ह्याच्या मुख्यालयात जाईल. तिथंच नक्कल तयार होईल. तिथून ती इथं परत येईल. मग ती नोंदली जाईल...''

लंगडा नक्कल मिळविण्याची योजना सांगतच राहिला. मास्तर लोक आपल्या बडबडीला आणि गांधीचबुतऱ्याजवळ पसरलेल्या दुर्गंधीला कंटाळून केव्हा पुढे सटकले ते त्याला कळलेच नाही. त्याने मान वर करून पाहिले तेव्हा त्याला आपल्या आसपास चिरपरिचित कुत्री, डुकरे व उकीरडे दिसले. त्यांच्या सहवासात राहूनच तर तो कचेरीविरूद्ध धर्मयुद्ध करीत होता.

गोधूळ वेला. एक खोंड अत्यंत उग्रपणे शिंगे फेंदारून चौखूर उधळत चबुतऱ्याजवळून निघून गेला. तो थोडावेळ धावत राहिला. नंतर समोरच्या गव्हाच्या एका हिरव्यागार शेतात जाऊन स्थिरावला. लंगड्याने हात जोडून म्हटले, ''धन्य आहे तुमची फौजदार साहेब !''

## ११

शिवपालगंज हे तालुक्याचे ठिकाण असूनही त्याला टाउन एरिया बनण्याचा अधिकार मिळण्याइतके ते मोठे नव्हते. शिवपालगंजमध्ये एक ग्रामसभा होती आणि गावकरी लोक टाउन एरियाच्या दराने आपल्याला जादा कर द्यावे लागू नयेत म्हणून तिला ग्रामसभाच राखू इच्छित होते. या ग्रामसभेचे प्रमुख रामाधीन भीखमखेडवींचे भाऊ होते. त्यांचे सर्वांत सुंदर वैशिष्ट्य म्हणजे इतकी वर्षे ग्रामसभेचे सभापती राहूनही ते वेड्याच्या इस्पितळात गेले नव्हते किंवा तुरुंगाची हवाही खाऊन आले नव्हते. शिवपालगंजच्या लोकांमध्ये ते आपल्या मूर्खपणाबद्दल प्रसिद्ध होते; आणि यामुळेच सभापती बनण्यापूर्वी ते सर्वप्रिय होते. बाहेरचे अधिकारी आले की गावकरी मंडळी त्यांना जणू तबकात ठेवून त्यांच्या समोर ठेवीत; आणि कधी-कधी असेही सांगत की, ''साहेब, शहरांमध्ये निवडून येणाऱ्या लोकांना तुम्ही हजारो वेळा पाहिलं असेल. आता एकदा इथलाही माल पाहून जा.''

ग्रामपंचायतीच्या निवडणुका जानेवारीत व्हावयाच्या होत्या आणि आता नोव्हेंबर



लागला होता. या खेपेला कोणाला सरपंच बनवावयाचे हा प्रश्न होता. गेल्या निवडणुकीत वैद्यजींनी मुळीच लक्ष घातले नव्हते; कारण ग्रामपंचायतीचे काम अत्यंत हलक्या दर्जाचे आहे, असे ते समजत होते. एक प्रकारे तसे ते हलके होतेही; कारण ग्रामपंचायतीचे अधिकारी अगदीच फडतूस होते. त्यांच्याजवळ पोलिसी दंडा नव्हता अथवा मामलेदाराचा रूबाबही नव्हता. त्यांच्याकडून रोज-रोज आपल्या कामाची पाहणी करवून घेतल्याने माणसाच्या इज्जतीला बट्टा लागत असे. सरपंचाला ग्रामपंचायतीच्या जमीनजुमल्यासाठी दावे-खटले करावे लागत; आणि शहरातील कोर्टकचेऱ्यांमध्ये वकील व अधिकारी त्यांच्याशी फार वाईट वागत. एक चोर दुसऱ्या चोराशी जेवढ्या सौजन्याने वागतो तेवढेही सौजन्य या लोकांकडून सरपंचाला मिळत नसे. कज्जे-खटल्यांमुळे सर्वांचे शत्रुत्व विकत घ्यावे लागे; आणि आपत्तीमध्ये पोलिसवाले नुसते स्मित करीत; एवढेच नव्हे तर कधीकधी जाड अक्षरांमध्ये 'परधानजी' (प्रधानजी-सरपंच) असे संबोधून बाहेरचा रस्ता दाखवीत.

परंतु अलीकडे काही दिवसांपासून वैद्यजींना ग्रामपंचायतीच्या कामातही गोडी वाटू लागली होती. कारण त्यांनी पंतप्रधानांचे भाषण कुठल्या तरी वर्तमान पत्रात वाचले होते. त्या भाषणात असे सांगण्यात आले होते की खेड्यांचा उध्दार शाळा, सहकारी संस्था आणि ग्रामपंचायती यांच्या द्वारेच होऊ शकतो. त्याबरोबर अकस्मात वैद्यजींच्या लक्षात आले की आपण आजपर्यंत गावाचा उद्धार फक्त सहकारी संस्था आणि कॉलेज यांच्या द्वारेच करीत होतो; आणि गावची पंचायत तर आपल्या हातात नाहीच. ''अरेरे !'' ते मनाशी म्हणाले, ''म्हणून तर शिवपालगंजाचा नीट उद्धार होत नाही. तरी मी विचार करतच होतो. की हे असं का होतंय ?''

त्यात लक्ष घालताच अनेक गोष्टी समोर आल्या. उदाहरणार्थ, रामाधीनांच्या भावाने ग्रामपंचायतीचे वाटोळे करून टाकले आहे; गावच्या पडीत जमिनीवर लोकांनी वाटेल तसे कबजे केले आहेत; आणि सरपंचाने नक्कीच लाच घेतली आहे; ग्रामपंचायतीजवळ पैसा नाही; तेव्हा सरपंचाने नक्कीच अफरातफर केली असली पाहिजे. गावामध्ये फार घाण साचली आहे; आणि सरपंच नक्कीच 'सुव्वरका बच्चा' आहे. पोलिसवाल्यांनी सरपंचाच्या तक्रारीवरून अनेक लोकांवर खटले भरले आहेत; त्यावरून फक्त एवढाच निष्कर्ष निघतो की तो आता पोलिसांचाही दलाल बनला आहे. सरपंचाला बंदुकीचे लायसेन्स मिळाले आहे. ही बंदूक नक्कीच दरवडे घालण्यासाठी उधार दिली जात असली पाहिजे. गतवर्षी गावात बजरंगीचा खून झाला होता. तो का व कसा झाला असावा हे सहज समजू शकेल.

भांग पिणाऱ्यांच्या दृष्टीने भांग वाटणे ही एक कला आहे, कविता आहे, कार्य आहे, कर्तृत्व आहे, प्रथा आहे. तसे पाहिल्यास दोन पैशांची भांगेची पाने चघळून वर पाणी प्याले की झकास नशा चढतो. पण ही नशाबाजी अगदीच स्वस्तातली म्हणायची. भांगेच्या पत्तीबरोबर बदाम पिस्ते, गुलकंद, दुध-मलई वगैरेचा वापर केला पाहिजे. भांग इतकी घोटली पाहिजे की पाटा व वरवंटा चिकटून एकजीव झाले पाहिजेत. भांग पिण्यापूर्वी शंकर भगवानांची स्तुती असलेले श्लोक म्हटले पाहिजेत. सारा कार्यक्रम वैयक्तिक न ठेवता त्याला सामुदायिक रूप देण्यात आले पाहिजे. हा आदर्श कार्यक्रम होय.

वैद्यजींच्या बैठकीत भांगेच्या याच सामाजिक पैलूला अभिव्यक्ति मिळवून देणे हे सनीचरचे काम होते. त्यावेळीही तो रोजच्याप्रमाणे भांग घोटत होता. इतक्यात त्याच्या कानांवर हाक आली, ''सनीचर !''

सनीचरने फुसकारून फणा उभारावा तसे डोके वर उचलले. वैद्यजी म्हणाले, ''भांगेचं काम दुसऱ्या कुणाकडे तरी सोपव आणि तू इकडे आत ये.''

जणू कोणीतरी त्याला मंत्रिपदाचा राजीनामा द्यायलाच सांगत होते. तो पुटपुटू लागला, ''कुणावर सोपवायचं हे काम ? हे काम करणारा इथं कोण आहे ? आजकालच्या पोरांना यातलं काय कळतंय ? चटणी वाटल्यासारखी भांग वाटून ठेवतील.'' परंतु त्याने पाटा-वरवंटा एका तरूणाच्या स्वाधीन केला, हात धुवून ते चड्डीच्या मागल्या बाजूला पुसले आणि वैद्यजींजवळ जाऊन उभा राहिला.

दिवाणावर वैद्यजी, रंगनाथ, बद्री पहिलवान आणि प्रिन्सिपॉल साहेब बसले होते. प्रिन्सिपॉल एका कोपऱ्यात सरकले आणि म्हणाले, ''बसा सनीचरजी !''

हे वाक्य ऐकताच सनीचर चमकला. परिणामस्वरूप त्याने आपले मोडके दात बाहेर काढले आणि छातीवरील केस खाजविण्यास सुरूवात केली. तो खुळ्यासारखा दिसू लागला; कारण चलाखीच्या हल्ल्याचा प्रतिकार कसा करावयाचा असतो हे तो जाणून होता. तो म्हणाला, ''प्रिन्सिपॉल साहेब, तुम्ही मला तुमच्या जवळ बसवून नरकात टाकू नका.''

बद्री पहिलवान हसले. ते म्हणाले, ''स्साल्या, फार नखरा करू नकोस. प्रिन्सिपॉल साहेबांशेजारी बसल्यामुळं तू नरकात जाशील होय ?'' आणि मग आवाज बदलून म्हणाले, ''बैस तिथं.''

वैद्यजींनी शाश्वत सत्य सांगण्याच्या शैलीत म्हटले, ''असं बोलू नये बद्री. मंगलदासजी काय होणार आहेत याची कल्पना आहे काय ?''

सनीचरने कित्येक वर्षांनंतर आपले खरे नाव ऐकले होते. तो बसला आणि प्रतिष्ठितपणे म्हणाला, ''महाराज, पहिलवानांना जास्त लाजवू नका. अजून त्यांचं वय काय आहे ? योग्य वेळी सगळं काही समजेल त्यांना.''



वैद्यजी म्हणाले, ''तर मग प्रिन्सिपॉल साहेब, सांगून टाका जे काही सांगायचं असेल ते.''ते अवधी बोलीत बोलू लागले, ''सांगायचं काय म्हणा ? आपणा सर्वांना माहीतच आहे.'' आणि मग स्वतःला खडी बोली (हिंदी) च्या सुळावर चढवून म्हणाले, ''ग्रामपंचायतीची निवडणूक व्हायची आहे. इथला सरपंच ही एक बडी असामी असते. तो कॉलेज-कमेटीचा मेंबरही असतो. एक प्रकारे माझाही ऑफिसर.''

वैद्यजी मध्येच म्हणाले, ''हे पाहा मंगलदास, या खेपेला ग्रामपंचायतीचा सभापती आम्ही तुला बनवणार आहोत.''

सनीचरचा चेहरा वेडा-वाकडा होऊ लागला. त्याने हात जोडले. त्याचे शरीर पुलकित झाले. डोळे डबडबले. एखाद्या गुप्त रोगाने पछाडलेल्या, उपेक्षित कार्यकर्त्याकडे एखाद्या मेडिकल असोसिएशनचा अध्यक्ष बनण्याचा परवाना आला असता त्याची जी अवस्था होईल तशी सनीचरची झाली. नंतर स्वतःवर ताबा मिळवून तो म्हणाला, ''नको नको महाराज, माझ्यासारख्या नालायक माणसाला आपण या जागेसाठी लायक समजलात, हेच फार झालं, पण मी या सन्मानाला मुळीच पात्र नाही.''

यावर प्रिन्सिपॉलसाहेब म्हणाले, ''गावचा सरपंच कुणी आलतू-फालतू थोडाच होऊ शकतो ? फार मोठा हुद्दा आहे तो. सबंध गावाच्या मालमत्तेचा मालक. मनात आणलं तर एका दिवसात लाखांची उलाढाल तो करू शकतो. स्थानिक अधिकारी. मनात आणल्यास सबंध गावावर १०७ कलमाखाली खटला भरून त्याला तुरूंगात डांबू शकतो. मोठमोठे अधिकारी येऊन त्याच्या दारात बसतात. तो ज्याच्या विरूद्ध तक्रार करील त्याला जगणं मुष्किल होऊन जातं. कागदावर एवढासा शिक्का मारला की त्याला वाटेल तेव्हा, वाटेल तेवढी तेल-साखर मिळविता येते. गावामध्ये त्याच्या परवानगीशिवाय कुणी उकीरड्यावर कचरा सुद्धा टाकू शकत नाही. सगळे त्याच्या सल्ल्यानं वागतात. सगळ्याची किल्ली त्याच्याजवळ असते. प्रत्येक बेवारशी व्यक्तीचा तोच वारसदार असतो. काय समजलास सनीचर ?''

सनीचरने नम्रपणे हात जोडून फक्त एवढेच म्हटले, ''मला काय करायचंय ? सारं जग असंच म्हणेल की तुम्ही मंडळी असतांना शिवपालगंजमधील एका रिकामटेकड्या माणसाला —''

प्रिन्सिपॉलनी आपले नेहमीचे 'हैं हैं हैं' करीत अवधी बोलीत म्हटले, ''तुम्ही पुनः बरळू लागलात सनीचरजी ! आमच्याकडे राजापूरच्या ग्रामपंचायतीत तिथल्या बाबूसाहेबांनी आपल्या शेतात राबणाऱ्या कुळालाच सरपंच बनवलंय. या धकाधकीच्या मामल्यात कुणी मोठा माणूस स्वतः थोडाच पडतो ? —''

प्रिन्सिपॉल साहेब न थांबता, न अडखळता बोलत राहिले, ''आणि मॅनेजर साहेब, त्या शेतकऱ्यानं सरपंच झाल्यावर मोठी बहार उडवून दिली, बरं कां ! एकदा मामलेदार कचेरीत सभा झाली. डेप्युटी कलेक्टर साहेब आले होते. सगळे सरपंच जमले होते. त्यांना जमिनीवर सतरंजी टाकून बसविले होते. डेप्युटी साहेब खुर्चीवर बसले होते. इतक्यात तो शेतकरी उठून म्हणाला, ''आम्हांला बोलावून जमिनीवर बसवायचं आणि डेप्युटी साहेबांनी स्वतः खुर्चीवर बसायचं हा कुठला न्याय ?'' डेप्युटी साहेबही नवे-नवे तरूण होते. तेही अडून बसले. त्यामुळं दोन्ही बाजूंनी तो प्रतिष्ठेचा प्रश्न होऊन बसला. इतर सरपंच हलवाहेराम (शेतकऱ्या) च्या बाजूने उभे राहिले. 'इन्किलाब झिंदाबाद' च्या घोषणा होऊ लागल्या. डेप्युटी साहेब तिथंच खुर्चीवर बसल्या-बसल्या 'शांती . . . शांती' म्हणून ओरडू लागले. पण कुठली शांती आणि कुठली शकुंतला ! सरपंचांनी सभेला बसण्याचे नाकारले, आणि राजापूरचा तो शेतकरी तालुक्याचा पुढारी बनला. दुसऱ्याच दिवशी तीन पक्षांनी त्याच्याकडे अर्ज धाडला की, तुम्ही आमच्या पक्षाचे सभासद व्हा. परंतु बाबूसाहेबांनी त्याला ताकीद दिली की, ''खबरदार, इतक्यात काही नाही. आम्ही जेव्हा ज्या पक्षात जायला सांगू तेव्हा त्या पक्षात जायचं.''

सनीचरच्या कानांत ''इन्किलाब झिंदाबाद' च्या घोषणा दुमदुमू लागल्या. त्याच्या मनश्चक्षूंसमोर एका उघड्या-बोडक्या चड्डीधारी इसमाच्या मागे शे-दोनशे माणसे हात वर करून ओरडत होती. वैद्यजी म्हणाले, ''हा अशिष्टपणा झाला. मी सरपंच असतो तर उठून निघून आलो असतो. मग दोन महिन्यांनी आपल्या ग्रामपंचायतीचा उत्सव केला असता. डेप्युटी साहेबांनाही बोलावलं असतं. त्यांना जमिनीवर बसवलं असतं, आणि मग स्वतः खुर्चीवर बसून व्याख्यान देत सांगितलं असतं, ''बंधूनो ! खुर्चीवर बसण्यात स्वाभाविकपणेच फार क्लेश होत आहेत. परंतु अतिथि सत्काराचा हा नियम डेप्युटी साहेबांनी अमक्या तारखेला आम्हांला तालुका - कचेरीत बोलावून शिकवला होता. त्यामुळं त्यांची शिकवण शिरसावंद्य मानून मला ही अडचण सहन करावी लागत आहे.'' एवढे बोलून वैद्यजी आत्मसंतोषाने खदखदून हसले. रंगनाथाचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांनी त्याला विचारले, ''काय बाळ, हेच योग्य झालं असतं ना ?''

रंगनाथ म्हणाला, ''बरोबर आहे. मलाही ही युक्ती कोल्हा आणि करकोचा यांच्या गोष्टीतून शिकवण्यात आली होती.''

वैद्यजी सनीचरला म्हणाले, ''तर मग ठीक आहे. जा, बघ, खरोखरीच त्या मूर्खानं



चटणीसारखी भांग वाटली नाही ना, ते पाहा. तुझा हात लागल्याशिवाय रंग चढत नाही.''

बद्री पहिलवान हसून दारातून म्हणाले, ''जा साल्या, पुनः आपली भांग घोटत बैस.''

थोडा वेळ स्तब्धता पसरली. मग प्रिन्सिपॉल हळूच म्हणाले, ''आपली परवानगी असेल तर खन्ना मास्टरासंबंधी दोन शब्द सांगतो.''

वैद्यजींनी कपाळाला आठ्या घातल्या. परवानगी मिळाली. प्रिन्सिपॉलनी सांगितले, ''एक घटना घडलीय. परवा संध्याकाळी गयादीनाच्या अंगणात धप्पकन काहीतरी पडलं. गयादीन त्यावेळी शेतात शौचाला गेला होता. घरामध्ये ते बोचकं बेलाच्या आत्येनं पाहिलं आणि उचललं. तो एक चुरगळलेला लिफाफा होता. आत्येनं ते पत्र बेलाकडून वाचून घेण्याचा प्रयत्न केला. पण बेलाला ते वाचता आलं नाही ——''

रंगनाथ लक्ष देऊन ऐकत होता. त्याने विचारले, ''ते पत्र इंग्रजीत लिहिलं होतं काय ?''

''इंग्रजीत कोण लिहिणार ? ते होतं हिंदीतच. पण कुमारी मुलगी ते कसं वाचणार ? ते एक प्रेमपत्र होत.''

वैद्यजी निमूटपणे ऐकत होते. ते पत्र कोणी लिहिले होते, हे विचारण्याचे धैर्य रंगनाथला झाले नाही.

प्रिन्सिपॉल म्हणाले, ''कुणी लिहिलं होतं कोण जाणे. मला तर वाटतंय की खन्ना मास्टराच्या गटापैकीच कुणाचा तरी हा चावटपणा असावा. गुंड आहेत साले गुंड, पण खन्ना मास्टर तुमच्या विरुद्ध प्रचार करतोय. त्याचं म्हणणं असं की ते पत्र रूप्पनबाबूंनी धाडलंय. तुमच्या घराण्याची बदनामी करण्याची हिम्मत आता तो करतोय.''

वैद्यजींवर या माहितीचा काही परिणाम झाल्याचे दिसले नाही. फक्त ते एक मिनिटभर गप्प राहिले एवढेच. नंतर ते म्हणाले, ''माझ्या घराण्याची बदनामी करायची त्याची काय टाप लागून राहिलीय. तो गयादीनांच्या घराण्यालाच बदनाम करतोय. मुलगी त्यांचीच आहे ना ?''

# १२

कार्तिक पोर्णिमेला शिवपालगंजहून सुमारे पाच मैल अंतरावर एक जत्रा भरते. तेथे जंगल आहे, एक टेकडी आहे, त्या टेकडीवर देवीचं एक देऊळ आहे, आणि सभोवती कुठल्या तरी जुनाट इमारतीच्या पसरलेल्या विटा आहेत. जंगलात करवंदे, कांगोण्या व बोरे यांची झाडे-झुडपे आहेत. जमीन उंच सखल आहे. सशापासून लांडग्यापर्यंत आणि मुरव्या चोरापासून दरवडेखोरांपर्यंत सर्वजण या जंगलात सहज लपून राहातात. आसपासच्या गावांत जे प्रेमसंबंध आत्मिक पातळीवर स्थापन होतात त्यांचे विश्लेषण या जंगलात शारीरिक पातळीवर होते. शहरांतूनही कधी-कधी पिकनिक करणारी जोडपी फिरायला म्हणून येथे येतात आणि एकमेकांना आपले सक्रिय ज्ञान दाखवून आणि कधीकधी हातासरशी देवळातील देवतेचे दर्शन घेऊन संकोचित शरीर व उत्फुल्ल मन बरोबर घेऊन परत जातात.

या भागात राहाणाऱ्या लोकांना या टेकडीचा मोठा अभिमान वाटतो. कारण हेच त्यांचे अजिंठा, वेरूळ, खजुराहो व महाबलिपुरम् आहे. देवासुर-संग्रामानंतर देवीला राहाण्यासाठी देवांनी स्वतःच्या हातांनी हे देऊळ बांधले होते, अशी त्यांची खात्री आहे. या टेकडीच्या खाली फार मोठा खजिना पुरलेला आहे, असे ते सांगतात. अशा प्रकारे अर्थ, धर्म आणि इतिहास यांच्या दृष्टीने ही टेकडी फार महत्त्वाची आहे.

इतिहास आणि पुरातत्त्वशास्त्र यांची माहिती रंगनाथाला असल्यामुळे आपण या टेकडीची संशोधनात्मक पाहाणी करावी अशी त्याची फार इच्छा होती. तेथील मूर्ती गुप्तकालीन असून ज्यांना 'टेराकोटा' असे म्हणतात त्या भाजलेल्या मातीच्या वस्तूंचे तुकडे मौर्यकालीन आहेत असे त्याला सांगण्यात आले होते.

या जत्रेला लोक चालले होते. बायका घोळका करून जात होत्या. त्यांच्या मागे-पुढे मुले व पुरूष होते. धुळीचे लोट वर उडवीत सर्वजण झपझप चालले होते. त्यातच बैलगाड्या आश्चर्यकारक पद्धतीने वाट काढीत धावण्याची स्पर्धा करीत होत्या. पायी चालणारी मंडळी त्यापेक्षाही जास्त आश्चर्यकारक पद्धतीने स्वतःला त्यांच्या धक्क्यापासून बचावत होती, आणि असे सिद्ध करीत होती की शहरातील चौकांमध्ये सगळ्या मोटारी समोरासमोर येऊन एकमेकांवर आदळून चक्काचूर होत नाहीत. याचे कारण पोलिसांचे रहदारी - नियंत्रणातील कौशल्य हे नसून लोकांना आत्मरक्षणाची हौस आहे, हेच होय. सारांश, जी प्रवृत्ती पोलिसांच्या मदतीशिवाय जंगलातील सशाचे हिंस्त्र पशूंपासून रक्षण करते अथवा शहरात पायी चालणाऱ्यांना ट्रकड्रायव्हर वावरत असतानाही जिवंत ठेवते, तीच प्रवृत्ती बैलगाड्यांच्या आक्रमणापासून जत्रेला जाणाऱ्यांचे रक्षण करीत होती.



जत्रेचा आनंद दुथडी भरून ओसंडत होता, आणि ऑल इंडिया रेडियोने जत्रेची रनिंग कॉमेंट्री दिली असती तर त्याने असे नक्कीच सिद्ध करून दाखविले असते की पंचवार्षिक योजनांमुळे लोक अत्यंत सुखात असून ते एकमेकांवर प्रेमाचा व आनंदाचा वर्षाव करीत जत्रेला चालले आहेत. परंतु रंगनाथाला या गावात येऊन जवळजवळ दीड महिना झाला होता. एव्हाना त्याला निश्चित कळून चुकले होते की बनियन व चड्डी घालणारा सनीचर केवळ हसण्याच्या वैशिष्ट्यामुळे बिडला आणि डालमिया यांच्यापेक्षा मोठा ठरत नाही, कारण हसणे ही काही फार मोठी गोष्ट नाही. ज्या कोणाची पचनशक्ती चांगली असेल त्याला हसण्यासाठी नोकर म्हणून ठेवता येते, आणि हीच गोष्ट गाण्यालाही लागू होते.

रंगनाथाने जत्रेचे सूक्ष्म निरीक्षण सुरू केले आणि मग लौकरच त्या उत्साहाचे बिंग फुटले. थंडी सुरू झाली असूनही त्याला कोणाच्याही अंगावर लोकरीचा कोट दिसला नाही. क्वचित् एखाद्या मुलाच्या अंगात फाटका स्वेटर दिसत होता. बायका भडक रंगाच्या परंतु स्वस्त, रेशमी साड्या नेसून आल्या होत्या. अनेकजणी अनवाणीच होत्या. पुरूषांच्या बाबतीत तर बोलावयास नकोच. हिंदी माणूस सदा अर्धनग्नच असावयाचा !

हे सारे पाहाणे आणि समजून घेणे यापेक्षा पुरातत्त्वशास्त्राचा अभ्यास करणे हा जास्त सुंदर व्यवसाय आहे, असा विचार त्याच्या चिडलेल्या मनात येऊन गेला, आणि त्याने रूप्पनबाबूंकडे मान वळविली.

रूप्पनबाबूंनी आरडा-ओरडा करून तीन सायकलस्वारांना खाली उतरावयास लावले. गर्दीतून एका बाजूला होऊन रस्त्याच्या कडेला आपापल्या सायकली हातात धरून ते उभे राहिले. त्या तिघांपैकी जो सरदारासारखा किंवा पुढाऱ्यासारखा दिसत होता त्याने डोकीवरील विटलेली हॅट काढून तिने तो वारा घेऊ लागला. थंडी असूनही त्याच्या कपाळावर घाम आला होता. त्याने हाफपँट, शर्ट व उघड्या गळ्याचा कोट घातला होता. पोटाच्या ढेरीवरून हाफपँट खाली घसरू नये म्हणून त्याने ती पट्ट्याने जाम आवळून टाकली होती. त्यामुळे पोटाचे क्षेत्रफळ जवळजवळ दोन समान भागांत विभागले गेले होते. या सरदाराचे दोन्ही साथीदार धोतर, टोपी घातलेले होते. त्यांच्या एकूण अवतारावरून ते असभ्य असावेत असे वाटत होते. तरीपण आपल्या सरदाराशी ते मोठ्या अदबीने वागत होते.

''काय साहेब, आजच्या जत्रेत तुमची चंगळ असणार, नाही ? पैसाच पैसा.'' रूप्पनबाबूंनी हसून त्या सरदाराला उद्देशून म्हटले. त्याने डोळे किलकिले करून मान हलवीत समजदारपणे म्हटले, ''असेल ! पण आता पैशाला काही किंमतच उरलेली नाही, रूप्पनबाबू.''

रूप्पनबाबूंनी त्या इसमाशी आणखी काही गप्पागोष्टी केल्या. त्याचा संबंध मिठायांशी, विशेषतः खव्याशी होता. त्या गृहस्थाने अचानक रूप्पनबाबूंचे बोलणे ऐकणे बंद केले आणि तो म्हणाला, ''थांबा रूप्पनबाबू !'' एवढे बोलून त्याने आपली सायकल आपल्या एका सहकाऱ्याकडे दिली, हॅट दुसऱ्याच्या हवाली केली आणि लांब-लांब ढांगा टाकीत, वाकडा-तिकडा चालत तो जवळच्या तुरीच्या शेतात घुसला. शेतामधून जाणाऱ्या पायवाटेने अनेक लोक जात-येत होते, आणि तुरीची झाडे फारशी दाट नव्हती. पण त्याकडे मुळीच लक्ष न देता तो धडपड करू लागला. मोठ्या मुष्किलीने त्याने कोटाची व सदऱ्याची बटने काढून आतून जानवे बाहेर खेचले. ते जास्त बाहेर आले नाही. म्हणून त्याने आपली मानच एका बाजूला झुकविली आणि कसाबसा जानव्याचा एक भाग कानात अडकविला. नंतर आवळून नेसलेल्या हाफपँटशी खेचाखेची करीत, कसेबसे गुडघ्यात वाकून तो त्या तुरीच्या शेतात पाण्याची धार सोडू लागला.

या हॅटवाल्या इसमाचे नाव 'सिंहसाहेब' आहे, ही माहिती एव्हाना रंगनाथाला मिळाली होती. ते या विभागाचे सॅनिटरी इन्स्पेक्टर असून त्यांची सायकल धरून उभा असलेला गृहस्थ जिल्हा बोर्डाचा मेंबर आहे आणि हॅट धरून उभा असलेला इसम त्याच बोर्डाचा टॅक्स कलेक्टर आहे. हेही त्याला समजले होते.

इन्स्पेक्टर साहेब परत आल्यावर बराच वेळ गप्पा गोष्टी होत राहिल्या. परंतु त्यांचा विषय आता मिठाई हा नसून जिल्हा बोर्डाचे चेअरमन, इन्स्पेक्टर साहेबांची रिटायरमेंट आणि 'दिवस फार वाईट आलेत,' हा होता.

जोगनाथावर पोलिसांची नजर पडली होती आणि बहुदा ती तेथेच स्थिरावलीही होती. आपल्याकडे गुन्हेगारांवर पोलिसांची नजर बहुदा पहिल्या दृष्टिक्षेपात प्रेम करण्याच्या इराद्यानेच पडत असते. एखाद्या ठिकाणी दरवडा पडल्यास दहा दिवसपर्यंत सारे काही सामसूम असते, आणि अकराव्या दिवशी अकस्मात कोणाला तरी पकडून, त्याला चीत करून त्याच्या चेहऱ्यावर पहिल्या चुंबनाप्रमाणे 'डाकू' हा शब्द डागण्यात येतो. परंतु जोगनाथ हा वैद्यजींचा माणूस समजला जात असल्यामुळे गयादीनच्या घरी झालेल्या चोरीच्या बाबतीत पोलिसांनी त्याच्या संबंधात ही शैली स्वीकारली नव्हती. उलट आमच्या चित्रपटातील अविवाहित हीरो आपल्या शेजाऱ्याच्या मुलीला जाळ्यात अडकविण्यासाठी तिच्या घराभोवती जसा चकरा मारतो तसे पोलिस जोगनाथाभोवती घिरट्या घालीत होते. म्हणजे असे की, त्यांचा मार्ग बलात्काराचा नव्हता किंवा



पहिल्या दृष्टिक्षेपात प्रेम करून बसण्याचाही नव्हता. तर मोठ्या हुशारीने, हृदयपरिवर्तनाच्या द्वारे, गुन्हेगाराकडून गुन्हा कबूल करवून त्याचे मनगट पकडण्याचा होता.

म्हणूनच आज जोगनाथ रूप्पनबाबूंबरोबर जत्रेला आला होता. आपण एकटेच राहिलो तर पोलिस आपल्याला छेडतील आणि कदाचित् एकदम प्रेमाने मिठी मारतील अशी भीती त्याला वाटत होती.

ही सारी मंडळी नटून-थटून जत्रेला आली होती. रूप्पनबाबूंनी सदऱ्याच्या कॉलरखाली अगदी नवा कोरा रेशमी रूमाल बांधला होता आणि केवळ सौंदर्यवृध्दीच्या उद्देशाने डोळ्यावर काळा चष्मा चढविला होता. सनीचरने चड्डीवर घरी विणलेली जाळीदार सुती बनियन घातली होती. ती चड्डीपर्यंत पोचत नव्हती. दीड इंच वरच संपली हाती. छोटू पहिलवानाने आज लंगोट्याची पट्टी हत्तीच्या सोंडेसारखी लोंबकळत सोडली नव्हती. उलट ती इतकी आवळून मागे नेऊन बांधली होती की पट्टीचे ते दुसरे टोक, लंगोटाच्या फाटून चिंध्या झाल्या तरी शेपटीप्रमाणे चिकटून राहिले असते. एवढेच नव्हे तर त्याने आज अंगात बनियन न घालता एक पारदर्शक सदरा घातला होता आणि तसाच एक पारदर्शक टॉवेल लुंगीप्रमाणे गुंडाळला होता.

जोगनाथ रूप्पनबाबूंच्या अंगाला अंग घासून चालला होता. तो एक हडकुळा तरूण होता. ज्या दिवशी गावात चोर आले होते. त्या दिवसापासून लोक जोगनाथाकडे वेगळ्या नजरेने पाहू लागले होते. गयादीनच्या घरी चोरी झाल्यापासून आपल्याला पूर्वीपेक्षा जास्त मान मिळत आहे, असे जोगनाथाला वाटत होते. आंबराईमध्ये गुराखी कवड्यांनी जुगार खेळत असत. तेथे जोगनाथ जाऊन पोचला की ते त्याची नजर चुकवून आपले पैसे आधी कनवटीला लावीत आणि मग त्याला बसायला सांगत. बाबू रामाधीनांच्या दारातील भांगपार्टीत जोगनाथाच्या पाठीवर अनेक प्रेमळ हात फिरू लागले होते.

फ्लशच्या खेळात शिवपालगंजमध्ये जोगनाथाचा हात धरणारा कोणी नव्हता. एकदा नुसत्या 'पेयर'वर त्याने खन्ना मास्टरांची ट्रेल उडवून दिली होती. त्या दिवसापासून जोगनाथाचा दरारा असा काही बसला की त्याच्या हातात तीन पत्ते पडताच मी-मी म्हणणारे खेळाडू आपले पत्ते पाहण्याचे विसरून त्याच्याच तोंडाकडे पाहू लागत. त्याने पहिला डाव मांडला रे मांडला की निम्म्याहून अधिक खेळाडू घाबरून आपले पत्ते फेकून देत. असे म्हणतात की राणा प्रतापाचा घोडा चेतक मुगल सैन्याच्या ज्या भागात प्रवेश करी तेथील सैनिकांची पांगपांग होऊन त्याला जागा करून दिली जाई आणि मुगल सैनिक पाठीला पाय लावून वाट फुटेल तिकडे पळून जात. हीच स्थिती जोगनाथाच्या डावाची होती. त्याचा डाव मैदानात उतरताच पळापळ सुरू होई.

परंतु गयादीनच्या घरी चोरी झाल्यापासून वातावरण पार बदलून गेले होते. आता जोगनाथ दिसताच लोक फ्लशच्या दुष्परिणामांसंबंधी बोलू लागत. जे जुगारी पूर्वी त्याला पाहाताच हीरोप्रमाणे त्याचे स्वागत करीत आणि जेवण-खाण विसरून त्याच्याबरोबर खेळत बसत तेच आता अचानक मोठ्या जबाबदारीचा आव आणून बाजारात जाण्याची, गवत कापून आणण्याची अथवा म्हशीची धार काढण्याची आठवण झाल्याचे दाखवीत.

या परिस्थितीने जोगनाथ वैतागून गेला. अलिकडेच काही दिवसांपूर्वी फौजदारांनी त्याला पोलिस ठाण्यावर बोलावून नेले होते. तो आपल्याबरोबर रूप्पनबाबूंनाही घेऊन आला होता. फौजदारसाहेब म्हणाले, ''रूप्पनबाबू, जनतेच्या सहकार्याशिवाय काही होणार नाही.''

त्यांनी गंभीरपणे समजावले होते, ''गयादीनांच्या घरच्या चोरीचा काहीच थांगपत्ता लागत नाही. जोपर्यंत तुम्ही मंडळी सहकार्य करणार नाही तोपर्यंत काहीच सुगावा लागणार नाही —''

रूप्पनबाबू म्हणाले, ''आमचं संपूर्ण सहकार्य आहे. खात्री वाटत नसेल तर कॉलेजच्या कुणाही विद्यार्थ्याला पकडून बघा.''

फौजदारसाहेब थोडावेळ येरझाऱ्या घालत राहिले. नंतर म्हणाले, ''विलायतेतली पद्धत या बाबतीत सर्वांना उत्कृष्ट आहे. ऐंशी टक्के गुन्हेगार आपण होऊन आपला गुन्हा कबूल करतात. अन् आमच्या इथं —'' एवढे बोलून ते थांबले;

आणि टक लावून जोगनाथकडे पाहू लागले. फ्लशच्या खेळात ब्लफ करताना वापरण्याची आपली धारदार नजर रोखून जोगनाथनेही फौजदारांकडे पाहिले.

उत्तर दिले रूप्पनबाबूंनी. ते म्हणाले, ''विलायतेतल्या गोष्टी इथं सांगू नका. ऐंशी टक्के लोक आपापला गुन्हा कबूल करू लागले तर उद्या तुमच्या चौकीतल्या दहा शिपायांपैकी ड्यूटी द्यायला फक्त दोनच उरतील. बाकीचे तुरूंगात जातील.''

सारांश, थट्टामस्करीतच सारी चर्चा संपली होती. जोगनाथाला फौजदारांनी का बोलावून घेतले होते याचा काही नीट उलगडा झाला नव्हता. त्याचाच उल्लेख करून रूप्पनबाबू रूबाबात म्हणाले, ''जोगनाथ, असं मेलेल्या वटवाघळासारखं मान खाली घालून चालल्यानं काय होणार ? जिवाची चैन कर. फौजदार म्हणजे काही लांडगा नव्हे. तो तुला खाणार थोडाच ?''

परंतु छोटू पहिलवान चिडून म्हणाला, ''आमचा आपला सरधोपट हिशेब आहे. इकडून आग खाल्लीत तर तिकडून निखारे बाहेर पडतील. जोगनाथ काही वैद्यजींचा सल्ला घेऊन गयादीनच्या घरात उतरले नव्हते. तर मग आता त्यांच्या आधारावर का झुलताहेत ?''



याला विरोध करण्यासाठी जोगनाथाने काहीतरी उत्तर दिले; परंतु त्याचवेळी त्यांच्या मागच्या बाजूने एक बैलगाडी खडखड करीत निघून गेली. रंगनाथ चेहऱ्यावरील धूळ पुसू लागला. छोटू पहिलवानाने डोळ्याची पापणीही लववली नाही.. भगवद्गीता ऐकून ज्या भावनेने अर्जुन अठरा दिवस कुरूक्षेत्राची धूळ चाखत राहिला होता त्याच भावनेने छोटू पहिलवानाने बैलगाडीमुळे उडालेली सगळी धूळ पोटात घातली. नंतर बेपर्वाईने तो म्हणाला, ''सच्ची बात आणि गाढवाची लाथ सहन करणारे फार थोडे असतात. जोगनाथांच्या बाबतीत गावभर जी कुजबुज चालू आहे तीच आम्ही स्पष्टपणे सांगून टाकली. यात भांडणाचा काय प्रश्न ?''

सनीचरला वाटले आपण शांतता प्रस्थापित करावी. सरपंच होण्याच्या आशेने तो आतापासूनच वैद्यजींच्या शाश्वत सत्य सांगून टांगण्याच्या शैलीच्या अभ्यास करू लागला होता. तो म्हणाला, ''आपसांत कुत्र्यासारखं भुंकणं बरोबर नाही. सारं जग जोगनाथाला वाटेल ते म्हणो, आपण त्याला एकदा भला म्हटलय ते म्हटलय. मर्दकी जबान एक की दो ?''

छोटू पहिलवान तुच्छतेने म्हणाला, ''म्हणजे तू मर्द आहेस तर ?''

रस्त्यात त्यांना लंगडा दिसला. रंगनाथ म्हणाला, ''हा इथंही येऊन पोचला.''

लंगडा एका कांगोणीच्या झुडुपाखाली टॉवेल अंथरून बसला होता. तो विश्रांती घेत होता आणि तोंडातल्या तोंडात काही तरी पुटपुटत होता. सनीचर म्हणाला, ''लंगड्याचं काय ? मनात येईल तिथं मुक्काम ठोकणार. मनमौजी माणूस आहे.''

छोटू पहिलवान आपल्या प्रसिद्ध वृत्तपत्रीय पोजमध्ये उभा होता. हा त्याचा फोटो वर्तमानपत्रात छापला गेला असता तर त्याच्या आधारे तो आपल्या सर्वात खऱ्या स्वरूपात वाचकांपर्यंत जाऊन पोचला असता. परमोच्च सुखाच्या तंद्रीत खालचा ओठ पसरून, दात विचकावून, डोळे किलकिले करून तो आपल्या जांघेचा मुळाजवळचा भाग अत्यंत तन्मयतेने खाजवीत होता. लंगड्यामुळे या परमानंदात बहुदा अडथळा निर्माण झाला असावा. तो चिडून म्हणाला, ''मनमौजी ? साला सुळावर चढून बसलाय. परवा मामलेदारांशी हमरी-तुमरी करून आलाय. मौज कुठून करणार हा ?''

ते सगळेजण जवळून जाऊ लागले. रूप्पन जोरात म्हणाले, ''काय लंगडे मास्टर, कसं काय ? नक्कल मिळाली ?''

लंगड्याने पुटपुटणे थांबवले. डोळ्यांवर तळहाताचा सज्जा बनवून त्याने उन्हात रूप्पनबाबूंना ओळखले. तो म्हणाला, ''कुठली मिळतीय, बापू ? इकडे या रस्त्यानं

नकलेसाठी केलेला अर्ज जिल्हाकचेरीत गेला आणि तिकडे त्या रस्त्यानं फाईल इकडे परत आली. आता पुनः पंधरा दिवसांची राखण लागली.''

सनीचर म्हणाला, ''तू मामलेदारांशी हमरी-तुमरीवर येऊन भांडलास म्हणे !''

''कसलं भांडण, बापू !'' लंगड्याचे ओठ पुनः काहीतरी बडबडण्याच्या तयारीने थरथरले, ''जिथं कायद्याचा मुद्दा असेल तिथं हमरी-तुमरी करून काय फायदा ?''

छोटू पहिलवानाने त्याच्याकडे तिरस्काराने पाहिले; आणि मग जणू झाडा- झुडुपांना उद्देशून तो म्हणाला, बोलाचा भात आणि बोलाची कढी. त्याचा काय फायदा ? साला नक्कल कारकुनाच्या डोंबलावर पाच रूपये का घालत नाही ?''

''छोटू भैया, तुला ते समजायचं नाही. हा तत्त्वाचा मुद्दा आहे.'' रंगनाथने त्याला समजावले.

छोटू पहिलवानाने आपल्या भक्कम खांद्यावरून एकदा उगीचच नजर फिरविली आणि म्हटले, ''असं आहे तर मग घालत बैस हेलपाटे !''

## १३

छोटू पहिलवान म्हणाला, ''आम्हांला दर्शन-बिर्शन घ्यायचं नाही. आम्ही फक्त लाल लंगोटेवाल्याचे गुलाम आहोत. त्याच्या खेरीज इतर देवदेवतांना आम्ही भुसा समजतो.''

आधी देवळात जाऊन देवीचे दर्शन घेऊन येण्यासंबंधी वादविवाद चालला होता. छोटूच्या या उद्‌गारांना कोणी काही उत्तर दिले नाही. त्याची समजूत घालण्याचा कोणी प्रयत्न केला नाही. सर्वजण जाणून होते की त्याला समजावण्याचा एकमेव उपाय म्हणजे त्याला जमिनीवर उताणा पाडून त्याच्या छातीवर बसायचे आणि त्याचे हाडे मोडून टाकायची. तिकडे छोटूने आपण नास्तिक नाही हे दाखविण्यासाठी उभे राहून आपल्या मांड्यांवर ढोलकीसारखा आवाज काढण्यास सुरूवात केली. एवढ्याने आपली आस्तिकता सिद्ध झाली नाही, असे वाटून तो एक गाणे गुणगुणू लागला.

बजरंगबली, मेरी नाव चली, जरा बल्ली कृपा की लगा देना । (हे बजरंगबली, माझी नाव निघाली, तू आपल्या कृपेचे वल्हे जरा चालव.)



मिठाईच्या दुकानाकडे बोट दाखवून तो म्हणाला, ''मी तिथं जाऊन तोपर्यंत पोटपूजा करतो. तुम्ही तिथंच या.'' मग जणू स्वतःशीच तो म्हणाला, ''सकाळपासून तोंडाला लगाम घालून फिरतोय. पोटात साले कावळे कोकलताहेत.''

रंगनाथाला असे सांगण्यात आले होते की हे देऊळ सत्ययुगात बांधलेले आहे. त्यामुळे एखाद्या शिलाखंडावर आपल्याला ब्राम्ही अक्षरे वाचावयास मिळतील अशी कल्पना करून तो चालला होता. परंतु ते मंदिर दुरून पाहाताच आपले देशबांधव काळाच्या बाबतीत अनादि आणि अनंत हे दोनच अचूक शब्द जाणतात याविषयी त्याची खात्री पटली. शिवाय सुमारे पंचाहत्तर वर्षापूर्वीच्या मंदिराला ते सहजासहजी गुप्तकालात किंवा मौर्यकालात ढकलू शकतात, हेही त्याला समजले.

देवळाच्या भिंतींवरील वेलबुट्ट्यांमध्ये पुढील मजकूर लिहिला होता :- ''बनवाया मंडप महिषासुरमर्दिनी का मुसम्मे इकबाल बहादुर सिंह वल्द नरेंद्र बहादुरसिंह तखत भीखापुर ने मिती कार्तिक बदी दसमी संवत १९५० विक्रमी को ।'' (कार्तिक वद्य १०, विक्रम संवत् १९५० रोजी भीखापुरच्या इकबाल बहादुरसिंह नरेंद्रबहादुरसिंह यांनी हा महिषासुरमर्दिनीचा मंडप बांधला.) हा शिलालेख वाचताच रंगनाथाचा सारा पुरातत्व-उत्साह थंड पडला.

भीखापूरचे सिंहासन (तख्त) हे साताऱ्याच्या किंवा पुण्याच्या गादीसारखे होते, असे समजण्याचे कारण नाही. अवधच्या लाखो जमीनदारांच्या घरी अशा प्रकारची असंख्य मोडकी-तोडकी सिंहासने पडलेली असत. त्यांवर बसून ते आपल्या प्रजेचे म्हणजे दोन-चार कुळांचे सलाम होळीला किंवा दसऱ्याला स्वीकारीत असत. मंदिरावर खर्च होणाऱ्या रकमेचा अंदाज घेऊन हे सिंहासनही अशाच लाखो सिंहासनांपैकी एक असले पाहिजे हे रंगनाथाने ओळखले. मंदिराची इमारतही सिंहासनासारखीच होती. एक खोली होती व तिला एकच दार होते. आतील भिंतीमध्ये सगळीकडे वॉर्डरोबसारखे मोठे कोनाडे होते. त्यात नाना प्रकारच्या देवांच्या राहाण्याची सोय करण्यात आली होती.

दरवाजातून आत जाताच समोरच्या वॉर्डरोबमध्ये ज्या मूर्ती दिसत त्यातच देवीची मुख्य प्रतिमाही होती. ती मात्र खरोखरीच एक प्राचीन मूर्ती होती.

ज्याप्रमाणे रणांगणामध्ये 'धडाम' असा आवाज कानांवर पडताच शिपाई जमिनीवर पालथे पडतात. त्याप्रमाणे मंदिरात शिरताच जोगनाथाने साष्टांग नमस्कार घातला. नंतर चवड्यांवर बसून त्याने अत्यंत सद्‌गदित स्वरात एक भजन गाण्यास सुरूवात केली. त्या गाण्याचे शब्द काही समजले नाहीत. परंतु तो रडत नसून गात आहे, एवढे मात्र लक्षात आले. जोगनाथाचा हा भावोन्माद गांजाच्या चिलमीतून अथवा दारूच्या

बाटलीतून निर्माण झालेला नव्हता. त्याच्या मुळाशी फक्त पोलिसांचे भय होते. ते कसेही असो. तो इतका स्पष्ट होता की आसपासचे दोन-चार लोक आपापले भजन विसरून त्याचे भजन ऐकू लागले.

सनीचरलाही सरपंच बनायचे होते. म्हणून तोही गाभाऱ्याच्या मधोमध मांडी घालून कसाबसा बसला आणि 'जगदंबिके,' 'जगदंबिके' असा घोष करू लागला. मंडपात जत्रेची भयंकर गर्दी होती आणि कोणाला कोणाचे बोलणे ऐकू येत नव्हते. परंतु एखाद्या ठिकाणी गेल्यावर आपल्या आडमुठेपणाचा दरारा तेथील लोकांवर न बसवील तो शिवपालगंजचा इसमच कसला ! इतर लोक सनीचरपासून थोड्या अंतरावर उभे राहिले. तिकडे रूप्पनबाबूंनीही डोके मिटले आणि झटकन एखादे वरदान मागून त्यांनी एकदम आपले डोके उघडले. त्यानंतर त्यांनी तेथूनच जत्रा पाहाण्यास सुरूवात केली. त्यांच्याशेजारीच एक मुलगी एका मूर्तीसमोर वाकून काहीतरी पुटपुटत होती. रूप्पनबाबूंनी आपली अशी समजूत करून घेतली की खरी जत्रा हीच आहे.

रंगनाथ हात जोडून सरळ मुख्य मूर्तीजवळ गेला. त्याने मूर्तीकडे पाहिले आणि तो पाहातच राहिला.

प्राचीन मूर्तिकलेविषयी त्याने जे काही वाचले होते ते त्याला अगदीच निरर्थक वाटू लागले. तो मनाशी म्हणाला, हीच देवीची मूर्ती असेल तर आतापर्यंत आपण खजूराहोस, भुवनेश्वराला अथवा वेरूळच्या कैलास मंदिरात ज्या मूर्ती पाहिल्या होत्या त्या काय होत्या ?

त्याने एक वेळ डोळे मिटून, संपूर्ण ताकद लावून, आपण वाचलेले सारे काही विसरून जाण्याच्या प्रयत्न केला. तो मनातल्या मनात ओरडू लागला, "वाचवा, वाचवा ! माझ्या भक्तीवर बुद्धीचा हल्ला होत आहे. मला वाचवा !" परंतु जेव्हा त्याने डोळे उघडले तेव्हा आपली भक्ती पसार झाली असून इतिहासाची पोपटपंची आपल्याला गदगदा हलवीत आहे, असे त्याला आढळून आले.

खरी गोष्ट अशी होती की या मूर्तीची घडण नव्या धर्तीची होती. तिच्या मस्तकावर सैनिकांच्या सारखे शिरस्त्राण होते, मानेच्या खाली रूंद व सपाट छाती होती, छातीच्या खालच्या भाग गडप झालेला होता. ते लोक भक्तिभावनेने नव्हे तर इंग्रजी इतिहास-लेखकांच्या पुस्तकांच्या आधारे या मंदिरात आले असतील ते फक्त एवढेच म्हणू शकले असते की, "या मूर्तीचा जेवढा भाग आम्हांला पाहावयास मिळाला त्यावरून ही सुमारे बाराव्या शतकातील एखाद्या शिपायाची मूर्ती आहे, असे जाहीर करण्यास आम्हाला मुळीच संकोच वाटत नाही."

आपल्या देशातील मूर्तिकलेसंबंधी इतर वाटेल ते अभिप्राय व्यक्त करता येतील. परंतु या मूर्तीमध्ये लिंगभेदाची काही भानगड असते, अशी तक्रार मात्र कोणीही करू शकणार नाही. आखूड केस कापून, शर्ट-पँट घालून, गोल्फच्या मैदानात फिरणाऱ्या स्त्रियांच्या बाबतीत आपला लिंगविषयक घोटाळा होऊ शकतो, परंतु येथे प्राचीन स्त्री मूर्तीच्या बाबतीत तसे होण्याची शक्यता नाही. पुराणवस्तु संशोधन शास्त्राच्या विद्यार्थ्यांना मानेखाली दोन उंच-उंच डोंगर पाहाण्याची सवय पडून गेलेली असते. तेथून थोडे खाली गेले की हे डोंगर दिशा बदलून मागल्या बाजूला जातात. हे सर्व समजण्याची दिव्यदृष्टी पुरातत्त्वाच्या मठ्ठातल्या मठ्ठ विद्यार्थ्यालाही प्राप्त होते. तो बौद्ध विहाराला गोपुरम् आणि गोपुराला स्तूप समजण्याची चूक करत असला तरी स्त्री-मूर्तीला पुरूषमूर्ती समजण्याची चूक त्याच्याकडून व्हावयाची नाही.



रंगनाथाने पुजाऱ्याला विचारले, "ही कोणत्या देवतेची मूर्ती आहे ?"

पुजारी कामाच्या गडबडीत होता. तो एकदम वसकन् ओरडून म्हणाला, "खिशातनं काहीतरी काढून देवापुढं ठेव म्हणजे आपोआप ही देवता कोणती आहे ते कळेल."

रंगनाथाने जिज्ञासेने पुढे होऊन मूर्तीच्या गळ्याला हात लावला. पुजाऱ्याने त्याच्याकडे साशंक नजरेने पाहिले आणि मग सुशिक्षित इसमाप्रमाणे तो म्हणाला, "मूर्तीला शिवण्याची सक्त मनाई आहे."

ती तरूणी दर्शन करून बाहेर निघून गेली होती. रूप्पनबाबूंच्या लेखी जत्रा संपली होती. त्यांनी रंगनाथाचा हात ओढत म्हटले, "दर्शन झालं ना. चल, आता बाहेर जाऊ."

इतिहास हा सर्वांत मोठा मूर्तिभंजक आहे. तोच आता रंगनाथाच्या मेंदूत घुसून म्हणाला, "दर्शनाचं काय घेऊन बसलात ? ही मूर्ती मुळी देवीची नाहीच."

हे ऐकताच तिघेही शिवपालगंजकर रंगनाथाभोवती गोळा झाले. इतर दोन-चार लोक चमकून त्याच्याकडे पाहू लागले. तेव्हा एखाद्या म्यूझियमच्या असिस्टंट क्यूरेटरप्रमाणे रंगनाथाने रूप्पनबाबूंना समजावून सांगितले, "पाहा ना ! ही तर उघड-उघड एखाद्या शिपायाची मूर्ती आहे. हे पाहा, हे शिरस्त्राण. हा पाहा, मागच्या बाजूनं वर आलेला बाणांचा भाता. अन् ही पाहा छाती. अगदी सपाट...."

रंगनाथ शिपायाच्या वीरतापूर्ण वक्षस्थळाचे संपूर्ण वर्णन करू शकला नाही. त्याचे वाक्य पूर्ण होण्याआधीच पुजाऱ्याने उसळून त्याला धक्का दिला आणि तो कसलाही प्रयत्न न करिता गर्दीतून तीरासारखा दारापर्यंत जाऊन पोचला.

इकडे पुजारी पूजा करविण्याचा व पैसे गोळा करण्याचा आपला धंदा थांबवून बेंबीच्या देठापासून रंगनाथाला इरसाल शिव्या देऊ लागला. त्याचे तोंड एवढेसे होते पण त्यातून जाडजूड शिव्या एकमेकींना मागे टाकीत मोडक्या-मोडक्या स्थितीत बाहेर येऊन कोसळू लागल्या. थोड्याच वेळात देऊळ शिव्यांनी भरून गेले. कारण

भक्तांनीही पुजाऱ्याच्या वतीने शिव्यांचे उत्पादन सुरू केले होते.

शिवपालगंज़वाले अगदी थक्क होऊन मंदिराबाहेर आले. पुजारी दारात येऊन ओरडत होता, "मी तर त्याचा अवतार बघूनच तो ख्रिश्चन आहे, हे ओळखलं होतं. विलायती अवलाद. चार बुकं वाचली नाहीत तर लागला सांगायला की ही देवीच नाही म्हणून. चार दिवसांनी हा सांगणार की आमचे बाप आमचे बापच नाहीत."

सनीचर आणि जोगनाथ यांच्या डोक्यांत ती सारी घटना शिरलीच नव्हती. तरी देखील ते हातपाय हलवून आरडाओरडा करू लागले. एवढ्यात रूप्पनबाबूंची व्यावहारिक बुद्धी परत आली. त्यांनी रंगनाथाचा हात धरून म्हटले, "चल बाबा !" नंतर पुजाऱ्याकडे पाहून वरच्या पट्टीत परंतु थंडपणे ते म्हणाले, "हे पाहा भटजी महाराज, जत्रा-बित्रा असली की जादा दम मारत जाऊ नका. तुमचं वय आता उतरतीला लागलंय. गांजा मेंदूवर चढून बसतो."

यावर काहीतरी खरमरीत उत्तर देण्यासाठी पुजाऱ्याने आपले तोंड उघडले. इतक्यात रूप्पनबाबू पुनः म्हणाले, "बस, बस ! बस ! फार झालं. जादा आगाऊपणा करू नका. आम्ही शिवपालगंजचे लोक आहोत. आपली जीभ वारूळात बंद करून ठेवा."

थोड्या अंतरावर गेल्यानंतर रंगनाथ म्हणाला, "चूक माझीच होती. मी काही बोलायला नको होतं."

रूप्पनबाबू त्याचे सांत्वन करीत म्हणाले, "ते खरं आहे. पण खरी चूक तुझी नसून तुझ्या शिक्षणाची आहे."

सनीचरही म्हणाला, "माणूस शिकला की सुशिक्षितांसारखा बोलू लागतो. बोलण्याची खरी धाटणी विसरून जातो. काय खरं की नाही जोगनाथ ?"

जोगनाथाने काही उत्तर दिले नाही. कारण एव्हाना तो गर्दीत घुसून तरण्याताठ्या पोरींना धक्के मारण्यात दंग झाला होता आणि त्याच्या चेहऱ्यावरून तो त्याच कार्यात मग्न राहू इच्छित होता, असे दिसत होते.

रूप्पनबाबू सिंहसाहेबांजवळ येऊन उभे राहिले. सिंहसाहेबांच्या चेहऱ्यावर चार-पाच दिवसांची वाढलेली दाढी होती. ओठांच्या कोपऱ्यांतून तंबाखूची पिंक खाली ओघळू पाहात होती. एवढे सर्व असूनही फक्त सोला हॅटमुळे ते पुष्कळच स्मार्ट दिसत होते.

रूप्पनबाबूंनी म्हटले, "कसं काय सिंहसाहेब ? काय रंग आहे ?"

"रंग बेरंग आहे, भाई ! दहा-दहा खटले भरावे लागलेत. आता रूप्पनबाबू, या वयात आमचे हाल आहेत. साक्ष देण्यासाठी कोर्टाच्या फेऱ्या करता-करता पाय सोलून



निघतील."

लोकांच्या गलबलाटाला आपल्या आवाजाने दाबून टाकत रूप्पनबाबू म्हणाले, "अहो खटल्यांचा काय उपयोग, सिंहसाहेब ? दहा-पाच रूपये घेऊन दाबादाबी करून टाका झालं."

सिंहसाहेबांनीही आपला आवाज तसाच चढवून म्हटले, "इथं कोण साला दहा-पाच रूपये द्यायला बसलाय ? तिकडे त्या भेळ-पुरी-मिठाईवाल्यांना धरलं तर साले फक्त दोन-दोन रूपये टिकवायला तयार झाले. मग आम्हीही म्हटलं, तुम्हाला खटलाच हवा असेल तर घ्या लेको !"

रूप्पनबाबूंनी हात वर करून विचारले, "कुठले आहेत ते फेरीवाले ? फारच अडाणी दिसतात !"

एक जाडजूड, दांडगेश्वर त्यांच्या समोरच उभा होत. दिसायला मोठा रूबाबदार होता. पण तो बोलल्यावर मात्र ते एक भले मोठे सडलेले कलिंगड असावे असा भास झाला. रडक्या आवाजात तो म्हणाला, "रोहूपुरवाले आहोत, बाबूसाहेब ! इतका वेळ निस्पिट्टर साहेबांची खुशामत करून राहिलो आहोत. पण हे दर हाऱ्याला दहा रूपये हा आपला दर कमी करायला तयारच होत नाहीत."

रूप्पनबाबू म्हणाले, "जाऊ द्या हो सिंहसाहेब, दोन रूपये दरानंही वीस रूपये होतील. काय वाईट आहे ? असा काय गहू विकलाय तुम्ही ?"

तेथूनच घसा खरवडून सिंहसाहेब ओरडले, "दोन रूपये ?" आणि हंसून म्हणाले, "आता इतकी बेइज्जती तरी करू नका रूप्पनबाबू !"

तो लठ्ठ इसम रूप्पनबाबूंच्या सहानुभूतीने प्रोत्साहित होऊन म्हणू लागला, "बाबूसाहेब, आता आमची स्थिती तरी बघा. एक वर्षानंतर इथं हारा लावलाय. त्यातून दहा रूपये दिल्यावर आम्हांला काय उरणार ?"

रूप्पनबाबूंनी सहज मस्करी म्हणून भेळपुरीवाल्यांची बाजू घेतली होती. आता त्यांची तरफदारी करण्यात त्यांना जास्तच गंमत वाटू लागली. ते तेवढ्याच जोरात म्हणाले, "खरं आहे याचं म्हणणं. त्याला काय उरणार ? आता ऐका सिंह साहेब, अडीच रूपयांवर मामला तोडून टाका. तुमचंही नको नि त्यांचंही नको."

असे म्हणून ते त्या लठ्ठ इसमाला म्हणाले, "जा, ताबडतोब पंचवीस रूपये सिंहसाहेबांना देऊन टाक; आणि थोडी मिठाई-बिठाईही दे."

तो इसम धावतच निघाला. त्याला उद्देशून सिंहसाहेब म्हणाले, "अरे ए, मिठाई-बिठाई आणू नको." आणि ते आम जनतेला आपला मुद्दा नीट समजावून सांगू लागले, "साली मिठाई एरंडेलात बनवलीय की मोहाच्या तेलात कोण जाणे. बकरीच्या लेंडीसारखा वास येतोय तिला."

रूप्पनबाबू आणखी जवळ गेले. घरगुती गप्पागोष्टी होऊ लागल्या. त्यांनी विचारले, बंगल्याचं कुठवर आलंय ?''

ते गृहस्थ अत्यंत खिन्न स्वरात उद्गारले, ''बंगला कसला ? त्याला आता घरच म्हणा.'' असे म्हणून ते गप्प राहिले. नंतर मरगळलेल्या आवाजात ते म्हणाले, ''अर्धवटच पडलंय ते. याच स्थितीत त्याचा लिलाव करून टाकावा असा विचार मनात येतोय.''

रंगनाथ मनातल्या मनात खदखदत होता. देवळात शिव्या खाल्ल्यानंतर कुणाशी तरी जोरात भांडण करावे असे त्याला वाटत होते. तो म्हणाला, ''इतकी लाच घेत असूनही तुमचा बंगला पुरा झाला नाही ?''

सिंहसाहेबांना या प्रश्नाचा राग आला नाही. त्यांनी फक्त भिवयांच्या इशाऱ्याने रूप्पनबाबूंना विचारले की, ''हे कोण ?'' रूप्पनबाबूंनी सांगितले, ''आमचे दादा आहेत ते. आतेभाऊ. त्यांच्या बोलण्याचा राग मानू नका. जरा जादा शिकलेले आहेत; त्यामुळं कधी-कधी वेडंवाकडं बोलतात.'' आणि मग आश्वासन देत म्हणाले, ''तरीपण काळजीचं कारण नाही. कसेही असले तरी घरचेच आहेत.''

रंगनाथाने ओठ दाबले आणि एक निःश्वास सोडला. सिंहसाहेब त्याला समजावून सांगू लागले, ''गेले ते दिवस भैया ! बंगला उभारायचे दिवस आता उरले नाहीत. लाचेच्या जोरावर आता बंगला बांधता येत नाही. घरावरचं छप्पर शाबूत राहिलं म्हणजे मिळविली. आता हा रेट कसा घसरत चाललाय ते तुम्ही पाहातच आहात. दहा-दहा खटल्यांचे कागद लिहून हात झिजले; आणि मिळालं काय ? बगळा मारला आणि पंख मिळाला.''

तो लठ्ठ माणूस परत आला. त्याने पंचवीस रूपयांच्या नोटा सिंहसाहेबांच्या हातांवर ठेवल्या. त्या एकेक रूपयांच्या नोटा होत्या. आपले बोलणे थांबवून त्यांनी त्या नोटा दोनदा व्यवस्थित मोजल्या. एक नोट जरा जास्त मळलेली होती ती बदलून घेतली. आणि मग सदऱ्याच्या खाली असलेल्या बंनियनच्या खिशात त्या नोटा जपून ठेवून दिल्या.

रंगनाथ त्याच्या तोंडाकडे पाहात होता. ते म्हणाले, ''पाहिली जगाची रीत ? पूर्वीच्या काळी अमुक एक लाच घेणारा अधिकारी आहे असं समजताच त्याच्या भोवती हजारो माणसं लाच द्यायला गोळा होत. ती पैसा देऊन शिवाय आपल्यावरच उपकार झाला असं मानत. आता कुणी जवळ सुद्धा फिरकत नाही. कुणी एखादा आला तरी या रूप्पनबाबूंसारख्या कुणाला तरी बरोबर घेऊन येतो. या मुर्वतीमुळं मामला बिघडून जातो.''

आणि मग रूप्पनबाबूंना समजावून सांगत ते म्हणाले, ''दिनानाथ मामलेदाराचं



काय झालं ? ठाऊक आहे तुम्हांला ? कधीतरी वैद्यजींना विचारा. चार महिने याच शिवपालगंजात येऊन बसले. कुणी एक कवडी दिली नाही. मग एके दिवशी भर कोर्टातच गरम झाले. दोन-चार वकील समोर उभे होते. त्यांना ते म्हणाले, ''भानगड तरी काय आहे ? मी पैशाला शिवत नाही असा तर लोकांचा गैरसमज झालेला नाही ना ? तसं असेल तर तुम्ही तालुक्याच्या कान्याकोपऱ्यात जाऊन जाहीर करा की मी लाच घेतो. कुणीही गैरसमज करून घेऊ नये.''

''एवढं झालं तरी लोकांना वाटलं, ही थट्टाच आहे. त्यांचा चेहराच असा होता की ते प्रामाणिक वाटायचे. त्यांना लाच हवी असेल, अशी शंका सुद्धा कुणाला यायची नाही. नंतर जेव्हा मोठमोठी मंडळी मध्ये पडली, खुद्द वैद्यजींनी चार-सहा ठिकाणी शब्द टाकला तेव्हा कुठं लोक शिफारशीच्या ऐवजी नोटा घेऊन त्यांच्याकडे येऊ लागले.''

''आता तुम्हीच सांगा रूप्पनबाबू, अशा मार्गानं पैसा कधी गोळा झालाय ? या पद्धतीनं दोन वेळचं पोट भागलं तरी पुष्कळ झालं.''

''हल्ली लाच घेणं हेही अगदी अपमानास्पद झालंय, त्यात काही रामच उरला नाही. आता लाच घेणारे आणि न घेणारे दोघेही सारखेच झालेत. सगळ्यांचीच स्थिती फार वाईट झालीय.''

आता एका टोळक्याची तीन टोळकी बनली. जोगनाथ दारूच्या गुत्त्याकडे गेला, सनीचर व छोटू पहिलवान जत्रेच्या दुसऱ्या बाजूला, जेथे ओळखीचे दोन-चार लोक भांग घोटत होते तिकडे गेले. रंगनाथ व रूप्पनबाबू बरोबर परतले.

रंगनाथ काहीसा गंभीर झाला होता. थकलाही होता. एका विहिरीच्या काठावर तो विश्रांतीसाठी बसला. रूप्पनबाबू तेथेच उभे राहून थोड्या अंतरावर होणारी तित्तर पक्ष्यांची झुंज पाहू लागले.

विहिरीपासून थोड्या अंतरावर एक पडकी इमारत होती. तेथे खांबाजवळ एक मुलगी बसली होती. गव्हाळ रंगाची तरुणी. तिने भडक रंगाची साडी नेसली होती. नाकात सोन्याची नथ. जत्रेतील गलिच्छपणाच्या पार्श्वभूमीवर रंगनाथाला हे दृश्य बरे वाटले. तो तिकडेच पाहात राहिला.

घाणेरडी लुंगी आणि चमकदार नकली सिल्कचा स्वच्छ सदरा घातलेला एक इसम त्या मुलीपासून थोड्या अंतरावर उभा राहून बिडी फुंकत होता. एका कानावर चुन्याची गोळी, केसांवर तेल चोपडलेले. हळूहळू तो त्या मुलीजवळ जाऊन उभा राहिला. नंतर जवळ - जवळ दोन हात अंतर ठेवून तो खाली बसला. तो काही तरी बोलला. त्यावर

ती मुलगी हसली. रंगनाथाला बरे वाटले. त्या मुलीने आपल्याकडेही पाहावे असे त्याला वाटले. तिने त्याच्याकडेही पाहिले. तिने पुन्हा तसेच हसावे, असे त्याला वाटले. ती पुन्हा हसली. तेलाने चपचपणाऱ्या केसांच्या त्या इसमाने दुसरी बिडी शिलगावली.

रंगनाथाजवळ एक इसम येऊन उभा राहिला. धोतर, सदरा आणि टोपी असा त्याचा पोषाख होता. खेड्याच्या दृष्टीने जबाबदार, प्रतिष्ठित असावा असे वाटत होते. रंगनाथाने त्याच्याकडे एक ओझरती नजर टाकली आणि तो समोर पाहू लागला. मुलीने स्मित करणे बंद केले होते. हिंदी सिनेमात गझल गाण्यापूर्वी हीरोइनच्या चेहऱ्यावर जसा करुणरस पसरतो तसाच काहीसा भाव तिच्या चेहऱ्यावर दिसू लागला होता.

त्या गृहस्थाने हळूच विचारले, ''तुम्ही इथलेच राहाणारे काय ?''

रंगनाथाने मान हलवून सांगितले, ''नाही.''

तो गृहस्थ निश्चिंतपणे रंगनाथाजवळ बसला, आणि म्हणाला, ''या खेडवळ लोकांना काही कळत - सवरत नाही. सिनेमाचं अमकं गाणं म्हणा, तमकं गाणं म्हणा, अशी फर्माइश करतात.''

रंगनाथ लक्ष लावून त्याचे बोलणे ऐकू लागला, पण त्याला ते काही कळलं नाही. तो गृहस्थ सांगत होता, ''तसं तुम्ही यांच्याकडून तराणा ऐका, दादरा ऐका, ठुमरी म्हणायला सांगा. अगदी प्राण पणाला लावून गातील.''

आपल्या स्वप्निल डोळ्यांत सारे रोमँटिक भाव गोळा करून तो म्हणाला, ''रोहूपुरला गेल्या होत्या, आता बैजेगावला चालल्या आहेत.''

रंगनाथाने शहरामध्ये एका संगीत सभेत रविशंकरांविषयी असेच ऐकले होते. अनाउन्सर सांगत होता, ''एडिंबरोहून नुकतेच परतले आहेत, येत्या हिवाळ्यात न्यूयॉर्कला जाणार आहेत.''

त्याने मान डोलावून त्याच्या बोलण्याला पाठिंबा दिला. आता त्याला त्या विषयाचे धागेदोरे सापडू लागले होते.

तो गृहस्थ थोडा वेळ थांबून सांगू लागला, ''उगीच वाटेनं चालता-चालता म्हणायची विद्या नाही यांची. बैठकीत या, बसून ऐका, तेव्हा समजेल, कोणतं असली अन् कोणतं नकली.''

रंगनाथाची नजर समोर होती. तेल चोपडलेल्या केसांचा तो इसम आता त्या मुलीच्या जास्तच जवळ जाऊन बसला होता. दोघे आपसात बोलत होते, हसत-खिदळत होते आणि राहून राहून रंगनाथाकडे पाहात होते. इतक्या वेळानंतर त्याला असे आढळून आले की या लोकांच्या आपल्याकडून फार मोठ्या आशा आहेत.



त्याच्या जवळ बसलेल्या या धोतर - सदरा - टोपीवाल्या इसमाला पाहून दुरून असे वाटत असावे की जणू दोन गंभीर गृहस्थ देशाच्या प्रश्नांसंबंधी गंभीर चर्चा करीत आहेत. आपल्या कपाळाला आठ्या घालून तो सांगत होता, ''नव्या कायद्यानं सारं धुळीला मिळवलं. मोठमोठे नबाबजादे गाणं ऐकण्यासाठी तळमळत आहेत. आता पोलिसठाण्यातल्या लोकांनी परवानगी दिलीय. बैठकीतलं गाणं पुनः सुरू झालंय.''

रंगनाथ उठून उभा राहिला. तो इसमही उठून म्हणाला, ''मी खुद्द हिच्यासाठी दहा वर्षं जिवाचं रान केलंय. मोरासारखा गळा आहे. तयारी म्हणाल तर शंभरजणींत उठून दिसेल अशी आहे.''

रंगनाथाने रूप्पनबाबूंकडे पाहिले. ते तित्तरांची झुंज पाहाण्यासाठी दुसरीकडे सटकले होते. त्याने त्यांना हाक मारली, ''रूप्पन !''

तो माणूस थोडा वेळ विचार करीत राहिला. नंतर म्हणाला, ''आपल्या धर्माचीच पोरगी आहे. हिंदू आहे. साधीभोळी आहे.''

नंतर गंभीरपणे, अभिमानाने सांगू लागला, ''नुसती गाते. गुणी लोकांमध्ये वावरलीय. धंदेवाली नाही.''

रंगनाथ त्या इसमाला म्हणाला, ''फार छान गोष्ट आहे. गाणाऱ्यांनी धंदा सुरू केला की गाणं बिघडतं. गायन हीही एक साधना आहे. तिच्यातच हिला राहू द्या.''

तो गृहस्थ चाचरत म्हणाला, ''तुम्हाला तर सगळं ठाऊक आहेच. तुम्हांला काय सांगायचं ? कधीतरी बैठकीला या....''

रूप्पनबाबूंना पाहाताच तो थबकला. ते अचानक मागून आले होते. ते कठोर स्वरात म्हणाले, ''जरूर येतील बैठकीला. पण तू कुणाशी बोलतो आहेस ? आपल्या बापाची तरी ओळख ठेवत जा.''

त्या इसमाने हात जोडले. त्याचा चेहरा बदलला. मवाल्याप्रमाणे हसत तो म्हणाला, ''आपला बाप म्हणजे रूपया आहे, मालक.''

रंगनाथ हसला. त्याने अर्धवट नजरेने त्या मुलीकडे पाहिले. तिचे हास्य अधिक ऐसपैस बनले होते.

ते बराच वेळ गप्प राहिले. न बोलता चालत राहिले. अखेर रूप्पनबाबूंनीच विचारले, ''काय सांगत होता तो ? अजून तिनं धंदा सुरू केलाय की नाही ?''

रंगनाथ गप्प राहिला.

''सगळीकडे बनवाबनवी. ह्या रंडीला सालीला मी लहानपणापासून बघतोय.'' एखाद्या वयस्कर माणसाप्रमाणे रूप्पनबाबू सांगू लागले, ''कित्येक वर्षांपासून नावेला कडं बांधून फिरते आहे, आणि तो तिच्या ठुमरी - दादऱ्याचा नगारा पिटतोय. म्हशीसारखा आवाज आहे, आणि आव मात्र मोठ्या वस्तादाचा आणते. या भागातली

सर्वांत रद्दी कलावंतीण आहे. कुणी तिच्याकडे ढुंकूनही पाहायला तयार नाही.''

रंगनाथ थकल्यासारखा चालत राहिला. रूप्पनबाबू सांगत होते, ''मी आलो नसतो तर तो थोडाच गप्प राहिला असता ? तुला त्यानं जवळ जवळ जाळ्यात अडकवलंच होतं.''

ते आपल्या रंगात बोलत चालले होते. अचानक रंगनाथाने विचारले, ''रूप्पन, तू बेलाला प्रेमपत्र का लिहिलंस ?''

या प्रश्नाने रूप्पनबाबूंचे व्याख्यान गडगडले. तरीपण त्यांनी स्वतःला सावरून म्हटले, ''तू इतकी वर्षं शहरात राहिलास, आणि कुणी कुणाला प्रेमपत्र का लिहितं तेही तुला माहीत नाही ?''

रंगनाथाला याचे उत्तर सुचले नाही. तो फक्त एवढेच म्हणाला, ''मामा फार रागावले होते.''

रूप्पनबाबू एकदम ताठ होऊन उभे राहिले आणि कुर्ऱ्यात म्हणाले, ''बाबांना रागवायचं कारण काय ? त्यांना म्हणावं, सरळ माझ्याशी बोला ना !''

''त्यांचं लग्न चौदाव्या वर्षी झालं होतं. पहिली आई मेली तेव्हा सतराव्या वर्षी दुसरं लग्न केलं. एक वर्षभरही एकटं राहाणं जमलं नाही. . . . हे तर झालं कायद्याप्रमाणं. बेकायदेशीरपणानं काय काय केलं. ते ऐकायचंय तुला ? —''

''मला नाही ऐकायचं.'' रंगनाथ उद्गारला.

## १४

मध्यरात्रीनंतर वैद्यजींना थंडी वाजू लागली आणि त्यांची झोप उडाली. च्यवनप्राश, सुवर्णभस्म, बदामपाक इत्यादींची संयुक्त किल्लेबंदी तोडून थंडी त्यांच्या कातड्याच्या आत घुसली आणि मांसाचे जाडजूड थर भेदून हाडांच्या मज्जेपर्यंत जाऊन पोचली. त्यांनी रजई नीट लपेटून घेण्याचा प्रयत्न केला, आणि त्याचवेळी त्यांना आठवले की एकटे झोपल्याने अंथरूणात फार गारठा राहातो. ही गोष्ट लक्षात आल्यानंतर आठवणींची जणू एक साखळीच सुरू झाली. तिचा व्यावहारिक फायदा असा झाला की



त्यांना गुंगी आली. थोडा वेळ शांतता राहिली. परंतु थोड्याच वेळानंतर पोटामध्ये वायूने क्रांती सुरू केली. ती शरीराच्या वरच्या व खालच्या भागांतून पुनः पुनः स्फोटकांच्या रूपाने बाहेर पडू लागली. त्यांनी रजई दाबून कूस बदलली आणि शेवटी क्रांतीचा अखेरचा विस्फोट ऐकून ते निद्रामग्न झाले. पाहाता-पाहाता क्रांतीची हवा कुत्रीप्रमाणे शेपटी हलवीत केवळ त्यांच्या नाकपुड्यांतून घोरण्याच्या रूपाने आत-बाहेर करू लागली. ते गाढ झोपी गेले. आता त्यांना लोकशाहीचे स्वप्न पडू लागले.

त्यांनी असे पाहिले की लोकशाही त्यांच्या पलंगाजवळ जमिनीवर चवड्यांवर बसली आहे. तिने हात जोडले आहेत. तिचे रंगरूप शेतकऱ्यासारखे आहे आणि तिला इंग्रजीच काय पण हिंदीसुद्धा शुद्ध बोलता येत नाही. तरीपण ती गयावया करीत आहे आणि तिचे ते गयावया करणे आपण ऐकत आहोत. वैद्यजी तिला पुनःपुनः पलंगावर बसायला सांगतात आणि असे समजावतात की, ''तू गरीब असलीस म्हणून काय झालं ? तू आमचीच नातेवाईक आहेस.'' पण लोकशाही त्यांना पुनःपुनः 'हुजूर' व 'सरकार' म्हणून संबोधित करते. खूप समजावल्यानंतर लोकशाही उठून त्यांच्या पलंगाच्या कोपऱ्यावर येऊन बसते, आणि तोंडातून चार शब्द काढण्याची हिम्मत तिच्यात आल्यावर ती वैद्यजींना विनंती करते की, ''माझे कपडे फाटलेत. मी नागडी-उघडी होऊन राहिलेय. अशा स्थितीत कुणासमोर जायचं म्हणजे मला लाज वाटते. म्हणून हे वैद्य महाराज, मला एक स्वच्छ पातळ नेसायला द्या.''

वैद्यजी बद्री पहिलवानाला आतून एक पातळ आणायला सांगतात. परंतु लोकशाही नकारार्थी मान हलवू लागते. ती सांगते, ''मी तुमच्या कॉलेजची लोकशाही आहे. तुम्ही कित्येक वर्षांत त्याची वार्षिक सभा बोलावलेली नाही. कॉलेज सुरू झाल्यापासून आजपर्यंत मॅनेजरची निवडणूक झालेली नाही. आजकाल कॉलेजातील प्रत्येक गोष्टीचा विकास होत आहे. पण मीच एकटी कोपऱ्यात पडून आहे. एकदा तुम्ही रीतसर निवडणूक घ्या. त्यायोगे माझ्या अंगावर नवीन कापड येईल. माझी लाज झाकली जाईल.''

असे म्हणून लोकशाही खोलीतून बाहेर निघून गेली, आणि वैद्यजींची झोप पुन्हा उडाली. जागे होताच त्यांनी आपल्या आंतरिक क्रांतीचा ताजा स्फोट रजईमध्ये पायथ्याच्या बाजूला ऐकला आणि त्यांच्या मनाशी एकदम असा निश्चय झाला की लोकशाही ही दिसायला कितीही गावंढळ असली तरी ती सज्जन आहे आणि ती आपलीच आहे. तिला आपण मदत केलीच पाहिजे. निदान तिला एक नवा कपडा द्यावा म्हणजे चार सज्जन माणसांमध्ये तिला उठता-बसता येईल.

दुसऱ्या दिवशी प्रिन्सिपॉलना आदेश देण्यात आला की कॉलेजची वार्षिक बैठक बोलावण्यात यावी आणि इतर पदाधिकाऱ्यांबरोबरच मॅनेजरचीही निवडणूक घेण्यात यावी. नवीन निवडणुका घेण्याची जरूरही नाही अथवा ते योग्यही नाही, ही गोष्ट वैद्यजींना पटवून देण्याची प्रिन्सिपॉलनी खूप खटपट केली. पण वैद्यजी म्हणाले, ''आता तुम्ही बोलू नका. हा तत्त्वाचा मुद्दा आहे.'' तरीही प्रिन्सिपॉल बोललाच. तो म्हणाला, ''अजून कुठल्याही वर्तमानपत्रात निंदाव्यंजक मजकूर छापून आलेला नाही, अथवा वरती तक्रार गेलेली नाही, एखादा मोर्चाही निघालेला नाही किंवा कुणी उपोषणही केलेलं नाही. सगळे साले आपापल्या जागी मूग गिळून गप्प बसलेत. कोणीही वार्षिक सभेबद्दल अवाक्षर काढत नाही. जे कोणी बोलताहेत ते अखेर आहेत तरी कोण ? तोच खन्ना मास्टर, तेच रामाधीन भीखमखेडवी आणि त्यांचे चार दोन बगलबच्चे. त्यांच्या फंदात पडून वार्षिक सभा बोलावणे योग्य होणार नाही.'' त्यांचे सगळे बोलणे ऐकून घेतल्यावर वैद्यजी म्हणाले, ''तुमचं म्हणणं बरोबर आहे. पण ही गोष्ट तुम्हांला कळायची नाही. कारण ही तत्त्वाची गोष्ट आहे. जा, बैठकीची तयारी करा.''

छंगामल विद्यालय इंटर कॉलेजचे विद्यार्थी क्रीडाजगताशी चांगले परिचित होते. कारण त्यांच्याकडून दर महिन्याला खेळांची फी कान पकडून वसूल केली जात असे. आता कॉलेजचे स्वतःचे असे क्रीडांगण नव्हते ही गोष्ट अलाहिदा. परंतु त्याबद्दल कोणाची तक्रार नव्हती. उलट सर्वांनाच त्याबद्दल बरे वाटत होते. खेळच नसल्यामुळे गेम्स टीचरजवळ इतका रिकामा वेळ शिल्लक राही की तो शिक्षकांच्या दोन्ही गटांत घुसून त्यांचा विश्वास संपादन करू शकत असे. प्रिन्सिपॉलनाही त्यामुळे पुष्कळच आराम मिळत असे. त्यांच्या कॉलेजात हॉकीच्या संघांमध्ये मारामारी होत नसे (कारण तेथे हॉकीचे संघच नव्हते), आणि या सर्व कारणांमुळे कॉलेजात शिस्तीची कसलीच समस्या निर्माण होत नसे. विद्यार्थ्यांचे पालकही खुष होते. कारण नुसती फी दिली की खेळाची कटकट नाहीशी होई आणि मुले खरोखरीचे खेळाडू होण्याचे संकट टळत असे. मुलांनाही आनंद होता. कारण त्यांना माहीत होते की हातात स्टिक पकडून ढेकळासारख्या चेंडूमागे एका गोलापासून दुसऱ्या गोलापर्यंत वेड्याप्रमाणे उगीचच धावण्यात जेवढा वेळ वाया जातो तेवढ्या वेळात आपण ताडीचा आख्खा डेरा घशाखाली उतरवू शकतो किंवा डाव लागला तर जुगारात चार-सहा रूपये कमावू शकतो.



याच मुलांच्या हातात आज हॉकीच्या स्टिका आणि क्रिकेटच्या बॅटी दिसत होत्या. जणू कुणीतरी रायफली धरायला सांगाव्यात तशा त्यांनी त्या स्टिका आणि बॅटी धरल्या होत्या. सुमारे पन्नास विद्यार्थी अशा प्रकारच्या उपकरणांनी सुसज्ज होऊन कॉलेजच्या फाटकाच्या आसपास मटकत होते.

त्यांचा तो थाटमाट पाहून रंगनाथाने विचारले, ''काय भानगड आहे ? कॉलेज तपासणीला आज इन्स्पेक्टर येणार आहेत की काय ?''

छोटू पहिलवानाने उत्तर देण्याची तयारी केली. म्हणजेच कमरेची निसटणारी लुंगी आवळली आणि तो म्हणाला, ''असल्या या धांदलीत कोण तपासणी करणार ? ही वार्षिक सभेची तयारी चाललीय.''

छोटू पहिलवानही कॉलेजच्या समितीचा सभासद होता. त्याला पाहाताच विद्यार्थ्यांनी हर्षध्वनी केला. फाटकावरच त्याला प्रिन्सिपॉल साहेब भेटले आणि म्हणाले, ''या, या छोटेलालजी ! तुमचीच वाट पाहात होतो.''

''आता आलोच आहोत तर परत थोडेच जाणार ? तुम्ही चला ना आमच्यापुढे!'' छोटू पहिलवान सरळपणाने म्हणाला. कुत्रा पावसात भिजला की तो एका खास पद्धतीने शिंकतो. प्रिन्सिपॉलसाहेब खजीलपणाने हसले तेव्हा काहीसा तसाच आवाज झाला. ते पुढे चालू लागले. ते सांगू लागले, ''रामाधीनांच्या गटानं फार जोर केलाय. बैजेगावच्या लालसाहेबांच्या मदतीनं कित्येकांना आपल्याकडे फिरवून घेतलंय. लालसाहेब या भानगडीत कशाला पडलेत कोण जाणे. शहरात राहातात पण खेड्यातल्या प्रत्येक बाबतीत ढवळाढवळ करतात. रामाधीनचे हात आभाळाला लागलेत. किती लोक इकडे आहेत आणि किती तिकडे आहेत, याचा पत्ताच लागत नाही.''

छोटू पहिलवान इमारतीसमोर लावलेले फुलांचे ताटवे पाहात होता. जेव्हा प्रिन्सिपॉल सांगू लागले की, ''बैद महाराजही कधी-कधी असा काही निर्णय घेऊन बसतात की विचारता सोय नाही. या निवडणुकी-फिवडणुकीची काय जरूर होती ?'' तेव्हा छोटू पहिलवानाने एका गाण्याचे पहिले दोन चरण म्हटले. हे गाणे त्या काळात कीर्तन म्हणून खूप लोकप्रिय झाले होते. ते चरण असे होते : - ''हमें क्या काम दुनियासे । मेरा श्रीकृष्ण प्यारा है !''

फाटकातून आत प्रवेश करतांना प्रिन्सिपॉलनी रंगनाथलाही म्हटले, ''तुम्हीही या रंगनाथबाबू, तुम्हाला कुणी अडवणार नाही.''

त्याने मान डोलावून आपण मागोमाग येत असल्याचे दर्शविले. पण तो आत गेला नाही.

हळूहळू कॉलेजच्या सर्वसाधारण सभेचे इतर सभासदही वेगवेगळ्या ढंगांनी व

वेगवेगळ्या मार्गांनी आले. को-ऑपरेटिव्ह युनियनचे एक डायरेक्टर पायी असूनही इतक्या झपाट्याने चालत आले आणि इतक्या भर्रकन आत शिरले की लोक त्यांच्याकडे पाहाण्याऐवजी एकमेकांच्या तोंडाकडेच पाहात राहिले. थोड्या वेळानंतर कॉलेजच्या शेतातील पीक तुडवीत ठेकेदार साहेब दुसऱ्या बाजूने जातांना दिसले. जेथे मजूर काम करीत होते तेथे थांबून त्यांनी कोणती तरी वस्तू वर आकाशापर्यंत उचलून जमिनीवर आपटण्याचा अभिनय केला आणि मग एकदम अंतर्धान पावले. थोड्या वेळाने बाबू गयादीन सावकाश चालत कॉलेजच्या फाटकापर्यंत आले आणि तेथील छोट्या पुलावर बसले. मुलांच्या हातांतील स्टिका व बॅटींकडे त्यांनी उदास नजरेने पाहिले. नंतर ते एका मुलाच्या तळहाताला चिकटलेल्या चेंडूवर आपल्या डोळ्यांनी मेस्मॅरिझमचा प्रयोग करू लागले. प्रिन्सिपॉलसाहेब फाटकावर येऊन त्यांना म्हणाले,

''मेम्बर साहेब, चला, इतर सर्व लोक आलेत.''

जणू त्यांना दरवड्याच्या गुन्ह्याखाली पकडण्यात आले होते आणि साक्षीदारांसमोर ओळख परेड करण्यासाठी बोलावण्यात येत होते, अशा प्रकारे मरतुकड्या आवाजात ते म्हणाले, ''चला.'' पेंग्विन् पक्ष्याप्रमाणे तंगड्या फाकून चालत चालत ते कॉलेजच्या इमारतीत दिसेनासे झाले.

थोड्या वेळानंतर रस्त्यावरून एक घोडेस्वार येत असलेला दिसला. त्याने झोकदार फेटा बांधलेला होता आणि बाराव्या शतकातील इतिहासाच्या एखाद्या पानातून तो नुकताच फडफडत बाहेर पडला असावा असे वाटत होते. विद्यार्थ्यांपैकी एक जण म्हणाला, ''आता कुणी वैद्यजींच्या केसालाही धक्का लावू शकणार नाही. ठाकुर बलरामसिंह आले.''

बलरामसिंहांनी आत येताच घोड्याचा लगाम समोर दिसलेल्या मुलाच्या हातात दिला. आता ते अठराव्या शतकातील पुरुष भासू लागले. दक्षिणेकडील बंडाची बातमी देण्यासाठी एखादा सांडणी-स्वार आग्र्याच्या किल्ल्यात प्रविष्ट व्हावा तसेच झपाट्याने ते कॉलेजच्या पुलापर्यंत आले आणि एका मुलाला विचारू लागले, ''मारपीट तर झाली नाही ना ?''

त्या मुलाने सांगितले, ''मारपीट कसली ? आम्ही तर प्रिन्सिपॉल साहेबांच्या गटात आहोत. अहिंसावादी आहोत.''

बलरामसिंहांनी मिशांवर ताव दिला आणि ते हसत म्हणाले, ''तुम्ही लोकही काही कमी नाही. हातात हॉकीच्या काठ्या घेऊन फिरताहात आणि महात्मा गांधींचा वारसा सांगताहात.''

तो मुलगा म्हणाला, ''महात्मा गांधीही काठी घेऊन चालत असत. आम्ही निःशस्त्र आहोत. ही तर हॉकीची स्टिक. हिनं साला चेंडूदेखील मरत नाही. मग



माणूस काय मरणार ?''

प्रिन्सिपॉलसाहेब पुनः बाहेर आले होते. ते म्हणाले, ''चला मेंबरसाहेब, आत चला. कोरम भरलाय. मीटिंग सुरू होतीय.''

बलरामसिंहानी फेट्याच्या पदराने घाम पुसला व म्हणाले, ''एखाद्या चेल्याला सांगा, घोड्याला दाणा-पाणी द्यायला. आम्हांला आतल्या मीटिंगशी काय करायचंय ? आमचा कोरम तर इथंच बांधलाय.''

प्रिन्सिपॉलनी खुष होऊन मान हलवली. बलरामसिंहांनी सदऱ्याचा खिसा मुठीत धरून म्हटले, ''खात्री वाटत नसेल तर याला हात लावून पाहा. खिसा तट्ट फुगलाय. हाच खरा कोरम.''

प्रिन्सिपॉलनी हात न लावताच म्हटले, ''स्पर्श केलाय असंच समजा. तुम्ही काय खोटं बोलणार ?''

बलरामसिंह म्हणाले, 'अस्सल विलायती चीज आहे. सहा गोळ्यांची. एक फुसका बार काढून गार पडणारं हे काही देशी पिस्तुल नव्हे. ठो - ठो सुरू केलं की रामाधीनच्या गटाचे सहा मेंबर चिमण्यांसारखे पटापट मरून पडतील.''
''ते काय सांगायला पाहिजे ? तुमची बरोबरी कोण करू शकणार ?''

प्रिन्सिपॉल साहेब अशा ढंगात बोलले जणू बलरामसिंहांच्या तोंडून त्यांना अस्सल काव्य ऐकायला मिळाले होते. चालता-चालता ते म्हणाले, ''मी आत मीटिंगमध्ये जातो. बाहेरची बाजू तुम्ही सांभाळा.'' नंतर महात्मा विदुराचा आव आणून विनवणीच्या सुरात म्हणाले, ''शांततेनं सारं काही करा.''

बलरामसिंहानी पुनः मिशांवर ताव देत म्हटले, ''इथं सारी शांतीच शांती आहे. आमच्या मांडी खाली पन्नास-पन्नास शांत्या पडलेल्या आहेत.''

प्रिन्सिपॉल साहेब आत गेले. बलरामसिंह पुलावर बसले. थोडा वेळ ते तंबाखूची पिंक पचापच थुंकत राहिले. नंतर ज्या मुलाने स्वतः महात्मा गांधीपेक्षा जास्त अहिंसावादी असल्याने सांगितले होते त्याला ते म्हणाले, ''बेटा, जरा कॉलेजभोवती एक चक्कर टाकून ये बघू. आमच्या माणसांनी पक्की नाकेबंदी केलीय की नाही ते पाहा. आणि रमेसराला सांग म्हणावं साला कुणाशी मारामारी करू नकोस, जो कुणी समजावून सांगून ऐकणार नाही त्याला इकडे फाटकावर पाठवून दे.''

आपल्या यशस्वितेवर युद्धातील आपल्या देशाचा विजय अवलंबून आहे, अशा रूबाबात वावरणाऱ्या बॉय स्काउटप्रमाणे शत्रुपक्षाची बित्तंबातमी काढून आणण्यासाठी तो मुलगा निघून गेला. आसपास भटकणाऱ्या विद्यार्थ्यांची हालचाल वाढली. बलरामसिंह म्हणाले, ''बाळानो, जरा आणखी मोठं वर्तुळ बनवा आणि बेफिकीर राहा. जोपर्यंत मी इथं पुलावर बसलोय तोपर्यंत दुष्मन जवळ फिरणार नाही.''

दुपारचे तीन वाजले होते. रस्त्यावरून ट्रक आणि बैलगाड्या चालल्या होत्या. बलरामसिंह पुलावर मांडी घालून बसले आणि स्वप्नाळू नजरेने त्यांची रहदारी पाहू लागले. एकदा त्यांचा घोडा खिंकाळला त्याबरोबर ते गर्जून म्हणाले, "शाबास माझ्या चेतका, धीर धर. योग्य वेळी दाणापाणी मिळेल." चेतकाने धीर धरला आणि त्याचा पुरावा म्हणून अखंडपणे पाण्याची धार सोडण्यास सुरुवात केली.

अचानक एक ट्रक कॉलेजच्या समोरच्या रस्त्यावर येऊन थांबला. सफेद धोतर, सदरा, टोपी घातलेला व हातात छडी घेतलेला एक इसम उडी मारून खाली उतरला, आणि झपाझप कॉलेजकडे निघाला. ट्रक थांबलेला पाहाताच लांबलांब असलेले विद्यार्थी धावत पुलाजवळ येऊ लागले. बलरामसिंहांनी त्या इसमाला अडवून म्हटले, "रामराम पंडित."

ते गृहस्थ ओठांतल्या ओठांत काहीतरी पुटपुटले आणि फाटकाकडे निघाले. बलरामसिंह म्हणाले, "अरे पंडित, जरा सावकाश चाल की. कुणी तुझ्या मागं तर लागलं नाही ना ?"

पंडित खजीलपणे हसले. म्हणाले, "मिटिंग सुरू झालीय ना ?"

बलरामसिंह उभे राहिले व सावकाश पंडितांजवळ आले. विद्यार्थ्यांनी त्यांच्याभोवती कडे केले होते. त्यांना उद्देशून बलरामसिंह म्हणाले, "तुम्ही जा रे इथून. तिकडे दूर जाऊन खा - प्या, मजा करा. "नंतर त्या गृहस्थांना उद्देशून जवळ जाऊन म्हणाले, "पंडित, मीटिंगमध्ये तुझी हजिरी लागलीय. आता जा परत."

पंडित काहीतरी बोलणार, इतक्यात बलरामसिंह त्याच्या अंगाला जास्तच चिकटले आणि म्हणाले, "मागला-पुढला विचार करून सांगतोय. जा परत."

पंडितांच्या मांडीला काहीतरी खडबडीत लागले. त्यांनी बलरामसिंहांच्या सदऱ्याच्या खिशाकडे पाहिले. घाबरून ते दोन पावले मागे सरले.

त्याला निरोप देत बलरामसिंहांनी पुनः म्हटले, "राम राम, पंडित."

तो इसम निमूटपणे परत फिरला. रस्त्यावर कोणतेही वाहन नव्हते. ट्रक निघून गेला होता. तो घाईघाईने पायीच एका बाजूला निघून गेला. एक विद्यार्थी म्हणाला, "गेला !"

बलरामसिंह म्हणाले, "पंडित समजूतदार आहे. ओळखलं त्याने."

"ओळखलं खरं, पण असं पळून जायची काय जरूर होती ?" एका विद्यार्थ्याने विचारले.

बलरामसिंह उद्गारले, "अजून बच्चा आहेस तू. अशा प्रसंगी शहाणा माणूस असाच वागतो."

एक विद्यार्थी घोड्याला दाणा-पाणी देत होता. घोडा पुनः खिंकाळला. यावेळी बलरामसिंहांनी त्याला धमकावले, "गप्प रे चेतक !"



बॉय स्काउट परत आला होता. घोड्याशी बोलण्याच्या सुरातच त्यांनी त्याला विचारले, "काय रे, काय बातमी आहे ?"

स्काउट घाबरला. घाबरलेल्या सर्वसामान्य विद्यार्थ्याप्रमाणे दात दाखवीत म्हणाला, "हां, ठाकुरसाहेब ! सगळं आलबेल आहे."

"किती लोक आले होते ?"

"पाच."

"सगळे शहाण्यासारखे वागले की कुणी अडाणीपणा केला ?"

"सगळ्यांनी ओळखलं." आता त्या मुलाला धीर आला होता. दूर अंतरावरून चाललेल्या पंडिताकडे इशारा करून तो म्हणाला,

'त्यांच्यासारखेच चडफडत परत गेले."

मुले मोकळेपणाने हसली. बलरामसिंह म्हणाले, "समजदार माणसाचं मरण आहे."

कॉलेजात जयजयकार दुमदुमला. कोणीतरी उद्गारला, 'बोल सियावर रामचंद्र की जय !"

जयजयकार करण्यात भारतीयांचा कोण हात धरणार? सियावर (सीताकांत) रामचंद्रापासून सुरुवात झाली. मग पवनसुत हनुमान की जय. नंतर अकस्मात् झटकन महात्मा गांधींवर येऊन तो जयजयकार आदळला.

बोल महात्मा गांधी की जय ! यानंतर जणू हिरवे निशाणच मिळाले. एक जयजयकार पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नावाने ठोकण्यात आला. एकेक जयजयकार प्रादेशिक पुढाऱ्यांच्या नावाने, एकेक जिल्ह्याच्या पुढाऱ्यांच्या नावाने, आणि शेवटी खरा जयजयकार: बोलो वैद्य महाराज की जय !

बरछीने भोसकलेल्या डुकराप्रमाणे किंचाळत प्रिन्सिपॉल साहेब इमारतीतून बाहेर आले आणि "त्यांनीही ओरडून म्हटले, "बोलो वैद्य महाराज की . . . "

'जय' म्हणण्यासाठी नवी पिढी फाटकाबाहेर उभीच होती.

जणू जत्राच भरली. प्रिन्सिपॉल साहेब रंगनाथाला समजावून सांगू लागले, "चला, वैद्य महाराज पुनः सर्वानुमते मॅनेजर निवडले गेले. आता कॉलेज कशी प्रगती करतं ते पाहा. धडाधड, धडाधड धडाधड! तुफान मेलसारखं चालेल." ते जोषात होते आणि यांचा चेहरा लाल होऊ लागला होता.

छोटू पहिलवान म्हणाला, ''ए प्रिन्सिपॉला, फार बहकू नकोस.''. माझंही जरा ऐकून घे. ही जी पोरं हातांत हॉकीच्या काठ्या घेऊन फिरताहेत ना, त्यांना एकेक चेंडू दे; आणि थोडी फार निशाणेबाजी शिका म्हणावं. या पोरांमध्ये चेंडूवर अचूक स्टिक मारील असा एकहीजण नाही. सगळे लेकाचे धुळीत साप मारावा तशा काठ्या आपटत असतात.''

''जरूर मेंबर साहेब, जरूर! खेळाचीही व्यवस्था होईल या कटकटीतून एकदा पार पडलो. . .''

छोटू पहिलवान म्हणाला, ''तुम्ही पार पडलात खरे; पण आम्ही आमचंही म्हणणं सांगून टाकतो. तुम्ही प्रत्येक गोष्ट करण्याचं आश्वासन देता खरे, पण तुम्हांला शेतातला मुळादेखील उपटता येत नाही. हीच रड खेळांची आहे. ही पोरटी नुसत्या हॉकीच्या काठ्या फिरवत भटकत असतात. आज गरज पडली असती तर या काठ्या नुसत्या हवेतच फिरत राहिल्या असत्या. एखाद्याच्या पाठीत काठी घालायला जाते तर खुद्द यांच्या गुडघ्यावरच आपटली असती. वेळेवर नेमबाजी कशी तयार पाहिजे.''

वैद्यजींनी मागून सांगितले, ''खेळांनाही महत्त्व आहे, प्रिन्सिपॉल साहेब छोटूचं म्हणणं काही चूक नाही.''

''हँ, हँ !'' प्रिन्सिपॉलनी पहिलवानाच्या शरीराकडे प्रेयसीच्या नजरेने पाहात म्हटले, ''पहिलवान आहेत ते. थट्टामस्करी नाही. त्यांच्या तोंडून चुकीची गोष्ट कशी बाहेर पडेल.''

## १५

गावाबाहेर एक विस्तीर्ण मैदान होते. ते हळूहळू वैराण बनत चालले होते. आता त्यात गवतसुद्धा उगवत नव्हते. त्याच्याकडे पाहिल्यानंतर आचार्य विनोबा भावे यांना भूदान म्हणून देण्यास ही आदर्श जमीन आहे, असे वाटे. आणि झालेही तसेच. दोन वर्षांपूर्वी हे माळरान भूदान म्हणून देऊन टाकण्यात आले. तेथून ते दान म्हणून ग्रामपंचायतीकडे परत आले. नंतर ग्रामपंचायतीने ते सरपंचांना दान दिले. सरपंचांनी



ते आपल्या नातेवाईकांना व मित्रांना दान म्हणून दिले. आणि त्यातील काही उरलेले तुकडे सरळ - सरळ खरेदी-विक्रीच्या सिद्धांतानुसार काही गरिबांना व भूमिहीनांना देऊन टाकले. नंतर असे आढळून आले की अशा प्रकारे गरिबांना व भूमीहीनांना जो भाग देण्यात आला होता तो मूळच्या माळरानात सामील नव्हता, तर तो कुणा शेतकऱ्याच्या जमिनीचा हिस्सा होता. त्यावरून कज्जे खटले सुरू झाले. ते अजूनही चालले होते आणि पुढेही चालत राहातील अशी आशा होती.

ते कसेही असो. भूदानयज्ञाचा धूर या संपूर्ण मैदानावर पसरला होता. मैदानात शेते तयार झाली होती. त्याचा पुरावा असा की पावला-पावलावर बांध घालण्यात आले होते आणि त्यांवर बाभळीच्या काटेरी फांद्या ठेवण्यात आल्या होत्या. पाणी, खत, बियाणे वगैरे गोष्टींचा मागमूसही नसतांना केवळ इच्छा शक्तीच्या जोरावर या जमिनीत गतवर्षीपासून जोरदार शेती होत होती, आणि केवळ गणिताच्या आधारे असे सिद्ध झाले होते की इतर वर्षांच्या मानाने गतवर्षी ग्रामपंचायतीत जादा धान्य पिकले आहे. ते माळरान म्हणजे आपले जुने कुरणच आहे असे समजून गावातील गुरे अजूनही कधी-कधी त्या बाजूने चरायला जात. पण त्यांच्या त्या कृत्यानंतर शेतकऱ्यांमध्ये शिवीगाळी, मारपीट, कोंढवाडा, पोलिसचौकी, कोर्ट-कचेरी वगैरे गोष्टी सुरू होत. त्यामुळे हळूहळू त्या बाजूला गुरांना जाण्यास मनाई करण्यात आली होती. आता बहुदा त्या माळरानावर सामसूम असे, आणि माणूस आशावादी असल्यास त्याला तेथे गेल्यावर त्या स्मशान शांततेतून प्रगतीचा व विकासाचा निनाद लौकरच घुमणार असल्याचा भास होई.

मैदानाच्या एका कोपऱ्यात वनसंरक्षण, वृक्षारोपण इत्यादींच्या काही योजनाही चालू करण्यात आल्या होत्या. त्या चालल्या की नाही हा वादाचा मुद्दा आहे. पाहायला गेल्यावर असे दिसून येई की तेथे काही खड्डे खोदण्यात आले आहेत आणि त्या खड्ड्यांत बाभळीच्या बिया लावण्यात आल्या होत्या असे ऐकिवात येई. शिवपालगंजवाले गंजवाले नसते आणि शेजारच्या गावकऱ्यांप्रमाणे उद्योगी असते तर या माळरानावरही बाभळीचे वन तरारून उठले असते, असेही लोक म्हणत असत. परंतु माती खराब असल्यामुळे त्या खड्ड्यांत बाभळीची रोपे उगवून आली नाहीत आणि त्या एकूण योजनेचा शिवपालगंजला एवढाच फायदा झाला की, ते खड्डे सार्वजनिक शौचकूपांसाठी वापरण्यात येऊ लागले आणि अशा प्रकारे जी योजना जंगल वाढविण्यासाठी तयार करण्यात आली होती ती आता घरांचीच योजना बनून गेली होती.

त्या माळरानाच्या दुसऱ्या टोकाला एक वडाचे झाड होते. तो प्रचंड वृक्ष जणू त्या वैराणतेवर बलात्कार करीत होता. त्याच्या शेजारीच एक विहीर होती. तिच्या कठ्यावर

रंगनाथ एकटाच बसला होता.

हिंदुस्थानात शिकलेले लोक कधी-कधी एका खास रोगाला बळी पडतात. त्या रोगाचे नाव आहे 'क्राइसिस ऑफ कॉन्शस.' काही डॉक्टर त्यामध्ये 'क्राइसिस ऑफ फेथ' नांवाचा आणखी एक आजारही बारकाईने शोधून काढतात. सुशिक्षित लोकांमध्ये सामान्यतः जे स्वतःला बुद्धिजीवी म्हणवितात, परंतु वस्तुतः जे बुद्धीच्या आधारे नव्हे तर आहार - निद्रा - भय - मैथुनाच्या आधारे जगत असतात (कारण केवळ बुद्धीच्या आधारे जगणे असंभव असते.) अशाच लोकांना हा आजार सतावीत असतो. या आजारामध्ये रोगी मानसिक ताण आणि निराशावाद यांच्या हल्ल्यांमुळे लंबी-चवडी वक्तव्ये देतो, जोरजोरात वाद घालतो, आपण बुद्धिजीवी असल्यामुळे आजारी आहोत आणि आजार असल्यामुळे बुद्धिजीवी आहोत हे सिद्ध करतो आणि अखेर या आजाराचा शेवट कॉफी हाउसमधील वादविवादात, दारूच्या बाटल्यांत, बाजार - बसव्यांच्या बाहुपाशांत, सरकारी नोकरीत आणि कधी-कधी आत्महत्येत होतो.

ज्या दिवशी रंगनाथाने कॉलेजातील मॅनेजरची निवडणूक पाहिली होती तेव्हा पासून आपल्याला हा रोग जडला असल्याची शंका त्याला येऊ लागली होती. वैद्यजींना पाहाताच त्याला निवडणुकीनंतर भाला भोसकल्याने किंकाळणाऱ्या डुकराप्रमाणे किंचाळत, जयजयकार करीत कॉलेजबाहेर आलेल्या प्रिन्सिपॉल साहेबांचा अवतार आठवे. वैद्यजींच्या बरोबर राहिल्याने आपण दरवडेखोरांच्या एखाद्या टोळक्यात सामील झालो आहोत, असे त्याला वाटू लागले. प्रिन्सिपॉल साहेब दात विचकून एखादा किस्सा त्याला सुनवू लागले - आणि त्यांच्या- जवळ अशा किश्शांचा मुळीच तुटवडा नव्हता - की हा माणूस कोणत्याही क्षणी कुणाचेही नरडे दाबू शकेल, हा विचार त्याच्या मनात न चुकता येई.

ते शहर असते तर एखाद्या कॉफी हाउसमध्ये बसून दोस्तांसमोर त्याने या निवडणुकीवर एक ऐसपैस व्याख्यान ठोकले असते. पिस्तुलाच्या जोरावर छंगामल विद्यालय इंटर कॉलेजची मॅनेजरी कशी मिळविण्यात आली त्याचे वर्णन करून त्याने टेबलावर मूठ आपटून म्हटले असते, ''ज्या देशात असल्या क्षुद्र जागांसाठी अशा गोष्टी केल्या जातात तिथं मोठमोठ्या जागांसाठी काय - काय केलं जात असेल ?'' एवढे सारे बोलून झाल्यावर उपसंहार म्हणून इंग्रजीची चार-दोन चुकीची अथवा बरोबर वचने उच्चारून त्याने कॉफीचा कप रिकामा केला असता आणि त्याने स्वतःची अशी गोड समजूत करून घेतली असती की आपण बुद्धिजीवी आहोत, आणि लोकशाहीच्या समर्थनार्थ एक झक्कपैकी व्याख्यान ठोकून व चार रिकामटेकड्या लोकांसमोर आपल्या मनातील मळमळ ओकून टाकून आपण 'क्राइसिस ऑफ फेथ' दाबून टाकला आहे.

परंतु हे शहर नसून खेडे होते. रूप्पनबाबूंच्या म्हणण्याप्रमाणे येथे आपल्या सख्ख्या



बापावरही विश्वास टाकता येत नाही, आणि सनीचरच्या म्हणण्याप्रमाणे इथे कुणी कापल्या करंगळीवर मुतायलाही तयार नसतो. त्यामुळे रंगनाथ येथे आपला आजार दाबून टाकू शकला नाही. दिवसेंदिवस त्याच्या डोक्यात ही गोष्ट पक्की होऊ लागली की आपण डाकूंच्या एका टोळीत येऊन पडलो आहोत, त्या डाकूंनी कॉलेजवर दरवडा घालून ते लुटले आहे आणि आता ते दुसऱ्या कोणत्या तरी ठिकाणावर दरवडा घालण्याची तयारी करीत आहेत. वैद्यजींना झडझडून चांगल्या इरसाल शिव्या द्याव्यात असे त्याला वाटत होते आणि त्यापेक्षाही जास्त म्हणजे ज्याच्या समक्ष वैद्यजींना सणसणीत शिव्या देता येतील अशा इसमाची त्याला गरज होती.

असा साथीदार कोठे मिळणार ? खन्ना मास्टर लबाड आहे. त्याच्या समोर काही बोलल्यास दुसरे दिवशी ती गोष्ट संबंध गावभर पसरेल आणि लोक म्हणू लागतील की, ''वैद्यजींचा भाचा आपल्या मामांनाच शिव्या देतो. पाहा ना, आजकालच्या शिकलेल्या लोकांचा काय हा असभ्यपणा !'' मालवीय मास्टरशी या विषयावर बोलता येईल खरे, परंतु तो गटबाज असला तरी अगदी साधासुधा माणूस आहे. त्याच्या समोर काहीही बोलण्यात मजा येत नाही.

मग कोण ? रूप्पनबाबू ?

रंगनाथाला रूप्पनबाबूचा थोडाफार भरवसा होता. कारण कधी-कधी ते प्रिन्सिपॉलला शिव्या देऊन कॉलेजच्या दुर्दैवाचे रडगाणे गात असत. त्यांची तक्रार अशी होती की, प्रिन्सिपॉल हा शिक्षणाच्या बाबतीत मठ्ठ असला तरी व्यावहारिक गोष्टींत वस्ताद आहे, मोठा तिकडमबाज आहे. त्याने पिताजींना असे काही आपल्या मुठीत करून ठेवले आहे की प्रत्येक गोष्ट तो आपल्या मनाप्रमाणे करतो, पण पिताजींना वाटते की ती गोष्ट त्यांच्या इच्छेनेच झालेली आहे. त्याने खन्ना मास्टरांवर फार अन्याय केला आहे. खन्ना मास्टर कितीही बेवकूब असले तरी त्यांच्यावर इतका अत्याचार होणे योग्य नाही. कारण पिताजींच्या मदतीने एका बेवकुबाने दुसऱ्या बेवकुबाला मारावे हे काही बरोबर नाही.

येथे वडाच्या झाडाखाली, विहिरीच्या कट्ट्यावर बसल्या-बसल्या रंगनाथाने सुटकेचा एक निःश्वास सोडला. कारण कित्येक दिवसानंतर आज प्रथमच त्याचा आजार त्याला त्रास देत नव्हता. त्याने हिम्मत करून आपले आत्मसंकट आज रूप्पनबाबूसमोर विशद करून मांडले होते. त्याने अगदी साफ सांगून टाकले होते की, ''मामांनी असं करायला नको होतं. पिस्तुलाच्या जोरावर मॅनेजरी मिळाली तरी तिचा काय फायदा ? चोहोकडे त्यांची बदनामी व्हायची ती झालीच.''

रूप्पनबाबूंनी आपल्या दंडुकेबाज शैलीत उत्तर दिले होते, ''हे पाहा दादा, याला राजकारण म्हणतात. यात भयंकर हलकटपणा चालतो. हे तर काहीच नाही. पिताजी

ज्या रस्त्यानं चालले आहेत त्यामध्ये यापेक्षाही पुढच्या गोष्टी कराव्या लागतात. येनकेन प्रकारेण शत्रूला चीतपट करणं हे मुख्य उद्दिष्ट असतं. त्यांनी इतरांना चीत केलं नाही तर ते स्वतःच चीत होऊन जातील. मग घरात बसून चूर्णाच्या पुड्या बांधत राहावं लागेल, कुत्रं सुद्धा विचारणार नाही.

"अर्थात् या कॉलेजात सुधारणा घडवून आणायला हवी. हे खरं. प्रिन्सिपॉल हरामखोर आहे. तो अहोरात्र गटबाजीतच गुंग असतो. खन्ना मास्टरही उल्लूचे पठ्ठे आहेत. पण ते हरामखोर नाहीत. या साल्यानं त्यांना पार दडपून टाकलंय. आता खन्ना मास्टरांना वर काढलं पाहिजे. मी पिताजींशी या बाबतीत बोललो होतो. पण ते प्रिन्सिपॉलला ढकलायला तयार नाहीत.

"मला असं वाटतं की आपण काही दिवस पिताजींशी या बाबतीत काहीच बोलू नये. फक्त हळूहळू खन्ना मास्टरांना वर काढावं. त्या योगे प्रिन्सिपॉल चीत होईल. तो साला फार फुगलाय. त्याचा फुगा फुटलाच पाहिजे. तो एकदा का चीत झाला की मग तो काय लायकीचा होता ते पिताजींच्याही लक्षात येईल . . ."

यामुळेच रंगनाथाने समाधानाचा निःश्वास सोडला होता. रूप्पनबाबूंशी या बाबतीत आपल्याला बोलता येईल. एवढी तरी खात्री त्याला वाटू लागली होती. रूप्पनबाबूंबरोबर आपण खन्ना मास्टरांना सहानुभूती दाखवू शकतो, खाली पडलेल्याला वर उठवू शकतो, फुगलेला फुगा फोडू शकतो आणि थोडक्यात म्हणजे अन्यायाचा प्रतिकार सरळसरळ न करता आडून का होईना, करणे शक्य आहे आणि आपले पूर्वीचे स्वास्थ्य परत मिळविता येणे शक्य आहे, एवढे सारे स्पष्ट झाले.

जानेवारीचा महिना अर्धा-अधिक निघून गेला होता. त्यानंतर फेब्रुवारी येणार होता. त्या महिन्यात ग्रामपंचायतीच्या निवडणुका व्हावयाच्या होत्या. नंतरचा महिना मार्चचा. त्या महिन्यात हायस्कूल व इंटरमीजिएटच्या परीक्षा सुरू होणार होत्या. निवडणुकीने एकीकडून सनीचर व बद्री पहिलवानांच्या आखाड्याला आणि दुसरीकडून रामाधीन भीखमखेडवी व त्यांचे जुगारी सेनापती यांना लोकशाहीच्या सेवेत गुंतवून टाकले होते. आतापर्यंत ही सेवा करण्याचा मुख्य मार्ग म्हणजे दोन्ही बाजूंच्या मंडळींनी एकमेकांच्या पाठीमागे एकमेकांना खणखणीत शिव्या देणे हाच होता. फेब्रुवारी महिन्यात हा कार्यक्रम समोरासमोरही होऊ लागेल अशी आशा होती. मार्चमध्ये होणाऱ्या परीक्षांच्या बाबतीत बोलावयाचे म्हणजे त्यांच्याकडे अजून कोणाचे लक्षच गेले नव्हते. विद्यार्थी, शिक्षक व विशेषतः प्रिन्सिपॉल साहेब, सारेजण त्याबाबतीत पूर्णपणे



निश्चिंत होते.

परंतु प्रिन्सिपॉल साहेब दुसऱ्याच एका भानगडीत अडकले होते. काही दिवसांपूर्वी कॉलेजच्या कमेटीची वार्षिक बैठक झाली होती तेव्हा वैद्यजींना एकमताने पुनः मॅनेजर म्हणून निवडण्यात आले होते. या निवडणुकीविरुद्ध काही सभासदांनी शिक्षणमंत्र्यांकडे एक तक्रार अर्ज गुदरला होता. त्यांचे म्हणणे असे की विरोधी सभासदांना बैठकीस येऊ दिले नाही, त्यांना पिस्तुलाची धमकी देण्यात आली. अर्जामध्ये ही गोष्ट इतक्या विस्ताराने, किंबहुना पाल्हाळाने, सांगण्यात आली होती की संपूर्ण अर्ज वाचणे अशक्य वाटत होते आणि तो संपूर्ण वाचला तरी त्यावर विश्वास ठेवणे अगदीच अशक्य होते. कारण त्याचा निष्कर्ष असा निघत होता की शिवपालगंजमध्ये कायदा नावालाही शिल्लक उरलेला नसून तेथे पोलिस चौकी नावाची एखादी वस्तूच नाही, आणि चार गुंड मिळून तेथे वाटेल तो नंगानाच घालू शकतात. अर्थात् हे सारे खोटे आहे, हे समजण्यासाठी कसलीही चौकशी करण्याची जरूर नव्हती हे उघड होते. तरी पण काही विरोधी मेंबरांनी शहरात जाऊन या तक्रार अर्जाची नक्कल शिक्षण खात्याच्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांना दिली होती, आणि तेथून परत ते सगळीकडे असा प्रचार करू लागले होते की या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन नावाचे एक अधिकारी येणार असून ते गृहस्थ तसे फार गरीब स्वभावाचे आहेत. परंतु या खेपेला त्यांना वैद्यजींचे बापसुद्धा बनवू शकणार नाहीत, कारण वरून खरीखरी चौकशी करण्याचा हुकूम सुटला आहे.

प्रिन्सिपॉल साहेबांना गुंतविण्यात एवढी बातमी पुरेशी होती. चौकशीचे प्रकरण स्वतः वैद्यजी हाताळतील हे त्यांना माहीत होते. परंतु चौकशीच्या निमित्ताने अधिकाऱ्यांचेही दौरे होणार आणि त्यांची व्यवस्था प्रिन्सिपॉलनाच पाहावी लागणार, हे स्पष्ट होते. अधिकारी मंडळी कॉलेजात येतील तेव्हा सर्वांत आधी काय पाहातील ? या प्रश्नाचे उत्तर प्रिन्सिपॉलनी स्वतःच दिलेः इमारती !

म्हणून आता ते इमारतींचे सौंदर्य वाढविण्यात मग्न झाले होते.

त्यांनी शहरात असे पाहिले होते की एक लहानसे झाड लावून त्याच्या भोवती विटांचे कोंडाळे रचले आणि त्यावर लाल - पिवळ्या - सफेद रंगांचे पट्टे ओढले की फारसा प्रयत्न न करताही ओसाड माळरान बागेसारखे दिसू लागते. त्यांनी असे ठरविले की कॉलेजच्या इमारतीसमोर गुलमोहर आणि बाहवा या झाडांची एक रांग लावून द्यावी आणि अधिकारी येण्यापूर्वीच विटांचे रंगीबेरंगी कट्टे सजवून टाकावेत. येतांना डोळ्यांसमोर स्वच्छ, रंगीबेरंगी इमारत असेल आणि परत जातांना पोटात फर्स्टक्लास चहा - फराळ असेल तर आमच्याविरुद्ध कोण काय लिहील ? हा विचार मनात येताच प्रिन्सिपॉल साहेबांनी जानेवारीतील कडक थंडी, दव वगैरेना न जुमानता

झाड लावण्यास प्रत्येक ऋतु उत्तमच असतो या शास्त्रीय सिद्धांताचा आधार घेऊन धूमधडाक्याने कामास सुरुवात केली.

ते कॉलेजच्या तटाजवळ उभे राहून काही खड्डे खोदवून घेत होते. त्यांच्या हातात एक जाडजूड व गुळगुळीत ग्रंथराज होता. त्याच्याकडे पाहाताच तो अत्यंत मौल्यवान् असला पाहिजे, हे लक्षात येत होते. ते आपल्या नेहमीच्या कामाच्या पोषाखात उभे होते. मोज्यांशिवाय बूट आणि हाफपँट या पोषाखात आपण फार स्मार्ट दिसतो अशी त्यांची समजूत होती. अर्थात् लोकांचे मत तसेच असण्याची जरूर नव्हती. त्यांनी ते पुस्तक पाळीव मांजरासारखे छातीशी कवटाळून धरले होते.

इतक्यात खन्ना मास्टर लगबगीने तेथे आले आणि प्रिन्सिपॉलांच्या हातात एक कागद देऊन म्हणाले, ''हे घ्या.''

प्रिन्सिपॉलनी जवळ उभ्या असलेल्या एका शिक्षकाकडे मदतीसाठी पाहिले. त्याला ते फार पूर्वीपासून ओळखत होते, कारण तो त्यांचा चुलत भाऊ होता. नंतर खड्ड्याजवळ उभ्या-उभ्याच ते एकदम ताठले आणि ऑफिसर बनून म्हणाले, ''काय आहे हे ?''

''काय असायचं ? कागद आहे !''

ते छाती काढून किलकिल्या डोळ्यांनी त्या कागदाकडे पाहू लागले. खन्ना मास्टरांनी हितचिंतकाप्रमाणे म्हटले, ''आणा इकडे, मी वाचून दाखवतो.''

''तुम्ही जा. आपलं काम बघा. मला शिकवायचा प्रयत्न करू नका.'' ते तिरस्काराने उद्‌गारले.

खन्ना मास्टर उसासा सोडून म्हणाले, ''या जन्मात शिकवण्याखेरीज आता सुटका कुठे आहे ?''

प्रिन्सिपॉलांचा चुलत भाऊ खन्ना मास्टरांच्या चेहऱ्यावर नजर रोखून उभा होता - मालकाच्या बंगल्याच्या आवारात उभ्या असलेल्या अल्सेशियन कुत्र्याने रस्त्यावर उभ्या असलेल्या गावठी कुत्र्याकडे पाहात राहावे तसा ! प्रिन्सिपॉल साहेब बराच वेळपर्यंत त्या कागदाकडे टक लावून पाहात राहिले. जुन्या काळचे ऋषी असते तर एव्हाना तो कागद जळून खाक झाला असता. बराच वेळ त्याच्याकडे पाहिल्यावर त्यांनी तो खन्ना मास्टरांनाच परत दिला.

खन्ना मास्टरांनी चिडून विचारले, ''हे काय ?''

''काय असायचंय ? कागद आहे.'' असे म्हणून प्रिन्सिपॉल एका खड्ड्याचे निरीक्षण करू लागले.



खन्ना मास्टरांनी दातांखाली ओठ दाबला. जरा आवाज सांभाळून ते म्हणाले, ''ते काही का असेना, लेखी अर्जावर तुम्ही लेखीच हुकूम दिला पाहिजे.''

एव्हाना प्रिन्सिपॉल एका मजुराशी बोलू लागले होते. ते त्याला सांगत होते, ''ठीक आहे, ठीक आहे. अरे, खड्डा खोदायचं काम चाललंय. विहीर खोदायची नाही आहे. पुष्कळ झालं.''

खन्ना मास्टर थोडा वेळ गप्प राहिले. नंतर म्हणाले, ''मला चार दिवस बाहेरगावी जायचं आहे. रजा पाहिजे. तुम्ही तशी लेखी परवानगी दिली पाहिजे.''

प्रिन्सिपॉलसाहेब खड्ड्यातील ओल्या मातीवर चवडे टेकून आरामात बसले. पाहाणाऱ्यांना वाटावे की कॉलेजच्या हितासाठी ते खड्ड्यात लोळण घ्यायलाही मागेपुढे पाहात नाहीत. ते मजुरांना खड्ड्याच्या लांबीरुंदीसंबंधी सविस्तर सूचना देऊ लागले.

आता खन्ना मास्टरांचे बोलणे पार्श्वसंगीतासारखे भासू लागले. तेही खड्ड्याच्या दुसऱ्या बाजूला जाऊन चवड्यावर बसले आणि म्हणाले, ''आधी माझ्या प्रश्नाचं उत्तर द्या आणि मग खड्ड्यात उतरा.''

प्रिन्सिपॉल साहेबांनी आता कुठे त्यांच्याकडे सरळसरळ पाहिले. ते म्हणाले, ''मी खड्ड्यात उडी मारणारच आहे. पण आधी तुम्हांला ढकलून मग मी वर पडणार. कळलं खन्ना मास्टर ?'' असे म्हणून त्यांनी आपल्या चुलत भावाकडे पाहिले. चुलत भावाने एकदम विनम्रपणे, आज्ञाधारक सुरात म्हटले, ''मी जाऊन पट्टेवाल्यांना बोलावून आणतो. भांडणतंटा होण्याची लक्षणं दिसताहेत. परंतु प्रिन्सिपॉलसाहेब, तोपर्यंत आपण काही बोलू नये, अशी माझी विनंती आहे.''

''मी काय बोलणार बाबा ? मी तर सारं काही निमूटपणे सहन करतो आहे. ज्या दिवशी यांचा घडा भरेल त्या दिवशी तो आपोआप फटकन् फुटेल.''

असे म्हणून प्रिन्सिपॉलनी खन्ना मास्टरांना जणू शाप दिला. ते एकदम घाबरले. प्रिन्सिपॉल आरडाओरडा करून खन्ना मास्टर आपल्याला मारतो आहे, असा कांगावा तर करणार नाहीत ना, अशी भीती त्यांना वाटू लागली. कज्जे - खटल्यात अडकून पडावे लागू नये म्हणून ते निमूटपणे खड्ड्याजवळून उठून दूर उभ्या असलेल्या एका शिक्षकाजवळ गेले आणि साऱ्या जगाला ऐकू जावे या हेतूने जोरात ओरडून म्हणाले, ''धमकी नका देऊ मास्टर साहेब. आता नबाबशाहीचा काळ उरलेला नाही. इतक्या सहजासहजी खन्ना मास्टर मरायचा नाही. सांगून ठेवतो तुम्हाला. माझ्या अंगाला हात लावला तर खून पडेल. हां. सांगून ठेवतो.''

खन्ना मास्टर ओरडू इच्छित नव्हते. परंतु आरडा - ओरडा करून प्रिन्सिपॉल माणसे गोळा करील या कल्पनेने त्यांनीच आवाज चढवला, आणि काही शिक्षक

त्यांच्या भोवती गोळा झाले.

अचानक ते पुनः किंचाळले, "मारा, मारा ना मला. बोलवा पट्टेवाल्यांना. त्यांच्याकडूनच माझी बेअब्रू करा. आता थांबलात कशाला ?"

खरोखरीच तमाशा सुरू झालाय हे नकळताच दोन्ही पक्षांतील अनेक प्राध्यापक घटनास्थळी येऊन हजर झाले. विद्यार्थी अजून मोठ्या संख्येने गोळा झाले नव्हते. जे थोडेसे आले होते त्यांना पट्टेवाल्यांनी धमकावून दूर हटविले होते. ते व्हरांड्यात उभे राहून संपूर्ण कार्यक्रम पाहू लागले. प्रत्यक्ष, घटनास्थळी मात्र हा तमाशा 'केवळ प्रौढांसाठीच' राहिला.

हे सारे बेलगाम प्रदर्शन पाहून प्रिन्सिपॉल साहेब प्रथम घाबरले. पण नंतर आपल्या रागाला लगाम घालून खन्ना मास्टरांजवळ गेले. त्यांनी त्यांच्या हातातून रजेचा अर्ज हिसकावून घेतला आणि ते थंड सुरात म्हणाले, "ओरडू नका खन्ना मास्टर ! तुमचा गैरसमज झालाय. आणा, तुमच्या अर्जावर हुकूम लिहून देतो."

त्यांनी खूण करताच त्यांच्या चुलत भावाने त्यांच्या हातात एक फाउंटनपेन उघडून दिले. बागवानीच्या (माळीकामाच्या) पुस्तकावर तो अर्ज टेकवून ते त्यावर काहीतरी लिहू लागले. लिहिता - लिहिता म्हणाले, "आपलं युद्ध हे तात्त्विक युद्ध आहे. त्यात मारामारीची काय जरूर ? सारं कसं शांततेनं झालं पाहिजे."

खन्ना मास्टर खुद्द आपल्याच तमाशाला कंटाळले होते. ते म्हणाले, "पण आधी या अर्जावर हुकूम लिहा आणि मग दुसऱ्या गोष्टीविषयी बोलणं करू."

"तेच तर करतोय." ते हसून म्हणाले, "घ्या !" अनेक शब्दांवर त्यांनी गुणाकाराची खूण करून ते खोडून टाकले. काही शब्दांवर गोल वर्तुळ केले. आणि सरतेशेवटी इंग्रजीत लिहिले, "नामंजूर !"

खन्ना मास्टरांनी काही बोलण्यापूर्वीच यांनी तो अर्ज त्यांच्या हातात देत म्हटले, "स्पेलिंग फार कच्चं आहे. "हॉलिडे' मध्ये 'एल्' नंतर 'वाय्' लिहिलाय. खन्नामध्ये 'के' कॅपिटल आहे की स्मॉल आहे, कळत नाही. या सर्व चुका लक्षात ठेवल्या पाहिजेत."

थोडावेळ स्तब्ध राहून खन्ना मास्टरांनी गेंड्याप्रमाणे जबडा फाडून आवाज काढला, "आता तू कॉलेजच्या बाहेर ये. तिथं सारं स्पेलिंग तुला पाठ करायला लावतो."

आणि मग संग्राम सुरू झाला.



ही घटना सकाळची आहे. दुपारपर्यंत पोलिस ठाण्यावर दोन्ही बाजूंचे तक्रार अर्ज जाऊन पोचले. त्यांवरून अध्यापकांनी दंगा केला होता आणि एकमेकांचे प्राण घेण्याची इच्छा बाळगली होती असे दिसून येत होते. त्यांना एकमेकांचे खून करण्यापासून परावृत्त करणारा तेथे कोणीच नव्हता. अशा स्थितीत त्यांनी खरोखरीच आपल्या शत्रूंचे खून का पाडले नाहीत ही गोष्ट स्पष्ट होत नव्हती. पोलिसांनी हाच मुद्दा घेऊन उलट्या बाजूने या प्रकरणाचा तपास सुरू केला होता.

त्याच दिवशी दुपारी वैद्यजींच्या दिवाणखान्यात या घटनेवर विचार विनिमय झाला. तेथे सामान्य नागरिकांची प्रतिक्रिया अशीच दिसून आली की ही घटना यापेक्षा थोडी अधिक महत्त्वपूर्ण व्हावयास हवी होती. म्हणजे असे की आपल्या एखाद्या साथीदाराचे हाड मोडले नाही तरी काही हरकत नाही, परंतु रक्त वाहू लागेल एवढी जखम तरी निदान व्हावयास हवी होती. त्यायोगे शत्रूंच्या विरूद्ध खटल्यात चांगली भक्कम बाजू तयार झाली असती. सरपंच बनण्यापूर्वी नेतागिरीची एक कामगिरी नमूद करून ठेवावी, या सद्हेतूने सनीचरने कसलीही फी न घेता आपली सेवा समर्पित करण्याची तयारी दर्शविली आणि तो म्हणाला, "प्रिन्सिपॉल साहेबांची इच्छा असेल तर मी त्यांच्या हातात भाला भोसकून रक्त काढू शकतो. अजून काही फारसं बिघडलेलं नाही. ते कृत्यही खन्नाच्या नावावर रूजू होईल." पण छोटू पहिलवानाने त्याला हुडुत् करून गप्प बसविले.

त्या दिवशी दुपारी रंगनाथ आणि रूप्पनबाबू सगळी हकीगत निमूटपणे ऐकत राहिले. ते काहीच बोलले नाहीत. अशा प्रकारे काहीही न बोलणे हे शिवपालगंजमध्ये मुर्खपणाचे लक्षण समजले जात असे - परंतु वस्तुतः ते आतल्या आत प्रिन्सिपॉलवर जळफळत होते. बऱ्याच वेळाने बाहेर येऊन रूप्पनबाबू म्हणाले, "हा साला पिताजींना कोर्ट कचेरीच्या रस्त्यानं घेऊन चाललाय्; अखेर तो त्यांना तुरूंगात डांबणार !"

दुपारच्या वेळी वैद्यजी प्रिन्सिपॉलकडून खन्ना मास्टरांची हकीगत ऐकत होते. संपूर्ण हकीगत ऐकल्यावर त्यांनी अशी एक गोष्ट सांगितली जिचा या प्रकरणाशी काही संबंध नव्हता. गोष्ट अगदी सात्त्विक होती आणि माणसाला एकदम निरोगी बनवून सोडणारी होती.

ते म्हणाले, "जिल्हा विद्यालय-निरीक्षकाचा धर्म पाहून मी तर थक्क झालो. गेल्या मंगळवारी मी शहरात गेलो होतो. तेथे एक गृहस्थ मारूतीच्या देवळात जमिनीवर पडून साष्टांग लोळत होते. ते उठले आणि मी त्यांच्याकडे पाहिले तो थक्क होऊन गेलो. ते आपले शाळा-निरीक्षक होते. त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहात होते. मी त्यांना नमस्कार केला तेव्हा प्रति-नमस्कार म्हणून त्यांनी भरलेल्या गळ्यांतून 'हाऊ-हाऊ' असा आवाज काढला आणि पुनः डोळे मिटून घेतले.

''म्हशीचं उत्तम तूप चार-सहा शेर घेऊन जा. असा हा धार्मिक गृहस्थ वनस्पती खाऊन आपला धर्म नष्ट करून राहिलाय.''

''काळाची लीला !''

एका प्राचीन श्लोकामध्ये भूगोलासंबंधी असे विवेचन करण्यात आले आहे की सूर्य दिशेच्या ताब्यात राहून उगवत नाही. तो जेथून उगवतो तीच पूर्व दिशा ठरते. याचप्रमाणे उत्तम कोटीतील सरकारी अधिकारी कामाच्या गुलामगिरीत राहून दौरा करीत नसतो; तर तो जिकडे जातो तिकडे त्याचा दौरा होतो.

या नवीन सौर-सिद्धान्तानुसार एक महापुरूष त्याच दिवशी संध्याकाळी सुमारे चार वाजता शहरातून मोटार पळवीत खेड्याकडे आले. रस्त्याच्या दोहोबाजूंला असणाऱ्या प्रजेच्या शेतांवर नजर टाकीत त्यांनी स्वतःलाच धन्यवाद दिले. कारण गतवर्षीच्या त्यांच्या व्याख्यानामुळेच यावर्षी रब्बीचे पीक उत्कृष्ट येणार असल्याचे दिसत होते. आपण सांगितलेल्या पद्धतीने शेतकरी शेती करीत आहे, शेत नांगरले पाहिजे आणि त्यात खतच नव्हे तर बियाणेही टाकले पाहिजे ही गोष्ट त्यांना समजली आहे, त्यांना सगळ्या गोष्टी कळू लागल्या आहेत आणि नव्या ज्ञानाच्या बाबतीतील त्यांचा बुजरेपणा नाहीसा झाला आहे, शेतकरी प्रगतिशील होत आहेत, हे पाहून त्यांना परम संतोष वाटला. मात्र ते अजून शेतकरीच राहिले आहेत, हे त्यांच्या मागासपणाचे लक्षण आहे, असाही विचार त्यांच्या मनात चमकून गेला.

मोटार भरधाव चालली होती आणि रस्त्यावरून वेडेवाकडे चालणारे वाटसरू वादळातील पाचोळ्याप्रमाणे उडून रस्त्याच्या कडेला जात होते. इकडे आळशी नागरिक आपल्या मोटारीच्या वेगामुळे किती चपळ बनले आहेत, ते पाहून त्यांनी स्वतःची पाठ थोपटली. शिवाय ते इतके हुशार बनले आहेत की एवढ्या वेगवान मोटारीखाली त्यांचा साधा अंगठासुद्धा चिरडला जात नाही. त्यांनी समाधानाने प्रथम स्वतःला आणि मग भारतवर्षाला उद्देशून म्हटले. ''शाबास ! तुझं भवितव्य उज्ज्वल आहे.''

गाडी छंगामल विद्यालय इंटर कॉलेजच्या समोरून पुढे गेली. चड्डीवर बुशशर्ट आणि चड्ड्यापड्यांच्या विजारीवर बनियन शिवाय सदरा घातलेले अनेक विद्यार्थी छोट्या पुलावर बसले होते. दोन्ही बाजूंनी तित्तर पक्ष्याचे आवाज काढले जात होते. त्या मुलांच्या या उल्लूपणावरून अर्ध्या सेकंदात ते विद्यार्थी आहेत ते त्यांनी ताडले.

गाडी जवळजवळ एका फर्लांगभर पुढे निघून गेली होती. एवढ्यात त्या महापुरूषांना अचानक आठवले की गेल्या अठ्ठेचाळीस तासांत आपण तरूणांसमोर



एकही व्याख्यान दिलेले नाही. त्यांना अकस्मात आठवले, या तरूणांसाठी आपण कोणती दुःखं, कोणत्या हालअपेष्टा भोगायच्या शिल्लक ठेवल्या आहेत ? यांच्यासाठीच तर आपण खेडेगाव सोडून शहरात बंगला बांधला. तलावाच्या काठी बसायचे सोडून सकाळ-संध्याकाळ एका लहानशा खोलीत बसायची सवय लावून घेतली. स्वतःमध्ये इतका मोठा बदल घडवून आणला. अशा या प्रिय तरूणांशी आपण अठ्ठेचाळीस तासांत बोललो नाही याची आठवण होताच ते मनाशी म्हणाले, ''अरेरे ! इतका वेळ मी लेक्चर दिल्याशिवायच राहिलो की ! माझ्या मनात इतके-इतके उच्च विचार निर्माण झाले. पण मी स्वार्थीपणानं ते स्वतःजवळच ठेवून घेतले. हाय ! मी किती कृपण आहे ! या देशात जन्माला येऊनही मी इतका वेळ तोंड बंद करून बसलो - धिःकार असो मला !''

अठ्ठेचाळीस तास ! ते आश्चर्याने विचार करू लागले : २८८० मिनिटे, आणि त्यांना साठांनी गुणल्यावर जितकी होतील तेवढी सेकंदे. किती सेकंदे ! एवढ्या कालखंडात नवजवानांना उत्साह देण्यासाठी मी एकही लेक्चर झोडले नाही ! मला झालंय तरी काय ? मला अर्धांगवायूचा झटका तर आला नाही ना ?

निमिषार्धात त्यांच्या मनात इतके सारे विचार येऊन गेले आणि त्यांनी ड्रायव्हरला हुकूम दिला, ''गाडी वळवून घे. आम्ही या कॉलेजची आकस्मित तपासणी करणार आहोत.''

ते कॉलेजात येताच सुट्टी झाली. विद्यार्थी वर्गातून बाहेर येऊन पटांगणात बसले. स्थानिक अधिकारी, बागांमध्ये कवड्यांचा जुगार खेळणारे जुगारी, दारूच्या गुत्त्यात बसलेले इरसाल मवाली, हे सारे हां हां म्हणता तेथे गोळा झाले. चांगली भरगच्च सभा झाली. अर्थात् हे लोक गोळा झाले नसते तरी मीटिंग झालीच असती. बोलणारा बेशरम असला की दिव्याचा खांबही त्याला पुरतो. तो एकटाच मीटिंग घेऊन टाकतो. परंतु येथे मात्र खरीखुरीच मिटिंग झाली. कॉलेजात मुले असण्याचा प्रत्यक्ष फायदा असा की त्यांना वर्गात कोंबले की कॉलेज होते आणि बाहेर काढले की सभा होते.

त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की तुम्ही देशाचे भविष्य आहात आणि शिक्षकांना सांगितले की तुम्ही देशाचे भविष्य निर्माते आहात. विद्यार्थी व शिक्षक यांना हे पहिल्यापासून माहीत होते. नंतर त्यांनी विद्यार्थ्यांना धमकावले की तुम्ही अठ्ठेचाळीसच काय पण आठ तासही गप्प बसू शकत नाही, तुमच्यात संयम असा मुळीच नाही. नंतर शिक्षकांना कान-पिचकी दिली की, तुम्ही विद्यार्थ्यांना संयम शिकवत नाही. मुलांना राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांविषयी काहीही माहीत नाही आणि अध्यापकांना हे माहीत असूनही ते महागाई भत्ता व पगारवाढ मागत असतात.'' शिक्षक व विद्यार्थी याबाबतीत स्वतःसंबंधी काही विचार करू लागण्यापूर्वीच प्रत्येक वक्ता शिक्षण

संस्थांमध्ये व्याख्यान देतात ज्या विषयावर बोलल्याशिवाय राहात नाही त्या विषयाकडे ते वळले.

ते म्हणाले, आपली शिक्षण पद्धती अत्यंत सदोष असून हे शिक्षण घेणारे विद्यार्थी कारकूनच बनू इच्छितात. त्यांनी विद्यार्थ्यांना सल्ला दिला की या शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणला पाहिजे. त्यांनी शेकडो विद्वानांचा व हजारो समित्यांचा आधार देऊन सांगितले की आपली शिक्षण पद्धती सदोष आहे. त्यांनी विनोबांचाच नव्हे तर गांधींचाही हवाला दिला. तेव्हा कॉलेजचे मॅनेजर वैद्यजींनीही मान हलवून आपली शिक्षणपद्धती खराब असल्याचे मान्य केले. त्यानंतर मान डोलावून प्रिन्सिपॉल, इतर शिक्षक, बाजारातील उडाणटप्पू व मवाली यांनीही त्या विधानाला पाठिंबा दिला. त्यांच्या या वक्तव्यामुळे दारूडे आणि जुगारी यांचीही खात्री पटली की आपली शिक्षणपद्धती सदोष आहे.

त्यांनी असेही सांगितले की आपली शिक्षणपद्धती चुकीची असल्याचे आपल्याला इतक्या लौकर समजले, ही शिक्षण क्षेत्रातील गेल्या शतकाची एक असामान्य फलनिष्पत्ती आहे. यानंतर त्यांनी मुलांना उपदेश केला की, ''तुम्ही शेती केली पाहिजे, दूध प्याले पाहिजे, आरोग्य सांभाळले पाहिजे, आणि भावी काळातील गांधी-नेहरू बनण्यासाठी तयार राहिले पाहिजे.'' वस्तुतः या सगळ्या गोष्टी विद्यार्थी त्यांनाही सांगू शकले असते. यानंतर समन्वय, ऐक्य, राष्ट्रभाषेचे प्रेम वगैरे मुद्यांवर एकेक अनिवार्य वाक्य बोलून, कॉलेजच्या अडचणींचा विचार करण्याचा वार्षिक वायदा करून, सेवा केल्यानंतर तत्काळ मिळणारा मेवा खाऊन व चहा पिऊन ते पुनः सत्तर मैलांच्या वेगाने पुढे सटकले.

शिक्षक आणि विद्यार्थी 'भाईयो और बहनो' ची नक्कल करीत आपापल्या घरी गेले. शिक्षण पद्धतीत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचा सल्ला अमलात आणण्यासाठी कॉलेजात माळी, पट्टेवाले व मजूर उरले.

कारकुनाने मेवामिठाईच्या बशीकडे पाहिले आणि तिच्यात उरलेला काजूचा एकमात्र तुकडा तोंडात टाकावा म्हणून उचलला. परंतु नंतर काहीतरी विचार मनात येऊन त्याने तो तुकडा गटारात फेकून दिला.

# १६

बद्री पहिलवान बाहेर गावी गेल्यामुळे आज रंगनाथ गच्चीवर एकटाच राहिला होता. आजकाल थंडी भयंकर कडाक्याची पडत होती. तिचा आनंद लुटण्यासाठी बद्रीनी आपली खाट खोलीच्या बाहेर व्हरांड्यात टाकून घेतली होती. रंगनाथ खोलीत झोपला होता.

रात्रीचे सुमारे अकरा वाजले होते. त्याला झोप येत नव्हती.

खाटेजवळ लाकडी पेटाऱ्यावर एक बॅटरीचा रेडियो होता. लाकडी खोक्यातून कॉलेजसाठी पुस्तके आली होती. ती पुस्तके प्रिन्सिपॉलच्या घरी आणि खोका दुरूस्त होऊन वैद्यजींच्या घरी आला होता. रेडियोही कॉलेजचाच होता. तो रंगनाथ येथे आल्यानंतर वैद्यजींच्या घरी मागवून घेण्यात आला होता. तो आल्यानंतर रूप्पनबाबूंनी कानांना तार लावून स्थानिक स्टेशनाची हालहवाल जाणून घेण्याचे जे अद्भूत यंत्र तयार केले होते ते निरूपयोगी ठरले होते. रात्रीचे काही तास सोडल्यास हा रेडियो अहोरात्र तसाच मजेत वाजत राही - मग खोलीत कोणी ऐकणारा असो की नसो.

यावेळी रेडियोवर शास्त्रीय संगीताचा एक कार्यक्रम आपल्या शेवटच्या टप्प्यावर येऊन पोचत होता. दंगा होण्याची लक्षणे दिसत होती. व्हायोलिनवाला आणि तबलेवाला हे एकमेकांवर ताशी दोनशे मैल वेगाने तुटून पडत होते. त्यांच्या मोटारी एकमेकींवर आपटून चक्काचूर होणार असा रंग दिसत होता. हाहाःकार माजला होता. अचानक व्हायोलिन वादकाने अत्यंत जोरात 'किर्रर्ररर' असा आवाज काढला. तो बरछीच्या पात्यासारखा रंगनाथच्या काळजात घुसला. एवढ्यात तबल्याचा एक स्फोट झाला. संगीत नाटक अकादमीचा पाया खिळखिळा करून टाकण्यास तो पुरेसा होता. रंगनाथने टुणकन उडी मारून रेडियोकडे पाहिले. तो मोडून इकडे तिकडे विखुरला तर नाही ना ? परंतु तो आपल्या जागेवर कॅसाबियाब्लांकाप्रमाणे भक्कम उभा होता, आणि संगीत जगतातील घनघोर युद्धाचे आवाज पूर्वीप्रमाणेच प्रसारित करीत होता. आता व्हायोलिनवाला शेपूट घालू लागला होता आणि तबलजी आवेशाने व जिद्दीने हल्ला चढवू लागला होता. रंगनाथने थकून एक निःश्वास सोडला व रेडियो बंद केला.

अंधार ! हिवाळ्याची रात्र आपल्या संपूर्ण ऐश्वर्यासह प्रकट झाली. अशा प्रसंगी माणसाचा ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास नसला तरी भुतांच्या अस्तित्वांवर विश्वास बसू लागतो. रंगनाथाला एकदम भीती वाटली नाही खरी, परंतु काहीतरी विचित्र वाटू लागले. खरे बोलायचे तर तो भीतीचाच एक प्रकार होता.

परंतु ती भीती त्याच्या मानगुटीला घट्ट धरून बसली नाही. कारण त्याचवेळी त्याने रूप्पनबाबूंविषयी विचार करण्यास सुरूवात केली आणि रूप्पनबाबूंची आठवण येताच

त्याला बेला नावाच्या एका मुलीची आठवण आली. तिला रंगनाथाने कधी पाहिले नव्हते. परंतु रूप्पनबाबूंनी तिला एक प्रेमपत्र लिहिले असल्याचे त्याने ऐकले होते.

सदर प्रेमपत्र केवढे लांब, रुंद व खोल आहे याची त्याला कल्पना नव्हती. परंतु ज्या बातम्या त्याच्या कानावर उडत उडत येऊन पोचल्या होत्या त्यांवरून त्या पत्रात फिल्मी गाण्यांचे काही तुकडे जोडून वाक्ये बनविण्यात आली आहेत, एवढे त्याला कळले होते. ते पत्र घराच्या एका कोपऱ्यात पडलेले बेलाच्या आत्येला सापडले होते असे म्हणतात. नंतर ते पत्र गयादिनांच्या समोर वाचण्यात आले होते. सुरुवातीच्या दोन-तीन वाक्यांपर्यंत गयादीनांच्या डोक्यात काहीच शिरले नाही. परंतु त्यानंतरच्या 'मुझको अपने गल्ले (म्हणजे गले) लगा लो, ओ हमराही !' या वाक्याने सारा खुलासा झाला. त्यांच्या ज्ञानाची किवाडे त्या वाक्याने धाडकन् उघडली आणि कोणीतरी बेलाच्या विचारार्थ ती सूचना मांडली असल्याचे त्यांच्या लक्षात आले. शेवटच्या वाक्यापर्यंत पोचता पोचता त्या दस्तऐवजाचा संपूर्ण उलगडा झाला होता. कारण त्याने लिहिले होते, ''ये मेरा प्रेमपत्र पढकर, कि तुम नाराज न हो, कि तुम मेरी जिन्दगी हो, कि तुम मेरी बंदगी हो ?'' या दस्तऐवजाचे लेखक होते - 'श्री. रू.'

गयादिनांखेरीज प्रिन्सिपॉल साहेबांनीच हे पत्र पाहिले होते असे म्हणतात, आणि तेही बहुदा याचसाठी की गयादीनांनी रूप्पनबाबूंच्या नैतिक उत्थान-पतनाचा का कोण जाणे, प्रिन्सिपॉल साहेबांशी संबंध जोडून दिला होता म्हणून. प्रिन्सिपॉलनी त्यांना असे समजावण्याचा प्रयत्न केला होता की हे प्रेमपत्र नसून उच्चकोटीच्या कवितांचा एक संग्रह आहे, त्याचे साहित्यिक महत्व 'रू.' लिहिल्यामुळे कमी होत नाही. परंतु एवढे सांत्वन - आश्वासन मिळाल्यानंतरही हा पत्रव्यवहार म्हणजे बदचालीचाच पुरावा आहे असे गयादीन मानत राहिले, आणि जेव्हा प्रिन्सिपॉल साहेबांनी त्यांना अनेक कवितांचे अशाच अर्थाचे तुकडे ऐकवून साहित्यात या गोष्टी विपुलतेने आढळतात, असे समजावण्याचा प्रयत्न केला तेव्हा गयादीन म्हणाले, ''तुमचं साहित्यही तुमच्या बदचालीचाच पुरावा आहे.'' अखेर दोघांनी आपसांत असे ठरविले की या दस्तऐवजाची वाच्यता कोणी कोठे करावयाची नाही.

या घटनेच्या दुसऱ्याच दिवशी शिवपालगंजमध्ये अनेक अफवा पसरल्या. एक अफवा अशी की खन्ना मास्टरांच्या गटातील कुणा पोराने बेलाला एक प्रेमपत्र लिहिले असून त्यावर खोटारडेपणाने रूप्पनचे नाव लिहिले आहे. दुसरी अफवा अशी होती की बेलाने रूप्पनला एक प्रेमपत्र लिहिले होते, त्याचे जे उत्तर रूप्पनने धाडले ते गयादीनांच्या हातांत पडले आणि त्यामुळे त्यांची भयंकर बेअब्रू झाली. तिसरी व सर्वांत जास्त पसरलेली अफवा म्हणजे बेला ही एक वाईट चालीची मुलगी आहे.



या तिसऱ्या अफवेचाच एक चमत्कार होता की रंगनाथाने यावेळी भिण्याचे सोडून बेलासंबंधीच विचार करण्यास सुरूवात केली होती. त्या दिवशी जत्रेहून परतताना त्याने रूप्पनबाबूंकडून प्रेमपत्रासंबंधी जे काही ऐकले होते तेव्हा पासून रूप्पनजवळ हा विषय पुनः काढण्याची त्याची हिम्मत झाली नव्हती. आता यावेळी रात्रीच्या एकांतात बेलाविषयी आपली जिज्ञासा तृप्त करून घेण्यास त्याच्याजवळ फक्त कल्पना होती, हस्तमैथुन होते आणि संकोच होता. आता बऱ्याच अंशी या गोष्टी आमच्या कलांच्या प्रेरक शक्ती असल्यामुळे त्यावेळी रंगनाथ एका कलावंताचे जीवन जगत होता.

कशी असेल ती ? 'मधुमती' मधील वैजयंती मालेसारखी ? 'गोदान' मधील शुभा खोटेसारखी ? 'अभियान' मधील वहीदा रहमानसारखी ? छेः ! या साऱ्या हिंदमातेसारख्या झाल्या आहेत. बेला अजून खूप ताजी तवानी असेल. कशी असेल ? माहीत नाही. पण जशी काही असेल, ती कशीही असली तरी 'खुदा की कसम लाजवाब' असेल, एका फिल्मी गाण्याचा हा तुकडा रंगनाथाच्या नरड्यात हाडकासारखा अडकला. पण तो स्वतःशीच हसला. त्या अंधारात त्याने एक अत्यंत सुंदर, जवळजवळ दीड इंच रूंद स्मित केले.

दुसऱ्या दिवशी रात्री रंगनाथ जेव्हा गच्चीवर एकटा झोपला तेव्हा त्याला बेलाची आठवण झाली नाही. त्याला वैद्यजींचा रागाने तापलेला वीर्यमय चेहरा आठवत राहिला.

दिवसा सनीचर व कालिका प्रसाद यांच्या प्रयत्नांनी तयार करण्यात आलेल्या को-ऑपरेटिव्ह फार्मच्या उद्घाटनाचा कार्यक्रम झाला होता. त्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांशी वैद्यजींनी आपल्या को-ऑपरेटिव्ह युनियनमधील अफरातफरीसंबंधी चर्चा केली आणि सरकारने अफरातफर झालेली रक्कम अनुदान म्हणून सहकारी सोसायटीला द्यावी अशी मागणी करणारा जो ठराव सोसायटीने केला होता, त्याचाही उल्लेख केला. वैद्यजींनी थंड सुरांत त्याना समजावले की,'' सरकारनं असं केलं नाही तर सरकारी अधिकारी सहकारी चळवळीला प्रोत्साहन देऊ इच्छित नाहीत, असाच निष्कर्ष काढला जाईल.''

हा अधिकारी नक्कीच डेलकार्नेगीची पुस्तके वाचून आला असला पाहिजे. म्हणून तर वैद्यजींच्या प्रत्येक मुद्यावर तो असे म्हणत होता की, ''तुमचं म्हणणं बरोबर आहे. पण ..'' हे वाक्य त्याने सात वेळा उच्चारले. त्याने आठव्यांदा तोंड उघडले तेव्हा त्यातून 'तुम्हाला अनुदान मिळेल' असे सुस्वर संगीत बाहेर न पडता पुनः पूर्वीचेच वाक्य बाहेर पडलेः ''तुमचं म्हणणं बरोबर आहे, पण ....''

हे ऐकताच वैद्यजी दुर्वासाचा क्रोध, हिटलरची हुकूमशाही आणि जवाहरलाल नेहरूंचा वैताग हे एकत्र करून त्या अधिकाऱ्यावर उखडले. ''तुम्ही लोक देशाचा उद्धार

असाच करणार वाटतं ? हे पण, परंतु, तथापि... किती दिवस चालणार ? महाशय, ही तर नपुंसकांची भाषा आहे. अकर्मण्य व्यक्ती याच पद्धतीने स्वतःला आणि देशाला सेवेपासून वंचित करीत असतात. तुमचा निर्णय स्पष्ट असला पाहिजे... परंतु.. थूः !''

यानंतर वैद्यजींनी देशाच्या दुर्दशेवर एक व्याख्यान ठोकले होते. व्याख्यान देऊन झाल्यावर ते एकदम शांत झाले नाहीत. थोडा वेळ धुसफुसत राहिले. तो अधिकारीही विनम्र राहूनही फणफणत् राहिला. मग इतर लोकही पुटपुटू लागले. सनीचरचा कार्यक्रम आधीच समाप्त झाला होता. त्यामुळे या धुसफुशीचा त्याच्या यशस्वीतेवर काही परिणाम झाला नाही. परंतु शेवटी छाप उरली ती या धुसफुशीची किंवा कुरकुरीची.

अशा प्रकारची धुसफुस किंवा कुरकुर रंगनाथाने शहरात असतांना दरवेळी, दर ठिकाणी ऐकली होती. आपला देश धुसफुसणाऱ्यांचा किंवा कुरकुरणाऱ्यांचा देश आहे हे त्याला ठाऊक होते. कचेऱ्यांत व दुकानांत, कारखान्यांत, पार्कांत, हॉटेलांत, वृत्तपत्रांत, कथांत, अ-कथांत सगळीकडे लोक धुसफुसत आहेत. हीच आपली युगचेतना आहे, हे तो पूर्णपणे जाणून होता. येथे खेड्यातही त्याने हीच धुसफुस ऐकली होती. शेतकरी अधिकाऱ्यांविरूद्ध कुरकुरत, धुसफुसत होते. अधिकारी लोक प्रथम स्वतःला जनतेपासून वेगळे करून जनतेविरूद्ध कुरकुरत होते आणि मग दुसऱ्याच क्षणी आपल्याला सरकारपासून वेगळे करून सरकारविरूद्ध फणफणत होते. बहुतेक सर्वांनाच कसला न कसला त्रास होत होता आणि कोणीही त्या त्रासाच्या मुळाशी जाण्याची तसदी घेत नव्हता, त्रासाचे जे काही तात्कालिक कारण सापडेल तेच धरून लोक कुरकुरायला सुरूवात करीत.

वैद्यजींचे वैशिष्ट्य असे की ते कुरकुरत नसत. आज त्यांनी कुरकुरून रंगनाथाचा विरस केला होता. त्याची अशी अपेक्षा होती की ते गरजतील आणि मग बरसतील. परंतु ते प्रथम गरजले आणि मग कुरकुरून गप्प बसले. त्या अधिकाऱ्याने शेपटी हलविण्याचा व कुरकुरण्याचा कार्यक्रम एकत्र पार पाडून त्यांना जेव्हा अशा इशारा दिला की को-ऑपरेटिव्ह युनियनच्या हिशेबाचे स्पेशल ऑडिट करण्याची जरूर भासेल, तेव्हा त्यांचा जोर थंड पडला होता.

तो मनाशी म्हणाला, हा गरजणाऱ्यांचा देश नसून कुरकुरणाऱ्यांचा देश आहे.

रात्रीच्या स्तब्धतेत खळबळ उडविणाऱ्या एका गावढळ आवाजाने रंगनाथाच्या कानावर जणू थप्पड मारली. कुसहरप्रसाद आपल्या दारात बसून कुणाला तरी शिव्या देत होते. कुरकुरणाऱ्यांचे ते वयोवृद्ध नेते. परंतु ते रडत नव्हते. यावरून ते शिव्या छोटू पहिलवानाला नसून दुसऱ्या कुणासाठी तरी असाव्यात हे स्पष्ट होत होते. त्या शिव्या



कुणाला उद्देशून होत्या हे समजणे कठीण होते. कारण कुसहर जेव्हा छोटू ऐवजी दुसऱ्या कोणाला शिव्या देत तेव्हा त्यांना काही अर्थ नसे. ज्याप्रमाणे जंगलात मोर नाचतो व उद्घाटनप्रसंगी पुढारी भाषण करतो त्याप्रमाणे ती नुसती एक भावात्मक स्थिती असे.

आवाज ! नुसते आवाज ! कुसहरप्रसाद राहून राहून गरजतात आणि गप्प बसतात. गावाच्या दुसऱ्या टोकाला एक कुत्रा भुंकतो. नंतर अचानक तो केकाटत दूर पळून गेल्याचा भास होतो. त्याने आपली शेपटी मागच्या पायात घातली आहे, तोंड छातीवर लोंबकळत आहे आणि उजव्या बाजूला कुणाच्या तरी लाठीचा सपाटा बसल्यामुळे तो वाकडातिकडा फरफटत पळतो आहे, असे चित्र मनःश्चक्षूंसमोर उभे रहाते. आणखी काही कुत्री भुंकू लागतात. रामाधीन भीखमखेडवींच्या दारातून कुणा तरूणाचा कर्कश परंतु किरटा आवाज ऐकू येतो. नीट लक्ष देऊन ऐकल्यावर त्यातून तमाशातल्या एका गाण्याच्या दोन ओळी बाहेर पडतात :-

तेरी बातोंसे जाहिर मुझे यह हुआ ।
इश्क तेरा रहा किसी कंगाल से ।।

(तुझ्या बोलण्यावरून मला एवढेच समजले की तुझे प्रेम कुणातरी भिकारड्यावर बसले आहे.)

तो पुनः पुनः याच ओळी घोकून घोकून म्हणतो. गाता-गाता त्याचा गळा भरून येतो व शब्द अडखळतात. हा बेवड्याचा परिणाम असू शकतो, किंवा आपल्या प्रेयसीला पूर्वी कुणा भिकारड्यावर प्रेम करावे लागले होते, या तिच्या दुर्दैवाबद्दल तो अश्रू ढाळीत असावा. गावातील चार पाच लफंगे खाली गल्लीतून जातात. गयादीनच्या घरी चोरी झाल्यापासून ते रोज रात्री पहारा देतात आणि 'जागते रहो' या घोषणेबरोबरच काही नवनवीन घोषणाही ते देत असतात. उदाहरणार्थ जागते रहो ।

एक चवन्नी चांदी की । जय बोल महात्मा गांधी की'' ।।

ही घोषणा इतर सर्वच घोषणांप्रमाणे पोकळ व निरर्थक आहे, कारण आता चवन्नी (पावली) ऐवजी पंचवीस पैसे चालतात. पावली खतम झाली आहे, चांदी नामशेष झाली आहे, महात्मा गांधी समाप्त झाले आहेत. ते लोक काही अर्थ न समजता, मुळीच न अडखळता घोषणा करीत राहातात. कुठून तरी एक आगगाडी चालली आहे. इंजिनाच्या शिटीचा कर्कश आवाज थोडावेळ या लहान-मोठ्या आवाजांना काहीसे मागे ढकलून देतो.

पुसट आवाज आणि काळोख यांच्या वातावरणात त्याला केव्हा झोप लागली ते कळलेच नाही. झोपेत त्याला असा भास झाला की आपण एका लिफ्टमध्ये उभे आहोत आणि तो लिफ्ट अनेक मजले खाली घसरत चालला आहे. अचानक तो लिफ्ट तीन-चार मजले एकदम पार करून वर आला. रंगनाथ कुरकुरला.

खोबऱ्याच्या तेलाचा व कोणत्या तरी स्वस्त अत्तराचा वास त्याच्या नाकात घुसला. तो सुगंधही नव्हता अथवा दुर्गंधही नव्हता. तो फक्त गंध होता. बांगड्यांच्या सौम्य किणकिणीने त्याच्या झोपेला एक धक्का दिला, आणि मग एका क्षणात त्याने असा एक अनुभव घेतला जो जन्मभर खजुराहो व कोणार्कच्या कलेचे अध्ययन करूनही घेता आला नसता.

ती पलंगाच्या कडेला बसली होती. तिने एक हात रंगनाथाच्या दुसऱ्या बाजूला टेकविला होता. त्याला आपल्या छातीवर दोन स्तनांचे भारी ओझे अनुभवास आले. ते स्तन आणि त्याची छाती यांमध्ये झाकणाऱ्या कपड्यां-व्यतिरिक्त एक जाड रजईही होती. परंतु त्यांची ऊब व मजबुती लपू शकत नव्हती. रंगनाथाचा श्वासोच्छ्वास जणू थांबला.

त्याच्या चेहऱ्यावरून रजई काढून टाकण्यात आली होती. परंतु काळोखात ते दोघे एकमेकांना पाहू शकत नव्हते. त्याच्या छातीवर पडणारा गरम व विस्फोटक दाब काहीसा वाढला. याचवेळी त्याच्या गालावर एक मऊ, रेशमी गाल येऊन टेकला. एक दीर्घ, संकोचपूर्ण उसासा म्हणत होता, ''हाय, झोपलात ?''

रंगनाथाची झोप उडाली. त्याने आपली मान हलविली. त्याच्या तोंडून अस्वाभाविकपणे हे शब्द बाहेर पडले, ''कोण ? कोण आहे !''

एक क्षणभर त्याच्या छातीवर टेकलेल्या स्तनांमधील धडधड जणू बंद पडली. नंतर अचानक ती उडी मारून खाटेपासून दूर उभी राहिली. दबल्या आवाजात ती उद्गारली, ''हाय मेरी मैया.''

आपल्या आईचा (मैयाचा) आदर करणे ही फार चांगली गोष्ट आहे. परंतु यावेळी हे शब्द फक्त भीती व्यक्त करण्यासाठी उच्चारण्यात आले होते. रंगनाथ रजई झटकून उभा राहिला. परंतु एव्हाना ती या गच्चीवरून त्या गच्चीवर आणि त्या गच्चीवरून दुसऱ्या एका गच्चीवर जाऊन पोचली होती.

खुल्या दरवाजातून बाहेर येऊन तो व्हरांड्यांत उभा राहिला. थंडी होती. तो बराच वेळ कान टवकारून ऐकत राहिला. परंतु त्याला वाऱ्याच्या भिरभिरीखेरीज दुसरे काहीच ऐकू आले नाही. येणारणीला 'हाय मेरी मैया'च्या पवित्र नामस्मरणानंतर आणखी काही संदेश देणे बाकी उरले नव्हते.

दार बंद करून जेव्हा तो खाटेवर पुनः आडवा झाला तेव्हा अनेक गोष्टी त्याच्या



लक्षात आल्या. पहिली अशी की कोणार्क, भुवनेश्वर, खजुराहो वगैरे ठिकाणच्या स्त्रीमूर्तींतील उंचवटे दगडातून बाहेर पडून मांसल बनतील तर ते माणसाला वेड लावण्यास पुरेसे आहेत. दुसरी एक गोष्ट त्याच्या लक्षात आली. ती अशी की पुरातत्त्व आणि भारतीय कला यासंबंधी आपण जेवढे वाचले आहे ते सारे अर्धवट व वाह्यात असून भारतीय कलेत डॉक्टरेट घेण्याऐवजी सुरसुंदरीच्या पोझमधील दोन जिवंत स्तनांचा आधार मिळविणे ही एक फार मोठी प्राप्ती आहे.

आणि या सर्व हलक्या फुलक्या मुद्यांना एका बाजूला सारून एक दुसरीच गोष्ट - मुद्याची गोष्ट त्याला सतावू लागली. ती अशी की, ''महाराज, तुम्ही अगदीच मूर्ख आहात. तुम्हांला बोलायची काय जरूर होती ? तुम्ही घाबरलात का ? तुम्ही तिला आणखी काही करण्याची संधी का दिली नाही ?''

''महाशय, तुम्ही नुसते मूर्ख नसून गद्धे आहात. हातून घालविलेल्या संधीमध्ये आणखी एकीची भर घातली ना ?

''मिस्टर, तुम्ही दुसरे काही नसून फक्त हिंदी विद्यार्थी आहात. त्यांच्या नशिबांत फक्त चित्रातली बाई लिहिलेली असते.''

त्याने पुनः झोपण्याचा प्रयत्न केला. पण झोप कशी येणार ? त्याचा हात छातीकडे गेला आणि त्याने खेदपूर्वक मान्य केले ती तेथे दुसरे काही नसून फक्त आपलीच खडबडीत छाती आहे.

कोण आहे ती ? या विषयावर तो जास्त विचार करू शकला नाही. कारण विचाराच्या मार्गात दोन डोंगर उभे होते !

## १७

जोगनाथाला पोलिसांनी पकडल्याची बातमी सकाळी गावभर पसरली. जोगनाथ हा वैद्यजींचा माणूस समजला जात असतांना त्याला हात लावण्याची हिंमत पोलिसांना कशी झाली, याचे लोकांना आश्चर्य वाटत होते. गावातील गुंड आणि सज्जन लोक सगळेच घाबरले. गुंड अशासाठी की, वैद्यजींच्या गुंडाला पोलिसांनी सोडले नाही, तर

आम्ही किस झाडकी पत्ती ! सज्जन लोकांना धडकी भरण्याचे कारण असे की, पोलिस आपल्या रोजच्या मित्रांशी असे वागू लागले तर वेळ पडल्यास आमच्याशी कसे वागतील ?

पोलिसांच्या प्रत्येक धरपकडीप्रमाणे ही धरपकडही नाट्यपूर्ण परिस्थितीत झाली होती.

परिस्थितीला नाट्यपूर्ण बनविण्याचे श्रेय पोलिसांनाच होते हे सांगण्याची आवश्यकता नसावी. फौजदार साहेबांनी वाचले होते की धोकादायक व्यक्तींना पकडण्याची योग्य वेळ म्हणजे रात्रीचा चौथा प्रहर होय. त्यामुळे जोगनाथ शिवपालगंजमध्ये अष्टौप्रहर फिरत असतो आणि त्याला पोलिसठाण्यावर बोलावून केव्हाही सहज पकडणे शक्य आहे, ती गोष्ट लक्षात न घेता पोलिसांनी त्याला गिरफदार करण्यासाठी ब्राह्म मुहूर्ताचीच वेळ पसंत केली.

पहाटे साडे चार वाजता पोलिसांनी त्याच्या घराला चोहोबाजूंनी वेढा घातला. तेथे गोळीबार करण्याची पाळी येणार नाही हे सर्वांना ठाऊक होते; म्हणून सगळ्या शिपायांनी हातांत रायफली घेतल्या. फौजदार साहेबांनी पिस्तुलात गोळ्या भरल्या आणि हेडकॉन्स्टेबलाच्या कानात कुजबुजले, ''कानपूरच्या बाजूनं गुंडांचं एक टोळकं काल या बाजूला आलंय. ते सारे बहुदा जोगनाथाच्या घरातच उतरले असावेत.''

हेडकॉन्स्टेबल म्हणाला, ''हुजूर, कानपूरहून आलेले लोक भूदान कार्यकर्ते आहेत.''

''तेच तर म्हणतोय मी.'' फौजदार कुजबुजले, पूर्वी बदमाष लोक साधूंच्या वेषांत फिरत असत. आता त्यांनी आपला वेष बदललाय.''

सर्व शिपायांनी बजरंगबलीचे नाव घेतले. आपल्या बायकापोरांचे चेहरे नजरेसमोर आणले आणि हत्यारबंद होऊन त्या बदमाषांचा समाचार घेण्यासाठी ते बाहेर पडले. त्या सर्वांनी आपापली शिरे तळहातावर घेतली होती, ते प्राणांवर उदार झाले होते. सर्वांचे जीव धाकधूक करीत होते.

घराला वेढा घातल्यानंतर कडेकोट बंदोबस्त करण्यात आला. सगळे शिपाई तंबाखूची फक्की न मारता, बिडी न शिलगावता आपापल्या जागी पुतळ्यांसारखे अर्धा तास बसून राहिले. कोणी हसला नाही की कोणी दुसऱ्याला हसविले नाही. एक शिपाई बूट काढून ठेऊन चवड्यांवर चोरांप्रमाणे चालत सर्वांच्या कानात शक्तीचा महामंत्र फुंकत गेला की, ''घाबरू नका. काही धोका नाही.'' सारे शिपाई अनुभवी होते. केवळ एखाद्याने म्हटले म्हणून धोका नाहीसा होत नसतो, हे त्यांना माहीत होते. म्हणून ते धोक्याच्या मनःस्थितीतच बसून राहिले. फौजदार व हेडकॉन्स्टेबल हातांत अनुक्रमे पिस्तूल व रायफल घेऊन जोगनाथाच्या दारावर उभे राहिले.



एक इसम गल्लीतून चालला होता. या लोकांना पाहून तो परतणार इतक्यात हेडकॉन्स्टेबलने त्याला हाताने खुणावून जवळ बोलावले. तो निश्चिंतपणे आला. हेडकॉन्स्टेबलने त्याच्या कानात म्हटले, ''पळून चालला होतास वाटतं ?''

तो बेधडकपणे म्हणाला, ''पळायचं कशासाठी ? मल्या पहाटे तुम्हा लोकांची तोंडं बघायला नकोत म्हणून परतत होतो.''

फौजदारांनी ओठांवर बोट ठेवून 'शूऽऽ' असा आवाज काढला. हेडकॉन्स्टेबलने त्या इसमाच्या कानात सांगितले, ''इथंच चबुतऱ्यावर बैस. साक्ष द्यावी लागेल.''

तो इसम म्हणाला, ''त्यासाठी बसून राहायची काय जरूर ? जेव्हा गरज लागेल तेव्हा उद्या, परवा, तेरवा मला बोलवा. मी येऊन साक्षही देईन. तुमच्या शब्दाबाहेर मी थोडाच आहे ?''

तो सटकू लागला. हेडकॉन्स्टेबलने त्याच्या कानात सांगितले, ''तर मग ठीक आहे. जा. पण खबरदार, आम्ही इथं आहोत ही गोष्ट कुणालाही सांगायची नाही.''

त्याने हेडकॉन्स्टेबलच्या कानात आपले नाक खुपसून त्याच सुरात म्हटले, ''सांगायचं कुणाला ? सारा गाव जाणतोय ते.''

तो निघून गेला. घराच्या मागल्या बाजूस बसलेल्या लोकांना बिडी-तंबाखूची तल्लफ अनिवार होऊ लागली. एव्हाना चांगलेच फटफटले होते. एकमेकांचे चेहरे दुरून दिसू लागले होते. अचानक मागे बसलेल्या शिपायांना कर्ररर असा आवाज ऐकू आला. बहुदा बाहेरचा दरवाजा उघडण्यात आला होता. त्याठिकाणी घाईघाईने कोणीतरी आपसात बोलत असल्याचे त्यांना ऐकू आले. आता धर्मक्षेत्रे-कर्मक्षेत्रे प्रवेश करण्याची संधी आपल्यासमोर चालून येत आहे, हे सर्वांनी ओळखले. ते आपापल्या संगिनी चढवून उभे राहिले.

तिकडे दरवाजाजवळचे संभाषण जोरजोरात ऐकू येऊ लागले आणि तो आवाज हळूहळू दूर जात चालला होता. शिपाई आतल्या आत अस्वस्थ होत होते आणि खोकून - खाकरून, तसेच शरीराच्या प्रत्येक छिद्रातून हवेचा दाब बाहेर फेकत होते. थोड्याच वेळात कथेचा उत्कर्षबिंदू येऊन ठेपला. धोक्याची शिटी वाजली आणि ते सारे दरवाजाकडे धावले. तेथून धावत पळत ते दरवाजापासून पन्नास यार्डांवर असलेल्या एका आंबराईत पोचले. तेथे जाताच एका नाट्यपूर्ण परिस्थितीचे ते घटक बनले.

त्यांना असे दिसले की जोगनाथ जमिनीवर बसला आहे. फौजदारसाहेब त्याच्या

छातीवर पिस्तूल रोखून उभे आहेत. हेडकॉन्स्टेबल दुसऱ्या दिशेने संगीन रोखून उभा आहे. झकास थिएट्रिकल दृश्य आहे. पण त्यावर पडदा पडत नाही. शिपायांनी तेथे जाताच त्या दृश्याला वेढा घातला आणि पिस्तुले व संगिनी यांच्या साह्याने त्याच्या शरीराचे भाग आरक्षित होते त्यांच्यावर कबजा केला.

जोगनाथापासून थोड्या अंतरावर एक लोटा पडला होता. जमिनीवर पाणी सांडले होते. फौजदारांनी एका शिपायाला म्हटले, ''तो लोटा ताब्यात घे. पुरावा म्हणून उपयोगी पडेल.''

शिपायाने तो लोटा उचलून त्याचे सूक्ष्म निरीक्षण केले आणि प्रशंसेच्या स्वरात म्हणाला, ''मुरादाबादी आहे.'' नंतर कांही तरी विचार करून त्याने विचारले, ''हुजूर, हा मोहरबंद करायचा काय ?''

''होय करायचा. पण नंतर.''

शिपायाने काही विचार करून पाण्याने भिजलेल्या जमिनीकडे बोट दाखवून विचारले, ''ही मातीही ताब्यात घ्यायची ?''

हेडकॉन्स्टेबल त्याच्यावर खेकसला, ''फार शहाणपणा दाखवू नकोस. जेवढं सांगितलं तेवढं कर.''

फौजदारांनी जोगनाथाला उभे केले. त्याची अंगझडती घेण्यात आली. नंतर संगिनी म्यानात गेल्या. पिस्तुले कातडी पिशवीत घुसली. शिपाई आपसात बोलू लागले.

एकजण म्हणाला, ''मला वाटतं, भल्या पहाटे हा शौचाला चालला असावा.'' दुसरा म्हणाला, ''कुणी सांगावं ? आजूबाजूला एखादं टोळकं असेल आणि त्याला दाणा-पाणी द्यायला हा चालला असेल !'' तिसरा म्हणाला, ''आता वैद्यजी आरडाओरड करणार !'' चौथ्याने हळूच सांगितले, ''फौजदार साहेबांनी वैद्यजींना आधीच आपल्या खिशात घातलंय. ही धरपकड कप्तानाच्या हुकुमावरून झालीय.'' पाचवा म्हणाला, ''चुप ! चुप ! जरा गंमत तर बघा आता !''

जोगनाथ आपल्या जागेवर एखाद्या लोकनृत्याच्या मुद्रेत उभा होता. परंतु त्याच्या चेहऱ्यावरून तो नृत्य करणार नाही, हे उघड दिसत होते. अचानक फौजदारांनी त्याच्या गालावर एक जोरदार थप्पड मारली आणि विचारले, ''लोटा घेऊन कुठं चालला होतास ?''

त्या आघाताचा प्रभाव नाहीसा करण्यासाठी त्याने डोके चोळले, आणि मग फौजदाराच्या डोळ्यांना डोळे भिडवून तो म्हणाला, ''तुम्ही माझ्या शरीराचे लचके जरी तोडले तरी जोपर्यंत माझा वकील मला सांगणार नाही तोपर्यंत मी काहीही बोलणार नाही.''

फौजदारांनी हेडकॉन्स्टेबलला हुकूम सोडला, ''याच्या हातात बेड्या घालून याला



घेऊन चला. अजून याच्या घराची झडती घ्यायची आहे.''

''यांनाही अजून फैलावर घ्यायचं आहेच की.'' हेडकॉन्स्टेबल म्हणाला.

हे सारे आख्यान वैद्यजींना घोकून घोकून सांगण्यात आले. परंतु आज पहिल्यांदाच पोलिस जे काही करतात ते योग्यच करतात या शाश्वत सत्याविषयी वैद्यजींच्या मनात संशय निर्माण झाला होता.

जोगनाथाविषयी वैद्यजींचे मत फारसे चांगले नव्हते. परंतु ते अशा जगात राहात होते की जेथे माणसाचा सन्मान त्याच्या सज्जनतेमुळे नव्हे तर उपयुक्ततेमुळे केला जात असतो. त्यांच्या माणसांपैकी जोगनाथ हाच एकटा असा होता की जो मनसोक्त दारू पीत असे. तो स्वतःच्या पैशांनी दारू पीत असो की इतरांच्या पैशांनी पीत असो, दारूचे प्रमाण कमी-जास्त होऊ देत नसे. थोडक्यात म्हणजे तो मध्यम प्रतीचा गुंड होता.

जोगनाथाच्या धरपकडीच्या मागे काहीतरी राजकारण असावे, असा संशय वैद्यजींना येत होता. गेल्या काही दिवसांपासून फौजदारसाहेब रामाधीन भीखमखेडवीलाही महत्त्व देऊ लागले आहेत, हे त्यांच्या लक्षात आले होते. प्रथम त्यांची अशी समजूत होती की अफूच्या चोरट्या व्यापारात रामाधीनानी त्यांनाही सामील करून घेतले असावे. परंतु आता त्यांना असे वाटू लागले होते की फौजदारांना भ्रम झालाय. राजकारणाच्या डावपेचात रामाधीन भीखमखेडवी हे वैद्यजींपेक्षा आपल्याला जास्त उपयुक्त ठरतील, हा तो भ्रम होता. ते कसेही असो. वैद्यजींना कळून चुकले की या परिस्थितीत जोगनाथाची धरपकड झाल्यानंतर सुरुवातीला फौजदारांना जे हवे असेल तेच घडणार आणि रामाधीन भीखमखेडवी यांची जी इच्छा असेल तीच फौजदारांचीही इच्छा असणार.

परंतु जोगनाथाला पोलिसठाण्यातूनच जामिनावर सोडवून आणण्याचा रूप्पनबाबूंनी हट्ट धरला होता. म्हणून वैद्यजींची इच्छा नसतांनाही ते फौजदारांशी बोलायला तयार झाले होते.

फौजदार साहेब यावेळी सकाळचे कडक फौजदार नव्हते. सकाळी त्यांची नजर माणसाच्या शरीरावर पडताच त्यावर काळे-निळे डाग व ओरखडे पडत होते. यावेळी ते रेशमी सदऱ्याआड आपले धष्टपुष्ट शरीर दिमाखाने मिरवत होते. खाली खादीचा पायजमा होता. ओठांच्या कोपऱ्यांतून पानाचा मुखरस पाझरत होता. त्यांच्या तोंडून वैद्यजींनी संपूर्ण घटना ऐकून घेतली. त्यांना काहीच आश्चर्य वाटले नाही. मात्र

जोगनाथाच्या घरात पोलिसांना एखादे गावठी पिस्तूलही मिळाले नाही, याचे त्यांना नवल वाटले. पोलिसांच्या घनिष्ठ संपर्कात इतकी वर्षे घालविल्यानंतर त्यांना एवढे माहीत झाले होते की अशा प्रसंगी गुन्हेगार किंवा वहमी इसमाच्या घरातून एखादा लोखंडाचा भिकारडा तुकडा तरी नक्कीच सापडतो. त्यालाच पिस्तूल असे समजण्यात येते; आणि मग अठराव्या व एकोणिसाव्या शतकात इंग्रजांविरूध्द झालेल्या चकमकीत भारतीयांचा पराभव होण्याचे मुख्य कारण काय असावे, हे ऐतिहासिक तथ्य आपोआप स्पष्ट होते.

या सौजन्याबद्दल फौजदारांचे आभार मानणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटले. त्याची प्रस्तावना म्हणून त्यांनी विचारले, ''जोगनाथाच्या घरात फक्त दागिनेच मिळाले ? गांजा, भांग, चरस, अफू वगैरे काही मिळालं नाही ?''

''मी अफूसाठी झडती घेतली नव्हती. तसं केलं असतं तर लोक असंच म्हणाले असते की गेल्या खेपेला त्या पार्टीतल्या एक इसम अफूच्या गुन्ह्याखाली पकडला गेला होता म्हणून या खेपेला या पार्टीतल्या इसमाला पकडलंय.''

''पार्टी ?'' वैद्यजींनी आश्चर्याने विचारले, ''कसली पार्टी ? तुम्ही ही कुणाची भाषा बोलताहात ?''

याचे उत्तर दिले रूप्पनबाबूंनी, ''पोलिसांची !''

फौजदारांनी डोळे मिटून आपला मेंदू साफ करण्याचा प्रयत्न केला. ते मनात म्हणाले, ''इंग्रजीमध्ये 'जिन' ही फार धोकेबाज चीज आहे. ती दिसते पाण्यासारखी पण पोटात गेली की जिभेला चुकीचं वळण देऊ लागते. काय म्हणायचं असतं आणि काय म्हटलं जातं.'' त्यांनी डोळे उघडले. वैद्यजींचा चेहरा खूपच गंभीर झाला होता. आता ते काहीतरी इरसाल शिवी हासडणार, या अपेक्षेने फौजदार त्यांच्या चेहऱ्यावरील भाव निरखू लागले.

''तुम्ही हे सौजन्य निष्कारण दाखवलं.'' वैद्यजी म्हणाले, ''जो अफूचा चोरटा व्यापार करतो त्याला कधीही क्षमा करता कामा नये. तो दुराचारी आहे, देशद्रोही आहे.''

फौजदार गप्प बसून राहिले. त्यांनी मनातल्या मनात प्रतिज्ञा केली की 'जिन' असो अथवा नसो, आता कोणतीही चुकीची गोष्ट मी सांगणार नाही. वैद्यजींनी अकस्मात् विचारले, ''जोगनाथाच्या घरात पिस्तूलसुद्धा सापडलं नाही. असली कसली झडती ?''

''आपली अशी-तशीच होती असं समजा.'' फौजदार नम्रपणे म्हणाले, ''आता इतकी पिस्तुलं कुठं राहिली आहेत की प्रत्येक झडतीत एकेक मिळावं ?'' ते हसून मनात म्हणाले, ''जिन ॲक्टिंग करायला चांगली उपयोगी पडते की !''



रूप्पनबाबू एका वर्तमानपत्राच्या मागे आपला चेहरा लपवून बसले होते. तेथूनच ते म्हणाले, ''कुठं गेली सारी पिस्तुलं ? तुमच्या स्टॉकमधलीही सगळी खलास झाली ?''

फौजदारसाहेब गंभीरपणाने म्हणाले, ''गेल्या खेपेला वैद्यजींनी पोलिसठाण्यावर जे व्याख्यान दिलं होतं त्याचाच हा परिणाम आहे. त्याने प्रभावित होऊन सगळ्या बदमाषांनी आपली पिस्तुलं या प्रदेशाच्या हद्दीबाहेर फेकून दिली आहेत. बहुतेक पिस्तुलं उन्नाव (गाव) च्या लोकांना विकून टाकली आहेत.''

बद्री पहिलवान उन्नावला गेले होते. ते अजून परत आले नव्हते. वैद्यजींनी डोळे किलकिले करून थोडावेळ विचार केला आणि किंचित् हसून म्हणाले, ''शिवपालगंजचं हवापाणी फारच उत्कृष्ट आहे. बुद्धीच्या विकासाला ते अत्यंत अनुकूल आहे.''

''मी तर तुम्हालाच इथलं हवापाणी मानतो.''

हे वाक्य उच्चारून या खेपेला फौजदारांनी 'जिन'ला मनातल्या मनात शिव्या दिल्या नाहीत. उलट ते मोकळेपणाने हसले. ते हसतच राहिले आणि 'जिन'ने जिभेलाच नव्हे तर गळ्यालाही वेगळे, चुकीचे वळण लावल्याचे त्यांच्या ध्यानातच आले नाही.

वैद्यजी निमूटपणे बसून राहिले. फौजदारांचे बोलणे त्यांनी न ऐकल्यासारखे केले होते. फौजदार जायला म्हणून हळूच उठले. ते दिवाणखान्याच्या उंबरठ्यावर पोचले इतक्यात वैद्यजींनी एखादी विसरलेली गोष्ट आठवावी त्याप्रमाणे म्हटले, ''जोगनाथाची जामीनकी बहुदा माझ्याच नावानं असेल ना ?''

फौजदार थांबले. म्हणाले, ''तसं असतं तर तुमची सही मी अवश्य करून घेतली असती. पण काही हरकत नाही. कोर्टात जामीन मिळून जाईल. तिथंच कुणाला तरी पाठवा.''

वैद्यजी गप्प राहिले. पण आता रूप्पनने साफ साफ विचारले, ''इथं जामीन घेण्यास काय हरकत आहे ?''

''चोरीच्या गुन्ह्याला जामीन चालत नाही.''

''आणि खुनाच्या ?''

फौजदार न चिडत म्हणाले, ''तुम्ही बहुदा गतवर्षीच्या नेवादाच्या खटल्यासंबंधी बोलताहात. परंतु त्या खटल्यातला गुन्हेगार टी. बी. चा पेशंट होता. त्याला कच्च्या कोठडीत ठेवून कोण हत्या विकत घेणार ?''

रूप्पनबाबू वर्तमानपत्र खाली टाकून आधीच उठून उभे राहिले होते. ते म्हणाले, ''जोगनाथ अजून तुमच्याच कस्टडीत आहे. तिथंच त्याची तपासणी करून घ्या. तोही आजारी आहे. अर्थात् त्याला टी.बी. नसून गनोरिया आहे, ही गोष्ट अलाहिदा.''

वैद्यजी थंड स्वरात म्हणाले, ''रूप्पन, सभ्यपणानं बोल. फौजदारसाहेब आपलेच

आहेत. जे काही करतील ते समजूनच करतील.''

फौजदारांनी पुन्हा म्हटले, ''मग मी आता निघूं ?''

''जरूर निघा.'' रूप्पनबाबू म्हणाले, ''ठाण्यात रामाधीन तुमची वाट पाहात बसले असतील.''

फौजदार हसले. नंतर त्यांनी नोकरशाही जीवनातील सर्वांत खेदपूर्ण घटनेचा उल्लेख केला, ''देश स्वतंत्र झालाय त्यामुळं सगळंच बदलून गेलंय. नाहीतर, रूप्पनबाबू, मोठमोठी माणसं वाट पाहात बसली असती.''

ते निघून गेल्यावर रूप्पनबाबू म्हणाले, ''ज्याला आपण लज्जतदार दर्जा समजत होतो तो तर नुसताच भुसा निघाला.'' अर्थात् हे वाक्य काहीसे स्वगत होते. त्यानंतर ते वैद्यजींना उद्देशून म्हणाले, ''मोठी बेअब्रू झाली.''

वैद्यजी शांतपणे बसून राहिले. नंतर रंगनाथ घरातून बाहेर जात असलेला पाहून ते व्याख्यान देण्याच्या ढंगात म्हणाले, ''लाभालाभ, जयाजय, मानापमान या सर्वांचा समबुद्धीने स्वीकार केला पाहिजे.''

''पिताजी गीता सांगताहेत,'' रूप्पनबाबू मनाशी म्हणाले, ''आता हा फौजदार तावडीतून सुटून कुठं जातोय बघू या.''

बाबू रामाधीन भीखमखेडवी यांच्या दारात आज भांग घोटण्याचा कार्यक्रम चालला होता. समोरच्या छपरीत जुगार चालला होता. या दोन्ही गोष्टींकडे मुळीच लक्ष न देता बाबू रामाधीन एका खाटेवर पडल्या पडल्या लंगड्याचे बोलणे ऐकत होते. लंगडा चबुतऱ्याच्या खाली उभा होता.

रंगनाथ व सनीचर त्याच बाजूने चालले होते. बाबू रामाधीननी त्यांना हाक मारून बोलावले आणि स्वतः खाटेच्या एका कोपऱ्यात बसून रंगनाथाला खाटेच्या उशाशी बसविले. सनीचरच्या बाबतीत त्यांनी कसलाच औपचारिकपणा दाखविला नाही. फक्त एवढेच म्हणाले, ''उभे का ? बसा ना सरपंच.''

रंगनाथाच्या बाबतीत हा दुसरा प्रसंग होता. तो जेव्हा पहिल्यांदा रामाधीनांच्या घरापुढून गेला होता तेव्हा तेथे भांग आणि जुगार यांचा ठावठिकाणा नव्हता. आज येथील मोसम चांगला होता. रंगनाथाने लंगड्याकडे पाहून विचारले, ''यांच कसं काय चाललंय ?''

''बहादूर माणूस आहे. बैलाची धार काढून आलाय, असंच समजा ना !'' रामाधीनांनी हातांनी खूण करून बैलाची धार काढायची म्हणजे हातांना कुठवर जावे लागते ते दाखवून दिले.



रंगनाथाने आनंदाने विचारले, ''काय झालं ? नक्कल मिळाली ?''

लंगड्याने वैष्णव संतांच्या निरिच्छपणाने उत्तर दिले, ''होय बापू, आता मिळालीच म्हणून समजा. जिल्हा कचेरीतून माझा अर्ज परत आलाय. तसं पाहिल्यास जिल्हा कचेरीत जाणारे अर्ज तिथंच हरवतात. पण माझा अर्ज हरवला नाही. तुम्हा मंडळींच्या चरणांची कृपा आहे.''

सनीचरने समजूतदारपणे म्हटले, ''फार चांगलं लक्षण आहे. अर्ज परत आला म्हणजे आता नक्कल मिळणारच.''

''केव्हा मिळेल ?'' रंगनाथाने विचारले.

लंगड्याला हा उतावळेपणा फारसा आवडला नाही. त्याने रंगनाथाला दिलासा देत म्हटले. ''नक्कल कारकून सांगत होता की आता तुझा नंबर लागलाच आहे.''

रामाधीननी सांगितले, ''जा लंगडेबुवा. तिकडे जाऊन थंडाई-बिंडाई प्या.''

रंगनाथ म्हणाला, ''आता आम्हीही निघतो, बाबू रामाधीनजी, फिरायला चाललो होतो. उशीर होईल.''

''फिरायला जाणं हे काम आहे घोडीचं. मर्द बच्चाचं ते काम नव्हे.'' ते आपलेपणाने म्हणाले, ''पाचशे जोर फटाफट काढा, लोखंडसुद्धा पचून जाईल.''

ते दोघे बाहेर पडले. परंतु जाता जाता जुगाऱ्यांच्या अड्ड्याजवळ थोडा वेळ थांबले.

खेळ दोन गटांत चालला होता. एका बाजूला अनेक इसम बसून 'कोटपीस' खेळत होते. त्यांची परिस्थिती सूक्ष्मपणे न्याहाळल्यावर असे लक्षात येत होते की कोटपीस हा बावन्न पत्त्यांनी खेळावयाचा खेळ आहे. पत्ते जुनाट, झिजलेले, आणि इतके फाटके-तुटके असले पाहिजेत की त्यातल्या दर्दी इसमाला दुसऱ्या बाजूनेही तो कोणता पत्ता आहे हे कळले पाहिजे. तो गट पाहिल्यानंतर कोटपीस हा खेळ आठ इसमांनी खेळायचा असतो हेही लक्षात येत होते. त्यांपैकी चार इसम पत्ते हातात घेऊन त्याने तोंड झाकून घेतात आणि मनावर काळजीचे भयंकर ओझे वागवतात. इतर चौघेजण एकेका खेळाडूच्या मागे बसून त्या खेळाचे 'प्रत्यक्ष वर्णन' सांगत असतात. आणि जेथे गप्प बसण्याची जरूर असते तेथे हटकून बोलतात. एवढेच नव्हे तर ते खेळणाऱ्यांसाठी तंबाखू मळणे, बिडी शिलगावणे, पाणी मागविणे आणि खाली टाकलेले पत्ते उचलणे वगैरे कामेही करतात. डाव पुरा झाल्यावर जय-पराजयानुसार जेव्हा खेळाडूंमध्ये पैशाची देवाणघेवाण होते तेव्हा खुर्दाचा तुटवडा भरून काढणे आणि जिंकलेल्या खेळाडूच्या पैशाने पान मागविण्याची जबाबदारीही त्यांच्यावरच असते. हात झालेले पत्ते मोजणे आणि हरलेला डाव फेकून देऊन कोणत्या तरी सबबीवर भांडण उकरून काढणे, ही कामेही त्यांनाच करावी लागतात. समोरच्या खेळाडूने कोणता पत्ता

खेळावा हे खुणेने सांगणे आणि त्याने तसा पत्ता टाकला की आरडा-ओरडा करून विरोध करणे हेही काम त्यांचेच असते.

रंगनाथाला हा खेळ अगदीच भांगेच्या नशेसारखा बेकार वाटला. परंतु जेव्हा त्याने दुसऱ्या गटाचे निरीक्षण केले तेव्हा शिवपालगंजच्या जुगाराविषयी त्याचे मत एकदम बदलले.

ते लोक फ्लश खेळत होते. 'लँटर्न' पासून 'लालटेन' हा शब्द बनविण्याच्या नियमानुसार या खेळाचे नाव येथे 'फल्लास' असे झाले होते. मोठ्या धूमधडाक्यात खेळ चालला होता. एकीकडे ब्लफच्या स्वयंचलित अस्त्राने हत्याकांड माजविले होते तर दुसरीकडे शुद्ध देशी चालीने एक खेळाडू पुढे चालला होता. अकस्मात त्याच्या अकलेचा हत्ती घाबरून इकडे-तिकडे सैरावैरा धावू लागला; आणि आपल्या मालकाला खाली फेकून त्याला तुडविण्यासाठी पाय उचलून उभा राहिला. त्याने पत्ते फेकून दिले आणि तिकडे जुगाराच्या डावात लावलेल्या पैशांतून मूठभर पैसे गोळा करून दुसऱ्या खेळाडूने ते आपल्या मांडीखाली दाबून ठेवले. हरलेल्या खेळाडूने कपाळाला आठीही न घालता किंवा न चिडता एक बिडी शिलगावली आणि दुसऱ्या डावाचे वाटले जाणारे पत्ते तो मख्खपणे पाहू लागला. दोन दिवसांपूर्वी रंगनाथाने याच इसमाला वैद्यजींच्या घरी आठ आणे रोजावर काम करतांना पाहिले होते. त्याचे ते धैर्य व हिंमत पाहून रंगनाथाने मनातल्या मनात त्याची वाखाणणी केली.

"दत्तात्रेय जिवंत असते तर त्यांनी या इसमाला आपला पंचविसावा गुरू केला असता," तो मनात म्हणाला. त्या खेळाडूची निर्विकारता पाहून त्याचे मस्तक आदराने - किंवा खरे सांगायचे तर त्याचे पत्ते डोकावून पाहाण्याच्या इराद्याने खाली झुकले.

ज्या आत्मविश्वासाने ते खेळत होते आणि आपल्या ढुंगणाची कातडी सुद्धा विकून ज्या आशावादाने ते ब्लफ करत होते ते पाहून रंगनाथ थक्क झाला. परदेशांकडून कोट्यावधी रूपयांची कर्जे मागणाऱ्या डेफिसिट फायनानसिंगच्या आचार्यांचे व महान् राजनितिज्ञांचे काळीजही इतके मजबूत असणार नाही. रंगनाथ मनाशी म्हणाला, "या मजुरांचे व गुराख्यांचे जीवन पाहिल्यानंतर मी आजपासून दिल्लीच्या स्वप्नसृष्टीत विहार करणाऱ्यांवर नाराज होणे सोडून देईन."

त्याने आपल्याजवळ बसलेल्या खेळाडूकडे पाहिले. या खेपेला तो पुनः डाव हरला होता. त्याने एक नवीन बिडी शिलगावली आणि तो निर्विकारपणे इकडेतिकडे पाहू लागला. रंगनाथ व सनीचर त्यांच्याकडे भकास नजरेने पाहून त्याने थोड्या अंतरावर उभ्या असलेल्या एका मजुराला पाच बोटांची खूण करून पैसे काढण्यास सांगितले. त्याने मान हलवून 'नाही' म्हणून सांगितले. तेव्हा तो उठून बाबू रामाधीन यांच्याकडे



गेला आणि तेथून लगेच परत येऊन आपल्या जागेवर पुनः पुर्ववत् बसला. त्याचा चेहरा पूर्वीप्रमाणेच निर्विकार होता. पत्ते उचलून त्याने अर्धवट जळालेली बिडी दूर फेकून दिली आणि एक ढेकर दिला. नंतर त्याने पाच रूपयांची नोट फेकली आणि बाकी रूपये परत घेण्याची फिकीर न करता एक डाव टाकला. दुसऱ्या बाजूला एका खेळाडूने म्हटले, "या खेपेला एखादा मोठा पत्ता आलेला दिसतोय."

रंगनाथाने वाकून पाहिले. तो पुनः पूर्वीप्रमाणेच ब्लफ खेळत होता.

परदेशी मदत कोणत्या कारणांसाठी, कोणत्या प्रसंगी व कसा चेहरा करून मागितली पाहिजे. याचा पदार्थपाठ रंगनाथाच्या डोळ्यांसमोर दिसत होता.

## १८

शहरामध्ये चहाचे हॉटेल, कमेटीरूम, ग्रंथालय व विधानसभा यांचा जो उपयोग असतो तोच खेड्यामध्ये रस्त्याच्या कडेला असलेल्या छोट्या पुलाचा असतो. लोक तेथे बसतात आणि गप्पा मारतात. यावेळी, सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास, रविवारी, रंगनाथ आणि रूप्पनबाबू एका पुलावर बसून उन्हं खात होते आणि जागतिक परिस्थितीसंबंधी विचार करीत होते.

जागतिक परिस्थिती म्हणजे अंधारात झालेला दोन मजबूत स्तनांचा गरमागरम स्पर्श-विषय, रंगनाथाने काढला होता. त्या दिवशीच्या रात्रीची घटना कोणाला सांगू नये अशी त्याची इच्छा होती. रूप्पनशी तो फक्त सामान्य ज्ञानाविषयी चर्चा करू इच्छित होता. तसेच आपल्या गल्लीत, चोळ्या बनविणाऱ्या एखाद्या कंपनीला मॉडेल म्हणून वापरता येतील अशा कोणकोणत्या मुली आहेत, याचीही माहिती त्याला हवी होती. त्याने रूप्पनशी या विषयाचे सूतोवाच केले तेव्हा जणू तो त्या कंपनीचा प्रचार अधिकारी असून मुली आणि त्यांचे स्तन यांविषयीचे त्याचे कुतूहल अगदीच व्यावसायिक स्वरूपाचे असावे असे वाटले. रूप्पनबाबूंनी जेव्हा त्याच्याशी या विषयासंबंधी जरा खोलात शिरून चर्चा करण्याचा प्रयत्न केला तेव्हा सखोल चर्चेमध्ये प्रत्येक भारतीय विद्यार्थी जसा इकडे-तिकडे भटकू लागतो तसा रंगनाथही कातडे

बचावण्याचा प्रयत्न करू लागला. मूळ विषयाला कलाटणी देऊन मुलींच्या आरोग्याकडे तो वळला आणि 'दि ग्रेट इंडियन ब्रा मॅन्युफॅक्चरिंग कंपनी' च्या प्रचार अधिकाऱ्याच्या पदाचा राजीनामा देऊन 'अखिल भारतीय नागरिक आरोग्य संघटने' च्या सरचिटणीसाचा हुद्दा त्याने सांभाळला. परंतु रूप्पनबाबूंच्या प्रश्नांनी त्याला त्या खुर्चीवरही टिकू दिले नाही आणि थोडा वेळपर्यंत काळोख, थंडी, भूतपिशाच इत्यादींची चर्चा केल्यानंतर रंगनाथाला असे आढळून आले की हळूहळू, इच्छा नसतांनाहीं, त्या रात्रीच्या घटनेचे सविस्तर वर्णन आपण रूप्पनबाबूसमोर करून चुकलो आहोत.

रूप्पनबाबू अत्यंत लक्षपूर्वक ऐकत राहिले, आणि रंगनाथाचे बोलणे पूर्ण होईपर्यंत आपण भट्टीत बसलो आहोत असा त्यांना भास होऊ लागला. नेहमी तरुण मुलींविषयी गप्पा सुरू झाल्या की त्यांना आपल्या शरीरात एक विचित्र उष्णता व ताण भासू लागे. तसेच यावेळी झाले. गच्चीवर आलेली मुलगी बेलाच असली पाहिजे आणि ज्यांना ती आत्मसमर्पण करू इच्छित होती ते आपण स्वतःच होतो याविषयी रूप्पनबाबूंची खात्री झाली. ''माझं प्रेमपत्र आता परिणाम दाखवू लागलंय, आणि ती तळमळते आहे,'' ते अभिमानाने मनात म्हणाले, आणि त्याच बरोबर स्वतःही तळमळू लागले. त्या रात्री आपण स्वतः गच्चीवर का झोपलो नाही, याची हळहळ रूप्पनबाबूंना अगदी असह्य झाली आणि एक फिल्मी गाणे त्यांच्या घशात घुटमळू लागले. परंतु यावेळी त्यांना रंगनाथासमोर एक समजदार तरुण म्हणून आपली प्रतिभा रुजू करावयाची होती. म्हणून ते वरवर पाहाता एखाद्या समजदार तरुणाप्रमाणे बसून राहिले. ते गप्प बसलेले पाहून रंगनाथाने आपला मुद्दा पुनः घोकून सांगितला, ''ती केव्हा आली आणि केव्हा गेली ते मला कळलंच नाही. मला फक्त एवढंच आठवतंय की ती माझ्या छातीवर ओणवी झाली होती, आणि . . . .'' रूप्पनबाबू मोठेपणाचा आव आणून म्हणाले, ''होतं असं कधी - कधी. आपल्याला भासही होतो. तो कोण होता, खरोखरी कुणी आला होता तरी काय, काही सांगता येत नाही. कुणाला हे तू सांगू नकोस. गांवढळ लोकांचा मामला आहे. भूतपिशाचांचे विचार त्यांच्या डोक्यात येऊ लागतील. तू कुणा - कुणाची म्हणून समजूत घालणार रंगनाथदादा ? तू आपलं तोंड बंद ठेव. कुणी सांगावं, ते स्वप्नही असेल, किंवा कदाचित् खरंही असेल.

या व्याख्यानामध्ये रंगनाथाला दोन आक्षेपार्ह मुद्दे आढळले. पहिला असा की रूप्पनबाबू त्याचा प्रत्यक्ष अनुभव हे एक स्वप्न आहे, असे म्हणून टाळाटाळी करू इच्छितात, आणि दुसरा असा की ते पुनःपुनः त्या मुलीसाठी पुल्लिंगाचा वापर करीत होते. तो म्हणाला, ''यात भास होण्याचा सवालच नाही. मी जागा होतो. ती येऊन माझ्या खाटेवर बसली, माझ्या छातीवर वाकली. . . .''



''ठीक आहे, ठीक आहे.'' आपल्या हाताने काही काल्पनिक डास उडवून लावत रूप्पनबाबू म्हणाले, ''कबूल आहे. खरोखरीच कुणी आला होता. पण यासंबंधी कुठं काही बोलण्याची जरूर नाही.''

कुणी आला होता ! रंगनाथाने डोळे मिटून एकदा कोणार्कच्या सुरसुंदरीचे ओझरते स्मरण केले आणि मनातल्या मनात वीसदा घोकले, ''आला होता नव्हे, आली होती. ती आली होती. रूप्पनबाबू, तुम्ही अजून 'आला होता' च्या पुढे विचार करू शकणार की नाही ?''

कोणा एका गावात कोणा एकाने कोणाचा तरी खून केला. दुसऱ्या कोणाचे तरी वैर साधण्यासाठी त्याचे नाव पोलिसठाण्यात खुनी म्हणून नोंदविण्यात आले. नंतर दुसऱ्या एकाने आपले वैर आठवून सूड उगविण्यासाठी त्याच्या विरूद्ध साक्ष देण्याचे कबूल केले. नंतर कोणीतरी कोणाकडेतरी त्याचा वशिला लावला, कोणीतरी त्याच्या वतीने कोणाला तरी लाच चारली. कोणीतरी कोणा साक्षीदाराला धमकी दिली, कुणाला बेवकूफ बनविले आणि कुणावर तरी प्रेम दर्शविले. अशा प्रकारे खटला कोर्टात जाऊन उभा राहीपर्यंत त्याचे स्वरूपच बदलून गेले आणि तो खुनाचा खटला न राहाता 'खूनका बदला' (खुनाचा सूड) नावाचे ते एक नाटकच बनले. दोन्ही बाजूंच्या वकिलांनी फार उत्कृष्ट भूमिका पार पाडल्या आणि नाटक या दृष्टीने एक चांगली कृती प्रस्तुत करण्यात आली आहे, याविषयी जज्जाची खात्री पटली. परंतु पुरावा म्हणून पेश करण्यात आलेली गोष्ट वस्तुतः फसवणूक आहे, हेही त्याच्या लक्षात आले. अखेर या फसवणुकीची थियरी इतकी परिणामकारक ठरली की आरोपी निर्दोष असल्याचे तर जज्जाने निकालपत्रात नमूद केलेच; शिवाय खून झालाच नव्हता असेही त्याने गृहीत धरले. परिणामतः ''आरोपी हरीराम यास खुनाच्या आरोपातून सन्मानपूर्वक मुक्त करण्यात येत आहे.''

आरोपी हरीराम केवळ जज्जाच्या म्हणण्याने सन्मानयुक्त किंवा अब्रूदार बनले नाहीत. ते पूर्वीप्रमाणेच गुंड राहिले. परंतु तुरुंगातून सुटून येताच त्यांनी आसपासच्या गावातील तमाम अब्रुदार समजल्या जाणाऱ्या लोकांना - म्हणजे स्त्रिया, अस्पृश्य व मुसलमान वगळून सर्व प्राणीमात्रांना - एक मेजवानी दिली. परिणामतः त्या दिवशी शिवपालगंजमधील सर्व प्रमुख लोक शेजारच्या गावी हरीरामच्या घरी मेजवानी झोडण्यास गेले आणि वैद्यजींच्या घरी रंगनाथ एकटाच उरला.

दिवसभर त्याचा वेळ निष्प्रभ, रटाळ, कंटाळवाण्या व्याख्यानासारखा गेला.

संध्याकाळी तो फिरायला बाहेर पडला. त्याने पाहिले, प्रिन्सिपॉल साहेब एका पानावाल्याच्या दुकानासमोर उभे आहेत.

ते पान चघळत होते आणि पानपट्टीवाल्याला त्याची किंमत देण्याचा प्रयत्न करीत होते. पानवाला त्यांना पान दिल्यानंतर 'हे दुकान तुमचंच आहे,' असे समजावून सांगत होता. एवढ्यात रंगनाथ तेथे जाऊन पोचला आणि प्रिन्सिपॉलसाहेब गंभीरपणे दुकानातील सामानसुमानाचे निरीक्षण करू लागले. एका चौकटीत रंगीबेरंगी चित्रकलेच्या मदतीने बसलेले महात्मा गांधी अक्राळ - विक्राळ हास्य करीत होते. त्यांचे उत्तराधिकारी नेहरू हात जोडून उभे होते. निष्कर्ष असा की एक रंगीत तेल लहान मुलांच्या डांग्या खोकल्यावर रामबाण औषध होते. रंगनाथ प्रिन्सिपॉलना म्हणाला, ''पाहिलं तुम्ही ?''

प्रिन्सिपॉलनी उत्तरादाखल एका अवधी भाषेतील म्हण सांगितली, ''जइस पसु तइस बँधना (जसे जनावर तसे दावे.) ग्रामीण भागात शोभेल असंच हे चित्र आहे.''

''यात ग्रामीण आणि शहरी यांचा काय संबंध ?'' रंगनाथ म्हणाला, ''गांधीजींचा आदर सगळेजणच करतात.'' थोडा वेळ तसबिरीचे अध्ययन केल्यावर त्याने तिची भावपूर्ण समीक्षा केली, ''असं वाटतं, हे चित्र बनवणाऱ्याला शंभर जोडे मारावेत.''

प्रिन्सिपॉल साहेब हसले. रंगनाथ बेवफूक आहे, असेच ते हास्य सूचित करीत होते. ते म्हणाले, ''जितका गूळ मिसळावा तितकं ते गोड होणार. तेल्या-तांबोळ्यांची लायकी ती काय ? दीड दमडीच्या दुकानात कुणी साला पिकासो थोडाच लटकावणार ?''

रंगनाथाने त्यांच्या विधानाचे खंडन करीत जोराने म्हटले, ''थांबा, थांबा मास्टर साहेब ! पिकासोचं नाव घेऊ नका. तुमच्या तोंडून असलं नाव ऐकलं की मूर्च्छाच येऊ लागते.''

दोघेही रस्त्यावर आले होते आणि गायी - म्हशींच्या गर्दीत हवा खाऊ लागले होते. वस्तुतः हवा अशी तिथे नव्हतीच. फुफ्फुसात घुसणारी धूळ होती, नाकात घुसायला शेणाची घाण होती आणि पाठीत घुसण्यासाठी गोमातेची शिंगे होती.

रंगनाथाच्या बोलण्याचा प्रिन्सिपॉल साहेबांवर इतका वाईट परिणाम झाला की ते गंभीर बनले आणि अगदी सभ्य गृहस्थांसारखे बोलू लागले. ते म्हणाले, ''म्हणजे काय ? रंगनाथजी, तुम्ही मला अगदीच अशिक्षित समजता की काय ? मीही इतिहास घेऊन एम्. ए. झालोय आणि मला एकोणसाठ टक्के मार्क मिळालेत. आता मी इथं प्रिन्सिपॉल आहे, हा काळाचा महिमा म्हणायचा.''

गंभीर संभाषणाने रंगनाथाची हवाच काढून टाकली. पिकासोच्या नावाने आपण जी थट्टा केली तिच्यामुळे प्रिन्सिपॉल साहेबांचे मन दुखावले असावे, असे त्याला वाटले.



त्याने त्यांची क्षमा मागितली तो म्हणाला, ''ते मला आधीच माहीत होतं. तुम्ही खालच्या वर्गात पास झाला असता तर इथं थोडेच आला असता !''

''ते तर खरंच.'' प्रिन्सिपॉल म्हणाले, ''तसं झालं असतं तर मीही एखाद्या युनिव्हर्सिटीत लेक्चरर झालो असतो. माझे कित्येक थर्डक्लास दोस्त युनिव्हर्सिटीतच लागले आहेत.''

प्रिन्सिपॉल थोडावेळ अन्यमनस्कपणे चालत राहिले. ते भावनाप्रधान बनण्याचा प्रयत्न करीत होते. थोड्या वेळानंतर ते म्हणाले, ''बाबू रंगनाथ, तुम्हा लोकांना माझ्याविषयी काय वाटत असेल ते मी जाणतो. तुम्हांला वाटत असेल की हा एका कॉलेजचा प्रिन्सिपॉल असूनही असा गांवढळ का आहे ? सर्वांसमोर हँ हँ करीत असतो. बरोबर आहे. मी सर्वांचं म्हणणं नम्रपणानं ऐकून घेतो. आता त्या खन्ना - बिन्नांची गोष्ट अलाहिदा. ते साले पोरकट आहेत. विशेषतः आपल्यापेक्षा वडील मंडळींचं म्हणणं ऐकून मी नेहमी त्यांना पाठिंबा देतो. आता तुम्ही मला बेवकूफ समजता. पण त्याचंही एक कारण आहे.''

''ते कारण असं की ... '' असे म्हणून ते एका म्हशीला वाट करून देण्यासाठी रस्त्याच्या कडेला उभे राहिले आणि हसू लागले.

''कारण असं की बुद्धिमत्ता ही जशी एक व्हॅल्यू आहे तशीच बेवकूफी हीही तिच्यापुरती एक व्हॅल्यू आहे. मूर्खपणाची गोष्ट तुम्ही वाटलं तर मान्य करा किंवा खोडून काढा, त्यामुळं तिचं काहीच बिघडत नाही. जो बेवकूफ आहे तो बेवकूफच राहाणार. म्हणून मूर्खांच्या वाटेला कधी जायचं नाही, हे माझं तत्त्व आहे.

''कधी-कधी असं करतांना लोक मलाच मूर्ख समजतात. पण वस्तुतः तेच मूर्ख असतात. काय समजलात बाबू रंगनाथ ?''

प्रिन्सिपॉल साहेबांच्या तोंडून एका दमात एवढे व्याख्यान ऐकून रंगनाथ चक्रावला. एवढ्यात एक खोंडाने त्यांच्या पाठीत शिंग खुपसण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला काही इजा झाली नाही. कारण प्रिन्सिपॉलनी त्याचा हात धरून बाजूला खेचले. त्यांच्या त्या बुद्धिमान रूपाचे दर्शन एक आगळाच अनुभव होता. आपल्याला केव्हा हसू आले आणि आपण केव्हा हँ हँ करू लागलो हे त्याला कळलेच नाही. दुसऱ्याच क्षणी तो प्रिन्सिपॉल साहेबांची जवळजवळ माफी मागत म्हणू लागला, ''जी, जी, तुम्हांला पिकासोची चांगली माहिती आहे, याची मला कल्पना आहे. जी, तसं काही नाही. जी, बस्स, एवढाच मुद्दा होता की त्याचं नाव तुम्ही शिवपालगंजमध्ये घेतलं. आता तुम्हीच विचार करा, इथं पिकासोचं नाव ऐकण्याची कल्पना तरी कुणी करू शकेल काय ? म्हणूनच मला गरगल्यासारखं झालं. जी, चूक तुमची नाही अथवा माझी नाही, शिवपालगंजची नाही किंवा पानपट्टीवाल्याची नाही. जी, खरी चूक पिकासोचीच

आहे.''

प्रिन्सिपॉलसाहेब रंगनाथाच्या व्यक्तित्वाचे विघटन व चूर्णीकरण पाहात राहिले. नंतर आवाज आणखी गंभीर करून म्हणाले, ''कधीकाळी मी लायकीच्या गोष्टी बोलत असे. त्यावेळी मी एम्. ए. च्या वर्गात होतो. कोणता प्रोफेसर लायक आहे आणि कोणता ईडियट आहे याचा विचार न करता मी प्रत्येकासमोर स्वतःचं शहाणपण उघडं करून दाखवीत असे. त्या प्रयत्नात एक प्रोफेसर उखडला आणि मी चांगलाच फसलो.''

''कळलं बाबू रंगनाथ ?''

आता ते गावच्या बाजारपेठेतून बाहेर आले होते. संध्याकाळ होऊ लागली होती. भडभुंजाच्या भट्टीचा धूर वर जाण्याऐवजी खालीच पसरला होता. सूर्यास्त झाला होता. परंतु अजून इतका प्रकाश होता की भडभुंजाच्या दुकानावर बसलेली त्याची पोरगी पाहून रंगनाथाने मनातल्या मनात ओळखले की ती बघण्यालायक आहे. लोकवस्तीचा भाग सुमारे पन्नास यार्ड अंतरावर राहिला होता आणि शहराचा असा ओसाड भाग सुरू झाला होता, जेथे माणूस कविता, वाटमारी किंवा शौच सुद्धा करू शकत असे. परिणामतः कविता व वाटमारी करण्यास असमर्थ असलेली मुले रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बसून शौचकर्म करीत होती आणि एकमेकांच्या अंगावर ढेकळे फेकत होती. तेथून थोड्याच अंतरावर अनेक प्रौढ व अनुभवी स्त्रिया त्याच हेतूने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ओळीत बसल्या होत्या. त्या ठिकाणची त्यांची निर्लज्ज उपस्थिती नवभारताच्या निर्मात्यांच्या नावाला बट्टा लावीत होती. परंतु त्या निर्मात्यांना याची काहीच कल्पना नव्हती. कारण ते बहुदा यावेळी आपल्या बंगल्यातील सर्वात लहान परंतु भपकेबाज खोलीत कमोडवर बसल्या बसल्या वृत्तपत्र, बद्धकोष्ठता आणि परदेशगमन या समस्यांचा विचार करीत असले पाहिजेत.

या दोघांना पाहून त्या स्त्रिया शौचाचा कार्यक्रम एकदम तहकूब करून झटकन उभ्या राहिल्या आणि त्यांना जणू 'गार्ड ऑफ ऑनर' देऊ लागल्या. हे रोजचेच दृश्य होते. रंगनाथ व प्रिन्सिपॉल निःसंकोचपणे चालत राहिले. त्या बायकाही आरामात उभ्या राहिल्या. में में करणारी एक शेळी रंगनाथ व प्रिन्सिपॉल यांना धक्का मारून रस्त्याच्या कडेला गेली आणि एका बाईजवळ असलेला पाण्याचा लोटा लवंडून जवळच्या बागेत घुसली. काही मुले ढेकळे फेकण्याच्या व दुसऱ्या नैसर्गिक कामाबरोबरच ओरडूही लागली. काही मुले त्याच स्थितीत उठून त्या शेळीच्या मागे धावू लागली. हे सारे वातावरण पाहून रंगनाथ व प्रिन्सिपॉल थोडा वेळ स्तब्ध राहिले. सुमारे दहा यार्ड दूर गेल्यावर त्यांनी मागे वळून पाहिले. बायका रस्त्याच्या कडेला पुनः पूर्वीसारख्या बसल्या होत्या. प्रिन्सिपॉल साहेब पुढे बोलू लागले.



''त्याचं असं झालं रंगनाथ बाबू, की माझा प्रोफेसर माझ्यावर उखडला आणि मग त्याचं माझं फाटतच गेलं. माझ्या प्रत्येक गोष्टीत तो दोष काढू लागला. अखेर त्यानं माझा क्लास घालवला आणि मग तो तिथं असेपर्यंत मला युनिव्हर्सिटीत जागा मिळणार नाही, हे देव बोलून चुकला. फार मोठं रामायण आहे ते. कुठवर सांगत राहू ? त्या साल्याला मी छेडलं नसतं तर आज मी त्याच्या जागेवर असतो.''

एवढे बोलून प्रिन्सिपॉल साहेब गप्प राहिले. थोडा वेळ दोघेही निमूटपणे चालत राहिले. नंतर प्रिन्सिपॉलच म्हणाले, ''अशा प्रकारे अनेकदा धक्का खाल्लाय. अखेर मी या निष्कर्षावर पोचलो की सगळीकडे असंच चालायचं. चालू द्या. सगळे लेकाचे फासेपारधी आहेत. तिथं साल्या तूच एकटा तिसमारखान बनून काय होणार ? आता अशी स्थिती आहे रंगनाथ बाबू की, तुम्ही काही सांगितलंत तर हाँ भैया, बहुत ठीक ! वैद्यजींनी काही म्हटलं तर हाँ महाराज, बहुत ठीक ! रूप्पनबाबूंनी काही सांगितलं तर हाँ पहिलवान, बहुत ठीक ! जे काही म्हणाल ते सारं ठीकच आहे.''

प्रिन्सिपॉलना अडवायची हिंमत रंगनाथाला झाली नाही. तो म्हणाला, ''ठीकच आहे प्रिन्सिपॉल साहेब.''

अचानक प्रिन्सिपॉल साहेब जोषात येऊन म्हणाले, ''ठीक तर आहेच रंगनाथ बाबू ! मला चार-चार बहिणींची लग्नं करायची आहेत. जवळ एक फुटकी कवडी नाही. वैद्यजींनी कान पकडून कॉलेजातून काढून टाकले तर कुणी भीक सुद्धा घालणार नाही. आता तुम्हीच सांगा, या साल्या खन्ना-बिन्नाला आपला बाप समजून चालू की वैद्यजींना ?''

या संभाषणातून प्रिन्सिपॉल साहेबांच्या व्यक्तिमत्वातील एका मोठ्या मानवी पैलू समोर येऊ लागला होता. परंतु त्यांच्या बोलण्यातून आता त्यांचा नेहमीचा पैलू समोर येऊ लागला होता. परंतु त्यांच्या बोलण्यातून आता त्यांचा नेहमीचा गावढळपणा जास्त डोकावू लागला होता. त्यामुळे त्याचा परिणाम होत नव्हता. रंगनाथ पूर्वीप्रमाणेच हलका झाला. तो म्हणाला, 'छेः छेः ! तुम्ही जे काही करताहात ते योग्यच आहे, आणि जिथं आहांत तिथंही योग्यच आहात. युनिव्हर्सिटीत प्रोफेसर होण्यासारखे काय आहे ? इथं तुम्ही कुणा व्हाइस चॅन्सलरपेक्षा कमी आहात ?''

इतक्या वेळानंतर प्रिन्सिपॉलसाहेब हसले. ते म्हणाले, ''अगदी बरोबर. मी तर स्वतःला व्हाइस चॅन्सलरपेक्षाही जास्त चांगला समजतो. व्हाइस चॅन्सलरचं जीवन म्हणजे नरक आहे. सकाळी उठल्यापासून आपली मोटार घेऊन प्रत्येक एक्झिक्युटिव्ह वाल्याला सलाम करीत त्याला फिरावं लागतं. कधी चॅन्सलर येणार, कधी मिनिस्टर तर कधी सेक्रेटरी. गव्हर्नर वर्षातून निदान चार वेळा तरी कानपिचक्या देतो. अहोरात्र क्यंव क्यंव च्यंव च्यंव. विद्यार्थी आया-बहिणींवरून शिव्या देत समोरून मिरवणूक

नेतात. नेहमी मार खाण्याची भीती. पोलिसांना फोन केला की कप्तान हसतो. म्हणतो, "पाहा, हे व्हाइस चान्सलर. वर्षातून दहावीस वेळा विद्यार्थ्यांवर लाठीमार केल्याशिवाय यांना चैनच पडत नाही. अशी आहे स्थिती, बाबू रंगनाथ !"

खाकरून ते पुढे म्हणाले, "अजून प्रिन्सिपॉलकी मध्ये ही आफत नाही. आणि जिथं वैद्यजी मॅनेजर आहेत तिथं प्रिन्सिपॉल हा पुरा सिंहच आहे असं समजा. आम्हाला कुणाची खुशामत करायची गरज नाही. वैद्यजींची कास धरून आहोत आणि इतर सर्वांची जोड्यांशी गाठ आहे. तुमचं काय मत आहे रंगनाथ बाबू ?"

"अगदी बरोबर आहे तुमचं म्हणणं."

"आणि खरं विचाराल तर मला युनिव्हर्सिटीत लेक्चरर न होण्याचेही मुळीच दुःख नाही. तिथं तर नरकच आहे. अगदी कुंभीपाक नरक. रात्रंदिवस खुशामत. एखादं सरकारी बोर्ड दहा रूपयांची ग्रँट देतं आणि मग कान पकडून जसा हवा तसा थीसिस लिहवून घेतं. ज्याला बघावं तो कसला ना कसला रिसर्च प्रॉजेक्ट घेऊन बसलाय. म्हणे, आम्ही रिसर्च करतो आहोत. रिसर्च कसला डोंबलाचा ? ज्याची पोळी खातात त्याची टाळी वाजवतात. आणि स्वतःला काय म्हणवतात ? पाहा, आता तोंडात आला होता शब्द. काय बरं ? हां, हां, आठवला. म्हणवतात स्वतःला बुद्धिजीवी. असले हे बुद्धिजीवीही विलायतेची एक वारी करण्यासाठी आपण आपल्या बापाची अवलाद नाही असं सिद्ध करायची जरूर भासली तर तेही सिद्ध करून देतील. भर चौकात दहा जोडे मारा पण एकदा अमेरिकेला पाठवा असले हे बुद्धिजीवी."

थोडा वेळ थांबून ते पुढे म्हणाले, "आमचा आपला एक खाक्या. वैद्यजींची खुशामत करायची, पण इतर कुणासमोर मान वाकवायची नाही. लेक्चरर होणं आपल्याला जमायचं नाही."

प्रिन्सिपॉलसाहेबांनी मान हलवून लेक्चरर बनण्यास नकार दिला, आणि त्यांच्या चेहऱ्यावरून जगातील सर्व विश्वविद्यालयांमध्ये शोकाकुल वातावरण पसरले असल्याचा भास होऊ लागला.

"अगदी बरोबर आहे तुमचं म्हणणं." रंगनाथ म्हणाला.

प्रिन्सिपॉलनी रंगनाथाकडे निरखून पाहिले आणि अचानक किंचित् स्मित करून ते हळूच म्हणाले, "काय भानगड आहे बाबू रंगनाथ ? माझ्या प्रत्येक विधानाला तुम्ही आपले 'ठीक आहे' म्हणताहात !"

रंगनाथाने उत्तर दिले, "मी विचार करतो आहे की तुमच्या अनुभवापासून आपणही काही शिकावं. एखाद्याचा मुद्दा खोडून काढण्यात काय फायदा ? तुम्ही जे म्हणता ते बरोबरच आहे."

प्रिन्सिपॉल खदखदून हसले. "म्हणजे तुम्हीही योग्यच बोलत होता रंगनाथ बाबू !



मी जेव्हा तुमच्यासमोर पिकासोचं नाव घेतलं तेव्हा तुम्हालांही खरोखरी मूर्च्छा आली असणार. मला ते समजतंय." यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. अशा गोष्टींचा परिणाम यंत्रावर सुद्धा होतो. मी तुम्हाला एक घटना सांगतो :-

"एक विमान भारतातून इंग्लंडला चाललं होतं. त्या विमानात तंबाखूचा एक व्यापारीही बसला होता. साल्याचं सगळं आयुष्य बिडी-सिगारेटचा धंदा करण्यात गेलं होतं. अकस्मात त्याला काय सुचलं कोण जाणे, तो लिटरेचर आणि फिलॉसफीच्या गोष्टी करू लागला. बस्स ! ताबडतोब विमानाची इंजिनं बंद पडली आणि ते एकदम हजार फूट खाली आलं. हलकल्लोळ माजला. लोकांना वाटलं की ॲक्सिडेंट झाला. परंतु एवढ्यात सगळं काही ठीक-ठाक झालं. इंजिनं पुनः चालू लागली.

"विमानाच्या इंजीनियरनं तपास सुरू केला तेव्हा त्याला काय आढळलं माहीत आहे तुम्हाला ? त्याला असं आढळून आलं की तंबाखूच्या व्यापाऱ्यानं कार्ल जेस्पर्सचं नाव घेतलं होतं. त्या धक्क्यानंच विमानाची इंजिनं एकदम बंद पडली होती. त्यानंतर सर्व प्रवाशांनी त्या व्यापाऱ्याची मनधरणी करायला सुरूवात केली की बाबा रे, एक तर तू गप्प बैस, नाही तर फक्त तंबाखूविषयी काय बोलायचं ते बोल. नाही तर ॲक्सिडेंट होईल."

रंगनाथ हसून म्हणाला, "आज तुम्ही खूप गमतीच्या गोष्टी सांगता आहात."

प्रिन्सिपॉल उदास होऊन म्हणाले, "मी रोज तुम्हाला अशा गोष्टी सांगू शकेन. पण तुम्ही आमच्या वाऱ्यालाही उभे राहात नाही. आजकाल तुम्ही खन्ना मास्टरांच्या प्रेमात सापडलाय."

ते परत चालले होते. अंधार पसरला होता आणि हवेत गारवा आला होता. रस्त्याच्या कडेला एके ठिकाणी काही वणजारे उतरले होते. ते शेकोटीजवळ बसून पांढरपेशा लोकांना न कळणाऱ्या अशा एका भाषेत आपसात बोलत होते. प्रिन्सिपॉल साहेब जातांना ज्याप्रमाणे गायी-म्हशींच्या कळपाला निःस्पृहपणे ओलांडून पुढे गेले होते त्याचप्रमाणे या भटक्या लोकांची वस्ती ओलांडून ते पुढे गेले. रंगनाथाने मागे वळून फक्त एकदा पाहिले आणि केवळ एवढेच म्हटले, "थंडी खूप जोरात पडलीय."

प्रिन्सिपॉलसाहेब हवामानाविषयी काही बोलण्यास तयार नव्हते. ते अजून आपल्या पूर्वीच्या मुद्यावरच अडून बसले होते. ते म्हणाले, "तुम्हा लोकांना अजून माणसाची पारख नाही. मी असं ऐकलंय की रूप्पनबाबू खन्नाच्या गोटात शिरलेत. पण रंगनाथ बाबू, तुम्ही विचार करायला हवा की अखेर हा खन्ना मास्टर किस झाडकी पत्ती आहे ? खन्ना मास्टर म्हणजे एक नंबरचा इरसाल आहे. त्या दिवशी कॉलेजात मारामारीपर्यंत पाळी आली ती त्याच्या मुळंच ना ? त्याचं काही गेलं नाही. पण कॉलेजचं नाव बदनाम झालं."

रंगनाथ म्हणाला, ''पण मी तर ऐकलं होतं की झगडा दोन्ही बाजूंनी झाला होता.''

प्रिन्सिपॉलसाहेब साधुसंतांप्रमाणे म्हणाले, ''तुमच्या ऐकण्यानं काय होतंय बाबू रंगनाथ ? आता ते प्रकरण कोर्टात गेलंय, मॅजिस्ट्रेटला जसं योग्य वाटेल त्याप्रमाणं तो निकाल देईल.''

''पण गोष्ट फार वाईट झाली.''

''वाईट ? अहो, शरमेनं मान खाली घालायची पाळी आलीय, रंगनाथ बाबू ! पण हे खन्ना मास्टर एवढे अब्रूदारही नाहीत. आम्हांलाच त्यांच्या गळ्यात धोंडा बांधावा लागेल, तेव्हा ते बुडतील.''

सरकारी प्रचार खात्याच्या निःस्पृहतेने (कोणी ऐको अथवा न ऐको, आम्ही सांगत राहाणार) ते सांगू लागले, ''पोलिसांनी जबरदस्तीनं दोन्ही पक्षांवर १०७ कलमाखाली खटला भरलाय. याला म्हणतात पोलिसी हरामखोरपणा. बदमाषी केली खन्नानं, मारामारीला सुरूवात केली त्याच्या साथीदारांनी आणि खटला भरलाय त्यांच्यावर नि आमच्यावरही. याला म्हणतात अंधेर नगरी चौपट राजा ! (अंधेर नगरी व झोटिंग पादशाही !') कालच सुनवणी होती. आम्हांला सांगण्यात आलं की आपसात तडजोड करा. आम्ही सांगितलं की तडजोड कसली ? सरळसरळ आम्हांला फाशी द्या म्हणजे निकाल लागला. शिवपालगंजमध्ये खन्ना मास्टर आणि त्यांचे गुंडच उरले म्हणजे भांडण-तंटा उरणारच नाही.''

''आम्ही निमूटपणे परत आलो. तिकडे त्यांनी सत्तर पोरं गोळा केली आणि 'प्रिन्सिपॉल मुर्दाबाद' च्या घोषणा द्यायला सुरूवात केली. शहरातील कचेरी. शेकडो भली मंडळी जमलेली होती. त्यांनी विचारलं की हे लोक कोण आहेत ? त्यावर खन्ना मास्टरानं स्वतःच सांगितलं की, ''हे छंगामल कॉलेजचे विद्यार्थी आहेत.'' याला म्हणतात पक्का बेशरम.

''समजलांत बाबू रंगनाथ ? असे आहेत तुमचे खन्ना मास्टर. रूप्पनबाबूंना म्हणावं त्यांच्या नादाला लागू नका. नाहीतर रडायची पाळी येईल एखाद्या दिवशी.''

ते पोलिस ठाण्यासमोरून जाऊ लागले. कित्येक शिपाई कंदील घेऊन इकडे तिकडे फिरत होते. गलबला चालला होता. काही मुले रस्त्यावर उभी राहून कोरसगीताप्रमाणे गात होती. चौकीशेजारी फौजदाराच्या क्वार्टरसमोर तीन ट्रक उभे होते. त्यांत सामान भरले जात होते. शिपायांची धावपळ व गलबला यांचे खरे कारण हेच होते.



प्रिन्सिपॉल साहेब म्हणाले, ''फौजदाराची उचलबांगडी झाली वाटतं.''

असे म्हणता म्हणता त्या वाक्याचा संपूर्ण अर्थ सर्वांत आधी त्यांच्याच लक्षात आला. रंगनाथाचा खांदा हलवून ते म्हणाले, ''असं आहे तर ! या भागात दुर्गंधी पसरली होती. आता घाण जाईल सारी.''

रंगनाथ म्हणाला, ''इतक्या लौकर कसा काय हुकूम आला कोण जाणे ! दुपारपर्यंत तर काही बातमी नव्हती.''

प्रिन्सिपॉल साहेबांची खुषी दुथडी भरून वाहात होती. असे वाटत होते, जणू ते दोन्ही हात पसरून एकदम हवेत उडणार आणि समोरच्या झाडाच्या फांदीवर बसून बुलबुलासारखा एखादा तराणा छेडणार ! ते म्हणाले, ''बाबू रंगनाथ, इतके दिवस आपल्या मामांच्या सहवासात राहूनही तुम्ही त्यांना ओळखलं नाही. याच्या आधीच्या ठाणेदाराला यांनी बारा तासात शिवपालगंजहून पळवून लावलं होतं. यांना मात्र चोवीस तासांची मुदत मिळालेली दिसते.''

ते पुटपुटू लागले, ''वैद्यजींच्या पुढे कुणाचं काय चालणार ? ज्या दिवशी फौजदारांनी जोगनाथाला जामिनावर सोडलं नाही त्याचवेळी त्याचे दिवस भरल्याचं मी ओळखलं. त्यात पुनः आमचा कलम १०७ चा मामला. आता तुम्हीच सांगा बाबू रंगनाथ, माझ्यावर खटला भरण्याची काय गरज होती ? पण यांना कुणी सांगायचं ? रामाधीन यांचे बाप बनले होते ना ! ते यांना वाटेल तसं नाचवत होते. अखेर परिणाम काय झाला ? दहा दिवस उलटले नाहीत तोच उचलबांगडी झाली की नाही ?''

विद्यार्थ्यांचा कोरस पूर्ववत् चालू होता. ''फौजदारांची उचलबांगडी ! फौजदारांची उचलबांगडी !''

ट्रकांमध्ये भरले जाणारे सामान पाहाण्यास ते थांबले.

एका ट्रकात शिसवीचे मोठमोठे पलंग होते. उरलेल्या जागेत एक छानपैकी गाय आणि तिचे वासरू होते. ते पाहून प्रिन्सिपॉल साहेब म्हणाले, ''म्हैस दिसत नाही कुठं ? अगदी फर्स्टक्लास म्हैस आहे. मुर्रा जातीची.''

त्यांनी रंगनाथाला समजाऊन सांगितले, ''ही गाय टिकैतगंजच्या ठाकुरांनी दिली होती. विधवा सुनेच्या गर्भपाताचा मामला. गोदान करून सुटका करून घेतली त्यांनी.''

कोणा विशिष्ट व्यक्तीला संबोधित न करिता त्यांनी मोठ्याने विचारले, ''म्हैस कुठं गेली ? कुठं दिसत नाही ती ?''

कुणीतरी अंधारातूनच सांगितले, ''विकली.''

''कुणाला ?''

''शहरातनं एक मुसलमान गवळी आला होता.''

''केवढ्याला ?''

''शंभर रूपयाला ! तुम्हांला काय वाटलं, ती हजाराला गेली असेल ?''

''आम्ही तर अजूनही तसंच समजतोय.'' प्रिन्सिपॉल साहेबांनी गमतीने उत्तर दिले, आणि हे संभाषण रंगनाथनेही मजेत ऐकावे यासाठी त्याचा खांदा गदागदा हलवला.

ट्रकाजवळ फक्त पलंग पडले होते. फौजदारांना पलंगांचा षोक आहे, हे रंगनाथाने ऐकले होते. तेच आज त्याने पाहिले. यावेळी भयंकर गोंगाट व उत्साह यांच्या वातावरणात ते पलंग ट्रकांवर चढविण्यात येत होते. काही चढविले गेले होते. काही चढविले जात होते आणि काही चढविले जाणार होते. रस्त्यावर कोरस गाणारे विद्यार्थी काळोख असूनही घटनास्थळी वर्तुळ करून उभे होते आणि पलंगांचे ट्रकांत भरले जाणे पाहात होते. एक शिपाई पलंगावर चढून, हातात कंदील घेऊन माल चढविणाऱ्यांना प्रोत्साहन देत होता, ''अरे ए ! मोडलास ना सांधा त्याचा. मला आधीपासूनच माहीत होतं की तुला तो सांधा मोडल्याशिवाय चैनच पडायची नाही.'' त्याचा तो आरडाओरडा ऐकल्यावर आज एखाद्या पलंगाचा सांधा मोडणे ही भारतीय लोकशाहीची सर्वांत मोठी दुर्घटना असली पाहिजे याविषयी खात्री पटत होती. पलंग चढविणाऱ्यांना धीर देत रंगनाथानेही थंड स्वरात सांगितले, ''होय बाबांनो, सांधा-बिंधा मोडू नका. नीट सांभाळून माल भरा.''

रंगनाथाचे हे बोलणे ऐकून प्रिन्सिपॉल साहेब खदखदून हसले. एक शिपाई पलंगांच्या परिचर्येत कसलीही आडकाठी येऊ न देता आपल्या जागेवरून म्हणाला, ''कोण आहे ? प्रिन्सिपॉल साहेब ! जयहिंद प्रिन्सिपॉल साहेब !''

''काय झालं बुवा ? जयहिंद ! बदली झाली वाटतं ?''

''जी हाँ प्रिन्सिपॉल साहेब ! फौजदार साहेबांनी कप्तान साहेबांकडे अर्ज केला होता. मुलीच्या शिक्षणाचा प्रश्न आहे. शहरात बदली हवी होती त्यांना.''

''आमच्या कॉलेजात घालायचं होतं. शिवपालगंजात एखाद्या शहरापेक्षा काय कमी आहे !''

''तुमचं कॉलेज म्हणजे हिंदुस्तानी शाळा आहे. ते इंग्रजी शिकवणार आहेत. सेंट मेरी स्कूलमध्ये. बेबीचा युनिफॉर्मही तयार झालाय. निळाशार आहे. तो घातला की अस्सल इंग्रजासारखी दिसते.''

''म्हणजे बदली होऊन शहरात चाललेत तर. बरं झालं म्हणायचं. पण ही गाय कुठं ठेवणार ? तिला चारा कुठून आणणार ? विकणार नाहीत वाटतं ?''

शिपायाने सारे बळ खर्च करून एक पलंग वर उचलला. धापा टाकत तो म्हणाला, ''छेः छेः ! गाय राहील मिलिटरी फार्मात. फौजदारसाहेबांचे भाऊ तिथंच नोकरीला आहेत. इथं या बिचाऱ्या गायीला काय मिळत होतं ? खाण्याचे दिवस तर यापुढेच आहेत.''



ट्रकावर चढलेल्या शिपायाचे सारे लक्ष सांध्यावर होते. ते दातओठ खात ओरडत होता, ''सांभाळून अरे, सांभाळून अरे, अरे, आता दुसरा पलंग तरी मोडू नका. मोडला-बिडला तर साल्या याद राख.''

कोणीतरी सांगितले की वैद्यजी नुकतेच फौजदारांना भेटायला आले आहेत. ते म्हणत होते की आपण असतांना फौजदार साहेबांची बदली होते म्हणजे काय ? आपण ती रद्द करून घेऊ.

प्रिन्सिपॉल रंगनाथला म्हणाले, ''फौजदार अब्रूदार असेल तर उद्या सकाळी कोंबडा आरवण्याच्या आत शिवपालगंज सोडून निघून जाईल.''

ते थोडा वेळ सामानाचे निरीक्षण करीत राहिले. रंगनाथ म्हणाला, ''फौजदार साहेब पलंगांचे षोकीन दिसतात.''

''जे काही फुकटात मिळेल त्याचे ते षोकीन आहेत.'' अचानक ते ट्रकावर चढलेल्या शिपायाला म्हणाले, ''अरे भाई, ती सांधा मोडलेली खाट इथं ठेवून जा ना. रूपया-आठ आण्यात तिचा लिलाव होणार असला तर आम्हीच घेऊन टाकू.''

शिपाई म्हणाला, ''साहेब, तुम्ही एवढी मोठी माणसं, अन् कसली क्षुद्र मागणी करता ! घ्यायचा असला तर पुराच्या पुरा ट्रकच घेऊन जा. बोला, आत्ताच्या आता धाडून देतो.''

''हँ हँ हँ ! ट्रक घेऊन मी काय करू ! मामुली मास्तर मी.'' नंतर आवाज बदलून असामान्य पुरूषाप्रमाणे ते म्हणाले, ''फौजदार साहेब घरातच आहेत ना ? वैद्यजीही आहेत ? तर मग चला रंगनाथ बाबू, फौजदारांनाही सलाम करून येऊ. बिचारे भले गृहस्थ होते. कधी कुणाला त्रास दिला नाही. कधी कुणाकडे काही मागितलं नाही. जेवढं काही देवानं दिलं तेवढं डोळे मिटून घेतलं.''

रंगनाथ मनात म्हणाला, ''खरोखरीच भले गृहस्थ होते. गेले बिचारे !''

# १९

चांभारवाडा आणि उच्च वर्णियांची वस्ती यांच्या मधोमध असलेल्या गांधी चबुतऱ्यावर आज कुत्री नव्हे तर माणसे बोलत होती. निवडणुकीपूर्वी रामाधीनच्या भावाने त्या जागेची सुधारणा केली होती. कारण बहुदा तसे निवडणूक कायद्यात लिहिले असावे. किंवा मग सगळे थोर पुढारी निवडणुकीच्या आधी काही महिने, का कोण जाणे, आपापल्या निवडणूक क्षेत्रात उर्फ मतदारसंघात सुधारणा घडवून आणतात, म्हणूनही त्याने तसे केले असावे. कोणी नवे पूल बांधतात, कोणी रस्ते बनवितात, कोणी गरीबांना अन्न आणि घोंगडी वाटतात ! याच न्यायाने रामाधीनच्या भावाने चबुतऱ्याच्या आसपासचे स्वरूपच बदलून टाकण्याचा प्रयत्न केला होता.

तेथे कडुलिंबाचा एक प्रचंड वृक्ष होता. तो पुष्कळशा बुद्धिजीवी लोकांप्रमाणे दूर-दूरपर्यंत आपले हात पाय पसरून उभा असला तरी बुंध्यात पोकळ होता. रामाधीनच्या भावाने त्याच झाडाखाली एक विहीर बांधली होती. वस्तुतः तेथे ती विहीर आधीपासूनच होती. परंतु त्याने तिचा जीर्णोद्धार करून, आजकालच्या पद्धतीप्रमाणे सरकारी कागदपत्रांत नवीन विहीर बांधल्याचे नोंदवून घेतले होते. कारण सरकारी अनुदान मिळविण्याचा तो नैतिक नसला तरी राजकीय मार्ग नक्कीच होता. पूर्वी ती विहीर पावसाळ्यात आसपास उंचवट्यांवर पडणारे पाणी आपल्याकडे ओढून घेऊन जवळपासच्या गल्ल्यांत पूर न येईल अशी तजवीज करीत असे. आता तिच्या भोवती एक कट्टा बांधण्यात आला होता. या कृतीचा संबंध कोणत्या तरी पंचवार्षिक योजनेशी होता हे उघड आहे. ते अधिक स्पष्ट करण्यासाठी विहिरीच्या दोन्ही बाजूंना एकेक खांब रोवण्यात आला होता त्यापैकी एका खांबावर असा शिलालेख कोरला होता: ''तृतीय पंचवर्षीय योजना. ग्रामसभा शिवपालगंज. या विहिरीचा शिलान्यास गुरांचे डॉक्टर श्री. झाऊलाल यांनी केला. सभापती श्री. जगदंबाप्रसाद.''

भोवती कट्टा बनल्यामुळे आता बाहेरचे पाणी आत न जाता आतील पाणी बाहेर येऊ लागले होते. या पाण्याचे अंतिम रूप शीतल-मंद-सुगंध असे होते. एका खूप मोठ्या गटारात तुंबून ते पाणी गावकऱ्यांना असा सल्ला देत होते की, ''पोटातील जंतांचा अनुभव तुम्हांला आहेच. आता तो सोडून द्या आणि या, थोडा मलेरिया आणि फायलेरियाही घेऊन जा.''

विहिरीच्या जीर्णोद्धाराबरोबरच गांधी चबुतऱ्याचाही अभ्युदय झाला होता. त्यात काही नव्या विटा बसल्या होत्या आणि त्यांच्यावरील सिमेंट असे मक्कम होते की ते ठेकेदाराकडून लावले गेले असूनही, पंधरा दिवसांनंतरही उखडले गेले नव्हते. या वातावरणात चौथरा पूर्वीपेक्षा जास्त आकर्षक बनला होता. आणि कॉलेजातील



उडाणटप्पू पोरे कधी-कधी तेथे बसून जुगार खेळू लागली होती. संध्याकाळच्या वेळी बद्री पहिलवानांच्या आखाड्यातील पट्ठेही आता तेथे येऊ लागले होते आणि त्यांचे एकूण हावभाव पाहून असे वाटत असे की तेथे येण्याचे त्यांचे एकमेव उद्दिष्ठ चबुतऱ्यावर बसून मानेवर बसलेले मातीचे प्लॅस्टर खरवडणे हे आहे.

आज निवडणुकीचा दिवस होता. कॉलेजला सुट्टी होती. निवडणूक दुसऱ्या कोणत्या तरी जागी व्हावयाची होती आणि ही जागा चांभारवाड्यापासून नक्कीच दूर असणार होती. परंतु यावेळी गांधी चबुतऱ्यावरही खूप गर्दी जमली होती आणि गांधीजींच्या इच्छेनुसार सर्व प्रकारची माणसे तेथे एकत्र जमली होती. जुगार खेळणाऱ्यांनी पत्ते आपल्या खिशात टाकले होते. आखाड्यातील पहिलवान कुस्ती न खेळता, मातीत न लोळता केवळ मोहरीच्या तेलाच्या मॉलिशच्या आधारावर आपल्या ख्यातीचा सुगंध दशदिशांत दरवळत होते.

रूप्पनबाबूंच्या चालीत थकवा होता आणि चेहऱ्यावर रोजच्या सारख्या उल्हास व हुशारी दिसत नव्हती. ते गांधी चबुतऱ्याजवळ येत असलेले पाहून एका नव्या पहिलवानाने डोळा मारला आणि विचारले, ''काय बाबू, काय हकीगत आहे ?''

त्याला प्रत्युत्तर म्हणून रूप्पनबाबूंनी डोळाही मारला नाही अथवा नेहमीप्रमाणे ''काय राजा, तूच सांग, काय हालहवाल आहे.'' असेही म्हटले नाही. त्यांनी मान हलवून फक्त एवढेच सूचित केले की, तू थट्टामस्करी कर. आम्ही काही करणार नाही; कारण आमचा मूड बरोबर नाही. ते काळा चष्मा लावून, मानेभोवती रेशमी रूमाल गुंडाळून गजगतीने आले आणि धप्पदिशी चौथऱ्यावर बसले. थोडा वेळ उपस्थित सज्जनवृंदामध्ये शांतता पसरली.

त्या पोरकट पहिलवानाने उनाडपणे आपला हात पसरला व तो कोपरात दुमडला. कोपराच्या वरच्या बाजूस उंदराच्या आकाराची एक छोटीशी बेटकुळी तयार झाली. तिच्याकडे पुनःपुनः प्रेमाने पाहात तो रूप्पनबाबूंजवळ येऊन बसला. त्याने पुनः एकदा डोळा मारला आणि रूप्पनबाबूंच्या पाठीवरून हात फिरवीत लाडात, ''काय भानगड आहे बाबू ? आज स्वारी रोजच्यासारखी रंगात दिसत नाही !''

रूप्पनबाबूंनी आपल्या दोस्ताची उपस्थिती आणि त्याची भाषणशैली यांकडे मुळीच लक्ष दिले नाही. ते गप्प बसून राहिले. कॉलेजचा एक पोरगा म्हणाला, ''गुरू, तुम्ही आम्हांला काय करायचं ते सांगितलंच नाही. रामाधीनच्या बाजूनं निवडणुकीत जो जोष आहे तो सनीचरच्या बाजूला दिसत नाही.''

रूप्पनबाबूंनी गरोदर बाईच्या आवाजात म्हटले, ''आता जोष वगैरेची काही जरूर नाही. निवडणुकीचा निकाल आत्ताच लागलाय. सनीचर निवडून आलाय.''

छोटे पहिलवान आणि कॉलेजचे विद्यार्थी यांच्यात एकच हलकल्लोळ माजला. दोहोबाजूंनी एकच प्रश्न विचारला जात होता; ''कसा ? कसा निवडून आला सनीचर ?''

रूप्पनबाबूंच्या साथीदाराने डोळा मारून म्हटले, ''पहिलवान, सांगा तर खरे सनीचर कसा जिंकला ?''

''महिपालपूरवाल्या युक्तीनं'' रूप्पनबाबूंनी थकलेल्या आवाजात सांगितले.

निवडणूक जिंकण्याच्या तीन युक्त्या आहेत : एक रामनगरवाली, दुसरी नेवादावाली आणि तिसरी महिपालपूरवाली.

ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी रामनगरला एकदा दोन उमेदवार उभे राहिले. रिपुदमनसिंह आणि शत्रुघ्नसिंह. दोघेही एकाच जातीचे असल्यामुळे जातीच्या आधारावर मतांची विभागणी होण्यात अडचण निर्माण झाली. जे मतदार ठाकुर जातीचे होते त्यांच्यापुढे असा यक्षप्रश्न उभा राहिला की हेही ठाकुर आणि तेही ठाकुर तेव्हा कुणाला मत द्यायचे आणि कुणाला द्यायचे नाही ? जे ठाकुर नव्हते त्यांच्यापुढे असा प्रश्न उभा राहिला की दोघेही आपल्या जातीचे नाहीत तेव्हा त्यांना आपण मत दिले काय किंवा न दिले काय दोन्ही सारखेच. काही दिवसांनी असे आढळून आले की रिपुदमनसिंह आणि शत्रुघ्नसिंह या दोन्ही नावांचा अर्थही एकच आहे. तो म्हणजे शत्रूला खाऊन टाकणारा सिंह. यावर गावकरी मंडळींनी लोकशाही परंपरेला अनुकूल असा निष्कर्ष काढला की कुणीही सरपंच झाला तरी आपले काय बिघडणार आहे ? त्यांनाच एकमेकांना खाऊ द्या.

निवडणुकीच्या आधी पाच दिवसपर्यंत अशा प्रकारचे उपेक्षेचे वातावरण कायम राहिले. उमेदवार मतयाचना करायला गेले की लोक दोघांनाही सांगत, ''आम्हांला मतांचं लोणचं थोडंच घालायचंय ? तुम्ही म्हणाल तितकी मतं देतो तुम्हांला.''

या साऱ्या गडबडीमुळे दोन्ही उमेदवार या निष्कर्षावर पोचले की आपल्याला कोणीही मत देणार नाही. ते घाबरून लोकशाहीचे गुणगान करू लागले. त्यांनी लोकांना त्यांच्या मताची किंमत सांगण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, ''तुम्ही तुमचं मौल्यवान मत चुकीच्या इसमाला द्याल तर लोकशाहीला धोका निर्माण होईल.'' लोकांना हा मुद्दा नीट कळला नाही. ज्यांना तो कळला त्यांनी फक्त एवढेच म्हटले की, ''चुकीच्या इसमाला मत देण्यात लोकशाहीला कसलाच धोका नाही. तुम्ही मत देऊ शकता एवढंच लोकशाहीला पुरेसं आहे. चूक-बरोबर हे सगळीकडेच असतं. संबंध देशभर काय चाललंय ते पाहा ना...''



असे बोलणारे एक-दोनच लोक होते. पण लोकशाहीला निरर्थक बनविण्यास एवढे पुरेसे होते. म्हणून दोन्ही उमेदवारांनी आपल्या प्रचाराची पद्धतच बदलली. सरपंचाच्या हातात कोणते अधिकार असतात त्याची माहिती ते देऊ लागले. तो गावातील सगळी नापीक जमीन इतरांना देऊ शकतो आणि जी पडीत जमीन लोकांनी बेकायदेशीरपणे आपल्या ताब्यात घेतली आहे तिच्यावरून तो त्यांना हुसकावून लावू शकतो.

शेतकऱ्याला जमीन अत्यंत प्रिय असते, ही गोष्ट प्रेमचंदांची 'गोदान' कादंबरी वाचणाऱ्यांना आणि 'दो बिघा जमीन' यांसारखे चित्रपट पाहाणाऱ्यांना आधीच माहीत असते. एवढेच नव्हे तर त्याला स्वतःच्या जमिनीपेक्षा दुसऱ्याची जमीन जास्त प्रिय असते आणि संधी सापडताच तो आपल्या शेजाऱ्याच्या जमिनीकडे लालचावलेल्या नजरेने पाहू लागतो, हेही सर्वांना ठाऊक असते. अर्थात् याच्या मुळाशी साम्राज्यवादी विस्ताराची प्रेरणा नसते, तर सहज प्रेमाची भावना असते. त्यामुळे तो बसतो आपल्या शेताच्या बांधावर, पण आपली गुरे मात्र शेजाऱ्याच्या शेतात चरायला सोडतो. ऊस खायचा झाला तर स्वतःच्या शेताऐवजी शेजाऱ्याच्या शेतातला ऊस तोडून घेतो आणि इतरांना सांगतो की बघा, माझ्या शेतात किती चोरी होते आहे. त्याचे म्हणणे चूक नसते. कारण ज्याप्रमाणे त्याच्या शेताजवळ दुसऱ्याचे शेत असते त्याचप्रमाणे दुसऱ्याच्या शेताजवळ त्याचेही शेत असते; आणि दुसऱ्याच्या संपत्तीविषयी सर्वांच्याच मनात सहज प्रेमभावना विद्यमान असते.

या गोष्टी 'गोदान' कादंबरीत इतक्या स्पष्टपणे सांगितलेल्या नाहीत आणि मुंबईच्या सिनेमांमध्येही-बहुधा कृशनचंदर आणि ख्वाजा अहमद अब्बास यांच्या भीतीमुळे अथवा पुरोगामीपणाच्या जोषात पन्नास टक्के आंधळे झाल्यामुळे किंवा केवळ अडाणीपणामुळे साफ-साफ दाखविण्यात आलेल्या नाहीत. म्हणून त्या जरा स्पष्टपणे सांगाव्या लागल्या. वस्तुतः आपल्या देशाची साफसफाई हे कलावंतांचे काम नाही; तरी पण ...

सारांश, गावकऱ्यांना जेव्हा हे कळले की ग्रामपंचायतीचा संबंध जमिनीच्या देवाण-घेवाणीशी आहे, त्यांच्या शेजाऱ्याचे शेत त्यांच्या मालकीचे होऊ शकते आणि अमुक शेतकरी बेवारशी मेल्यानंतर त्यांना त्याचा वारसदार ठरवून त्यांना राज्याभिषेक होऊ शकतो, तेव्हा शेतकऱ्यांमधील सहजप्रेमाची भावना ओसंडू लागली. त्यानंतर मतदारांना जमिनीच्या प्रेमाने ग्रामपंचायतीकडे ढकलले आणि ग्रामपंचायतीच्या प्रेमाने त्यांना सरपंचपदाच्या उमेदवारांकडे ढकलले आणि निवडणुकीच्या बाबतीत त्यांचा मेंदू

एकदम सक्रिय बनला. त्यानंतर त्यांच्या समोर तीच मानसिक समस्या उभी राहिली जी चिनी आक्रमणाच्या वेळी आचार्य कृपालानींनी संबंध देशासमोर उभी केली होती. ते आता विचार करू लागले की तटस्थ राहाणे निरर्थक आहे. त्यात दुर्बलताही आहे आणि नुकसानही आहे. तुम्हाला सुखासमाधानाने राहावयाचे असेल तर रिपुदमन आणि शत्रुघ्न यांच्यापैकी कुणाची तरी एकाची बाजू घेतली पाहिजे. फार जादा तटस्थ बनण्याचा प्रयत्न करता कामा नये; नाही तर दोन्ही बाजूंनी थपडा खाव्या लागतील.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील तटस्थतेची समस्या आपण निमूटपणे, अंगचोरपणाने सहन केली; कारण अशा प्रकारच्या अनेक समस्या आपण झेलल्या होत्या. परंतु आपल्याला आपले बरेवाईट फार चांगले समजते अशी घमेंड रामनगरवाल्यांना वाटत होती. म्हणून त्यांनी या समस्येच्या बाबतीत अंगचुकारपणा करणे योग्य नव्हे असे ठरविले आणि बघता-बघता सगळा गाव दोन गटांत विभागला. ज्याला बेवारशी जमिनीची वाटणी रिपुदमनाच्या हातून करवून घेणे योग्य वाटत होते त्यांचा एक गट बनला आणि ज्यांना हे सत्कार्य शत्रुघ्नसिंहांच्या हातून करविण्यात अधिक कलात्मकता दिसत होती त्यांचा दुसरा गट बनला.

निवडणुकीला दोन दिवस राहिले तेव्हा दोन्ही बाजूंनी जय्यत तयारी झाली असल्याचे दिसून आले. लोकांनी कंठशोष करून इनकिलाब झिंदाबादच्या आरोळ्या ठोकल्या, एकमेकांच्या आयाबहिणींचा उद्धार केला, आपापल्या लाठ्यांना तेलाची मालिश केली. भाले - बरच्यांच्या पात्यांना धार लावून ती लाठ्यांमध्ये बसविली आणि तळहातावर शीर घेऊन त्याच हातात गांजाची चिलीमही धरली. एवढे सर्व झाल्यानंतर रिपुदमनसिंहांनी आपले धाकटे बंधू सर्वदमन यांना बोलावून प्रेमाने सांगितले, ''बाबा रे, या लढाईत मी प्राणास मुकलो आणि माझ्या बरोबर पंचवीस इसमांचेही प्राण गेले तर तू काय करशील ?''

सर्वदमनसिंहांनी तशी वकिलीची परीक्षा देऊन त्यात ते पासही झाले होते; परंतु ज्याप्रमाणे एके काळी मोठे मोठे वकील-बालिष्टर वकिली सोडून राजकारणात उतरले होते त्याचप्रमाणे तेही आपली वकिली सोडून गेल्या चार वर्षांपासून स्थानिक राजकारणात पडले होते. फरक एवढाच होता की स्वातंत्र्य संग्रामाच्या राजकारणात पडणाऱ्या पुष्कळशा वकिलांच्या उपजीविकेच्या साधनांसंबंधी लोकांना काही माहिती नसे; परंतु सर्वदमनांच्या उपजीविकेचे साधन सर्वांना चांगले माहीत होते; आणि सर्वांवर त्याची चांगलीच छापही पडत असे. त्यांच्याजवळ दहा गॅसबत्त्या होत्या. त्या लग्नसराईत भाड्याने दिल्या जात असत. शिवाय त्यांच्याजवळ दोन बंदुकीही होत्या. त्या दरवड्यांच्या मोसमात भाड्याने दिल्या जात. या सर्वांतून त्यांना निवांतपणे ग्रामीण राजकारणाचे संचालन करता येण्याएवढी प्राप्ती सहज होत असे. गॅसबत्त्या आणि



बंदुका खूप दूरदूरपर्यंत जात, आणि त्याप्रमाणे त्यांचे खूप व्यापक व सखोल सामाजिक संबंध प्रस्थापित झाले होते आणि त्यामुळे सर्वदमनांमध्ये संभाषण करण्याची योग्यता व आत्मविश्वास निर्माण झाला होता.

आपल्या भावाच्या प्रश्नाचे उत्तर सर्वदमनांनी मोठ्या आत्मविश्वासाने दिले. ते म्हणाले, ''भाईसाहेब, या लढाईत तुम्ही आणि तुमची पंचवीस माणसे धारातीर्थी पडली तर दुसऱ्या बाजूला शत्रुघ्नसिंह आणि त्यांचे पंचवीस लोकही मारले जातील. हा तर सरळ सरळ हिशेब झाला. आता यानंतर तुम्ही जसं सांगाल तसं करीन.'

रिपुदमनांनी सर्वदमनांना मिठी मारून रडण्याचा प्रयत्न केला परंतु माणूस सिनेमा नट किंवा पुढारी असेल तरच तो हुकमी रडे काढू शकतो. सारांश, सवय नसल्यामुळे रिपुदमनांचा तो प्रयत्न अयशस्वी झाला. सर्वदमनांनी त्यांना हळूच बाजूला केले आणि म्हणाले, ''जाऊ द्या. आता मला सांगा, पंचवीस पंचवीसांचा हिशेब बरोबर जमल्यानंतर पुढं काय करायचं ?''

रिपुदमन म्हणाले, ''समज, त्यानंतर पुनः सरपंचाची निवडणूक व्हायची ठरली आणि तू सरपंच बनायचं ठरवलंस तर काय स्थिती होईल ?''

सर्वदमन कागद-पेन्सिल घेऊन आले आणि बेरीज-वजाबाकी करून म्हणाले, ''दादा, तुम्ही आणि शत्रुघ्नसिंह आपापल्या पंचवीस लोकांसह मरण पावलात की मग मीच काय, माझ्या पक्षाचा कुणीही इसम पन्नास मतं जादा मिळवून निवडून येईल. कारण गावातील मतदारांपैकी त्या बाजूला खरोखरीच मरायला तयार असणारे जास्तीत जास्त पंचवीस लोक निघतील. उलट आमच्या बाजूला अशा माणसांची संख्या चाळीसपेक्षाही जास्त आहे. तिकडचे ते पंचवीस लोक मेले की त्यांचा पुरा मोहल्लाच मेला म्हणून समजा. उलट आमची पंचवीस माणसं मेली तरी उरलेल्या पंधरा माणसांच्या मुठीत विजयश्री राहील.''

निवडणुकीच्या तीन दिवस आधी सब-डिव्हिजनल मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात रिपुदमनांनी शत्रुघ्नसिंह आणि त्यांचे पंचवीस लोक यांच्याविरूद्ध असा अर्ज दाखल केला की या लोकांपासून आमच्या जीवित-वित्ताला धोका आहे आणि निवडणुकीत शांतताभंग होण्याची आशंका आहे. पोलिसांनी या अर्जाला दुजोरा दिला. याला शह देण्यासाठी शत्रुघ्नसिंहांनी रिपुदमन व त्यांचे चाळीस लोक यांच्याविरूद्ध असाच अर्ज गुदरला आणि पोलिसांनी त्यालाही दुजोरा दिला. परंतु त्यात त्यांनी असे गणित मांडले की ही गोष्ट रिपुदमन आणि त्यांचे पंचवीस लोक यांच्या बाबतीतच खरी आहे. निवडणुकीच्या आधी एक दिवस दोन्ही उमेदवार आणि दोन्ही बाजूची पंचवीस-पंचवीस मंडळी यांना कोर्टासमोर उभे करण्यात आले. कायद्याच्या पुस्तकात लिहिल्याप्रमाणे मॅजिस्ट्रेटने शत्रुघ्नसिंह आणि त्यांची पार्टी यांच्याकडून जामीन व जातमुचलके

मागितले. ते देण्याचा ते लोक विचार करू लागले. नंतर मॅजिस्ट्रेटने रिपुदमन आणि त्यांच्या पार्टीकडून जामीन व जातमुचलके मागितले. यावर रिपुदमन म्हणाले, ''हुजूर, आम्ही कुणी जामीन आणि मुचलके देणार नाही. माझं सांगणं लक्षात ठेवा. उद्या आमच्या गावात कत्ले आम होईल. शत्रुघ्नसिंह आणि त्यांचे गुंड यांच्याकडून वाटेल तेवढा मोठा जामीन तुम्ही घेतला तरी त्यांना झगडा करण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. आम्ही आपले साधेसुधे शतकरी आहोत. आम्ही त्यांची बरोबरी थोडीच करू शकणार ? म्हणून असं करा हुजुर, की आम्हाला जामीन देऊ न शकल्याबद्दल पोलिस कस्टडीत ठेवून द्या. पोलिसठाण्यात बंद राहिल्यामुळं आमचे प्राण तरी वाचतील. मात्र एवढंच करा हुजूर, की शत्रुघ्नसिंहांच्या जामिनावर विश्वास ठेवू नका. आमच्या घराण्यातील जी चारदोन मंडळी गावात राहातील त्यांचे प्राण वाचविण्याची तुम्ही व्यवस्था करा.'' एवढे बोलून त्यांनी पोलिस कस्टडीच्या लाकडी खांबाला मिठी मारून रडण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांनी त्यांच्या या म्हणण्यालाही दुजोरा दिला. अखेर मॅजिस्ट्रेटनी असा निर्णय दिला की ज्या अर्थी रिपुदमनसिंह आणि त्यांची पार्टी निवडणुकीच्या वेळी तुरूंगात राहाणार आहे त्या अर्थी शत्रुघ्नसिंहांचा आणि त्यांच्या पार्टीचाही जामीन मंजूर करता येणार नाही. त्यांनाही तुरूंगातच रहावे लागेल.

अशा प्रकारे काही दिवसांसाठी दोन्ही उमेदवार आणि त्यांचे पंचवीस पंचवीस साथीदार जिवंत असून मेल्यासारखे झाले.

त्यानंतर निवडणूक अत्यंत शांत व सभ्यतापूर्ण वातावरणात पार पडली. वेगवेगळ्या पक्षांच्या सामर्थ्याच्या बाबतीत बोलावयाचे तर शत्रुघ्नसिंहांचे साथीदार अगदीच फुसके ठरले. खरे म्हणजे त्यांचा कोणी साथीदार गावात उरला तरी की नाही, हेच कळले नाही. तिकडे रिपुदमनांच्या वतीने सर्वदमन निवडणूक लढविण्यासाठी हजर होते. कारण वकिलीची डिग्री आणि पोलिसांचा पाठिंबा यांमुळे ते शांतताप्रिय गृहस्थ समजले जात होते व म्हणून त्यांना पोलिस कस्टडीत ठेवणे आवश्यक वाटले नव्हते. त्यांनी जोरात निवडणूक लढविली आणि पूर्वी कागदावर बेरीज वजाबाकी करून त्यांनी जो निष्कर्ष काढला होता तोच खरा ठरला.

निवडणूक जिंकण्याची ही पद्धत रामनगरच्या नावाने पेटंट ठरली.

नेवादावाली पद्धत यापेक्षा अधिक आदर्शवादी होती.

नेवाद्याला अनेक जातींचे उमेदवार निवडणुकीला उभे होते. परंतु त्यांत मुख्य



उमेदवार फक्त दोनच होते. ज्यांना ऋग्वेदात पुरूषब्रह्माचे मुख व पाय समजण्यात आले आहे अशा जातींचे ते होते. आजच्या परिभाषेत बोलायचे म्हणजे तो ब्राम्हण आणि हरिजन यांच्यातील संघर्ष होता. परंतु नेवाद्यात हा मामला अत्यंत सांस्कृतिक व जवळजवळ वैदिक ढंगावर चालला.

ब्राम्हण उमेदवाराने सवर्णांमध्ये ऋग्वेदाच्या पुरूष - सूक्ताचा अनेकदा पाठ केला आणि त्यांना समजावून दिले की ब्राम्हण हेच पुरूष-ब्रम्हाचे तोंड आहे. शूद्र हा पुरूष-ब्रम्हाचा पाय असल्याचेही त्याने पटवून दिले. सरपंचाच्या स्थानाविषयी त्याने अनेक उदाहरणे देऊन लोकांना असे पटवून दिले की त्याचा संबंध मेघा व वाणी यांच्याशी आहे. या गोष्टी पायात नसून डोकीत असतात; आणि तोंडही डोक्याशी संबद्धच असते. म्हणून स्वाभाविकपणेच शुद्राने सरपंच न बनता ब्राम्हणानेच बनले पाहिजे.

ब्राम्हण उमेदवाराने शूद्रांचा तिरस्कार करण्यासाठी प्रचलित शिवीगाळीचा आधार न घेता तो आपले म्हणणे याच सांस्कृतिक पातळीवरून समजावीत राहिला. त्याने सवलत म्हणून हेही मान्य केले की ज्या धावपळीच्या कामात पायांची जरूर असते-उदाहरणार्थ न्यायपंचायतीच्या पट्टेवाल्याचे काम; ते निश्चितपणे शूद्रालाच मिळाले पाहिजे; परंतु सरपंचाच्या जागेसाठी शूद्राने उभे राहणे हे वेदांविरूद्ध होईल.

परंतु सामान्यतः जसे घडते त्याप्रमाणेच मतदारांनी संभाषणाची ही सांस्कृतिक पातळी मान्य केली नाही. त्यामुळे नाईलाजाने ब्राम्हण उमेदवाराला आपल्या प्रचाराचा ढंग बदलावा लागला. त्याने पुरूष-ब्रम्हाच्या मुखाच्या नात्याने आपल्या तोंडाचा जरा जादा उदार उपयोग करण्यास सुरूवात केली. त्याचबरोबर त्याचे सहाय्यक प्रचाराच्या वेळी आपल्या तोंडाचा जास्तच बेलगाम वापर करू लागले. आणि काही दिवसांनंतर प्रचाराची पातळी आपल्या मूळपदावर आली. ''अरे ठाकुर किसनसिंह, तू काय मला सोडून त्या चांभारड्याला मत देणार ?''

गावामध्ये ब्राम्हण उमेदवाराच्या बाजूने बघता-बघता शिवीगाळीचे उग्र वातावरण तयार झाले; आणि मग अचानक एके दिवशी पुरूषसूक्ताच्या ज्या ऋचेत शूद्राला पाय मानण्यात आले त्या ऋचेचा खरा अर्थ त्याला उमगला.

एके ठिकाणी ब्राम्हण उमेदवाराचा एक पाठीराखा दुसऱ्या उमेदवाराला उघडउघड शिव्या देत होता. तो चबुतऱ्यावर बसला होता आणि त्याच्या तोंडून शिव्यांचा जो अस्खलित प्रवाह धो धो वाहात होता त्यातील मध्यवर्ती प्रश्न हाच होता की, ''ठाकुर किसनसिंह तुम्हीच सांगा, आता तुम्ही त्या —'' यानंतर काही इरसाल शिव्या आणि मग वाक्याचा शेवट—''लाच मत देणार काय ?''

तो चबुतऱ्यावर बसला होता आणि बोलत होता. अकस्मात् त्याचे वाक्य अर्धवटच

राहिले. त्याला आपल्या कमरेत इतक्या जोराचा प्रहार झाल्याचा भास झाला की 'तात लात रावण मोहिं मारा' (रावणाने मला लाथ मारली हो) हे म्हणण्याचीही संधी त्याला मिळाली नाही. तो चबुतऱ्यावरून खाली कोसळला. तो खाली पडतो न पडतो इतक्यात त्याच्या कमरेत आणखी दहा लाथा बसल्या आणि जेव्हा त्याने डोळे उघडले तेव्हा त्याला असे आढळून आले की हे जग स्वप्न असून मोहनिद्रेचा त्याग होऊन चुकला आहे. त्यांनंतर अशा प्रकारच्या अनेक घटना घडल्या आणि ब्राम्हण उमेदवाराला समजून चुकले की पुरूष-ब्रम्हाचे तोंड पुरूष-ब्रम्हाच्या पायापासून फार दूर नाही. सारांश, जेथे तोंड चालत असेल आणि त्याला उत्तर म्हणून लाथ बसत असेल तेव्हा तोंड फार वेळ चालू शकत नाही, असे सिद्ध झाले.

हा शोध लागल्यामुळेच ब्राम्हण उमेदवार हैराण झाला. परंतु अशा प्रसंगी त्याच्या मदतीला एक बुवाजी धावून आले. आपद्ग्रस्त शेतकऱ्यांपासून सर्वोच्च अधिकारी, पुढारी व व्यापारी यांच्यातून आपले चेले अचूक शोधून काढणाऱ्या अनेक बुवामहाराजांपैकी ते एक होते.

ही घटना वेताळपंचविशी आणि सिंहासनबत्तिशी यातील कहाणीसारखी घडली. एके दिवशी ब्राम्हण उमेदवार आपल्या तोंडाचा अत्यंत मर्यादित वापर करूनही पुरूष-ब्रम्हाच्या पायाची ठेकर खाऊन धराशायी झाला होता आणि सरपंचाचे पद चांभाराच्या तावडीत न सापडता ब्राम्हणाच्या हातात कसे ठेवता येईल याचा विचार करीत होता. विचार करण्याचा हा कार्यक्रम गावाबाहेर एका विहीरीच्या कट्ट्यावर 'ठरवा नील-नील कोमल-कोमल छाया तरूवनमें तम श्यामल' अशा सायंकालीन वातावरणात एका वडाच्या झाडाजवळ चालला होता. एवढ्यात त्या झाडाखाली काही ठिणग्या उडत असलेल्या दिसल्या, आणि त्याचबरोबर शिवशंकराची काही विशेषणे घोगऱ्या आवाजात ऐकू आली. झाडाखाली कोणीतरी बुवा आहेत, याविषयी ब्राम्हण उमेदवाराची खात्री पटली.

तेच खरे होते. बाबाजी शंकराचे नाव घेत होते आणि गांजा ओढत होते. माणूस दुःखी नसला आणि समोर एखादे बुवा उभे असले तरी देखील तो साष्टांग नमस्कार घालतो. येथे तर बाम्हण उमेदवार चिंताग्रस्त होता आणि बाबाजी प्रकट झाले होते. कसलाही मागचापुढचा विचार न करिता तो बाबाजींच्या चरणांवर डोके ठेवून गयावया करू लागला.

बाबाजींच्या जीवनात असे प्रसंग अनेकदा आले होते. त्याच अनुभवांच्या आधारे त्यांनी ब्राम्हण उमेदवाराला अभयदान देत सांगितले की, ''घाबरू नको बेटा ! तुला स्वप्नावस्थेचा रोग जडला असेल, किंवा शीघ्रपतन होत असेल, अथवा लहानपणच्या वाईट सवयीमुळे तुला नपुसंकता प्राप्त झाली असेल तर माझ्या औषधाचा फक्त



एकदाच वापर करून तू एक हजार स्त्रियांची घमेंड जिरवशील, याबद्दल खात्री बाळग.'' परंतु ब्राम्हण उमेदवाराने नकारार्थी मान हलवून बाबाजींच्या या उदारतेचा फायदा घेण्याचे नाकारले. तेंव्हा बाबाजींनी त्याला सांगितले की, ''या अत्यंत गोपनीय औषधविधीच्या साह्यानं तू वाजीकरणाचा वस्ताद तर होऊन जाशीलच; पण त्याच बरोबर त्याच्या आधारानं औषध तयार करून तू ती विकू लागशील तर थोड्यात दिवसात तुला करोडपतीची भूमिकाही सुरू करावी लागेल.'' एवढे सारे झाले तरी ब्राम्हण उमेदवार रडतच राहिला; आणि नकारार्थी मान हलवतच राहिला. बाबाजींनी जेव्हा त्याला खोदून खोदून विचारले तेव्हा तो म्हणाला, ''मला एक हजार स्त्रियांची खुमखुमी जिरवायची नसून फक्त एका चांभाराची खोडकी जिरली तरी माझं काम भागेल.''

बाबाजींनी ब्राम्हण उमेदवाराचे सांत्वन केले आणि सगळे प्रकरण समजावून घेऊन त्याला त्या संकटातून मुक्त करण्यासाठी गांजाची चिलीम कनवटीला खोचून व नकली जटांवर थोडीशी धूळ टाकून ते गावात गेले. त्यांनी एका देवळासमोर मुक्काम ठोकला; आणि दुसऱ्या दिवसापासून कबीर व रामानंद यांच्यापासून गुरू गोरखनाथापर्यंतच्या कथा लोकांना सांगण्याचा सपाटा सुरू केला. त्या कथांचा निष्कर्ष हा असे की कोणी कोणाची जात विचारू नये आणि जो हरीला भजतो तो हरीला आवडतो.

'हरी' ही काय चीज आहे तेही लोकांना त्याच दिवशी संध्याकाळपासून समजून येऊ लागले. एका चिलमीत गांजाची गोळी भरली आणि तिच्यावर एक निखारा दाबून बसविला. गाल फुगवून व आकुंचित करून तो निखारा फुलविण्यात आला आणि झुरका मारण्यात आला. दोन झुरक्यांमधील इंटरव्हलमध्ये भगवान शंकराचे नाव नाना प्रकारांनी व नाना अर्थांनी घेण्यात आले. ती चिलीम भक्तांमध्ये इकडून तिकडे व तिकडून इकडे अशी फिरत राहिली. भक्त समजले की हाच 'हरी' आहे.

बाबाजींच्या दरबारात अठ्ठेचाळीस तासपर्यंत अखंड नामसंकीर्तन चालत राहिले. जे लोक गांजा पीत नव्हते त्यांच्यासाठी भांगेची व्यवस्था करण्यात आली आणि जोपर्यंत संकीर्तन चालू राहिले तोपर्यंत पाट्यावर वरवंटाही फिरत राहिला. हार्मोनियम वाजत राहिला; आणि राधाकृष्ण व सीताराम यांच्या खुशामतीची अशी काही ढंगदार गाणी गायिली गेली की त्यांच्यापुढे सिनेमाच्या मी मी म्हणणाऱ्या गाण्यांनी हात टेकले.

दोन दिवसांनंतर बाबाजी श्रीकृष्णाचा अवतार असल्याचे मान्य करण्यात आले. अर्थात् त्यांनी यमुनेचे पाणी पिण्याऐवजी फक्त गांजापान केले आणि पिशाच्चांप्रमाणे ते श्रीकृष्णाऐवजी भगवान शिवाच्या जास्त जवळ राहिले, ही गोष्ट अलाहिदा. दरम्यान चिलीम भकाभक पेटत राहिली आणि असे सिद्ध करीत राहिली की गांजा चोरीचा असो की सरकारी दुकानातला, आणि गंगाजल गंगोत्रीचे असो अथवा घाणेरड्या

नाल्याच्या संगमानले असो, त्याचा परिणाम नेहमीच सारखा होत असतो.

बाबाजी मोठे मस्त गृहस्थ होते. ते संकीर्तनाचे निरीक्षणच नव्हे तर स्वतःही संकीर्तन करीत असत. ते जेव्हा गांजा पीत नसत तेव्हा त्यांचा आवाज गळ्यातून बाहेर पडून स्पष्ट ऐकू येत असे; आणि तेथे हार्मोनियम वाजता नसता तर त्यांच्या नामसंकीर्तनात एक धुनही आढळून आली असती. परंतु या स्वाभाविक अडचणी असूनही बाबाजींनी बघता-बघता सारा गाव आपल्या काबूत करून घेतला. त्यांनी कबीर, रैदास, व रामानंद यांची अशी काही फक्कड भजने ऐकविली की लोक त्या संतांचा जयजयकार करू लागले. ते संत स्वतः तेथे हजर असते तर असे मौलिक काव्य ऐकून त्यांनी बाबाजींचाच जयजयकार केला असता. याच वातावरणात बाबाजींनी गावातून जातीयवादाचे उच्चाटन करून टाकले; आणि एके दिवशी त्यांनी गांजा, भांग व संकीर्तन यांच्या धुंदीत असे सांगून टाकले की या गावचा सरपंच मोठा धर्मात्मा आहे, तेव्हा लोक थक्क होऊन गेले. एका भंगडाने म्हटले की "अजून सरपंचाची निवडणूक तर झालेली नाही. त्या जागेसाठी पहिल्यांदाच निवडणूक व्हायची आहे." तेव्हा बाबाजी उद्गारले, "आमच्या भगवानांनी तर केव्हाच निवड करून टाकलीय." सारांश, नशा उतरण्यापूर्वीच लोकांना माहीत होऊन गेले की ब्राम्हण उमेदवाराला खुद्द परमेश्वरानेच सरपंच म्हणून निवडले आहे; आणि या ज्ञानाच्या आधारे नशा उतरण्यापूर्वी जवळजवळ साऱ्याच गावकऱ्यांनी त्या ब्राम्हणाला आपला सरपंच म्हणून मान्य केले. अशा प्रकारे लाथ सुन्न पडली आणि तोंडाचा जय झाला.

नेवादावाली पद्धत निवडणूक लढविणाऱ्यांच्या दृष्टीने मोठी यशस्वी ठरली. इतर गावांतील लोकांनी तिच्यात वेगवेगळ्या सुधारणा करून मोठमोठे निवडणुकीचे फड जिंकले. जेथे गांजा पिणारे बाबाजी मिळाले नाहीत अथवा तेवढा गांजा मिळाला नाही तेथे लोकांनी बहुदा कुणालाही बुवा बनवून देवीच्या पूजेची तरतूद करण्यास सुरूवात केली. त्या ठिकाणी बकऱ्यांचे बळी देण्यात येऊ लागले आणि दारूचा नैवेद्य दाखविला जाऊ लागला. याचाही परिणाम असाच होई की लाथ सुन्न पडे आणि तोंडाचा जय होई.

अशा प्रकारे पेटंट म्हणून नोंदलेली पद्धत निवडणूकसंहितेत नेवादावाली पद्धत म्हणून नमूद केली गेली.

महिपालपूरवाली पद्धत शुद्ध वैज्ञानिक आणि सर्वात साधीसुधी होती. तिचा विकास एका निर्वाचन अधिकाऱ्याच्या चुकीतून झाला, आणि नंतर त्या चुकीला मान्यता



मिळून ती पद्धत अनेक ठिकाणी अमलात आणली गेली. ती चूक एका घड्याळामुळे घडली.

निवडणूक दुपारी बारा वाजता व्हावयाची होती. निवडणूक-अधिकाऱ्यांचे घड्याळ शहरातील टॉवरक्लॉकबरोबर लावलेले होते. आणि टॉवरक्लॉक जकात खात्याच्या चेयरमनच्या घड्याळाप्रमाणे लावलेले होते. त्यामुळे ते सव्वातास पुढे होते. त्याचा परिणाम असा झाला की निवडणूक अधिकाऱ्याने काही उमेदवारांचा विरोध असतानाही जितके मतदार व उमेदवार आले होते त्यांच्यातून पावणे अकरा वाजताच निवडणूक पुरी केली आणि तिचा निकालही तेथेच जाहीर करून टाकला. जेव्हा उरलेले मतदार आणि उमेदवार निवडणुकीच्या जागी येऊन पोचले त्यावेळी निवडणूक अधिकारी आपल्या घरी एक वाजून पंधरा मिनिटांनी घ्यावयाचे जेवण घेत होता.

या निवडणुकीविरूद्ध तक्रार अर्ज दाखल झाला आणि त्यात सारा वादविवाद घड्याळांसंबंधी झाला. तो खटला खूपच शास्त्रीय ठरला आणि त्यायोगे न्यायालयाला अनेक प्रकारच्या घड्याळांसंबंधी मेकॅनिकल माहिती प्राप्त करण्याची संधी मिळाली. याचा परिणाम असा झाला की हा खटला तीन वर्षे चालला, परंतु निवडणूक अधिकाऱ्याने काही चूक केली होती असे सिद्ध झाले नाही. तसे सिद्ध व्हावयाचेच नव्हते. त्याने ज्याला सरपंच म्हणून जाहीर केले होते तो आपले घड्याळ नेहमीच सव्वा तास पुढे ठेवून गावावर रीतसर राज्य करीत राहिला. बाकीचे उमेदवार, छोटू पहिलवानाच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे घड्याळाऐवजी घंटा घेऊन गप्प बसले.

महिपालपूरवाली घटना शुद्ध आकस्मित होती. परंतु न्यूटनसमोर झाडावरून फळ पडण्याची घटनाही अशीच आकस्मिक किंवा योगायोगाचीच होती. तिच्यातूनच त्याने गुरूत्वाकर्षणाचा सिद्धांत शोधून काढला होता. कालांतराने निवडणूक कलेत प्रवीण असलेल्या लोकांनीही महिपालपूरच्या घटनेतून एक सिद्धांत काढला. तो असा की सर्व घड्याळे एका वेळी एकच वेळ दाखवीत नाहीत आणि सारे मतदार एकाच वेळी एके ठिकाणी जमत नाहीत.

या सिद्धांताचा शोध लागल्यानंतर ग्रामपंचायतींच्या निवडणुकांत त्याचा उपयोग अनेकदा अनेक प्रकारे करण्यात आला. निवडणूक अधिकाऱ्यांची घड्याळे महिपालपूरचे उदाहरण समोर ठेवून अर्धा तास मागे-पुढे होत असत आणि घड्याळ हे अखेर एक यंत्रच असल्यामुळे त्याबद्दल कोणाही मानवाला दोष दिला जात नसे. त्यानंतर बहुदा असे घडू लागले की ज्या उमेदवाराचे घड्याळ निवडणूक अधिकाऱ्याच्या घड्याळाशी मिळते जुळते असेल तो निवडणुकीत विजयी होऊ लागला. हा दोन यंत्रांचा खेळ होता आणि त्याबद्दल कोणा माणसाला दोषी ठरविणे अशास्त्रीय ठरले असते.

भूगोलाच्या दृष्टीने शिवपालगंजहून महिपालपूर दूर पडत होते आणि नेवादा जवळ

होता. त्यामुळे रामाधीन भीखमखेडवींना नेवादा पद्धतीची चांगली माहिती होती. तिचा त्यांनी भरपूर वापरही केला. तिकडे सनीचरच्या वतीने वैद्यजींनी भूगोलाऐवजी इतिहासाला जास्त महत्त्व दिले आणि पूर्वीच्या सर्व पद्धतींचे मनन करून सनीचरच्या बाबतीत महिपालपूरच्या पद्धतीचा अवलंब करण्याचा सल्ला दिला. परिणामतः त्यांच्या बाजूने फक्त एका स्वस्तपैकी घड्याळाचा खर्च करण्यात आला. निवडणूक अधिकारी चुकून ते घड्याळ आपल्या मनगटावर बांधून घरी निघून गेला. त्याच्या उलट नेवादा पद्धतीचा वापर करणारे पराभूत होऊन निराश आणि दारू यांच्या आघातांनी धारातीर्थी पतन पावले. नशाखोरीच्या विशेषज्ञतेखेरीज त्यांच्या पदरात काहीच पडले नाही.

## २०

गच्चीवरील व्हरांड्यात एका ढेकळाला बांधलेली जी एक मळकट पुडी जमिनीवर पडली होती ती नंतर प्रेमपत्र ठरली. रंगनाथाने ते पत्र एकदा वाचले आणि मग पुनः पुनः वाचले. जिचे दडपण आपल्या छातीवर पडल्यामुळे त्या रात्री कोणार्क व खजुराहो याची सारखी आठवण येत होती तिनेच ते पत्र लिहिले असले पाहिजे, हे लक्षात येण्यास त्याला मुळीच उशीर लागला नाही. हे प्रेमपत्र आपल्यासाठी नसून दुसऱ्या कोणाला तरी उद्देशून लिहिलेले आहे, हेही रंगनाथाच्या लक्षात आले.

तो दुसरा कोण असावा ?

रूप्पन ?

म्हणजे हे पत्र बेलाने रूप्पनला लिहिले असेल काय ? आणि त्या दिवशी या गच्चीवर आलेली मुलगी बेलाच होती काय ?

या प्रश्नांच्या उत्तरांसंबंधी विचार करतांना रंगनाथ एखाद्या थोर न्यायशास्त्र्याची किंवा तर्कशास्त्र्यांची भूमिका घेऊन दोन आणि दोन मिळून चार होतात असा निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करीत होता, असे समजणे चूक होईल. वस्तुतः एकीकडे तो या पत्राची लेखिका बेला आहे असे गृहीत धरून तिचा रूप्पनशी संबंध जोडू पाहात होता, तर दुसरीकडे त्याला या गोष्टीचे आश्चर्य वाटत होते की शिवपालगंजमध्येही फिल्मी



गाण्यांचा कोणीतरी एवढा मोठा विद्वान विद्यमान आहे की ज्याच्या प्राप्तीमुळे विश्वविद्यालयांच्या अधिकाऱ्यांनी स्वतःला धन्य समजावे, आणि त्यांनी त्याला स्वतःच्या गळ्यात बांधून घेतले अथवा न घेतले तरी त्याच्या गळ्यात फिल्मी साहित्याची डॉक्टरेट अवश्य बांधावी. कारण ते संपूर्ण प्रेमपत्र फिल्मी गाण्यांचे तुकडे जोडून, गद्यासारखे पद्य लिहून तयार करण्यात आले होते. या विचारांबरोबरच रंगनाथाच्या मनात आणखी एक भावना प्रबळ होत होती. तिचे वर्णन फिल्मी भाषेतच करता येईलः - 'जाने फिर क्यों जलाती है दुनिया मुझे !' (ही दुनिया मला पुनः पुनः का बरे छळते आहे ?) त्या दिवशी त्याचा आवाज ऐकून जी तरुणी 'हाय मैया' हा पवित्र मंत्र जपत पळून गेली होती तीच आज दुसऱ्या कुणासाठी तरी 'अकेले हैं चले आओ,' जहाँ हो तुम,' अशी अपील ब्रॉडकास्ट करीत होती. हे सारे त्याला असह्य होत होते.

पत्र खिशात घालून रंगनाथ घरातून बाहेर पडला. आज शहरात जोगनाथाचा खटला सुरू होणार होता, आणि शिवपालगंजमध्ये जो - जो म्हणून महत्त्वाचा इसम समजला जात होता तो तिकडेच धाव घेत होता. एखाद्या गुंडावर खटला सुरू झाला की ग्रामीण बांधवांना अशी स्वाभविक इच्छा होते की आपण शहरात चक्कर टाकून आणि कोर्टकचेरी बघून यावे. गुंडाचा अपमान होत असलेला पाहून त्यांना हार्दिक सुख मिळते आणि गुंडालाही, पाहा, गावचे किती लोक माझ्या मदतीला धावून आले आहेत, असे वाटून हार्दिक सुख प्राप्त होते. या परंपरेला अनुसरून गावातील अनेक लोक शहराकडे गेले होते आणि पुष्कळसे अजून जावयाचे होते.

बद्री पहिलवान समोरून आपल्या भुवन-मोहन रूपात येत होते. मलमलीचा सदरा. फाल्गुन महिन्याच्या दृष्टीने थंडगार असला तरी त्यांच्या शरीरावर झळकत होता. त्याच्या आत बनियन घालण्याची जरूर त्यांना भासली नव्हती. कमरेला लंगोट तर कसलेला होताच, परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की त्यावर लुंगीही होती. पायांत काळे चकचकीत बूट. तुळतुळीत गोटा केलेल्या डोकीवर कडू तेलाची चमक आणि त्याच्यावर - फार वरती निळे आकाश.

रंगनाथाला प्रथम वाटले की आपण हे प्रेमपत्र रूप्पनबाबूसमोर सादर करावे, आणि 'संस्कृतीच्या अधःपतनात सिनेमाचा वाटा' या सारख्या विषयावर छोटेसे व्याख्यान देऊन त्याला बेलाच्या प्रेमात पडण्यापासून परावृत्त करावे. रूप्पनबाबूंशी या विषयावर चर्चा करणे अवघड जाईल, हे त्याला कळत होते. परंतु प्रेमपत्र मिळणे यासारख्या भयंकर घटनेचा मामुली पद्धतीने निकाल लावणे हेही त्याला योग्य वाटत नव्हते. परंतु बद्री पहिलवान दिसताच त्याने आपली योजना बदलली - एखादा अमेरिकन एक्सपर्ट दिसताच आपण कधी-कधी आपली योजना बदलतो त्याप्रमाणे.

बद्री पहिलवानांनी दुरूनच प्रेमपत्राचे निरीक्षण केले, आणि त्यांना ते सोपे जावे म्हणून रंगनाथ आपल्या दोन्ही हातांत ते पत्र धरून दीड फूट अंतरावर उभा राहिला. ते निमूटपणे संपूर्ण पत्र वाचू लागले. एके ठिकाणी जेव्हां त्यांनी डोळे किलकिले केले तेव्हा रंगनाथाने त्यांना मदत करण्यासाठी वाचून दाखविले... ''फिर ये हसीं रात न हो'' आणि म्हणाला, ''हसीं म्हणजे हसीन, सुंदर !'' (पुन्हा अशी सुंदर रात्र कदाचित येणार नाही.)

बद्री पहिलवानांनी एक ढेकर दिला. त्याचा अर्थ बहुदा असा असावा की ते सांगण्याची जरूर नाही. असल्या गोष्टी मला चांगल्या समजतात. संपूर्ण पत्र वाचून झाल्यावर त्यांनी ते आपल्या हातात घेतले आणि त्याची घडी घालून ते आपल्या सदऱ्याच्या खिशांत ठेवले.

रंगनाथ म्हणाला, ''रूप्पनबाबू साफ चुकीच्या मार्गानं चालले आहेत. आणि ती पोरगी ! काय काय कचरा तिनं या पत्रात भरलाय देव जाणे.''

यावर बद्री पहिलवान जोरात हसले आणि म्हणाले, ''ही चिठ्ठी त्या सालीनं, ग्रामसेविकेनं लिहिली असेल. या गावात असल्या गोष्टी फक्त तिलाच येतात.''

म्हणजे ? ... रूप्पनबाबू एखाद्या ग्रामसेविकेच्या प्रेमात अडकले की काय ?''

पहिलवान पुनः पूर्वीसारखे हसले. नंतर स्वतःला सावरून म्हणाले, ''छेः छेः ! तू तर प्रत्येक गोष्ट उलटीच समजतोस. ती बिचारी असली भानगड करीत नाही. फक्त इतरांची पत्रं लिहून देते.''

बद्री पहिलवान आपल्या वाटेने निघून गेले. रंगनाथाच्या चेहऱ्यावर काळजीचे चिन्ह पाहून जाता जाता ते म्हणाले, ''या कागदाची चिंता तू करू नकोस. मी सारं ठीक करून देतो.''

न्यायालय शहरात होते, परंतु त्यात जवळ जवळ सारे शिवपालगंज गाव भरले होते. जोगनाथाविरूद्ध चोरीचा खटला चालू होता आणि त्यात पुराव्याची साक्ष चालली होती.

वातावरण गावंढळ व अश्लील होते. व्हरांड्यांत नागरिक कुत्र्यांसारखे लोळत पडले होते. होळी जवळ आली होती. त्यामुळे लोकांच्या तोंडात शिव्या व चावट विनोद घोळत होते. शरीरांवर घाणेरडे परंतु रंगी-बेरंगी कपडे अथवा चिंध्या होत्या. गलिच्छ, दाढ्या वाढलेले वादी-प्रतिवादी-साक्षीदार बिड्या फुंकत अथवा किडक्या दातांच्या मागे तंबाखूचा चुरा सुरक्षित ठेवून जोर जोरात बडबडत होते. एक बाई जमिनीवर झोपून



एका मुलाच्या तोंडात आपला स्तन कोंबून त्याला दूध पाजत होती; आणि ते दृश्य अनेक उपस्थित नागरिकांना मोठे आकर्षक वाटत होते.

वारा सोसाट्याचा होता आणि धूळ व पाचोळा ओसरीवर पसरत होता.

पायांना खाकी पट्टी गुंडाळलेले, दोन पोलिस शिपाई व्हरांड्यात उघड्या डोक्याने फिरत होते. त्यांच्यापैकी एकाच्या पायातील वहाणा ज्या नेहमी इतरांची मरम्मत करण्यास तयार असत-समोरच्या वडाच्या झाडाखाली बसलेल्या चांभाराकडे स्वतःची मरम्मत (दुरूस्ती) करवून घेण्यासाठी गेल्या होत्या. दुसऱ्याच्या वहाणा कोर्टाच्या दारात काढून ठेवल्या होत्या. कारण त्या अजून कोऱ्या होत्या आणि पायात घातल्यावर आपल्याच अंगठ्याला चावत होत्या. काहीही काम नसले तरी, वकील लोक, कामाच्या ओझ्याखाली दबल्यासारखे वारंवार कोर्टात जात होते आणि बाहेर येत होते. आरामात जांभया देणारे शिरस्तेदार दर पंधरा मिनिटांनी कोर्टाच्या बाहेर येऊन एका पानपट्टीच्या दुकानाकडे जात होते आणि मग एखाद्या कज्जेदलालास आपल्या मागे फरफटत, दुसऱ्याला बरोबर घेत, तिसऱ्याला काखेत मारून असे समजावून सांगत होते की आज काम फार आहे, आता परवा या. ते तोंडात पान व चुना यांचा तोबरा भरून, उंटाप्रमाणे मान उंच करून, पुनः कोर्टाच्या सुरक्षित वातावरणात जाऊन बसत होते.

व्हरांड्यात एका कोपऱ्यात लंगडा बसला होता.

सनीचर सरपंच असल्यामुळे तेथील तमासगिरांमध्ये त्याची उपस्थिती अनिवार्य होती. त्याचे आणखी एक कारण असे होते की आज छोटू पहिलवान पोलिसांच्या बाजूने जोगनाथाविरूद्ध साक्ष देणार होता. या घटनेला ऐतिहासिक महत्त्व होते. कारण छोटू पहिलवान वैद्यजींचा माणूस समजला जात असे आणि जोगनाथही वैद्यजींचाच माणूस होता. आता अचानक अशी परिस्थिती निर्माण झाली होती की एकाच गृहस्थांची दोन माणसे आरोपी व वादीचा साक्षीदार या नात्याने एकमेकांसमोर दंड ठोकून उभी होती. या घटनेला उद्देशून रूप्पनबाबूंनी काही दिवसांपूर्वी तमाशाच्या शैलीत असे उद्गार काढले होते की ''दो फूल साथ फूले, किस्मत जुदा-जुदा है !'' (दोन फुले एकत्र उमलली पण त्यांचे नशीब मात्र वेगवेगळे आहे.)

सनीचर आणि गावचे बरेचसे लोक कोर्टात, आत गेले होते. लंगडा बाहेर व्हरांड्यात बसला होता. सनीचर सहज गंमत म्हणून त्याला आपल्या रिक्शातून घेऊन आला होता. तो तेथे बसल्या बसल्या आपल्या नवीन श्रोत्यांना आपल्या जीवनातील अनुभव सांगत होता. त्याचे फक्त एक जीवन होते आणि त्यात फक्त एकच अनुभव होता. तोच तो यावेळी पाल्हाळाने सांगत होता.

''...तर काय बापू, इतक्या दिवसांनंतर, पुरे एक वर्ष तीन महिने उलटल्यावर, आता प्रकरण रूळावर आलंय. नकलेच्या अर्जात आता काही चूक राहिलेली नाही,

फाईलही जिल्ह्यातून तालुक्यात परत आली आहे. काल मामलेदार कचेरीत गेलो होतो तेव्हा समजलं की नक्कल कारकुनानं आता माझं काम हातात घेतलंय. आज नक्कल तयार होईल. मग ती अस्सल प्रतीशी ताडून पाहिली जाईल .... बस्स ! आता तीन-चार दिवसांचीच खोटी आहे.''

एक वकील व्हरांड्यातील खांबाला टेकून सिगारेट पीत होते. ते तेथूनच म्हणाले, ''इतके दिवस वणवण भटकलास. त्याऐवजी प्रथमच आमच्याकडे किंवा कुठल्याही वकिलाकडे गेला असतास तर तीन दिवसांत हे काम झालं असतं.''

लंगड्याने आजकाल संतांप्रमाणे मधुर स्मिताचा वापर करण्याची कला शिकून घेतली होती. ते स्मित त्याने चेहऱ्यावर पांघरले की दुसरा इसम पोरकटासारखे बोलत असून आपण आपल्या साधुत्वामुळेच ते सहन करीत आहोत, असा आभास निर्माण होई. त्याच स्मिताचा खूप अधिक प्रमाणात वापर करीत लंगडा म्हणाला, ''वकिलाची गरज नव्हती बापू; ती तर सत्याची लढाई होती. कारकुनाला पाच रूपये दिले असते तर नक्कल तीन दिवसांतच काय पण तीन तासांत मिळाली असती. पण त्या पद्धतीनं त्याला ती रक्कम घ्यायची नव्हती अथवा मला ती द्यायची नव्हती.''

वकिलाने विचारले, ''त्याला का घ्यायची नव्हती ? रूपये दिले आणि त्यानं घेतले नाहीत, असं झालं की काय ?''

लंगडा थकून जमिनीवर आडवे होण्याची तयारी करू लागला होता. तो म्हणाला, ''ती सत्याची लढाई होती, बापू. तुम्ही वकील आहात. तुम्हांला ते कळायचं नाही.''

लोक हसू लागले. परंतु लंगड्याने आडवे होऊन निमूटपणे डोळे मिटून घेतले; आणि तो हलकेच कण्हला.

कोणी तरी विचारले, ''काय भानगड आहे ? लंगडेबुवा गार पडत चाललाय.''

त्याने डोळे मिटल्या मिटल्याच मान हलविली. काही बोलला नाही. त्याच्या जवळ बसलेल्या एका इसमाने त्याच्या अंगाला हात लावून म्हटले, ''ताप आहे असं वाटतंय.''

एक म्हातारी निमूटपणे बसून घुबडासारख्या डोळ्यांनी जगाकडे दार्शनिकतापूर्वक पाहात होती. ती म्हणाली, ''दिवसच वाईट आलेत. माझी दोन मुलंही तापानं फणफणताहेत. शेतं पिकून पिवळी झालीयेत. ती कापायला कुणी नाही. उंदीर नासधूस करताहेत.''



गयादीनची साक्ष चालली होती. उलट तपासणी संपत आली होती. अचानक जोगनाथाच्या वकिलाने विचारले,

''तुम्हांला एक मुलगी आहे ?''

''होय !''

''तिचं नाव बेला आहे ?''

''होय !''

''तिचं वय सुमारे वीस वर्ष आहे ?''

''होय.''

वीस वर्षे वयाच्या मुलीच्या बापाकडे जसे तीक्ष्ण नजरेने व संशयाने पाहिले पाहिजे तसे कोर्टाने गयादीनकडे पाहिले.

''तुमच्या घरी एखादी दुसरी स्त्रीही आहे ?''

''होय. माझी विधवा बहीण आहे.''

''पण ती नेहमी तुमच्याच घरी राहात नाही ना ?''

''छेः छेः ! ती नेहमी माझ्याच घरी राहाते.''

वकिलाने गर्जून म्हटले, ''तुम्ही खरं बोलायची शपथ घेतलीय. खोटं बोलाल तर तुमच्यावर खटला होईल. तुमची बहीण बहुदा आपल्या सासरीच असते आणि सध्या तुमची मुलगी घरी एकटीच असते, ही गोष्ट खरी नाही काय ?''

गयादीन गप्प उभे राहिले. वकिलाने पुनः दटावून म्हटले, ''बोलत का नाही ?''

''काय बोलू ? तुम्ही इतके रागावला आहात की काही बोलणं कठीण आहे.''

वकील त्याच आवाजात म्हणाला, ''मी मुळीच रागावलो नाही.''

गयादीन काही बोलले नाहीत. तेव्हा वकिलाने आवाज सौम्य करून म्हटले, ''यावर तुमचं उत्तर काय आहे ?''

''माझी विधवा बहीण नेहमी माझ्या घरीच असते.''

''तुमच्या मुलीचं लग्न झालंय ?''

''नाही.''

''कधी करायचा विचार आहे ?''

''कर्ताकरविता परमेश्वर आहे.''

परमेश्वराचे नाव ऐकताच कोर्टाने आपली मान वर उचलली. आतापर्यंत कोर्ट दुसरे काही कागदपत्र पाहात होते. त्यांचा या खटल्याशी काही संबंध नव्हता. त्यांनी आता वकिलाला म्हटले, ''या प्रश्नांचा खटल्याशी काही संबंध दिसत नाही.''

यावर वकील म्हणाला, ''महाशय, तो संबंध मी नंतर स्पष्ट करणार आहे.''

कोर्टाचा पाठिंबा मिळाल्यावर पब्लिक प्रॉसिक्यूटरही आपल्या साक्षीदाराचा बचाव

करण्यास पुढे सरसावला. त्याने हरकत घेतली, ''महाशय, हे प्रश्न अप्रासंगिक आहेत.''

कोर्टाने डोके वटारून पब्लिक प्रॉसिक्यूटरकडे पाहिले. त्याच्या हरकतीला हेच उत्तर होते.

तिकडे जोगनाथाच्या वकिलाने कोर्टाचा मूड बिघडतो आहे असे पाहून गयादीनांशी त्यांच्या मुलीविषयी सुखसंवाद करण्याचे थांबविले. दुसऱ्या साक्षीदाराला बोलावण्यात आले.

ज्या इसमाने जोगनाथाच्या घराच्या झडतीच्या वेळी प्रकट होऊन आणि त्याच क्षणी तेथून पसार होऊन साक्षीसाठी आपल्याला केव्हाही बोलावण्यास हरकत नसल्याचे आश्वासन पोलिसांना दिले होते तोच हा साक्षीदार होता. याचे नाव बैजनाथ असे होते आणि तो शिवपालगंजचे पंडित राधेलाल यांचा चेला होता. ज्यांनी खोट्या साक्षी देण्यात उच्च कोटीचे प्राविण्य संपादन केले होते. ज्यांना आजपर्यंत मोठ्यात मोठा वकीलही उलटतपासणीत उलटे पालटे करू शकला नव्हता आणि कुणालाही पकडता येणार नाही असे खोटे बोलण्यातील क्षमतेमुळेच संबंध जिल्ह्यातील कज्जेदलाल आणि साक्षीदार यांमध्ये ज्यांना अभूतपूर्व प्रतिष्ठा प्राप्त झालेली होती तेच हे पंडित राधेलाल. अलीकडे काही दिवसांपासून पूर्वेकडल्या प्रेयसीच्या प्रीतीने त्यांना काहीसे घरकोंबडे बनवून टाकले होते, त्यामुळे साक्षी देण्याच्या प्रायव्हेट प्रॅक्टिससाठी ते पुरेसा वेळ देऊ शकत नव्हते. म्हणून त्यांनी पूर्वीपेक्षा खटल्यांना जाणे कमी करून टाकले होते. बडे वकील आणि डॉक्टर यांच्याप्रमाणे आता ते सामान्य प्रॅक्टिस न करता विशेषज्ञांसारखी प्रॅक्टिस करीत असत. ही प्रॅक्टिस सध्या फक्त दिवाणी दाव्यापुरती व विशेषतः वारसाविषयक दाव्यांपुरतीच मर्यादित होती. फौजदारी खटल्यांतील खोट्या साक्षीची पातळी कायम टिकविण्याच्या दृष्टीने गेल्या काही वर्षांत त्यांनी काही चेले तयार केले होते. त्यांमध्ये बैजनाथांचे स्थान सर्वांत वर होते.

बैजनाथ भीखमखेडाचा राहाणारा होता. परंतु आसपासच्या गावांत साक्षीच्या उद्देशाने तो आधीपासूनच हजर असतो असे मानले जात असे. अशा प्रकारे त्याची प्रॅक्टिस भीखमखेड्यातच नव्हे तर आसपासच्या अनेक गावात चांगला जम बसवून राहिली होती. जोगनाथाच्या गिरफदारीच्या दिवशी तो शिवपालगंजमध्येच होता हा नुसता योगायोग म्हणायचा. वस्तुतः साक्ष देण्यासाठी त्याचे खरोखरीच त्या ठिकाणी असणे-नसणे अप्रस्तुत होते.

बैजनाथाने वादीच्या बाजूने संपूर्ण खटल्याची उजळणी केली. त्याने सांगितले, ''जोगनाथाच्या घराची झडती माझ्या समक्षच घेण्यात आली, हे तीन दागिने माझ्यासमोर मिळाले, हे माझ्यासमोर मोहरबंद करण्यात आले, त्यांचा रिपोर्ट माझ्यासमोर लिहिण्यात आला, त्यावरील माझी सही माझ्यासमोरच झाली,'' वगैरे वगैरे.



जोगनाथाच्या वकिलाने उलटतपासणी सुरू केली :

''तू भीखमखेड्यात राहातोस काय ?

''होय !''

''भीखमखेडा शिवपालगंजहून दोन मैल आहे ?''

''मला माहीत नाही.''

''तर मग किती दूर आहे ?''

''शिवपालगंजमध्ये तमाशा होतो तेव्हा तो भीखमखेड्यात ऐकू येतो.''

''मग एक मैल असेल ?''

''ते सांगता येणार नाही.''

''अर्धा कोस ?''

''कोण जाणे !''

''वीस मैल ?''

''मला माहीत नाही. मी काही अंतर मोजलं नाही.''

कोर्टाने साक्षीदाराकडे रोखून पाहून विचारले, ''दोन गावांत किती अंतर आहे?''

''मध्ये काही शेतं पडतात.''

''किती शेतं असतील ?''

''दहा-वीस-पन्नास शेतं असतील.''

''नक्की सांग ना, किती शेतं असतील ?''

''माहीत नाही. मी मोजली नाहीत.''

कोर्टाने पब्लिक प्रॉसिक्यूटरकडे रोखून पाहिले. तो म्हणाला, ''महाशय, साक्षीदार खरंच बोलतोय. त्यानं शेतं मोजली नाहीत. पण दोन्ही गावं जवळजवळ आहेत. एक मैल अंतरावर. फौजदारांच्या साक्षीत हे येऊन गेलंय.''

कोर्टाने जोगनाथाच्या वकिलाला म्हटले, ''तर मग अंतरासंबंधी उलटतपासणी करायची काय जरूर ? फौजदारांच्या विधानाला तुम्ही चॅलेंज करणार आहात काय ?''

''मी चॅलेंज करीत नाही. पण महाशय, उलटतपासणी ही करावीच लागते.''

''का ?''

''हे दाखवून देण्यासाठी की साक्षीदाराची अक्कल केवढी आहे ?''

''की खुद्द तुमची अक्कल किती आहे हे दाखविण्यासाठी ?''

कोर्टाच्या तोंडून हे वाक्य ऐकताच बचाव पक्षाच्या वकिलाचा चेहरा खेटराने मारल्यासारखा झाला. परंतु एवढ्यात कोर्ट जोरजोराने हसू लागले. त्यावरून त्यांनी ते वाक्य अपमान करण्यासाठी उच्चारले नसून सहज गंमत म्हणून उच्चारले होते हे सिद्ध झाले. एवढे झाल्यानंतर तो विनोद होता हे जसजसे ज्याच्या ज्याच्या लक्षात येत गेले तो तसतसा आळीपाळीने हसत राहिला. अखेरीस जोगनाथाचा वकीलही हसला. न्यायालयांचा एक अलिखित कायदा असा आहे की कोर्ट आणि वकील यांनी अकबर व बिरबल यांच्यातील विनोदासारखा हजरजबाबीपणा व्यक्त करणारा विनोद व थट्टामस्करी मधून-मधून करावी. या अनावश्यक प्रथेचे परिपालन झाल्यानंतर कोर्टाने भीखमखेडा व शिवपालगंज यांच्यातील अंतरासंबंधीचे सारे प्रश्न नियमबाह्य ठरविले. अर्थात त्या प्रश्नांची उत्तरे कागदावर लिहिली गेल्यानंतर ते रद्द ठरले होते.

आता पुनः बैजनाथाची उलटतपासणी पुढे चालू झाली.

''आतापर्यंत पोलिसांच्यावतीने तू किती खटल्यात साक्ष दिली आहेस ?''

''आठवत नाही.''

''मी असं म्हणतो की तू आतापर्यंत पोलिसांच्या वतीनं साठ खटल्यांत साक्ष दिली आहेस.''

''तुम्ही खुशाल म्हणा. मला काही आठवत नाही.''

''यापूर्वीही तू कधी एखाद्या खटल्यात पोलिसांचा साक्षीदार म्हणून आला होतास काय ?''

''पोलिसांचा साक्षीदार म्हणजे काय ?''

''तू प्रश्नाचं उत्तर देण्याऐवजी उलट प्रश्न विचारू नकोस. सरळ उत्तर दे.''

''तुम्ही मला अरे-तुरे करून दाबायचा प्रयत्न करू नका. मी कुणी गावंढळ असामी नाही.'' ही धमकी ऐकताच वकिलाने कोर्टाकडे संरक्षण मागितले. कोर्टाने सांगितले, ''अरे बाबा, प्रश्नाचं उत्तर नीट दे ना !''

बैजनाथ वाकून म्हणाला, ''गरीब परवर, प्रश्न तरी कळू द्या. हे मला विचारताहेत की मी कितीदा पोलिसांचा साक्षीदार म्हणून इथं आलोय. मला पोलिस-बिलीस काही माहीत नाही. मी खरी खरी साक्ष देतो. जे माहीत असेल ते सांगायला मी डरत नाही. - मग पोलिसवाले बोलावोत किंवा बचावपक्षाचे लोक बोलावोत.''

यावर कोर्टाने काही सांगण्यापूर्वीच जोगनाथाच्या वकिलाला घुस्सा आला. वस्तुतः हे वकील आपल्या कोपिष्टपणाबद्दल प्रसिद्ध होते, आणि त्यांचे दलाल बहुदा नवीन कज्जेखोरांना त्यांचा घुस्सा दाखविण्यासाठीच कोर्टात पकडून घेऊन जात असत. क्रोध



हीच त्यांची विद्या, त्यांची बुद्धी, त्यांचे कायदाविषयक ज्ञान, त्यांचे अस्त्र-शस्त्र व कवच होते. तोच त्यांचा साईनबोर्ड, त्यांची जाहिरात, त्यांचा पितु-मातु सहायक-स्वामि-सखा होता. ते जेव्हा रागावत तेव्हा इतर लोकांचा थरकाप उडो अथवा न उडो ते स्वतः मात्र थरथर कापू लागत. समजूतदार न्यायाधीश त्यांच्या रागाचा परिणाम स्वतःवर होऊ न देता निमूटपणे आपले काम करीत राहात, आणि ती खोकला किंवा शिंक यांसारखी एक मामुली बाब आहे असे समजून त्यावर आपले मत व्यक्त करीत नसत. एखाद्या न्यायाधीशाने त्यांच्या रागीटपणाबद्दल नाराजी व्यक्त केली तर त्या न्यायाधीशाचा निषेध करणारे भाषण वकीलसाहेब बार असोसिएशनमध्ये देत आणि असोसिएशन निषेधाचा ठराव पास करी.

हे कोर्ट समजूतदार होते, म्हणून त्याने या रागाकडे लक्ष दिले नाही. तिकडे वकिलाने ओरडून म्हटले, ''माझा प्रश्न अगदी सरळ आहे. चालबाजी दाखवू नकोस. तू असं सांग, सरकारी खटल्यांमध्ये वादीच्या बाजूनं तू आतापर्यंत कितीदा साथ दिली आहेस ?''

बैजनाथ म्हणाला, ''तर मग माझाही अगदी साधा सवाल आहे, वकील साहेब ! तुम्ही असं सांगा, खुनी आणि दरवडेखोर'' यांच्या बाजूनं तुम्ही आतापर्यंत किती खटल्यात वकीलपत्र घेतलंय ?''

आपला क्रोध पाहून लोक घाबरलेले व चिडलेले वकिलांनी पाहिले होते, परंतु इतक्या थंडपणे असभ्यपणा करणारा इसम त्यांना अजून भेटला नव्हता. या उत्तरापुढे त्यांचा राग शेपूट हलवू लागला, आणि मग चीत होऊन कोर्टाला चारी पाय दाखवीत तो सपशेल उताणा पडला. वकिलाची नजर कोर्टाकडे वळली. तो म्हणाला, ''महाराज, आता आपणच पाहा या साक्षीदाराचं वागणं. हा अगदी असभ्यपणे बोलतो आहे. त्यामुळं कोर्टाचीच मानहानी होत आहे.''

बैजनाथानं चलाखीने मान हलविली. जणू वकील धावत होता आणि त्याने मध्येच टांग मारून त्याला पालथे पाडले होते. तो हलकेच म्हणाला, ''तुम्ही वाटेल ते विचारावं, आणि मी काही विचारलं तर कोर्टाकडे तक्रार का करता वकील साहेब ?''

कोर्ट काहीतरी जरूरीचे कागदपत्र वाचण्यात गुंतले होते. त्यामुळे वकिलाला आपल्या स्वतःच्या हिकमतीच्या जोरावरच त्या खड्ड्यातून बाहेर पडणे जरूर होते. त्याने दातओठ खात म्हटले, ''दीड दमडीसाठी पोलिसांतर्फे खोटी साक्ष देतोस बेट्या, आणि उलट आमचीच उलट तपासणी घेतोस ?''

बैजनाथाने सभोवताली एक अहंकारपूर्ण दृष्टी फिरवून वकिलाकडे कीव केल्याप्रमाणे पाहिले, आणि सर्वांना उद्देशून तो म्हणाला, ''हा आपला-आपला धंदा आहे,''

कोर्ट आवश्यक कागदपत्रांवर सही करून रिकामे झाले होते. आता अत्यंत भोळेपणाने ते म्हणाले, ''आपसात बोलणं बरं नव्हे. हं, वकील साहेब, उलटतपासणी पुढे चालू करा.''

वकील म्हणाला, ''महाराज, या साक्षीदाराची उलटतपासणी करणं महाकर्मकठिण आहे. प्रत्येक प्रश्नाचं उत्तर देतांना तो अडखळतो. हे नमूद करून ठेवावं.''

कोर्टाने बैजनाथाकडे अर्थपूर्ण नजरेने पाहिले. बैजनाथ पब्लिक प्रॉसिक्यूटरकडे पाहू लागला. पब्लिक प्रॉसिक्यूटर कोर्टाकडे पाहू लागला.

कोर्टाने वकिलाला सांगितले, ''पुढं चला.''

वकिलाने करकोच्याप्रमाणे आपले पाय बदलले, आणि अशा प्रकारे उलटतपासणीचे एक ऐतिहासिक युग संपवून दुसऱ्या युगात प्रवेश केला.

''तू सरकारविरूद्ध चुरई कलम ३७९ च्या खटल्यात सरकारच्या बाजूनं साक्ष दिली होतीस ना ?''

''मला आठवत नाही.''

''ही साक्ष तू याच महिन्यात दिली आहेस.''

बैजनाथ थोडा वेळ विचार करीत राहिला. नंतर म्हणाला, ''या महिन्यात मी एक साक्ष दिली होती. मी माझ्या बागेजवळून चाललो होतो. एक इसम एक गाठोडे घेऊन पळून चालला होता .....''

''तू साक्षीत काय सांगितलंस ते पुनः सांगण्याची जरूर नाही. फक्त एवढंच सांग की मागल्या महिन्यातही तू साक्ष दिली होतीस ?''

''साक्ष दिली होती, पण खटल्याचं नाव मला आठवत नाही.''

इतक्या वेळानंतर आता कोर्टालाही राग आला. ते म्हणाले, ''हे कसं शक्य आहे ?''

''सरकार, आम्ही आपली गावढळ माणसं. लिवणं पुसणं आम्हाला येत नाही.''

वकील म्हणाला, ''महाशय, हेही नमूद करून घ्यावं.''

बैजनाथ म्हणाला, ''सरकार काय-काय म्हणून नमूद करणार ? तुम्हीच टिपून घ्या. आपल्या कारकुनाला सांगा, तो सारं काही टिपून घेईल.''

आता मात्र कोर्टाने बैजनाथाला चांगलेच जामले. इतके जामले की थोडा वेळ बैजनाथ खरोखरीच घाबरला. त्याचा चेहरा फटफटीत पडला. तिकडे धमकावता धमकावता कोर्टाचा चेहरा लाल झाला. परंतु कोर्टाची धमकावणी दुसरे मिनिट पार करून तिसऱ्या मिनिटापर्यंत पोचली तेव्हा बैजनाथ सावरला. त्याला आपले वस्ताद पंडित राधेलाल यांचे स्मरण झाले. त्यांनी सांगितले होते की, ''बेटा, साक्ष देतांना कधी-कधी वकील किंवा न्यायाधीश रागावतात. त्याला भिता कामा नये. ते बिचारे



दिवसभर बौद्धिक काम करीत असतात. त्यांची पचनशक्ती बिघडलेली असते. ते बहुदा अपचन, मंदाग्नी किंवा मूळव्याध या रोगाने पीडलेले असतात. म्हणून ते चिडखोर बनतात. त्यांच्या धमकावणीला भीक घालता कामा नये. आपण असाच विचार करायचा की ते आपल्याला धमकावत नसून स्वतःच्या पचनशक्तीलाच धमकावत असतात. एवढंच नव्हे तर, ही सारी मोठी माणसं शिकली सवरलेली असतात, हेही लक्षात ठेवलं पाहिजे. त्यांना तुझी मनःस्थिती कळायची नाही. म्हणून जेव्हा ते रागावतील तेव्हा आपण थंड रहायचं, आणि त्यांना कसं बनवता येईल, याची युक्ती शोधीत राहायचं.''

कोर्टाने आता शेवटची ताकीद दिली की प्रत्येक प्रश्नाचे उत्तर 'होय किंवा नाही' एवढेच द्यावयाचे. उलट तपासणीचा टँक आता सपाट जमिनीवरून घरघरत चालू लागला.

''सहा महिन्यांपूर्वी तू सरकार विरूद्ध बिसेसर या खटल्यात वादीच्या बाजूनं साक्ष दिली होतीस ?''

''नाही !'' (हे उत्तर बरोबर होते. कारण बैजनाथाने ही साक्ष सात महिन्यांपूर्वी दिली होती.)

''एक वर्षापूर्वी तू सरकार विरूद्ध छुन्नूच्या खटल्यात साक्ष दिली होतीस ?''

''नाही !'' (हे उत्तरही बरोबर होते. छुन्नूचा खटला चौदा महिन्यांपूर्वी झाला होता.)

'' ..... ''

'' नाही ! ''

'' ..... ''

'' नाही ! ''

'' ..... ''

'' नाही ! ''

'' ..... ''

'' नाही ! ''

'' ..... ''

'' होय ! ''

''अशा प्रकारे तू आतापर्यंत अनेक खटल्यांत सरकारी साक्षीदार म्हणून आला होतास.''

''तुम्ही तर असे फक्त दोनच खटले सांगितलेत की !''

''इतक्या साऱ्या खटल्यांमध्ये तूच पोलिसांना वारंवार साक्षीसाठी सापडतोस. याचं

काही खास कारण आहे काय ?''

बैजनाथाने कोर्टाकडे पाहून हुतात्म्याचा आव आणून म्हटले, ''कारण एवढंच की मी जवानमर्द माणूस आहे.'' त्याची छाती फुगली, ''बदमाषांच्याविरूद्ध साक्ष देण्याची आमच्याकडे कुणाची हिम्मत होत नाही. मी निधड्या छातीचा माणूस आहे, आणि गुंडगिरीच्या विरूद्ध आहे. त्यामुळं जे मला दिसतं ते बेधडक सांगायला मी कचरत नाही.''

वकिलाने त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. कोर्टाने हाताने खूण करून त्याला साक्षीदाराच्या पिंजऱ्यातून बाहेर येण्यास सांगितले. पण बैजनाथाचे व्याख्यान थांबेनाच. तो म्हणत होता, ''मी अशी प्रतिज्ञा केलीय की आमच्या भागांतून गुंडांची हकालपट्टी केल्याशिवाय मी राहाणार नाही. मी माझ्या प्रतिज्ञेवर दृढ आहे. तसं करतांना माझा प्राण गेला तरी मला त्याची पर्वा नाही —''

★ ★

''तुझं नाव ?''

''छोटू पहिलवान.''

पब्लिक प्रॉसिक्यूटरने त्यात दुरूस्ती करण्यासाठी शिरस्तेदाराला सांगितले, ''लिहा, छोटेलाल.''

छोटू पहिलवानाने त्याच्याकडे अशा नजरेने पाहिले की जणू त्याला खरोखरच छोटा बनविण्यात आले असावे. नाराज होऊन त्याने आवंढा गिळला. दुसरा प्रश्न होता, ''बापाचं नाव ?''

''कुसेहर.''

पब्लिक प्रॉसिक्यूटरने पुनः दुरूस्ती केली, ''कुसेहर प्रसाद.''

या खेपेला छोटू पहिलवानाने त्यांच्याकडे असे पाहिले जणू त्याच्या बापाला कुणीतरी शिवी दिली असावी.

''जात ?''

''बामण.''

''मुक्काम ?''

''आम्ही गंजकर आहोत.''

ठीक आहे. पण तुझ्या गावाचं नाव काय ?''

''गंज.''

''कोणता गंज ?''



छोटू पहिलवानाने अक्कडबाज़पणे म्हटले, ''शे-दोनशे गंज आहेत की काय ?'' नंतर थोडा वेळ थांबून सांगितले, ''शिवपालगंज.''

''म्हण, देवाशपथ, खरं खरं सांगेन.''

''म्हटलं.''

''नुसतं म्हटलं नव्हे, तोंडानं म्हण, देवाशपथ खरं खरं सांगेन.''

''तोंडानचं म्हटलं की.''

पट्टेवाला कोर्टाच्या तोंडाकडे बघू लागला. संभाषणात 'डेडलॉक' निर्माण झाला होता. कोर्टाने छोटू पहिलवानाकडे निरखून पाहिले. लांब-लांब कल्ले, खोंडासारखी गर्दन. गयादीनच्या भाषेत, 'बिन सोंडेचा हत्ती'. तिकडे कोर्टाचे व्यक्तित्व बुद्धिजीवी होते. त्याने पट्टेवाल्याला हुकूम सोडला, ''साक्षीदाराला म्हणावं, बाहेर जाऊन तोंड साफ करून ये.''

''बाहेर जाऊन आधी तोंड साफ करून ये.''

छोटू पहिलवानाने खांद्यावरील पंचाने तोंडावरील काल्पनिक घाम पुसला. नंतर आरामात साक्षीदारांच्या पिंजऱ्यावर रेलून इकडे तिकडे पाहू लागला. जणू जहाजाच्या रेलिंगवर रेलून उभ्या उभ्या समुद्रातील जलचरांकडेच कोणीतरी पाहात राहावे तसा तो उभा होता. कोर्टाने पुनः हुकूम सुनावला.

''साक्षीदाराचं तोंड साफ करवून घ्या.''

पब्लिक प्रॉसिक्यूटरने छोटू पहिलवानाला सांगितले, ''बाहेर जाऊन पान थुंकून ये.''

छोटू पहिलवान यावेळी खरोखरीच मोठ्या आत्मविश्वासाने व बेफिकीरपणाने पान चघळत होता. त्याला वाटले, आपल्याला असे सांगण्यात येत आहे की, ''बाहेर जाऊन आपला आत्मविश्वास थुंकून ये'' त्याने त्या हुकुमाकडे दुर्लक्ष केले. परंतु हळूच पान घशाखाली सरकविले, आणि पुनः एकदा पंचाने तोंड पुसून टाकले.''

कोर्टाने पट्टेवाल्याला हुकूम सोडला, ''साक्षीदाराला शपथ घ्यायला लाव.''

पट्टेवाल्याने या तडजोडीकडे विकृत नजरेने पाहात छोटू पहिलवानाला सांगितले, ''म्हण, देवाशपथ, खरं खरं सांगेन.''

''खरं खरं सांगेन.''

''देवाशपथ.''

''देवाशपथ.'' छोटू पहिलवानाने इकडे-तिकडे पाहात या खेपेला सहजगत्या म्हटले.

पब्लिक प्रॉसिक्यूटरने प्रथम छोटू पहिलवानाला जोगनाथाच्या घरच्या झडतीसंबंधी प्रश्न विचारले. फौजदार जोगनाथाबरोबरच त्याच्या घरात घुसले होते, हे सुद्धा त्याने

सांगून टाकले.''

''मग घरची झडती घेतली ?''

''होय.''

''काय मिळालं ?''

''काही नाही.''

पब्लिक प्रॉसिक्यूटरच्या कपाळाला आठी पडली. त्याने जोर देऊन विचारले, ''मी विचारतो आहे की झडतीत काय मिळालं ?''

''मिळणार काय ? घंटा !''

जोगनाथ आणि त्याचा वकील दोघेही एकदमच हसले. मागून सनीचर ओरडला, ''शाब्बास ! असंच चालू दे बेटा !''

''हे कोण बोललं ? हा काय असभ्यपणा !'' कोर्टाने गंभीरपणे विचारणा केली. परंतु एव्हाना सनीचर कोर्टातून बाहेर गेला होता.

पब्लिक प्रॉसिक्यूटरने म्हटले, ''झडतीत तीन दागिने मिळाले होते. ते हे तुझ्यासमोर आहेत.''

जोगनाथाचा वकील झटकन उठून समोर आला आणि कोर्टाला म्हणाला, ''महाशय, ही तर उलटतपासणी आहे.''

पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणाला, ''हुजूर, साक्षीदार उलटलाय. मला याची उलटतपासणी करायची परवानगी मिळावी.''

कोर्टाने गंभीरपणे सांगितले, ''करा.''

जोगनाथाच्या वकिलाने हरकत घेतली. ''महाशय, यांनी असं लिहून दिलं पाहिजे की हा साक्षीदार उलटलाय म्हणून.''

पब्लिक प्रॉसिक्यूटरने आपल्या फाइलीतून एक अर्ज काढला. तो नक्कीच आधीपासून लिहून ठेवलेला होता. तो अर्ज कोर्टाला सादर करण्यात आला.

बचाव पक्षाच्या वकिलाने पुनः हरकत घेतली. ''महाशय, हा अर्ज आधीच लिहून ठेवलेला होता.''

''त्यामुळं काही फरक पडत नाही.'' कोर्टाने विद्वत्तापूर्वक सांगितले.

परंतु आपल्या या कृत्याच्या समर्थनार्थ काही तरी स्पष्टीकरण देणे पब्लिक प्रॉसिक्यूटरला आवश्यक वाटले. तो म्हणाला, ''हुजूर, हा तर रोजचा व्यवहार आहे. न्यायालयीन डावपेचांचा एक भाग. प्रत्येक प्रसंगासाठी आधीपासून तयार रहावं लागतं.''

''ठीक आहे. ठीक आहे. तुम्ही उलटतपासणी घ्या.''

पब्लिक प्रॉसिक्यूटरने छोटू पहिलवानाकडे वळून आपला प्रश्न पुनः उच्चारला, ''हे जे तीन दागिने तुझ्यासमोर ठेवले आहेत ते झडतीच्या वेळी जोगनाथाच्या घरातून मिळाले की नाही ?''



नसती पिरपिर करण्याची आपली इच्छा नाही, अशा थाटात छोटू पहिलवान कोर्टाला म्हणाला, ''मला जे सांगायचं होतं ते सांगून झालं. झडतीत काहीही सापडलं नाही.''

पब्लिक प्रॉसिक्यूटरने फाईलीतून एक कागद काढून म्हटले, ''झडतीत मिळालेल्या सामानांची ही यादी तुझ्यासमोर लिहिली आहे ?''

''माझ्यासमोर फक्त शिवीगाळी होत राहिली. लिहिण्याचा प्रसंगच आला नाही.''

''या यादीवर तू सही केली आहेस ? बघून सांग.''

छोटू पहिलवानाने त्या कागदाकडे पाहिले देखील नाही. तो ऐटीत म्हणाला,

''नाही.''

पब्लिक प्रॉसिक्यूटरने एका ठिकाणी असलेल्या छोट्र्या सहीकडे बोट दाखवीत म्हटले, ''हे पाहा, नीट पाहा. ही सही तुझीच आहे.''

छोटू पहिलवानाने कोर्टाला सांगितले, ''सरकार, मला जे सांगायचं होतं ते सांगून झालं. आता हे पुनः पुनः तोच प्रश्न कशाला उगाळताहेत ?''

परंतु या खेपेस कोर्टाने सहानुभूती दाखविली नाही. उलट ताकीद दिली, ''कागद पाहून उत्तर दे. खोटं बोललास तर तुरूंगात जावं लागेल.''

छोटूवर याचा काही परिणाम झाला नाही. छाती फुगवून तो म्हणाला, ''तुरुंग तर त्यासाठीच आहेत, हुजूर. आम्ही कोर्टात आलो तेव्हाच एक पाय तुरूंगात नि एक बाहेर ठेवून आलो आहोत. पण मी कागद का बघू ? लिहिण्यावाचण्याच्या नावानं मी शंख आहे. लिहिणं-वाचणं माझ्या बाबतीत हराम आहे.''

पब्लिक प्रॉसिक्यूटरने आवाज चढवून विचारले, ''तर मग तू सही कशी करतोस ? ही सही तू केलेली नाहीस ?''

इतक्या वेळानंतर जोगनाथाच्या वकिलाने तोंड उघडले. एखाद्या वासराला कुरवाळावे तशा कोमल स्वरात तो म्हणाला, ''हळूहळू एकेक प्रश्न विचारा. साक्षीदार काही कुठं पळून चालला नाही.''

पब्लिक प्रॉसिक्यूटरने त्याकडे लक्ष न देता विचारले, ''तर मग तू सही कशी करतोस ?''

''कोण लेकाचा सही करतोय ? आमच्या घराण्यात सात पिढ्यांमध्ये कुणी सही केली असेल तर मी करणार ! जाऊन बघा पाचशे कागद घरात ठेवलेत. प्रत्येकावर मी अंगठ्याची निशाणी केलीय. अगदी न चुकता,

छोटू पहिलवानाने अभिमानाने चोहोकडे नजर फिरविली. पब्लिक प्रॉसिक्यूटरने

पुनः विचारले, ''मी असं विचारतोय की या कागदावर तू सही केली आहेस की नाही ?''

''तुम्ही तित्तर पक्ष्याप्रमाणे टुरटुर करीत बसा. तुम्हाला कोण अडवतोय ?'

कोर्टाने खडसावले, ''सभ्यपणानं बोल.''

छोटू पहिलवान जोषात येऊन म्हणाला, ''ज्याचा त्याचा सभ्यपणा ज्याच्या त्याच्याजवळ. त्यांच्या धमकीला भिऊन मी खोटं का सांगावं ?''

पब्लिक प्रॉसिक्यूटरने आपले कागद गोळा करीत म्हटले, ''मला काही विचारायचं नाही.''

छोटू पहिलवान लुंगी सावरीत बाहेर सटकू लागला. एवढ्यात जोगनाथाचा वकील म्हणाला, ''महाशय, मी काही प्रश्न विचारतो.''

कोर्टाने काही हरकत घेतली नाही. वकिलाने विचारले,

''गयादीनची मुलगी बेला हिला तू ओळखतोस ?''

''तिला कोण ओळखत नाही ?''

''फालतू गोष्टी नकोत. स्वतःच्या बाबतीत बोल. तू खुद्द तिला ओळखतोस की नाही ?''

''का ओळखणार नाही ?''

''ती मुलगी कशी आहे ?''

''वाईट चालीची आहे.''

कोर्ट म्हणाले, ''ही उलटतपासणी निरर्थक आहे. हिचा खटल्याशी काही संबंध नाही.''

''नाही कसा, महाराज ? आत्ता तो स्पष्ट होतोय बघा.'' वकिलाने चुटकी वाजवीत म्हटले आणि छोटू पहिलवानाला विचारले,

''बेला वाईट चालीची आहे, हे तू कशावरून म्हणतोस ?''

''प्रत्यक्ष डोळ्यांनी बघितलंय मी.''

''काय बघितलं आहेस ?''

''ती जोगनाथाबरोबर बदफैलीपणा करत असतांना मी पाहिलीय. म्हणून तर गयादीननं जोगनाथाला या खटल्यात अडकवलंय.''

यानंतर उलटतपासणी नेहमीच्या चाकोरीतून सुरू झाली. या उलटतपासणीच्या जोरावर कोर्टामध्ये हजारो वेळा हे सिद्ध करण्यात आले आहे की जगात चोर असा कोणी नसतोच. उलट ज्याला चोर समजण्यात आलेले असते तो घरमालकाच्या बायकोचा, बहिणीचा किंवा मुलीचा प्रियकर असतो, त्याला तिने रात्रीच्या एकांतात शय्यालाभासाठी बोलावलेले असते, परंतु घरमालक त्याला आपला भाऊ, मेहुणा किंवा



जावई म्हणावयास तयार ... होत नाही, तो त्याला चोरच समजतो आणि महाशय, त्याचा परिणाम हा की....

ते फौजदार साहेब आता शिवपालगंजला नव्हते. आपले मोडके-तोडके पलंग, दुभती गाय व कॉनव्हेंट गामिनी कन्या यांच्यासह शहरात आले होते आणि कुठल्या तरी गल्लीत मोठ्या मुष्किलीने शोधून मिळविलेल्या एका लहानशा भाड्याच्या घरात राहू लागले होते. त्यांच्याकडे असे काही विशेष काम सोपविण्यात आले होते की ज्यामुळे त्यांना सामान्य नागरिकाप्रमाणे राहावे लागत होते. आता सरकारी नोकरांना सामान्य नागरिकाप्रमाणे राहावे लागणे हे खेदजनक दशेचे द्योतक असल्यामुळे त्यांना पाहून कीव येत असे.

परंतु त्यांनी जोगनाथाविरूद्ध चोरीच्या खटल्याचा तपास केला असल्यामुळे त्यांना आज कोर्टात येऊन शिवपालगंजकरांचा सहवास स्वीकारावा लागला होता. छोटूची साक्ष ऐकताच त्यांनी 'छिः छिः !' असे उद्‌गार काढण्यास सुरूवात केली आणि कोर्टाची नजर त्यांच्याकडे वळण्यापूर्वीच ते गयादीनचा हात धरून बाहेर गेले. थोडा वेळ दोघेही स्तब्ध उभे राहिले.

अखेर फौजदार म्हणाले, ''हे गंजवाले ! बेइमानीपणालाही काही मर्यादा असते. अशा मुलीविषयी असलं घाणेरडे बोलतांना यांच्या जिभा झडून कशा जात नाहीत ?''

गयादीन जमिनीकडे पाहात होते. एक टाचणी दोन विटांच्या मध्ये पडली होती. बहुदा ती उचलावी की नाही याचा विचार ते करीत असावेत.

फौजदार साहेब धिक्काराने म्हणाले, कुणीही उठावं आणि कुणाबद्दल काहीही बरळावं. कुणाला विचारणारंच कुणी नाही.''

यावर आपल्या नेहमीच्या थकलेल्या थंड आवाजात गयादीन म्हणाले, ''हे तर देव बोलून चुकला होता, फौजदारसाहेब. ज्या दिवशी तुम्ही जोगनाथाला पकडलं त्याच दिवशी मी ओळखलं की आता माझ्या घरातल्या कुणाचीही अब्रू सुरक्षित राहाणार नाही.''

''मला फार खेद वाटतो.''

''खेद कसला ? तुमची काय चूक ? ज्याला तुम्ही चोर ठरवून तुरूंगात घालायचा प्रयत्न कराल तो आपल्याकडून प्रयत्नांची शिकस्त केल्याशिवाय थोडाच राहील ?''

''माझ्या अंगाचा अगदी भडका उडाला.''

''माझ्यासाठी तुम्ही आपल्या जिवाला त्रास करून घेऊ नका फौजदारसाहेब ! ही

आपल्या देशाची रीतच आहे. कोर्टात एकदा पाऊल टाकलं की जे काही पडेल ते भोगलं पाहिजे. ज्याला इथं यावं लागेल त्याचं दैवच फिरलं म्हणून समजा. तुम्ही स्वतःच्या जिवाला त्रास करून घेऊन काय होणार, फौजदारसाहेब ?''

जोगनाथचा वकील तीरासारखा बाहेर येऊन दुसऱ्या कोणत्यातरी कोर्टाकडे धावला. त्याच्या मागोमाग धावणाऱ्या अशिलांना त्याने सांगितले, ''गडबड करू नका. आधी जोगनाथाला सुटू द्या. मग एकेकाचं उट्टं काढू. हां, हां. पोलिसांचंही.''

फौजदारांनी दचकून पाहिले. पण तेथे पाहायला काहीच नव्हते.

## २१

यावेळी प्रिन्सिपॉल साहेब वैद्यजींशी कॉलेजच्या प्रश्नांसंबंधी विचार विनिमय करीत होते, म्हणजेच खन्ना मास्टरांना शिव्या देत होते.

त्याच्या आदल्या दिवशी कलम १०७ च्या खटल्यासाठी ते कोर्टात गेले होते, तेव्हा त्यांना खटल्याला नवेच वळण लागले असल्याचे आढळून आले होते. कारण खन्ना मास्टरांच्या वकिलाने आपली बाजू मांडतांना अशा अर्थाचे मुद्दे पुढे केले होते :-

''महाशय, हा खटला 'हॅवज्' आणि 'हॅव नॉटस्' यांच्यातला आहे. एका बाजूला कॉलेजचे मॅनेजर आहेत. त्यांना वैद्यमहाराज म्हणतात. वस्तुतः ते वैद्य कमी असून महाराज जास्त आहेत. त्यांच्या पाठीशी त्यांचे शेकडो गुंड आणि मवाली आहेत. त्यापैकीच या कॉलेजचे प्रिन्सिपॉल आणि आठ-दहा शिक्षक हे आहेत. ते त्यांचे नातेवाईक तरी आहेत किंवा नातेवाईकांचे नातेवाईक तरी आहेत. त्या सर्वांची आर्थिक स्थिती चांगली आहे आणि ज्यांची स्थिती चांगली नाही त्यांची भरपाई कॉलेजच्या फंडातून केली जाते. महाशय, दुसऱ्या बाजूला खन्ना आणि त्यांच्यासारखेच आठ दहा शिक्षक आहेत. ते गरीब आहेत आणि त्यांना हे लोक मरडून काढीत असतात. आपसातील संघर्षाचे मुख्य कारण हेच आहे.''

कोर्टाने यावर इंग्रजीत म्हटले होते, ''म्हणजे असे की भाकरी आणि मासळी यांच्यावरून सुरू झालेले हे भांडण आहे.''



वकिलाने आपलाच मुद्दा खोडून काढीत, दुरूस्त करीत, त्यात भर घालीत, काटछाट करीत आणि पुनः त्याच मुद्यावर येत व त्यापासून दूर जात म्हटले होते, ''तसं नव्हे महाशय, माझ्या म्हणण्याचा अर्थ तो नाही. मला फक्त एवढंच सांगायचं होतं की हा तत्त्वाचा झगडा आहे.''

''पण तुम्ही तसं काही म्हणाला नाहीत.''

''मी तेच सांगणार होतो, महाशय,'' वकील आपले प्रतिपादन पुढे रेटत म्हणाला, ''खन्ना आणि त्यांच्यासारखे विचार बाळगणारे लोक यांना जनतेच्या पैशाचा असा दुरूपयोग व्हावा हे सहन होत नाही. महाशय, हे सर्व नवयुवक आहेत आणि बेइमानी व ढोंग यांच्याशी तडजोड करण्याची सवय त्यांना अजून झालेली नाही.''

कोर्टाने हसून म्हटले, ''अशा स्थितीत त्यांनी खटल्याला आणि तुरूंगाला भिता कामा नये.''

या सल्ल्याकडे लक्ष न देता वकिलाने आपले व्याख्यान पुढे चालू ठेवले होते : ''म्हणून हे लोक कॉलेजच्या बाबतीत होणाऱ्या अंधाधुंदीविरूद्ध कायदेशीरपणे आपला आवाज काढत आहेत. महाशय, अलीकडेच काही दिवसांपूर्वी त्या कॉलेजच्या मॅनेजरची निवडणूक झाली होती आणि त्यावेळी पिस्तुलाच्या जोरावर वैद्य महाराज पुनः मॅनेजर म्हणून निवडून आले होते. याबद्दल डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशनकडे तक्रार नोंदविण्यात आली आहे. खन्ना वगैरेंनी या प्रकाराचा निषेध केला होता. एवढेच नव्हे तर ते डेप्युटी डायरेक्टरांनाही भेटले होते. त्या संपूर्ण प्रकरणाची लौकरच चौकशी व्हावयाची आहे. त्याचप्रमाणे वैद्य महाराज ज्या को-ऑपरेटिव्ह युनियनचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत तिच्यात अफरातफर झाली होती. ते प्रकरण सहा महिने दाबून टाकण्यात आलं होतं. आता खन्ना आणि त्यांचे सहकारी यांनी मिळून रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, यांना भेटून त्याचाही तपास सुरू करविला आहे. आवश्यकता वाटल्यास मी या दोन्ही अधिकाऱ्यांची साक्ष काढीन.

''महाराज, या तपासाच्या मुदतीत खन्नांना व त्यांच्या सहकाऱ्यांना दडपून टाकण्यासाठी, त्यांना अडचणीत टाकून त्यांचे तोंड बंद करण्यासाठीच हा खटला भरण्यात आला आहे. हा खटला म्हणजे एक प्रकारची फसवेगिरीच आहे. महाशय....''

प्रिन्सिपॉलांच्या वकिलाने कोर्टात काय सांगितले होते ही गोष्ट फारशी महत्त्वाची नाही. पण त्या दिवशी गावी परत आल्यावर प्रिन्सिपॉल साहेबांनी वैद्यजींना सांगितले होते की, ''कॉलेजची निवडणूक आणि सोसायटीतील अफरातफर या दोन्ही प्रकरणांची चौकशी होणार आहे.''

वैद्यजींच्या कपाळाला मुळीच आठी पडली नव्हती. फक्त ते धर्माकडे झुकले आणि

'हरि-इच्छा' असे म्हणून गप्प राहिले होते.

परंतु प्रिन्सिपॉलसाहेब यावेळी नक्की योजना बनवून आले होते आणि जोरात होते. म्हणून ते अवधीत बोलू लागले :-

''महाराज, माझं तर असं मत आहे की साल्या खन्नाचे हात पाय तोडून एखाद्या नाल्यात त्याला फेकून द्यावं आणि हे शक्य नसेल तर साल्याचा कान धरून त्याला कॉलेजातून काढून टाकावं. ढुंगणावर चार लाथा माराव्यात अन्....''

परंतु वैद्यजींवर याचा काही परिणाम झाला नाही. ते म्हणाले, ''मला हिंसा पसंत नाही.'' असे म्हणून त्यांनी ढेकर दिला. आता ते पुनः 'हरि इच्छा' म्हणणार अशी प्रतिक्षा प्रिन्सिपॉल करू लागले. परंतु त्यांनी काहीही म्हटले नाही. बहुदा अहिंसा, पिस्तुलाचा वापर, अफरातफर, देशकल्याण वगैरे प्रश्नांत गरफटून ते गप्प बसले असावेत.

दारूच्या गुत्त्यापासून सुमारे शंभर यार्डावर पिंपळाचे एक झाड होते. त्या झाडावर एक भूत राहात असे. भूत खूप जुने होते आणि स्वातंत्र्य मिळाले, जमीनदारी नष्ट झाली, ग्रामपंचायत स्थापन झाली, कॉलेज निघाले यासारख्या शेकडो घटना घडल्यानंतरही ते मेले नव्हते. ते तेथे असल्याचे ज्यांना माहीत असे ते लोक दिवस बुडाल्यानंतर त्या बाजूला जात नसत. कधी चुकून गेले तर त्यांना तऱ्हेतऱ्हेचे आवाज ऐकू येत. ते आवाज ऐकल्यामुळे माणसाला नंतर ताप येत असे. त्या तापाने बहुदा माणूस मरून जाई. तो मेला नाही तर लोक म्हणत, पंडित राधेलाल भूत फार चांगले उतरवतात.

एकदा संध्याकाळच्या वेळी एक सायकलस्वार पिंपळाच्या झाडाखालून निघाला. ते झाड रस्त्याच्या कडेला असल्यामुळे त्याच्या खालून जाणे त्याला भागच होते. सायकलस्वाराला भुताविषयी माहिती होती आणि त्यावेळी त्याच्या समोरून एक ट्रक सावकाश चालला नसता तर त्याला बहुदा त्यावेळी तिकडून जाण्याची हिंमत झाली नसती. तो ट्रकामागच्या लाल दिव्याचा आधार घेऊन, पश्चिमेकडील उरल्या सुरल्या प्रकाशाला दिवसाची खूण समजून सटकन् पिंपळाच्या झाडाखालून पसार झाला.

एवढे झाल्यावर त्याने सुटकेचा निःश्वास सोडला. फाल्गुनाचे वारे त्याच्या चेहऱ्यावर आदळले आणि त्याने त्या वाऱ्याचा मनसोक्त आनंद लुटला. त्याने जरा आणखी जोषात येऊन दोन - तीनदा 'कटिलों - कटिलों' म्हणून तितर पक्ष्याचा आवाज काल्पनिक जनसमुदायाला ऐकविला. नंतर अमरसिंह राठौराच्या महशूर तमाशातील



'निकल गया जैसे शेर शिकारी को मार' हे गाणे गुणगुणण्यास सुरुवात केली. हळूहळू गाण्याचा व्हॉल्यूम आपोआप वाढू लागला.

एवढ्यात तो दचकला. रस्त्याच्या अगदी कडेला त्याला 'गों गों गों' असा आवाज ऐकू आला. हा माणसाचा आवाज नव्हता. हा आवाज भुताचा आहे, ही गोष्ट सायकलस्वाराला न सांगताही समजली. त्याच्या उरात धडकी भरली. त्याला वाटले भुताने कसलीही पूर्वसूचना न देता आपली जागा बदलली असावी आणि ते पिंपळाच्या झाडावरून उतरून पिंपरीच्या झाडावर वस्तीला आले असावे.

'गों गों गों' चा आवाज पुनः झाला. या खेपेला तो जरा जास्त जोरात झाला. त्याच बरोबर काही माणसांचे दोन प्रकारचे आवाज ऐकू आले. एकजण जोरात हसला. दुसरा म्हणाला, ''तरी मी सांगितलं होतं की बाबा रे फार पिऊ नकोस. पण तू ऐकलं नाहीस. आणखी पी बेट्या !''

आणखी एक पुरुषी आवाज आला. तो गाण्याचा होता. हसत हसतच कोणी तरी 'हामिद डाकू' या तमाशातील एक तराणा छेडला होता: ''न कीजै शोरगुल चिकचिक शीरा सबको झुकाते हैं'' (उगीच ओरडा करू नकोस आम्ही सर्वांपुढे शीर नमवितो.)

याचवेळी 'गों गों गों' च्या आवाजात अनेक आरोह - अवरोह निर्माण झाले. प्रथम कोणीतरी संथ लयीत 'गों गों' म्हटले. त्यानंतर बहुदा आपले वैशिष्ट्य दाखविण्यासाठी तो घसा खरखडून ओरडला, ''बचाओ !'' नंतर पुनः पूर्वीचेच 'गों गों गों.' परंतु आता त्या आवाजात जोर नव्हता. उगीच ओरडायचे म्हणून तो ओरडत होता.

याच वेळी हामिद डाकूच्या तमाशातील गाणे म्हणणाऱ्याने संगीताचा कार्यक्रम थांबविला. नंतर बहुदा तोच म्हणाला, ''तरी मी सांगत होतो, बेट्या, फार पिऊ नकोस. पण फुकटची दारू !'' त्यानंतर तेच हास्य. तेच हामिद डाकूचे गाणे.

सायकलस्वाराच्या उरात जी धडकी भरली होती ती भुताच्या कल्पनेने भरली होती. माणसाला तो मुळीच घाबरत नव्हता. म्हणून माणसांचा आवाज ऐकून काहीतरी भानगड असल्याची शंका येऊन तो सायकलवरून खाली उतरला आणि जोरात ओरडला, ''घाबरू नको पैलवान ! हा मी आलोच. खबरदार ! हात लावू नकोस.''

पिंपरीच्या झाडाच्या दुसऱ्या बाजूला एक मोठे झुडूप होते. त्याच्या मागे संध्याकाळच्या अंधुक प्रकाशात पाच सहा माणसे हालचाल करीत होती. नाना प्रकारचे आवाज होत होते.

''गों गों गों.''

''बचाओ !''

''फार बहकू नको बेट्या ! सांगितलं होतं ना, फार झोकू नकोस म्हणून !''

"न की जै शोरगुल चकचक, शीरा सबको झुकाते हैं !"

सायकलस्वार सावधपणाने इकडे-तिकडे पाहात होता आणि कुणा अज्ञात व्यक्तीला कुणा अज्ञात धोक्यापासून वाचविण्यासाठी ओरडत होता. एवढ्यात एक इसम झुडुपाच्या मागून पुढे आला आणि नीट पावले टाकीत सायकलस्वाराजळ येऊन उभा राहिला. त्याच्या तोंडाला बेवड्याचा सुवास येत होता. तो इसम रुबाबात म्हणाला, "काय रे बाबा ? तू का ओरडतो आहेस ? तुला काय त्रास होतोय ?"

सायकलस्वाराने झुडपाकडे बोट दाखवून म्हटले, "त्या बाजूनं कुणीतरी 'बचाओ, बचाओ' म्हणून ओरडतो आहे."

ते सारे दारू पिऊन धुंद झालेत. सगळ्या साल्यांना बरळायचं आहे ! पण तुला काय हवंय ?"

आणखी दोन सायकलवाले रस्त्याने चालले होते. या दोघांना बघून ते आपल्या सायकलींना ब्रेक लावून खाली उतरण्याची तयारी करू लागले. झुडुपाजवळचे आवाज एव्हाना आणखी उंच चढले होते. परंतु त्यांचे शब्द स्पष्ट नव्हते. त्या इसमाने लष्करी ढंगात सांगितले, "तुम्हाला थांबायचं कारण नाही. हा गंजकरांचा मामला आहे. सब साला दारू पीकर मस्त हो रहा है । अपने-अपने रास्ते फॉलिन हो जाओ."

दोन्ही सायकलस्वारांनी हा उपदेश ऐकून आपली गती वाढविली. पहिला सायकलवालाही नाक मुरडत पुढे सटकला. जाता-जाता त्याने संदेश दिला, "सगळे लुच्चे आहेत. सारं शिवार घाण होऊन गेलंय या दारूड्यांमुळं."

लष्करी थाटातील इसमाने यावर उत्तर म्हणून सांगितले, "तुम ठीक बोलता है जवान ! दारू पीना ठीक बात नही."

आता रस्ता निर्मनुष्य होता. त्या इसमाने तेथूनच हुकूम सोडला, "चला रे पोरांनो ! डबल मार्च करा ! चल प् !"

सुमारे पाच इसम झुडुपामागून निघून रस्त्यावर आले. त्यांच्यापैकी कोणाचेही पाय डगमगत नव्हते. सगळे गप्प होते. सगळेजण अशा तयारीने पावले उचलत होते की जणू ती एक गनिमी हल्ला चढविणाऱ्या सैनिकांची तुकडी होती आणि तिच्याकडे आपल्या सीमेवरील चिन्यांनी बळकावलेली भूमी परत मिळविण्याची कामगिरी सोपविण्यात आली होती. भूत असलेल्या पिंपळाच्या झाडापर्यंत आल्यावर त्यांनी रस्ता सोडून दिला. ही गोष्ट त्यांनी भूताचा मान राखण्यासाठीही केली असेल किंवा समोरून दिव्याचा प्रखर प्रकाशझोत टाकत येणाऱ्या मोटारीला टाळण्यासाठीही केली असेल. रस्त्याच्या खाली उतरताच ते एका शेतात पोचले. त्या शेताच्या चारी बाजूंना बामळीच्या काटेरी फांद्या रोवलेल्या होत्या. शेतात पीक नव्हते. फक्त जमिनीच्या रक्षणासाठीच काट्यांचा आधार घेण्यात आला होता.



ती तुकडी शेतातून वर चढून पुनः रस्त्यावर आली होती. दारूचा गुत्ता जवळजवळ पन्नास यार्डांवर राहिला होता. एका इसमाने सांगितले, "रमचन्नाचं स्वतःच असं एकही बामळीचं झाड नाही. हा कुणाच्या बामळीच्या फांद्या घेऊन आलाय ?"

"कोण जाणे कुणाची बाभुळ असेल."

"तू सांगू नकोस. मला आपोआप कळेल."

"कळेल तर मग विचारतोस कशाला ?"

"तुझाही रागरंग कळावा, म्हणून विचारतोय."

तो इसम हसू लागला. सर्व समाजाला उद्देशून तो म्हणाला, "जोगनाथ तुरूंगातून उलट तपासणी करायला शिकून आलाय."

ते सगळे गुत्यात शिरले. त्यांच्या पूर्वीचे फक्त पाच-सहा लोकच तेथे होते.

एकाने उत्साहाने विचारले, "काय जोगनाथ, केव्हा सुटलास तुरूंगातनं ?

"आज दुपारीच."

त्याने जादा उत्साहाने विचारले, "एकूण कसं काय होतं वातावरण ?"

"फार छान होतं."

"कुणी ओळखीचं भेटलं ?"

"सगळेच ओळखीचे झाले."

"तिथं बिसेसराही असेल. भेटला ?"

"अं हंऽ ! पण तिथं सारे बिसेसराचे बाप होते."

"काथ्या कुटावा लागला की नाही ?" कोणीतरी एका कोपऱ्यातून घोगऱ्या आवाजात विचारले. जोगनाथाने चिडून म्हटले, "हा कोण बोलतोय डुकरीचा –"

"आमचे पाहुणे आहेत."

"त्यांना सांग, म्हणावं आपला बेंडबाजा बंद करा. त्याचं कौतुक शिवपालगंजमध्ये व्हायचं नाही."

"ऐकलं पाव्हणं ? हा जोगनाथ आहे. नुकताच तुरूंगातून सुटून आलाय. वटवट बंद करा म्हणतोय."

"आता माझंही ऐका. आधीच सांगून ठेवतो. मी एक नंबरचा हरामखोर आहे. गुपचुप आपली दारू ढोसा आणि तिथं कोपऱ्यात उलटी करा. पुनः काथ्याची गोष्ट काढाल तर मग अस्सल काथ्या दाखवीन."

"ऐकलं पाव्हणं ?"

"ऐकणार कोण ? इथं तर कोपरा रिकामा आहे."

"अरे वाह रे पाव्हणे !"

जोगनाथाने दहा रूपयांची नोट काढून ती दुकानदाराच्या हातात देत म्हटले,

''सगळ्यांना एकेक पाव बेवडा दे. कुणीही सुटता कामा नये. बऱ्याच दिवसांनी आपल्या मायभूमीला परतलोय.''

''खूप पैसा आणलाहेस वाटतं ?''

''सनीचरा सरपंच झालाय. त्याचा हुकूम आहे की आज सर्वांनी मनसोक्त झोकली पाहिजे.''

''पण सनीचराजवळ पैसा कुठला ?''

''आता सनीचर हा सनीचर राहिलेला नाही. तो सरपंच झालाय. समजलं ?''

सगळेजण एकेक ग्लास घेऊन बसले. ती दुकानाच्या बाहेरची ओसरी होती. एक कुडाची भिंत उभारून ती रस्त्यापासून वेगळी करण्यात आली होती. आतल्या बाजूला गुत्ता होता. ओसरीवर एक कंदील जळत होता. त्याच्या उजेडात पिणारे दिसत होते. दुकानाच्या आतल्या बाजूस एक चिमणी धूर ओकत होती. तिच्या उजेडात दारू पाजणारी व्यक्ती दिसत नव्हती. ओसरीवर एक बाकडे पडले होते. त्यावर दोन इसम बसले होते. जोगनाथही तेथेच बसला. इतर लोक खाली एका तरटावर बसले होते. काही नुसत्या जमिनीवर बसले होते. मद्य पाजणारा, सुरई मद्यचषक - सारं काही त्यांतच सामावलेले होते. देशी दारूचा दुर्गंध रस्त्यावर खूप दूरपर्यंत पसरला होता. ज्याप्रमाणे योजनगंधेच्या केवळ सुगंधानेच राजा शांतनूला तिच्या अस्तित्वाचा दुरूनच सुगावा लागला होता त्याप्रमाणे केवळ वासामुळेच दूरदूरच्या लोकांना या ठिकाणी देशी दारूची विक्री होत आहे, हे समजत असे. आपल्या देशात वास हीच देशी दारूची जाहिरात असते. म्हणूनच मोठमोठ्या वर्तमानपत्रांतून विलायती दारूच्या भरपूर जाहिराती दिसतात. पण देशी दारूचा कोठे उल्लेखही आढळत नाही. तिला जाहिरातीची जरूरच नसते.

दोन-तीन घोट घेतल्यानंतर जोगनाथाने इकडे-तिकडे पाहून म्हटले, ''पाणी मिसळलंय !''

''काय ?''

''पाणी. दारूत पाणी मिसळून विकतोय साला.''

''मलाही तसंच वाटतंय.''

''मला देखील.''

''मला सुद्धा. बऱ्याच दिवसांपासून तसं वाटतंय. किंबहुना आता तर पाणी मिसळलेलीच दारूच अस्सल दारूसारखी वाटू लागलीय.''

दुकानदार गल्ल्यावरून उठून जोगनाथाजवळ आला. तो थंडपणे म्हणाला, ''मजेत पी. तुझी हवा तर पहिल्याच ग्लासात निघून चाललीय. पाव-आधपाव फुकटात प्यायची असेल तर तसं साफ सांगून टाक. मी पाजतो. पण पाणी-बिणी फालतू लोक



मिसळतात. इथं तसलं काही नाही.''

जोगनाथावर याचा योग्य तो परिणाम झाला. खिशातून दहाच्या व पाचाच्या काही नोटा काढून तो म्हणाला, ''मोफत प्यायची असेल तेव्हा अवश्य पिईन. पण घाबरू नकोस. हे पाहा. इतक्या नोटा कधी पहिल्या होत्यास ?''

दुकानदार हडकुळा परंतु कणखर इसम होता. ऐटीत परत गेला आणि म्हणाला, ''आमचे पाहाण्याचे दिवस संपले. आता तुझे दिवस आलेत. पाहात राहा.''

दुसरा पेला भरला. एकाने विचारले, ''आता काय विचार आहे जोगनाथ ?''

''पैशाची जरा चणचण आहे.'' जोगनाथाने अशा थाटात उत्तर दिले की कुणाचाही त्यावर विश्वास बसू नये.'' आधी त्या फौजदाराशी दोन हात करायचे आहेत. बदली झाली म्हणून काय झालं ? मी त्याला तसा सोडणार नाही. इथं यायच्या आधीच शहरात त्याच्यावर एक दावा ठोकून आलोय. दहा सुनावण्यांत कंबर ढिली होईल ?''

''कसला दावा ?''

''दिवाणी दावा. तुला माहीत नाही ? माझ्यावर चोरीचा खोटा खटला भरला होता. दोन-तीन महिने मला कच्च्या कैदेत राहावं लागलं.''

''वैद्यजींनी जामीन दिला नाही ?''

''त्यांनी दिला असता. पण मीच अडून बसलो. म्हटलं, फौजदाराच्या नावानं इथंच राहीन. राहायला भाडं तर पडत नव्हतंच.''

''मग ?''

''मग काय ? माझी बेअब्रू झाली. शेतीचं नुकसान झालं. एक शेत रमचन्नानं घशात घातलं. या सगळ्या नुकसानीबद्दल आठ हजार रूपयांचा नुकसान भरपाईचा दावा ठोकलाय, डिक्री झाली तर फौजदारसाहेब लिलावात निघतील.''

''पण कोर्ट फीचं काय केलंस ? दिवाणीत बराच खर्च येतो.''

''सर्व काही परमेश्वर देईल.''

''हे पाहा जोगनाथ भैया, ब्राह्मणाच्या कुळात जन्माला येऊन अशा थापा देऊ नकोस. खरं काय ते सांग.''

'होय बाबा, आमचंही म्हणणं हेच की परमेश्वराला मध्ये आणू नकोस. कोर्ट फी कोण देणार ?''

''एकदा सांगितलं ना, परमेश्वर देईल.''

''आता हा अडून बसला. सांगायचा नाही. नको सांगूस. आगे बढो. दावा ठोकलास की ठोकायचा आहे ?''

''ठोकला.''

"कधी ठोकलास ?"

"आजच ठोकला."

झुडुपाच्या मागून एक इसम झोकांच्या खात आला आणि कण्हत रस्त्याने चालू लागला. तो आत्मकरूणा, आक्रोश वगैरे अनेक साहित्यिक गुणांनी पीडित होता. दारूच्या गुत्यात त्याचे जे बोलणे गाळून पोचले त्यावरून असा निष्कर्ष काढण्यात आला की थोड्याच वेळापूर्वी भुताटकीच्या पिंपळाजवळ रस्त्याच्या कडेला वाटमारी झाली आहे आणि काही लोकांनी त्याला लुटले आहे. आता तो पोलिसठाण्यावर तक्रार नोंदवायला चालला असून एकेकाची हड्डी नरम करणार आहे.

जोगनाथाच्या पायाशी जमिनीवर बसलेला एक इसम मोठ्या आरामात पेल्यांवर पेले रिचवत होता. तो म्हणाला, "तुमच्या गावात ही फार वाईट गोष्ट आहे, पहिलवान. माणसं लेफ्ट राइट करीत दिवस मावळताच वाटमारी करू लागतात. हे अगदीच वाह्यात काम आहे. क्यों जवान ? क्या बोलता है ?"

जोगनाथाने फक्त मान डोलाविली आणि दुकानदाराला सांगितले, "आणखी एक पावभर दे बाबा. वाटल्यास मोफत दे."

थोड्या वेळानंतर जेव्हा ते लोक झोकांच्या खात कुडाच्या भिंतीबाहेर आले तेव्हा त्यांच्यासमोर रस्ता होता; आणि त्या रस्त्यावर एक-दोन मरतुकड्या कुत्र्यांखेरीज कोणीही नव्हते.

जो इसम नुकताच कण्हत आला होता तो आता नीट चालत त्यांच्यासमोरून निघून गेला. त्यांना ते कळलेही नाही. परतताना त्या इसमाच्या अंतःकरणातील किल्मिष धुतले गेले होते आणि धर्मावरील त्याची श्रद्धा वाढली होती. कारण पोलिस चौकीवर पोचण्यापूर्वीच त्याला एका विद्वानाने समजावले होते की,

"तक्रार करून काय होणार ? जे गेलं ते गेलं. गेलेला माल कधी परत मिळतो काय ?"

'हे पाहा, तू हिंदू आहेस की मुसलमान ? हिंदू असशील तर तुझा कर्मावर विश्वास आहे की नाही ? तुझ्या कर्मात ते पंचेचाळीस रूपये लिहिलेले नव्हते. आता धावपळ करण्यात काही अर्थ नाही. देवाची हीच इच्छा होती."

"जा घरी. जीव बचावला, हेच पुष्कळ झालं. गतवर्षी एका इसमाला त्याच ठिकाणी बकऱ्यासारखा कापून ठार मारण्यात आलं होतं."

"देवाचं नाव घे आणि घरी जाऊन सत्यनारायणाची पूजा कर. कज्जेखटल्यात जो



पैसा खर्च करायचा तो देवा-धर्मासाठी खर्च कर.

"गरम दुधात हळद घालून पी आणि कूस बदलून झोपून जा. उद्या सकाळपर्यंत सारं काही विसरून जाशील."

# २२

आखाड्यातून दोन पहिलवान झुलत-झुलत बाहेर पडले. त्यांपैकी एक होते बद्री आणि दुसरा छोटू. दोघांनी तुळतुळीत गोटा केला होता. त्यावर घामाच्या मदतीने मातीचा जणू गिलावा चढला होता. मानेच्या मागील भागावर गेंड्याच्या मानेसारख्या सुरकुत्या पडल्या होत्या. छोटू पहिलवान राहून राहून हलकेच कण्हत होता. परंतु स्वाभिमानामुळे ते कण्हणे तोंडातून 'हाय' या शब्दांत व्यक्त न होता उसाशातून 'हाव' या शब्दात व्यक्त होत होते. बद्री निमूटपणे त्याच्या बरोबर चालत होते. जणू त्यांचा या साऱ्या प्रकाराशी कसलाही संबंध नव्हता.

आज छोटूला बद्री पहिलवानांनी धोबीपछाड डावाने चीत केले होते. ते त्याचे वस्ताद नसते तर यावेळी त्याने डोळ्यांतून अश्रू आणि तोंडातून फेस गाळत त्यांना हजारो शिव्या घातल्या असत्या. परंतु वस्तादांचा मान ठेवायचा म्हणून तो यावेळी गप्प होता, आणि निमूटपणे चालणे अशक्य झाले की तोंडातून 'हाव' असा आवाज काढत होता.

परंतु हे संकट एवढ्यावरच थांबणार नव्हते. चालता चालता बद्री पहिलवानांनी विचारले, काय रे, त्या दिवशी तू जोगनाथाच्या साक्षीत काय काय बरळून आलास ?"

"कोण साला जोगनाथाचा साक्षीदार होता ? मी तर पोलिसांच्या बाजूनं साक्ष द्यायला गेलो होतो." छोटूनं बेफीकीरपणे कमरेतील कळा दाबून धरत उत्तर दिले.

बद्री शांतपणे म्हणाले, "सरळ प्रश्नाला सरळ उत्तर दे. साल्या-मेहुण्याला मध्ये

आणू नकोस.''

''इथं. कोण वाकडी चाल चालतोय ?'' छोटू म्हणाला. पण यावेळी आवाज काहीसा नरम पडला होता.

बद्री पहिलवानांनी या निरर्थक वाक्याकडे दुर्लक्ष करून विचारले, ''तू आपल्या साक्षीत बेलाविषयी काय सांगितलं होतंस ?

''मला काय सांगायचं होतं ? जे तोंडाला आलं ते सांगितलं.''

बद्री पहिलवान अत्यंत सौम्य स्वरात बोलत होते. त्यांनी छोटूचा हात धरून विचारले, ''तिची जोगनाथाशी काय भानगड आहे काय ?''

छोटूने आपला हात हळूच सोडवून घेतला. बोट धरून मनगट पकडले जाते आणि मनगट धरून धोबीपछाड डावाच्या साह्याने माणसाला चीत केले जाते, हे त्याने नुकतेच स्वतः अनुभविले होते. तो विषय टाळण्यासाठी तो म्हणाला, ''कुणाची कुणाशी भानगड आहे, हे मला काय माहीत ? गावाच्या शिवारात सगळीकडे तुरीची शेतं आहेत. कोण कुणाशी लागू आहे हे शोधण्यासाठी मी कुठं कुठं डोकावत फिरणार ?''

बद्री पहिलवान पूर्वीप्रमाणेच सौम्य स्वरात बोलत राहिले. त्यांनी विचारले, ''पण तू तर सांगितलं होतंस ना की तू बेलाला जोगनाथाबरोबर भानगड करतांना प्रत्यक्ष पाहिलंस म्हणून ?''

''नुसतं सांगितल्यानं काय होतंय ?''

बद्री पहिलवान एकदम थांबले. आवाज चढवून ते म्हणाले, ''होत कसं नाही ? तू सांगितलंस की नाही, बोल.''

छोटू पहिलवानाला आता काहीतरी शंका येऊ लागली. त्याच्या आवाजातील आत्मविश्वासाचा खणखणीतपणा नाहीसा झाला. ज्याप्रमाणे शाश्वत साहित्य लिहिणारा क्रांतिदर्शी साहित्यकारही रेडियो अधिकाऱ्यांसमोर दबकत बोलतो त्याप्रमाणे छोटू बद्री पहिलवानांसमोर गडबडला. तो माफी मागत म्हणाला, ''सांगितलं होतं की, गुरू ! पण सांगतांना पुष्कळच सांगितलं होतं. कोर्टातल्या साक्षीचा मामला होता. जे तोंडाला येईल ते बोलत गेलो. तिथं खरं थोडंच बोलायचं असतं ?''

बद्री पहिलवान थोडा वेळ अंधारात स्तब्ध उभे राहिले. काहीच बोलले नाहीत. कोणत्याही पहिलवानाला जे काम सहजासहजी करता येत नाही ते काम ते करू लागले. म्हणजे विचार करू लागले.

छोटू आता जास्तच गडबडला. दबकत-दबकत म्हणाला, ''गुरू कसल्या विचारात पडला आहात ? विचार करणं हे फालतू लोकाचं काम आहे. मला तरी सांगा, काय भानगड आहे ?''



बद्री सावकाश म्हणाले, ''मी असा विचार करतो की तुला लाथांनी मारावं की जोड्यानं ? तुझ्या जवानीवर कुत्र्याची पिल्लं मुततात साली. थूः तुझ्या जिनगानीवर !'' असे म्हणून ते तिरस्काराने जमिनीवर पचकन थुंकले.

छोटू गोंधळून उभा राहिला. अडखळत म्हणाला, ''असं म्हणू नका गुरूजी ! माझ्याकडून काय चूक झाली ते सांगा.''

''तुला साल्या काय कळणार ? तू एका भल्या घरच्या मुलीच्या अब्रूची लक्तरं जगासमोर मांडलीस. तुझ्या मते हे काहीच झालं नाही ?''

हात्तिच्या ! एवढीशी क्षुल्लक गोष्ट ! असे म्हणून छोटू पहिलवानाने सुटकेचा निःश्वास टाकला. तो बेपर्वाईने म्हणाला, ''गुरू, मी जे काही सांगितलं ते भर कोर्टात देवाची शपथ घेऊन सांगितलं. कोर्टात सांगितलेल्या गोष्टीला काहीच अर्थ नसतो हे तमाम दुनियेला माहीत आहे. त्यानं कुणाचं काय बिघडलं ?'

बद्री गप्प राहिलेले पाहून छोटूला जास्तच जोर चढला. त्याने आपल्या स्वाभाविक ढंगात म्हणजे साऱ्या जगाला किड्यामुंगीसारखे तुच्छ समजत आपले म्हणणे संपविले, ''याच गोष्टीसाठी तुम्ही मला जोड्यांनी मारणार म्हणता गुरू ? वाह गुरू ! तुम्ही सुद्धा कधी-कधी कमालच करता की. वाह ! मी मनात म्हटलं एवढा काय मोठा अपराध घडला माझ्या हातून ?''

बद्री पहिलवानांनी आपली गर्दन दोन्ही हातांनी चोळून तिच्यावर दोन-चार चापट्या मारल्या. अशा प्रकारे त्यांनी आपल्या मानेवर बसलेला मातीचा गिलावा झटकून टाकला आणि इतका वेळ सुरू असलेले विचारमंथन झाडून टाकले. नंतर अचानक ते हसून म्हणाले, ''तू अगदी खानदानी गांवढळ आहेस. तुला डावीकडे उजवीकडे काही दिसतं तरी काय ? ही बेला आता तुझी आई होणार आहे. मग तू तिला छिनाल म्हण किंवा आणखी काही म्हण. ती शिवी तुलाच लागेल.

''काय म्हणता काय गुरू ?''

''म्हणायचं काय ? एका महिन्याच्या आत बेलाचं लग्न होणार. बद्री पहिलवानाबरोबर ! आणि तू वाजव बेंड बाजा. काही आलं ध्यानात ?

बद्री पहिलवानांचे बोलणे ऐकून छोटूला असा भास झाला की अनेक प्रकारच्या निरर्थक गोष्टींचा जणू एक ढीग आपल्यासमोर पडला आहे, आणि कोणीतरी आपल्याला त्या ढिगाऱ्यावर जोरात आपटून चीत केले आहे. त्याच्या तोंडून फक्त एवढेच वाक्य बाहेर पडले की , ''म्हणता काय गुरू ?''

''काय म्हणतोय ते ऐकू येत नाही तुला ?'' बद्री उथळपणाने त्याची मस्करी करीत म्हणाले, ''काय झालंय काय तुला ? कानात फार मळ साचलाय वाटतं ? पुनः नीट ऐक. मी बेलाशी लग्न करणार आहे. तिच्याशी मी वायदा केलाय. त्या दिवशी तू

कोर्टात तिची बदनामी केलीस तेव्हा माझ्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन पोचली होती. एक लप्पड मारून तुझं डोस्कं पोटात खुपसावं असं वाटलं मला. पण किती झालं तरी तू माझा चेला आहेस. पालक-बालक समजून तुला माफ केलं.''

एक दीर्घ उसासा टाकून त्यांनी आपले भाषण संपविले, ''असो. जे झालं ते झालं. आता आपल्या जिभेला लगाम घालून रहा.''

छोटूला अजूनही असे वाटत होते की आपण निरर्थकतेच्या ढिगाऱ्यावर चीतपट होऊन पडलो आहोत आणि बद्री पहिलवान जे काही सांगत आहेत ते जणू एक स्वप्नच आहे. तो म्हणाला, ''गुरू, तुमी बामण, ती बनिया. जरा विचार करून बोला. बैद महाराज खवळले तर सारी इस्कीम उलटी पालटी होईल.''

बद्री पहिलवान म्हणाले, ''हत्ती आपल्या वाटेनं जात असतात. कुत्री भुंकत राहातात.''

छोटू जवळ जवळ गयावया करत म्हणाला, ''गुरू तुम्ही म्हणीमध्ये बोलताहात. पण बैदजींचं एवढ्यानं समाधान थोडंच होणार !''

आपल्या मनातील रहस्य प्रकट करून बद्री पहिलवानांना बहुदा हलके हलके वाटत असावे. त्यांनी या प्रश्नाला काही उत्तर दिले नाही. ते नुसते शीळ घालत राहिले.

थोडा वेळ चालत राहिल्यानंतर छोटूच्या मेंदूत सारे प्रकरण वजनदारपणे घुसले. काही दिवसांपूर्वी अशी बातमी पसरली होती की रूप्पनबाबूंनी बेलाला एक पत्र लिहिले आहे. कुणी एक मुलगी रात्रीच्या वेळी बैदजींच्या गच्चीवर आली होती, आणि ती रंगनाथावर आदळून परत पळून गेली होती, ही बातमीही उडत-उडत त्याच्या कानापर्यंत जाऊन पोचली होती. बैदजींच्या गच्चीवरून ज्या घरांच्या गच्चीवर जाता येते त्यांमध्ये गयादीनचेही घर होते. एके दिवशी रूप्पनबाबूंनी असेही सांगितले होते की कुणा मुलीने लिहिलेली एक चिठ्ठी रंगनाथाच्या हातात पडली आहे, परंतु रंगनाथ त्याबाबतीत काहीच सांगत नाही. छोटू पहिलवानाला अशी शंका येत होती की रूप्पनबाबू कित्येक दिवसांपासून बेलाला आपल्या जाळ्यात अडकविण्याच्या प्रयत्नात आहेत आणि आता ती जवळ जवळ अडकली आहे. अशा स्थितीत बद्री पहिलवानांचा बेलाशी संबंध आहे आणि तो इतका खोलपर्यंत जाऊन पोचला आहे, या बातमीने छोटू गडबडून गेला.

तो विचारू लागला, ''पण गुरू, बेलाशी रूप्पनबाबूंनी काही पत्रव्यवहार केला होता असं ऐकलंय.''

''होय, केला होता. पोर आहे. पोरकटपणा केला झालं.''

''शिवाय त्या बाजूनंही एखादी चिठ्ठी आली होती असंही ऐकिवात आहे.''

बद्री पहिलवानांनी धमकावून विचारले, ''कुणी सांगितलं तुला ?''



''कुणीही नाही, गुरू.''

''तर मग कसं कळलं ?''

''ऐकलं होतं, गुरू !''

''कुणाकडून ?''

''ते काही आठवत नाही, गुरू ! पण कुणीतरी अशीच उडत-उडत बातमी सांगितली होती.''

बद्री पहिलवान गप्प राहिले. धंदेवाईक साक्षीदार कोर्टात खरे बोलण्याची शपथ घेऊन जशी उडवाउडवीची उत्तरे देतो तसा जर एखादा माणूस संभाषणात बोलू लागला तर त्याला जास्त प्रश्न विचारणे निरर्थक असते. बद्रीनी थोडा वेळ गप्प राहून स्पष्टच सांगितले, ''होय, चिठ्ठी आली होती. ती माझ्यासाठीच होती. पण चिठ्ठी नव्हती तर आजकालच्या पोरींचे चोचले-नखरे होते. सिनेमातली गाणी होती त्यांत.''

छोटूने खुशामत करीत विचारले, ''म्हणजे गुरू, हे प्रकरण अनेक वर्षांपासून चालत आलेलं असणार ? गच्चीवरच ... ?''

बद्री म्हणाले, ''छोटू, एवढी मोठी गोष्ट सर्वांत आधी मी तुलाच सांगितलीय. हेच पुष्कळ समज. आता फार खोलात शिरू नकोस. अन् हे बघ, इतक्यात कुणाजवळ बोलू नकोस.''

छोटू पहिलवान अंधारामध्ये कुणाच्या तरी कट्ट्याला धडकला. गावच्या प्रथेप्रमाणे कोणीतरी अतिक्रमण करण्याच्या हेतूने तो कट्टा बांधला होता. एक इरसाल शिवी हासडून आणि मग कमरेतील दुखण्याबद्दल आदर दर्शविण्यासाठी एकदा 'हाव्' असा आवाज काढून त्याने वायदा केला की, ''कुणालाही सांगणार नाही, गुरू.''

''काही दिवसांत ही गोष्ट सगळीकडे पसरणार आहेच. तरीपण सध्या ती झाकून ठेवायची आहे.''

''गुरू, एकदा सांगितलं ना, कुणाजवळही बोलणार नाही.''

थोड्या वेळानंतर बद्री पहिलवान हसू लागले. ते म्हणाले, ''पण छोट्या, तुझ्या अकलेची मात्र अगदी कमाल आहे गड्या. बेला आणि जोगनाथ यांची तू जोडी जमवलीस ! बेला जोगनाथाशी भानगड करील ? हुंः ! साला दीड दमडीच्या गुळासारखा आहे. बेलानं त्याचा हात धरला तर पिरपिरायला लागेल. त्याच्याशी तू बेलाचा संबंध जोडलास. अखेर खड्डूसच तू म्हणा.'

छोटू पहिलवानाच्या कमरेत एक कळ उठली. त्याला वाटले, आपल्याला पुनः कोणीतरी धोबीपछाड करून आपटलंय.

एकमेकांचा निरोप घेण्यापूर्वी बद्रीनी पुनः छोटूला आठवण दिली की, ''इतक्यात माझ्या आणि बेलाच्या संबंधाविषयी कुठं बोलू नकोस हं.'' छोटूने निष्ठापूर्वक

गोपनीयतेची शपथ घेतली. परंतु त्याची ती शपथ बहुदा राजभवनांत घेतल्या जाणाऱ्या गुप्ततेच्या शपथांसारखीच ठरली असावी. कारण दुसऱ्या दिवसापासूनच अनेक लोक आपल्याकडे बदललेल्या नजरेने पाहात असल्याचे पहिलवानांना आढळून आले.

## २३

त्या गावात एक दुःखी तरूण होता. त्याचे नाव रूप्पनबाबू. काही दिवसांपूर्वी त्याचा रूबाब ऐसपैस आणि मान फार मोठा होता, कारण त्याच्या बापाचे नाव वैद्यजी होते आणि शिवाय त्याचे स्वतःचे असेही एक नाव होते. तो दहाव्या इयत्तेत अनेक वर्षे शिकत होता आणि विद्यार्थ्यांचा लीडर होता. मामलेदार त्याचा दोस्त, फौजदार त्याचा दरबारी आणि प्रिन्सिपॉल त्याच्या हाताखालचा नोकर होता. तो बहुदा कॉलेजच्या अध्यापकांच्या व्यवहारावर व आचरणावर असंतुष्ट असे. शिक्षक मंडळी त्याला 'भयानां भयं भीषणं भीषणानाम्' व पित्यांचा पिता मानत असत. घरी त्याचे स्थान एखाद्या अरबी जातीच्या शिंगरासारखे होते, आणि देशाच्या राजकारणाच्या कुरणात स्वच्छंदपणे चरणाऱ्या होतकरू गुरांप्रमाणे पुढे मागे तोही चरण्याची कला शिकून घेईल आणि बापाच्या मृत्यूनंतर इकडच्या-तिकडच्या रस्त्यांवर वर्ष-सहा महिने घालवून एखादे दिवशी तो आपल्या बापाच्या जागीच रवंथ करीत असलेला दिसेल, याविषयी सर्वांची खात्री होती.

पाच महिन्यांपूर्वी त्या गावात एक तरूण आला होता. त्याचे नाव रंगनाथ होते. लोक त्याचा मोठेपणा ओळखून होते. कारण त्याच्या मामाचे नाव वैद्यजी होते, आणि शिवाय त्याच्या ठिकाणी त्याचे स्वतःचे असे एक मोठेपण होते. त्याने इतिहास या विषयात एम्. ए. केले होते. तो दिसण्यात भला व साधासुधा होता, पण मनात आल्यास वाकडेही बोलू शकत असे. जवळ जवळ प्रत्येक सुशिक्षित भारतीयाप्रमाणे तो आपल्याशी संबंध नसणाऱ्या घटनेकडे एक घटना म्हणूनच पाहात असे, ती विसरून जात असे आणि नंतर तिच्याविषयी काळजी करीत नसे. इतिहासाचा अभ्यास केल्यामुळे त्याला राजकीय व सामाजिक शोषणाच्या व छळाच्या पुष्कळ गोष्टी माहीत



होत्या. परंतु आपणही इतिहासाचा एक भाग आहोत आणि आपण मनात आणल्यास इतिहास घडवू-मोडू शकतो, हा विचार त्याच्या डोक्यात कधी आला नाही. देशातील ज्या पंचाण्णव टक्के बुद्धिजीवी लोकांना त्यांची बुद्धी आत्मसंतोष मिळवून देते, त्यांना वादविवाद करण्याचे कौशल्य शिकविते, इतरांनी काय केले पाहिजे व काय करता कामा नये यावर त्यांना व्याख्याने द्यावयास लावते, आणि करण्याच्या अथवा न करण्याच्या बाबतीत आपलीही काही जबाबदारी आहे या असभ्य विचारापासून त्यांना अनेक कोस दूर ठेवते अशा लोकांपैकी तो एक होता.

परंतु ज्या तरूणाचे नाव रूप्पनबाबू असे होते तो आता दुःखी होऊ लागला होता, कारण काही दिवसांपासून राजकीय पसंती व नापसंती यांमध्ये त्याने आपली वैयक्तिक पसंती घुसडण्यास सुरूवात केली होती, आणि त्यामध्ये पूर्वी त्याला जे दोष दिसत नव्हते ते आता एखाद्या फुटबॉलप्रमाणे त्याच्या डोळ्यांना दिसू लागले होते. पूर्वी तो कॉलेजच्या प्रिन्सिपॉलला आपल्या वडिलांचा फक्त गुलाम समजत होता, परंतु आता त्याला असे दिसून येऊ लागले होते की तो एक महामूर्ख व हट्टी इसम असून शिक्षकांविषयी त्याला वाटणारा द्वेष व्यक्त करून त्यांच्यावर सूड उगविण्यासाठी तो त्याच्या वडिलांना गटबाजीत ओढून राहिला आहे. काही शिक्षक त्याला पूर्वी मूर्ख व अडाणी वाटत होते, परंतु अलीकडे काही दिवसांपासून त्याला असे वाटू लागले होते की ते वेडपट असले तरी बदमाष नाहीत, आणि त्यांचे रक्षण झाले पाहिजे. काही दिवसांपूर्वी बद्री पहिलवान हे त्याला सामर्थ्याचे अत्युच्च शिखर असल्यासारखे वाटत होते, आणि त्यांच्या सामर्थ्याचा त्याला अभिमान वाटत असे. परंतु आता त्याची नजर आसपासच्या जिल्ह्यांतील गुंडांकडे वळू लागली होती. हे गुंड कधी-कधी शिवपालगंजला येत आणि बद्रींशी बातचीत करून निघून जात. सारांश, त्या तरूणाच्या मनात एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली होती. ज्या अस्वस्थतेमुळे माणूस बिभीषण, ट्रॉट्स्की किंवा सुभाषचंद्र बोस बनून काहीतरी करून दाखवू इच्छितो आणि अखेर शेवटी फाशीच्या फळीवर, तुरूंगात किंवा जयप्रकाश नारायण व अच्युत पटवर्धन यांच्या संन्यासात जाऊन थांबतो अशी ती अस्वस्थता होती.

दुसरा तरूणही काहीसा विमनस्क होऊ लागला होता. कारण या पाच महिन्यांत त्याने असे पाहिले होते की जो खेळ गंमत म्हणून सुरू झाला होता त्यामध्ये लोकांचे हात-पाय मोडू लागले आहेत, आणि जी धूळ हसत हसत दुसऱ्यांच्या डोळ्यांत फेकली होती तिने त्यांचे डोळे फुटले आहेत. जेव्हा सनीचरला सरपंच बनविण्याची गोष्ट सुरू झाली होती अथवा जेव्हा छोटू पहिलवान जोगनाथाविरूद्ध साक्ष द्यायला गेला होता तेव्हा ते सारे थट्टामस्करीसारखे वाटत होते. परंतु जेव्हा त्याने पाहिले की सनीचर खरोखरीच ग्रामपंचायतीचा सरपंच बनला आहे आणि छोटू जोगनाथाला तुरूंगातून

सोडवून हसत हसत परत आला आहे तेव्हा त्याला जणू झटका बसला. सनीचरच्या विजयाच्या दिवशी त्याने खूप विचार केला, आणि त्यावेळी त्याला प्रदेशांच्या राजधान्यांमध्ये असंख्य वैद्यजी आणि मंत्र्यांच्या व मुख्यमंत्र्यांच्या रांगेत असंख्य सनीचर घुसलेले दिसून आले.

ज्याचे नाव रूप्पनबाबू होते त्याच्या मनात अस्वस्थता निर्माण होण्याच्या दिवशी आणखी एक घटना घडली होती. पण त्या घटनेचा या अस्वस्थतेशी काही संबंध नव्हता. त्या तरूणाला पुष्कळ दिवसांपासून एका तरूणीची जरूर होती आणि ही गोष्ट ओळखून त्याने चुकून असे गृहीत धरले होते की आपल्याला फक्त बेलाची जरूर आहे. त्यानंतर, जीवजंतू, पशुपक्षी वगैरेमध्ये, जी इच्छा मोसमानुसार आणि माणसामध्ये वाटेल तेव्हा व्यक्त होत असते. अशा आपल्या इच्छेला त्याने 'प्रेम' हे नाव दिले होते. हा शब्द आपल्या शब्दकोशांत बहुदा कवितेच्या लबाडीमुळे आला असावा. सारांश, त्या तरूणाने असा विचार करण्यास सुरूवात केली की आपले बेलावर प्रेम आहे, आणि सर्व गोष्टींची माहिती नसल्यामुळे बेलाही आपल्यावर प्रेम करीत असावी, असा त्याने स्वतःचा समज करून घेतला. मग त्याने बेलाला एक प्रेमपत्र लिहिले. त्याचे उत्तर बेलाने काही दिले नाही, परंतु त्याला स्वतःला मात्र अनेक ठिकाणी व अनेकदा त्याबद्दल जाब द्यावा लागला. हा जाब देतांना त्याने आपला पीळ कायम ठेवला, परंतु आतल्या आत तो खजील होत होता. पुढे ज्या दिवशी त्याने खन्ना मास्टरांकडून असे ऐकले की बेला आणि बद्री पहिलवान यांचे आधीचेच मेतकूट आहे, आणि बद्री तिच्याशी लग्न करणार आहेत तेव्हा त्याच्या मनात भयंकर खळबळ उडाली, आणि त्या बेचैनीनेच त्याला प्रिन्सिपॉल, वैद्यजी, बद्री पहिलवान, सनीचर या सर्वांविषयी प्रतिकूल विचार करण्यास भाग पाडले. आतापर्यंत तो वास्तवतेचे प्रदर्शन करीत होता, आता त्याच्या जीवनात वास्तवतेच्या दर्शनास सुरूवात झाली.

त्याचबरोबर त्या दुसऱ्या तरूणालाही असे प्रतीत होऊ लागले की शोषण आणि छळणूक यांच्या गोष्टींची घोकंपट्टी करणे पुरेसे नाही आणि ज्या गाढवाच्या पाठीवर सारे वेद, उपनिषदे व पुराणे यांचे ओझे लादलेले असते तो आंतरराष्ट्रीय विद्वत् परिषदेचा अध्यक्ष बनला तरी तो माणूस ठरत नाही, माणूस बनण्यासाठी विद्वत्तेचे ओझे वाहण्याव्यतिरिक्त आणखीही काही करावे लागते.

खन्ना मास्टरांनी बद्री पहिलवानांच्या प्रेम प्रकरणाची माहिती रूप्पनबाबूंना सांगण्यापूर्वी त्यांना आणखी एक गोष्ट सांगितली होती. त्यांचे हे सम्मेलन होळीनंतर



तीन दिवसांनी चंद्रोदय झाल्यावर रस्त्याच्या कडेला, एका पुलावर झाले होते. काही दिवसांपूर्वी ज्या पुलावर बसून रंगनाथाने रूप्पनबाबूंना गच्चीवरील आपल्या एकाकी झोपण्याचे अनुभव सांगितले होते, तोच हा पूल.

खन्ना मास्टरांबरोबर मालवीयही होते. दोघेही आधीच पुलावर बसले होते. रूप्पनबाबू होळीच्या उत्सवात अखंडपणे भांग पीत राहिल्यामुळे थकले होते, आणि आपला थकवा घालविण्यासाठी यावेळी पुनः एकदा भांग पिऊन रंगनाथाबरोबर फिरायला निघाले होते. पुलावर दोन इसम बसलेले पाहून त्यांनी नेहमीच्या पद्धतीप्रमाणे विचारले, ''कोण आहे रे ?''

''कोण ? रूप्पनबाबू ? नमस्कार रंगनाथजी, मी खन्ना आहे.''

''दुसरं कोण आहे ?''

''मालवीय आहेत. नमस्कार रूप्पनबाबू, या, बसा.''

आपल्या गुरूजनांच्या अभिवादनाचा कामचलाऊ स्वीकार करून रूप्पनबाबू पुलावर बसले. रंगनाथ शिक्षकांच्या दुसऱ्या बाजूला बसला. 'बिग-फोर'ची बैठक सुरू झाली.

रात्रीचे सुमारे नऊ वाजले होते परंतु कोठेही सामसूम नव्हती. तालुका कचेरीच्या समोर पानपट्टीवाल्याच्या दुकानावरील बॅटरीवाला रेडिओ अजूनही ठणाणत होता, आणि फिल्मी गाण्याच्या गटारगंगेतून 'अरमान, साजना, हसीन, जादूगार, मंजिल, नजर, तू कहाँ, सीना, गले लगा लो, गले लग जा, मचल मचल कर, आँधियाँ, गम, तमन्ना, परदेसी, शराब, मुसकान, आग, जिंदगी, मौत, बेरहम, तस्वीर, चाँदनी, आसमाँ, सुहाना सपन, जोबन, मस्ती, उभार, इन्तजार, बेजार, इसरार, इनकार, इकरार.... यांसारगे शब्द मसामसा बाहेर पडत होते. उपासमारीने गांजलेल्या देशांना नवजागृतीचा संदेश देण्यास हे शब्द अत्यंत उपयोगी आहेत. या गटाराचा धोधो आवाज दूरदूरपर्यंत पसरला होता, आणि या पुलापर्यंतही वाऱ्याच्या झोताबरोबर येऊन धडकत होता. आजूबाजूला कोल्हे ओरडत होते आणि त्यावरून असे सिद्ध होत होते. की त्यांच्यामध्ये सामुदायिकपणे राहाण्याची शक्ती खूप मोठ्या प्रमाणात आहे, आणि गावाच्या भोवतालचे सारे जंगल तोडले गेले असूनही आपल्या देशातून विस्थापित झालेल्या यहुद्यांप्रमाणे - ते कोठेतरी वसाहत करण्यासाठी जणू चळवळ सुरू करणार आहेत. परंतु या सर्व आवाजांना दडपून टाकणारा सर्वांत जोरदार आवाज हॉर्न वाजवीत ताशी सत्तर मैल वेगाने शहराच्या दिशेने धावणाऱ्या ट्रकांचा होता. रात्र झाली आहे. शहरातील एखाद्या हलक्या प्रतीच्या बारमध्ये रमच्या बाटल्या रिकाम्या होत असतील, एखाद्या गावठी खाणावळीत मांस आणि गरम तंदुरी रोट्या तयार होत असतील, आणि एखाद्या ठिकाणी एखादी छोकरी बिडीचे झुरके घेत माझी वाट पाहात असेल — या कल्पना शेकडो मैलांवरून येणाऱ्या ट्रक ड्रायव्हरला उत्कंठित करण्यास

आणि पायाला ॲक्सिलेटरवर सारी ताकद एकवटून जोर देण्यास पुरेशा होत्या. परिणामतः रस्त्यावरून दर पाच मिनिटाला एखादा ट्रक घरघर करीत भरधाव निघून जात होता आणि तो जात असतांना पुलावर बसलेले चारी महापुरूष श्वास रोखून धरत होते, आणि तो निघून गेल्यावर 'आपण लोक बचावलो' या समाधानाने आपले अर्धवठ राहिलेले बोलणे पुरे करू लागत.

या अडचणींना न जुमानता त्यांचे संभाषण चालत राहिले. खन्ना मास्टर दुःखी स्वरात रूप्पन व रंगनाथ यांच्याकडे मदतीची याचना करू लागले. त्यांनी आपल्या खिशातून एक कागद काढला आणि रूप्पनबाबूंना म्हणाले, "हे वाचा. पाहा तुमच्या प्रिन्सिपॉलनी काय लिहिलंय ते."

रूप्पनबाबू म्हणाले, "मला अंधारात वाचता येत नाही. तुम्हाला वाचता येत असेल तर वाचून दाखवा."

तेव्हा मग खन्ना मास्टरांनी तोंडीच त्या पत्रकातील मजकुराचा सारांश सांगितला. त्याचा संबंध मालवीयांच्या नैतिक आचरणाशी होता. त्या मजकुरावर विश्वास ठेवावयाचा तर असे मानावे लागले असते की मालवीयांना विद्यार्थ्यांविषयी फार प्रेम वाटते, आणि काही विद्यार्थ्यांवरील त्यांचे प्रेम अगदी शारीरिक पातळीवरील आहे. त्या पत्रकात अशा अनेक घटना नमूद करण्यात आल्या होत्या की ज्यांच्यावरून त्यांच्या आचरणावर प्रकाश पडत होता. उदाहरणार्थ, ते एका मुलाला आपल्याबरोबर शहरात घेऊन गेले होते आणि त्याला सिनेमा दाखवून, त्याच्या बरोबर रात्र घालवून, आणि त्याला आगामी परीक्षेतील गणिताचा पेपर सांगून शिवपालगंजला परत आले होते. हे पत्रक एखाद्या साहित्यिक हेतूने लिहिलेले नसून जनतेला वस्तुस्थिती कळावी, या उद्देशाने लिहिलेले होते. त्यामुळे त्याची वर्णनशैली स्पष्ट, सरळ, रोखठोक व कोठेकोठे असभ्य होती. त्या पत्रकात प्रिन्सिपॉल आणि मॅनेजर यांना असे आवाहन करण्यात आले होते की कॉलेजातून अशा शिक्षकांना कान धरून बाहेर काढले पाहिजे.

अशा प्रकारे पत्रकाचा सारांश सांगून झाल्यावर रूप्पनबाबूंना खन्ना मास्टरांनी विचारले, "इतके सारे झाल्यावरही आम्ही गप्प बसावं, आणि प्रिन्सिपॉलच्या विरूद्ध ब्र ही काढू नये, असं तुम्ही म्हणाल काय ?"

रूप्पनबाबूंनी मांगेच्या तारेतच विचारले, "मग काय विचार आहे ?"

"आमच्याजवळ सबळ पुरावा आहे. हे पत्रक प्रिन्सिपॉलनं छापवून घेतलंय.

आम्ही त्याच्यावर अब्रूनुकसानीचा दावा करणार आहोत."

रंगनाथ म्हणाला, "मोठी शरमेची गोष्ट आहे."

रूप्पनबाबू बेपर्वाईने म्हणाले, "असं पाहा, एके काळी मालवीयजींच्या विरूद्ध खरोखरीच अशा अफवा पसरल्या होत्या. एका मुलानं खुद्द मलाच सांगितलं होतं की,



मालवीयजी मला सिनेमा दाखवणार आहेत ..."

त्यांच्या वक्तृत्वात एका विचित्र आवाजाने खंड पडला. मालवीयजी जोरजोरात नाक शिंकरू लागले होते. तेव्हा कुठे इतरांना समजले की ते बऱ्याच वेळापासून निमूटपणे रडत बसले होते.

खन्ना मास्टर त्वेषाने म्हणाले, "हेच, हेच ते चारित्र्यहनन. कॅरेक्टर ॲसेसिनेशन. एका सज्जन गृहस्थाला अशा प्रकारे बदनाम केले जात आहे. तुमच्याकडून सहानुभूतीची अपेक्षा होती. पण तुम्हीही असं बोलू लागलात."

रूप्पनबाबू निर्दयपणे म्हणाले, "मी जे काही ऐकलं होतं ते सांगितलं. मास्तर मंडळी असल्या गोष्टी करीतच असतात. ही तक्रार खरी असली तरी नवीन नाही. परंतु असल्या पत्रकबाजीला माझा विरोध आहे. तुम्ही निश्चिंत राहा. मी अगदी खुल्लमखुल्ला याचा विरोध करीन."

खन्ना आणखीच गरम झाले. ते म्हणाले, "रूप्पनबाबू, तुम्ही तोच आरोप पुनः करताहात. मी याचा विरोध करतो. मालवीयांच्या विरूद्ध हा खोटा प्रचार आहे. हे कॅरेक्टर-ॲसेसिनेशन आहे. कुणीही कुणासंबंधी वाटेल ते बोलावं ? ही काय रीत झाली ?"

ते पुढे बोलू लागले, "हे पाहा, माणसं बद्री पहिलवानांविषयीही तोंडाला येईल ते बोलतात. परंतु मी त्यावर विश्वास ठेवला नाही."

यावर प्रथम रंगनाथानेच विचारले, "बद्रीदादांविषयी लोक काय बरळतात ?"

तेव्हा जरा आडवळणाने इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगून खन्ना मास्टरांनी बद्रीचे प्रेमप्रकरण सविस्तर कथन केले. त्यांनी ते एका विद्यार्थ्याकडून ऐकले होते. त्या विद्यार्थ्याने आखाड्यातील एका पहिलवानाच्या तोंडून ते ऐकले होते. त्या पहिलवानाने ते कुणाकडून ऐकले होते कोण जाणे. खन्ना मास्टरांनी रूप्पन व रंगनाथ यांना जो अहवाल सादर केला त्यात इतर गोष्टींबरोबर आणखी एका घटनेची भर घातली होती. की अशी की गयादीन हे मुलीचे लग्न न करताच सात-आठ महिन्यांनी आजोबा बनणार आहेत आणि रूप्पनबाबूंना भेट म्हणून एक पुतण्या मिळणार आहे.

ही बातमी एवढी जोरदार होती की रूप्पनबाबू पुलावरून खाली पडतापडता वाचले आणि रंगनाथाने हा भांगेचा परिणाम आहे असे म्हणून उडवाउडवी करण्याचा प्रयत्न केला. परंतु रूप्पनबाबू गडबडले होते यात शंका नाही. थोड्या वेळानंतर ते भानावर आले आणि आतापर्यंत त्यांचे ज्या गोष्टीकडे लक्ष गेले नव्हते अशा अनेक गोष्टी त्यांना आठवू लागल्या. अलिकडे बद्री पहिलवान बऱ्याच दिवसांपासून गच्चीवर बराच वेळ व्यायाम करीत असतात, आणि त्यावेळी जिन्याचे वरचे दार ते लावून घेत असतात, हे त्यांना आठवले, त्या दिवशी रात्री रंगनाथाच्या खाटेवर कोणती मुलगी

आली असावी त्याचाही त्यांना आता उलगडा झाला.

आता मात्र रूप्पनबाबूंना खरोखरीच भांगेची गरमी जाणवू लागली आणि ते बेचैन होऊन इकडे-तिकडे पाहू लागले. खन्ना मास्टर व रंगनाथ हे दोघे प्रिन्सिपॉल व त्यांचे साथीदार यांच्या विरुद्ध चालू असलेल्या १०७ व्या कलमाखालच्या खटल्यासंबंधी चर्चा करीत होते. खन्नांनी आत्मकरूणेच्या महाकाव्यामध्ये एक नवीन सर्ग लिहिण्यास सुरूवात केली होती. रूप्पनबाबू थोडा वेळ स्तब्धपणे त्यांच्याकडे निरखून पाहात राहिले. त्यांना असे दिसून आले की खन्ना मास्टर आता पूर्वीपेक्षा अधिक कृश झाले आहेत आणि इतका वेळ गप्प बसलेले मालवीयजी वस्तुतः गप्प बसलेले नसून रडत आहेत.

रूप्पनबाबूंना राग आला. पण तो राग कोणावर आहे, हे त्यांना नीटसे समजले नाही. त्याचबरोबर त्यांना त्या शिक्षकांची व स्वतःचीही कीव आली. ते प्रिन्सिपॉलना वाटेल तशा शिव्या देऊ लागले. रंगनाथने त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला आणि त्या शिक्षकांना पूर्वीप्रमाणे असे सांगण्याचा प्रयत्न केला की, ''हे काही खरं नव्हे. हा फक्त भांगेचाच प्रताप आहे.'' परंतु रूप्पनबाबूंनी त्यालाच गुरकावून गप्प केले.

शहराच्या एका कोपऱ्यात सभोवताली उंच तट असलेला एक ऐसपैस बंगला होता. त्याच्या एकूण बांधणीवरूनच तो एखाद्या तालुकेदाराचा असावा असे वाटत होते. जमीनदारी नष्ट झाल्यानंतर त्याच्या मालकाने नव्या जमान्यातील कोणा तालुकेदाराला राहाण्यासाठी तो भाड्याने दिला होता.

बंगल्याच्या एका कोपऱ्यातील खोलीत जिल्हाविद्यालय निरीक्षकाची कचेरी होती. तेवढा भाग वगळल्यास उरलेल्या सबंध बंगल्यात त्यांचे बिऱ्हाड होते. त्यांच्या बिऱ्हाडाचा भागही कचेरीचाच आहे असे समजून सरकार त्याचेही भाडे भरत होते. कचेरीचे संपूर्ण भाडे जिल्हा विद्यालय - निरीक्षक आपल्या घराचे भाडे म्हणून भरत होते. अशा प्रकारच्या मित्रतापूर्ण तडजोडीला इंग्रजीत 'ऑफिस-कम-रेसिडेन्स' असे म्हणतात. हिन्दी-मराठीत त्याला 'ऑफिस कमी रेसिडेन्स जादा' असे म्हणतात.

कार्यालयातून, म्हणजे कोपऱ्यातील खोलीतून, वैद्यजी, प्रिन्सिपॉल साहेब व रूप्पनबाबू बाहेर पडले. बाहेरून पाहाणाऱ्यांना असेच वाटले असते की जणू तीन चोर बंगल्यात काही हातचलाखी करून बाथरूमच्या वाटेने पळून चालले असावेत. दहा-पाच पावले चालून गेल्यावर त्यांचा वेग मंदावला आणि ते इकडे-तिकडे पाहात लॉनची लांबी-रूंदी व बागेची शोभा यांचे निरीक्षण करू लागले. पोर्टिकोकडे पाहून रूप्पनबाबू म्हणाले, ''इन्स्पेक्टर साहेबांची कार अगदी डबडी झालीय.''



प्रिन्सिपॉलनी उडत-उडत तिकडे पाहिले व म्हटले. ''भत्त्यावर थोडा प्रतिबंध घालण्यात आलाय.''

''तरीच !'' रूप्पनबाबूंनी सभोवती नजर फिरवून लॉन, बाग, इमारत वगैरे पाहात म्हटले, ''सगळा थाट फुकटचाच म्हणायचा.''

फाटकावर एक पट्टेवाला दिसला. प्रिन्सिपॉल साहेबांना पाहून त्याने चेहऱ्यावर विशिष्ट प्रकारचा भाव आणला. प्रिन्सिपॉलनी दुसऱ्या प्रकारचा भाव आणून डोके गोल-गोल फिरविले. पट्टेवाल्याने तिसऱ्या प्रकारचा अविर्भाव केला. तेव्हा प्रिन्सिपॉलनी खिशातून एक अधेली काढून त्याला देत म्हटले, ''अरे बाबा तू काय रोज-रोज मागत राहाणार ?''

पट्टेवाल्याने सभ्यपणे उत्तर दिले, ''आपण लोकांनी दिलेलंच तर मी खातो, साहेब.''

रूप्पनबाबू म्हणाले, ''यात काय संशय ?''

वैद्यजींनी त्यांच्याकडे कडक नजरेने पाहिले आणि ते न बोलता रस्त्यावर आले. रूप्पनबाबूंच्या प्रसन्नतेत त्यामुळे काही फरक पडला नाही. ते प्रिन्सिपॉलना हळूहळू सांगू लागले, ''अशा प्रसंगी दोन आण्यापेक्षा जास्त देणं बरं नव्हे. तेव्हढ्यात दोन पानपट्ट्या येतात. फुकटात एवढं पुष्कळ झालं ....''

इंग्रज लोक शहराच्या ज्या भागाला सिव्हिल लाइन्स असे म्हणत असत आणि आपले वारसदार व मानसपुत्र यांच्यासाठी त्यांनी जो मागे ठेवला होता तो भाग होय. रस्त्यावर वर्दळ फारच कमी होती. अधून-मधून एखादी चमकदार कार मग ती सरकारी पैशाची असो, उसनवार घेतलेल्या पैशांची असो की मोफतची असो भर्रकन निघून जाई आणि पायी चालणारा माणूस आपले दैव व परमेश्वर यांच्या कृपेमुळेच आपण बचावलो, या आनंदात रस्त्याच्या कडेला सरकत असे. मधूनच एखादी डबडी कार हळूहळू फरफटत गेल्यासारखी जाई. ती खरी प्रायव्हेट कार असे. पुरेसा भत्ता न खाल्यामुळे ती मरतुकडी, ॲनीमियाच्या रोग्यासारखी दिसे.

संध्याकाळचे चार वाजण्याचा सुमार होता. चौथ्या श्रेणीचे सरकारी अधिकारी वरच्या अधिकाऱ्यांच्या मुलांना आपल्या सायकलींवर बसवून किर्रकिर्र करीत रस्त्याने चालले होते. मुले इंग्रजी शाळांतून घरी परत येत होती. सर्वांना आपापल्या घरी जाऊन कोणता ना कोणता महान् संदेश पोचवावयाचा होता. ''अगर तुम्हारा मम्मी तुमको दूसरा ड्राइंग कापी नहीं खरीदेंगा, तो तुमको कल पनिश मिलेंगा !'' या वक्तव्यावर दोन मुले वादविवाद करीत चालली होती. एकजण सायकलच्या दांडीवर बसला होता तर दुसरा कॅरियरवर. त्यांच्या मधोमध सायकलच्या गादीवर गणवेश

परिधान केलेला पट्टेवाला होता.

इतक्या वेळानंतर वैद्यजी बोलले, आणि बोलले तेही भरल्या गळ्याने. ते म्हणाले, ''या मुलांचं शिक्षण पाहा. आणि दुसरीकडे आमच्या खेड्यातल्या शाळेतील मुलं. किती फरक आहे !''

प्रिन्सिपॉल साहेबांचे दोन्ही हात पँटच्या खिशांत गेले. लहान तोंडी मोठा घास घेण्याची तयारी झाली. म्हणाले, ''मी असा विचार करतोय की येत्या जुलैपासून आपल्या कॉलेजातही मुलांसाठी युनिफॉर्म सुरू करावा.''

''फार उत्तम विचार आहे.'' वैद्यजी म्हणाले.

रूप्पनबाबू नंतर प्रिन्सिपॉल साहेबांना म्हणाले, ''कोणता युनिफॉर्म सुरू करणार ? त्या पट्टेवाल्याचा की त्या मुलांचा ?''

प्रिन्सिपॉल साहेब म्हणाले, ''रूप्पनबाबू, मी पुरा सोशालिस्ट आहे. माझ्या दृष्टीनं दोघेही समान आहेत.''

''मी तुम्हांलाही त्यात धरून तिघांना एक समजतो.''

थोडा वेळ ते न बोलता चालत राहिले. प्रिन्सिपॉल साहेबांनी वैद्यजींना सांगितले, ''इन्स्पेक्टर साहेबांच्या घरून डबा परत आला नाही.''

वैद्यजी गंभीरपणे चालत राहिले. विचार करून म्हणाले, ''जवळ जवळ दहा शेर तूप तरी असेलच. एवढं तूप दिल्यावर डब्याचं काय घेऊन बसलात ?''

प्रिन्सिपॉल हसले. म्हणाले, ''ठीक आहे. जाऊ द्या. गाय निघून गेल्यावर दाव्याबद्दल दुःख करण्यात काय अर्थ ?''

''तेच तर !'' वैद्यजी जास्तच गंभीर बनले आणि प्रवचन झोडू लागले, ''हत्तीचं दान दिल्यावर अंकुशाबद्दल कसलं भांडण करायचं ? रामानं जेव्हा बिभीषणाला राज्याभिषेक केला तेव्हा जांबुवंत म्हणाला, ''महाराज, सोन्याचा निदान एक राजवाडा तरी तुम्ही स्वतःसाठी राखून ठेवायला हवा होता.'' यावर मर्यादापुरुषोत्तम प्रभु रामचंद्रजी महाराज काय उत्तर देतात ? ते म्हणतात, ''हे जांबुवंत, विक्रीते करिणि किमंकुशे विवादः ? हत्ती विकल्यावर अंकुशासाठी कसला झगडा करायचा ?''

प्रिन्सिपॉलांच्या मनातला जणू एक काटा निघून गेला. एखाद्या उच्च कोटीच्या दैववादी पुरुषाप्रमाणे मान हलवून ते वीरश्रीने म्हणाले, ''तर मग ठीक आहे. जाऊ द्या. त्या डब्याचं काय एवढंसं ?''

रूप्पनबाबू म्हणाले, ''परंतु तत्वतः हे चूक आहे. त्यांनी तो डबा परत करायला हवा होता. दर खेपेला नवा डबा कुठून आणायचा ?'' त्यांनी प्रिन्सिपॉलना आग्रहाने सांगितले, ''तुम्हांला मागायला संकोच वाटत असेल तर मला सांगा, मी तो परत मागून आणतो.''



परंतु त्यांना कोणीही तसे सांगितले नाही.

आता ते लोक बाजारपेठेत आले होते. आज देखील भारतीय शहरांमध्ये दोन प्रकारच्या बाजारपेठा असतात. एक काळ्या म्हणजे नेटिव्ह लोकांची आणि दुसरी गोऱ्या लोकांची. ही दुसऱ्या प्रकारची बाजारपेठ होती. येथे इंग्रजी सिनेमागृहे, दारूचे गुत्ते, हॉटेल आणि भपकेबाज दुकाने होती. विद्युत्दीपांच्या झगझगाटाने डोळ्यांत खुपणाऱ्या जाहिराती होत्या. त्यांचा प्रिय विषय सिगारेट व शराब हा होता. या भागात आले की असे वाटे, देशात भाकरींचा तुटवडा असला तरी केक भरपूर प्रमाणात मिळतात, आणि पाण्याच्या अभावी तुमच्या घशाला कोरड पडत असल्यास तुम्ही बियर पिऊन ताजेतवाने होऊ शकता; आणि आवश्यकता पडल्यास दारूबंदीवर झकासपैकी भाषणही झोडू शकता. सारांश, येथे आल्यानंतर असे वाटे की जोपर्यंत तुम्ही जनता आहात तोपर्यंतच तुम्हांला खाण्या - पिण्याची व कपड्या - लत्त्याची टंचाई भासत राहील; आणि तुम्हांला या आपत्तीतून स्वतःची सुटका करून घ्यावयाची असेल तर जनतापण सोडून मोठेपण मिळविण्याची काही तरी युक्ती शोधा.

एके ठिकाणी फूटपाथवर धोतर - सदरा - टोपीवाले चार - सहा सद्गृहस्थ हिंडत - फिरत गप्पागोष्टी करीत होते. ते स्वतःवर फार खुष होते. अधूनमधून आनंदातिरेकाने ते एकमेकांच्या पायांजवळ तोंडातील पानाची पिचकारी पचकन टाकत होते. ज्यांचा जन्म 'भारत छोडो' ची घोषणा दुमदुमल्यानंतर झाला होता असे रूप्पनबाबू मोठ्या आत्मविश्वासाने म्हणाले, ''ईश्वर आपल्या गाढवांना जिलब्या खाऊ घालतो आहे. प्रत्येक फांदीवर एकेक घुबड बसलंय.''

ही काव्ये आम जनतेत खूपच प्रचलित व विख्यात आहेत. ती उद्धृत करून रूप्पनबाबूंनी काही फार मोठी अपूर्व कल्पकता दाखविली होती असे नाही; परंतु त्यांनी ज्या ढंगात ही वाक्ये उच्चारली होती त्यावरून ते गंभीर होत चालले आहेत असे वाटत होते. प्रिन्सिपॉलनी त्यांना जरा चुचकारले आणि वैद्यजींना म्हटले, ''चला महाराज, थोडं खाणंपिणं करू या. चिरंजीवांचा मूड जरा गेल्यासारखा दिसतोय.''

सर्वांत प्रथम त्यांनी पानपट्टीचे दुकान शोधण्याचा विचार केला. हिंदी माणसाच्या दृष्टीने यात काही फारसे अवघड नाही. रॉबिन्सन क्रूसोऐवजी एखादा हिन्दी माणूस एखाद्या एकाकी बेटावर अडकून पडला असता तर त्याने फ्रायडेच्या ऐवजी एखादा पानपट्टीवालाच शोधून काढला असता. वस्तुतः खऱ्या हिंदी माणसाची व्याख्याच अशी आहे की जो माणूस कोठेही पान खाण्याची व्यवस्था करतो आणि कोठेही लघवी

करण्यासाठी जागा शोधून काढतो तो अस्सल भारतीय समजावा. परंतु या बाजारपेठेत पानपट्टीचे दुकान शोधण्याची गरज नव्हती. दुकाने स्वतःच माणसांना शोधत होती. या ठिकाणी समोर, मागे, उजवीकडे, डावीकडे, सर्वत्र पानपट्टीचीच दुकाने होती. ते तिघेजण त्यांच्या समोरच असलेल्या दुकानाजवळ जाऊन उभे राहिले. एका मोठ्या आरशात पाहून वैद्यजींनी आपल्या साफ्याचा कोण ठीक केला, रूप्पनबाबूंनी डोळे मिचकावून हसण्याचा प्रयत्न केला; आणि प्रिन्सिपॉलसाहेब पानपट्टीवाल्याशी बोलू लागले.

त्यांनी हळूच सांगितले, ''तीन ग्लास जरा दाट मिश्रणाचे द्या.''

वैद्यजींनी भाबडेपणाचा आव आणून विचारले, ''काय ? काय आहे ?''

प्रिन्सिपॉल साहेब म्हणाले, ''काही नाही, पान खाण्याच्या आधी पाण्याची व्यवस्था करतो आहे, एवढंच !''

पानपट्टीवाल्याने भांग ढवळून तीन ग्लासांत ओतली. प्रिन्सिपॉलसाहेब म्हणाले, ''मिरी आणि बदाम जरा जास्त पाहिजेत.''

पानपट्टीवाल्याच्या दुकानात एका अत्यंत देखण्या व तरतरीत तरुणाची तसबीर लावलेली होती. समोरच्या थुलथुलीत व बेढब इसमाचे ते दहा-पंधरा वर्षांपूर्वीचे छायाचित्र असले पाहिजे यात मुळीच शंका नव्हती. रूप्पनबाबूंनी प्रिन्सिपॉल साहेबांना हळूच डिवचून म्हटले, ''इमारत फार भव्य होती असं सांगणारे भग्नावशेषही इथं उरलेले दिसत नाहीत.''

प्रिन्सिपॉल म्हणाले, ''अं ऽ हं ! दुसऱ्या कुणाची तरी तसबीर असावी.''

पानपट्टीवाल्याने या अपमानाबद्दल काही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. एवढाच फरक पडला की भांग तयार करण्यात जरा वेग आला आणि ते कार्य तो पहिलवानी थाटात करू लागला. चोरून भांग विकण्याच्या गुन्ह्याबद्दल पोलीस पानपट्टीवाल्यावर खटला तर भरणार नाहीत ना, या भीतीने रूप्पनबाबू इकडे - तिकडे पाहू लागले.

जिकडे - तिकडे इंग्रजीचा उदोउदो चालला होता. इंग्रजीत जाहिराती. दुकानांची नावे इंग्रजीतच होती. मळकट कॉलरींचे कारकून, झकपक पोषाखातील व्यापाऱ्यांची पोरटी, मवाल्यांसारखे फिरणारे पुष्कळसे राजकीय भडभुंजे, नजरेच्या जरबेनेच साऱ्या जगाला पराभूत करणारे, हनुवटी वर केलेले धुंदफुंद ऑफिसर, सगळेजण इंग्रजी बोलत होते. इंग्रजी पोषाखातील माणसे रुबाबात येत होती आणि जात होती. एका इंग्रजी सिनेमाच्या पोस्टरवर एक गोरी बाई - जवळजवळ नग्नावस्थेत - एका पलंगावर अर्धवट पहुडली होती आणि तिचं चुंबन घेतलं जात होतं. दोन - चार काळीकुट्ट, घाणेरडी मुले जवळ उभी राहून त्या चित्राचे निरीक्षण करीत होती. जवळच्या एका ग्रामोफोनच्या दुकानात पॉप म्यूझिकची एक रेकॉर्ड वाजत होती आणि काही पोरे - आपण जो गहू



खाल्ला आहे तो आपल्या गरीबीचा महारोग जगाला दाखवून बाहेरून मागविण्यात आला आहे, याचा विसर पडून वेड्यासारखे हात - पाय हलविण्यात रंगून गेले होते. रूडयार्ड किपलिंगचे धड वरती आणि शिर खाली लटकावून पूर्वेची आणि पश्चिमेची संस्कृती या विराट रूपात एकमेकांना भेटत होत्या. रूप्पनबाबूंनी भांग पिऊन ग्लास ठणकन दुकानावर ठेवून दिला.

प्रिन्सिपॉल साहेब खन्नांविषयी काही सांगू लागले.

रूप्पनबाबू आपल्या वडिलांकडे वळून म्हणाले, ''तुम्ही जरा या प्रिन्सिपॉलसाहेबांना आवरा. खन्ना मास्तरांचा प्रश्न त्यांनी इथं न काढलेला बरा. नाही तर मी आडपडदा न ठेवता बोलू लागलो म्हणजे यांना पळता भुई थोडी होईल.''

वैद्यजी शांततेच्या व क्षमेच्या देवदूताप्रमाणे आपले पंख फडफडवून म्हणजे मिशांवर सांडलेले ग्लासातील द्रव दोन्ही मुठींत पुसून टाकीत म्हणाले, ''मला तुम्ही मध्ये ओढू नका, रूप्पन ! तू आता खन्नाच्या बाजूनं बोलायला लागला आहेस, याचा प्रिन्सिपॉल साहेबांना फार खेद वाटतो. तुम्ही आपसात बोलून हा प्रश्न निकालात काढा.''

ते तिघे रिक्शास्टँडकडे चालले होते. वडिलांचे बोलणे ऐकताच रूप्पनबाबू जागच्या जागी थबकले. खांद्यावरची पिशवी फूटपाथवर ठेवून ते प्रिन्सिपॉल साहेबांना म्हणाले, ''तर मग या प्रिन्सिपॉलसाहेब, आधी आपण खन्नांचा प्रश्न मिटवून टाकू.''

प्रिन्सिपॉल साहेबांनी दुसरीकडे तोंड वळवून पुढे जात म्हटले, ''पुनः कधीतरी.''

रूप्पनबाबू रागारागाने म्हणाले, ''आजचं काम उद्यावर टाकणारे भ्याड दुसरे कुणी असतील. या प्रश्नाचा निकाल आत्ताच्या आत्ता लागला पाहिजे. कधीतरी वर तो सोडून दिला तर तो कधीच लागायचा नाही.''

वैद्यजींना एका पिंपळाच्या झाडाखाली असलेले शिवलिंग दिसले. त्याच्यावर एक लहानसे देऊळ बांधले होते. शिवलिंग पाहाताच वैद्यजी भक्ति - आतुर झाले. ही गोऱ्या लोकांची बाजारपेठ आहे, येथे देवाचे नाव लपून - छपून घेतले पाहिजे, या शिष्टाचाराचा विसर पडून ते पिंपळाच्या झाडाखाली जाऊन पोचले आणि सद्गदित कंठाने शंकराचे स्तोत्र म्हणू लागले.

इकडे फुटपाथवर प्रिन्सिपॉल साहेब आणि रूप्पनबाबू उद्याचे काम आज करण्यासाठी उभे राहिले.

वैद्यजींनी डोळे मिटून घेतले. पाठीमागे मोटारी येतजात राहिल्या आणि मुलींचे इंग्रजीने ओथंबलेले आवाज वातावरणात अस्वस्थता निर्माण करीत राहिले. कोणत्या तरी सिनेमात कुणा खेळणीवालीने जशी ट्यून वाजविली होती त्या आवाजाची नक्कल करीत खेळणी विकणारे कर्ण - विस्फोटक संगीत - निर्मिती करीत राहिले. परंतु ज्याप्रमाणे विरोधी पक्षाचा आरडाओरडा आणि शिवीगाळी यांना मुळीच किंमत न देता

खरा मिनिस्टर वशिलेबाजीच्या मार्गाने सरळ चालत राहातो त्याप्रमाणे पूर्णपणे निर्लिप्त राहून वैद्यजीही त्या आवाजांकडे दुर्लक्ष करून शंकराची प्रार्थना करीत राहिले.

हजारो स्तोत्रांच्या जड्याबुड्या कुटून, वाटून त्यांच्या प्रार्थनेचे जे वस्त्रगाळ चूर्ण बाहेर पडले त्याचे स्वरूप असे होते.

"हे शंकरा, तू शत्रूंचे निर्दाळण कर."

"तू रूद्र आहेस, मन्युमय आहेस, अखिल सृष्टीत तू संहारक भावाने सन्निविष्ट आहेस. गावात रामाधीन भीखमखेडवी कॉलेजच्या मॅनेजरीची निवडणूक हरला आहे. याने डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशनकडे असा तक्रार अर्ज केला आहे की निवडणूक पिस्तुलाच्या जोरावर झाली आहे. पोलिस अधिकाऱ्यांकडेही त्याने तक्रार केली आहे. तू भांग व धोत्रा खातोस. हे शंकरा, या अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट बुद्धीत तू तुझी भांग व धोत्रा मिसळून तिला आणखी भ्रष्ट करून टाक. त्यांना आमच्या बाजूनं निकाल देण्याची प्रेरणा तू दे. भूतनाथ ! रामाधीन भीखमखेडवीला तू मारून टाक.

"हे त्र्यंबका, सुगंधिमया, पुष्टिवर्धना, देठापासून काकडी जशी खुडली जाते तसं तू मला मृत्यूपासून तोडून दूर कर. परंतु अमृतत्वाशी असणारा माझा संबंध तोडू नकोस. हे शिवा, तू शत्रूला अमृतत्वाच्या देठापासून तोडून मृत्यूच्या अंधकूपात ढकलून दे. तू आपल्या सेवकांचं संकट ते आपलं स्वतःचं संकट मानतोस. मज सेवकाचा सेवक जो सनीचर त्याच्या मार्गातील अडथळे नाहीसे कर. सरपंचाच्या निवडणुकीच्या बाबतीत त्याच्या शत्रूंनी त्याच्या विरूद्ध तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यात सनीचराला तू विजयी बनव. शत्रूंनी अर्ज परत घेतला नाही तर त्यांना मारून टाक."

"हे उमापती, जगत्कारणा, पन्नगभूषण शिवा, को-ऑपरेटिव्ह सुपरव्हायजर रामस्वरूप याचा मुद्दा उपस्थित करून शत्रुगण सोसायटीत अफरातफर झाल्याचा बभ्रा करीत आहेत. त्यात माझाही हात होता, असा शंख ते करताहेत. को-ऑपरेटिव्ह इन्स्पेक्टर नीच, धूर्त व प्रामाणिक आहे. तो आमच्या मुठीत सापडत नाही. गेल्या खेपेस तो मला एकीकडे गाठून भीती दाखवून गेला आहे. तू त्या को-ऑपरेटिव्ह इन्स्पेक्टरला मारून टाक."

"हे रूद्रा दिविलोकातील तुझे अस्त्र वर्षा हे आहे. अंतरिक्षातील तुझे अस्त्र वायू आहे, भूलोकातील तुझे अस्त्र अन्न आहे. शत्रूला तू हवं तर वीज पाडून, वादळ उठवून किंवा गॅस्ट्रोएन्ट्रायीटसच्या साह्यानं - जे कोणतं अस्त्र तुला सोयीचं वाटेल ते वापरून - ठार मारून टाक."

"हे शिवा, हे महेशा, मी तुझं ध्यान करतो. तू परानंदमय आहेस. आपल्या तेजाने तू नभोवकाश व्यापून टाकले आहेस. तू अतींद्रिय आहेस, सूक्ष्म आहेस, अनंत आहेस, अद्य आहेस, निस्संग आहेस, निर्लिप्त आहेस."



"म्हणून हे शिवा, तू शत्रूंचा निःपात कर."

वैद्यजींनी डोळे उघडले तेव्हा त्यांना असे दिसले की भौतिक जग हे आपण डोळे मिटण्यापूर्वी जसे होते तसेच आताही आहे. फरक एवढाच होता की दहा पावलांवर रूप्पनबाबू जोरजोराने ओरडत प्रिन्सिपॉलांशी बोलत होते.

"तुम्ही फारच शेफारला आहात. मला तुम्ही खन्नाचा हस्तक समजता ? मी कुणाही साल्याच्या गटात नाही. मी फक्त खऱ्याचा पाठिराखा आहे. काय समजलात प्रिन्सिपॉल साहेब !"

प्रिन्सिपॉल साहेब मोठेपणाचा आव आणून हसले व म्हणाले, "फार झालं रूप्पनबाबू, आता गप्प बसा."

"अजून तर काहीच झालं नाही, प्रिन्सिपॉल साहेब ! मी तुम्हांला सांगून ठेवतो, तुम्ही जो १०७ कलमाखाली खटला चालवलाय त्यात उद्याच्या उद्या तडजोड झाली पाहिजे. उद्याच्या नंतर जर त्याची तारीख पडली तर याद राखून ठेवा, सगळे 'इस्टूडेंट' 'इनकिलाब झिंदाबाद' करायला लागतील. मग तुमची गटबाजी जागच्या जागी राहील."

"रूप्पन !" वैद्यजींनी जवळ येत कठोर स्वरात म्हटले. परंतु रूप्पनवर वैद्यजींच्या धमकावणीचा काही परिणाम झाला नाही. ते म्हणाले "बाबा, मी त्यावेळी बोललो नाही. पण खन्ना मास्टर आणि प्रिन्सिपॉल साहेब यांचं जेव्हा भांडण जुंपलं तेव्हा मी तिथंच होतो. किंबहुना मीच मध्ये पडून ते थांबवलं. हा १०७ कलमाखालचा खटला साफ खोटा आहे. खन्ना मास्टरांना गुंतविण्यासाठी तो चालू आहे. इस्टूडेंट समाज त्याला मुळीच सपोर्ट करणार नाही."

वैद्यजींनी थंड स्वरात म्हटले, "असू दे, असू दे. घरी गेल्यावर आपण यासंबंधी विचार करू."

प्रिन्सिपॉल साहेबांना अचानक काय झाले कोण जाणे. ते एकदम ओरडून म्हणाले, "तुम्ही सावकाश विचार करा. महाराज ! पण रूप्पननी इथं भर बाजारात माझी बेअब्रू केलीय. खन्नाची बाजू घेऊन त्यांनी मला नाही नाही ते बोलून घेतलं. मिसेस खन्नानं यांची बुद्धी भ्रष्ट करून टाकलीय. पडद्यामागे काय - काय चाललंय, ते मी कसं सांगू ?"

वैद्यजी गंभीरपणे म्हणाले, "ते सांगायची जरूर नाही. मला सारं ठाऊक आहे."

ते निघाले. परंतु रूप्पनबाबूंनी त्यांना अडवून म्हटले, "बाबा, आता या गोष्टीचा इथंच निकाल लागला पाहिजे. बोला, तुम्हांला काय ठाऊक आहे ? बोला, बोला. मिसेस खन्नांना या चर्चेत कशाला ओढलंत ?"

वैद्यजी थांबले. त्यांनी नाटकी ढंगाने प्रिन्सिपॉलांकडे पाहिले. त्या नजरेने

प्रिन्सिपॉलना जिंकून घेतले. नंतर त्याच ढंगात त्यांनी रूप्पनबाबूंकडे पाहिले. एखादा लेचापेचा माणूस असता तर तो त्या नजरेमुळे तेथेच कोसळला असता. पण रूप्पनबाबू असल्या बाबतीत आपल्या बापाचेही बाप होते. ते खवळून म्हणाले, ''बोला ना, थांबलात का ?''

वैद्यजी एक उसासा टाकून म्हणाले, ''रूप्पन, तू अकस्मात आपल्या गुरूचा द्रोह का करू लागला आहेस आणि खन्ना मास्टर तुझे एवढे जानी दोस्त का बनले आहेत, ते मी जाणतो. स्पष्ट सांगायचं तर तुझं त्यांच्याकडे जाणंयेणं मला योग्य वाटत नाही.''

रूप्पनबाबू थोडा वेळ स्तब्ध उभे राहिले. नंतर त्यांनी गळ्याला बांधलेला रूमाल आवळला. हातात थैली उचलून घेत ते म्हणाले, ''कळलं. तुम्हांला माझ्या चारित्र्याविषयी शंका वाटू लागलीय. सारं काही कळलं मला.'' आणि बोट नाचवीत भविष्यवाणीच्या आविर्भावात ते म्हणाले, ''याच प्रिन्सिपॉल साहेबांनी तुमचे कान भरले आहेत. मला माहीत आहे. याचा परिणाम चांगला होणार नाही.''

त्यांनी अचानक रोखून पाहात म्हटले, ''आणि बद्री दादा ? गावभर त्यांची छिः थूः होऊन राहिलीय. ते बेलाशी लग्न करणार आहेत म्हणे. त्यांना काही बोलायची हिंमत होत नाही ? त्यांच्या चारित्र्याविषयी —''

प्रिन्सिपॉलनी ओळखले की आता वीज कोसळणार. आपल्या थोरल्या मुलाच्या बदचालीची तक्रार ऐकून वैद्यजी मूर्च्छा येऊन फूटपाथवर कोसळण्यापूर्वी प्रिन्सिपॉलांनी रूप्पनबाबूंना अडवीत म्हटले, ''काय बरळताय हे तुम्ही रूप्पनबाबू ? जरा शुद्धीवर येऊन बोला. ''आणि वैद्यजींना ते म्हणाले, ''जाऊ द्या महाराज. रूप्पनबाबू अजून पोर आहेत. कुठं काही तरी ऐकलं असेल तेच भकत सुटलेत.''

परंतु वैद्यजींना प्रिन्सिपॉलांकडून या सारवासारवीची किंवा सांत्वनाची मुळीच गरज नव्हती. रूप्पनबाबूंचा आवेश ते शांतपणे व गंभीरपणे झेलत होते. त्यांच्या मिशा दोन-तीनदा थरथरल्या. याखेरीज त्यांच्या चेहऱ्यावर कसलाही बदल दिसून आला नाही. रूप्पनबाबू जोरजोरात बद्रींच्या प्रेमप्रकरणाची निर्भत्सना करू लागले. प्रथम ते त्याच्या इतिहासात शिरले. त्यानंतर त्यांनी त्या प्रश्नाच्या तात्कालिक परिस्थितीशी संबंधित काही तथ्ये व आकडे प्रस्तुत केले. अखेर त्यांनी सगळे काही पाहात असून पाहात नसल्यासारखे वागण्याच्या वैद्यजींच्या म्याड व पक्षपातपूर्ण धोरणाचा निषेध केला. आपल्या व बद्रीदादांच्या बाबतीत वैद्यजी दोन वेगळ्या प्रकारचे मानदंड लागू



करू पाहात असल्याचे आणि ते लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत असल्याचे त्यांनी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. भाषण संपवितांना त्यांचा चेहरा लालबुंद झाला, त्यांच्या तोंडाला फेस आला आणि त्यांचे डोळे मिचमिचू लागले.

सांत्वनाचे शब्द येथे निरर्थक आहेत, हे ओळखून खजील झालेल्या फळविक्रेत्याप्रमाणे प्रिन्सिपॉल साहेब आपला माल आपल्या पिशवीत भरून आधीच मोकळे झाले होते. वैद्यजींवर कसलीच प्रतिक्रिया होत नाही हे पाहून रूप्पनबाबूही थंड पडले आणि काही तरी युक्ती काढून तेथून सटकण्याचा विचार करू लागले. वैद्यजींनी त्यांचे सगळे व्याख्यान शांतपणे ऐकून घेतले होते - जणू ती रूप्पनबाबूंची बेताल बडबड नसून ते भगवद्‌गीतेतील समत्वयोगाचे सार होते आणि ते त्यांना फूटपाथवर मोठ्या प्रेमाने पाजण्यात येत होते. रूप्पनबाबू गप्प बसल्यानंतर त्यांनी प्रिन्सिपॉल साहेबांना म्हटले, ''चला, आपण स्टेशनवर जाऊ. गाडीची वेळ होत आलीय.''

आपल्या वडिलांचा तो शांतपणा पाहून रूप्पनबाबू गडबडले होते. त्यांनी चाचरत, अडखळत म्हटले, ''मी जरा थांबणार आहे. रात्रीच्या गाडीनं येईन.'' पण त्यांच्या त्या बोलण्याकडे कोणी लक्ष दिले नाही. वातावरणातील ताण कमी करण्याच्या उद्देशाने त्या विषयासंबंधी थंडपणे काहीतरी बोलावे म्हणून प्रिन्सिपॉल साहेब म्हणाले, ''बद्री पहिलवानांविषयी —''

वैद्यजींनी त्यांना हाताच्या खुणेनेच थांबविले. नंतर ते सहजपणे म्हणाले, ''काही सांगायची जरूर नाही. माझा निर्णय होऊन चुकलाय.''

रूप्पनबाबूंना उत्सुकतेने गदागदा हलविले, परंतु आपल्याला त्यात काही स्वारस्य नाही हे दाखविण्यासाठी ते थोड्या अंतरावर उभे राहून रस्त्यावरील रहदारी पाहू लागले. ज्यांना ऐकण्याची इच्छा नाही त्यांना ऐकू जावे एवढ्या मोठ्या आवाजात वैद्यजी म्हणाले, ''मी इतका बुरसटलेला, सनातनी नाही. गांधीजी आंतरजातीय विवाहांचे पुरस्कर्ते होते. मीही तसाच आहे. बद्री आणि बेला यांचे लग्न सर्व प्रकारे आदर्श समजले जाईल. परंतु गयादीनची प्रतिक्रिया काय आहे ते कळत नाही. पाहू नंतर.''

एवढे बोलून त्यांनी रूप्पनबाबूंकडे पाहिले. रूप्पनबाबूंना त्यांच्या डोळ्याला डोळा भिडविण्याची हिम्मत झाली नाही. ते तोंडातल्या तोंडात पुटपुटले, ''मी जातो.''

# २४

दुपार टळून चालली होती आणि घरात ओसरीवर वैद्यजी व बद्री पहिलवान यांच्या खेरीज कोणीही नव्हते. घराचा हा पुरूषी भाग होता. तेथे बायका फार क्वचित् येत. स्तब्धता पसरली होती. रूप्पनबाबू ओसरीजवळच्या खोलीत गप्प पडून होते. आज कॉलेजला सुटी होती, आणि आधल्या रात्री ते बराच वेळपर्यंत जागे होते. त्यामुळे पुष्कळ झोप झाल्यानंतरही ते पुनः झोपण्याचा प्रयत्न करीत होते. एवढ्यात त्यांना आपल्या वडिलांचा शास्त्रीय आवाज ऐकू आला, ''तू इतका नीच असशील अशी मला कल्पना नव्हती.''

ज्या कानावर असे वाक्य पडल्यानंतर तो एकदम टवकारला गेला नाही तर तो कुत्र्याच्या शेपटीपेक्षाही क्षुद्र आहे, असे म्हटले पाहिजे. रूप्पनबाबूंनी कान टवकारले आणि हळूच डोकावून पाहिले. वैद्यजी पलंगावर मांडी ठोकून बसले होते आणि बद्री पहिलवान जवळच चौथऱ्यावर चवड्यांवर बसले होते. त्या दोघांमध्ये आधी कसलीही घोषणा न होता, अगदी अनौपचारिक वातावरणात युद्ध जुंपले होते. वातावरण इतके घरगुती होते की रूप्पनबाबूंनी वैद्यजींचे ते वाक्य ऐकले नसते तर त्यांना असेच वाटले असते की आपले ज्येष्ठ बंधू व पिताजी एकांतात, 'को-ऑपरेटिव्ह सोसायटीत आणखी एका नवीन अफरातफरीची आवश्यकता' या सारख्या सामुदायिक महत्त्वाच्या विषयावर प्रारंभिक विचार विनिमय करीत असावेत.

असो. रूप्पनबाबूंनी ते वाक्य ऐकले आणि त्याच सपाट्यात वैद्यजींच्या तोंडून लगेच दुसरे एक वाक्य त्यांच्या कानांवर पडले, ''तू मूर्खही आहेस, अशी मी कल्पनाही करू शकलो नसतो.''

बद्री पहिलवानांनी बेपर्वाईने, एक जांभई दिल्यासारखे करीत म्हटले, ''घरात शिवीगाळी करून काय फायदा ? हे काही बरं नव्हे.''

या व्यावहारिक सल्ल्याचा वैद्यजींवर बहुदा योग्य परिणाम झाला असावा. त्यांनी सोहराब मोदीवाली शैली बदलली. सामान्य संभाषणाच्या थाटात ते म्हणाले, ''आणि तू जे काही केलं आहेस ते बरं आहे वाटतं ? त्याचा काय परिणाम होईल याचा तरी तू विचार केला आहेस काय ? त्यामुळं माझ्या आत्म्याला किती दुःख झालंय, याची तुला कल्पना आहे ?''

बद्री पहिलवानांनी आज सकाळी बहुदा भांग घेतली नसावी. भांग न पिणाऱ्यांना भांग प्याल्याने जांभया येतात आणि भांग पिणाऱ्यांना भांग न प्याल्याने जांभया येतात, हा एक भौतिक सिद्धांत आहे. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर जांभईची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली. आपल्या खांद्यावर बसलेल्या डासाला त्यांनी दुसऱ्या हाताच्या एका



नाजुक फटक्याने उडवून लावले. पण तो डासच असा विचित्र की तो उडून जाण्याऐवजी मरून गेला. एवढा सारा कार्यक्रम पार पाडल्यानंतर त्यांनी वैद्यजींच्या आक्षेपांना उत्तर दिले. ते म्हणाले, ''यात दुःख करण्यासारखं काय आहे ? तुम्हांला कसला त्रास होतोय ते सांगा, तो दूर करून टाकू.''

वैद्यजींनी आवाज खालच्या पट्टीत आणून म्हटले, ''तू एवढा समजूतदार असून गयादीनच्या मुलीच्या फंदात कसा अडकलास ?''

बद्री पहिलवान थोडा वेळ गप्प बसले. नंतर म्हणाले, ''तुमच्याशी या बाबतीत बोलणं व्यर्थ आहे.'' एवढे बोलून त्यांनी खुंटीवरील सदरा काढून खांद्यावर टाकला आणि ते दाराकडे निघाले. वैद्यजी म्हणाले, ''आता पळून कुठं चाललास ?''

''कोण पळून चाललंय ? काही मुद्दा असला तर बोलण्यात फायदा ! घरातही असंबद्ध बडबड सुरू झाली की मग आटोपलाच सारा कारभार.''

वैद्यजींनी आवाजाचा गियर बदलून म्हटले, ''पण या विषयावर केव्हा ना केव्हा बोलणं हे करावंच लागेल.''

बद्री पहिलवानांनी आपल्या पायांना ब्रेक लावले आणि तेथूनच म्हटले, ''यावेळी तुमच्या तोंडून वेडेवाकडे शब्द बाहेर पडताहेत. हे सारं काही ठीक नाही. पुनः कधी तरी बोलू.''

''पुनः कधी ? माझं नाक कापलं गेल्यावर ?''

बद्री पहिलवान नाइलाजाने परत फिरले. खांद्यावर सदरा तसाच ठेवून ते पुनः चौथऱ्यावर, चवड्यांवर बसले आणि म्हणाले, ''नाका - बिकाच्या गोष्टी काढू नका. नाक शिल्लक आहेच कुठं ? ते तर पंडित अजुध्या परसादांच्या काळातच कापलं गेलंय.''

वैद्यजी म्हणाले, ''आता तू हलकटासारखं बोलायला लागलास.''

बद्री पहिलवान चवड्यांच्या स्प्रिंगांवर झोके घेऊ लागले. त्यांच्या आवाजाचा सायलेन्सर मोडून पडला. घोगऱ्या आवाजात ते म्हणाले, ''बोलू लागलोय तर आता बोलूच द्या. तुम्ही म्हणता की मी बेलाच्या जाळ्यात अडकलोय. तुम्ही आमचे बाप आहात. तुम्हांला कसं समजावून सांगायचं ?'' अडकणं - अडकवणं हे फालतू लोकांचं काम आहे. तुमच्या घराण्यात तुमचे आजोबा अजुध्यापरसाद रघुबराच्या बायकोच्या जाळ्यात अडकले होते. याला म्हणतात अडकणं. होय. नाही तर काय ?'' थोडा वेळ थांबून ते घाईघाईने म्हणाले, ''असो. आता त्याची चर्चा करून काय फायदा ?''

वैद्यजींनीही आपल्या आवाजाचा ॲक्सिलेटर दाबला. ते म्हणाले, ''तुमचं घराणं, तुमचे आजोबा, अशी भाषा तू बोलतो आहेस. हे घराणं माझंच आहे ? तुझं नाही ?

ते लोक तुझे पूर्वज नव्हेत ?''

जणू चौकातील लाल दिवा पाहाताच गाडी थांबावी त्याप्रमाणे बद्रीची गाडी एकदम थबकली. ते थांबून म्हणाले, ''अखेर तेच झालं ना ? एक खरी गोष्ट सुनावली तर तुम्ही लगेच भडकलात. असो. जाऊ द्या झालं.''

क्लच व ॲक्सिलेटर एकदमच दाबून एखादा नवशिक्या गाडी चालविण्याचा प्रयत्न करीत असावा त्याप्रमाणे वैद्यजी म्हणाले, ''नाही, बद्री, मी असा सोडणार नाही तुला. आज या गोष्टीचा निकाल लागलाच पाहिजे. आपण ब्राम्हण आहोत, ती वैश्य आहे. परंतु हा केवळ जातीचा प्रश्न नाही, तत्त्वाचा प्रश्न आहे. असल्या चारित्र्याच्या मुलीशी — छोटूनं कोर्टात काय सांगितलं होतं ?....''

बद्री पहिलवान उठून उभे राहिले. ते म्हणाले, ''बस्स. आता बोलणं बंद. मी माझ्या बाजूनं एक गोष्ट सांगून बोलणं बंद करतो. मी बाबा अजुध्यापरसादांच्या मार्गानं जाणारा नव्हे. जे काही करीन ते पद्धतशीर, नियमाप्रमाणं करीन. उगीच इकडची - तिकडची बडबड मला पसंत नाही.''

ते दाराकडे जाऊ लागले. अचानक वैद्यजी पलंगावरून उठून उभे राहिले; आणि जटा - जूट, दाढी - मिशा, कमंडलू - कौपीन नसलेल्या, शाप देणाऱ्या ऋषीच्या पोजमध्ये ताठ उभे राहून, दुप्पट शक्तीचा हॉर्न वाजविल्याप्रमाणे ओरडले, ''नीचा ! तर मग माझंही म्हणणं ऐक ——''

रूप्पनबाबू हे संभाषण आश्चर्याने ऐकत होते. काही दिवसांपूर्वी शहरामध्ये वैद्यजींच्या बोलण्यावरून त्यांचा असा समज झाला होता की बेलाचे लग्न बद्रींशी होण्यास ते विरोध करणार नाहीत, जर काही आडकाठी आलीच तर ती गयादीनांच्या बाजूने येईल आणि तीही दूर केली जाईल. परंतु या संभाषणावरून त्यांच्या लक्षात आले की आपण ज्याला संघर्षाचा शेवट समजत होतो तो तर वस्तुतः आरंभच आहे.

ते स्वतःला थोपवू शकले नाहीत. लगबगीने बाहेर येत ते आपली शांतिदूताची भूमिका बजावू लागले. ते म्हणाले, ''पिताजी, आता काही बोलण्यापासून काय फायदा ? काल तुम्ही प्रिन्सिपॉलना जे सांगितलं होतं तेच करा. सगळीकडे तेच सांगत सुटा. आम्ही सुद्धा असंच सांगत फिरणार की आम्ही जात - पात मानत नाही. बद्री दादा बेलाच्या जाळ्यात अडकलेच आहेत तर ——''

रूप्पनचे वाक्य पुरे झाले नाही. आपली मान मोडून पडते आहे, असा त्यांना भास झाला. हे रोजचेच होते. बद्री पहिलवान रोज कुणा ना कुणाच्या मानेवर हात टाकतच



असत. आज त्यांनी रूप्पनचीच मान पकडली. पण रूप्पनचे डोळे एका सेकंदात अंगणाच्या दहा फेऱ्या मारून आत्मलीन झाले. बद्री दात ओठ खात म्हणत होते, ''तू घरात सुद्धा नेतागिरी करणार की काय ? मी तिच्या जाळ्यात अडकलो, असं म्हणायची हिम्मत तू करतोस ? आणि तेही माझ्या तोंडावर ? पाप्याचं पितर कुठलं!''

रूप्पनची मान गदगदा हलवून त्यांनी एखादा मेलेला उंदीर फेकून द्यावा तसे त्यांना अंगणात ढकलून दिले. रूप्पनबाबूंची अशी काही गाळण उडाली होती की अशा प्रकारे मिळालेली 'पाप्याचं पितर' ही पदवी स्वीकार करावी की परत देऊन टाकावी, हे देखील त्यांना ठरविता आले नाही. तिकडे बद्री पहिलवान वैद्यजींना सांगत होते. ''याला म्हणतात स्वयंभू पुढारी. खुद्द यानं तिला दोन पानांचं पत्र पाठवलं होतं. काय - काय भरकटलं होतं कोण जाणे. स्वतः अडकला होता आणि मी अडकलोय म्हणून सांगतोय.''

रूप्पनबाबू पडता पडता सावरले होते. ते कुर्ऱ्यात म्हणाले, ''या बाबतीत तुमच्याशी बोलण्याइतका मी क्षुद्र नाही.'' आणि ते वैद्यजींना म्हणाले, ''पिताजी, आता यांच्याशी काही बोलण्यात अर्थ नाही. यांना जे करायचं असेल ते करू द्या.''

परंतु यावेळी वैद्यजी सल्ला घेण्याच्या नव्हे तर देण्याच्या मनःस्थितीत होते. ते कठोर आवाजात म्हणाले, ''ते कसंही असो; रूप्पन ! हा तुझा विषय नव्हे. माझी तुम्हा सर्वांविरूद्धच तक्रार आहे. तुझ्या चारित्र्याचीही मला माहिती आहे.'' रूप्पनबाबूंना त्वेष आला. ''अस्सं !'' त्यांनी आपली मान वर करून छाती काढून उत्तर दिले, ''तर मग मलाही तुमच्या चारित्र्याची बित्तंबातमी आहे.''

युद्धाचे हे शेवटचे दृश्य होते. बद्री पहिलवान खवचटपणे आपल्या वडिलांना म्हणाले, ''ऐकलंत ?''

रूप्पनबाबू तरातरा बाहेर निघून गेले. वैद्यजी पलंगाजवळ स्तब्ध उभे राहिले. अशा प्रसंगी फिल्मी हीरोच्या बापाप्रमाणे ते हंबरडा फोडून रडले नाहीत. आपल्या भ्रष्टाचाराच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी एखादे कमिशन नेमण्याची सूचना मिळताच एखादा मोठा पुढारी ज्याप्रमाणे असे पत्रक काढतो की आधी भ्रष्टाचाराची सर्वमान्य व्याख्या निश्चित करण्यात आली पाहिजे, त्याप्रमाणे त्यांनी काही वक्तव्य दिले नाही. आपल्या पुस्तकांवरील प्रतिकूल अभिप्राय पाहून, टेक्स्ट बुक कमेटीच्या कृपेने लक्षाधीश बनलेल्या एखाद्या साहित्यिकाप्रमाणे ते तुच्छपणे हसले नाहीत. आपल्या चारित्र्याविषयी एवढे भयंकर उद्गार ऐकल्यावरही त्यांनी असे काही केले नाही. ते गप्प उभे राहिले. त्यांच्या व्यवसायातील सर्वात सोपे कार्यही त्यांनी केले नाही. - आपल्या तोंडातून 'हे राम' असे शब्द सुद्धा बाहेर काढले नाहीत.

दुपार उतरतीला लागली होती. एका हलवायाच्या दुकानात एक हलवाई बसला होता. तो दूरूनच हलवायासारखा दिसत होता. दुकानाच्या खाली एक पुढारी उभा होता. तो दुरूनच पुढाऱ्यासारखा दिसत होता. तेथेच सायकलीचे हँडल धरून एक पोलिस शिपाई उभा होता. तो दुरूनच पोलिस असल्यासारखा दिसत होता. दुकानातील मिठाया शिळ्या व भेसळयुक्त पदार्थांपासून बनविल्या असाव्यात असे वाटत होते आणि तशाच त्या होत्याही. दूध पाणीदार आणि आरारूट मिसळून दाट बनविल्यासारखे दिसत होते आणि ते तसेच होते ही. पृथ्वीवरील स्वर्गाचा हा असा एक कोपरा होता की ज्या ठिकाणी सारी वास्तविकता नजरेसमोर स्पष्ट दिसत होती. काहीही लपलेले नव्हते अथवा लपविण्याची जरूरही कोणाला वाटत नव्हती.

दुकानात जिलबी, पेढे व लाडू होते. त्यांच्याच शेजारी काचेच्या लहान - लहान खोक्यांत वाळलेल्या लाकडांच्या तुकड्यांसारखे काही पदार्थ होते. बिस्किटे, केक पेस्ट्री इत्यादींच्या परंपरेतील ते काही स्थानिक पदार्थ होते. शहरांप्रमाणेच येथेही हे पदार्थ असे दाखवून देत होते की पूर्व पूर्व आहे आणि पश्चिम पश्चिम आहे आणि त्या दोहोंचे मीलन मिठायांच्या द्वारे शिवपालगंजात होते.

त्याच ठिकाणी रूप्पनबाबू व लंगडा यांचीही भेट झाली.

पहिल्या वर्गातील प्रवाशाने तिसऱ्या वर्गातून प्रवास करणाऱ्या एखाद्या माणसाकडे तो तिकिटाशिवाय प्रवास करीत असावा अशा संशयाने पाहावे, तसे रूप्पनबाबू लंगड्याकडे पाहात होते. परंतु आज रूप्पनबाबू अशा काही उदास मनःस्थितीत होते की ज्यावेळी विश्वमैत्री वगैरे पंचशीलाचे सारे सिद्धांत सहज अमलात आणता येतात. म्हणून त्यांनी पडेल आवाजात विचारले, ''काय रे बाबा, तुझ्या प्रकरणाचं कुठवर आलंय ?''

''आज तर सुट्टी आहे, बापू. काही समजलं नाही. खरं म्हणजे आता नक्कल तयार झाली असेल.'' लंगड्याने यापूर्वीची प्रगती सांगण्यास सुरूवात केली. ''खरं म्हणजे ती तेव्हाच तयार झाली होती. पण मी घ्यायला जाऊ शकलो नाही. मला मुदतीचा ताप आला होता. त्या दिवशी जिल्हा कचेरीत मी खाली पडलो तो पुनः उठलोच नाही. मग विचार केला, मरायचंच असेल तर आपल्या गावात जाऊन मरावं. गावाकडचेच एक ठाकूर तिथं आले होते. ते मला बरोबर घेऊन गेले. तिथं लोकांनी सांगितलं की विषमज्वर आहे.''

''पण एके दिवशी गावात अनेक माणसं मोटारीतून आली. संबंध गावभर भिंतीवर कावेनं इंग्रजीत कायबाय लिहून गेले. त्यानंतर बापू, त्यांनी माझं रक्त काढलं आणि ते यंत्रात घालून पाहिलं. आता काय चमत्कार आहे बघा बापू, मी देशी माणूस पण मला आजार जडला विलायती. कलियुगातलं आश्चर्यच म्हणायचं. मोटारीतनं आलेली



माणसं म्हणाली,'' लंगडा थोर पुरूष आहे. त्याला मलेरिया जडलाय.

''काय सांगावं बापू, त्यानंतर मोटारवाल्यांनी गावात फार मोठं काम केलं. दोन-तीन माणसं एक एक मशीन घेऊन सगळीकडच्या विहिरी, आड, तलाव, डबकी यांच्यावर किर्र-किर्र करीत फिरले. दोन इसम प्रत्येक घरासमोर जाऊन कावेनं मलेरिया महाराणीची स्तुती इंग्रजीत लिहीत गेले. त्या अक्षरांचा प्रताप बापू, की सारे डास पळून गेले. आम्हीही बापू, महिनाभर दुःख भोगून तुमचं दर्शन घेण्यासाठी पुनः उठून उभे राहिलो.''

नेता उद्गारला, ''लंगडेबाबा, काय मुद्याची गोष्ट सांगितलीस तू :-

लिखे देख अंगरेजी अच्छर
भागे मलेरिया के मच्छर !''

हलवायाने पुढाऱ्याची तारीफ करीत म्हटले, ''वाहवा, काय छान कविता रचलीय तुम्ही. त्याबद्दल ही घ्या जिलबी.''

पुढाऱ्याने मुळीच संकोच न करिता माशा उडवून परातीतून चारपाच जिलब्या उचलल्या आणि तो त्या खाऊ लागला. तिकडे शिपाई लंगड्याला म्हणाला, ''म्हणजे मरता-मरता वाचलांस, असंच म्हण की.''

''ते ठीक आहे बापू, पण मी मरणार नाही, हे मी पक्कं जाणून होतो. देवाच्या दरबारात असा अन्याय होणं शक्य नाही. जोपर्यंत मला तालुका कचेरीतून नक्कल मिळत नाही तोपर्यंत मी मुळीच मरणार नाही.''

कोण जाणे किती कबीर, तुलसीदास, रैदास यांनी येऊन लंगड्याच्या सुरात सूर मिळविण्यास सुरूवात केली. तो म्हणाला, ''नक्कल पाहिल्याशिवाय माझे प्राण जायचे नाहीत. मी सत्याची लढाई लढतो आहे.''

शिपाई म्हणाला, ''साल्या तू अगदीच गावंढळ आहेस. दोन रूपयांपायी सारं आयुष्य बरबाद करून राहिला आहेस. देऊन का टाकत काहीस दोन रूपड्या ?''

लंगडा मान हलवून म्हणाला, ''तुला ते कळायचं नाही, बापू ! ही सत्याची लढाई आहे.''

रूप्पनबाबूने विषय बदलण्यासाठी विचारले, ''अरे पण, सध्या काय स्थिती आहे ?''

लंगड्याने सांगितले, ''उद्या-परवापर्यंत मिळून जाईल. आतापासूनच तालुका कचेरीसमोर तळ ठोकतो.''

पुढारी म्हणाला, ''तिथंच झोपडी बांधून घे. म्हणजे धावपळ थांबेल.''

रूप्पनबाबू बाकावर बसल्या बसल्या थोडावेळ पायाच्या पिंड्या झटकत राहिले. नंतर हलवायाला म्हणाले, ''एक कुल्हड (मातीचा पेला) भर दूध दे.'' आणि थोडा

वेळ विचार करून म्हणाले, ''एक कुल्हड लंगड्यालाही दे.''

लंगड्याबरोबर दूध पिऊन रूप्पनबाबू उठणार इतक्यात नेता म्हणाला, ''मग कशी काय वाटते ही कल्पना, लंगडेबाबा ? तिथंच तालुका कचेरीसमोर झोपडी टाकावी.''

लंगड्याने वैष्णवजनवाल्या शैलीत हसून असे दर्शविले की नेता मूर्ख आहे आणि आपण नम्र आहोत.

नेता म्हणाला, ''काही दिवसांनी अन्नसत्याग्रह सुरू कर. छान होईल. पेपरात नाव छापून येईल. नक्कल मिळो किंवा न मिळो, प्रसिद्धी तर मिळेल. विचार कर यावर, लंगडेबाबा.

रूप्पनबाबू यावेळी ज्या मनःस्थितीत होते त्या स्थितीत त्यांना नेत्याने केलेला हा विनोद आवडला नाही. अचानक त्यांना असे वाटले की हा गृहस्थ 'लंगडेबाबा' म्हणून लंगड्याची टिंगल करतो आहे. आणि आपण सगळेही त्याला लंगडाच म्हणतो. हे तरी काय ? त्याचे खरे नाव काय ?

हा विचार मनात येताच विचाराच्या धरणाची दारे सरकली. रूप्पनबाबूंना अचानक अनेक नावे आठवली. लंगड्याला तेथे 'लंगड' असे म्हणत. एक आंधळा त्यांच्या दारात येई. त्याला लोक 'सूरे' (सुरदास) म्हणत. ज्याचे कान कुस्ती खेळतांना तुटले असतील त्याला 'टुट्टे' असे नाव मिळे. वैद्यजींच्या पेशंटांपैकी एकजण तिरळा होता. तो दिसताच ते म्हणत, ''काय शुक्राचार्य, काय हालहवाल आहे ?'' एक म्हातारा होता. त्याचा 'बहिरेबुवा' या नावाने आदर केला जाई. ज्याच्या तोंडावर देवीचे वण असतील त्याला शिवपालगंजमध्ये 'छत्ताप्रसाद' म्हणत. (मधमाशांच्या पोवळ्याला छत्ता म्हणतात). सहा बोटे असणाऱ्यांना छांगुराम (छः उंगलीयाँ) हे नाव हमखास मिळावयाचेच.

अपंग व व्यंगयुक्त लोकांविषयी हेच आपले परंपरागत प्रेम आहे. हीच गोष्ट रूप्पनबाबूंच्या मनात या शब्दांत व्यक्त झाली : ''हा जर पुनः याला लंगडेबाबा म्हणाला तर मी याची चांगली खेटरपूजा करीन.'' त्याच आवेशात ते रागारागाने म्हणाले, ''ए ऐंचाताना (तिरळा) परशाद, तू याला लंगडा का म्हणतोस ? त्याच्या खऱ्या नावानं का हाक मारत नाहीस ?''

नेत्याने लंगड्याकडे वळून विचारले, ''तुझं खरं नाव काय रे ?''

''आता तर सगळे लंगड्या म्हणूनच हाक मारतात, बापू.'' त्याने विचार करून उत्तर दिले, ''तसं आईबापांनी ठेवलेलं मूळ नाव लंगडपरशाद आहे.''



सगळी यंत्रे नादुरूस्त होऊन पडली आहेत. सगळीकडे काही ना काही गोंधळ आहे. ओळखीचे सारे लोक चोरटे आहेत. रस्त्यांवर फक्त कुत्री, मांजरे व डुकरे फिरत आहेत. वारा फक्त धुरळा उडविण्यासाठी वाहातो आहे. आकाशाला कसलाच रंग नाही. त्याचे निळेपण ही शुद्ध फसवणूक आहे. बेवकूफ लोक बेवकूफ बनविण्यासाठी बेवकूफांच्या मदतीने बेवकूफांच्या विरूद्ध बेवकुफी करीत आहेत. घाबरण्याची, घाईघाईने आत्महत्या करण्याची काही जरूर नाही. बेइमान आणि बेइमानी पूर्णपणे सुरक्षित आहेत. आजचा दिवस अठ्ठेचाळीस तासांचा आहे.

ते एका घनदाट आंबराईजवळून चालले होते. चैत्राचा महिना होता. बहुतेक सर्व पिकांची कापणी झाली होती. बागेत खळे करण्यात आले होते. रिकाम्या झालेल्या शेतांत शेकडो गायी - म्हशी मजेत फिरत होत्या आणि जवळपासच्या ज्या शेतातील पिके अजून उभी होती त्या शेतांत घुसून आरामात चरत होत्या. गुराखी मंडळी बागेतील कापलेल्या पिकांच्या ढिगांमागे लपून जुगार खेळत होती. काही गुराखी तर उघडउघड जमिनीवर जुगाराचा डाव मांडून बसले होते. कवड्यांच्या साह्याने जुगार खेळला जात होता आणि सर्वजण या तत्वाला धरून चालले होते की या जगात येऊन जेवढे काही लुटता येईल तेवढे लुटावे कारण शेवटी जेव्हा प्राण निघून जातील तेव्हा पश्चात्ताप करण्याची पाळी येऊ नये जे लोक या खेळात हरले होते ते प्राण निघून जाण्याची वाट न पाहाताच पस्तावू लागले होते आणि जुगाऱ्यांच्या अड्ड्यांपासून दूर बसून चरस पीत होते. गुराख्यांमध्ये फक्त दोन - तीन सीनियर लोक होते, बाकी सगळे ज्यांना जाहीर सभांतून देशाचे भावी गांधी, नेहरू, टागोर व सी. व्ही. रमण म्हणून संबोधले जाते असे कोवळे तरूण होते.

जुगाऱ्यांचे अड्डे बसलेले पाहून रूप्पनबाबू फिरत - फिरत त्याच बाजूला वळले. परंतु आजच्या मनःस्थितीत गो-- चारण - लीलावाले ते वातावरण - ज्यामध्ये गुरे दुर्बळ शेतकऱ्यांच्या पिकांत घुसून चरत होती आणि आपली गुरे योग्य ठिकाणी जाऊन पोचली आहेत हे पाहून गुराखी एकाग्र चित्ताने जुगार खेळत होते असे ते वातावरण - त्यांना फारसे आकर्षक वाटले नाही. जेव्हा सगळे जुगारी आपापल्या जागेवरून उठून त्यांच्या स्वागतासाठी उभे राहिले तेव्हा त्यांनी शाळामास्तराच्या थाटात त्यांना सांगितले, ''बसा, बसा. आपापलं काम करा.''

ते थोडा वेळ उभ्या उभ्याच जुगाराच्या प्रगतीचे निरीक्षण करीत राहिले. अकरा वर्षे वयाच्या एका मुलाने त्यांच्याकडे पाहून तोंडातून चरसाचा धूर काढण्यास सुरूवात केली. तो धूर इतका वेळ बाहेर काढत राहिला की रूप्पनबाबूंनी तो संपण्याची आशा सोडून दिली आणि ते पुढे चालू लागले. मागून जुगारी - वृंदाने त्यांच्या चरणस्पर्शाचे कोरसगीत गायिले. परंतु त्यांना आशीर्वाद देण्यासाठीही त्यांनी मागे वळून पाहिले

नाही. ते पुढेच चालत राहिले. थोड्या अंतरावर गेल्यावर ते ओरडले, ''अरे हरामखोरानो, ही गुरं तुम्ही पिकांत का सोडली आहेत ? कुणाची आहेत ही गुरं ?''

''आमची नाहीत !''

''आमची नाहीत !''

''आमचीही नाहीत !''

''आमची गुरं तिकडे आहेत ती. . . . .''

''कोण जाणे कुणाची आहेत.''

पिकांत चरणाऱ्या गुरांविषयींची ही ठरीव ठशाची उत्तरे ऐकून रूप्पनबाबू थांबले, आणि ओरडून म्हणाले, ''जोडे खावे लागतील.''

ही भविष्यवाणी ऐकून गुराख्यांनी आपली गुरे काही पिकांतून बाहेर काढली नाहीत, परंतु त्यांनी असा निष्कर्ष काढला की आज रूप्पन भैय्या बरेच गरम झालेले दिसतात. एवढ्यात रूप्पनने आपल्या धमकीचा पुनरूच्चार केला, ''अरे ऐकू येत नाही काय ? जोडे खावे लागतील.'' यावर एक गुराखी 'ही गुरं आमची नाहीत, तरीपण बाहेर काढतो त्यांना, हा नेहमीचा राग आळवीत गुरांना हाकलण्यासाठी आणि त्याच क्रमाने त्यांना दुसऱ्या एका नव्या शेतात चरण्याची संधी देण्यासाठी त्या बाजूला गेला.

ते एका गल्लीतून निघाले. त्या गल्लीचे वैशिष्ट्य असे होते की एखाद्या बहुउद्देशी प्रकल्पाखाली तिची उभारणी झालेली नसली तरी ती स्वतःच आपल्या बहुउद्देशी प्रकल्पांचे अंग बनली होती. ती गल्ली होती, तशीच मोऱ्यांतील पाणी हजारो धारांनी वाहून नेणारी गटारगंगाही होती. गटारातून वाहणारी घाण कुजवून तिला खताचे रूप देणारा तो डेपोही होता. त्याचबरोबर आसपास ग्रामपंचायतीचा एकही दिवा नसल्यामुळे अंधारात प्रेमातुर युगुलांनी सामुदायिकपणे भेटण्याचे मीलनकेंद्र म्हणूनही त्या गल्लीचा वापर होत असे. सारांश, केवळ आपल्या नुसत्या अस्तित्वामुळेच ती ग्रामसुधारणेची एक उत्तमपैकी योजना होती.

रूप्पनबाबू नाक न मुरडता गल्लीच्या दुसऱ्या टोकाला जाऊन पोचले. तेथून जवळच एक मैदान, नंतर तालुका कचेरी आणि पोलिस चौकी यांच्या इमारती दिसत होत्या. तेथून थोड्याच अंतरावर छंगामल विद्यालय इंटर कॉलेजची छपरे दिसत होती. वैद्यजींनी त्याला शांतिनिकेतन असे नाव दिले असल्यामुळे छपरांचे स्वरूप बदलण्यास ते तयार नव्हते.

गल्लीच्या कोपऱ्यावर एक इसम एका म्हातारीकडून एक कोंबडा विकत घेत होता.



म्हातारी म्हणत होती, ''आम्ही पठाण बाबांच्या थडग्याला नवस केला होता. हा कोंबडा आम्ही त्यांच्याचसाठी वाढवत आहोत.''

कोंबडा विकत घेणारा कोंबड्यासाठी खरोखरीच फार आतुर झाला होता आणि सर्व प्रकारचा त्रास सहन करण्यास तयार होता. तो म्हातारीला समजावून सांगू लागला की, ''पठाणबाबांना फक्त कोंबड्याशी काम. मग तो हा असो की तो असो.'' त्याने तिला हेही समजावून सांगितले की, ''कोंबडा विकण्याच्या दोन पद्धती आहेत. एक सरळपणानं देऊन टाकायची आणि दुसरी लाथा खाऊन देऊन टाकायची.'' त्याने मोठ्या उदारपणे म्हातारीला यांपैकी कोणत्याही पद्धतीचा स्वीकार करण्याचे स्वातंत्र्य दिले होते. त्याने असेही सांगितले की, ''आम्ही हा कोंबडा नुसताच खरेदी करणार नाही, त्याची काही किंमतही देऊ.''

रूप्पनबाबूंनी जाता - जाता त्या इसमाला हटकले आणि विचारले, ''कुणी मोठा अधिकारी यायचा आहे वाटतं ?''

त्या इसमाने या प्रश्नाचे उत्तर म्हणून कुणाला तरी दहावीस शिव्या घातल्या; आणि त्यातच आपली आत्मकथाही सांगून टाकली की, ''मी सकाळपासून कोंबडा शोधतो आहे. हे शिवपालगंज म्हणजे अगदीच रद्दी गाव आहे. लोकांशी बोलतांना असं वाटतं की जिकडे - तिकडे कोंबडेच कोंबडे आहेत; पण तुम्ही विकत घ्यायला निघालात की सारे खुराड्यात जाऊन लपतात.''

रूप्पनबाबूंनी यावरून असा निष्कर्ष काढला की शहरातून त्याचा वरिष्ठ अधिकारी यावयाचा आहे. जाता - जाता ते हळूच म्हणाले, ''कोंबड्याची व्यवस्था तर झाली पण 'त्या' चं काय करणार ?''

''कशाचं ?''

रूप्पनबाबूंनी एक सांकेतिक खूण केली. परंतु त्या इसमाला त्या कलेतील काहीच माहिती नव्हती. ती जाणून घ्यायलाही तो तयार नव्हता. मान वाकडी करून त्याने पुनः विचारले, ''कशाचं ?''

यावर रूप्पनबाबू म्हणाले, ''रमचन्नाची पोरगी तर सासरी गेली. आता काय करणार ?''

''राम, राम ! काय भलतंच बोलता हे पंडितजी, तुम्ही.'' त्या इसमाने रूप्पनबाबूना झिडकारत म्हटले.

चौकीच्या बाहेर कानावर जानवे गुंडाळलेला, बनियन आणि अंडरवेयर घातलेला

एक धट्टाकट्टा शिपाई. झाडांखाली कुत्र्यांसारखे पडलेले चौकीदार. फुटके कुल्हड, घाणेरड्या माशा घोंघावत असलेल्या पत्रावळी आणि धूर ओकणाऱ्या चिमण्या यांनी संपन्न असलेली मिठाईची दुकाने आणि चहाची हॉटेले. किटण बसलेली मेजे. रस्त्यावरून घरघरत जाणाऱ्या, नशाबाज ड्रायव्हरांच्याकडून चालविल्या जाणाऱ्या हत्याभिलाषी ट्रकांच्या रांगा. सायकलीच्या कॅरियरवर गवताच्या भाऱ्यांप्रमाणे कागदपत्रांचे गठ्ठे बांधून चाललेले वसुली कारकून, मामलेदाराचा फटकळ पट्टेवाला. दारू पिऊन, न्हाव्याच्या दुकानात जाऊन विनाकारण भांडणारा पंडित रामधराचा बेलगामी बेटा - ज्याला आठवड्यातून सात वेळा स्थानिक पोस्टमन त्याच्यापेक्षाही जास्त दारू पिऊन जोड्यांनी मारतो असा दिवटा पुत्र ! कॉलेजकडून येत असलेले एकमेकांच्या कमरेभोवती हात टाकून चालणारे व एखादा कोरस गात असल्यासारखे गाणारे विद्यार्थी.

## २५

वैद्यजींच्या दिवाणखान्यापासून सुमारे शंभर यार्ड अंतरावर एक लहानसे मैदान होते. त्यात काही कडुनिंबाची झाडे होती. त्यांवर शेकडो पोपट टें टें करीत असत आणि त्यांच्या खाली शेकडो कुत्री पळापळीचा खेळ खेळत असत. अलीकडे नुकतीच प्रायमरी शाळेतील एका उत्साही शिक्षकाने तेथे काही मुलांना जमवून कवाईत करण्यास व हुतूतू खेळण्यास शिकवायला सुरुवात केली होती. त्याच्या मागे काहीतरी राजकारण असावे, असा वैद्यजींचा अंदाज होता. परंतु तो शिक्षक रामाधीन भिखमखेडवीच्या गटाचा असल्यामुळे वैद्यजींनी आपली शंका आपल्या बैठकीत व्यक्त करून तेवढ्यावरच ते प्रकरण संपवून टाकले होते. त्याच जागेत आठवड्यातून एकदा स्थानिक बाजार भरत असे. तेथे सामान्यतः भाजीपाला विकायला येत असे; आणि कधी-कधी नव्या नवसाच्या मुलाप्रमाणे गव्हाचे एखादे दुर्मिळ पोतेही किरकोळ विक्रीसाठी येत असे.

सनिचरने सरपंच बनल्यानंतर त्या मैदानाच्या एका कोपऱ्यात एक लाकडी केबिन



उभारली आणि तेथे किराणा मालाचे एक दुकान थाटले. हे कार्य त्याला सरपंच बनण्यापूर्वी का करता आले नव्हते, या बाबतीत त्याला काहीही सांगायचे नव्हते.

होळीच्या पंधरा दिवस आधी ते दुकान थाटण्यात आले आणि त्याने बद्री पहिलवानांची खुशामत करून त्यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन घडवून आणले. उद्घाटनाचा समारंभ साधा परंतु रूबाबदार होता. छोटू पहिलवान आपल्या एकदोन साथीदारांसह दुकानाच्या उद्घाटनाच्या वेळी तेथे जाऊन एका मोडक्या बाकावर बसला. छोटूने दुकानातून गुळाचा एक मोठा खडा उचलला आणि आपल्या साथीदारांना तो वाटून देऊन त्यांच्या बरोबर खाऊ लागला. बद्री पहिलवान स्तब्धपणे जनतेच्या आगमनाची वाट पाहात राहिले. अखेर जेव्हा जनतेच्या नावाने दहा-पाच रिकामटेकडे लोक तेथे भटकत-भटकत आले तेव्हा बद्री पहिलवानांनी एक संक्षिप्त परंतु सारगर्भित भाषण केले ते म्हणाले, ''आता सनीचरांनी रात्रंदिवस रिकामे बसून राहाणे योग्य होणार नाही. दुकान उघडले आहे. हे सरळ मार्गानं जातील तर थोड्याच दिवसांत यांची गणना माणसांत होऊ लागेल.''

सनीचरने आपल्या परीने दुकान चांगलेच सजवले होते. लाकडी भिंतीच्या एका बाजूला कोणत्यातरी कंबर घट्ट बनविणाऱ्या लाडूची जाहिरात होती. दुसऱ्या बाजूला 'अधिक धान्य पिकवा' या पूर्वीच उल्लेखिलेल्या पोस्टरांपैकी एक खूप मोठे पोस्टर होते. उरलेल्या जागेत कुणा म्हातारीने शोधून काढलेले काजळ, गजकर्ण, खोकला, दमा वगैरे रोगांवरील रामबाण औषधे आणि एक खास प्रकारची बॅटरी, वनस्पती तूप इत्यादी वस्तूंच्या जाहिराती होत्या. ज्या गोष्टींच्या जाहिराती तेथे होत्या त्या बहुदा नव्हत्याच. ज्यांच्या जाहिराती नव्हत्या अशाच वस्तू दुकानात प्रामुख्याने होत्या.

दुकानामध्ये पान-बिडीपासून तांदूळ, डाळ, पीठ, मीठ, गरम मसाला वगैरे पर्यंत ज्या ज्या वस्तूंची उघड-उघड खरेदी-विक्री होत असते व ज्या खाल्ल्या जातात अशा सर्व वस्तू होत्या. पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात राजकारणाचा जो भाग नमूद केलेला असतो तो हा होता. त्यानंतर पक्षाच्या बैठकांमध्ये गुप्त विचारविनिमयाच्या रूपाने व्यक्त होणारा व फक्त विश्वसनीय गोटांनाच कळणारा असा दुसरा पैलू होता. त्यात अशा वस्तूंचा समावेश होत होता ज्या उघडपणे खरेदी केल्या जात नाहीत परंतु खाल्ल्या मात्र जातात. या श्रेणीतील मालामध्ये अनेक इंग्रजी औषधांचा समावेश होत होता. त्यांचा उगम स्थानिक इस्पितळाच्या स्टोअररूममध्ये होता. त्यातच अमेरिकन दुधाच्या भुकटीचे डबेही येत होते. त्यांचा उगम स्थानिक प्रायमरी शाळेत होत होता. अशा प्रकारच्या पदार्थांमध्ये जे फक्त लपून-छपून खरेदी केले जातात व लपून छपूनच वापरले जातात त्यांचाही समावेश होत होता. त्यात गांजा, भांग व चरस यांचा अंतर्भाव होत होता. अफूच्या बाबतीत सनीचरने फारशी उत्सुकता दाखविली नव्हती,

कारण गावामध्ये अफूचा चोरटा व्यापार करण्याचा एकाधिकार रामाधीन भीखमखेडवीनाच होता.

होळी येईपर्यंत सनीचरच्या दुकानाला सरकारी मान्यता मिळून गेली होती. तेथे साखरेची विक्री होऊ लागली होती. तिच्या बाबतीत अशी बोलवा होती की ती परमिटवर मिळते, परंतु परमिट कुठून मिळते याविषयी मात्र काहीच बोलवा नव्हती. होळीच्या दिवसापासूनच तेथे गावठी दारूचीही विक्री सुरू झाली होती. त्या दारूची सर्वात मोठी विशेषता म्हणजे तिच्यात पाणी मिसळलेले नसे. सरकारी लायसेन्सवाल्या दुकानातील दारूत हे वैशिष्ट्य नव्हते.

या दुकानाला आपापल्या परीनी सर्वांचेच आशीर्वाद मिळाले होते. बद्री, छोटू, वैद्यजी, प्रिन्सिपॉल, सगळेजण येऊन त्याला आशीर्वाद देऊन गेले होते. प्रिन्सिपॉलनी तर एक मोलाची सूचनाही केली होतीः थोडीशी जागा काढता आली तर वह्या, पुस्तके, कागद, पेन्सिली वगैरेही विकायला सुरुवात कर. को-ऑपरेटिव्हचा नवा सुपरव्हायजर असे सांगून गेला होता की दुकानाची इमारत व्यवस्थित तयार झाली म्हणजे ते को-ऑपरेटिव्ह स्टोअर म्हणूनही चालविता येईल, यावर सनीचरने उत्तर दिले होते की, "तुम्ही आत्तापासूनच याला 'क्वापरेटिव स्टोर' का समजत नाही ? क्वापरेटिवच्या लाखो रुपयांच्या इमारती उभारल्या जातात. त्याच गल्लीत क्वापरेटिव स्टोरचीही इमारत उभारून द्या म्हणजे झालं."

सुपरव्हायझरने सांगितले, "इस्टोरची इमारत म्हणजे अशी काय मोठी असणार? चार भिंती बांधून वर एक छप्पर टाकून दिलं की झाली इमारत. मनात आणलं तर उद्या ती उभी राहील. "परंतु वैद्यजींनी सांगितले, "तू सध्या पंचायतघर बांधतो आहेसच. त्यातूनच स्टोअरही बांधून होईल."

सनीचरने सरपंचाच्या रूबाबात पुटपुटायला सुरुवात केली, "बैद महाराजांचं इथंच तर चुकतं. कुणाला 'नाही' म्हणणं त्यांना जमतच नाही. मला असं सांगताहेत. तिकडे प्रिन्सिपॉल साहेबांना सांगून ठेवलंय की पंचायतघर कॉलेजजवळ बांधण्यात येईल आणि जरूर पडल्यास एक - दोन वर्ग त्यातच भरतील. बद्री पहिलवानांना सांगितलंय की सनीचरच्या बसण्या - उठण्याची नि झोपण्याची सोय पंचायत घरातच करू या, म्हणजे तो रात्रंदिवस पंचायतीचंच काम करीत राहील. आता तुम्हीच सांगा, ही पंचायत घराची इमारत म्हणजे कार्तिकातली कुत्रीच झालीय. आधीपासूनच हजार माणसे तिला वेढा घालून बसली आहेत. बाजार भरायच्या आधीच भिकाऱ्यांची गर्दी उसळलीय."

सुपरव्हायझर म्हणाला, "तर मग बैदजींशी बोलून घे. किंवा मग मी त्यांच्याशी बोलतो."



"बोलून काय होणार ? त्यांचा प्रत्येक शब्द आम्हांला हुकुमासारखा आहे."

एक चोवीस - पंचवीस वर्षांचा लाजाळू तरुण जवळ - जवळ एक तासभर सनीचरच्या दुकानात बसून जणू भाषण देत होता. चार - सहा लोक त्याचे बोलणे कुतूहलाने ऐकत होते. त्यांत रूप्पनबाबूही होते. तरुणाचे भाषण अत्यंत सभ्यतापूर्ण आणि तर्कसंगत होते. परंतु ऐकणारे ते आपापल्या कुवतीप्रमाणे समजून घेत होते.

मुले म्हणजे एक कटकट आहे, ही गोष्ट मान्य करण्यास समजदार लोकांना फारशी अडचण वाटत नव्हती. हीच गोष्ट समजून सांगण्यासाठी त्या तरुणाने एक उदाहरण दिले. "समजा, घरात एक पावशेर खीर बनवली. आता फक्त नवरा - बायकोच असतील तर त्यांना प्रत्येकाला अदपाव खीर मिळेल. त्यांना एक मुलगा असेल तर तिघांना एकेक छटाकापेक्षा थोडीशी जास्त मिळेल. पाच मुले असतील तर छटाकाचा हिशेब विसरून तो तोळ्यांत करावा लागेल. म्हणजे खिरीची मजा खतम . . ."

रूप्पनबाबू म्हणाले, "भाईसाहेब, मला एकही मुलगा नाही, आणि मुलगा कसा होतो तेही मला माहीत नाही. पण तुम्ही मला एक गोष्ट समजून द्या. मुलं पाच असू नयेत, दोन - तीन पुरेत, हे समजलं. पण खीर पावशेरच का बनवायची ? चांगली शेरभर का बनवत नाही ?"

नौजवान रूप्पनबाबूंशी चर्चा करण्यास चाचरत होता. तो म्हणाला, "शेरभर बनविण्याची ऐपत किती लोकांची आहे ?"

"तर मग ऐपत वाढविण्याचा विचार करा. मुलांच्या मागे का हात धुवून लागला आहात तुम्ही ?"

सनीचरने हात वर करून सरपंच या नात्याने बोलायला सुरुवात केली, "पुरुषांना खच्ची करण्यात काही वावगं नाही. पण खरोखरी काय करायला पाहिजे ते मी सांगतो. काही वर्षांपूर्वी आमच्या या शिवपालगंजात वानरंच वानरं झाली होती. सारं पीक नष्ट होऊन चाललं होतं. वानरांची संख्या फार अधिक होती. या मुलांच्या संख्येपेक्षाही जास्त. गावकरी मंडळी सकाळपासून गोफण घेऊन बाहेर पडत आणि शेतांत जाऊन 'लेहो, लेहो, लेहो' असं ओरडून वानरांना एका शेतातून दुसऱ्या शेतात हाकून लावत. पण त्यामुळं पिकाचं संरक्षण काही होत नव्हतं. तेव्हा आम्ही पश्चिमेकडील जिल्ह्यांतून काही माणसं बोलावून आणली. ती वानरांना पकडण्यात वस्ताद होती. थोड्याच दिवसांत सगळ्या वानरांना पकडून ते इथून घेऊन गेले.

''तुम्हीही तसंच करा. जेवढी काही पोरटी सापडतील तेवढी सगळी पकडून बंद करून टाका. गोळ्या - बिळ्या घालायची जरूर नाही. ती वानरं विलायतेला पाठवून दिली होती म्हणे. मुलांनाही जहाजांत भरून तिकडेच पाठवून द्या. तिथंच राहू द्या नि वंश चालवू द्या त्यांना.''

रुप्पनबाबू दूर उभे होते. ते म्हणाले, ''विलायतेला पाठवायला काही खर्चही यायचा नाही. परदेशांतून गव्हानं भरलेली जहाजं येतात म्हणे. तीच जहाजं परततांना या मुलांना भरून नेतील. सगळं काम अगदी फुकटात होऊन जाईल.''

त्या लाजाळू तरुणाने या सूचनांवर थोडावेळ विचार केला. नंतर तो लाजून म्हणाला, ''छेः छेः ! तुम्ही मंडळी थट्टा करताहात.'' त्याने उभे राहून मोठ्या आदराने यावेळी सनीचराच्या रूपात व्यक्त झालेल्या लोकशाहीला नमस्कार केला आणि म्हटले, ''उद्या पुनः दर्शनाला येईन.''

सनीचरने सरपंचाच्या रुबाबात म्हटले, ''तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. हे गंजकर असेच द्वाड आहेत. उद्या आलात म्हणजे बैदजींच्या दारात मीटिंग करू. सर्वांचं मत अनुकूल पडलं तर नसबंदी चालू होईल. आम्ही आपले 'बरमचारी' आहोत. बायकोपोरं कुणीच नाहीत. तुम्ही म्हणत असाल तर आम्हीही नसबंदी करून घेऊ. गंमत होईल.''

लोकांनी प्रसन्न मनाने तरुणाला निरोप दिला. तरुण मात्र दुःखी अंतःकरणाने परतला.

दुपारचे सुमारे तीन वाजले होते. लोकांचे दरवाजे आणि रस्ते निर्मनुष्य होते. पिकांची कापणी चालू होती आणि बहुतेक लोक शेतात व खळ्यांवर गेले होते. तो तरुण, प्लेगाच्या साथीमुळे उजाड झालेल्या एखाद्या देशात हिंडणाऱ्या प्रेषिताप्रमाणे, नाकासमोर पाहात, सरळ चालू लागला.

त्या तरुणाने अंगात झुळझुळीत टेरेलिनचा बुशशर्ट आणि अधिकारपदाची खूण असलेली पँट घातली होती. गावाची शीव थोड्या अंतरावर राहिली असता त्याला अचानक असे आढळून आले की आपल्या बुशशर्टने एका कुत्र्याचे अंतःकरण चोरले आहे. तो कुत्रा भुंकत - भुंकत तरुणाच्या घोट्याजवळ येत होता. तरुणाने चटकन समोरच्या घराकडे धाव घेतली आणि पत्र्याच्या छपराखाली, चबुतऱ्यावर तो उभा राहिला. त्याने जवळच पडलेली एक तूरकाठी उचलली आणि मोडलेल्या रथाचे चाक घेऊन अभिमन्यू उभा असावा त्याप्रमाणे तो कुत्र्याच्या चक्रव्यूहाला तोंड देण्यास तयार झाला.

अंगावर धावून आलेल्या कुत्र्याच्या भुंकण्यामध्ये अशी काही अद्भुत जादू होती की बघता - बघता जिकडे - तिकडे कुत्रेच कुत्रे दिसू लागले. सगळे भुंकत होते. जे भुंकू



शकत नव्हते ते आवेशाने शेपूट हलवीत होते आणि कंबर लचकत होते. पुष्कळशी पिल्ली आपल्या बारीक आवाजात 'क्यँव' 'क्वँव' करीत आकाश पाताळ एक करीत होती.

घराचा दरवाजा उघडला आणि त्यातून गयादीन बाहेर आले. ते शांतपणे उद्गारले, ''फार ओरडा चाललाय.''

यानंतर आपल्या दारात एक शहरी इसम तुरीची एक बारीक फांदी घेऊन ती हलवत असल्याचे पाहून त्यांनी कुत्र्यांना दटावले. शेजारच्या घरातून एका उत्साही मुलाने बाहेर येऊन कुत्र्यांवर दगडांचा मारा करण्यास सुरुवात केली. दुष्मनाचा धीर खचला. सगळ्या कुत्र्यांची पांगापांग झाली. त्यांच्या भुंकण्याचा आवाज अधूनमधून ऐकू येत राहिला.

गयादीननी त्या लाजाळू तरुणाला विचारले, ''कोण तुम्ही ?''

या प्रश्नाचे प्रत्येक भारतीयाजवळ अत्यंत सोपे उत्तर तयार असते. ते म्हणजे आपली जात सांगून टाकणे. तो म्हणाला, ''मी अगरवाल आहे.''

भिंतीला टेकवून उभी करून ठेवलेली एक खाट खाली पाडत गयादीन म्हणाले, ''बसा ना. काय काम करता तुम्ही ?''

तरुणाने खाटेवर बसून तोंडाचा घाम पुसला. हा घाम उन्हामुळे नव्हे तर कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे फुटला होता. त्याने उत्तर दिले, ''मी नोकरी करतो.''

गयादीननी तरुणाच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिले. त्याच्यावर लाजरेपणाची छाप होती. परंतु एकूण विचार करता तो सुंदर होता. त्यांनी विचारले, ''इथं कसं काय येणं झालं ?''

यावर त्या तरुणाने अडखळत - अडखळत देशात दररोज जन्माला येणाऱ्या मुलांविषयी बोलण्यास सुरुवात केली. थोड्या वेळानंतर गयादीनांच्या लक्षात आले की इतर लोक अव्याहत मुलांना जन्म देत आहेत आणि त्यांना तसे करण्यापासून परावृत्त करणे हा या तरुणाचा व्यवसाय आहे. त्यांनी त्याच्या पगारासंबंधी चौकशी केली आणि मुलांच्या निर्मितीला आवर घालण्यासंबंधी नुसती व्याख्याने देऊन एखाद्याला आपले पोट कसे भरता येत असेल याचे आश्चर्य करीत ते गप्प बसले.

अचानक त्यांनी विचारले, ''तुम्हांला किती मुलं आहेत ?''

''एकही नाही. माझं लग्न झालेलं नाही.''

गयादीननी आता उत्सुकतेने त्या तरुणाकडे नखशिखान्त पाहिले. त्यांनी पुनः एकदा त्याला विचारले, ''तुम्ही वैश्य अगरवाले ना ?''

त्याने मान हलवून या सन्मानसूचक विचाराला पाठिंबा दिला. त्याबरोबर गयादीन खाटेवर हळूच उसळी मारून त्याच्याजवळ सरकले. त्याने तरुणाला त्याच्या घरचा पत्ता

विचारला. तो जवळच्या शहरातच राहात होता. नंतर त्यांनी त्याच्या वडिलांचे नाव विचारले. ते एक प्रख्यात व्यापारी निघाले. नंतर त्यांची हालहवाल विचारली. तेव्हा त्यांना समजले की इतर अनेक लहान व्यापाऱ्यांप्रमाणे तेही एक लहानसे पुढारी बनले आहेत. त्याचा पुरावा असा की त्यांच्या या मुलाला नोकरी करण्यासाठी घरापासून फार दूर न पाठवता पंधरा मैलांवरच नेमण्यात आले होते. नंतर त्याच्या भावा - बहिणीची चौकशी त्यांनी केली तेव्हा त्यांना असे समजले की त्याच्या बहिणीचे लग्न एका श्रीमंत व्यापाऱ्याशी झालेले असून त्याचा मेहुणा कलकत्त्यातील एक धनाढ्य इसम आहे व त्याचा धाकटा भाऊ आपल्या मेहुण्याबरोबर व्यापार करतो आहे. जास्त खोलात शिरल्यावर समजले की त्या श्रीमंत गृहस्थाचे हे तिसरे लग्न आहे. त्यानंतर गयादीननी थोड्या आडवळणाने त्याला विचारले, ''तुमचाही लग्नाचा विचार असेल ना ?'' यावर तो म्हणाला, ''यंदाच लग्न झालं पाहिजे, असा पिताजींचा हुकूम आहे.''

गयादीन शेवटी त्या तरुणाला म्हणाले, ''तुम्ही शिकले - सवरलेले आहात. तुम्हाला मुलगी बी. ए., एम्. ए. झालेलीच हवी असणार !''

यावर त्या तरुणाने, आपल्याबरोबर शिकणाऱ्या मुलींवर प्रेम करणाऱ्या आणि लग्न मात्र आपल्या बापाने हुंड्याची शिडी लावून आणलेल्या मुलीशी करणाऱ्या सर्वसामान्य भारतीय तरुणांप्रमाणे उत्तर दिले, ''ते काही मला माहीत नाही. पिताजींची आज्ञा मला शिरसावंद्य आहे.''

हे ऐकल्यावर, तो तरुण खाटेवरून उठून उभा राहाण्यापूर्वीच गयादीन म्हणाले, ''तुम्ही तर आमचे जातवाले. घरी आलाच आहात तर सरबत घेऊन जा. सरबत नको असल्यास दूध घ्या. आणि दूधही आवडत नसल्यास चहा घ्या.''

असे म्हणून त्याने बेलाला हाक मारली.

वैद्यजींची इतराजी झाल्यामुळे शिवपालगंजहून उच्चाटन झालेले जुने फौजदार साहेब आज जोगनाथाची माफी मागण्यासाठी आले आहेत आणि ते वैद्यजींच्या दिवाणखान्यात बसले आहेत, ही बातमी गावभर पसरली. ती पुष्कळ अंशी खरीही होती.

ते यावेळी वैद्यजींच्या दिवाणखान्यात होते. टेरिलिनचा बुशशर्ट, सोनेरी काडीचा चष्मा. पुष्कळशा निराधार तरुणींविषयींच्या सहानुभूतीमुळे आपले गाव सोडून शहरात राहावयास गेलेल्या एखाद्या मोठ्या जमीनदारासारखे ते यावेळी दिसत होते. त्यांचे शरीर मोठे रुबाबदार व खानदानी होते, परंतु डोळ्यांत रसिकता भरलेली होती. थोडेसे



प्रोत्साहन मिळाल्यास ते उर्दूचा एखादा प्रणयपूर्ण शेर सुनावतील असे वाटे.

रूप्पनबाबू आजकाल प्रिन्सिपॉलांच्या विरोधी गटात उघडउघड सामील झाले होते. ते बहुदा खन्ना मास्टरांच्या घरीच पडलेले असत. रंगनाथ दर दोन-तीन दिवसांनी शहरातील आपल्या घरी परत जाण्याच्या गोष्टी बोलू लागला होता, आणि कधी-कधी तोही खन्ना मास्टरांच्या घरी जाऊ लागला होता. बद्री पहिलवान तीन दिवसांपूर्वी आसपासच्या जिल्ह्यांत दौऱ्यावर गेले होते, कारण त्यांचे दोन-तीन चेले स्वतःच्या भोळेपणामुळे वाटमारी व दरवडेखोरीच्या गुन्ह्यांत पकडले गेले होते. यावेळी वैद्यजींच्या बैठकखान्यात वैद्यजी, फौजदार साहेब, जोगनाथ व छोटू पहिलवानाचे वडील कुसहर प्रसाद उपस्थित होते.

या ठाण्यातून बदली झाल्यानंतर फौजदारांना बराच त्रास सोसावा लागला. पहिली गोष्ट अशी की त्यांच्या जागी बदलून आलेला ठाणेदार 'आत्तापर्यंत सारा गोंधळच होता. परंतु काही हरकत नाही, सगळं काही ठीक होऊन जाईल' या सिद्धांताचा अनुयायी होता. त्यामुळे जुन्या फौजदारांची याच ठाण्याच्या अनेक बाबींसंबंधी चौकशी सुरू झाली होती. चौकशी सुरू होणे ही अॅनेस्थीशिया शिवायच्या ऑपरेशनसारखी एक अत्यंत त्रासदायक गोष्ट असते. मग तिचा शेवट कॉफी हाउसमधील चर्चांप्रमाणे निष्कर्षरहित का होईना ! यावेळी खात्याकडून फौजदार साहेबांची चांगली खरडपट्टी चालली होती. दुसरा त्रास गायीमुळे होत होता. शहरात गेल्यावर त्यांना असे समजले की त्यांचा भाऊ मिलिटरी फार्मवर काम करीत होता आणि गायीला तेथे ठेवून फुकटच्या चाऱ्याची तरतूदही तो करू शकत होता हे खरे, परंतु त्यावेळी त्यांच्याकडे भ्रष्टाचारविरोधी मोहीम चालू होती त्यामुळे गोमातेची सेवा करण्याचा भार उचलण्याची हिंमत त्यांना होत नव्हती. गल्लीतील घरात राहात असतांना फौजदारांना रोज हा प्रश्न पडत होता की गायीशी कसे वागावे ? तिसरी कटकट जोगनाथाच्या दाव्याने निर्माण केली होती.

त्याने सिव्हिल जज्जाच्या कोर्टात आठ हजार रूपयांच्या नुकसान भरपाईचा दावा दाखल केला होता. त्या दाव्यातील शेवटचा भाग काहीसा या शब्दांत व्यक्त झाला होता :-

''प्रतिवादीने वादीवर चोरीचा खोटा गुन्हा लादून त्याला त्रास देण्याच्या हेतूने त्याच्यावर खोटा खटला भरला व त्याला जवळजवळ दोन महिने कच्च्या कैदेत ठेवले. त्यायोगे त्याची सबंध समाजात बेअब्रू झाली आणि त्याच्या व्यवसायाला धक्का पोचला. या सर्वांची नुकसान भरपाईची रक्कम कित्येक लाख रूपये होते, परंतु एवढी रक्कम देण्याची ऐपत प्रतिवादीची नाही म्हणून त्याच्यावर केवळ प्रतीक म्हणून आठ हजार नुकसान भरपाई देण्याचा दावा दाखल करण्यात येत आहे.'

फौजदार साहेबांची ऐपत खाली आणून जोगनाथाने त्यांना ज्या पातळीवर आणून ठेवले होते तिच्याबद्दल त्यांची काही तक्रार नव्हती. खरी अडचण अशी होती की त्या साऱ्या प्रकरणाने जनतेचे लक्ष वेधून घेतले होते. त्या शहरात सुमारे अर्धा डझन कागदाचे कपटे प्रकाशित होत होते. त्यांना तेथे साप्ताहिके असे म्हटले जात होते. ते कपटे उडविणारे काही अर्ध शिक्षित लोक होते. ते स्वतःला पत्रकार म्हणवून घेत असत, आणि पत्रकार मंडळी त्यांना मवाली म्हणत. त्या पत्रांतून बहुदा कोर्टाच्या नोटिसा आणि रस्त्यांवरील घटनांचे वृत्तांत प्रसिद्ध होत असत. त्याच बरोबर प्रत्येक पत्रात एखाद्या अधिकाऱ्याच्या जीवनातील अशा एखाद्या घटनेचा तपशील छापला जात असे. जिच्यामध्ये तो अधिकारी स्वतः एक पात्र असे आणि दारूची बाटली, बाई, नोटांचे पुडके, जुगार किंवा दलाल यांपैकी कोणीतरी दुसरे पात्र म्हणून येत असे. ही भिकारडी वृत्तपत्रे कोर्टांच्या व अधिकाऱ्यांच्या जगात अत्यंत आवडीने वाचली जात आणि त्या क्षेत्रातील हिन्दी-उर्दू पत्रकारित्वाच्या धोक्याचा पुरावा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असे. कधीकधी एखाद्या अधिकाऱ्याच्या जीवनवृत्तांताचे खंडनही प्रसिद्ध होत असे. त्यावरून असे आढळून येई की संपादकाने अमुक तारखेच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या घटनेची स्वतः चौकशी केली असून ती निराधार असल्याचे त्याला आढळून आले आहे आणि त्याला ती बातमी प्रसिद्ध केल्याबद्दल दिलगिरी वाटत आहे. त्याच्या खास बातमीदाराला नोकरीवरून काढून टाकण्यात आले असून त्याला शेंगदाणे विकण्याचा धंदा करणे भाग पडले असून संपादकाचा त्याच्यावर रोष झाला आहे. ज्या अधिकाऱ्याच्या बाजूने अशा प्रकारचा खंडनात्मक मजकूर प्रसिद्ध होई तो आपल्या सहकाऱ्यांना हसून म्हणे, ''पाहिलंत.'' आणि त्याचे सहकारी त्याच्या मागे म्हणत, ''संपादकांनी यालाही चांगलं पिळलेलं दिसतंय.'' अशा प्रकारे साहित्य आणि सरकार यांचा संपर्क दिवसेंदिवस अधिकाधिक घनिष्ठ होत होता. या लंगोटी-पत्रांचा सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक दृष्टीने हाच उपयोग होता.

तेव्हा अशाच प्रकारच्या एका लंगोटी पत्राने फौजदारांवर जोगनाथाने लावलेल्या फिर्यादीची बातमी आपल्या मुखपृष्ठावर ठळक अक्षरांत छापली होती. आपल्याकडे आलेली बातमी शिळी आहे असे वाचकांनी म्हणू नये, यासाठी तिच्यात काही रोचक फेरफार करून इतर लंगोटी पत्रांनीही ती बातमी अनेकदा अनेक प्रकारांनी छापली होती. शहरात जाताच फौजदार साहेब एक प्रख्यात गृहस्थ बनले.

अजून खटल्याची पहिली तारीखही पडली नव्हती. परंतु फौजदारांना असे दिसून आले की पत्रकारांप्रमाणे त्यांच्या स्वतःच्या खात्यातील लोकांनाही त्या प्रकरणात गोडी वाटू लागली आहे. ते क्लबात गेले की तेथे त्यांचे सहकारी त्यांना एखादे व्याख्यान सुनावत. त्याचा निष्कर्ष असा असे की, ''काळ फार वाईट आलाय. दीड दमडीची माणसेही तिस्मारखान बनली आहेत. आता नोकरी करण्याचे दिवस उरले नाहीत. तुम्ही मोठे समजदार गृहस्थ होता. तुम्ही या भानगडीत कसे अडकलात ?'' त्यांना आपल्या सहकाऱ्यांकडून इतकी अधिक सहानुभूती मिळे की त्यांना रस्त्यांने जाणे कठिण होऊन बसले. आणि जेव्हा सगळेजण कोरस बांधून सांगू लागले की, ''भ्यायचं काही कारण नाही. आपण सगळे मिळून सुप्रीम कोर्टापर्यंत लढत देऊ. अहो, शास्त्रांनीच सांगून ठेवलंय की ''सत्यमेव जयते !'' हे सारे ऐकून फौजदारांचा धीर सुटू लागे.''



एके दिवशी त्यांच्या एका वडीलधाऱ्या हितचिंतकाने त्यांना असा सल्ला दिला की, ''तू मोठा विचित्रच दिसतोस. हे खटल्यांचं शेपूट लावून कशाला इकडे - तिकडे फिरतो आहेस ? तिकडे जाऊन काहीतरी लटपट करून तो खटलाच निकालात काढ की.''

त्यानंतर ते वैद्यजींच्या चरणांशी आले.

ते लोक गप्प बसले होते. जे काही बोलणे व्हावयाचे ते बहुदा होऊन गेले होते. सर्वजण वैद्यजींच्या तोंडाकडे पाहात होते.

अचानक फौजदार म्हणाले, ''वैद्यजी, माझ्या बसची वेळ होत आलीय.''

''तुम्ही जसं म्हणाल तसं करू.'' वैद्यजींनी चटकन उत्तर दिले, ''तुम्ही प्रतिवादी आहात, जोगनाथ वादी आहे. यावेळी तुम्ही एकमेकांसमोर आहात. स्वतःच बोलून प्रश्न मिटवून टाका. तरुण मंडळीमध्ये मी काय बोलणार ?''

जोगनाथ म्हणाला, ''महाराज, ही काही माझी खासगी बाब नाही. शिवपालगंजच्या अब्रूचा प्रश्न आहे. म्हणून तर ग्रामपंचायत या दाव्याचा खर्च स्वतः करते आहे. तडजोड व्हायची तर तीही ग्रामपंचायतीच्या ठरावानंच होईल. मी फौजदारसाहेबांपेक्षा तेव्हाही लहान होतो, आताही लहान आहे. किती झालं तरी अधिकारी तो अधिकारी. मला काहीच म्हणायचं नाही. तुम्ही जसं सांगाल तसं होईल.''

फौजदारांना असा भास होऊ लागला की, संध्याकाळच्या पोर्तुलाकाप्रमाणे आपल्या मिशा कोमेजून खाली झुकत चालल्या आहेत. परंतु मेण लावून मिशांना पीळ भरण्याचा हाच फायदा असतो की भावनांच्या आवेगासरशी त्या वर खाली होत नाहीत. ते काहीच बोलले नाहीत.

वैद्यजी जोगनाथाला म्हणाले, ''तर मग ग्रामपंचायतीवरच सोपवून दे. सनीचरशी

बोलून घे. एवढे मोठे अधिकारी शहरातून धावत आले आहेत. मानगड निकालात काढा.''

फौजदारांच्या कपाळाला आठ्या पडल्या. ते म्हणाले, ''सनीचर ? हा कोण ?''

''तुम्हांला माहीत नसेल. त्यांचं खरं नाव मंगलप्रसाद आहे. आमचे ते सरपंच आहेत. त्या तिकडे त्यांचं दुकान आहे. तिथंच जाऊन तुम्ही बोलणी करा.'' वैद्यजी आदराने म्हणाले.

कोणतरी म्हणाले, ''सनीचरलाच इकडे बोलावून घ्या ना.''

वैद्यजी गंभीरपणे म्हणाले, ''हुद्याचा मान ठेवला पाहिजे. गांधीजींनी नेहरूंना पंतप्रधान बनवल्यानंतर ते त्यांचा केवढा मान ठेवत असत ! आपसातील संबंधांची गोष्ट वेगळी आहे. परंतु लोक व्यवहारात जागेचा मान ठेवावा लागतो.''

फौजदारांना धीर देत ते म्हणाले, ''तिकडे दुकानावरच जा. सरपंच आले असतील.''

सनीचर आपल्या दुकानाच्या केबिनमध्ये बसून फौजदार व जोगनाथ यांची वाट पाहात होता. शेतातून परत येताच गंजकरांच्या पद्धतीने त्याला कळून चुकले होते की, जोगनाथाच्या दाव्यामुळे फौजदारांची हवा निघून गेली आहे, ते नाक मुठीत धरून तडजोड करण्यासाठी आले आहेत, त्यांना जरा ताणून धरले पाहिजे. कारण त्यामुळे शिवपालगंजात मी - मी म्हणणारे फौजदारही भुईसपाट झाल्याचा धडा इतरांना मिळेल, आणि ही घटना वेळप्रसंगी उपयोगी पडेल. सनीचरने फौजदारांची वाट पाहात असतांना भांगेच्या चार - पाच पुड्या विकल्या. नंतर एक पुडी रस्त्याने जाणाऱ्या एका इसमाला मोफत दिली. तो इसम ग्रामपंचायतीचा सभासद होता. त्याने विचारले ''याचं काय करायचं ?''

''ठेवून दे जवळ. फौजदाराची धिंड निघणार आहे. ती निघाली की मग भांगेची मेजवानी दे सर्वांना. भांग आमची, बदाम, पिस्ते, साखर, दूध हे सगळं तुझं.''

पंचाने पुडी कनवटीला लावली आणि मिस्किलपणे हसून म्हटले, ''सरपंच साहेब, आमच्यावरच डाव करताय काय ? दीड दमडीची भांग. खरा खर्च बदाम पिस्त्याचाच असतो.''

सनीचरने तोंड असे वेडेवाकडे केले की जणू आपल्या उदारपणाविषयी दाखविलेली ही शंका त्याला मुळीच आवडली नसावी. तो म्हणाला, ''पुडी तर ठेवून घे. ती काय चावते की काय ?'' फौजदाराचा काटा एकदा निघाला की त्यानंतर सगळं स्थिरस्थावर झालं नाही तर ग्रामपंचायतीमार्फतच भांगेची मेजवानी देऊन टाकू.''



पंच म्हणाला, ''पंचवीस रुपये उडून जातील.''

''जाऊ देत उडून.''

''पंचायतीचा चिटणीस त्याला हरकत घेईल.''

सनीचरने घाईघाईने स्वतःला राग आणला आणि तो म्हणाला, ''इथं क्वापरेटिव युनियनमध्ये गेली दहा वर्षं दररोज भांगेचा कार्यक्रम चालत आलाय. कुणी साल्यानं त्याला हरकत घेतली नाही. तेव्हा ग्रामपंचायतीच्या भांग - मेजवानीला कोणत्या तोंडानं अन् कोण हरकत घेणार ?''

फौजदार व जोगनाथ येत असलेले दिसले. सदरा उचलून अंगात घालावा असा विचार प्रथम सनीचरच्या मनात आला. हा सदरा निवडणुकीनंतर शिवण्यात आला होता आणि वैद्यजींच्या आज्ञेने काही विशिष्ट प्रसंगी तो अंगात घातला जात असे. परंतु नंतर त्याच्या मनात दुसराच काही विचार आला, आणि त्याने तो सदरा तांदळाच्या टोपलीवर ठेवून दिला. मग उघड्या अंगावरून एकदा हात फिरविला, शेंडी डोकीवर व चांगली विस्कटली, अंडरवेअर वर ओढून मांड्यांच्या उगमापर्यंत नेली. त्यानंतर अवधूत शैलीत तो फौजदाराचे स्वागत करण्यास तयार झाला. म्हणजेच कुणा काल्पनिक गिऱ्हाइकासाठी तराजूवर माल तोलू लागला.

जोगनाथाने दूरूनच म्हटले, ''सरपंचसाहेब, फौजदारसाहेब आलेत.''

सनीचरने फौजदारांच्या डोकीवरून पलीकडे पाहात विचारले, ''कुठं आहेत ?''

''हेच तर आहेत.''

सनीचरने समोर पडलेल्या बाकड्याकडे बोट दाखवून रुक्षपणे म्हटले, ''बसा फौजदार साहेब. तुम्ही गणवेशात नव्हता म्हणून ओळख पटली नाही.''

फौजदार बाकावर बसले. त्याच्यावरील धूळ झटकणे त्यांना शिष्टाचाराविरूद्ध वाटले. त्यांच्या शेजारीच जोगनाथ बसला.

फौजदार साहेबांनी बोलायला सुरुवात केली, ''सनीचरनी, तुमच्यासारख्या सरपंचाच्या हातून शिवपालगंजची खूप सुधारणा होईल. मी इथं असतांना तुमच्याशी ओळख झाली नाही याचा मला खेद वाटतो. या जोगनाथांचा काहीतरी गैरसमज झाल्यामुळं यांनी एक दावा . . . .''

सनीचरने त्यांना मध्येच अडवून विचारले, ''गैरसमज ? ही काय भानगड आहे ? तुम्ही इंग्रजी ऐवजी देशी भाषेत बोला की. आम्ही खेडवळ माणसं. आम्हांला समजेल असं काही बोला.''

फौजदारांच्या मिशांवरील घट्ट मेणाने त्यांची अब्रू वाचविली. झुपकेदार मिशांच्या छत्रछायेत आपल्या आवाजात जास्तीत जास्त गोडवा आणून ते म्हणाले,

''जोगनाथांची काही तरी चुकीची समजूत झालीय की. . . .''

सनीचर म्हणाला, ''चुकीची समजूत झाली असेल तर या खटल्यात ती ठीक होऊन जाईल. चार तारखा झाल्या की कुणाची समजूत चुकीची होती ते कळेल.''

फौजदारांनी बाकावर बसल्या - बसल्या फारशी हालचाल केली नाही. घड्याळाकडे पाहात ते म्हणाले, ''हे पाहा सरपंच साहेब, माझीच गैरसमजूत झाली होती असंच समजून चाला घटकाभर. चूक माझीच होती. सगळा साक्षीपुरावा तपासल्याखेरीज मी या खटल्यात हात घालायला नको होता. आता मी तडजोडीला तयार आहे. तुम्हांला जे योग्य वाटेल तेच आपण करू.''

जोगनाथ हसला. परंतु सनीचर गंभीरपणे म्हणाला, ''काय जोगनाथ, तुझं काय म्हणणं आहे ?''

''माझं काय म्हणणं असायचं ? मी तेव्हाही गुंड होतो, आताही गुंड आहे. सांगणं - ऐकणं तुम्हांलाच करायचंय ! तसं माझं मत तुम्हाला समजून घ्यायचं असेल तर तेही ऐकून घ्या. फौजदार साहेब जे बोलताहेत तेच त्यांनी लिहून द्यावं. म्हणजे मग प्रकरण मिटलं असं समजता येईल.

फौजदार साहेब काही बोलले नाहीत. सनीचर थोडा वेळ विचार करीत राहिला. नंतर म्हणाला, ''मी सांगतो फौजदारसाहेब. चला. आपण वैद्यजींशीच बोलून घेऊ.''

फौजदार म्हणाले, ''त्यांच्याशी माझं बोलणं आधीच झालंय. त्यांचं म्हणणं असं की हे प्रकरण ग्रामपंचायतीच्या हातात आहे. जोगनाथाचा दावा ग्रामपंचायतच लढवते आहे. त्यांचं म्हणणं असं की दावा काढून घेण्याचा निर्णय तुम्हीच करू शकाल. वैद्यजी स्वतः ग्रामपंचायतीचे सभासदही नाहीत.''

''ते ठीक आहे हो,'' सनीचर वातावरण तयार करण्यासाठी म्हणाला, ''तरीपण वैद्यजींशी बोलणं केलेलं बरं.''

''पण ते तर म्हणतात की मी साधा सभासद सुद्धा नाही.''

सनीचरने तांदळाच्या पाटीवरून सदरा उचलला व तो झटकला. त्यामुळे धुरळा उडाला. परंतु फौजदारांनी नाक देखील मुरडले नाही. सदरा अंगात घालीत तो म्हणाला, ''चला, त्याच दरबारात आपल्याला गेलं पाहिजे.

त्या दिवशी संध्याकाळी ग्रामपंचायतीमार्फत भांगपार्टी झाली. गांधी - चबुतऱ्यावर अनेक पाटे - वरवंटे खणखणू लागले. धुळीने भरलेल्या वातावरणात भांग घोटली गेली. भांगेने नशा चढविण्याचे नाकारू नये, तो धोका राहू नये यासाठी तिच्यात



धोत्र्याच्या बिया मिसळण्यात आल्या. बदाम - पिस्ते, मिरी, वेलदोडे आणि असल्याच ओळखू न येणाऱ्या दहा - वीस प्रकारच्या वस्तू तिच्यात घालण्यात आल्या. ते मिश्रण दूध व पाणी यांत मिसळण्यात आले, आणि पाहाता - पाहाता अनेक बादल्या फसफसू लागल्या. माकडाप्रमाणे उडी मारून सनीचरने प्रथम एक पेलाभर भांग झाडाखाली असलेल्या शिवलिंगाला अर्पण केली आणि भांगेशी संबंधित अनेक स्तोत्रे व प्रार्थना तो म्हणू लागला. जुन्या काळचा अशिक्षित इसमही आजकालच्या सुशिक्षित माणसापेक्षा किती अधिक ज्ञानवान असतो, या कल्पनेने सभोवतालचे लोक स्तुतिदर्शक मान डोलवू लागले. पुनः भांग घोटण्याचा कार्यक्रम चालू झाला.

कितीतरी मुले गांधीचबुतऱ्याजवळ गोळा झाली होती. त्यांच्या डोळ्यांतून घाण वाहात होती, तोंडातून लाळ गळत होती. बहुतेक सर्वांच्या पोटांचे नगारे झाले होते. त्यावरून त्यांच्या घरांत खाण्यापिण्याची कमतरता नाही हे सिद्ध होत होते. त्यांचे आवाज कधी चिरचिरे तर कधी भसाडे होत होते. त्या सर्वांपेक्षा त्यांच्या चेहऱ्यांवरील खुषी अत्यंत अस्वाभाविक वाटत होती. भावी पिढी जोराने ओरडून बोलणार आणि कोणत्याही परिस्थितीत तिची पोटे फुगलेली व चेहरे हसरे राहाणार, ही गोष्ट प्रत्येक जाणकार इसमाला कळून चुकली होती. भांगेचे वाटप प्रथम या मुलांमध्येच सुरू झाले. त्यांना दुधाची चव जरी कळत नसली तरी भांगेची चव कळत होती आणि 'फार छान', 'फसखलास' असे मतप्रदर्शन करीत ते मिटक्या मारीत भांग पिऊ लागले.

त्याच दिवशी रात्री जोगनाथाने खास निवडक लोकांना दारूच्या गुत्त्यात दारूची पार्टी दिली. शेजारच्या गावातील जो इसम नुकताच खुनाच्या आरोपातून सुटून परत आला होता. त्याला त्या कार्यक्रमाचा प्रमुख पाहुणा बनविण्यात आले होते. त्याच्या उपस्थितीमुळे तेथील वातावरण सुरुवातीला मोठे सन्मानपूर्ण व शांत होते, परंतु नंतर जेव्हा एक इसम लष्करी थाटात म्हणाला की, ''बाबा रे, झोपलेल्या माणसाची मान बकऱ्याच्या मानेसारखी कापण्यात कसली आलीय बहादुरी ? हे तर भ्याडपणाचं कृत्य आहे.'' त्याबरोबर वातावरणातील शांतता शेपूट घालून कुठल्यातरी बिळात शिरून बसली.

''तू कधी बकरा कापला आहेस ?'' प्रमुख पाहुण्याने विचारले.''

''मी काही खाटीक नाही.''

''मी सरळ सरळ प्रश्न विचारतोय.'' प्रमुख पाहुण्याने पुनः तोच प्रश्न विचारला, ''तू कधी एखादा बकरा कापला आहेस ?''

तो आपल्या हातातील दारूच्या पेल्यावर आपली नजर स्थिर करून शांतपणे बोलत होता. त्याने आपला प्रश्न पुनः उच्चारताच अनेकजण घाबरून त्याच्याजवळ सरकले. एकाने त्याचा हात धरून म्हटले, "जाऊ दे रे !"

त्याने त्याचा हात झटकला आणि तिसऱ्यांदा प्रश्न विचारला, "तू कधी एखादा . . ."

"जाऊ दे, जाऊ दे रे बाबा !" लोकांनी त्याची मनधरणी करण्यास सुरुवात केली. परंतु लष्करी थाटात बोलणारा इसमही एव्हाना अशा मुक्कामावर येऊन पोचला होता. जेथे वस्तूला गवताची काडी आणि प्रत्येक माणसाला किडामुंगी समजण्यात येते. त्याने आम जनतेला उद्देशून म्हटले, "या तरुणाला दारू चढलीय. त्याला त्या कोपऱ्यात झोपवा आणि डोक्यावर थंड पाणी ओता."

ही सुरुवात होती. पेले आणि बाटल्या यांची फोडाफोडी होण्यास मुळीच वेळ लागला नाही. नंतर ते सर्वजण गुत्त्यातून बाहेर पडून रस्त्यावर येऊन थोडा वेळ शिव्यांच्या मेजवानीवर ताव मारीत राहिले. एक वाजल्यानंतर लाथाबुक्या आणि लाठ्या-काठ्या यांची मेजवानी सुरू झाली.

शेजारपाजारच्या घरांतील लोक जागे झाले होते आणि पोलिस ठाण्यातील लोक घोरत होते.

रंगनाथ गच्चीत उघड्यावर झोपला होता. त्याची झोप उडाली होती. तो थोडा वेळ गप्प झोपून राहिला, आणि गावाच्या एका कोपऱ्यातून येणारा तो आरडाओरडा ऐकत राहिला. नंतर तो रूप्पनना म्हणाला, "मला या गावाचा अगदी वीट आलाय. मी उद्याच परत जातो."

रूप्पनबाबू आजच्या भांगपार्टीत सामील झाले नव्हते. परंतु त्यांच्या वाटणीची भांग घरी पाठविण्यात आली होती. झोपाळू आवाजात ते म्हणाले, "कुठं जाणार दादा ? तिथंही असलेच हरामखोर लोक तुला भेटतील."

रंगनाथ पटकन म्हणाला, "मला शहराचा सुद्धा वीट आलाय."

रूप्पनबाबूंनी कूस बदलून जांभई देत म्हटले, "वीट येणारा तू असा कोण टिकोजीराव ? यांच्याहून तू काही वेगळा आहेस ?"

बोलता - बोलता ते खाटेवर उठून बसले आणि म्हणाले, "बऱ्याच दिवसांपासून तू असंच बोलतो आहेस. तू अशा थाटात बोलतोस जणू तू विलायतेतून आला आहेस आणि इतर सगळे 'काला आदमी जमीन पर हगनेवाला' आहेत.

"तुला झोपायचं असलं तर गप्प पडून राहा. नाहीतर रात्रभर बसून नुसता तिटकाराच करीत राहा."

# २६

घरी परत आल्यावर बद्री पहिलवानांना असे दिसून आले की वैद्यजी दुःखी आहेत. ते दुःखी किंवा नाराज असण्याची खूण म्हणजे त्यांचा फेटा ढिला होई, मिशा अस्ताव्यस्त होऊन जात आणि दर तिसऱ्या वाक्यानंतर ते म्हणत "मी काय सांगू ?' मनाला येईल तसं करा."

बद्री पहिलवानांच्या एका मित्राला शेजारच्या जिल्ह्यात बिगर परवाना हत्यारे बाळगण्याच्या गुन्ह्यावरून शिक्षा झाली होती. त्याच्या घरात एक स्टेनगन, काही हँडग्रेनेड, एक रायफल व एक बंदूक सापडली होती आणि तो गृहस्थ त्या शस्त्रागाराचा मालक असल्याचे सिद्ध झाले होते. त्या मित्राने खटल्यात असे सांगितले होते की, "हे शस्त्रागार माझं नाही अथवा हे घरही माझं नाही." आरोपीच्या म्हणण्याप्रमाणे ते घर त्याच्या बायकोचे होते. परंतु असे ऐकिवात आहे की ती शस्त्रास्त्रे पाहाताच कोर्टाचे मन भीतीने हादरून गेले आणि संधी मिळताच त्याने त्याला दोन वर्षांची शिक्षा देऊन तुरुंगात पाठविले.

बद्री पहिलवानांना शस्त्रास्त्रांमध्ये काही स्वारस्य नव्हते. परंतु मित्राच्या शोकसमाचाराला जाणे त्यांना आवश्यक वाटले. मित्राने सध्या हायकोर्टात अपील केले होते आणि तो स्वतः जामिनावर सुटला होता. बद्रींना त्याने घोकून घोकून सांगितले की, "हायकोर्टात हरलो तर सुप्रीम कोर्टात जावं लागेल. त्यासाठी फार खर्च येईल. तो सारा खर्च मलाच करावा लागेल, कारण आजकाल कुणी कुणाचं नाही." बद्रींनी याचा अर्थ असा लावला की या कज्जेदलालीचा सारा खर्च आजूबाजूच्या रस्त्यांवरून दिवस मावळल्यावर जाणाऱ्या - येणाऱ्या वाटसरूंना करावा लागणार आहे. असल्या वाटमारीच्या गोष्टींकडे ते तिरस्काराने पाहात असत. म्हणून त्यांनी मित्राला आश्वासन दिले की, "पैशाची काळजी तू करू नकोस. परमेश्वर सारी उणीव भरून काढील." यावर मित्र हसून म्हणाला, "जे काही आहे ते परमेश्वरानंच दिलेलं आहे." आणि असे म्हणत त्याने छपराच्या गवतात खुपसून ठेवलेले एक गाठोडे बाहेर काढले. त्या गाठोड्यात दुमडलेल्या बऱ्याच नोटा ठेवलेल्या होत्या. त्यांपैकी दोन हजार रुपयांच्या नोटा त्याने बद्रींच्या हातात आग्रह करकरून ठेवल्या आणि म्हटले, "हे पैसे तुझ्याजवळ असू देत. माझं काय ? रमता जोगी, बहता पानी ! एक पाय बाहेर तर एक पाय तुरुंगात. हायकोर्टात अपील फेटाळलं गेलं तर हा जामीन संपून जाईल. त्यावेळी याच पैशातून सुप्रीम कोर्टात जाण्याची व्यवस्था तू कर. देवानं मध्यंतरीच्या काळात दोन - चार हजार रुपयांची तरतूद केली तर तेही तुझ्याकडे पाठवून देईन. माझे दिवस वाईट आहेत. एक परमेश्वराचा आणि एक तुम्हां लोकांचा आधार

आहे. . . . .''

अशा प्रकारे परमेश्वराविषयीची चर्चा संपवून बद्री पहिलवान जेव्हा आपल्या घरी परतले तेव्हा, ठेव म्हणून का असेनात, त्यांच्या खिशात दोन हजार रुपये होते. त्यांनी वैद्यजींना आपल्या मित्रावर कोसळलेल्या आपत्तीची हकीगत सांगितली आणि म्हटले, ''कदाचित् सुप्रीम कोर्टापर्यंत जायची जरूर पडेल. त्यावेळी मलाच सारी धावपळ करावी लागेल.'' वैद्यजींनी पडेल आवाजात उत्तर दिले, ''मी काय सांगू ? मनाला येईल तसं. . .''

बद्रींनी चमकून त्यांच्याकडे पाहिले. त्यांच्या डोकीला फेटा नव्हता. पण त्यांच्या मिशा अस्ताव्यस्त झाल्या होत्या. त्यांना काळजी वाटू लागली. वैद्यजी दुःखी आहेत, हे त्यांनी ओळखले.

त्यांच्या दुःखाचे कारण खोदून खोदून शोधण्यात आले. तेव्हा असे आढळून आले की अलीकडे दोन - चार दिवसांत अनेक मंडळींनी पुष्कळच अपकृत्ये केली होती.

प्रिन्सिपॉल साहेबांनी शहरात जाऊन डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशनला कॉलेज समितीचा वार्षिक अहवाल लिहून दिला होता. अहवाल अत्यंत सुंदर अक्षरांत लिहिला होता. त्याची भाषा प्रांजळ व शैली अलंकारपूर्ण होती. वैद्यजींच्या श्रेष्ठत्वाचे निरूपण करतांना त्यांना या क्षेत्रातील नरकेसरी असे संबोधण्यात आले होते. वैद्यजींना सर्वानुमते मॅनेजरच्या जागेवर 'सहर्ष' पुनः निवडण्यात आले असल्याचे त्यात सप्रमाण सिद्ध करण्यात आले होते. काही सभासदांना कॉलेजच्या बाहेर पिस्तुलाचा धाक दाखवून आत जाऊ देण्यात आले नव्हते, ही गोष्ट त्या अहवालात नमूद केलेली नव्हती. एवढा लेखी पुरावा सादर केल्यानंतरही डेप्युटी डायरेक्टर 'मॅनेजरच्या जागेची निवडणूक पिस्तुलाच्या जोरावर दहशतीच्या वातावरणात करण्यात आली' या रामाधीन भीखमखेडवी यांच्या आरोपाची चौकशी करू इच्छित होते. चौकशी करण्याचे काही एक कारण नसतांना त्यांनी प्रिन्सिपॉलना नोटिस दिली आहे की, ''मी स्वतःच तपास करणार आहे.'' आणि त्यासाठी एक तारीखही निश्चित करून टाकली आहे.

खन्ना मास्टरांनीही डेप्युटी डायरेक्टरांकडे एक लेखी तक्रार गुदरली आहे. त्यांत अनेक आरोप ठेवलेले असून असेही नमूद करण्यात आले आहे की 'येथे शिक्षकांना जेवढा पगार प्रत्यक्षात मिळतो त्याच्या दुप्पट रकमेवर सही करून घेतली जाते.' वस्तुतः असे तर सत्तर टक्के कॉलेजात घडतच असते, आणि म्हणून तिकडे लक्ष द्यावयास नको होते. परंतु डेप्युटी डायरेक्टरांनी असे आश्वासन दिले आहे की मी याचीही चौकशी करीन. सबंध जगभर असा एक अटळ नियम आहे की पावती जेवढ्या रकमेची असेल तेवढी रक्कम मिळाली असे समजावे. परंतु एवढा लेखी पुरावा असतांनाही ते तपास करण्याचा हट्ट धरून बसले आहेत.



मालवीय मास्टरांच्या दुराचरणाविरुद्ध कोणीतरी निनावी पत्रक छापले आहे. आरोप खरा असो की खोटा असो, परंतु निनावी तक्रार करणे हे भ्याडपणाचे कृत्य आहे. एखाद्या विद्यार्थ्याशी व्यभिचार करणे हे सुद्धा भ्याडपणाचेच कृत्य होय, आणि मालवीयांनी ते कृत्य खरोखरीच केले असेल तर त्याचा उघड उघड निषेध करावयास हवा होता. आता खन्ना मास्टर कॉलेजातील काही विद्यार्थ्यांची साक्ष काढून हे पत्रक बिचाऱ्या प्रिन्सिपॉलनी छापविले असल्याचे सिद्ध करणार आहेत असे ऐकिवात आहे. रूप्पन काही बोलत नाहीत, परंतु असे बोलले जाते की खन्नांना पत्रकाच्या छपाईचा पुरावा त्यांच्याच मदतीने मिळाला आहे. अनेक विद्यार्थ्यांना चिथावून अशी तक्रार करण्यात आली आहे की कॉलेजात सर्व काही चालते, फक्त शिक्षण चालत नाही. बिचाऱ्या मोतीराम मास्टरांविरुद्ध असा आरोप करण्यात आला आहे की ते वर्गात शास्त्र शिकविण्याऐवजी पिठाच्या गिरणीचा धंदा कसा चालवावा ते शिकवितात. या सर्वाविषयी तसा काही लेखी पुरावा नाही, पण त्याचीही चौकशी होणार आहे.

इतरांचे जाऊ द्या, पण रंगनाथ सुद्धा अलीकडे अधूनमधून खन्नांशी बोलू लागला आहे. त्याची तब्येत आता चांगली सुधारली आहे, पण मेंदूत बिघाड झाला आहे.

को-ऑपरेटिव्ह इन्स्पेक्टर धर्मराजाचा बाप असल्याचा आव आणतो आहे. त्याने आपला एक रिपोर्ट वर पाठविला आहे. त्यात असे म्हटले आहे की, ''रामस्वरूप सुपरव्हायझरने दोन हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेची जी अफरातफर केली आहे ती वैद्यजींच्या माहितीने केली आहे.'' म्हणून ते पैसे वैद्यजींकडून वसूल करावेत अशी सूचना त्याने केली आहे. मॅनेजिंग डायरेक्टर या नात्याने वैद्यजींनी या इन्स्पेक्टराविरुद्ध तक्रार केली होती. ती लेखी असूनही तिच्यावर काही कारवाई करण्यात आलेली नाही, आणि अनेक खटपटी करूनही त्याची बदली होत नाही. एवढेच काय पण इन्स्पेक्टर दारू पितो, असेही त्यांनी वरती लिहून कळविले असूनही अजूनपर्यंत सहकारी खात्यात ज्वालामुखीचा स्फोट होण्याची गोष्ट तर दूरच राहिली, साधा भूकंपही झालेला नाही.

बद्री पहिलवान वडिलांजवळ त्यांच्या पलंगावर एक पाय ठेवून त्या पायाच्या गुडघ्यावर एका हाताचे कोपर टेकवून व त्या हातावर हनुवटी ठेवून उभे होते. सगळी हकीगत ऐकून ते म्हणाले, ''बस्स ?''

वैद्यजी म्हणाले, ''तू याला 'बस्स' म्हणतोस. माझ्या सेवेचा हाच मोबदला वाटतं ?''

बद्री पहिलवानांनी मोबदल्याच्या मुद्याकडे दुर्लक्ष केले आणि म्हटले, ''या भानगडी दहा मिनिटात मिटवून टाकता येतील. को - ऑपरेटिव्ह इन्स्पेक्टरला दहा जोडे लगावले की तो सरळ होईल. डेप्युटी डायरेक्टरही आमचं म्हणणं न ऐकता तपास

करायला आले तर त्यांचीही कुणाशी तरी भरतभेट घडवून आणू. खन्ना मास्टरांसाठी आपण असा हुकूम काढू की त्यांनी आणि त्यांच्या पार्टीच्या लोकांनी कॉलेजच्या आवारात पाऊल टाकता कामा नये. सगळ्यांना सतत गैरहजर दाखवून पंधरा दिवसांनंतर हाकलून देऊ. . . . .''

वैद्यजींनी अडवून विचारले, ''हे कसं होणार ?''

''प्रिन्सिपॉल करील. त्रिपाठीला गत वर्षी कसं काढून टाकलं होतं ? त्यांना महिनाभर गैरहजर ठेवलं होतं की नाही ?''

वैद्यजींच्या चेहऱ्यावर थोडाफार विश्वास दिसू लागला. तेव्हा बद्री पहिलवान म्हणाले, ''तुम्ही हे सारं मनातून काढून टाका. प्रिन्सिपॉल सगळं काही व्यवस्थित करील. छोटूनं नुकतेच दोन - तीन पठ्ठे तयार केले आहेत. कॉलेजच्या बाहेर त्यांचीच ड्यूटी लावून देऊ. खन्ना कॉलेजात जाऊ लागला की त्याला जोड्यांनी मारता येईल.''

''रंगनाथ वाटेल तेवढं बडबडला तरी त्याची काय फिकीर ? शहरी माणूस आहे. त्याच्याकडे तुम्ही लक्षच देऊ नका. तो घाबरून पळून जाईल. राहाता राहिले रूप्पनबाबू. त्यांना दोन - चार लाफे लगावले की काम खलास. तुम्ही जेव्हा सांगाल तेव्हा ते काम उरकून टाकू.''

बद्रीची ही संरक्षण - योजना ऐकून वैद्यजी थोडावेळ शांतपणे बसून राहिले. नंतर म्हणाले, ''इथं सारं ठीक होऊन जाईल. परंतु वरचं राजकारण गडबडलेलं दिसतंय. म्हणून तर या क्षुद्र अधिकाऱ्यांची हिंमत वाढलीय. को - ऑपरेटिव्ह इन्स्पेक्टराची बदली होत नाही, याच्या मागे फार मोठं राजकारण आहे. काळजीचं तेच कारण आहे.''

बद्री पहिलवान काहीसे वैतागून म्हणाले, ''राजकारणाचं तुमचं तुम्ही बघा. मला जे वाटतं ते मी सांगितलं. इन्स्पेक्टरला दहा जोडे मारण्यात येतील. एक कमी नाही की एक जास्ती नाही.'' थोडावेळ विचार करून ते म्हणाले, ''तो रजा घेऊन बाहेरगावी गेला तर त्याला जोडे मारलेच पाहिजेत असं नाही. सोडून देऊ.''

त्यांनी सदऱ्याच्या खिशातून काही नोटा बाहेर काढल्या. त्या वैद्यजींकडे देत ते म्हणाले, ''हे तेराशे रुपये आहेत. तडजोडीचे काही रूपये फौजदारही देऊन गेलेत म्हणे. ते यात घालून पुरे दोन हजार करून टाका. को-ऑपरेटिव्हवाले फार दडपण आणू लागले तर आधीच जमा करून टाकू.''

वैद्यजी गंभीरपणे म्हणाले, ''फौजदारांनी जे काही दिलं होतं त्यातली काही रक्कम जोगनाथाला दिलीय. चार - पाचशे रुपये उरलेत. ते जनतेचे आहेत.''

''को - ऑपरेटिव्हही जनतेचीच आहे की.''

वैद्यजींनी त्या नोटा बद्रींकडे परत देत म्हटले, ''सध्या तुझ्याजवळच राहू देत. पुढं



पाहाता येईल.''

त्यानंतर बद्री आपल्या मित्राविषयी बोलण्यास थांबले नाहीत. घरात जाण्यापूर्वी ते पुन: एकदा आपल्या वडिलांकडे वळले आणि एका विचित्र आवाजात पुटपुटल्यासारखे म्हणाले, ''बापू, गयादीनशीही बोलून घ्या ना.'' हा विचित्र आवाज अलीकडेच कोठून तरी ते शिकून आले होते.

गेली काही वर्षे बद्री पहिलवान आपल्या वडिलांशी बोलतांना कोणत्याच संबोधनाचा वापर करीत नसत. लहानपणी ते त्यांना बापू म्हणत असत. परंतु तरुण झाल्यावर पहिलवानकी सुरू होताच त्यांनी हे पोरकट संबोधन सोडून दिले होते. वैद्यजींनी बद्री पहिलवानांचे हे वाक्य ऐकले आणि, का कोण जाणे, डोळे मिटून घेतले.

हुशार कावळा कचऱ्यावरच टोच मारतो, हा प्राणिशास्त्रातील नियम शिवपालगंजमधील प्रत्येक पोरासोराला माहीत होता. वैद्यजींच्या बाबतीत तसेच घडले.

या को - ऑपरेटिव्ह इन्स्पेक्टरने भारीच अडचण करून ठेवली होती. पूर्वीचा इन्स्पेक्टर लोकशाही पद्धतीने काम करीत होता. म्हणजे असे की सोसायटीच्या इमारतीत भांग घोटण्याची तरतूद जेव्हा केली जाई तेव्हा पाट्यावर वरवंट्याचा पहिला वार पडताच तो इतर सभासदांच्याही पूर्वी तेथे येऊन हजर होई आणि स्वतः जनतेतील एक बनून तेथील कार्यक्रमांत भाग घेई. हा इन्स्पेक्टर भांगेचा शत्रू आणि वैद्यजींना मिळणाऱ्या माहितीच्या आधारे व वैद्यजींनी वरच्या अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रानुसार, दारूचा शौकीन होता. दारूबरोबरच त्याला प्रामाणिकपणाचेही व्यसन जडले होते, आणि सोसायटीच्या सभासदांशी सहकार्य करण्याऐवजी तो त्यांना विरोध करू लागला होता. इन्स्पेक्टरची बदली होणार याविषयी वैद्यजींची खात्री होती. परंतु त्यांच्या पत्राचे उत्तर बऱ्याच दिवसांनंतरही आले नाही तेव्हा त्यांना काळजी वाटू लागली. चौकशी केल्यानंतर तो सारा राजकारणाचा डाव आहे असे आढळून आले. ज्याप्रमाणे लोकसेवकांचे स्थानांतरण राजकारणाच्या द्वारे होऊ शकते त्याप्रमाणे उच्चतर राजकारणाच्या साह्याने ते थांबूही शकते हे त्यांना समजले आणि मग इन्स्पेक्टराचे हात दारूची बाटली आणि लेखणी यांच्यापर्यंतच नव्हे तर राजकारणाच्या धाग्या-दोऱ्यांपर्यंतही पोचलेले आहेत हे त्यांना कळून आले.

एके दिवशी वैद्यजी एकटेच मैत्रीयात्रेवर निघाले. शहरात जाऊन त्यांनी सकाळपासूनच डझनवारी बंगल्यांना भेटी दिल्या. काही ठिकाणे वगळता जेथे तास - अर्धा तास बाहेर ताटकळत बसणे हे अपमानकारक समजले जात नव्हते,

त्यांचे उल्हासाने स्वागत झाले, आणि त्यांचा डळमळणारा आत्मविश्वास पुनः एकदा ताठ उभा राहिला. पुष्कळशा बंगल्यांमधील लोक त्यांच्याकडून वीर्यपुष्टीच्या गोळ्या मिळाल्यामुळे खुष झाले. पुष्कळांना गोळ्यांबरोबर ही माहितीही पुरवावी लागली की, ''काही दिवसांपूर्वी एका उच्च कोटीच्या ज्योतिष्याशी माझी ओळख झाली आहे. तुम्ही तुमची जन्मकुंडली दिल्यास तिच्यावर पुनः विचार करता येईल.'' काही लोकांचा उत्साह वाढविण्यास स्तंभन गोळ्या आणि भविष्य या गोष्टी पुरेशा नव्हत्या. त्यांना असे सांगावे लागले की, ''हृषीकेशचे अमुक महात्माजी अमुक तारखेला इथं येणार आहेत. - होय, ज्यांच्या आशीर्वादाने अमुक पोलिस अधिकाऱ्याविरुद्ध करण्यात आलेले सगळे आरोप खोटे ठरले, एवढेच नव्हे तर त्याला ताबडतोब बढतीही मिळाली तेच हे महात्माजी. त्यांना रात्री दहा वाजल्यानंतर भेटणं अधिक सोयीचं होईल. आपली इच्छा असल्यास आपली ओळख करून देण्यास त्या दिवशी मीही येईन.''

वरच्या पातळीवरील अनेक राजकारणी लोकांना व अधिकाऱ्यांना या पद्धतीने खिशात घालून वैद्यजी सरतेशेवटी ज्या बंगल्यातून को-ऑपरेटिव्ह इन्स्पेक्टराच्या संरक्षणाचे हुकूम निघत होते तेथे गेले. तेथे त्यांना असे समजले की सहकारी चळवळीत आता एका नवीन विचाराची भर पडली आहे. नातेवाईकवाद, जातिवाद, समाजवाद वगैरे उच्चवर्गीय सिद्धांतांना एकत्र गुंडाळून भावी कार्यकर्त्यांना प्रेरणा देण्याचे कार्य हा विचार करणार आहे. या विचाराचे स्वरूप काहीसे असे होते :- तुमच्या हातात सामर्थ्य असेल तर त्याचा उपयोग प्रत्यक्षपणे ते सामर्थ्य वाढविण्यासाठी करू नका. त्याच्या द्वारे काही नवीन व विरोधी शक्ती निर्माण करा आणि त्या शक्तींना एवढे मजबूत बनवा की त्यांनी सतत आपसात संघर्ष करीत राहावे. अशा प्रकारे तुमचे सामर्थ्य सुरक्षित व सर्वोपरि राहील. तुम्ही केवळ आपलेच सामर्थ्य वाढवीत राहिलात आणि इतर परस्पर विरोधी शक्तींची निर्मिती, स्थिती व संहार यांचे नियंत्रणकर्ते बनला नाहीत तर काही दिवसांनंतर काही शक्ती एखाद्या अज्ञात व अनपेक्षित कोनातून वर येऊन तुमच्यावर हल्ला करतील आणि तुमचे सामर्थ्य छिन्न भिन्न करून टाकतील.

या सिद्धांताला व्यावहारिक रूप देण्याचा एक परिणाम असा दिसून आला की त्या बंगल्यावर आता फक्त आपल्याच गटातील लोकांच्या नव्हे तर दुसऱ्या विरोधी गटांच्याही शिफारशी ऐकून घेतल्या जात होत्या. यावेळी को-ऑपरेटिव्ह इन्स्पेक्टरची बदली थोपवून धरण्याची शिफारस एका विरोधी गटाच्या टोळी-नायकाकडून आली होती आणि त्या टोळी-नायकाच्या शक्तीचा उपयोग एका तिसऱ्याच विरोधी गटाच्या टोळीनायकाला भरडून काढण्यासाठी करावयाचा होता. यामुळे वैद्यजीनी को-ऑपरेटिव्ह इन्स्पेक्टरच्या बदलीसाठी आमरण उपवास केला तरी त्याची बदली होणे अशक्य होते.



या साऱ्या गोष्टी वैद्यजींना कोणी सांगितल्या नाहीत. अशा प्रकारच्या बंगल्यांवर पुष्कळशा गोष्टी नुसत्या पाहून आणि हुंगून माहीत होतात. त्याप्रमाणे तेथे जाताच त्यांना सर्व काही समजले तरीपण त्यांनी धीर सोडला नाही. त्यांनी आपले म्हणणे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु गुंतागुंत वाढतच गेली. ते म्हणाले, ''आमच्या सोसायटीत तशी म्हणण्यासारखी अफरातफर झालेली नाही. जरी झाली असली तरी अफरातफर करणारा बेपत्ता आहे आणि सरकारी यंत्रणेतील सदोषपणामुळे किंवा सरकारच्या नालायकीमुळेच तो अजून पकडला गेलेला नाही. या प्रकरणाशी माझा काहीच संबंध नाही. त्याच्याशी माझा काही संबंध आहे असं सिद्ध झाल्यास तुम्ही सांगाल तेवढी रक्कम मी सोसायटीला दान म्हणून देईन. परंतु त्यापूर्वी या इन्स्पेक्टराची बदली झाली पाहिजे. तुम्ही जे म्हणाल ते करायला मी तयार आहे. मात्र अट एवढीच. . .''

यावर वैद्यजींना असे सांगण्यात आले की, ''आम्ही जनतेसमोर आदर्श घालून दिला पाहिजे. असं झालं नाही तर जनतेचं चारित्र्य बिघडून जाईल. ते बिघडलं की सारा देश बिघडेल, चालू काळ बिघडेल, भविष्यकाळ बिघडेल. रामानं काय केलं होतं ? सीतेचा त्याग केला होता की नाही ? म्हणून तर आपण आजपर्यंत रामराज्याचं स्मरण करतो आहोत. त्यागाच्या द्वारा भोग घेतला पाहिजे. हाच आमचा आदर्श होय. म्हटलंच आहे की, 'तेन त्यक्तेन भुंजीथाः । आजही सारे प्रख्यात नेते हेच करतात. आधी भोग घेतात, मग त्याचा त्याग करतात, मग त्यागाच्या द्वारा भोग घेतात. अमक्या अर्थमंत्र्यांनी काय केलं ? त्यागपत्र दिलं की नाही ? अमक्या रेल्वे मंत्र्यांनीही असंच केलं आणि तमक्या माहिती मंत्र्यांनीही तसंच केलं. यावेळी देशाला, या राज्याला, या जिल्ह्याला, या सहकारी सोसायटीला अशाच त्यागाची जरूर आहे. आरोपांची जाहीर चौकशी होण्याऐवजी तुम्ही जनतेसमोर आदर्श घालून देणं हे जास्त चांगलं. आदर्शाची इमारत उभी करताच सगळे आरोप तिच्या पायात गाडले जातील. म्हणून तुम्ही मॅनेजींग डायरेक्टरशिपचा राजीनामा देणं योग्य होईल. तुमच्या विरुद्ध जो रिपोर्ट आलाय, त्याला हेच उत्तर होय. तुम्हांला वाटल्यास 'माझा राजीनामा हा एखाद्या परिस्थितीच्या निषेधार्थ आहे,' असे तुम्ही म्हणू शकता, किंवा एखाद्या सहकाऱ्याला दोषी ठरवून तुम्ही राजीनामा देऊ शकता, अथवा एखाद्या तत्त्वाची ढालही त्यासाठी पुढे करू शकता. तुम्ही एकदा राजीनामा द्यायचं ठरवलं की मग त्यासाठी कारण शोधण्याचं पूर्ण स्वातंत्र्य तुम्हाला राहील. परंतु राजीनाम्याच्या बाबतीत अळंटळं होता कामा नये. राजीनामा बिनशर्त असला पाहिजे. तसं नसेल तर मग काहीच नको. मात्र तसं घडल्यामुळं पुष्कळच काहीतरी घडून येईल. ते कदाचित तुम्हांला न आवडणारंही असू शकेल.''

वैद्यजींनी निश्चय केला. ते म्हणाले, ''मी राजीनामा देतो. बहुदा ती माझी दुर्बलता समजली जाईल. तरीपण या निरर्थक प्रचाराच्या निषेधार्थ तुमच्या सांगण्यावरून मी राजीनामा देईन. परंतु प्रादेशिक फेडरेशनसाठी उमेदवार निवडण्याचा प्रश्न जेव्हा पुढे येईल. . . .''

या बाबतीत त्यांना आश्वासन देण्यात आले. सगळे थोर लोक, वेळ येताच, जनतेसमोर आदर्श प्रस्तुत करण्यासाठी ज्या निश्चिंत मनाने राजीनामा देतात त्याच निश्चिंत मनाने त्यांनी राजीनामा द्यावा असे त्यांना सांगण्यात आले. लायक माणसांचा तुटवडाच आहे. त्यामुळे लायक माणसाला कसलीच कमतरता पडत नाही. तो एका बाजूने सुटला की दुसऱ्या बाजूने धरला जातो.

आजच्या मैत्रीयात्रेत वैद्यजी वीर्यपुष्टाची गोळी, ज्योतिष्यांच्या विषयी माहिती - वितरण आणि बुवा - महाराजांच्या बाबतीतील मध्यस्थी या तीन कार्यमांबरोबरच एक चौथाही कार्यक्रम जोडत चालले होते. त्याप्रमाणे या बंगल्यातून बाहेर पडण्यापूर्वी त्यांनी येथेही त्याचे सूतोवाच केले. ''मी माझ्या थोरल्या मुलाचं लग्न आंतरजातीय पद्धतीनं करण्याचा विचार करतोय, हे ऐकून तुम्हांला नक्कीच आनंद होईल. अजून निर्णायक बोलणी झाली नाहीत. तरीपण लग्नाची निमंत्रणपत्रिका मी आपल्याकडे लौकरच पाठवू शकेन, अशी आशा वाटते. आपण या प्रसंगी अवश्य यावं. त्यावेळी व्यक्तिशः येणं कदाचित मला जमणार नाही, म्हणून आताच सांगून ठेवतो आहे. अशा आदर्श विवाहांमध्ये आपल्या सारख्यांचं सहकार्य आणि आशीर्वाद मिळणं अत्यंत आवश्यक आहे. आपल्याला हे कळल्यानंही फार आनंद होईल की. . . .''
त्यांना ते कळल्याने आनंद झाला. ते अवश्य हजर राहातील.

सहकारी सोसायटीचा वार्षिक समारंभ अत्यंत यशस्वीपणे पार पडला, कारण या वर्षी मिठाई शहरातून मागविण्यात आली होती. सोसायटीच्या इमारतीत पताका फडकविण्यात आल्या आणि फुलांच्या हारांचे ढीग पडले. ज्या अधिकाऱ्याने काही दिवसांपूर्वी को-ऑपरेटिव्ह फार्मचे उद्घाटन केले होते त्यालाच या समारंभासाठी बोलावण्यात आले होते. पब्लिकसमोर व्याख्यान झोडण्याच्या व हार घालून घेण्याच्या रक्ताची चटक त्याला पूर्वीच लागली होती. या गोष्टींचा वास लागताच तो पँट चढवून आणि एका व्यापाऱ्याची मोटार मागून घेऊन 'पों पों' करीत समारंभाच्या जागी येऊन पोचला.

सोसायटीचा वार्षिक अहवाल न वाचताच वाचला गेला असे गृहीत धरण्यात आले.



व्यवहारात फायदा झाला होता आणि सभासदांना त्यात वाटा मिळणार होता. तो त्यांना न देताच मिळाला. पुष्कळशा गोष्टी न होताच होऊन गेल्या. अखेर जी गोष्ट होणे जरूर होती ती होऊ लागली. भाषणे सुरू झाली.

भाषणाची खरी गंमत ते देण्यात असते, घेण्यात नसते. त्यामुळे इकडे भाषणे चालू झाली आणि तिकडे लोक आपसात दुसऱ्या समस्या सोडवू लागले. उदाहरणार्थ, शहरातून आलेल्या अधिकाऱ्याने जेव्हा असे म्हटले की, ''वैद्यजी हे सहकाराची प्रतिमा आहेत,'' तेव्हा प्रतिमा या शब्दाचा अर्थ विचारण्याऐवजी श्रोते आपापसात असे बोलू लागले की, ''बद्री पहिलवान आणि गयादीनची पोरगी यांची भानगड चालू आहे.'' नंतर अधिकारी असे म्हणाला की, ''जोपर्यंत गावोगावी अशा प्रतिमा निर्माण होणार नाहीत तोपर्यंत सहकारी चळवळ वाढण्याची मुळीच आशा नाही.'' यावरही लोकांनी सहकार आणि चळवळ यांचे अर्थ जाणून घेण्याऐवजी फक्त एवढेच म्हटले की, ''आता ही भानगड आतल्या आत दडपता येणं शक्य नाही, म्हणून ते लग्नाला तयार झालेत.'' ही सारी कुजबुज चालू असली तरी कोणीही उघडपणे दुःखदायक शब्द उच्चारले नाहीत. कारण अजूनही जर कोठे चक्रवर्ती राज्य असेल तर ते सोसायटीत होते आणि जर ते कोणाचे असेल तर ते वैद्यजींचे होते.

तरीपण अगदी रामराज्यात सुद्धा दुःखदायक सत्य सांगणारा एक परीट पुढे आला होता. येथेही एका इसमाने उभे राहून मोठ्या आवेशात सांगितले की मी भाषण देणार.

त्याच्या जवळपास बसलेले लोक त्याचे धोतर ओढू लागले. हेतू असा की धोतराच्या लोभाने त्याने खाली बसावे. परंतु तो इसम रामाधीन भीखमखेडवीच्या गटाचा होता आणि आपल्या पुढाऱ्याच्या सूचनेप्रमाणे प्रत्येक गोष्ट करण्यास तयार होऊन तो आला होता. त्यामुळे त्याने ओढल्या जाणाऱ्या धोतराची पर्वा केली नाही. उलट त्यामुळे त्याचा आवेश दुप्पट वाढला, आणि सर्व भाषणांवर ताण करून त्याने जोरात भाषण दिले की, ''मी बोलणार !''

जोरात बोलण्याचा जो परिणाम नेहमी होतो तोच यावेळी झाला. प्रतिपक्षी हळू बोलू लागले. शहरातून आलेला अधिकारी म्हणाला, ''बोला ! अवश्य बोला ! तुम्हांला कोण अडवतंय ?''

आपला आवेश कायम टिकविण्यासाठी त्या इसमाने, 'अध्यक्ष महाशय, बंधूनो आणि भगिनींनो', हे शब्दही उच्चारले नाहीत. त्याने एकदम मुद्यालाच हात घातला. ''या रिपोर्टात - काय बरं नाव त्याचं - अफरातफरीचा उल्लेख आलेला नाही. इथं एक लुच्चा सुपरव्हायझर होता - काय बरं नाव त्याचं - त्याचं नाव रामसरूप. अफरातफर केली साल्यानं - काय बरं नाव त्याचं - शहरात दोन गाड्या भरून गहू

घेऊन गेला आणि पळाला. तो दारू पीत असे - काय बरं नाव त्याचं - रंडीबाजीसुद्धा करीत असे. वैद्यजीसुद्धा त्याच्या तोंडात तोंड खुपसून काय नाव त्याचं - गुलुगुलु गोष्टी करीत. एके दिवशी रात्री दोन ट्रक आले. काय नाव त्याचं - रात्रीतल्या रात्रीत ते भरले गेले. कुणाला कळलं सुद्धा नाही. काय बरं नाव त्याचं - साला गोडगोड बोलायचा. मला पाहाताच दूरूनच काय नाव त्याचं - रामराम करायचा. त्याच्याशी वैद्यजींची - काय नाव त्याचं - कुणी राग मानू नका, मी जरी बोललो नाही तरी सारं जग बोलतंय - चांगलीच गट्टी जमली होती. दोन हजार रूपयांचं कांडात काढलं साल्यानं - काय नाव त्याचं - याला जब - जब - जब - जब - जबाबदार कोण ? को-ऑपरेटिव्ह ही फार छान प्रतिमा आहे - काय नाव त्याचं - ही प्रतिमा डोकीवर घेऊन नाचा. कोण कुठं चाललाय हे बैदजीना विचारणारा कुणी नाही काय ? मिठाई खात राहा. काय नाव त्याचं - पाणी पिऊन घरी जा. यानं काही देशाचा - काय नाव त्याचं - उद्धार व्हायचा नाही. देशात देशाची रीत चालली पाहिजे. अफरातफर कशी झाली याची चौकशी झाली पाहिजे. मी शिकलेला नाही. तेव्हा कुणी राग मानू नये. होळी आहे, होळी आहे. . . . .''

त्या इसमाचा आवेश वाढत चालला होता आणि त्याचे भाषण चौखूर उधळले होते. लोकांनी त्याचा खूप पाठलाग केला पण ते थांबायचे नाव घेत नव्हते. एवढ्यात वैद्यजी उठून समोर आले आणि उभे राहिले. भाषण करणाऱ्याने त्यांना पाहाताच जागच्या जागी थोडा थयथयाट केला आणि मग शेपूट हलवून ते जमीन हुंगू लागले.

वैद्यजी उभे राहून थोडावेळ स्मित करीत राहिले. तेवढ्यानेच सिद्ध झाले की अफरातफरीशी त्यांचा काही संबंध नाही. त्यानंतर ते ऋषींच्या वाणीत बोलू लागले, ''अफरातफर कशी होते हे समजून घेतलं पाहिजे. तुमच्या जवळ तुमच्या स्वतःच्या एक सहस्त्र मुद्रा आहेत. त्यांची अफरातफर तुम्ही करू शकत नाही. त्या मुद्रा तुमच्या आहेत, म्हणून तुम्ही त्यांचे अपहरण करू शकत नाही. तुम्ही त्यांचा गैर वापर करू शकता पण अपहार करू शकत नाही. ज्याच्याजवळ स्वतःच्या मुद्रा नसतील तोच अफरातफर करू शकतो.

''सहकारामध्ये कोणाचीही वैयक्तिक मालमत्ता नसते. ती सामुदायिक संपत्ती असते. अनेक व्यक्तींची संपत्ती एका जागी गोळा केली जाते. ज्याची ती संपत्ती नसते तो तिचं रक्षण करत असतो. ती संपत्ती त्याची नसते. पण तिच्या संरक्षणासाठी त्याची नियुक्ती झालेली असते. त्याने तिचा गैरवापर केला तर ती अफरातफर ठरते. सभ्य गृहस्थहो, नीट लक्षात घ्या. स्वतःच्या संपत्तीचा तुम्ही गैरवापर केला तर ती अफरातफर ठरत नाही, दुसऱ्यानं केला तर ती अफरातफर आहे. सहकारी संपत्ती कोणा विशिष्ट व्यक्तीची संपत्ती नसते. त्यामुळे ज्याची ती संपत्ती नसते अशा



इसमाकडूनच तिचा गैरवापर किंवा अपव्यय होत असतो. म्हणजेच अफरातफर होते. यावरून असं सिद्ध झालं की सहकारी संपत्तीचा गैरवापर कधी होत नसतो. जी काही होते ती नेहमी अफरातफरच असते. सहकारी संपत्तीच्या नशिबात हेच लिहिलेलं असतं. याबद्दल आश्चर्य वाटण्याचं कारण नाही; अथवा सहकारी संपत्तीशी अफरातफर हा शब्द जोडलेला पाहून ''भ्यायचंही कारण नाही.''

कुठं - कुठं अफरातफर लपवली जाते. दोष कधी लपवू नये. तसं केल्यास तो मूक धरतो. आम्ही हेच तत्त्व मान्य करतो. ज्या सहकारी सोसायटीत अफरातफर झाली नसेल तिच्याकडे संशयानं पाहिलं पाहिजे. तिथं बहुदा अफरातफर आकड्यांच्या आड लपवली जाते. इथं काहीच लपवलेलं नाही. व्यवस्था उत्तम ठेवली गेली. अफरातफर झाली पण होऊनही झाली नाही. कारण त्याचा परिणाम उत्तम झाला. वर्षअखेरीस सोसायटीला तोटा झाला नाही, नफाच झाला. नफा एक पैशाचा होवो की एक कोटी मुद्रांचा. नफा तो नफाच; आणि तोटा तो तोटाच. इथं तोट्याचा प्रश्नच नाही. नफाच झालेला आहे.

''अशा स्थितीत अफरातफरीचा प्रश्न उपस्थित करणं निरर्थक होतं. तो प्रश्न उपस्थित करणं म्हणजे सोसायटीचा अपमान करणं होय. हा सहकाराचा अपमान आहे.

''माझ्याविरुद्ध वैयक्तिक आरोप करण्यात आले आहेत. आधी आरोप करणं हे अयोग्य होय. त्यात पुनः वैयक्तिक आरोप करणं तर जास्तच अनुचित होय. अशा वातावरणात कुणीही व्यक्ती काम करू शकणार नाही. सभ्य व्यक्ती तर मुळीच काम करू शकणार नाही. मी असल्या या आरोपांचा निषेध करतो. मात्र लक्षात ठेवा, निषेध आरोपांचा आहे, आरोप करणाऱ्याचा नाही. आरोप करणारे श्री रामचरन आहेत. मी त्यांचा आदर करतो. त्यांच्याविषयी माझ्या मनात मोठी श्रद्धा आहे.

''परंतु त्यांच्या आरोपांना माझा विरोध आहे. जोरदार विरोध आहे आणि त्याचा निषेध म्हणून मी इथल्या मॅनेजिंग डायरेक्टरशिपचा राजीनामा देतो.'' एवढे बोलून वैद्यजी आपल्या जागेवर शांतपणे बसले.

यानंतर घटनाचक्र वेगात फिरू लागले. खूप गलबला माजला. जणू एखाद्या आमदाराला विधानसभेतून बाहेर फरफटत ओढून काढण्यात येत होते. नंतर गलबला कमी झाला आणि शहरातून आलेल्या अधिकाऱ्याचा आवाज ऐकू येऊ लागला, ''वैद्यजी आपल्या निर्णयावर कायम आहेत. म्हणून माझा असा सल्ला आहे की त्यांचा राजीनामा मंजूर करावा. तसं पाहिल्यास आजच पुढच्या वर्षासाठी निवडणूक व्हायची होती. राजीनाम्याचा अर्थ असा की वैद्यजी पुढच्या वर्षी मॅनेजिंग डायरेक्टर होऊ इच्छित नाहीत. . . .''

वैद्यजींनी बसल्या जागेवरूनच सांगितले, ''मी सभासद सुद्धा राहू इच्छित नाही.

माझं कर्तव्य मी पूर्ण केलं. आता तरुणांनी पुढं आलं पाहिजे. त्यांनीच ही चळवळ पुढे चालवावी.''

शहरी अधिकारी समजावून सांगू लागला, ''मला असं वाटतं की तुम्ही इतकं अंग काढून घेऊ नये. नाहीतर ही सोसायटी पार बसून जाईल. तुम्ही तरुणांनी पुढं यावं म्हणतां. पण ते आज आहेत कुठे ?''

परंतु वैद्यजींनी आपला निश्चय सोडला नाही. आजच्या काळातही नवयुवक असलेच पाहिजेत आणि त्यांनीच ही चळवळ पुढे चालविली पाहिजे, हा आपला मुद्दा ते घट्ट धरून बसले. अखेर शहरातून आलेला अधिकारी म्हणाला, ''आता नव्या मॅनेजिंग डायरेक्टराची निवडणूक करावी.''

असे म्हणून इतरांना बोलण्याची संधी न देता तो स्वतःच बोलू लागला. त्याने परंपरेपासून सुरुवात केली. तो म्हणाला, ''बंधूनो, येथील सगळ्या निवडणुका एकमतानं होत आल्या आहेत. या सोसायटीची ही परंपरा आहे. मला आशाच नव्हे तर खात्री वाटते की आजही त्या परंपरेला अनुसरून निर्णय घेतला जाईल. तुम्ही लोक एखादं नाव. . . .''

अचानक छोटू पहिलवान आपल्या लुंगीसकट उभा राहिला. त्याने त्यांना मध्येच अडवून म्हटले, ''निवडणूक - बिवडणूक करण्यात काय स्वारस्य आहे ? ही सोसायटी केवढी ? मूठभर सुद्धा नाही. तिच्यातही तुम्ही निवडणुका लढवणार ?''

यानंतर त्याने पुटपुटत एक म्हण सुनावली. त्याबरोबर जवळपास बसलेले बरेचसे लोक हसू लागले. अधिकाऱ्याला वाटले की छोटू पहिलवानाने आपल्याविरुद्ध काहीतरी अश्लील विधान केले असावे. तो घाबरून म्हणाला, ''पहिलवानजी, तुमचा काहीतरी गैरसमज. . .''

छोटू पहिलवानाने कुर्ऱ्यात त्याला मध्येच अडवून म्हटले, ''आमचा गैरसमज होणारच. तुम्ही पाटलोण घालून आलाहात, साहेब. खरं काय ते तुम्हांलाच कळणार.''

अधिकारी त्याची मनधरणी केल्यासारखे करीत म्हणाला, ''जरा माझं म्हणणं ऐकून तर घ्या पैलवानजी ! मी तर निवडणुकीच्या विरुद्ध बोलत होतो. इथं निवडणूक लढवण्याची परंपरा नाही, इथं प्रत्येक निर्णय एकमतानं घेतला जातो, हेच मी सांगत होतो. निवडणूक. . . . . .''

छोटू पहिलवानाने आपली छाती फुगवली. तो आव्हान देत म्हणाला, ''तुम्ही पुनः निवडणुकीच्या गोष्टी बोलू लागलात, साहेब. निवडणुकीचा जणू जप चालवलाय. आम्ही सांगून टाकलंय की इथं निवडणूक - बिवडणूक व्हायची नाही. तिची काही जरूर नाही. वैद्यजी राहू इच्छीत नसतील तर न राहोत. कोंबडा नसला तर सकाळ व्हायची थांबते काय ?'' . . . . .



संध्याकाळचे चार वाजले असावेत. वारा धूळ उडवीत जोरात वाहात होता. छोटू पहिलवान धुळीपासून डोळ्यांचे रक्षण व्हावे म्हणून डोळे किलकिले ठेवून आपल्या जागेवर डोलत होता आणि आवेशात येऊन किंचाळत होता. आवेश आणि आरडा - ओरडा यांचे काही कारण समोर नव्हते. पण त्याचा आवेश वाढतच चालला होता आणि आवाजही चढत होता. त्याच प्रमाणात जनताही जोषात येऊ लागली होती आणि अधिकाऱ्याची घाबरगुंडी वाढत होती. छोटू आता कोणत्या तरी काल्पनिक सैन्याला रणमैदानावर पुढे घुसण्यास प्रोत्साहन देत होता. अखेर तो म्हणाला, ''वैद्यजी बाजूला झालेत. काही फिकीर नाही. त्यांच्या जागेवर झटकन दुसरा इसम बसून जाईल. कसली आलीय निवडणूक ? आले मोठे निवडणूकवाले ! असली लटपटपंची शहरात चालते. इथं चालायची नाही. इथं आम्ही ज्याला मनात आणू त्याला वैद्यजींच्या जागेवर बसवू शकतो. उठा बद्री वस्ताद ! इतर कुणी नसेल तर तुम्हीच बसा तिथं. उठा, उठा वस्ताद. झटकन ती जागा बळकावून बसा.''

आरडा - ओरडा सुरू झाला आणि अकस्मात् कोणीतरी आरोळी ठोकली, ''बोलो, भारत माता की जय !'' आणि मग नेहमीचा क्रम सुरू झाला. ''बोलो, महात्मा गांधीकी -'' ''पंडित जवाहरलाल नेहरू की -'' ''बैद महाराज की -'' ''बद्री पहिलवान की -'' 'इदरीस साहेब की -''

इदरीस साहेब म्हणजे शहरातून आलेले ते अधिकारी सुन्न होऊन गेले. त्यांचे डोळे दिपले. ते जेव्हा शुद्धीवर आले तेव्हा त्यांना असे दिसून आले की, वैद्यजी कोठेतरी निघून गेले आहेत, त्यांचा विरोधक रामचरन याला कोणीतरी फाटकाबाहेर हात धरून ओढून नेत आहे, बद्री पहिलवान गळ्यात हार घालून व्यासपीठावर त्यांच्या शेजारी बसले आहेत, त्यांच्या चेहऱ्यावर मॅनेजिंग डायरेक्टराच्या जागेचे तेज झळकत आहे!

## २७

त्या वर्षी शिवपालगंजात रब्बीचे पीक चांगले आले.

हिवाळ्यात वेळच्या वेळी पाऊस पडला. कालव्याच्या पाण्यावरील जो बडा साहेब जनतेला कस्पटासमान आणि लोकशाहीला प्लेगासमान समजत होता, त्याची बदली झाली. त्याच्या जागी आलेल्या अधिकाऱ्याने कालव्याचे पाणी पाण्यासारखे खर्च केले आणि ते सर्वत्र पोचविण्याचा प्रयत्न केला. वसंत ऋतूत पश्चिमेकडील वारा जोरात वाहिला नाही. टोळ आणि उंदीर यांचा त्रास झाला नाही. दंडुक्याच्या जोरावर आपली गुरे इतरांच्या उभ्या पिकात चारणारे दोन प्रख्यात गुंड होते. त्यांच्यापैकी एकजण कुठल्यातरी ट्रकाखाली सापडून मरण पावला व दुसरा तुरुंगात गेला. ज्यायोगे गावातील निम्मे शिम्मे लोक शेतीचे काम सोडून तुरुंगात जाऊन बसले असते असा कुठलाही फौजदारी खटला गावात निघाला नाही. आपसातील वैरामुळे कोणी खळ्याला आग लावली नाही.

गावाच्या टोकाला एका जंगलामध्ये काही वंजारी येऊन राहिले होते. त्यांच्या मुली तरुण आणि देखण्या होत्या. ते लोक हातभट्टीची दारू बनवीत आणि स्वस्त भावात विकीत. त्या बाजूने जाणाऱ्या तरुणांना बकरा बनवून ते आपल्या झोपडीत बांधून टाकीत, आणि ज्यावेळी शेतात खुरपणीच्या कामासाठी त्यांची उपस्थिती अनिवार्य असे त्यावेळी ते झोपडीत बांधलेल्या स्थितीत में में करीत असत. या वर्षी पोलिसांनी प्रथम त्या मुलींवर हात टाकला, नंतर हातभट्टीच्या दारूवर, आणि सरतेशेवटी वंजाऱ्यांच्या एकूण जीवनक्रमावरच घाला घालून त्यांना त्या भागातून हुसकून लावले. अशा प्रकारे तरुण आणि शेते यांच्यामध्ये, बागांतून चालणाऱ्या जुगाराव्यतिरिक्त, दुसरा काही अडथळा उरला नाही आणि त्यांनी मन लावून शेतीत काम केले.

पीक चांगले आले. परंतु लोक समजत होते त्याप्रमाणे ती गोष्ट काही अभावितपणे घडून आलेली नव्हती. उत्तम पीक येण्यामागे या घटनांचा अथवा या घटनांच्या अभावाचाही हात होता.

उत्तम पीकपाण्याकडे शेतकऱ्यांनी विशेष लक्ष दिले नाही, कारण ते पीक वाईट आले तरी तिकडे लक्ष देत नसत. परंतु दुसरे इतर वर्ग मात्र टाळ्या वाजवून नाचू लागले. पुढारी म्हणाले, ''हा आमच्या व्याख्यानांचा परिणाम आहे,'' विकास अधिकारी आकडेवारीच्या साह्याने असे सिद्ध करू लागले की, ''हे सारं आमच्या प्रयत्नांमुळे घडून आलं आहे.'' सरकारी क्षेत्रात लोक एकमेकांचे अभिनंदन करू लागले.''

उत्तम पिकाचा एक परिणाम हाही झाला की, गयादीनना कज्जेदलालीपासून थोडी फुरसत मिळाली. कर्जाच्या वसुलीसाठी त्यांनी काही दावे दाखल केले होते. त्यांत प्रतिवादींनी पैसे देऊन तडजोड केली. पुष्कळसे शेतकरी स्वतः होऊन पैसे घेऊन त्यांच्या घरी येऊ लागले आणि लग्नसराई जवळ आली असताही वसुली वाढली,



निर्गत कमी झाली.

एके दिवशी ते सात - आठ शेतकऱ्यांच्या घोळक्यात बसून हिशेब करण्यात मग्न होते. इतक्यात वैद्यजी आपल्या घराकडे येत असलेले त्यांना दिसले.

एका महापुरूषाने दुसऱ्या महापुरूषाशी जसे वागावे, जवळ - जवळ तसेच गयादीननी वैद्यजींचे स्वागत केले. एकान्त झाला. वैद्यजी म्हणाले, ''एका अत्यंत महत्वाच्या गोष्टीविषयी तुमच्याशी बोलणं करायला मी आलोय.''

गयादीन काही बोलले नाहीत. जो बोलणे करायला आला आहे तो आपण गप्प बसलो तरी आपले म्हणणे सांगणारच, हे त्यांना माहीत होते. थोडा वेळ स्तब्ध राहिल्यानंतर वैद्यजींनी विचारले, ''जातिव्यवस्थेच्या बाबतीत तुमचं काय मत आहे ?''

गयादीनांच्या चेहऱ्यावर मानसिक गोंधळाचे एक जाळेसे पसरले. ते म्हणाले, ''देवाची देणगी आहे. त्यानं तुम्हांला ब्राम्हण बनवलं. मी बनिया आहे.''

''मला हे मान्य नाही.'' वैद्यजी हसून म्हणाले, ''जातिभेदामुळंच आपल्या देशाची अशी दुर्दशा झालीय. म्हणूनच मी माझ्या मुलांची आंतरजातीय लग्नं करू इच्छितो. कोणी ना कोणी या दिशेनं पुढं पाऊल टाकलंच पाहिजे. महात्माजी म्हणत असत —''

गयादीननी हात वर उचलून त्यांना मध्येच अडविले आणि म्हटले, ''महाराज, तुम्हांला तुमच्या मुलांची लग्नं जातीबाहेर जाऊन करायची असतील तर खुशाल करा. पण तुम्ही एवढे समजदार असतांना महात्माजींना या मुलामुलींच्या प्रकरणात निष्कारण ओढू नये, हे बरं.''

वैद्यजी गडबडले. ते म्हणाले, ''मी एक तत्त्व सांगत होतो.''

''मी सुद्धा.'' असे म्हणून गयादीन गप्प बसले.

थोड्या वेळानंतर वैद्यजीच म्हणाले, ''तर मग आंतरजातीय विवाहासंबंधी तुमचं काय मत आहे ?''

ते मान खाली घालून बसले होते. त्यांचे वाक्य ऐकून त्यांनी हळूच मान वर उचलली आणि म्हटले, ''महाराज, ह्या बामण - ठाकुरांच्या घरच्या गोष्टी आहेत. यात आम्ही वाणी-बनिये काय सल्ला देणार ?''

वैद्यजी हसून म्हणाले, ''हे काय बोलता तुम्ही गयादीनजी ? हा तुमच्या आमच्या कुटुंबांचा प्रश्न आहे. यात तुम्ही काही बोलला नाही तर दुसरं कोण बोलणार ?''

आता गयादीननी हळूच आपले तोंड वैद्यजींकडे वळविले. वैद्यजींचा चेहरा फोकसमध्ये येताच त्यांनी आपली भकास व उदास नजर त्यावर केंद्रित केली. त्या नजरेत जणू आपल्याला काही कर्तव्य नाही, असा भाव होता. त्यांनी विचारले, ''महाराज, माझ्या कुटुंबाचा याच्याशी काय संबंध ?''

वैद्यजींनी आश्चर्याने कपाळाला आठ्या घालीत विचारले, ''म्हणजे, तुम्हांला काहीच माहीत नाही ?''

गयादीन तसेच बसून राहिले. त्यांच्या स्तब्धतेवरून त्यांना काही माहीत नसावे असे दिसले.

आता वैद्यजी घाईघाईने बोलू लागले, ''बद्रीला हेच स्थळ पसंत आहे. मुलाला सोळावं वर्ष लागलं की त्याच्याशी मित्राप्रमाणे वागावं लागतं. म्हणूनच मी काही हरकत घेतली नाही. त्यानं बहुदा मुलीची संमती मिळवली असावी. आता तुमचीही काही हरकत असू नये.''

साऱ्या वातावरणाविषयी आपली नापसंती दर्शवीत गयादीननी कपाळाला आठ्या घातल्या. परंतु आपली चीड व्यक्त होऊ न देता ते म्हणाले, ''माझी हरकत असायचं काय कारण ? तुमच्या मुलांनी वाटेल तिथं लग्न करावं. मला कशाला त्यात ओढता तुम्ही महाराज ?''

वैद्यजी कंटाळून गेले होते. ते म्हणाले, ''मी तुम्हाला त्यात ओढत नाही. मुलगी तर तुमचीच आहे. म्हणून तुमच्याशी बोलणं करायला मी आलोय. पण तुम्ही जाणून बुजून डोळ्यांवर कातडं ओढून घेताहात. झोपलेल्याला जागं करता येतं, पण झोपेचं सोंग घेतलेल्याला कसं जागं करायचं ?''

गयादीननी या विधानाला विरोध करण्यासाठी हात वर करून त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. परंतु ते बोलतच राहिले, ''बद्रीनं निश्चय करून टाकलाय, आणि साऱ्या समाजात ही गोष्ट जाहीर झालीय. अशा स्थितीत आपण शांतपणानं ही सूचना मान्य करणं हेच आपलं कर्तव्य ठरतं. हा एक आदर्श विवाह समजला जाईल. दोघेही सुखात नांदतील. बद्रीला मी राजकारणात आणतो आहे. त्याला सोसायटीचा मॅनेजिंग डायरेक्टर तर करून टाकलाच आहे. मुलीलाही काही दिवसांनंतर समाजसुधारणेच्या कामात घालू. स्त्रियांचं एक बोर्ड आहे. त्यात तिला एखादी जागा मिळवून देऊ. मोटार मिळते. पट्टेवालाही बरोबर असतो. काही दिवसांनंतर ए. मे. ले. चं तिकीटही मिळवून देता येईल. पतिपत्नी दोघे मिळून सुखानं देशसेवा करतील. आपल्याला आणखी काय हवंय ?''

आपले भाषण ऐकता - ऐकता गयादीन अगदी रडकुंडीला आले आहेत, ही गोष्ट उत्साहातिरेकामुळे वैद्यजींच्या लक्षात आली नाही. गयादीननी हात जोडून गयावया करीत म्हटले, ''महाराज, माझं असं वाटोळं करू नका. माझ्या मुलीवर आधीच काय कमी संकटं कोसळली आहेत. आई लहानपणीच मरून गेली. कसंबसं लहानाचं मोठं केलंय. शहरात अगरवाल वैश्यांचं एक कुटुंब आहे. ते लोक हिचा उद्धार करायला तयार आहेत. मुलगा चांगला शिकलेला, नोकरी असलेला आहे. पंधरा दिवसांनंतरच लग्नाचा मुहूर्त आहे. अशा स्थितीत तुम्ही सारी मोठी माणसं तिची खोटीनाटी निंदानालस्ती करू लागलात तर तिचं काय होईल, महाराज ? तुम्ही स्वतःच विचार करा. माझ्या मुलीची तुम्ही अशी बदनामी करीत राहिलात तर तुम्ही वाटेल तेवढे मोठे पुढारी असलात तरी रौरव नरकात, किड्यांसारखे वळवळत पडाल. आता यापेक्षा मला जास्त बोलायला लावू नका.''



वैद्यजी सुन्न झाले. गयादीन पुनः म्हणाले, ''तुमचे हे पोळ - काय नावं आहेत त्यांची - छोटू, रूप्पन, सनीचर - बिनीचर - माझ्या मुलीविषयी कसल्या - कसल्या अफवा पसरवताहेत. तुम्ही देखील एवढे मोठे ज्ञानी असूनही असल्या पोरकट गोष्टी करताहात ! आता महाराज, तुम्हांला एवढीच विनंती आहे की तुम्ही स्वतः आपलं तोंड बंद करा आणि तुमच्या या पोळांना आवरा. मुलीचं लग्न कसंबसं पार पडेपर्यंत शांत राहा. आज तुमचा काळ आहे. सगळे लोक तुमच्या पायांवर लोळण घेताहेत पण एवढे शेफारून जाऊ नका. भल्या माणसांनाही शिवपालगंजात राहू द्या.''

वैद्यजी निमूटपणे ऐकत राहिले. नंतर उठून बाहेर जाता - जाता म्हणाले, ''तुम्ही तुमच्या निर्णयानुसार मुलीचं लग्न करून टाका. माझ्याकडून होण्यासारखी काही सेवा असल्यास तीही मी करीन. माझं बोलणं विसरून जा. मला चुकीची माहिती पुरविण्यात आली होती. त्याबद्दल मी दिलगीर आहे.''

परंतु बेलाच्या भावी आयुष्यासंबंधी त्यांनी गयादीनांच्या तोंडून जे काही ऐकले होते त्याबद्दल त्यांना मुळीच वाईट वाटले नव्हते. त्यांना खूपच हलके वाटले आणि ते आनंदाने तेथून परतले.

गयादीननी एक अपूर्ण घटना पूर्ण करून वैद्यजींना सांगितली होती. बेलाचे लग्न अजून ठरले नव्हते. जो तरुण काही दिवसांपासून शिवपालगंजमध्ये 'मुले निर्माण न करण्याचे फायदे' सांगण्यासाठी येऊ लागला होता त्यालाच जावई म्हणून खरेदी करण्याचा विचार गयादीननी चालविला होता. त्याची भेट झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ते शहरात जाऊन त्याच्या बापाला भेटून आले होते. तेथे त्याचे एक कापडाचे दुकान होते. पूर्वी ते छान चालत होते. परंतु दोन वर्षांपूर्वी शेजारीच एक पंजाबी दुकानदार आल्यामुळे त्याच्या दुकानाची घडी विस्कटली होती. दुकान ज्या रस्त्यावर होते त्याच रस्त्याला थोड्या अंतरावर मुलींचे एक कॉलेज होते आणि त्याच्या थोडे पुढेच युनिव्हर्सिटी होती. अनेक वर्षांपासून कॉलेजच्या व युनिव्हर्सिटीतील मुली आपल्याला लागणाऱ्या कापडाची खरेदी त्या तरुणाच्या बापाच्या दुकानातूनच करीत असत. या

मुली फॅशनेबल होत्या, मूर्ख होत्या आणि का कोण जाणे, रोज खरेदी करूनही त्यांना नेहमीच कापडाची चणचण भासत असे. त्यामुळे त्या तरुणाच्या बापाचे दुकान मोठे धूमधडाक्यात चालले होते; आणि त्यांतून मिळणाऱ्या उत्पन्नातून त्या तरुणाने एम. ए. पास करून मुलांचे उत्पादन थांबविण्याची नोकरी मिळविली होती; तसेच त्या तरुणाच्या बहिणीनेही बी. ए. पास करून एक श्रीमंत नवरा पटकावला होता. परंतु पंजाब्याचे दुकान अगदी शेजारीच निघाल्यामुळे सारे चित्रच बदलले होते; कारण त्या दुकानावर बावीस वर्षांचा देखणा तरुण सकाळपासूनच दाढीमिशा साफ करून, टाइट पॅंट आणि घट्ट टी - शर्ट घालून बसत असे; आणि मुली आता तेथेच जाऊन कपडे विकत घेऊ लागल्या होत्या. तो त्यांना 'बहनजी' म्हणत असे आणि सिनेतारकांच्या नावाने डिझाइन केलेले कपडे त्यांना दाखवीत असे; आणि कधी - कधी एकटी - दुकटी मुलगी सापडल्यास तिला ब्लाउज व सुरवार यांच्या नवनवीन फॅशन्ससंबंधी तिने न मागताच सल्ला देत असे. आता मुली ज्या वेगाने कपडे खरेदी करीत होत्या त्यावरून असे वाटत होते की त्यांना पूर्वीपेक्षांही आता कपड्यांची जास्तच चणचण भासत असावी; आणि त्या दिवसा अंगात घातलेला नवीन कपडा या रात्री काढून कुणाला तरी देत असाव्यात. थोडक्यात म्हणजे त्या तरुणाच्या बापाची स्थिती खालावली होती.

त्याने गयादीनना ही सारी स्थिती सविस्तरपणे समजावून सांगितली. त्या सर्वाचा सारांश हाच होता की, ''मुलगा तुमचा आहे. तुम्हांला वाटेल तेव्हा लग्न करून टाका. परंतु आजकाल आमचे दिवस फिरले आहेत. तेव्हा मी माझा मुलगा स्वस्तात विकायला तयार नाही.''

मुलींना भुलवून आणि त्यांना चोळ्या विकून जो कुणी पैसा मिळवील तो कधी- ना- कधी अवश्य दुःखी होईल, असा विचार करून गयादीननी तरुणाच्या बापाला सहानुभूती दाखविली आणि सांगितले की, ''मी जावई विकत घ्यायलाच बाहेर पडलोय. तेव्हा चांगली भरपूर किंमत द्यायलाही मी तयार आहे.'' यामुळे कसलीही अडचण न येता लग्न तर ठरले; परंतु वराची किंमत नक्की ठरली नाही. तरुणाच्या बापाने शेजारच्या पंजाबी तरुणाच्या आगमनापासून आजपर्यंतच्या तोट्याचा हिशेब करून गयादीनकडून पंधरा हजार रुपये मागितले. यावर गयादीननी आपल्या जातीची तारीफ करीत म्हटले की, ''तुमची मागणी योग्यच आहे. कारण हत्तीचं लेंडुक सुद्धा एक क्विंटलचं असतं. त्याप्रमाणे कोणताही दुकानदार दिवाळखोर झाला तरी आपल्या मुलाची किंमत पंधरा हजार रुपये आहे असं सांगू शकतो.'' त्यानंतर त्यांनी शेवटचे म्हणून असे सांगितले की, ''माझी ऐपत तुमच्यापेक्षा खूपच कमी आहे. मी मुलाची किंमत सात हजारापेक्षा जास्त देऊ शकणार नाही.''



अशा प्रसंगी आजपर्यंत कोट्यावधी वेळा जे घडले आहे तेच येथेही घडले. तरुणाचा बाप म्हणाला, ''सात हजार म्हणजे फारच कमी होतात. कारण यापूर्वीच चौदा हजाराला मागणी येऊन गेलीय.'' गयादीन म्हणाले, ''एवढी किंमत देण्याची ऐपत माझ्याजवळ नाही. मी माझ्या ऐपतीप्रमाणं द्यायला तयार आहे.'' यावर तरुणाचा बाप म्हणाला, ''आता मी मुलाच्या काकाशी यासंबंधी बोलतो. तो सध्या अमुक गावी असिस्टंट सेल्स टॅक्स ऑफिसर आहे. तसंच मी मुलाच्या मामाच्या चुलत भावाच्या साडूंशी बोलतो. ते अमुक ठिकाणी डिस्ट्रिक्ट अँड सेशन जज्ज आहेत. ते मुलाला अगदी आपल्या मुलाप्रमाणे मानतात. नंतर मी माझ्या मावस भावाच्या मेहुण्यांशी बोलतो. ते कलकत्त्याला लोखंडाचा व्यापार करतात. तसंच मी मुलाची आई, काकी, आत्या, मावशी, मामी, आजी, पणजी यांच्याशीही बोलतो.''

त्याने गयादीनना आश्वासन दिले की या सर्वांचे मत घेऊन मी दहा दिवसांच्या आत तुम्हांला मुलाची नक्की किंमत कळवतो. परमेश्वराची इच्छा असेल तर तुम्ही - आम्ही अवश्य व्याही बनू. त्याने बेलासंबंधी काहीही माहिती घेण्याचे नाकारले. तो म्हणाला, ''मुलगी शिकलेली असेल तर ठीकच आहे, आणि शिकलेली नसेल तर त्याहून चांगले. कारण मला काही तिला मास्तरीण बनवायची नाही. मुलगी सुंदर असेल तर ठीकच आहे, आणि सुंदर नसेल तर त्याहून चांगलं. कारण मला काही तिला बाजारबसवी बनवायची नाही.''

त्यामुळे जेव्हा वैद्यजींनी गयादीनशी आंतरजातीय विवाहाच्या गुणांविषयी चर्चा करण्यास सुरुवात केली तेव्हा त्यांची पहिली प्रतिक्रिया अशीच झाली की आपण इथून धूम ठोकावी आणि शहरात जाऊन तरुणाच्या बापाच्या हातांत पंधरा हजार रुपये ठेवावेत. वैद्यजींची ब्याद टळताच ते शहरात जाण्याची तयारी करू लागले.

थोड्या वेळाने ते घरातून बाहेर पडले तेव्हा त्यांना खन्ना मास्टर, मालवीय व रंगनाथ येत असलेले दिसले. ते मनात म्हणाले, आता हे तासभर इथून हलणार नाहीत. नंतर त्यांनी मनाशी विचार केला, शहराकडे जायला अजून दोन तासपर्यंत बस मिळणार नाही.

खन्ना मास्टरांनी काही स्थानिक बातम्या सांगून एक वक्तव्य दिले, ''देश रसातळाला चाललाय.''

गयादीन हे स्वतः नीरस व निराशावादी असूनही त्यांना हे मास्टर पुष्कळच मनोरंजक वाटत होते, तसेच त्यांच्या प्रत्येक वाक्यात मूर्खपणाची वीज चमकत

असल्याचे त्यांना दिसून येई. त्यांनी विचारले, "हा रसातळ आहे कुठं ?"

खन्ना मास्टर इतिहास शिकवीत असत. त्यांना भूगोलाचे ज्ञान नव्हते. त्यामुळे या प्रश्नाने ते गडबडले. अखेर त्यांनी वडील मंडळींच्या तोंडून ऐकलेली माहिती सांगितली, "कुठं आहे म्हणून सांगायचं ? स्वर्ग, नरक, पाताळ, रसातळ - सारं काही आपल्या मनातच आहे."

गयादीन थोडा वेळ या तत्त्वज्ञानासंबंधी विचार करीत राहिले. नंतर म्हणाले, "मनातच असेल तर मग चिंता कसली ? जाऊ द्या देश रसातळाला. त्यात कुणाचं काय नुकसान आहे ?"

खन्ना मास्टरांचा उत्साह मावळला. ते म्हणाले, "नुकसान कसलं आलंय म्हणा ? मी आपला एक विचार सांगितला."

गयादीन त्यांना चुचकारत म्हणाले, "सगळेच लोक जेव्हा काही बोलतात तेव्हा कोणता तरी विचारच सांगत असतात."

खन्ना मास्टर गप्प बसले. थोडावेळ थांबून त्यांनी विचारले, "बेलाची प्रकृती कशी काय आहे ? ती आजारी होती म्हणे ?"

मालवीयांनी त्यांच्याकडे रोखून पाहिले. रंगनाथही मनात म्हणाला, "हे मास्टर लोक असेच असतात. वर्गातून बाहेर पडले की नेहमीच काहीतरी मूर्खासारखं बरळतात."

या प्रश्नाची प्रतिक्रिया गयादीनवर काहीच दिसून आली नाही. फक्त ते खन्ना मास्टरांकडे निमूटपणे एक मिनिटभर साध्या भोळ्या, निरागस नजरेने पाहात राहिले. या एका मिनिटाच्या युगात आपण स्वतः कुणीकडे पाहावे हे खन्ना मास्टरांना कळेना. नंतर गयादीननी विचारले, "आता तुमची हालहवाल सांगा. मास्टर साहेब. तुमच्या त्या १०७ कलमाखालच्या खटल्याचं कुठवर आलंय ?"

"तेच तर तुम्हांला सांगायला आलो होतो."

गयादीननी त्यांना आठवण करून दिली, "पण तुम्ही तर रसातळाच्या गोष्टी करीत होता." खन्ना मास्टर अचानक दीन बनले. ते म्हणाले, "आम्हां लोकांना आता तुम्हीच वाचवा. इथं प्रिन्सिपॉल बदडून काढायला बसलाय आणि तिथं कोर्टात डेप्युटी साहेब सगळी हकीगत ऐकून घेण्याच्या पूर्वीच नाराज झालेत."

गयादीननी रंगनाथाकडे पाहिले. ते काही बोलले नाहीत. मालवीयांनी खुलासा केला, "रंगनाथजी या बाबतीत आमच्या बाजूला आहेत. त्यांच्यासमोर बोलायला काही हरकत नाही."

प्रत्येक बुद्धिजीवी स्वतः गटबाजीत सामील असूनही त्याच्यावर गटबाजीचा उघडउघड आरोप केल्यास खवळून उठतो. त्याप्रमाणे रंगनाथ मान हलवून म्हणाला,



"मी कुणाच्याच बाजूला नाही. या प्रकरणात यांच्यावर अन्याय होतोय, म्हणून मला यांच्याबद्दल सहानुभूती वाटते."

गयादीन म्हणाले, "तर मग आपण कुणाच्याच बाजूचे नाही, असं तुम्ही का म्हणता ?"

मालवीयांनी आपले म्हणणे पुढे चालू केले, "इथं प्रिन्सिपॉल साहेबांनी छोटू पहिलवानाला चिथावून दिलंय. परवा रस्त्यानं जाताना तो मला म्हणाला, "मास्टर साहेब अजून काही झालेलं नाही. गुपचुप शिवपालगंज सोडून निघून जा, नाही काही भलतं - सलतं झालं तर तुमच्या घरच्या लोकांना दुःख होईल." असाच सल्ला इतर लोकांनीही दिलाय. बहुदा प्रिन्सिपॉल आम्हांला बदडून काढायचा विचार करतोय. काय करावं, सुचत नाही."

"करणार काय ? निमूटपणे मार खा. मास्तर झाल्यावर माराला कुठवर भिणार?" गयादीन जमिनीकडे रोखून पाहात म्हणाले.

खन्ना मास्टरांना वीरश्री चढली. ते म्हणाले, "आम्ही निमूटपणे मार खाणार नाही. आम्ही ठोशास ठोसा देऊ."

गयादीन काही बोलले नाहीत. खन्ना मास्टर पुनः म्हणाले, "हे काही मोगलाईचे दिवस नव्हेत की कुणीही कुणालाही बदडावं."

"आजचा काळ त्यापेक्षाही वाईट आलाय." गयादीन म्हणाले, "चारपाच वर्षांपासून मी तर हेच पाहातो आहे. तिकडे रंगापूरला हेडमास्तराचा खून झाला की नाही ? काय झालं त्याचं ? खून करणारे आजही लाठ्या घेऊन, मिशांवर ताव देत फिरताहेत."

त्यांनी मान हलवून त्यांना समजावीत म्हटले, "नको, मास्टर साहेब, तुम्ही ठोशास ठोसा देण्याच्या गोष्टी बोलू नका. प्रिन्सिपॉल साहेब आणि बैद महाराज यांचं सामर्थ्य फार मोठं आहे. तुम्ही नेस्तनाबूद व्हाल. परीक्षांच्या दिवसांत दरसाल कितीतरी शिक्षक विद्यार्थ्यांकडून मार खातात. त्यांचं काय चालतं ? टाळकं चोळत सावकाश घरी परत जातात, आणि बायकोकडून पेलाभर पाणी मागून घेऊन पितात. काही जण पोलिस ठाण्यावर तक्रार नोंदवतात आणि पुनः मार खातात."

त्यांना धीर देत ते म्हणाले, "हीच आजकालची रीत आहे. शिक्षक झाल्यावर मारहाणीला भिता कामा नये."

खन्ना मास्टर गार पडले. ते म्हणाले, "मग आम्ही काय करावं ?"

"त्यांचंच म्हणणं मान्य करा." एकतर १०७ कलमाखालच्या खटल्यात तडजोड करा, नाहीतर शिवपालगंज सोडून पळून जा."

"हेच तर रडगाणं आहे." खन्नामास्टर रडण्याचा प्रयत्न करीत म्हणाले.

''प्रिन्सिपॉलकडे तडजोडीचा निरोप आम्ही पाठवला होता. पण त्यांचं म्हणणं असं की शिवपालगंज सोडून निघून जाण्याच्या अटीवरच तडजोड होईल. कोणत्याही परिस्थितीत आम्ही इथून निघून गेलं पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. आता तुम्हीच सांगा, आम्ही काय करावं ?''

गयादीन विचार करू लागले. बराच वेळ विचार केल्यावर आणि आपण विचार करण्याचे काम पूर्ण केले आहे हे सिद्ध करण्यासाठी कपाळावरील आठ्या आत गुंडाळून घेत ते म्हणाले, ''यावर तुम्ही काय करू शकणार मास्टर साहेब ? देशाचा नकाशा समोर उलगडून तो पाहायला सुरुवात करा. कदाचित् त्यात शिवपालगंजच्या पुढचंही एखादं ठिकाण तुम्हांला आढळेल.''

थोडावेळ सर्वजण स्तब्ध बसून राहिले. त्यानंतर ओल्या मातीत गांडुळाने वळवळत उभ्या - आडव्या रेघोट्या उमटवाव्यात त्याप्रमाणे खन्ना मास्टर खटल्याच्या मागील सुनावणीची हकीगत तपशीलवार सांगू लागले.

१०७ कलमाखालच्या खटल्यातील पहिला पक्ष म्हणजे ज्या लोकांच्या भांडखोर स्वभावाबद्दलची पोलिसांनी भविष्यवाणी केली होती ते खन्ना मास्टर, मालवीय आणि त्यांच्या बरोबरचे तीन नवशिके शिक्षक हे होते. हे शिक्षक प्रिन्सिपॉलच्या गटात सामील नसल्यामुळे त्यांच्या विरुद्ध आहेत असे समजण्यात आले होते. दुसऱ्या पक्षात जे लोक होते त्यांच्यासंबंधी खन्ना मास्टरांनी मॅजिस्ट्रेटसमोर अशी भविष्यवाणी वर्तविली होती की 'त्यांच्यापासून माझ्या जिवाला व संपत्तीला धोका आहे.' एका वकिलाने थट्टेने असेही म्हटले की, शिक्षकाजवळ संपत्ती कुठे असते ? आणि शिक्षकाच्या प्राणांची अशी काय किंमत असते ? परंतु मॅजिस्ट्रेटने तिकडे लक्ष न देता दुसऱ्या पक्षाविरुद्धही समन्स काढले होते. या दुसऱ्या पक्षात प्रिन्सिपॉल साहेबांव्यतिरिक्त त्यांचे दोन पुतणे व दोन भाचे होते. हे चौघे गेली तीन वर्षे कॉलेजात अध्यापन करीत होते. परंतु लोकांनी त्यांना अध्यापक मानण्यास नकार दिला होता, आणि त्यांच्याकडे प्रिन्सिपॉलांचे पुतण्ये व भाचे म्हणूनच पाहाण्याची सवय त्यांना झाली होती.

खटल्यामध्ये खन्ना मास्टरांना एका फार मोठ्या अडचणीला तोंड द्यावे लागले. पहिल्या पक्षाच्या बाबतीत पोलिस खात्याचे सगळे संशोधक, इतिहासकार व सर्जक कलाकार यांनी जवळजवळ असे शाबीत केले होते की खन्ना मास्टर व त्यांचे सहकारी भांडखोर आहेत. याच्या उलट खुद्द प्रिन्सिपॉलांच्या विरुद्ध शिवपालगंजमध्ये सबळ



पुरावा न मिळाल्यामुळे कसलाही सुंदर इतिहास ते निर्माण करू शकले नव्हते. त्यामुळे एके दिवशी खन्ना मास्टरांचा वकील प्रत्यक्ष पुराव्याचा तुटवडा आणि युक्तिवादाचा भरपूर उपयोग यांच्या आधारावर प्रिन्सिपॉलविरुद्ध जोरदार भाषण देत होता. एवढ्यात कोर्टाने मान वळवून खन्ना मास्टरांकडे मारक्या म्हशीसारखे पाहिले, आणि विचारले, ''तुम्ही लोक अध्यापक आहात ?''

''होय, साहेब.''

''तुम्हांला लाज वाटत नाही ?''

वस्तुतः शिक्षक असल्याबद्दल त्यांना नेहमीच लाज वाटत असे. परंतु यावेळी मात्र ते मान्य करण्यास मालवीयजींना संकोच वाटला. ते म्हणाले, ''महाशय, अध्यापक असण्यात लाज कसली ?''

''अध्यापक असूनही तुम्ही मवाल्यांसारखे भांडता. १०७ कलमाखाली खटला भरण्यापर्यंत पाळी आलीय. याबद्दल तुम्हांला लाज वाटत नाही ?''

खन्नांच्या वकिलाने कोर्टाला सांगितले, ''महाशय, हीच गोष्ट दुसऱ्या पक्षालाही सांगावी.''

कोर्ट रागात होते. त्यामुळे स्वाभाविकपणेच ते इंग्रजीत गुरगुरले, ''अवश्य सांगितली जाईल. पण या लोकांना मी विचारतो आहेः शिक्षक असून असला खटला लढवायची यांना लाज कशी वाटत नाही ? मला तर हा खटला ऐकतानाच शरमल्यासारखं होतयं. माझ्या मनात विचार येतो, विद्यार्थ्यांवर याचा काय परिणाम होईल ?''

प्रिन्सिपॉल साहेबांच्या वकिलाने सांगितले, ''महाराज, विरोधी पक्षाच्या या शिक्षकांना कचकावून शिक्षा द्यावी. म्हणजे त्याचा विद्यार्थ्यांवर चांगला परिणाम होईल. कारण त्यावरुन गुंडगिरीचा परिणाम वाईट होतो, हे त्यांना कळून येईल.''

परंतु कोर्ट आपल्याच युक्तिवादाच्या जाळ्यात गुरफटले होते. त्याला अकस्मात लज्जेने घेरुन टाकले होते. त्यामुळे इतर साऱ्या गोष्टी मागे पडून एकूण चर्चा लज्जेवर केंद्रित झाली आणि शिक्षक हा किती सन्माननीय प्राणी समजला जात असे या मुद्यावर जाऊन पोचली. तेथून तिथे पुनः पलटी खाल्ली आणि एका मुद्यावरून दुसऱ्या मुद्यावर अशा उड्या मारीत शिक्षकांमधील निष्ठेचा अभाव, संयमहीनता, देशाचे भवितव्य वगैरे निराशावादी विधानांवर जाऊन पोचली. याच विधानांच्या आधारे असे सिद्ध केले जाते की शिक्षकाने त्याग केला पाहिजे, इतर सर्वांचे काम आदर्शांचा अधःपात करण्याचे असून शिक्षकाचे काम मात्र आदर्शांचे उत्थान करण्याचे आहे, आणि हे ओळखून कमी पगार व भरपूर प्रतिष्ठा घेऊन त्यांनी गांधी - नेहरूंसारखे थोर पुरुष निर्माण केले पाहिजेत.

खन्ना मास्टरांना नव्हे पण त्यांच्या वकिलाला अखेर असे कबूल करावे लागले की, "आम्हांला लाज वाटली पाहिजे, हे मी तत्त्वतः मान्य करतो. पण दोन्ही पक्षांना समसमान लाज वाटली पाहिजे."

त्यानंतर कोर्टाने प्रिन्सिपॉलना फैलावर घेतले. त्या विवेचनाचा सारांश असा होता की अशा प्रकारे प्रिन्सिपॉलकी करण्यास त्यालाही लाज वाटली पाहिजे.

"मी प्रिन्सिपॉल असतो तर असल्या शिक्षकांना एक दिवससुद्धा कॉलेजात ठेवून घेतलं नसतं. शिक्षकांच्या भांडणात पोलिस आणि कोर्ट यांचा काय संबंध ? हुशार प्रिन्सिपॉल असता तर त्यानं मुळातच अशा शिक्षकांना कॉलेजात येऊ दिलं नसतं, आणि त्यातूनही ते आले असते तर त्यांना हाकलून लावण्यास एक मिनिटाचाही उशीर केला नसता. हा विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. यात मऊपणा काय कामाचा? पण आमचे प्रिन्सिपॉल तरी कसले ! आमच्या काळी ...."

आता प्रिन्सिपॉल साहेबांच्या वकिलालाही म्हणावे लागले की, "शिक्षकांच्या बाबतीत प्रिन्सिपॉलसाहेबांनी फारच नरमाईचे धोरण स्वीकारलं, आजपर्यंत त्यांनी त्यांच्याविरूद्ध कठोर कारवाई केली नाही, आणि तसं केल्याबद्दल व न केल्याबद्दल प्रिन्सिपॉलना लाज वाटली पाहिजे, हे मी तत्त्वतः मान्य करतो."

या पॉईंटवर चर्चा येताच कोर्टाने खन्ना मास्टरांना सांगितले, "झाला एवढा तमाशा खूप झाला. आता याचा निकाल लागला पाहिजे. तुम्ही एकतर आपसात तडजोड करा, नाहीतर कॉलेज सोडून निघून जा. तसं नसेल तर मला या खटल्याचं निकालपत्र लिहावं लागेल."

यावर फौजदारांनी कोर्टाच्या दयाळूपणावर एक लहानसे भाषण देऊन म्हटले, "हुजूर, निकालपत्र लिहू नका. नाहीतर मोठा गहजब होईल. किती झालं तरी हे बिचारे मास्तर आहेत. त्यांना कुणीतरी चिथवून दिलंय. तुम्ही निकालपत्र लिहिलं तर यांची मोठीच पंचाईत होईल. तुम्ही त्यांना एवढी समज दिलीय तेच पुष्कळ आहे. यांना पुष्कळ समजावण्यात आलं आहे. ते समजले असतील. आता तडजोड होईल याविषयी मला खात्री वाटते. आणखी एका तारखेची संधी यांना द्यावी. तोपर्यंत सारं ठीक होईल. हुजूरांना निकालपत्र लिहावं लागणार नाही."

रंगनाथ म्हणाला, "म्हणजे याचा अर्थ असा की -"

खन्ना मास्टर म्हणाले, "त्याचा अर्थ असा की तारखेहून परतल्यापासून प्रिन्सिपॉलसाहेबांनी मास्टर मोतीरामांना आमच्या मागे लावून दिलंय. आतापर्यंत ते निमूटपणे सायन्स शिकवीत होते आणि आपली पिठाची गिरणी सांभाळत होते. आता परवापासून ते आम्हांला हेच समजावताहेत की मास्तरकीपेक्षा पिठाची गिरणी चालवणं जास्त फायदेशीर आहे. नफ्यासंबंधी बोलतांना ते लाकूड कापण्याच्या यंत्राचाही उल्लेख करत होते. काल संध्याकाळी त्यांनी मालवीयजींकडून पानाचं दुकान चालविण्यात किती फायदा आहे ते समजून घेतलं. आता तुम्हीच सांगा, आम्ही काय करावं ?"



गयादीननी जांभई देत सांगितले, "तडजोड करून टाका."

"पण त्याचा अर्थ —"

"तो अर्थ तर तुम्हीच सांगितलाय मास्टर साहेब ! शिवपालगंज सोडून निघून जाण्याच्या अटीवरच तडजोड होणार असेल तर तेच करा. अहोरात्र कटकट करण्यात काय फायदा ? जास्तीत जास्त काय होईल ? तुम्ही बेकार व्हाल. बेकारी ही तितकी वाईट गोष्ट नाही. कोट्यावधी लोक बेकार आहेत. खरा त्रास कटकटीचा असतो. तिच्यापासून दूर राहिलं पाहिजे."

रंगनाथाला एव्हाना शिवपालगंजमध्ये राहायला लागून सहा महिने झाले होते. त्याची तब्येत सुधारली होती आणि भाषा बिघडली होती. योग्य प्रसंगी गप्प बसण्याची व चुकीच्या प्रसंगी आवेश दाखविण्याची सवय लागू लागली होती. या भांडणात आपण कोठेच नाही, या असहाय्यतेच्या भावनेमुळे त्याच्या मनात हीनगंड उत्पन्न होऊ लागला होता. परिस्थितीच्या विरूद्ध त्याच्या मनात स्वाभाविक रोषही उत्पन्न होत होता; परंतु तो प्रत्येक भारतीयाच्या रोषाप्रमाणे वादविवादाच्या रूपाने निघून जात असे आणि उरला - सुरलेला उत्तमोत्तम खाण्यापिण्याच्या खाली दबून जात असे. आज मात्र हा हीनगंड आणि रोष यांनी एकत्र येऊन त्याची अशी काही अवस्था करून सोडली की त्याने दरडावण्यास सुरुवात केली. त्याने बोलण्याचा प्रारंभ दरडावण्यापासून केला आणि त्याचा शेवटही दरडावण्यातच केला. ते कसेही असो. त्याच्या एकूण बोलण्याचा अर्थ हाच निघाला की, "या परिस्थितीशी भक्कमपणे दोन हात केले पाहिजेत. खन्ना मास्टरांनी माघार घेता कामा नये. अन्यायाशी तडजोड करता कामा नये."

खन्ना मास्टर म्हणाले, "आम्ही काही करू शकत नाही."

रंगनाथाने विचारले, "आणि तुम्ही गयादीनजी ?"

याचे उत्तर म्हणून गयादीननी थांबत - थांबत एक किस्सा सुनावला, "पुष्कळ वर्षांपूर्वी आमच्या या भागात मातापरशाद नावाचे एक गृहस्थ होऊन गेले. या भागातले ते पहिले पुढारी. लोक त्यांचे बोलणे मोठ्या प्रेमाने ऐकत असत. वेळप्रसंगी ते तुरुंगातही जात असत. त्यावेळी लोक जास्तच प्रेमाने त्यांची आठवण काढीत. ते तुरुंगातून सुटून आले की लोक त्यांच्याशी त्याच गोष्टी बोलत. त्यामुळे पुन: जोषात

येऊन त्यांनी तुरुगांत जावे, असाच हेतू त्याच्या मुळाशी असे. एकदा बरीच वर्षे ते तुरुंगात गेल्याशिवाय राहिले. याचा परिणाम असा झाला की लोक त्यांच्या व्याख्यानांना कंटाळून गेले. जमीनदारी - निर्मूलन, स्त्रीशिक्षण, परदेशी मालाचा व दारूच्या गुत्त्यांचा बहिष्कार, या विषयांवरील त्यांची व्याख्यानं लोकांना इतकी तोंडपाठ झाली होती की ते बोलायला उभे राहिले की शाळकरी विद्यार्थी त्यांनी कांही बोलण्यापूर्वीच त्यांच्या व्याख्यानांतील वाक्य म्हणून दाखवत. मग त्यांना बोलायला काही उरतच नसे. ते वर्गणी मागायला गेले की लोकांना वाटे, हा भीकच मागतोय. ते जेव्हा भारतमातेचा जयजयकार करीत तेव्हा लोकांना वाटे, हा आपल्या घराण्याचाच प्रचार करतोय; आणि जेव्हा ते जमीनदारी निर्मूलनांसंबंधी बोलू लागत तेव्हा लोकांना कळून चुकलेले असे की, यंदा यानं सारा भरायचा नाही, असं ठरवलेलं आहे. सांगायचं तात्पर्य असं की मातापरशादांची नेतागिरी या भागात पाच वर्षं कशीबशी चालली. नंतर त्यांच्या लक्षात आलं की आता आपली डाळ शिजत नाही. तेव्हा मग मलाच त्यांना समजावून सांगावं लागलं की, भाई मातापरशाद, पुढाऱ्याच्या अंगी जे गुण असले पाहिजेत ते तुमच्यात नाहीत. पुढाऱ्याला जनतेच्या बारीक - सारीक खाचाखोचा माहीत असल्या पाहिजेत; पण जनतेला मात्र पुढाऱ्यासंबंधी कसलीही माहिती असता कामा नये. इथं तर सारंच उलटं आहे. तुम्हांला जनतेसंबंधी काहीच माहिती नाही; पण जनतेला मात्र तुमच्याविषयी बित्तंबातमी आहे. त्यामुळं हा भाग तुमच्या पुढारीपणाला अनुकूल नाही. तेव्हा तुम्ही एक तर हा भाग सोडून दुसरीकडे निघून जा किंवा काही दिवस तुरुंगात राहून या.'' माझा सल्ला ऐकून मातापरशाद तुरुंगात गेले. त्यानंतर वर्षभरातच तुमचे मामा वैद्यजी कुठल्या तरी दुसऱ्या जिल्ह्यातून इथं आले. त्यांच्याविषयी कोणालाच काही माहीत नव्हते. लोकांना फक्त एवढंच माहीत होतं की त्यांच्या मिशा काळ्याभोर आहेत, शरीर मजबूत आहे आणि त्यांच्या वीर्यपुष्टीच्या औषधांचा खूप गाजावाजा झालेला आहे. त्यांनी सहकारी सोसायटी काढली, एक माध्यमिक शाळा उघडली, आपला आयुर्वेदिक दवाखाना सुरू केला; आणि ते कुणाचे कोण आहेत हे लोकांना कळण्यापूर्वीच ते इथले पुढारी बनले. एका गावाची जमीनदारीही त्यांनी गहाण ठेवून घेतली, सहकारी संस्थेतून कर्ज उशीरा मिळाल्यामुळं लोकांचं नुकसान होऊ नये यासाठी त्यांनी स्वतःची सावकारीही चालू केली. तिकडे मातापरशाद तुरुंगात अडकून पडले आणि इकडे हे लष्कर भरतीच्या कामात गढून गेले. शहरातील शांतता सभांना जाऊ लागले. स्वातंत्र्य मिळाल्यावर त्यांनी जमीनदारीला विरोध म्हणून आपल्याकडे गहाण असलेलं गाव विकून टाकलं आणि पैसा मिळवून 'माजी जमीनदार' या आरोपातून स्वतःची सुटका करून घेतली. तिकडे मातापरशाद तुरुंगातून सुटल्यावर सरकारी पेनशन मिळवून शहरातच आपल्या



पोटापाण्याचा व्यवसाय करू लागले, इकडे, बाबू रंगनाथ, तुमचे मामा या भागाचे अनभिषिक्त राजे बनले.

''बाबू रंगनाथ, पुढारीपण हे एक असं बियाणं आहे की जे आपल्या घरापासून दूर असलेल्या जमिनीतच चांगलं फोफावतं. त्यामुळं मी इथं पुढारीपणा करू शकत नाही. लोक मला जरुरीपेक्षा जास्त ओळखतात. त्यांच्यासमोर माझा पुढारीपणा चालायचा नाही. मी काही बोललो तर लोक म्हणतील, पाहा, गयादीन लीडरी करू लागलेत.

''आणि या खन्ना मास्टरांसाठी तरी मी मुळीच पुढारीपणा करणार नाही. ज्यांना काही कळतच नाही त्यांच्यासाठी कुठवर वकिली करायची ?''

रंगनाथाने त्यांचे व्याख्यान शांतपणे ऐकून घेतले होते. तो म्हणाला, ''पण गयादीनजी, मामांना तुम्हीच चांगलं ओळखता. तुम्हीच त्यांच्यावर थोडाफार प्रभाव पाडू शकाल. खन्ना मास्टरांना तुम्ही काहीतरी मदत केलीच पाहिजे.'' यावर ते म्हणाले, ''खन्ना मास्टरांना मी तर काही मदत करू शकणार नाही. पण तुम्ही करू शकाल. तुम्ही आपल्या मामांविरूद्ध आता बोलू लागलाच आहांत. संकोच निघून गेलाय. शिवाय तुम्ही परगावचे आहात. इथल्या लोकांना तुमचं खरं स्वरूप माहीत नाही. जसे हे खन्ना मास्टर तसेच तुम्ही. आता तुम्हीच पुढाकार घेऊन दाखवा.''

रंगनाथ आवेशात येऊन म्हणाला, ''जरूर दाखवीन. तुम्हांला काय वाटतं ?''

''असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ !'' ते म्हणाले - पण ते मनातल्या मनात. ती मंडळी तावातावाने उठून जात असलेली त्यांनी पाहिली. त्यांना त्यात काहीच स्वारस्य नव्हते. बसची वेळ होत आली आहे आणि पंधरा हजार रुपये ही खूप मोठी रक्कम असली तरी यावेळी बेलापुढे तिची काही किंमत नाही, हे सारे त्यांना आठवले.

## २८

डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन कॉलेजशी संबंधित प्रश्नांची चौकशी करण्यासाठी येणार होते. त्यांच्या आगमनाला आता फक्त चार दिवस उरले होते.

खन्ना मास्टरांच्या घरी जाऊन त्यांच्या तयारीची विचारपूस करावी या हेतूने रूप्पनबाबू व रंगनाथ तिकडे निघाले. देऊळ आणि बसस्टँड यांच्यामधील पायवाटेने जात असता त्यांना एक दृश्य दिसले.

बसस्टँडच्या भोवती असणाऱ्या भिंतीच्या दुसऱ्या बाजूने एक डोके वर आले होते. शरीर भिंतीआड लपले होते. हनुवटी भिंतीवर टेकलेली होती. ते मुंडके मुळीच हालचाल न करता देवळाकडे टक लावून पाहात होते. त्याच्या चेहऱ्यावर ऐसपैस परंतु अस्वाभाविक स्मित होते. दुरून असा भास होई की कुणी माणूस हसत असतांना त्याचे मुंडके कापून ते या भिंतीवर ठेवले असावे.

रूप्पनबाबूंनी थांबून खुणेनेच रंगनाथाचे लक्ष तिकडे वेधले. ते थोडा वेळ तिकडे टक लावून पाहात राहिले. अचानक त्यांच्या लक्षात आले की, हे तर लंगड्याचे डोके आहे.

रूप्पनबाबूंनी त्याला हाक मारली. त्याबरोबर त्याचा गळाही तटाच्या वर आला. दोघेही त्याच्याजवळ जाऊन उभे राहिले, आणि तटाच्या दोन्ही बाजूंनी संभाषण सुरू झाले. रूप्पनने विचारले, ''बसस्टँडवर उभ्या उभ्या काय चाललंय ?''

त्याच्या चेहऱ्यावरील स्मित मावळले होते आणि आता तो स्वाभाविक दिसू लागला होता. तो म्हणाला, ''इथं कोण काय करतं, बापू ? येणारे - जाणारेच इथं येत असतात.''

''परत चाललास वाटतं ? याचा अर्थ तुला नक्कल मिळाली. केव्हा मिळाली ?''

''नक्कल मी जवळजवळ घेतलीच होती, बापू ! पण —''

डाव्या हाताच्या मुठीने त्याने आपल्या कपाळावर चार - पाच बुक्या मारून घेतल्या. जणू तो हातोडाच मारून घेत होता. ते दोघेही निमूटपणे उभे राहिले.

''गेल्या खेपेला दुकानावर तुमची भेट झाली होती तेव्हा तुम्ही केवढा आपलेपणा दाखवला होता. दूध विकत घेऊन पाजलं होतं.''

''त्याच्या दुसऱ्याच दिवशी मला माझ्या गावी जावं लागलं. नात्यातल्या एका माणसाचा मृत्यू झाल्याची बातमी आली होती. गावात पोचताच पुनः तापानं येऊन मला अंथरूणाला खिळवलं.''

''पुरे सत्रा दिवस मी खाटेवर पडून होतो. कालच परत आलोय. बापू, मामलेदार कचेरीत जाऊन चौकशी केली तेव्हा कळलं की पक्ष्यांनी केव्हाच पिकाचा फन्ना उडवलाय.''

''तिथं ते म्हणाले, ''तुझी नक्कल कधीच तयार होऊन आली होती. नोटीस बोर्डावर त्याची सूचनाही लावण्यात आली होती. पण पंधरा दिवसपर्यंत ती घ्यायला कुणी आलंच नाही. म्हणून आम्ही ती फाडून फेकून दिली.' नक्कल तयार झाल्यावर



ती पंधरा दिवसपर्यंत ठेवतात, आणि ती न्यायला कुणी आलं नाही तर ती फाडून टाकतात, मला माहीत नव्हतं.''

एवढं बोलून त्याने हसण्याचा प्रयत्न केला. त्यांनी पाहिले, तो रडत होता.

रंगनाथ त्याला समजावून सांगू लागला, ''हे पाहा लंगड्या, तुला कायदेकानून माहीत असून काही उपयोग नाही. तुला फक्त एकच गोष्ट माहीत हवी की तू जनता आहेस आणि जनतेचा जय इतक्या सहजासहजी होत नसतो.''

त्याने रडणे थांबवून आपली हनुवटी पूर्वीप्रमाणेच भिंतीवर टेकविली आणि तो पापणी न लववता त्या दोघांकडे पाहू लागला.

''हरलास तर काही विशेष नाही. आपल्या गावी जाऊन शेती कर. काही दिवसांनी ही जखम आपोआप भरून येईल.''

''शेती कशी करणार, बापू ? शेताचाच तर दावा चाललाय.''

''तर मग चोरी कर, दरवडा घाल.'' रूप्पनबाबू अचानक कठोर आवाजात म्हणाले.

तो थोडा वेळ गप्प राहिला. नंतर जणू काही तरी विचार करून म्हणाला, ''नक्कल मिळण्यासाठी पुनः अर्ज का करू नये ?''

रंगनाथाने एक दीर्घ उसासा सोडून म्हटले, ''कर बापड्या. पण या खेपेला एक वकील दे. लाच देण्यापासून तू स्वतःला कदाचित बचावशील, परंतु वकील दिल्याखेरीज तुझं काम होणार नाही.''

ते दोघे परत पायवाटेवर आले. रूप्पनबाबूंनी रस्त्यात पडलेल्या एका कुत्र्याला ठोकर लगावली; परंतु त्याने एकदा डोके किलकिले करण्याव्यतिरिक्त दुसरी काही प्रतिक्रिया दर्शविली नाही. ते म्हणाले, ''हा लंगडा शिवपालगंजच्या बाहेरच राहिलेला बरा. इथं आला की कसंसंच व्हायला लागतं. त्याला बघितलं की चांगली थोबाडात द्यावी असं वाटतं.''

''मग देत का नाहीस ?'' रंगनाथाने गुरकावून विचारले; आणि तो मनात म्हणाला, ''इथं आल्यापासून मी आज प्रथमच गुरकावतो आहे.''

# २९

ते लोक खन्ना मास्टरांच्या घरी बसले होते. ते घर म्हणजे एका जुनाट इमारतीतील खोली होती. तिच्या मागील बाजूस एक अंगण, ओसरी आणि कोठडी होती. ओसरीवर स्वयंपाक केला जाई. अंगणातील एका गटारात लघुशंका केली जाई आणि त्याच्याजवळच बसून आंघोळ करण्यात येई. शिवपालगंजमधील पंचाण्णव टक्के घरांप्रमाणे या घरातही स्नानगृह आणि संडास या गोष्टी नव्हत्या.

खोलीत एक लाकडी पलंग. त्याच्यावर एक फाटका गालिचा. त्याच्या एका कडेला अभ्रा नसलेली एक उशी. त्या उशीकडे पाहिल्यानंतर येथे डोक्याला लावण्याचे कडू तेल भरपूर मिळते याची खात्री पटत होती. पलंगाला लागूनच एक भिंतीतील कपाट होते. त्याच्या एका कप्प्यात दाढी भिजविण्याचा ब्रश ठेवलेला होता. त्याच्यावरील साबण वाळून तो कडक झाला होता. त्याच्या शेजारीच एक सेफ्टी रेझर पडलेला होता. त्याच्यावर साबण आणि केस चिकटून वाळले होते. कपाटाच्या त्याच कप्प्यात बूटपॉलिशची एक डबी, एक सेवानिवृत्त ब्रश, एक घाणेरडे फडके आणि साधना नावाच्या एका सिनेमा नटीची चौकटीत बसविलेली तसबीर होती. त्या चित्रात ती अत्यंत कमी कपडे अंगावर ठेवून, 'विलायती नट्यांजवळ जे असतं ते माझ्याजवळही आहे' असेच जणू जाहीर करीत मोठ्या धीटपणे उभी होती.

कपाटाच्या वरच्या कप्प्यात पुस्तके होती. ती म्हणजे डॉक्टर ईश्वरीप्रसाद यांनी लिहिलेला भारतवर्षाचा इतिहास, इतिहासावर 'ग्रॅज्युएट' नावाच्या गृहस्थांनी लिहिलेली काही परीक्षोपयोगी गाइडे, 'खिशातील गुप्त पोलिस' नावाच्या पुस्तकमालेतील काही पुष्पे, 'कल्याण' नावाच्या धार्मिक मासिकाचे खूपच जाडजूड विशेषांक, आणि गुलशन नंदाच्या कादंबऱ्यांचा संपूर्ण संच. खन्ना मास्टर इतिहास शिकवीत आणि हे साहित्य वाचत असत.

उपस्थित मंडळींमध्ये खन्ना मास्टर, मालवीयजी, त्यांच्या गटातील आणखी दोन शिक्षक आणि रंगनाथ हे प्रमुख होते. त्याखेरीज आणखी दोन विद्यार्थी होते. ते त्या भागात बोलाचाली होण्याच्या आधीच मारामारी करण्याबद्दल प्रसिद्ध होते आणि कधी-कधी मनात आल्यास कॉलेजमध्ये जाऊन शिकत असत. या बैठकीसमोर विचारार्थ दोन विषय होते :-

(१) मालवीयजींच्या विरुद्ध छापण्यात आलेले अश्लील पत्रक आणि गेल्या आठवड्यात प्रिन्सिपॉलनी खन्ना मास्टरांशी केलेले गैरवर्तन यांमुळे निर्माण झालेली परिस्थिती.

(२) डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांच्याकडून होणाऱ्या चौकशीची तयारी.

एक तिसरा विषयही होता: प्रिन्सिपॉलचे नाकही कापावे की त्याला फक्त जोड्यांनी मारून सोडून द्यावे. परंतु रंगनाथाच्या उपस्थितीमुळे हा विषय अजेंड्यात सामील करण्यात आला नव्हता.

संभाषण पहिल्या विषयावर चालले होते.

सध्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा चालू होती. खन्ना मास्टरांनी एका मुलाला कॉपी करतांना पकडले. यावर त्या मुलाने असे सांगून टाकले की, ''मी प्रिन्सिपॉल साहेबांच्या बाजूचा असल्यामुळं माझ्यावर कॉपी केल्याचा आळ घेण्यात आला आहे, उलट खन्ना मास्टरांनी आपल्या मर्जीतल्या अनेक विद्यार्थ्यांना कॉपी करण्याची पूर्ण मोकळीक दिली आहे.'' यावर मालवीयजींनी घटनास्थळी जाऊन खन्ना मास्टरांच्या बाजूने बोलण्याचा प्रयत्न केला. परंतु तो मुलगा आधीच ओरडला. ''अरे ए मास्तरा, तू कशाला मध्ये लुडबुड करतो आहेस ? जी पोरं तुझ्याबरोबर शहरात जाऊन सिनेमा पाहून आली आहेत त्यांना तू सबंध पुस्तकच्या पुस्तक उतरून काढू देतोस, आणि आम्ही एखादी ओळ इकडून - तिकडून मिळवली तर तुलाच सगळ्यात जास्त राग येतोय.'' यावर मालवीयजी शरमिंदा होऊन गप्प बसले परंतु खन्ना मास्टरांनी त्या मुलाला खडसावण्यास सुरुवात केली. तेव्हा तो मुलगा अत्यंत गंभीरपणे म्हणाला, ''मी तुमची बेअब्रू करू इच्छित नाही. म्हणून तुम्ही निमूटपणे या खोलीतून निघून जा. नाहीतर मी तुम्हांला खिडकीतून बाहेर फेकून देईन, आणि मग तुमचे हातपाय मोडले तर मी त्याला जबाबदार असणार नाही.''

खन्ना मास्टरांनी प्रिन्सिपॉलांकडे जाऊन तक्रार नोंदवली. यावर ते म्हणाले, ''हे खन्ना जिथं जातील तिथं काही ना काही कटकट व्हायचीच.'' त्यांनी ती तक्रार ऐकण्याचे नाकारले.

यानंतर महायुद्ध पुकारण्यात आले. खन्नांच्या गटातले चारपाच मास्तर प्रिन्सिपॉलांच्या कचेरीत जाऊन पोचले. ते ज्या खोल्यांतून तेथे गेले होते तेथील विद्यार्थी मनसोक्तपणे कॉपी करण्यात गढून गेले. इकडे प्रिन्सिपॉलांच्या खोलीत शिव्यांचा उपयोग हत्यारांसारखा केला जाऊ लागला. अध्यापकांनी प्रिन्सिपॉलना शिव्यांची लाखोली वाहिली. प्रिन्सिपॉलनी आपल्या जोरदार आवाजात त्या शिव्या बुडवून टाकल्या आणि खन्नांना सांगितले की, ''तुम्ही कॉलेजच्या बाहेर चालते व्हा. आणि परीक्षा संपेपर्यंत कॉलेजच्या जवळपास फिरकू देखील नका. तुम्ही जर इथं दिसलात तर तुमच्याशी तोंडानं नव्हे, जोड्यानं बोलण्यात येईल.'' खन्ना मास्टरांनी याला आक्षेप घेतला. त्याबरोबर प्रिन्सिपॉलनी आपल्या शब्दांनाच खेटरांचा आकार देऊन खन्ना मास्टरांना बडवायला सुरुवात केली. त्याला खन्नांनी अधिक जोराचा आक्षेप घेतला. अखेर खन्नांच्या गटाच्याच एका शिक्षकांनी पोलिसाला बोलावले.

पोलिस बोलावण्यासाठी कुठे जावे लागले नाही. विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षेचा शांतता व सुव्यवस्था यांच्याशी घनिष्ठ संबंध असल्यामुळे पोलिस फाटकावरच हजर होता. त्याला बोलावताच तो आला. तेथे खून होत नव्हता अथवा दरवडाही पडत नव्हता. त्यामुळे पोलिसाची आठवण काढताच, घटना समाप्त होण्याची वाट न पाहाता, तो ताबडतोब घटनास्थळी येऊन पोचला. त्याने येताच निर्णय दिला की, प्रिन्सिपॉलांच्या हुकुमानुसार खन्नांनी ताबडतोब बाहेर निघून गेले पाहिजे.

या घटनेचा विद्यार्थ्यांवर फारसा परिणाम झाला नाही. ते निमूटपणे पेपर लिहीत राहिले आणि रीतसर कॉपी करीत राहिले.

याच घटनेला खन्ना मास्टरांशी केले गेलेले 'गैरवर्तन' असे संबोधण्यात आले होते आणि याचसंबंधी या बैठकीत चर्चा चालली होती. खन्ना मास्टर रंगनाथला सांगत होते.

गतवर्षी त्रिपाठींच्या बाबतीतही असंच घडलं होतं. त्यांना सांगण्यात आलं की, बस्स, उद्यापासून कॉलेजात येऊ नका. ते दुसऱ्या दिवशी कॉलेजात गेले. तर कॉलेजच्या फाटकावर बद्री पहिलवानांच्या तीन-चार चेल्यांनी त्यांना येऊन घेरलं. बिचारे त्रिपाठीजी अब्रू बचावून पळून गेले. त्यांनी कोठे जाऊन तक्रार नोंदविण्यापूर्वीच त्यांच्यावर इतके दिवस गैरहजर राहाण्याचा चार्ज ठेवून त्यांना सस्पेंड करण्यात आलं आणि मग काढून टाकण्यात आलं.

''त्यांनी दावा लावलाय. तो आजही चालू आहे. त्यासाठी त्यांना पदरचा पैसा खर्च करावा लागतो. प्रिन्सिपॉलाच्या बाजूनं होणारा खर्च कॉलेज करतं. त्यामुळं या दाव्याची प्रिन्सिपॉलला मुळीच पर्वा वाटत नाही.''

रंगनाथ म्हणाला, ''तर मग तुम्ही काही तरी लौकरच करायला हवं.''

''ते काहीतरी काय, याचाच विचार करायचाय आपल्याला.''

ते सर्वजण बराच वेळ विचार करीत राहिले. ते दोन विद्यार्थी गुलशन नंदाची एक-एक कादंबरी नजरेखालून घालत राहिले. या नाटकात आपली भूमिका विचार करण्याची नाही, हे ते जाणून होते.

मालवीय म्हणाले, ''आपण पोलिसात तक्रार नोंदवावी की, कॉलेजला जातांना माझा रस्ता अडवला जातो.''

खन्ना मास्टर तुच्छपणे हसले. जणू त्यांना म्हणायचे होते, असल्या अकलेच्या बळावर गटबाजी कुठवर टिकाव धरणार ? ते म्हणाले, ''माझा रस्ताच अडवला जाईल याला काय आधार ? कदाचित ते मला कॉलेजात येऊ देतील आणि मग तिथं एकदम बेअब्रू करतील. तक्रार नंतर होईल, आधी तिथं इन्सल्ट होईल.''

मालवीयांनी अत्यंत लक्षपूर्वक हे वक्तव्य ऐकले. नंतर त्यावर भाष्य केले,''याचा



अर्थ असा की तुम्ही तिथं जायला भिताहात.''

खन्ना मास्टर आतापर्यंत मांडी घालून बसले होते. ते अचानक गुडघे मोडून आणि छाती ताणून, शरीरातील उंचवटे व खळगे दाखविणाऱ्या कै. मॅरिलिन मनरोच्या एका प्रख्यात पोझमध्ये बसले. ते आव्हानपूर्वक म्हणाले, ''होय, होय. मी भितोय. तुमची काही हरकत आहे त्याला ?''

मालवीयांनी समजूत घातल्यासारखे करीत म्हटले, ''हरकतीचा प्रश्न नाही. जोपर्यंत तुम्ही तिथं जात नाही आणि ते तुम्हांला काम करण्यास प्रतिबंध करीत नाहीत तोपर्यंत तक्रार कशी काय करता येईल ?''

रंगनाथने सांगितले, ''फर्ड्या इंग्रजीत एक झकासपैकी अर्ज लिहा. डेप्युटी डायरेक्टर इथं चौकशीला आले की त्यांच्यासमोर तो ठेवून द्या. आमच्या प्रिन्सिपॉल साहेबांचा चेहरा काळवंडून जाईल.''

खन्ना मास्टर म्लानपणे हसले. ते म्हणाले, ''रंगनाथ तुम्ही देखील ... काय म्हणायचं ? या डेप्युटी डायरेक्टरांकडून मला कसलीही आशा वाटत नाही. ज्या कुणाची शेपटी वर उचलून पाहावी ती मादीच असल्याचं आढळून येतं.''

यावर एक मास्तर हसू लागला. तिकडे विद्यार्थ्यांनाही 'मादी'चा उल्लेख कानांवर पडताच गुलशन नंदाच्या कादंबऱ्या वाचणे थांबविले. आता ते कव्हरवरील बाईच्या चित्राकडे लक्षपूर्वक पाहू लागले आणि या लोकांचे बोलणे ध्यान देऊन ऐकू लागले. मालवीयजी म्हणाले, ''तरीपण हे डेप्युटी डायरेक्टर नवीन आहेत. यांच्याकडून आशा करण्यास हरकत नाही. मोठे कडक आहेत, असं ऐकतो. मोठमोठ्या पुढाऱ्यांनाही बसायला खुर्ची देत नाहीत म्हणे. ते निष्कारण बडबडू लागले की त्यांना बाहेर हाकलून देण्याची धमकी देतात.''

''तुम्ही नुसते ऐकतच राहा, मालवीयजी. मला सगळं ठाऊक आहे.'' खन्ना निराशेने उद्गारले, ''जे पुढारी विरोधी पक्षाचे असतील त्यांच्याशीच ते कडकपणानं वागतात. ते मोठे बनेल अधिकारी आहेत. अर्धे पुढारी आणि अर्धे अधिकारी. दोन-चार पुढाऱ्यांना त्यांनी आपल्या बाजूला वळवून घेतलंय. रात्री जाऊन त्यांच्यासमोर शेपटी हलवतात आणि दिवसा त्यांच्याच जिवावर इतरांशी कडकपणानं वागतात.''

मालवीयजी म्हणाले, ''ते काही असो. पूर्वीच्या डेप्युटी डायरेक्टरांपेक्षा ते लाखपटींनी चांगले आहेत.''

आणि ते रंगनाथाला सांगू लागले, पूर्वीचे डेप्युटी डायरेक्टर म्हणजे गोगल गाय आणि पोटात पाय असे होते. त्याबद्दल त्यांची ख्याती होती. आम्ही दोन-तीन शिक्षक त्यांच्याकडे डेप्युटेशन घेऊन गेलो आणि त्यांना सगळी हकीगत सांगितली. अगदी लक्ष देऊन त्यांनी आमचं म्हणणं ऐकलं. नंतर जेव्हा ते बोलू लागले तेव्हा आम्हांला

असा भास झाला की या गावचे गयादीनच बोलताहेत.

''ते म्हणाले, 'अहो, तुमचं कॉलेज तर फारच चांगलं आहे. तुम्ही म्हणता की तिथं फक्त गटबाजी आहे, मुलांचं शिक्षण नीट होत नाही, हिशोबात घोटाळे आहेत, परीक्षेत कॉपी करू दिली जाते, प्रिन्सिपॉल तुमच्याशी गैरवर्तन करतो' मैयाजी, हे काय बोलणं झालं ? हे सारं तर सगळ्याच कॉलेजातून चालतं. मुलांचे शिक्षण नीट होत नाही तर कुणी काय करावं ? मुलं स्वतःच शिकू इच्छित नाहीत, तर त्यांना कोण कसं शिकवणार ? आमच्या काळी चांगली घरंदाज मुलं शिकायला येत, ती लक्ष लावून शिकत. आता भंग्यांची आणि चांभारांची पोरं शिकायला येतात. तेव्हा शिक्षण होणार कसं ?'' तुम्ही स्वतःच सांगा ना मैयाजी !

''खरं म्हणाल तर तुमच्या कॉलेजची कीर्ती फार चांगली आहे. बैदजी मॅनेजर आहेत. मोठे सात्त्विक गृहस्थ आहेत. मांस-मच्छर खाणं तर दूरच राहिलं, कांदा लसूणसुद्धा खात नाहीत. अन् असं पाहा, तुमचं कॉलेज तोट्यात चालत नाही. तुम्हांला महिन्याच्या महिन्याला पगार मिळतो. तिथं कधी अफरातफर होत नाही. कधी संप होत नाही. आतापर्यंत कॉलेजच्या इमारतीला कधी आग लावण्यात आली नाही. कधी चोरी झाली नाही. कधी कुणाचा खून झाला नाही. सारं काही व्यवस्थित चाललंय. अहो, तुमचं कॉलेज म्हणजे एक आदर्श कॉलेज आहे.''

''रंगनाथबाबू, डेप्युटी-डायरेक्टर अशा प्रकारे आम्हांला शांततेवर प्रवचन देत राहिले. जणू ते शिक्षणाधिकारी नसून एखाद्या पोलिस चौकीचे फौजदार होत. आम्ही तेथून निघतांना ते म्हणाले, ही तक्रार-बिक्रार करणं बरोबर नाही. तुम्हाला काही त्रास होत असेल तर सरळ बैदजींना जाऊन सांगा. ते सारं ठीक करतील.''

''रंगनाथबाबू, आम्हीही मग मनात म्हटलं की साल्या, तू मोठी गरीब गाय आहेस, तर मग एखाद्या डेअरीत जाऊन स्वतःला दाव्यानं बांधून घे की. चारा खा आणि दूध दे. इथं कशाला बसला आहेस ?''

सर्वजण हसू लागले. मुले खास करून हसली आणि पुनः कादंबऱ्यांवरील बायांची चित्रं पाहाण्यात गढून गेली. मालवीयजींनी आपले भाषण संपवीत म्हटले, ''परंतु या डेप्युटी डायरेक्टरांविषयी मला आशा वाटते. या खेपेला आम्ही तक्रार करताच ते म्हणाले, तुम्ही जाऊन निमूटपणे आपलं काम करा. मी स्वतःच तिथं येईन आणि चौकशी करीन.''

खन्ना मास्टरांनी निराशेने मान हलवून म्हटले, ''उँ ऽ हूँ ! मला मुळीच आशा वाटत नाही. हे निवडणुकीचे वर्ष आहे. मी तर असं ऐकलंय की तो कॉलेजला पहिल्यापेक्षा दुप्पट पैसा देववणार आहे. यंदा सगळ्यांना मोकळं रान आहे. चौकशी परवाच होईल. पण त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. काय करावं ?''



विद्यार्थी अजूनपर्यंत काही बोलले नव्हते. त्यांच्यापैकी एकाने बोलण्यासाठी तोंड उघडले. तो शिवपालगंजच्या प्रसिद्ध पोषाखात होता. म्हणजे रेघारेघांच्या पायजम्यावर त्याने बनियन न घालता मलमलीचा सदरा घातला होता. त्याने गुळगुळीत गोटा केलेला होता. त्याच्या एकूण अवतारावरून तो गुंड असावा असे वाटत होते. तो बोलल्यानंतर तो जसा दिसतो तसाच आहे, हे सिद्ध झाले. तो म्हणाला, ''मास्टर साहेब, चौकशी-बिवकशीतून काही निघायचं नाही. सरळ मार्ग तोच आहे. तुम्ही नुसता हुकूम द्या, एखाद्या दिवशी इथंच अंधारात-उजेडात प्रिन्सिपॉल साहेबांची भरतभेट घडवून आणू.''

दुसऱ्या विद्यार्थ्याने याचा अर्थ स्पष्ट करून सांगितला, ''फक्त नाक कापायचं. जीव घ्यायची जरूर नाही.''

रंगनाथाची भलतीच कुचंबणा होऊ लागली. काही दिवसांपासून तो खन्ना मास्टरांच्या अडचणीमध्ये लक्ष घालू लागला होता. अध्यापकांच्या या गटाविषयी त्याला सहानुभूती वाटू लागली होती. विशेषतः काहीही लेखी आज्ञा न देता केवळ मारहाण करून प्रिन्सिपॉलनी खन्ना मास्टरांना कॉलेजात येण्यास आडकाठी केली आहे, याचा त्याला फार राग आला होता. अलीकडे दोन-चारदा त्याला या लोकांबरोबर फिरतांना पाहून वैद्यजी व प्रिन्सिपॉल साहेब त्याच्याकडे पाहून हसू लागले होते. त्यानेही, 'मी खन्ना वगैरे मंडळींचा दृष्टिकोण समजून घेऊन तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न करतोय असे सांगून त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला होता. त्याचे हे म्हणणे वैद्यजींनी नुसते ऐकून घेतले होते. त्यावर ते काही बोलले नव्हते.

ते विद्यार्थी ज्या आत्मविश्वासाने प्रिन्सिपॉलचे नाक कापण्याच्या गोष्टी बोलत होते आणि त्या कृत्याला भरतभेटीचे नाव देत होते ते पाहून रंगनाथ गडबडला होता. त्याला रामायणाची कथा आवडत होती. तो मनाशी म्हणाला, भरतभेटीनंतर प्रिन्सिपॉलांना राज्याभिषेक करण्याची पाळी आली तर दोन-चार दिवसांनी हे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याबरोबर मलाही खुनाच्या आरोपावरून पोलिस कस्टडीत रहावं लागेल. आरोग्याच्या दृष्टीने शिवपालगंजचे हवापाणी कितीही चांगले असले तरी तेथील पोलिस कस्टडीची या बाबतीतील ख्याती काही चांगली नव्हती.

तो उठून उभा राहिला परंतु तो चालू लागणार इतक्यात बाहेर कुणाची तरी पावले वाजली, आणि दार उघडून रूप्पनबाबू आत आले.

आज ते वीराच्या वेशात होते. धोतराचा सोगा नेहमीप्रमाणे खांद्यावर टाकला होता, रेशमी रूमाल गळ्याभोवती लपेटला होता, केसाची एक बट कपाळावर रूळत होती, चेहरा तेलाच्या व पाण्याच्या तेजाने तळपत होता. ओठांच्या कोपऱ्यातून पानाचा मुखरस पाघळत होता. आत येताच ते म्हणाले, ''बसा, बसा तुम्ही मंडळी. मला

अजून पुष्कळ काम आहे. मी आता थांबत नाही.''

त्यांनी सिंहाप्रमाणे चोहोकडे नजर फिरविली. परंतु इतरांच्या नजरेला ते सिंहासारखे दिसले नाहीत. त्यांच्या दृष्टीने तो एक साध्याभोळ्या, शेलाट्या, देखण्या तरूणाचा चेहरा होता. त्याचे डोळे काहीसे पाणवल्यासारखे आणि ओठ रोजच्यापेक्षा थोडे अधिक नाजुक दिसत होते.

रंगनाथ म्हणाला, ''बैस रूप्पन, मीही येतोच''

''छेः छेः ! दादा, मला एक मिनिटही थांबायला वेळ नाही. मी फक्त एवढंच सांगायला आलो होतो की मी आसपासच्या गावांमध्ये सगळा बंदोबस्त करून आलोय. या कॉलेजसंबंधी या भागातले सारे लोक निर्भयपणानं खरी स्थिती सांगतील. सगळी जनता आपल्या पाठीशी आहे.''

ते आवेशात होते. ते पुढे म्हणाले, ''पिताजीना हेच हवं होतं. मग हेच घ्या म्हणावं. खोटारडेपणानं वस्तुस्थिती लपून राहात नाही, हे त्यांनाही एकदा कळू दे.''

खन्ना मास्टरांनी त्यांच्या कल्पनाविहाराला बांध घालीत म्हटले, ''बसा तर खरे रूप्पनबाबू, काय-काय करून आला ते सांगा ना.''

''जरा लौकर समजून घ्यायचा प्रयत्न करा.'' रूप्पनबाबू म्हणाले, ''उद्या सगळं काही समजेलच. इथंच शिवपालगंजमध्ये पाचशे माणसांच्या समोर डेप्युटी डायरेक्टर प्रिन्सिपॉलना शंभर जोडे मारील. त्यानं नाही मारले तर तुम्ही मला शंभर जोडे मारा.''

आवाज चढवून ते पुढे म्हणाले, ''आता तुम्ही आरामात झोपा. उद्याचं उद्या पाहाता येईल.'' आणि ते हुकुमी आवाजात म्हणाले, ''चल रंगनाथ दादा, आपण निघू. मास्टर साहेबांना आराम करू दे.'' मोठ्या उत्साहाने त्यांनी एक हात वर उचलून मुलांना आशीर्वाद दिल्यासारखे केले. पानिपताच्या मैदानावर सैन्याच्या एका तुकडीला आव्हान देऊन दुसऱ्या बाजूने हल्ला करण्याचा हुकूम द्यावा, त्याप्रमाणे ते म्हणाले, ''तयारीत राहा पठ्ठ्यांनो !''

ते खोलीतून बाहेर आले. रंगनाथ त्यांच्या मागोमाग होता. दोघेही थोडा वेळ निमूटपणे चालत राहिले. रस्त्यावर आल्यावर रंगनाथाने रूप्पनबाबूंच्या खांद्याला स्पर्श केला. रूप्पनबाबूंनी चमकून त्यांच्याकडे पाहिले. नंतर दुसरीकडे पाहू लागले.

रंगनाथाने त्यांच्या खांद्यावर हात ठेवून सौम्य स्वरात विचारले, ''रूप्पन, तू दारू प्याला आहेस ?''

रूप्पनबाबू रूबाबात चालले होते. त्यांचे पाय लटपटत नव्हते. दुसरीकडे पाहात ते म्हणाले, ''तू म्हणत असशील तर हो म्हणतो, नाही तर नाही.''

''जे खरं असेल तेच सांग.''

''खरं म्हणजे काय ? कुठल्या पक्ष्याचं नाव आहे ते ? कोणत्या घरट्यात राहातो



तो ? कुठल्या जंगलात सापडतो तो ? रूप्पनबाबू खदखदून हसले आणि म्हणाले, ''दादा, हे शिवपालगंज आहे. इथं खरं काय नि खोटं काय ते सांगणं कठीण असतं.''

रंगनाथने घराकडे जाणारा रस्ता बदलला. रूप्पनचा कोपर धरून तो दुसरीकडे जात म्हणाला, ''चला. हेही ठीक आहे. पुढं एखाद्या पुलावर बसून हवा खाऊ.''

थोडा वेळपर्यंत ते हळूहळू रस्त्याच्या निर्जन भागाकडे चालत राहिले. नंतर रूप्पनबाबू स्वतःच म्हणाले, ''कधी ना कधी सुरूवात करावीच लागली असती. शिवपालगंजात राहायचे असेल तर असंच राहावं लागेल.''

थोडा वेळ थांबून, निष्कारणच चिडून ते म्हणाले, ''इथं महात्मा गांधी बनून भागणार नाही.''

ते रस्त्याच्या कडेला एका लहान पुलावर बसले. ते रंगनाथाला खेटून बसले होते. त्यांनी आपला एक हात रंगनाथाच्या खांद्यावर प्रेमाने ठेवला होता. एवढी गोष्ट वगळल्यास त्यांच्यात काही वेगळेपणा अथवा दारूचा परिणाम दिसत नव्हता. रंगनाथाने त्याच्या विधानाला हरकत घेत, मोठेपणाचा आव आणून म्हटले, ''काय बडबडतो आहेस रूप्पन तू हे ? शिवपालगंजची सबब सांगून आपल्या आचरणात दोष आणणं हे काही बरं नव्हे. जगाच्या पाठीवर काही नुसतं शिवपालगंजच नाही. तुझ्या-माझ्यासाठी एवढा सारा देश मोकळा पडलाय.''

रूप्पन दुर्मुखलेला चेहरा करून बसले होते. ते पुटपुटले, ''मला तर असं वाटतंय दादा, की संबंध देशभर हे शिवपालगंजच पसरलेलं आहे.''

प्रिन्सिपॉल साहेबांवर एकामागून एक संकटे कोसळू लागली. परवा डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन चौकशी करायला येणार. त्यांची सगळी व्यवस्था डाकबंगल्यावर करावी लागेल. त्यांनी कॉलेजच्या कारकुनाला काही सूचना केल्या. ते दारात उभे राहून त्याला सूचना देत होते आणि तो खुर्चीवर बसल्याबसल्या कैरीची थंडाई पीत होता. त्यांचे सगळे बोलणे झाल्यावर तो म्हणाला, असले फडतूस लोक रोजच येत असतात. आम्ही कुठवर त्यांच्या मागे धावत फिरायचं ? ''प्रिन्सिपॉल साहेबांनी कारकुनाला दोस्तीच्या सुरात सांगितले, ''हे डेप्युटी डायरेक्टर खुष झाले तर आमचा काही फायदा करून देतील असं नाही, पण ते नाराज झाले तर मात्र आमचं खूपच नुकसान करू शकतील.'' या विषयावर त्यांनी एक लहानसे प्रवचन प्रसारित केले. परंतु कारकुनावर त्याचा काही परिणाम झाला नाही. त्याने मख्खपणे थंडाईचा

पेला रिकामा केला आणि तृप्तपणे एक असभ्य ढेकर दिली. त्या ढेकरामागे अनेक वर्षांचा ऐतखाऊपणा आणि अपचन यांचा हात होता. तो म्हणाला, ''जोपर्यंत काका इथं आहेत तोपर्यंत कुणीही आपलं काही वाकडं करू शकणार नाही.''

काका म्हणजे वैद्यजी. प्रिन्सिपॉलांनी ओळखले की कारकून आज काहीही काम करण्याच्या मनःस्थितीत नाही, आणि त्याला काही करण्यास भाग पाडण्यात आले तर तो बाकावर आडवा होईल आणि आपल्या जुनाट पोटदुखीची तक्रार करू लागेल. तसे झाल्यास तो उद्याही काम करणार नाही. ''त्यांचाच तर आधार आहे,'' असे म्हणून वैद्यजींची अनावश्यक खुशामत करीत ते बाहेर पडले. आता आपल्या विश्वासातील एका शिक्षकाला बोलावून त्याला सूचना द्याव्यात असा त्यांचा विचार होता. परंतु तो शिक्षक एका विद्यार्थ्याला घेऊन सिनेमा पाहाण्यासाठी शहरात गेल्याचे त्यांना समजले. ''आतापर्यंत एकटे मालवीयच असं करीत होते. आता या महाराजांनीही तीच लाइन धरलेली दिसते.'' प्रिन्सिपॉल जोराने ओरडले. उद्याची व्यवस्था कोणावर सोपवावी याचा विचार करीत त्यांनी कुणा अज्ञात व्यक्तीला आणि कुणा अज्ञात परिस्थितीला अवघीतून मनसोक्त शिव्या देण्यास सुरुवात केली. यावर त्यांचा पट्टेवाला बडबड करीत त्यांच्या पुढून निघून गेला. त्याने पायात खडावा घातल्या होत्या आणि कपाळाला भरपूर गंध फासले होते.

ते वैद्यजींच्या घरी जाण्यास निघाले. इतक्यात वळवाच्या पावसापूर्वी येणाऱ्या वादळाने त्यांचा रस्ता अडविला. त्यांच्या डोळ्यांत धूळ भरली. रस्त्याच्या कडेला असलेल्या पानपट्टीच्या दुकानावरील छप्पर उडाले आणि त्यांच्या खांद्याला स्पर्श करीत ते रस्त्यावरच कोसळले. त्या गडबडीत त्यांचा पाय शेणाच्या पोहावर पडला, त्यामुळे त्यांची चप्पल आणि घोटे नायट्रोजनच्या भांडाराने भरून गेले. प्रिन्सिपॉलनी खन्नाना एक-शिवी हासडली. नंतर मेघगर्जना व विजेचा चमचमाट होऊन गारा पडू लागल्या. त्यांनी खन्ना मास्टरांना पुनः शिवी दिली, आणि दोन-तीन माणसांना धक्के देत, एका कुत्र्याची शेपटी तुडवत ते एका चहाच्या हॉटेलात घुसले.

वादळ-वारा आणि गारा यांचा खेळ संपल्यावर ते हळूहळू वैद्यजींच्या घराकडे जाऊ लागले. वाटेत भेटणारे शेतकरी खळ्यावरून जे धान्य अजून घरी आणलेले नाही ते भिजून खराब होईल या विषयावर चर्चा करीत होते. परंतु त्यांनी तिकडे फारसे लक्ष दिले नाही. त्यांच्या पायाला शेण लागले होते आणि त्यांच्या दृष्टीने ती जगातील सर्वात मोठी दुर्घटना होती. रस्त्याने जाणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याकडे पाहून ते मनात म्हणत, ''आता हा माझा पाय पाहून हसणार.'' पण कोणीही तसे केले नाही. प्रिन्सिपॉल साहेब वैद्यजींच्या घरी पोचले.

बैठकीचा दरवाजा बंद होता. त्यांनी कडी वाजवून तो उघडण्याची खूण केली. तो



बहुदा धुळीपासून संरक्षण व्हावे म्हणून बंद करण्यात आला होता. दरवाजा उघडताच पलंगावर वैद्यजी, बद्री पहिलवान, सनीचर व छोटू बसलेले दिसले. त्या लोकांचे चेहरे गंभीर होत होते. वैद्यजींनी खुणेनेच प्रिन्सिपॉल साहेबांना आत येण्यास सांगितले. यावर त्यांनी आपल्या नेहमीच्या उत्साहपूर्ण भाषेत सांगितले की, ''एक लोटाभर पाणी मागवा. पाय धुवूनच आत यायला हवं. कारण माझा पाय गोमातेच्या मैल्यावर पडलाय.'' या विनोदाला कोणी हसले नाही. सनीचरने उठून निमूटपणे त्यांना पाण्याचा एक भरलेला तांब्या दिला. प्रिन्सिपॉल साहेब दात काढून हीः हीः करीत आत गेले आणि वैद्यजींच्या पायांना स्पर्श करून त्यांच्या जवळच बसले. बद्री पहिलवानांनी विचारले, ''काय रागरंग आहे प्रिन्सिपॉल साहेब ?''

''आमचा रंग तर नेहमीच पक्का असतो.' त्यांनी हिम्मत करून विनोदाचा दुसरा प्रयत्न केला, ''तुमचा रागरंग सांगा. वरातीबरोबर आम्हांला केव्हा निघायचं आहे ?''

यावर बद्री पहिलवानांनी त्यांच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. जणू वरातीचा अर्थ त्यांना समजला नव्हता. वैद्यजींनी विचारले, ''कुणाची वरात, प्रिन्सिपॉल साहेब ?''

''आमच्या नव्या मॅनेजिंग डायरेक्टर साहेबांची. गावातल्या गावातच लग्न असलं म्हणून काय झालं ? वरात ती वरात. मीही एक सिल्कचा नवा सदरा शिवायला टाकलाय. त्याचे पैसे तुमच्याच खिशातून वसूल केले जातील. काय मॅनेजिंग डायरेक्टर साहेब ?'' प्रिन्सिपॉल साहेबांनी बद्री पहिलवानांना हसत हसत विचारले. इतका वेळ चीड आणि वैताग यांचे ओझे वाहिल्यानंतर ते आता पुनः हलके फुलके होऊ लागले होते.

बद्री पहिलवान छोटूशी दुसऱ्याच कोणत्या तरी विषयासंबंधी बोलू लागले. प्रिन्सिपॉलांच्या प्रश्नाला उत्तर देणे त्यांना आवश्यक वाटले नाही. वैद्यजी म्हणाले, ''बद्रीचं लग्न यंदा तरी होत नाही. तुम्ही कुणाच्या लग्नाविषयी बोलताहात ?''

''का बरं ? गयादीनजींची —''

वैद्यजींनी हात वर करून त्यांना मध्येच अडविले आणि म्हटले, ''तुम्ही देखील शत्रूंच्या जाळ्यात अडकलात ? अत्यंत खेदाची गोष्ट आहे.''

प्रिन्सिपॉल साहेब बुचकळ्यात पडले. संबंध गावभर बद्री आणि बेला यांच्या लग्नाची चर्चा चालू होती आणि —''

''शत्रूंनी गयादीनजींच्या कन्येला बदनाम करण्यासाठीच या अफवा पसरविल्या होत्या. खुद्द तुम्हांला माहीतच आहे की बेला म्हणजे मूर्तिमंत देवता आहे आणि बद्री पूर्णपणे निष्कलंक आहे. त्या दिवशी शहरातून परत आल्यावर मी चौकशी केली तेव्हा मला समजलं की याच्या मागेही शत्रूचा कट आहे. मी मग मनाशी म्हटलं की हा विषय मनातून काढून टाकणंच मुलीच्या हिताचं ठरेल. बिचारे गयादीनजी तर या

बदनामीला भिऊन शहरात पळून गेलेत. ते आपल्या मुलीचं लग्न तिथंच कुणाशी तरी करून टाकणार आहेत. धन्य आहे ! हे गावही अद्भूत आहे.''

बद्री पहिलवान उठून बाहेर निघून गेले होते. छोटू दुसरीकडे पाहात आपल्या उघड्या जांघेवर उजवा हात फिरवू लागला होता. आपला गावढळपणा व्यक्त करण्याचा त्याच्या जवळ हाच रामबाण उपाय होता. सनीचरने सरपंच या नात्याने आपली जबाबदारी ओळखून म्हटले, ''या गावाला मीच वठणीवर आणीन. मला सरपंच झाल्याला दिवस तरी असे किती लोटलेत ?''

बेडकालाही पडसे होऊ लागले आहे, असा विचार मनात आणून छोटू पचकन जमिनीवर थुंकला. सर्व लोक थोडा वेळ गप्प बसून राहिले. वैद्यजी पुढे बोलू लागले, ''कुणाच्याही मुलीविषयी खूप विचार करून बोललं पाहिजे. कोण जाणे, कुणा शत्रूनं अशी अफवा पसरवली होती की बद्री स्वतःच गयादीनच्या घराण्याशी शरीरसंबंध स्थापन करू इच्छितात —''

छोटूने आपल्या जांघेवर हात फिरविणे थांबविले आणि म्हटले, ''मी काही बोललो तर तुम्ही राग मानाल, महाराज.''

''तू मूर्ख आहेस. जोपर्यंत तू काही बोलत नाहीस तोपर्यंतच तुझी शोभा.'' वैद्यजी कडकपणे म्हणाले, ''तुम्हीच लोकांनी पोरकटपणानं वाटेल त्या अफवा पसरवल्या; आणि गयादीनजींचा अपमान केला. आता गप्प बसा. त्याच्या मुलीचं लग्न निर्विघ्नपणानं पार पडू द्या. बस्स. हा मुद्दा इथंच संपला. पुनः या विषयाची चर्चा होता कामा नये.'' असे म्हणून ते लोडाला टेकून आडवे झाले. जणू एखाद्या मुगल बादशहाने कुणा गुलामाला हद्दपारीची शिक्षा दिली होती आणि त्यावर तो काहीही ऐकायला तयार नव्हता.

## ३०

ज्या काळी भारतवर्षावर गोऱ्यांचे राज्य होते (अर्थात् यापुढे लिहिला जाणारा इतिहास ही गोष्ट मान्य करण्याची परवानगी देत असेल तरच !) नद्यांच्या काठी, घाटांमध्ये, अरण्यांत व आंबरायांमध्ये - म्हणजे जेथे कोठे वर्डस्वर्थ, रवींद्रनाथ ठाकुर अथवा सुमित्रानंदन पंत यांच्या कविता आपोआप गळ्यापर्यंत येतील अशा ठिकाणी - डाकबंगले बांधण्यात आले होते. धूळ-धुरळा, कॉलरा-देवी-प्लेग, उपासमार-गरिबी, कुरूपता-असभ्यता-विरसता वगैरे गोष्टी तेथे क्वचितच जाऊन पोचत. गोरे व काळे असे दोन्ही वर्णांचे साहेब खेड्यांतून दौऱ्यावर जात तेव्हा तेथेच उतरत.

ज्याप्रमाणे आज पिकनिकला सहज दौऱ्यांचे रूप देणे शक्य असते त्याप्रमाणे त्याकाळी या डाकबंगल्यांत राहून दौऱ्याला पिकनिकचे रूप देता येत असे. साहेब लोक तेथे बसून सत्तेच्या आधारे समस्यांना व समस्यांच्या आधारे सत्तेला मजबूत बनवीत, झाडे झुडुपे, पशु-पक्षी, जीव-जंतू इत्यादींवर रिसर्च करीत, कधी शेळ्या वळणाऱ्या नेटिव्ह मुलींची धडधाकट प्रकृती पाहून आश्चर्यचकित होत, कधी त्या भागातील उनाड बायकांना अशी खात्री देत की कपडे आणि शिंपी यांनी कितीही कट रचले तरी, पौर्वात्य व पाश्चात्य माणसांमध्ये काहीच मुलभूत फरक नाही, कधी भेटीतून आलेल्या स्कॉच-व्हिस्कीच्या बाटल्या फोडत, कधी हसत, कधी नाराज होत, कधी गप्प बसत, तर कधी जनता व सरकार यांच्यामध्ये डोंगराची, कधी वाळवंटाची, कधी शेणाच्या ढिगाची, कधी नदीची तर कधी पुलाची भूमिका बजावत.

या गोष्टी प्राचीन काळच्या आहेत. आता शहरांत खेड्यांची चलती आहे. खेड्यांत प्रायमरी स्कूल आणि पंचायत, घरे बांधली गेली आहेत, आणि जोपर्यंत एखादा माणूस स्वतःच प्लेग बनत नाही तोपर्यंत प्लेग हा रोग नामशेष झाला आहे. एखादा सुशिक्षित म्हणजे इंग्रजी शिकलेला इसम आता शहरातून खेड्यात गेला तर ती त्याची हाराकिरी आहे, असे मानले जात नाही. काळा साहेब शहरातून खेड्यात गेला आणि तेथे एखादा दिवस थांबून, तेथील पाणी पिऊन, कसलाही सांसर्गिक रोग किंवा आजार न होता, हसत खेळत, सहीसलामत परत आला, अशी शेकडो उदाहरणे घडली आहेत. या उदाहरणांमुळे खेड्यांविषयी लोकांचे मत बदलले आहे. तेथील पाण्यासंबंधी शेवटचा निर्णय देणे अजूनही तसे अवघडच आहे, परंतु अहोरात्र धुळीचे लोट उडवीत पळणाऱ्या जीपगाड्यांच्या द्वारे एवढे तरी नक्कीच स्पष्ट झाले आहे की आजपर्यंत शहरांपुरताच मर्यादित असलेला हिंदुस्तान आता खेड्यांपर्यंतही पसरू लागला आहे.

आता भेट म्हणून येणारी स्कॉच व्हिस्कीची बाटली कधीच रिकामी झाली आहे, कंपाऊंडमध्ये चरणारी शेळी पोटात गेली आहे आणि तिला चरायला नेणारी मुलगी म्हातारी झाली आहे. तरी देखील डाकबंगल्यांच्या प्रेमपाशात बांधल्या गेलेल्या काळ्या साहेबांचे काही दुर्लभ नमुने पाहावयास मिळतात.

छंगामल विद्यालय इंटर कॉलेजच्या तपासणीसाठी येणारे डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन हे अशाच दुर्मिळ नमुन्यांपैकी एक होते. किंबहुना एक प्रकारे ते दुर्मिळातही

दुर्मिळ होते. जेव्हा ते सब-डेप्युटी-इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स होते तेव्हापासूनच त्यांच्या मनात-ज्याप्रमाणे शेरशहाच्या मनात दिल्लीच्या सिंहासनावर बसण्याची एक अभिलाषा घर करून राहिली होती. ती अशी की बढती मिळवून या डाकबंगल्यात उतरावयाचे, मागील बाजूच्या पायऱ्यांवरून उतरून मगतिन बीबीला गंगा-स्नान घडवावयाचे, आणि 'अमुक' डाकबंगल्यात उतरून महाराणा प्रतापावर एक खंडकाव्य लिहावयाचे, ते इंटरमीजिएटच्या वर्गाला पाठ्यपुस्तक म्हणून लावून घ्यावयाचे, मग 'तमुक' डाकबंगल्यावर उतरून वर्षातून एकदा धोंडे महाराजाच्या आश्रमात जाऊन त्यांचे दर्शन घ्यावयाचे, 'फलाण्या' डाक बंगल्यात राहून गीतेचा स्वाध्याय करीत आतापर्यंत मूर्खपणाने हातून घालविलेल्या संधीची आठवण काढीत तळमळणाऱ्या अंतःकरणाला शांतता मिळवून द्यावयाची, 'ढेकण्या' डाकबंगल्यात -

आणि येथे डेप्युटी डायरेक्टर झाल्यानंतर त्यांनी मनाशी असे ठरविले होते की शहराच्या भयंकर कोलाहलापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी शिवपालगंजच्या डाकबंगल्याकडे पळ काढावयाचा, तेथे उसाचे करवे चोरवायचे, शिंगाडे खायचे, भाजलेली कणसे मिटक्या मारीत खायची, आणि दररोज पाचशे या वेगाने सगळ्या फाइलींचा फडशा पाडायचा.

छोटू पहिलवान डाकबंगल्यावर उभ्या उभ्या गर्जना करीत होता, "जाणारे विलायतेला निघून गेले. पण आपली अवलाद इथंच ठेवून गेले. सरळ गावात आले असते तर तिथल्या तिथं फटाफट निकाल लागला असता. पण त्यांची घोडी सरळ डाकबंगल्यावरच येऊन थांबते. सगळा गाव कोसभर अंतर चालून इथं आलाय आणि ताटकळत बसलाय.

'सकाळी नऊ वाजता आलो होतो. तेव्हापासून आता एक वाजलाय. शंभर दीडशे माणसं माशा मारत बसली आहेत. चडफडताहेत. आता हे साहेब पों पों करीत संध्याकाळी येतील आणि म्हणतील, 'हैं हैं हैं ! उशीर झाला बुवा.' तुम्ही मंडळीही बेशरम आहात. दात काढून म्हणाल, हैं हैं हैं !' हे सारं पाहिलं की तळपायाची आग मस्तकाला जाते."

डाक बंगल्यासमोर हिरवेगार लॉन होते. शेजारची गव्हाची शेते पाण्याशिवाय वाळून गेली तरी इथली हिरवळ कधीच सुकायची नाही. बंगल्याभोवती तटाशी संमांतर अशी आंब्यांच्या झाडांची रांग होती. त्यांची फळे मुख्यतः तेथील माळी, चौकीदार, आसपासचे तीनचार गुंड आणि शहरात राहाणारा एक इंजिनियर हे खात असत. मात्र



येथील हवेप्रमाणेच येथील झाडांच्या सावलीवर जनतेचा हक्क होता, आणि यावेळी शिवपालगंजमधील दोन्ही पक्ष त्या हक्काचा पुरेपुर उपभोग घेत होते.

डाकबंगल्याच्या दोन टोकांना झाडांच्या सावलीत दोन छोटे शामियाने उभारण्यात आले होते. जमिनीवर सतरंज्या व गालिचे अंथरले होते. या दोन शामियान्यांपैकी एक प्रिन्सिपॉल आणि त्यांचे साथीदार यांचा होता, आणि दुसरा खन्ना मास्टरांच्या पक्षाचा. प्रिन्सिपॉल साहेबांच्या खेम्यात यावेळी ते आणि बद्री पहिलवान यांच्या व्यतिरिक्त सुमारे साठ माणसे होती. त्यांत छोटू पहिलवानही होता. तो एका झाडाच्या बुंध्याला टेकून, ललित त्रिभंगी मुद्रेत उभा राहून डेप्युटी डायरेक्टरच्या वर्तनाविषयी आपले मत व्यक्त करीत होता. दुसऱ्या बाजूच्या डेऱ्यात खन्ना मास्टर, रूप्पनबाबू, इतर काही अध्यापक आणि रामाधीन भीखमखेडवी यांचे काही चेले होते. रामाधीन भिखमखेडवी अपेक्षेप्रमाणे, येण्याचा वायदा करूनही आले नव्हते.

छोटू पहिलवानाची गर्जना, लोकांची आपसातील भयंकर बडबड, खाणे पिणे, झोपण्याचे प्रयत्न, जांभया, पान-तंबाखू चिलिम-बिडी-सिगारेट या सर्वांच्या वातावरणात संगीतधारा वाहात होती.

याची सुरुवात ट्रँझिस्टरांपासून झाली होती. दोन्ही खेम्यांमध्ये दोन चार शौकीन मंडळी होती. ते लोक खांद्यावर पंचा, कानावर चुन्याची गोळी, पाठीवर बंदूक, एका हातात तितर पक्षाचा पिंजरा आणि दुसऱ्या हातात ट्रँझिस्टर घेऊन आले होते. बघता-बघता दोन्ही डेऱ्यांत ट्रँझिस्टरांतून 'बलमा, छलिया, बेईमान, दगाबाज, इत्यादींची विविध भारती दुमदुमू लागली. अकरा वाजल्यावर खन्ना मास्टरांच्या डेऱ्यात कोठून तरी रेकॉर्ड व ॲम्प्लिफायरसह एक ग्रामोफोन येऊन पोचला. आणि सव्वा अकरा वाजता त्याने आपल्या भसाड्या आवाजात 'बेईमान दगाबाज' वाल्या गाण्यांचा विसर पाडून शांततापूर्ण सहजीवन आणि विश्वप्रेम यांचे संगीत सुरू केले :-

"मुझको अपने गल्ले (म्हणजे गळ्याशी, गल्ल्याशी काही संबंध नाही) लगा लो, ऐ मेरे हमराही !"

या गाण्याच्या शब्दा-शब्दातून शुभ्र कबुतरे उडत होती आणि ऑलिव्हच्या फांद्या डोलत होत्या, हे उघड आहे. परंतु प्रिन्सिपॉल साहेबांच्या डेऱ्यात ते युद्धाचे आव्हान आहे असे समजण्यात आले, आणि बघता बघता तेथेही रेकॉर्ड व ॲम्प्लिफायरसह एक ग्रामोफोन प्रकट झाला आणि किंचाळू लागला,

"आ ऽऽऽ ! गले लग जा ! "

या घोषणेनंतर, अशा प्रसंगी खेडवळ वरातींमध्ये घडते त्याप्रमाणे, दोन्ही बाजूनी फिल्मी गाण्यांची लढाई सुरू झाली.

अशा या वातावरणात नाराज कोण होणार ? फक्त छोटू पहिलवान सोडल्यास

कोणीही नाही. परंतु एका दृष्टीने, छोटू पहिलवानाचा रोष वाजवी होता. वस्तुतः काही लोक त्या ठिकाणी आठ वाजताच आले होते, कारण डेप्युटी डायरेक्टर नऊ वाजता यावयाचे होते. दोन-तीन तासांचा उशीर हा अगदी सरळ वृत्तीच्या, गरीब गाय असणाऱ्या अधिकाऱ्यालाही शोभून दिसतो. (गाईच्या बाबतीत असेच घडते ना ! पाच वाजता घरी परततांना कुणाच्या तरी शेतात ती घुसते आणि उभे पीक खाऊ लागते. नंतर दोन-चार फटके खाल्यावर सावकाश सात-आठ वाजता घरी परत येते.) परंतु पाच तास होऊन गेल्यानंतर छोटू पहिलवानाला वैताग येणे पूर्णपणे न्याय्य होते.

''काय करणार ? त्यांना रात्रंदिवस मिटिंगा असतात. कुठं जायला निघाले रे निघाले की मीटिंग येऊन मानगुटीला बसते.'' प्रिन्सिपॉल साहेबांनी भलेपणाने म्हटले.

दोन वाजायला आले होते. खूपच उकाडा होऊ लागला होता. लोकांना शंका येऊ लागली होती की ग्रामोफोनवर तीच तीच गाणी पुनः पुनः वाजविली जात असावीत. आता लोक उठून वारंवार झुडुपांच्या मागे घाईघाईने जाऊ लागले होते, आणि दोन्ही पार्ट्यांचे पुढारी भिऊ लागले होते की, 'साला मूतने जाय और मूतने भरका हो जाय' (साला मुतायला गेला आणि मुततच राहिला) असे झाले नाही म्हणजे मिळवली. आता छोटू पहिलवान झाडाखालून उठून शामियान्यात आला होता, आणि रूप्पनबाबूंविषयी बोलू लागला होता :-

''रूप्पन दुष्मनांना जाऊन मिळालेत. दुसरा कुणी मिळाला नाही तेव्हा आपल्या बापावरच 'फॉलिन' झाले. आम्हीही आपल्या बापाला, महाराज कुसहर प्रसादांना, खूप बदडलंय. पण बाहेरच्या कुणा माणसाची मजाल आहे की त्यांना अरेतुरे करील. इथे हे साले खन्ना-बिन्ना यांच्या बापाला खेटरताहेत आणि हे त्यांच्या मागे लाळ घोटत फिरताहेत —''

बद्री पहिलवान शामियान्याचा एक कोपरा धरून लवंडले होते. छोटूचे बोलणे संपूर्णपणे न ऐकताच तो रूप्पनला आपल्या स्वतःपेक्षाही क्षुद्र ठरवू पाहात आहे, हे त्यांनी ओळखले. ते सिनीयर वस्तादाच्या रूबाबात म्हणाले, ''बस, बस, बस — आता तोंडाला कुलूप घालून बस.''

चार वाजण्याच्या सुमारास वैद्यजी सनीचर बरोबर डाक बंगल्याच्या फाटकावर येत असलेले दिसले. शहरातून आलेल्या ग्रामोफोनवाल्याने प्रसंगानुकूल असे एक फिल्मी गाणे लावले. त्याचे सुरूवातीचे शब्द असे होते: ''नजर लागी राजा तोरे बंगले पर.'' ते ऐकताच छोटू पहिलवानाने त्याला इतक्या जोरात दटावले की ग्रामोफोन आपोआप



थांबला. लोक आपापल्या जागेवर सावरून बसले. काहीजण उठून उभे राहिले. फक्त बद्री पहिलवान उन्मळून पडलेल्या झाडाप्रमाणे कोपऱ्यात पडून राहिले. वैद्यजी येऊन शांतपणे एका गालिचावर बसले. त्यांच्या पाठीशी आपोआप लोड येऊन लागला. सनीचर व प्रिन्सिपॉल बाजूला उभे राहिले. आता फक्त हातात चवऱ्या धरण्याचाच जणू अवकाश होता. वैद्यजी येऊन बसताच एखादा चक्रवर्ती सम्राट सिंहासनावर येऊन बसावा, असा भास झाला. त्यांच्याशी तुलना करता समोरच्या शामियान्यातील खन्ना मास्टर, रूप्पनबाबू वगैरे अगदीच लुच्चे-लफंगे असल्यासारखे दिसू लागले.

वैद्यजींनी प्रिन्सिपॉलना विचारले, ''काय हकीगत आहे ?''

प्रिन्सिपॉल साहेब मोठ्या उत्साहाने सांगू लागले, ''आपली सारी मंडळी आसपासच आहेत. तिकडच्या मंडळींना बहुमूत्ररोग झालेला दिसतोय.''

सनीचर मिस्किलपणे म्हणाला, ''तुम्ही म्हणत असाल तर रूप्पनबाबूंना बोलावून विचारू या. फार त्रास होत असेल तर महाराजांच्या दवाखान्यातून जमालगोट्याची एकेक गोळीही आणून वाटता येईल.''

वैद्यजींच्या चेहऱ्यावरील प्रसन्नपणा झाकळला. ते म्हणाले, ''त्या नीचाचं नावसुद्धा घेऊ नकोस. ''थोडा वेळ थांबून ते पुनः पूर्वीसारखे झाले. त्यांनी विचारले, ''डेप्युटी डायरेक्टरांचा अजून पत्ता नाही ? आता सूर्यास्ताला फारसा अवधी उरलेला नाही.''

आपले बोलणे कदाचित् अधिकाऱ्यांच्या कानापर्यंत जाऊन पोचेल या आशेने लोचट स्वरात ते म्हणाले, ''एवढे मोठे अधिकारी आहेत. एखाद्या मिटिंगमध्ये अडकले असतील. आता यायलाच हवेत.''

''कुणाला तरी पाठवायचं होतं.''

''पाठवलंय ना.'' प्रिन्सिपॉलनी माहिती दिली. ''मास्टर मोतीराम सकाळीच गेले आहेत. ते या पार्टीतही नाहीत किंवा त्या पार्टीतही नाहीत. त्यांची वृत्ती अशी की आपली पिठाची गिरणी बरी आणि आपण बरे. म्हणूनच आम्ही त्यांना सांगितलं की, 'मास्टर साहेब, तुम्हीच जा. तुम्ही वडील आहात. डी. डी. साहेबांबरोबर त्यांच्याच गाडीतून या. तुम्ही आमच्या बाजूनं डी.डी. चे कान भरायला गेला होता, असं कुणी म्हणणार नाही.''

वैद्यजी जनतेचे मनोरंजन करण्यासाठी जुन्या आठवणी सांगू लागले :

''त्यावेळी आमच्या प्रातांत पंतजींचा जमाना होता. नुकतेच राष्ट्रीय सरकार स्थापन झाले होते. निवडणुकीची एक सभा होती. दहा वाजता पंतजी यायचे होते. जिल्हाधिकारी, पोलिस अधिकारी, सगळे ताटकळत ताटकळत उभे होते. अकरा वाजले, बारा वाजले, मग एक वाजला, नंतर दोन वाजले ... ''

असा हा किस्सा चालत राहिला. पाच वाजायला आले. तोपर्यंत

प्रिन्सिपॉलसाहेबांना असे दिसून आले की आपल्या शामियान्यातलेही अनेक लोक उठून झुडुपांमागे जाऊ लागले आहेत; आणि बहुमूत्ररोग इतका पसरला आहे की काही जण झुडुपांच्या मागून परतच आलेले नाहीत.'' ते छोटू पहिलवानाला म्हणाले, ''मेंबरसाहेब, हे लक्षण काही ठीक दिसत नाही.''

छोटू पहिलवान वैतागला होता. तो म्हणाला, ''तर मग मी काय करू ? कुणाचं हगणं मुतणं मी कसं बंद करणार ?''

एव्हाना ग्रामोफोनची गाणी जवळजवळ थकून गेली होती आणि लोक लहान लहान गट बनवून गप्पा गोष्टी करू लागले होते. सूर्यास्ताची वेळ झाली होती. प्रिन्सिपॉल साहेब टक लावून थोड्याच अंतरावर डाक बंगल्याजवळील रस्त्याच्या कडेला असलेल्या एका आंब्याच्या झाडाकडे पाहू लागले होते. झाडाच्या ज्या भागावर त्यांची नजर लागून राहिली होती तेथे एक वाळलेली फांदी होती. त्या फांदीत एक विळा अडकलेला होता. त्या विळ्याला एक बांबू बांधलेला होता. त्या बांबूचे खालचे टोक एका मुलीच्या हातात होते. ती मुलगी सुमारे वीस वर्षाची होती. वर सांगितल्याप्रमाणे प्रिन्सिपॉलसाहेब फक्त वाळलेली फांदी पाहात होते. अचानक त्यांनी चमकून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला पाहिले आणि ते म्हणाले, ही बस इथं अशी थांबतेय का ?''

लोक घाईघाईने फाटकाकडे जाऊ लागले. खरोखरीच एक बस डाकबंगल्यासमोर थांबली होती.

बसमधून खांद्याला एक भली मोठी पिशवी अडकविलेले मास्टर मोतीराम खाली उतरले. दोन्ही बाजूच्या लोकांनी त्यांना घेरले. थोड्याच वेळात ते वैद्यजींजवळ येऊन उभे राहिले आणि म्हणाले, ''डेप्युटी डायरेक्टरसाहेब आज येणार नाहीत.''

ही बातमी अनधिकृतरीत्या आधीच जाहीर झाली होती; कारण चोहोकडे गलबला सुरू झाला होता आणि ज्यांना बहुमूत्ररोग झालेला नव्हता तेही झपाट्याने इकडे-तिकडे विखरू लागले होते. प्रिन्सिपॉल साहेबांनी विचारले, ''मग ? पुनः कोणत्या तारखेला येतो म्हणालेत ?''

''ते काही सांगता येत नाही. आज तर ते शहरात नव्हतेच. तीन-चार दिवस झाले, ते बाहेरगावी दौऱ्यावर आहेत. अजून आले नाहीत.''

''कधी परतणार आहेत ?''

''ते कसं सांगायचं ? कुणालाच काही माहीत नाही. कुणी म्हणत होतं चार दिवसांत येतील तर कुणी सांगत होतं पाच दिवसांनी येतील. मला वाटतं, त्यांना परत यायला निदान सहा - सात दिवस तरी लागतील.''

वैद्यजींनी डोके मिटून जणू आपला थकवा दूर केला; आणि विचारले, ''तर मग तुम्ही दुपारीच का परत आला नाहीत ? जनतेला किती त्रास सोसावा लागला !''



मास्टर मोतीराम नम्रपणे वाकून म्हणाले, ''कसा येणार महाराज ? हे सारं खरेदी करायचं होतं ना !'' त्यांनी पिशवीकडे बोट दाखविले आणि म्हटले, ''गिरणी जुनी झालीय. सारखी मोडतोड चालूच असते. कुठं कुठं हिंडावं लागलं. अखेर जुन्या बाजारात —''

मास्टर मोतीरामांचे संभाषण ऐकणाऱ्या अनेक लोकांमध्ये रंगनाथही होता. शत्रूपक्षाकडून बहुदा तोच घटनेचा संपूर्ण तपशील जाणून घेण्यासाठी आला असावा. तो जेव्हा हळूच निसटून जाऊ लागला तेव्हा वैद्यजींनी त्याला हाक मारली. तो त्यांच्या जवळ येऊन बसला.

वैद्यजी त्याच्याकडे पाहून हसले. हसत - हसत पाहात राहिले. रंगनाथ थोडा वेळ घुटमळला. नंतर धीर करून त्याने विचारले, ''काय आज्ञा आहे, मामाजी ?''

''काहीही आज्ञा नाही.'' वैद्यजी मधुर स्वरात म्हणाले, ''हे तर धर्मयुद्ध आहे. तुला वाटतं की हे दोन - चार अध्यापक योग्य मार्गानं चालले आहेत. म्हणून तू त्यांना आपुलकी दाखवतो आहेस. परंतु सन्मार्ग कोणता आणि असन्मार्ग कोणता याचा अनुभव तुला कधी ना कधी येईलच. तसा जेव्हा तो येईल तेव्हा तू स्वतःच आपल्या पूर्वस्थितीला येशील.''

श्वास आत ओढून ते म्हणाले, ''तू सुशिक्षित आहेस, बुद्धिमान आहेस. तुझी काळजी मला नाही, काळजी आहे रूप्पनची.''

संभाषणात जीव आणण्यासाठी प्रिन्सिपॉल खदखदून हसत म्हणाले, ''छेः छेः महाराज ! तुम्ही रंगनाथ बाबूंना ओळखलं नाही. ते मोठे राजनीतिज्ञ आहेत. तिकडली स्थिती त्यांनी आधीच ओळखलीय. त्यांना समजावून सांगण्याची जरूर नाही.''

वैद्यजी पुनः स्मित करून म्हणाले, ''धर्मयुद्धात बुद्धी नव्हे तर विश्वास महत्त्वाचा असतो. जोपर्यंत तुझी अशी खात्री आहे की आम्ही दोषी आहोत तोपर्यंत तू आम्हांला कसून विरोध कर. त्याची काही काळजी नाही. ज्या दिवशी माझ्या प्राणांची जरूर भासेल तेव्हा मला सांग. मी भीष्मपितामहांप्रमाणे माझ्या निधनाची तिथि स्वतःच नक्की करीन.''

रंगनाथाला काय बोलावे ते सुचेना. तो म्हणाला, ''तुमचा काहीतरी गैरसमज झालाय.''

वैद्यजींचा चेहरा लाल झाला. ते जोराने म्हणाले, ''छेः छेः ! गैरसमज त्या लोकांचा

झालाय. मी तर लोकशाही मार्गानं चालणारा आहे. सर्वांना बोलायचं स्वातंत्र्य मी देतो. म्हणून तर माझेच गुलाम असणारे हे अध्यापक मला विरोध करीत फिरताहेत. पण यालाही मर्यादा असते. काय प्रिन्सिपॉल साहेब ?''

प्रिन्सिपॉल साहेब मान खाली घालून म्हणाले, ''तुमच्या समोर मी काय बोलणार ? पण तुम्ही नसता तर मी कधीच राजीनामा देऊन निघून गेलो असतो.''

''तुम्ही का निघून जावं ? आता हे प्रकरण समाप्त करण्याची वेळ येऊन ठेपलीय. थांबा, मी आताच निर्णय देऊन टाकतो.''

त्यांनी छोटूला हाक मारून सांगितले, ''छोटू, तिकडच्या शामियान्यात जा. खन्ना आणि मालवीय यांना बोलावून आण. रूप्पनलाही बरोबर घेऊन ये. ते येणार नसतील तर आपणच तिकडे जाऊ. आणि हे पाहा, जनतेला म्हणावं की आपापल्या घरी जा आणि आराम करा. प्रिन्सिपॉल साहेब, तुम्ही तिकडे जाऊन जनतेचे आभार माना.''

थोड्याच वेळात दोन्ही शामियान्यांत शुकशुकाट झाला. खन्ना मास्टरांचा शामियाना जरा आधीच रिकामा झाला होता. कारण तेथे लोकांचा बहुमूत्ररोग आटोक्यात आणणारे बद्री पहिलवान व छोटू नव्हते. शिवाय डेप्युटी डायरेक्टरांनी तोंडघशी पाडले आहे, हे कळताच पुष्कळसे लोक एकदम गडप झाले होते. आता मायक्रोफोन, ग्रामोफोनच्या तबकड्या व पाण्याची भांडी गोळा करणे एवढेच ज्यांचे काम उरले होते तेच लोक बहुदा त्या शामियान्याजवळ होते. इकडे वैद्यजींच्या शामियान्यात बद्री पहिलवान, छोटू, सनीचर, प्रिन्सिपॉल साहेब, दोन - चार प्रतिष्ठित माणसे आणि बद्रींच्या आखाड्यातील काही गुंड उरले होते.

वैद्यजींचा निरोप मिळताच खन्ना, मालवीय, त्यांच्या बाजूचे दोन शिक्षक आणि रूप्पनबाबू आपसात बेफिकीरपणे गप्पा मारत तेथे आले आणि त्यांच्या समोर बसले. खन्ना मास्टरांनी विचारले, ''आपण बोलावलंत आम्हांला ?''

अंधार पडू लागला होता. मावळत्या प्रकाशात अरण्यासारखी ती बाग, खेमे, गालिचे या सर्वांचे मिळून एक मजेदार चित्र तयार झाले होते. असे वाटत होते, जणू कोणी शहनशाह दिल्लीहून दक्षिणेत आला असून संध्याकाळच्या वेळी आपल्या दरबारी मंडळींशी एखाद्या डोंगराच्या पायथ्याशी बसून सल्लामसलत करीत आहे, आणि काही बंडखोर जहागीरदारांना पकडून त्याच्या समोर उभे करण्यात आले आहे.

नंतर वैद्यजींचे भाषण सुरू झाले :

''खन्नाजी आणि मालवीयजी, मी तुम्हांला या ठिकाणी आत्मीय समजून बोलावलंय.''

''तुमचा आणि प्रिन्सिपॉलांचा आपसातील विरोध वाढला आहे. कोर्टकचेरी चालू आहे. खुल्लम खुल्ला शिवीगाळी चालते. मारामारीची तयारी चालू आहे. मी तुम्हांला



दोष देत नाही. दोष कुणाचाही असू शकेल. मी स्वतः दोषपूर्ण आहे. कुणाचा दोष आहे ते मी कसा सांगणार ? परंतु परिस्थिती बिघडलीय, एवढं मला कळतंय. ती सुधारली पाहिजे.''

खन्ना म्हणाले, ''मलाही माझं म्हणणं सांगण्याची संधी द्या.''

''नाही !'' त्यांनी गंभीरपणे मान हलवून म्हटले, ''मुळीच नाही ! नाही ! नाही ! तुम्ही तुमचं म्हणणं अनेकदा सांगितलंय. अनेक ठिकाणी सांगितलंय. अनेक रूपांनी सांगितलंय. प्रिन्सिपॉलनीही त्यांचं म्हणणं सांगितलंय. केवळ एकाच व्यक्तीनं अजून आपलं म्हणणं सांगितलेलं नाही. ती व्यक्ती मी आहे. आज फक्त मीच माझं म्हणणं सांगणार आहे.

''हे विद्यालय मी स्थापन केलंय. मी माझ्या रक्ताचं पाणी करून हे वाढवलंय. तुम्ही दोघेही फक्त वेतनभोगी आहात. इथं नाही तर कुठं दुसरीकडे जाऊन तुम्ही अध्यापक व्हाल. तुम्ही कुठंही अध्यापक होऊ शकाल. चांगला पगार मिळवाल. पण मी इथंच राहाणार आहे. हे विद्यालय यशस्वीपणे चाललं तर मला माझं जीवन यशस्वी झालं असं वाटेल. हे गटबाजीत नष्ट होऊ लागलं तर मला आपणच नष्ट होत आहोत असं वाटेल. मला त्रास होतो आहे. फारच त्रास होतो आहे. माझी व्यथा आंतरिक आहे. माझी व्यथा तुम्हां लोकांना कळायची नाही.''

ते थोडा वेळ थांबले. शामियान्यात स्तब्धता पसरली होती. त्यांनी पुनः उद्घाण केले:

''आता मला फक्त एकच मार्ग दिसतोय. मी निर्णय घेतलाय. माझी तुम्हांला हात जोडून विनंती आहे की तुम्ही हा निर्णय मान्य करावा. तुमच्या दृष्टीनंही तोच एकमेव मार्ग आहे. त्याच मार्गानं तुम्हाला जावं लागेल.

''खन्नाजी आणि मालवीयजी, मी इतरांना सांगत नाही. फक्त तुम्हांलाच सांगतोय. तुम्हाला राजीनामा द्यावा लागेल.''

त्यांना मध्येच अडवीत खन्ना म्हणाले, ''पण ——''

''नाही !'' दयाळूपणे पण तितक्याच खंबीरपणे ते म्हणाले, ''नाही. मी आधीच सांगितलंय. आज फक्त मीच बोलणार. तर मी सांगत होतो की, तुम्हांला राजीनामा द्यावा लागेल. आज आणि आत्ता. इथल्या इथं आणि आताच्या आता. तुम्ही राजीनामा दिला पाहिजे. हे मी रागानं बोलत नाही. पूर्णपणे विचार करून बोलतोय. तुमच्या हितासाठी सांगतोय. विद्यालयाच्या हितासाठी सांगतोय, संपूर्ण समाजाच्या हितासाठी सांगतोय.

''माझी ही नम्र विनंती आहे. माझ्या या विनंतीचा तुम्ही अव्हेर करू नका. तुम्ही आताच्या आता राजीनामा द्या. नंतर तुम्हांला वाटेल ते बोलण्याचं स्वातंत्र्य राहील.

आमच्याकडून बळजबरीनं राजीनामा घेण्यात आला असंही तुम्ही म्हणू शकाल. याबाबतीत आमच्यावर दावा लावण्याचंही स्वातंत्र्य तुम्हांला राहील. परंतु माझं तुम्हांला एवढंच सांगणं आहे की यावेळी तुम्ही या विद्यालयाचे हितचिंतक या नात्यानं स्वेच्छेनं निमूटपणे राजीनामा द्या.''

''तुम्ही आमच्याकडे पुष्कळच मागितलं आणि तुम्हांला पुष्कळच मिळालं. मी मात्र कधीच काही मागितलं नाही. आज या विद्यालयाच्या नावानं फक्त तुमचा राजीनामा मागतोय. माझी विनंती आहे. ——''

एव्हाना रूप्पनबाबू आपल्या जागेवर उठून उभे राहिले होते. त्यांचा आवाज लटपटत होता. आवेशाच्या भरात ते बोलू लागताच एक शब्द दुसऱ्या शब्दावर चढू लागला. ते म्हणाले, ''ते शक्य नाही. तुम्हांला त्यांच्याकडून बळजबरीनं राजीनामा लिहून घेता येणार नाही. हे राजीनामा देणार नाहीत.''

वैद्यजींनी त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून प्रिन्सिपॉलना म्हटले, ''तुमच्याजवळ टाइप केलेले कागद तयार आहेत ना ? तर मग ते घेऊन तिकडे जा. छोटू, तू खन्नाजींना आणि मालवीयजीना तिकडे घेऊन जा. दोघेही बुद्धिमान आहेत. त्यांना सारं काही समजेल. जा. बद्री, तूही जा.''

आणि ते कडाडले. त्यांचा तो रूद्रावतार एवढा आकस्मिक व अभूतपूर्व होता की बद्री पहिलवान उडी मारून त्यांच्यासमोर आले. इतर लोकही त्यांच्याजवळ धावले. ते कडाडून उद्गारले, ''आणि हा रूप्पन ! हा मूर्ख आहे ! नीच आहे ! पशू आहे ! पतित आहे ! विश्वासघातकी आहे !''

ते असेच बोलत राहिले, आणि या निमित्ताने शिव्यांच्या बाबतीत संस्कृत भाषाही मुळीच दुबळी नाही, हे त्यांनी सिद्ध केले. काही अंशी त्यांच्या आवाजातील कडकपणामुळे व काही अंशी संस्कृतच्या प्रकोपामुळे लोक पार भेदरून गेले. लोकांनी वैद्यजींना एवढे क्रुद्ध झालेले आज प्रथमच पाहिले होते.

ते गालिचावर बसल्या - बसल्या आपले दोन्ही गुडघे आळीपाळीने पोलादी पिस्टनप्रमाणे हलवीत होते आणि थरथरत्या गळ्याने किंचाळत होते, ''तू नेता बनतोस काय ? मला विरोध करून तू नेता बनू पाहातोस ? तर मग बघ, आत्ताच दाखवतो तुला इंगा.''

त्यांचा आवाज जास्तच थरथरू लागला ते बोलू लागले, ''वृद्धावस्था शांततेनं व्यतीत होईल, अशी आशा वाटत होती. ग्रामपंचायतीची कटकट मिटवून टाकलीय. सहकारी संघ होता तो बद्रीला देऊन टाकला. या कॉलेजची जबाबदारी तुझ्यावर सोपवावी, असा विचार मनात होता. या खेरीज तुला द्यायला माझ्याजवळ उरलं तरी काय होतं ? पण नीचा, तू विश्वासघातकी निघालास. जा ! आता तुला काहीही



मिळणार नाही.''

त्यांच्या आवाजात एक विचित्र तडफड निर्माण झाली. ते घोषणा करीत म्हणाले, ''जा, मी तुला माझ्या उत्तराधिकारापासून वंचित करतो. सर्वांनी ऐकावं, माझ्यानंतर बद्रीच या कॉलेजचे मॅनेजर होतील. हाच माझा शेवटचा निर्णय. रूप्पनला काहीही मिळणार नाही.''

बोलता - बोलता त्यांचा गळा दाटून आला. क्रोध व अगतिकता यांमुळे त्यांचे डोळे अश्रूंनी डबडबले. रंगनाथाला वाटले, सगळे लोक आपल्याकडेच रोखून पाहात आहेत. त्याने मान खाली घातली.

रूप्पन बाबू उठून फाटकाकडे गेले तेव्हा लोक भानावर आले. वैद्यजी आपले डोळे पुसत होते. लोकांमध्ये अचानक हालचाल सुरू झाली. ते इकडे - तिकडे विखरू लागले. डाकबंगल्याच्या व्हरांड्यात एक कंदील लागला होता. तेथे मालवीय जोरजोरात बोलत होते. छोटूने त्यांना धमकावून म्हटले, ''जरा धीर धरा, मास्टरजी !''

प्रिन्सिपॉलनी खन्नांचा हात घट्ट धरून म्हटले, ''या मास्टर साहेब, आपण तिकडेच जाऊ. आपलं भांडण संपलं. आजपासून आपण पुनः मित्र झालो.''

आशा वाटत नव्हती, परंतु अशा या रात्रीनंतरही सकाळ झालीच.

रंगनाथाला रात्री नीट झोप आली नव्हती. त्याला नीट विचारही करता आला नव्हता. परंतु जाग येताच त्याने स्वतःसंबंधी एक गोष्ट नक्की करून टाकली. काही महिन्यांपूर्वी एका दीर्घ आजारातून उठल्यानंतर तो येथे केवळ आपली प्रकृती सुधारण्यासाठी आला होता. आता अकस्मात् त्याने ठरविले की आपली प्रकृती सुधारली आहे.

शेजारी रूप्पनबाबूंची खाट रिकामी होती. रात्रभर ते कुठे राहिले असतील कोण जाणे. काही बाबतीत त्याचा रूप्पनबाबूंवर पूर्ण विश्वास होता. ते जेव्हा मूर्ख बनतात तेव्हा स्वेच्छेने तसे बनतात हे त्याला माहीत होते. मूर्ख बनणे ही त्यांच्या बाबतीत असहाय्यता नव्हती. तो त्यांचा षोक होता. ती चैनीची बाब होती. त्यामुळे वैद्यजींचा आरडा ओरडा ऐकून ते दारूच्या गुत्याकडे धावले नसतील याविषयी त्याला खात्री वाटत होती. दुःखाचा डोंगर कोसळताच दारूकडे धाव घेण्याची कल्पना त्यांना सुचली नसावी. कारण त्यांनी 'देवदास' कादंबरी वाचली नव्हती अथवा त्याचा सिनेमाही पाहिला नव्हता. ते मंदिराकडेही धावले नसावेत, कारण संकटकाळी देवळाकडे धाव घेणाऱ्याचा चेहरा जसा असायला हवा तसा तो रूप्पनबाबूंचा नव्हता.

तर मग ते आहेत कुठे ? याचवेळी कॉलेजात संप घडवून आणण्यासाठी ते आपले साथीदार गोळा करायला तर ते गेले नसतील ? इमारतींना आगी लावण्यासाठी, प्रिन्सिपॉलना बडवून काढण्यासाठी किंवा विनाकारण बाजारपेठ लुटण्यासाठी ते एखाद्या

क्रांतीकारक पक्षाचे संघटन करू लागले आहेत काय ? किंवा शिक्षण - व्यवसायातील महशूर फॉर्म्युल्याप्रमाणे, शेजारच्या एखाद्या गावात, खन्ना मास्टरांना प्रिन्सिपॉलपदाचा राज्याभिषेक करून, त्यांच्यासाठी छंगामल विद्यालय इंटर कॉलेजशी स्पर्धा करण्यासाठी दुसरे एखादे कॉलेज तर ते उघडणार नसतील ना ? रंगनाथ विचार करू लागला. ते असेच काहीतरी नक्की करणार असतील. कारण वैद्यजींच्या क्रोधाचे प्रदर्शन पाहिल्यानंतर जेव्हा ते तिथून निघून गेले होते त्यावेळी त्यांचे व्यक्तित्व मिळमिळीत दिसत नव्हते. तेजस्वी दिसत होते.

वैद्यजी सकाळी खूप दूर फिरायला जात असत, आणि ते अजून परत आले नव्हते. आता त्यांच्याशी स्वाभाविकपणे संभाषण करणे शक्य नाही, हे रंगनाथ जाणून होता, आणि अस्वाभाविकपणे त्यांच्याशी बोलण्यास तो तयार नव्हता. तो स्वतःला उद्देशून म्हणाला, ''विरोधाच्या पहिल्या प्रयत्नातच तू धराशायी झालास. आता तुला स्वतःची वस्तुस्थिती ओळखली पाहिजे. हे स्थान सोडून निघून गेले पाहिजे - मामा परत येण्यापूर्वीच.''

रहना नहीं देस बिराना है ।
(हा परका देश आहे. इथं तुला राहायचं नाही.)

सनीचरचे दुकान उघडले होते आणि त्याच्या समोर दोन माणसे मोठ्या नाटकी ढंगाने आपसात भांडत होती. त्यांचे ते युद्ध शाब्दिक, तार्किक व अजूनपर्यंत अहिंसक होते. त्यांच्यापैकी एकाने दुसऱ्याच्या शेतातील पाटाचे पाणी फोडून आपल्या शेतात घेतले होते. ते दोघे सरपंचाकडे आपल्या भांडणाचा निकाल लावून घेण्यासाठी आणि निकाल लागण्यापूर्वी भांडण्यासाठी आले होते. दोन्ही बाजूंनी शिव्यांचा मुसळधार पाऊस पडत होता. ज्या शिव्या साहित्य व कला, वृत्तपत्रे, रेडियो अथवा सिनेमात ऐकायला मिळत नाहीत, फक्त वास्तविक जीवनातच ज्यांचा उपयोग केला जातो अशा त्या शिव्या होत्या.

गेल्या काही महिन्यांत तो ज्या जीवनाच्या भोवतीच घिरट्या घालत राहिला होता, ज्याच्या आत प्रविष्ट होऊनही तो बाहेरचाच राहिला होता ते जीवन एखाद्या अभिशापाप्रमाणे त्याच्या समोर येऊन उभे राहिले. आत्म्याचे स्वरूप सारंगीसारखे असेल तर त्याच्या आत्म्याच्या तारांवर पलायन - संगीत घुमू लागले.

तो दारात बसून निमूटपणे पाहात होता. छोटू पहिलवान रोजच्याप्रमाणे आपले गजकर्ण खाजवीत समोरून निघून गेला. त्याने रंगनाथाकडे पाहिलेही नाही. रस्त्यावर जोराचा घरघराट ऐकू आला. हा शहरातील को-ऑपरेटिव्ह डेअरीचा ट्रक असणार. तो दूध गोळा करण्यासाठी येथे आला असणार. एक इसम हातात हंटी घेऊन सनीचरच्या दुकानाकडे जात असलेला दिसला. तो तेली असून शहरात विकत घेतलेले यंत्राचे तेल



घाण्यातून काढलेले शुद्ध मोहरीचे तेल म्हणून खेड्यात विकतो, हे रंगनाथाला माहीत होते. अंडरवेअर आणि बनियन घातलेला एक लष्करी थाटातला इसम स्वस्तात मांस खरेदी करून कसायाच्या घरून परत येत असलेला दिसला. रोजच्या प्रमाणे त्याने रंगनाथाला म्हटले, ''जै हिंद साब !''

तो मांसाचा तुकडा लोंबकळत पुढे निघून गेला. रंगनाथाच्या मनात विचार आला, आपण त्याच्या गळ्यात हात घालून म्हणावे, ''काही हरकत नाही. या निमित्तानं इथं कुणीतरी हिंदचं नाव काढलं, हे काय कमी आहे ?''

दूर कोठेतरी एका माकडवाल्याचा डमरू वाजू लागला. सनीचरच्या दुकानासमोर चाललेल्या शिवीगाळीने नवीन उंची गाठण्याचा प्रयत्न केला. आपल्याला भयंकर वैताग आला असल्याचे रंगनाथाला जाणवले. आता त्याच्या आत्म्याच्या तारांवर पलायनसंगीत स्पष्टपणे निनादू लागले.

## पलायन - संगीत

तू मध्यम कुवतीचा माणूस आहेस आणि माणुसकीच्या चिखलात रुतला आहेस. तुझ्याभोवती चिखलच चिखल आहे.

चिखलाची खुशामत करू नकोस. चिखलातून कमळ उगवते या भ्रमात राहू नकोस. चिखलातून चिखलच निर्माण होतो, तोच वाढतो, तोच पसरतो, तोच उड्या मारतो.

चिखलापासून दूर राहा. हे ठिकाण सोडून दे. येथून पलायन कर.

जेथील रंगीत चित्रे तू 'लुक' आणि लाइफ' मध्ये धुंडाळून पाहिली आहेस, जेथील फुलांचे मुकुट, गिटार व पोरी तुझ्या आत्म्याला सदैव नवनवीन संशोधनाचे आव्हान देत असतात, जेथील हवा सूक्ष्माहूनही सूक्ष्म तर आहे, जेथे रविशंकर छाप संगीत आणि महर्षी योगी छाप अध्यात्म यांचा चिरंतन स्वप्न लोक आहे, —

तेथेच जाऊन तू लपून बैस. येथून पलायन कर. हे स्थान सोडून दे.

तरूण डॉक्टरांप्रमाणे, इंजिनियर, शास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय कीर्तीसाठी तळमळणाऱ्या मनीषींप्रमाणे, — ज्यांचे अहोरात्र हेच रडगाणे चालू असते की येथे सर्वांनी मिळून आम्हांला सुखी बनवले नाही, त्यांच्याप्रमाणे तू येथून पलायन कर. इथल्या भानगडीत तू गुंतू नकोस.

तुझे नशीबच फुटके असेल, आणि तुला येथेच राहाणे भाग असेल तर तू आपले एक वेगळे काल्पनिक जग निर्माण कर. ज्या जगात अनेक बुद्धिजीवी डोळे मिटून पडले आहेत त्या जगात तू राहा. हॉटेलात आणि क्लबात, दारूच्या गुत्त्यात आणि

कॉफीघरात, चंदीगढ - भोपाळ - बंगलोरच्या नवनिर्मित भवनांत, जेथे कधीही न संपणारे सेमिनार चालले आहेत अशा थंड हवेच्या ठिकाणी असलेल्या विश्रामधामांत, जेथे भारतीय प्रतिमेची निर्मिती चालू आहे अशा परदेशी मदतीने उभारलेल्या नवनवीन संशोधन - संस्थांत, चिरूटाचा धूर, चमकदार आवरणांची पुस्तके आणि चुकीच्या परंतु अनिवार्य इंग्रजीचे धुके जेथे पसरले आहे त्या विद्यापीठांत तू जा. तेथेच कोठेतरी आपला जम बसव आणि मग तेथेच कायमचा राहून जा.

हे सारे तुला जमले नाही तर तू भूतकाळात जाऊन दडी मार. कणाद, पतंजली, गौतम, अजिंठा, वेरूळ, घारापुरी, कोणार्क, खजुराहो, शालभंजिका सुरसुंदरी - अलसकन्या यांचे स्तन, जप - तप - मंत्र, संत समागम - ज्योतिष - सामुद्रिक यांपैकी जेथे कुठे जागा मिळेल तेथे जाऊन दडून बैस.

पळ, पळ, पळ ! वास्तविकता तुझा पाठलाग करीत आहे.

तो उठणार इतक्यात त्याला कॉलेजच्या बाजूने प्रिन्सिपॉलसाहेब येत असलेले दिसले. आज त्यांनी शर्ट व हाफ पँट यांच्याबरोबर मोजे व बूटही घातले होते. हातात तीच रूबाबदार छडी होती. त्यांनी दुरूनच हसून नमस्कार केला. बघता - बघता ते कट्ट्यावर आले आणि फक्त आपलीच उणीव होती या आत्मविश्वासाने जवळच पडलेल्या खुर्चीवर ते बसले. त्यांनी विचारले, ''महाराज अजून फिरून परत आले नाहीत वाटतं ?'' एवढे बोलून निवांतपणे बसण्यासाठी ते मोजे व बूट काढू लागले.

थोड्या वेळाने ते खुर्चीवर बेडकासारखे बसले, आणि म्हणाले, ''काल महाराजांना फार वाईट वाटलं. तरीपण आता तो प्रश्न निकालात निघाला, हेही बरंच झालं.''

ते जास्तच उत्साहात येऊन म्हणाले, ''मी तर आधीच तुमच्यासंबंधी त्यांना सांगून ठेवलं होतं. 'रामभरोसे बैठ के सबका मुजरा लेयँ.' तुम्ही आमच्या विरुद्ध थोडेच होता ? त्यांच्याकडे तुम्ही बातमी काढायलाच जात होता. मी महाराजांना ते समजावून सांगितलं होतं.''

दोघेही थोडा वेळ गप्प राहिले. माकडवाल्याच्या डमरूचा आवाज जवळ येत चालला होता. ''तुमची तब्येत तर आता अगदी 'टिचन्न' दिसतेय.''

''टिचन्न ?''

''हो ना, आता तुम्ही अगदी 'फिट्ट' झालात ना ?''

रंगनाथाने अत्यंत शिष्टाचारपूर्ण स्वरात म्हटले, ''ही तुमचीच कृपा आहे.''

''मग आता काय इरादा आहे ?''



''परत चाललोय. इतके दिवस रिसर्चचं काम तसंच पडून राहिलं. या उन्हाळ्यात ते पुरं करायचं आहे.''

यावर त्यांनी बाष्कळपणाने पुष्कळ गोष्टी सांगितल्या त्यांचे तात्पर्य हे होते की रंगनाथ इतिहासाचा मोठा विद्वान आहे, परंतु बहुतेक लोक अडाणी आहेत, विद्यापीठे म्हणजे तबेले आहेत आणि मोठे मोठे प्रोफेसर ही निव्वळ भाड्याची तट्टे आहेत.

रंगनाथाने त्यांच्या त्या बडबडीत मुळीच रुची दाखविली नाही. त्यांनी त्याला विचारले, ''तुम्हाला चान्स मिळणे कितपत शक्य आहे ? या वर्षी तिथं लेक्चरर बनाल तुम्ही.

''सध्या तरी तो प्रश्नच उपस्थित होत नाही.''

प्रिन्सिपॉल साहेबांनी आपली खुर्ची दोन इंच पुढे सरकविली; आणि म्हटले, ''तुम्हांला माहीतच आहे की राजीनामा दिलाय. आमच्या इथं इतिहासाच्या लेक्चरराची जागा रिकामी झाली. तिथंच तुम्ही का येत नाही ? मग मामांच्या घरी राहा, कॉलेजात दोन तास शिकवा आणि उरलेल्या वेळात रिसर्च करा.''

आपल्या शरीरातील सारे रक्त उसळून सापाप्रमाणे आपल्या मस्तकात पोचले आहे, असा रंगनाथाला भास झाला. तो कडवटपणाने म्हणाला, ''मी तुमच्या इथं नोकरी करीन ? आणि तीही खन्नांच्या जागी ?''

प्रिन्सिपॉल साहेबांच्या चेहऱ्यावर मुळीच आठी पडली नाही. ते म्हणाले, ''मी बैद महाराजांशी बोललोय.''

रंगनाथ पूर्वीच्याच कडवटपणाने म्हणाला, ''माझ्या डोळ्यासमोर घडलेली गोष्ट आहे. खन्नांना इथून कसं काढून टाकण्यात आलं ते मी पाहिलंय —''

प्रिन्सिपॉल उदासपणे म्हणाले, ''आता तुम्हांला काय सांगावं ? तुम्हीही असं बोलता. हे तर गटबाजीचं बोलणं झालं.''

एक इसम फाटकी लुंगी गुंडाळून, त्यावर काळा तेलकट सदरा अंगात घालून कुडबुडे वाजवीत सनीचराच्या दुकानाजवळ आला. त्याच्या बरोबर एक माकड आणि एक माकडीण स्टेजवर नाचण्याचा पोषाख घालून चालले होते. त्यांच्या मागोमाग अनेक लहान - लहान मुले आरडा - ओरडा करीत येत होती. त्या गर्दीत काही कुत्रीही होती. त्यांना भिवविण्यासाठी तो इसम मधूनच 'कडाक्' करून आपले कुडबुडे डोकीवर नेत असे.

त्या कुडबुड्याच्या आवाजामुळे प्रिन्सिपॉल साहेबांना जोराने बोलावे लागले. ते म्हणाले, ''ती जागा खन्नाच्या जाण्यामुळं झाली की मालवीयाच्या मरण्यामुळं झाली याच्याशी तुम्हांला काय करायचंय ? तुमच्या घरची बाग आहे. तुम्ही आंबे खा. झाडं कशाला मोजताहात ?''

याचे काही उत्तर रंगनाथाने दिले नाही. तेव्हा ते त्याला चुचकारू लागले. 'तुम्ही' वरून 'तू' वर आले. ते म्हणाले, ''मी तर तुला घरचा मुलगा समजून सांगतो आहे. अखेर तू करणार तरी काय ? कुठं ना कुठं नोकरीच करणार ना? इथं तर खन्नानं आपल्या इच्छेनं राजीनामा दिलाय. तिथं कुणी सांगावं, खरोखरीच एखाद्या खन्नाला कान पकडून काढून टाकण्यात आलं असेल.

''यापासून तू कुठवर अलिप्त राहाणार, बाबू रंगनाथ ? जिथं जाशील तिथं तुला एखाद्या खन्नाचीच जागा मिळणार.''

एवढे बोलून ते कठड्यापासून थोड्या अंतरावर उभ्या असलेल्या माकडवाल्याकडे वळले आणि हाताच्या जोरदार इशाऱ्यांनी त्याला मसणात जाण्याचा सल्ला देऊ लागले.

रंगनाथाचा चेहरा रागाने लाल झाला. आवाज चढवून जणू त्या आवाजाबरोबर आपण सत्याचा ध्वजही उंच फडकवीत आहोत अशा थाटात तो म्हणाला, ''प्रिन्सिपॉल साहेब, तुमच्या या बडबडीची मला किळस येतेय. बंद करा ती बडबड.''

प्रिन्सिपॉलनी त्याचे हे बोलणे मोठ्या आश्चर्याने ऐकले. नंतर उदास होऊन ते म्हणाले, ''बाबू रंगनाथ, तुझे विचार फार उच्च आहेत. परंतु एकूण विचार करता त्यांवरून हेच सिद्ध होतं की तू गद्धा आहेस.''

यानंतर संभाषणात पेचप्रसंग निर्माण झाला. बोलणेच खुंटले. तो माकडवाला मसणात जाण्याऐवजी तेथेच जोरजोराने गाऊ लागला होता आणि त्याचे कुडबुडे आता एका नव्या तालावर वाजू लागले होते. थोड्याच अंतरावर काही कुत्री शेपटी हलवीत, कंबर लचकवीत, भुंकत होती. मुले गोल वर्तुळ करून उभी होती. दोन्ही माकडे आपल्या मालकासमोर मोठ्या गंभीरपणे गाल फुगवून बसली होती. त्यांच्याकडे पाहिले की असे वाटत होते की जेव्हा ही उठतील तेव्हा भरतनाट्यमहून खालच्या प्रतीचे नृत्य मुळीच करणार नाहीत.

***Printed at:*** D.R. Printers & Convertors Pvt. Ltd. A-31, Sector-9, Noida, U.P.